सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ४६ वें

# दिल्ली-डायरी

( म. गांधींचीं १०-९-'४७ ते ३०-१-'४८ मधील प्रार्थनोत्तर प्रवचनें )

★

अनुवादक

**साने गुरुजी**

फेब्रुवारी, १९४९ ]

मूल्य रु. १०–००

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

*

[ नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, यांच्या परवानगीनें
हें पुस्तक प्रकाशित केलें आहे. ]

मुद्रक
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनवार, पुणें २

# प्रस्तावना

आपल्या आयुष्याच्या अखेरच्या साडेचार महिन्यांत गांधीजींनीं प्रार्थनोत्तर जीं प्रवचनें केलीं, तीं सुमारें चारशें पृष्ठांच्या या ग्रंथांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. नांवांत सूचित केल्याप्रमाणें हें पुस्तक म्हणजे खरोखर ता. १० सप्टेंबर '४७ ते ३० जानेवारी '४८ पर्यंतच्या गांधीजींच्या दिल्लींतील वास्तव्याची रोजनिशीच होय. अनेकांचा जीवितनाश, अपरिमित वित्तनाश आणि याहूनहि अधिक म्हणजे जीवनाला अत्यावश्यक असणाऱ्या नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचा नाश घडविणाऱ्या घटनांमुळें म. गांधी किती दुःखी झाले होते, तें सर्वांना माहीतच आहे. त्यांच्या हृदय-व्यथेचें आणि नष्ट पावलेल्या मानव-प्रतिष्ठेच्या पुनरुत्थानासाठीं त्यांनीं केलेल्या महान् प्रयत्नांचें दर्शन या पुस्तकाच्या पानापानांतून कोणाहि वाचकास होऊं शकेल. त्यांच्या नेहमींच्या लेखन-भाषणांप्रमाणेंच या प्रवचनांतहि त्यांनीं जीवनाच्या विशाल क्षेत्रांतील विविध विषयांची चर्चा केली आहे. पण शांततेची प्रस्थापना आणि जातीय सलोखा—विशेषतः हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यांतील सलोखा—यांवरच त्यांचा मुख्य भर आहे. परंतु गांधीजींच्या समोर जें ध्येय होतें, तें साध्य होण्याऐवजीं त्यांना त्यांचे प्राण मात्र गमावावे लागले, हें आपणां सर्वांच्या जीवनाचें आणि कार्याचें दुःखपूर्ण भाष्य होय ! स्वतःकडून जातीय ऐक्याची स्थापना होऊं न शकल्यास जिवंत राहण्यांत त्यांना रस राहिला नव्हता, ही गोष्ट या पुस्तकाच्या वाचनानें स्पष्ट होत आहे; आणि गेल्या ३० जानेवारीला आपल्या देशांत जी करुण घटना घडून आली तिचें पूर्वचिन्ह म्हणूनच कीं काय, निराशेचा सूरहि या प्रवचनांतून उठत असलेला आपणांस आढळून येतो. सत्य आणि अहिंसा अनेक अगम्य मार्गांनीं कार्य करीत असतात; आणि असाहि संभव आहे, कीं आपल्या जिवंतपणीं महात्माजी जो चमत्कार करून दाखवूं शकले नाहींत, तो आतां आपल्या मृत्यूनें ते करून दाखवितील. ज्या शांततेसाठीं आणि सलोख्यासाठीं गांधीजींनीं आपलें सर्व आयुष्य खर्च केलें आणि अखेरीस आपल्या प्राणांचेंहि बलिदान केलें, त्या शांततेची आणि सलोख्याची पुनः संस्थापना होण्यासाठीं या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

१७-३-'४८

—राजेंद्रप्रसाद

# अनुक्रमणिका

| प्रकरण | तारीख | पृष्ठें |
|---|---|---|
| १. | १०–९–'४७ | ३–७ |
| | मृतांचें शहर ३ | |
| | निर्वासितांचा प्रश्न ४ | |
| | खरा शीख ६ | |
| २. | १२–९–'४७ | ७–१० |
| | सरहद्द प्रांतांतील वार्ता ७ | |
| | क्रोध म्हणजे अविवेकाचा लहान भाऊ ७ | |
| | झालें गेलें विसरा ८ | |
| | राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १० | |
| ३. | १३–९–'४७ | १०–१३ |
| | सरकारवर विश्वास ठेवा १० | |
| | प्रभु सर्वांचा त्राता ११ | |
| | दोन्ही सरकारांचें कर्तव्य १२ | |
| | आसफअलीसाहेब १२ | |
| ४. | १४–९–'४७ | १३–१४ |
| | आपला अधःपात १३ | |
| | निर्वासितांच्या छावण्यांतील सफाई १३ | |
| | सरकार आणि जनता यांचें कर्तव्य १४ | |
| ५. | १५–९–'४७ | १५–१६ |
| | आत्मपरीक्षण १५ | |
| | आपल्या सरकारवर भरंवसा ठेवा १६ | |
| ६. | १७–९–'४७ | १७–२० |
| | जबरदस्ती नाहीं १७ | |
| | क्रोध आंवरा १८ | |
| | कामगारांचें कर्तव्य १९ | |

७. १८–९–'४७ २०–२१

अविभाज्य प्रार्थना २०
गजेंद्रमोक्ष २०
दिल्लीनंतर पंजाब २१
लष्कराचें नि पोलिसांचें कर्तव्य २१

८. १९–९–'४७ २२–२३

अतिशयोक्ति टाळा २२
शूर आणि निर्भय बना २२

९. २०–९–'४७ २३–२६

ईश्वरच भयहर्ता २३
अल्पसंख्याकांचें रक्षण २४
भाऊच शत्रू झाले २४
शरणार्थी २५
मुस्लिमांचीहि हिंदी संघराज्यनिष्ठा आवश्यक २५

१०. २१–९–'४७ २६–२८

विरोधकालाहि मान २६
फलहीन वृक्ष सुकूं लागतो २७
आपलीं घरें सोडूं नका २७
सरकारनें राजीनामा केव्हां द्यावा ? २८

११. २२–९–'४७ २९–३१

विरोधकांचें कर्तव्य २९
निरोगी सहिष्णुता २९
जर हिंदुस्थान घसरेल तर ? ३०
बिगरपरवाना शस्त्रास्त्रें ३०
बहुसंख्याकांचें कर्तव्य ३१

१२. २३–९–'४७ ३२–३४

सार्वजनिक माफी ३२
ज्ञान-रत्नें ३२

शूराप्रमाणें मरण्याची कला ३३
निर्वासितांसाठीं घरें ३४

१३. २४–९–'४७ ३४–३५
भारताची दुबळी नौका ३४
सरकारांना अवसर द्या ३४
जुनागड ३५

१४. २५–९–'४७ ३६–३८
हिंदी संघराज्य-सरकारचें कर्तव्य ३६
धर्माचा विजय ३६
देशद्रोह्याला शिक्षा ३७
पोलिसांचें नि लष्कराचें कर्तव्य ३७
आग कशी विझवायची ? ३७

१५. २६–९–'४७ ३८–४१
ग्रंथसाहेब ३८
माझी महत्त्वाकांक्षा ३८
लज्जास्पद वस्तु ३९
अन्याय सहन नाहीं करतां कामा ३९
हिंदुधर्माचा नाश फक्त हिंदूच करूं शकतील ४०
सत्यमेव जयते ४१

१६. २७–९–'४७ ४१–४४
राम हाच सर्वोत्कृष्ट धन्वन्तरी ४१
ग्रंथसाहेबांतील तो चरण ४२
ही का चूक आहे ? ४३
सैतानी असहिष्णुता नि ढवळाढवळ ४३
माझी श्रद्धा का दुबळी झाली ? ४४

१७. २८–९–'४७ ४५–४८
चार्चिलचा अविवेक ४५

१८. २९–९–'४७ ४८–४९
भ्रातृहत्येचा परिणाम ४८

नगर वाचनालय, सातारा.



१९. ३०-९-'४७ ४९-५१

सरकारचें कर्तव्य ४९

व्यक्तीची शक्ति ५०

हिंदुस्तानी मुसलमान ५१

२०. १-१०-'४७ ५१-५४

सेवेचें क्षेत्र अनंत आहे ५१

शान्तीच्या अटी ५२

बदला घेणें हा खरा उपाय नव्हे ५३

मुसलमानी दोस्तांच्या तारा ५४

दुष्टपणाची नि रानवटपणाची हद्द ! ५४

२१. २-१०-'४७ ५५-५७

शीखांच्या गुरूंचा संदेश ५५

कृपाणाचा योग्य उपयोग ५६

जन्मदिवसाचें अभिनंदन ५६

२२. ३-१०-'४७ ५७-५९

सारेच समान दोषी ५७

सत्याग्रह आणि दुराग्रह ५७

सत्कर्म हेंच सत्कर्माचें फळ ५८

स्वच्छता आणि निर्वासितांच्या छावण्या ५८

एक फ्रेंच मित्राचा सल्ला ५९

२३. ४-१०-'४७ ६०-६१

कांबळ्यांची मागणी ६०

२४. ५-१०-'४७ ६२-६४

माझें आजारीपण ६२

कांबळीं ६२

विसंगत सूचना ६२

पुनश्च चर्चिल ६३

२५. ६-१०-'४७ ६४-६८

अन्नाचा प्रश्न ६४

स्वावलंबन ६५
परकी मदतीचा अर्थ ६६
केंद्रीकरण कीं विकेंद्रीकरण ६६
टंचाई कशी दूर करावी ? ६७
अध्यक्ष ट्रूमन यांचा सल्ला ६७

२६. ७–१०–'४७ ६८–७१

अधिक कांबळ्यांची मागणी ६८
कॉंग्रेसच्या ब्रीदाला जागा ६९
अन्नधान्य-नियंत्रण ६९
मंत्र्यांना धोक्याची सूचना ६९
रामराज्याचें रहस्य ७०

२७. ८–१०–'४७ ७१–७३

पैसे पाठविण्यापेक्षां कांबळीं पाठवा ७१
शूरांची अहिंसा ७१
वर्तमानपत्रांचें कर्तव्य ७२
लष्कराचें नि पोलिसांचें कर्तव्य ७३

२८. ९–१०–'४७ ७३–७५

लवकर घोंगड्या द्या ७३
नुसतें शांतपणें ऐकणें पुरेसें नाहीं ७४
पाकिस्तानांतील अल्पसंख्य ७४

२९. १०–१०–'४७ ७५–७६

अधिक घोंगड्या आल्या ७५
अन्नवस्त्रांचा तुटवडा ७५

३०. ११–१०–'४७ ७७–७८

चरखा-जयंती ७७
हरिजनांसाठीं पट्टे ७७
दसरा आणि बक्रईद ७८
दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह ७८

३१. १२–१०–'४७ ७९–८०
शरणार्थींना दोन शब्द ७९
३२. १३–१०–'४७ ८०–८२
शरणार्थींना ८०
३३. १४–१०–'४७ ८२–८४
थोर उदाहरण ८२
शीख मित्रांशीं बोलणें ८२
सरकार दुबळें नका करूं ८३
स्वतःच्या दोषांकडे पहा ८३
३४. १५–१०–'४७ ८४–८५
सोन्यासारखीं कृत्यें गोळा करा ८४
हिंदी कीं हिंदुस्तानी ? ८५
३५. १६–१०–'४७ ८६–८८
म्हैसूरचें उदाहरण ८६
सदाचार ८६
खात्यांपासून अपेक्षा ८७
पूर्व पाकिस्तानांतील अल्पसंख्य ८७
३६. १७–१०–'४७ ८८–९१
सार्वभौम उपाय ८८
कांबळीं ८९
नियंत्रणें उठवा ८९
दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह ९०
३७. १८–१०–'४७ ९१–९३
कुरुक्षेत्रावर कांबळीं धाडलीं ९१
राष्ट्रीय भाषा ९१
३८. १९–१०–'४७ ९३–९५
हें का स्वराज्य ? ९३
एकच मार्ग ९४

३९. २०-१०-'४७ ९६-९८
हा का शेवटचा गुन्हा ! ९६
एक अनावृत पत्र ९७
४०. २१-१०-'४७ ९८-९९
आणखी एक गुन्हा ९८
कायद्यांत ढवळाढवळ नको ९९
४१. २२-१०-'४७ ९९-१०२
एका उर्दू दैनिकांतील उतारा १००
संस्थानें कोठें चाललीं ? १००
दसरा आणि बक्रईद १०१
४२. २३-१०-'४७ १०२-१०४
मित्रांच्या घरीं राहणाऱ्या निर्वासितांना १०२
आणखी एक गुन्हा १०३
वर्ध्याची महारोगी-परिषद् १०३
४३. २४-१०-'४७ १०४-१०६
एकच एक ध्यास १०४
तुमची श्रद्धा तेजस्वी राखा १०५
महारोग्यांचा प्रश्न १०५
४४. २५-१०-'४७ १०६-१०८
दिल्लीचे कैदी १०६
कैद्यांचे वर्ग पाडणें अनिष्ट १०६
कैद्यांचें कर्तव्य १०७
४५. २६-१०-'४७ १०८-११०
दसऱ्याची शिकवण १०८
काश्मिरांतील घटना १०९
कलकत्त्यांत शांति आहे १०९
शाबास रतलाम ! ११०
४६. २७-१०-'४७ ११०-११२
सोडून जाण्याची सक्ती ११०

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

नैतिक शक्ति विरुद्ध भौतिक शक्ति १११
नागरिकांचें कर्तव्य १११
४७. २८–१०–'४७ ११२–११४
सचोटीचा व्यवहार ११२
अलीगडचे विद्यार्थी ११२
तिकिटाशिवाय जाण्याची घातुक प्रथा ११३
४८. २९–१०–'४७ ११४–११५
दिलीप कुमार रॉय ११४
काश्मीरी वेदना ११४
४९. ३०–१०–'४७ ११६–११७
अहिंसेची रीत ११६
५०. ३१–१०–'४७ ११७–११८
आदर्श वर्तन ११७
मन हेंच मंदिर ११७
श्रीमंत नि गरीब ११८
सक्तीनें धर्मांतर ११८
५१. १–११–'४७ ११९–१२०
शेख अब्दुल्ला ११९
कुरुक्षेत्रांतील निर्वासित १२०
५२. २–११–'४७ १२०–१२४
संपूर्ण सहकार्याची आवश्यकता १२०
काळाचें महत्त्व १२२
आझाद हिंद फौजेचे अधिकारी १२२
पाकिस्तान चिथावणी देतें ? १२३
५३. ३–११–'४७ १२४–१२६
जातीयतेचें विष १२४
अन्न-नियंत्रणें उठवा १२४
नियंत्रणामुळें अनिष्ट निर्मिति १२४
मुरब्बी लोकांचा सल्ला १२६

लोकशाही आणि विश्वास १२६

५४. ४-११-'४७ १२६-१३१

क्रोधाचा संभव १२६

असत्य विरुद्ध अर्धवट सत्य १२७

सुखी निर्वासित १२८

दिल्लींतील कर्तव्य १२८

आक्षेपांचें निरसन १२९

डुकरांची हत्या १२९

पाकिस्तान का धार्मिक राष्ट्र आहे? १३०

गायीगुरांची निगा १३०

५५. ५-११-'४७ १३१-१३४

हरिजनांची कामाला लायक बनण्याची पात्रता १३१

शाकाहार कसा फैलावेल? १३२

आपल्या घरीं रहा १३२

अहिंसेवर अचल श्रद्धा १३३

योग्य माणसाची स्तुति केलीच पाहिजे १३३

५६. ६-११-'४७ १३४-१३७

विपर्यस्त वार्ता १३४

नियंत्रणें दूर करा १३५

खादी विरुद्ध गिरणीचें कापड १३६

५७. ७-११-'४७ १३७-१३८

टेहर गांवाचा दौरा १३७

एक धडा १३७

शरणार्थींना सल्ला १३८

५८. ८-११-'४७ १३८-१४१

शीख-धर्मग्रंथांतून पठण १३९

कापसाच्या गांठींविषयीं १३९

खादीची निर्मिति १४०

स्वावलंबन आणि सहकार १४०

भूतदयेची मूर्ति १४१

५९. ९–११–'४७ १४१–१४४

दिवाळी-उत्सव नको १४२

परकीय वसाहतींतील स्वातंत्र्य १४३

६०. १०–११–'४७ १४४–१४६

देवाचे सेवक बना १४४

पानिपतला भेट १४५

डॉ. गोपीचंद १४६

६१. ११–११–'४७ १४७–१४९

जुनागड १४७

हिंदी संघराज्यांत सामील होणें १४७

काश्मीर आणि हैदराबाद १४९

काश्मीरची फाळणी १४९

६२. १२–११–'४७ १४९–१५१

दीपावलि-उत्सव १४९

खरा दीपोत्सव १५०

कलंकित काश्मीर १५०

द्वेष नि संशय दूर करा १५०

६३. १३–११–'४७ १५१–१५३

विक्रम संवत् १५१

असुरी शक्तींना जिंकून घेणें १५१

मागें जाणें नाहीं १५२

धर्मांत सक्तीला जागा नाहीं १५२

अखिल भारतीय काँग्रेस-समिति १५३

६४. १४–११–'४७ १५३–१५५

रामनामाची सर कशाला नाहीं १५३

शरणार्थींनीं परत जाणें १५४

६५. १५–११–'४७ १५५–१५६

राष्ट्रपिता ? १५५

नियंत्रणें अहितकारी १५६
६६. १६–११–'४७ १५६–१५९
ईश्वरप्राप्ति १५६
रामपूर संस्थान : पूर्वी आणि आतां १५६
सत्याग्रह : अत्यन्त प्रभावी शस्त्र १५७
भावार्थ १५८
दक्षिण आफ्रिकेबाबत हिंदु-मुस्लिम-ऐक्य १५८
६७. १७–११–'४७ १५९–१६२
हिंदुस्थान आणि द. आफ्रिका १५९
ब्रिटिश राष्ट्रसंघांतील हिंदुस्थान १६०
वर्ण : पूर्वग्रह १६०
विचारानुरूप मनुष्य १६१
जनतेचा आवाज १६२
६८. १८–११–'४७ १६३–१६४
अ. भा. कॉं. समितीचे ठराव १६३
हिंदु-मुस्लीम-संबंध १६३
पानिपतच्या मुस्लिमांचें उदाहरण १६३
नियंत्रणें दूर केल्यावरची अपेक्षा १६४
६९. १९–११–'४७ १६४–१६९
लज्जास्पद दृश्य १६४
शीखांचे दोष १६६
कृपाणाचा हक्क १६६
लष्कर आणि पोलिस १६७
शेरवाणींचें हौतात्म्य १६८
अभिमान आणि मैत्री १६९
७०. २०–११–'४७ १६९–१७२
अतःपर असहकार नाहीं १६९
ओखलाला भेट १७०
अंमलदारांसंबंधीं १७०

निर्वासितांमधील दुराचार १७१
हिंदुस्थानांतील गायीगुरें १७१
गोशाळांची व्यवस्था १७२

७१. २१-११-'४७ १७२-१७६
हिंदुस्थानांतील दुग्धालयें १७२
वांसरांची कत्तल १७३
सतीशबाबूंची गोसेवा १७३
हिंदु आणि हिंदुधर्म १७४
सर्वसामान्य छावणीसंबंधीं १७५
ईश्वराचा द्रोह १७५
रोमन कॅथॉलिकांचा छळ १७५

७२. २२-११-'४७ १७७-१७९
सोनपतचे खिस्ती १७७
जशास तसें १७७
सदाचाराविषयीं सांगणें १७७
निर्वासितांमध्यें परस्पर-सहकार १७८
सरकारचा गोंधळ १७९
व्यापाऱ्यांना विनंति १७९

७३. २३-११-'४७ १७९-१८१
प्रार्थनेच्या वेळेस शान्ति १७९
मर्यादेच्या पलीकडे १८०
हिंसेचें समर्थन नाहीं १८०
हरिजनांचा छळ १८०

७४. २४-११-'४७ १८१-१८५
विधायक कामाची जरुरी १८१
ताजी करुण घटना १८२
कृपाणाचें रहस्य १८३
दुष्ट सूचना १८४
पाकिस्तानचीं पापकृत्यें १८५

७५. २५-११-'४७ १८५-१८८
शरणार्थी कीं दुःखी ? १८५
मुसलमानांच्या घरांचा कब्जा नका घेऊं १८६
वाजवी मागणी १८७
परत जाण्याची शर्त १८७
७६. २६-११-'४७ १८८-१९०
निराधार आरोप १८८
अपहृत भगिनी १८८
पीकपाण्याच्या वेळेस मदत १८९
किसान-राज्य १८९
७७. २७-११-'४७ १९०-१९२
अशक्य कांहींच नाहीं १९०
शेरे काश्मीर १९१
खरें असेल तर भयंकर १९१
७८. २८-११-'४७ १९२-१९५
गुरु नानकांची जयंति १९२
व्यापारांत जातीयता नाहीं १९३
सोमनाथ देवालयाचा जीर्णोद्धार १९४
पापाला प्रोत्साहन का द्यायचें ? १९४
काठेवाडांत शांति १९५
७९. २९-११-'४७ १९५-१९७
दिल्लींत दारू १९५
मशिदींचें नुकसान १९५
अपहृत मुली १९६
नियंत्रणें १९६
ऐषआरामी वस्तूंवर कर बसवा १९७
८०. ३०-११-'४७ १९७-२००
बरोबर आसन बाळगा १९७
काठेवाडची तार १९८

नगर वाचनालय, सातारा.



हिंदुमहासभा आणि रा. स्व. संघ यांना विनंति १९९
मशिदींत मूर्ती १९९
८१. १–१२–'४७ २००–२०३
'जर-तर' कशाला ? २००
सत्यमय असा २०१
सत्यसंशोधन २०२
८२. २–१२–'४७ २०३–२०६
पानिपतला भेट २०३
दोन मंत्री २०४
निर्वासितांचीं दुःखें २०५
८३. ३–१२–'४७ २०६–२०९
वचनांचें महत्त्व २०६
सिंधमधील हरिजन २०७
पुनश्च काठेवाड २०७
दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी २०८
८४. ४–१२–'४७ २०९–२१२
परदेशांतून प्रचार कां ? २०९
चांगली बातमी २१०
जातीय व्यापारी संघ २१०
ब्रह्मदेशाचे पंतप्रधान २११
८५. ५–१२–'४७ २१२–२१४
मुसलमान आरोप मागें घेतात २१२
नियंत्रणें २१३
८६. ६–१२–'४७ २१४–२१५
शेजारधर्म २१४
८७. ७–१२–'४७ २१५–२१७
अपहृत स्त्रिया २१५
८८. ८–१२–'४७ २१७–२१९
एका मुस्लिम संस्थेचा इशारा २१७

सिंधमधील केविलवाणीं पत्रें २१७
पुनश्च नियंत्रणें २१८
निर्नियंत्रणाचा अर्थ २१८

८९. ९-१२-'४७ २२०-२२१

हवापालट २२०
खुनाहून वाईट २२०
कस्तुरबा-निधि-कार्यकर्त्यांस २२१

९०. १०-१२-'४७ २२१-२२२

चरख्याचा अर्थ २२१
चरखा आणि जातीय ऐक्य २२२
जगा नि जगूं द्या २२२

९१. ११-१२-'४७ २२३-२२४

कुराणांतील सुरा २२३
मुस्लिम शान्तिदूतांचें आश्वासन २२३

९२. १२-१२-'४७ २२४-२२६

निर्वासितांचे हाल २२४
दुसरी बाजू २२५
कलकत्त्यांत गुंडागिरी २२६

९३. १३-१२-'४७ २२६-२२७

चरख्याचा संदेश २२६

९४. १४-१२-'४७ २२७-२२९

मित्रभावाचें कर्म २२७
नई तालीम २२८

९५. १५-१२-'४७ २२९-२३४

लज्जास्पद बेकायदा वर्तन २२९
गुंडगिरी आणि लांचलुचपत २३०
धूर्त डाव २३०
विश्वासानें विश्वास वाढतो २३२

अयोग्य भीति २३३
अखंड हिंदुस्थानचे नागरिक २३३

९६. १६–१२–'४७ २३४–२३५

अनियंत्रणाचे परिणाम २३४
सनदी नोकर नि त्यांचे पगार २३५

९७. १७–१२–'४७ २३५–२३८

सक्तीनें कब्जा घेणें २३५
गोड बोलणीं २३६
परतीच्या अटी २३६
पूर्व आफ्रिकेंतील हिंदीजन २३७

९८. १८–१२–'४७ २३८–२४०

समजुतींतील गोंधळ २३८
केवळ अज्ञान २३९
धर्माचा इन्कार २४०

९९. १९–१२–'४७ २४०–२४२

गुरगांव जिल्ह्यांतील एका
खेड्याला भेट २४०
किंमती आणि निर्नियंत्रण २४१
पेट्रोलवर नियंत्रण २४१
संमिश्र खत २४१

१००. २०–१२–'४७ २४२–२४४

भीति सोडा २४२
ग्रामोद्योग २४३
भांडवल आणि श्रम २४३

१०१. २२–१२–'४७ २४४–२४८

भ्रष्ट नका करूं २४४
हिंदी संघराज्यांतील मुसलमानांचें कर्तव्य २४५
कॉंग्रेसचे असा २४६

१०२. २३-१२-'४७ २४८-२५२
प्रार्थनेची वेळ २४८
भावलपूरचे मुसलमानेतर २४८
पाकिस्तानांतील निर्वासित २४९
नौखालींतील बातमी २५०
१०३. २४-१२-'४७ २५२-२५४
ही का अहिंसा? २५२
अनाठायीं राग २५२
नाताळचें अभिनंदन २५३
१०४. २५-१२-'४७ २५४-२५६
काश्मीरचा सवाल २५४
जम्मू येथील घटना २५५
पाकिस्तानचा अभिमान २५५
गझनीच्या महंमुदाला हांक २५६
१०५. २६-१२-'४७ २५७-२५९
तिबिया कॉलेज २५७
अपहृत स्त्रिया २५८
सौदा नको २५८
१०६. २७-१२-'४७ २५९-२६१
विचार, वाणी नि कृति यांत एकरूपता २५९
पंचायतीचें कर्तव्य २५९
गुरांढोरांची सुधारणा २६०
जमिनीचा कस वाढविणें २६०
आदर्श व्हा २६१
१०७. २८-१२-'४७ २६१-२६३
खुल्या मैदानांतील सभा २६१
नियंत्रणें दूर करणें २६१
१०८. २९-१२-'४७ २६३-२६७
हकीमसाहेबांचें स्मारक २६३

खुल्या मैदानांतील सभा २६३
पुनश्च काश्मीर २६४
देणगी २६६
विचित्र विरोध २६६
हिंदी मुसलमानांस सल्ला २६६
१०९. ३०–१२–'४७ २६७–२७०
सामुदायिक शिस्त २६७
भागलपूरमधील हिंदू आणि शीख २६७
सिंधमधील मुसलमानेतर २६८
विठ्ठलाचें मंदिर २६८
मुंबईतील नियंत्रण २६९
११०. ३१–१२–'४७ २७०–२७२
हृदयपालट नाहीं तोंवर परत नका फिरूं २७०
निर्वासित परत जाईपर्यंत शान्ति नाहीं २७०
निर्वासित आणि प्रामाणिक मेहनत २७१
संपूर्ण प्रार्थना ध्वनिक्षेपित करा २७१
अतिशयोक्तीनें कार्यनाश २७२
१११. १–१–'४८ २७२–२७३
आध्यात्मिक अन्न २७२
हरिजन आणि दारू २७२
११२. २–१–'४८ २७३–२७४
नौखालींतील टोपी २७३
भजन २७४
अविश्वास म्हणजे भीति २७४
११३. ३–१–'४८ २७५–२७६
खरी शान्ति अंतरीं २७५
छावणींतील जीवनाचा आदर्श २७५
११४. ४–१–'४८ २७६–२७८
युद्धाचा अर्थ २७६

भित्रेपणाहूनहि वाईट २७७

११५. ५–१–'४८ २७८–२८२

निर्नियंत्रणाचा परिणाम २७८
अन्नधान्य २७९
कडधान्यें २७९
डाळी २७९
तेलें २७९
गरम आणि रेशमी कापड २७९
सुती कापड आणि सूत २८०
पेट्रोलचें वांटप २८०
कापड-नियंत्रण २८२

११६. ६–१–'४८ २८२–२८४

ही बळजोरी थांबली पाहिजे २८२
संपाचा प्लेग २८३
खरी लोकशाही २८३
आयात-निर्यात मालाची तोंडमिळवणी २८४

११७. ७–१–'४८ २८५–२८७

चुकीचा उपवास २८५
विद्यार्थ्यांचा संप २८५
निर्वासितांचीं दुःखें २८५
निर्वासितांचें कर्तव्य २८६
कराचींतील घटना २८६

११८. ८–१–'४८ २८७–२८९

हरिजन आणि मद्यपान २८७
सत्याग्रह कां नाहीं ? २८८
हिंदी संघराज्यांत जातीयता नको २८८
विद्यार्थ्यांतील पक्ष २८९
भावलपूरचें शिष्टमंडळ २८९

११९. ९-१-'४८ २८९-२९२
धीरता नि शूरता हवी २९०
घरांचा प्रश्न २९०
गैरसमज २९१
बिर्लाभवन कां? २९१
सभ्य चोर २९१
१२०. १०-१-'४८ २९२-२९४
शिस्तीची जरुरी २९२
भावलपूरच्या मित्रांना २९२
इराण आणि हिंदुस्थान २९३
स्वतः निर्णय घेत जा २९४
१२१. ११-१-'४८ २९४-२९६
प्रार्थना-सभेंत शान्ति २९४
आंध्रमधील पत्र २९५
पक्षांना प्रार्थना २९६
आत्मघातकी प्रवृत्ति २९६
१२२. १२-१-'४८ २९६-३०२
सार्वभौम सल्लादाता परमेश्वर २९६
आशीर्वाद द्या २९८
मृदुता नको २९९
आत्मशुद्धीसाठीं हांक ३००
१२३. १३-१-'४८ ३०२-३०५
भावलपूरचे निर्वासित ३०२
दोषार्ह कोण? ३०३
हिंदू आणि शीखांचें कर्तव्य ३०४
दिल्लीची कसोटी ३०४
१२४. १४-१-'४८ ३०५-३११
तारांचा, पत्रांचा वर्षाव ३०५
पाकिस्तानला दोन शब्द ३०६

माझें स्वप्न ३०८
तिळतिळ मारणें ३०८
सरदार ३०९
उपवासाचा हेतु ३१०
विपर्यासास वाव नाहीं ३११

१२६. १६-१-'४८ ३१२-३१५
ईश्वराची कृपा ३१२
केवळ शुद्ध सदिच्छा ३१३
उपवासाला योग्यतम उत्तरें ३१४

१२७. १७-१-'४८ ३१५-३१७
हृदयाची शुद्धि ३१५
पाकिस्तानला दोन शब्द ३१६
उपवासामुळें सुखी ३१७

१२८. १८-१-'४८ ३१७-३२१
पुढील काम ३१७
उपवासाचें पारणें ३२०
प्रतिज्ञेचा भावार्थ ३२०

१२९. १९-१-'४८ ३२१-३२४
अभिनंदन आणि चिंता ३२१
इशारा ३२३
समोरचें काम ३२३

१३०. २०-१-'४८ ३२४-३२८
विवेक राखा ३२४
प्रधान मंत्र्यांचें धीरोदात्त वर्तन ३२५
काश्मीरचा प्रश्न ३२६
ग्वाल्हेर, भावनगर आणि काठेवाडी संस्थानें ३२७

१३१. २१-१-'४८ ३२८-३३१
प्रार्थनेच्या वेळेस बॉंब ३२८
ही हिंदुधर्माची सेवा नव्हे ३२९

बॉंब फेकणाऱ्याची कींव करा ३२९
भावलपूर आणि सिंध ३३०
चुकीचें उदाहरण ३३१

१३२. २२–१–'४८ ३३१–३३४

पंडित नेहरूंचें उदाहरणं ३३२
दारिद्र्याची लाज नको ३३२
पुन्हां ग्वाल्हेर ३३३

१३३. २३–१–'४८ ३३४–३३७

नेताजींचा जन्मदिन ३३४
सावधगिरीचा इशारा ३३५
म्हैसूर, जुनागड आणि मीरत ३३५
देशद्रोह्यांचा प्रश्न ३३६

१३४. २४–१–'४८ ३३७–३३८

कैद्यांची अदलाबदल आणि अपहृत स्त्रिया ३३७

१३५. २५–१–'४८ ३३८–३४१

दिल्लींत शांति ३३८
मेहरौली येथील उरूस ३३८
मला मोकळें करा ३३९
भाषावार प्रान्त-विभागणी ३४०
सीमा-समिति नको ३४१

१३६. २६–१–'४८ ३४१–३४४

स्वातंत्र्य-दिन ३४१
निर्नियंत्रण आणि वाहतुक ३४३
लांचलुचपतीचा भस्मासुर ३४४

१३७. २७–१–'४८ ३४५–३४६

मुसलमान आणि प्रार्थनावृन्द ३४५
मेहरौली येथील उरूस ३४५
सीमा प्रान्तांत कत्तल ३४६

अजमीरचे हरिजन ३४६
मीरपूरचे बळी ३४६

१३८. २८–१–'४८ ३४७–३४९

भावलपूरच्या मित्रांना ३४७
दिल्लींत शांति ३४७
दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह ३४७
म्हैसूरमधील मुसलमान ३४८
दात्यांना दोन शब्द ३४८

१३९. २९–१–'४८ ३४९–३५१

भावलपूरला शिष्टमंडळ ३४९
त्यांचा सेवक ३५०
भाकरीसाठीं काम ३५०
किसान ३५१
मद्रासेंत अन्नधान्याचा तुटवडा ३५१

# दिल्ली-डायरी

## १

१०-९-'४७

# मृतांचें शहर

संचारबंदी होती. त्यामुळें आजच्या प्रार्थनेला फार लोक नव्हते. तरीहि साऱ्या दिल्लीला उद्देशूनच गांधीजी बोलले. ते म्हणाले :

" जेव्हां मी शहादरा स्टेशनवर आलों तेव्हां स्वागतासाठीं सरदार, राजकुमारी इत्यादि मंडळी आली होती. मी त्यांच्याकडे पाहिलें. आज मला सरदारांच्या ओंठांवर तें चिरपरिचित हास्य दिसलें नाहीं. आज ते हंसत नव्हते. नेहमींप्रमाणें थट्टामस्करी करीत नव्हते. रेल्वेंतून उतरल्यावर जे जे भेटले, जे जे दिसले, त्या सर्वांच्या चेहऱ्यावर सरदारांच्या खिन्नतेचीच छाया पसरलेली दिसली. नेहमीं आनंदी असणारी दिल्ली आज जणूं मृतांची नगरी झाली होती. दुसरेंहि एक आश्चर्य माझ्यासाठीं वाढून ठेवलेलें होतें. ज्या भंगीवस्तींत राहण्यानें मला आनंद होतो, तेथें आज मला नेण्यांत आलें नाहीं. बादशाही बिर्लाभवनांत मला नेण्यांत आलें. याचें कारण समजल्यावर मला दुःख झालें. ज्या बिर्लाभवनांत मी पूर्वीं नेहमीं राहत असें, तेथें आज पुनः गेल्यानें मला बरेंहि वाटलें. मी भंगीवस्तींत असलों काय किंवा बिर्लाभवनांत आलों काय, दोन्ही ठिकाणीं मी बिर्लाबंधूंचाच पाहुणा असतों. त्यांचीच मंडळी माझी सर्व प्रकारची काळजी घेत असते. मला आज भंगीवस्तींत न नेतां बिर्लाभवनांत नेण्यांत आलें; परंतु हा जो फेरबदल करण्यांत आला, त्याला सरदार कारण नाहींत. वाल्मीकि-वस्तींत माझा नीट संभाळ होईल कीं नाहीं याची चिंता करीत बसण्याचा दुबळेपणा सरदारांजवळ नाहीं. भंगीवस्तींत राहिल्यानें मला फार आनंद होत असतो; परंतु तेथील घरांतून आज इतकी गर्दी आहे कीं मला तेथें राहणें अशक्य झालें आहे. नव्या दिल्लीच्या समितीचा हा दोष आहे.

# निर्वासितांचा प्रश्न

भंगीवस्तींत जेथें मी राहतों, तेथें आज शरणार्थी लोक येऊन राहिले आहेत, म्हणून बिर्लाभवनांत मला जावें लागलें. माझ्यापेक्षां शरणार्थींची जरुरी किती तरी अधिक आहे. परंतु निराश्रितांचा असा प्रश्न उभा राहणें ही गोष्ट एक राष्ट्र म्हणून आपणांस लाजिरवाणी नाहीं का? पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्याबरोबर कायदे–आझम जिना, लियाकत अली वगैरे पाकिस्तानी पुढाऱ्यांनींहि असें जाहीर केलें होतें कीं अल्पसंख्य जमातींना बहुसंख्य जमातींप्रमाणेंच वागविण्यांत येईल; कोणताहि फरक करण्यांत येणार नाहीं. दोन्ही सरकारांनीं ही गोष्ट का केवळ बाहेरच्या जगाला खुष करण्यासाठीं सांगितली होती? कीं त्यांना दुनियेला असें दाखवायचें आहे कीं आम्ही बोलतों त्याप्रमाणें वागतों, आमचा शब्द खरा करण्यासाठीं आम्ही प्राणांचें बलिदानहि करूं? आज हिंदू आणि शीख यांना स्वतःचीं घरेंदारें सोडून पाकिस्तानांतून इकडे कां यावें लागत आहे? तेथील घरंदाज, स्वाभिमानी मंडळी इकडे निघून कां येत आहेत? क्वेटा, नवाबशहा जिल्हा, कराची, येथें काय चाललें आहे? पश्चिम पंजाबांतील दुःखदायक करुणकहाण्या वाचून नि ऐकून हृदय पिळवटून निघतें. 'हें सारें गुंडांचें काम आहे, काय करणार?' असें हिंदुस्थानी नि पाकिस्तानी सरकारांनीं लाचार होऊन म्हणणें शोभत नाहीं. आपापल्या राज्यांतील प्रजेच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक सरकारच्या शिरावर आहे. ती पार पाडणें प्रत्येक सरकारचें कर्तव्य आहे. असें झालें, तसें झालें अश्या पळवाटा काढण्यांत अर्थ नाहीं. दोन्ही सरकारांनीं आपापलीं कर्तव्यें पार पाडावीं, तसें करतांना मरावें. साम्राज्यशाहीच्या चिरडून टाकणाऱ्या दडपणाखालीं कांहीं आतां काम नाहीं करायचें. परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं कायद्याचें राज्य नाहींसेंच झालें. तुम्हांला जगासमोर उभें राहायचें आहे. दिल्लीचे प्रधान जगाला का असें सांगणार कीं दिल्लीची जनता आमचें ऐकत नाहीं, हे निर्वासित कायदा मानीत नाहींत? तुम्ही का आपली दिवाळखोरी जगाला जाहीर करणार? स्वेच्छेनें नि आनंदानें निर्वासित लोक कायदा मानीत नाहींत म्हणजे काय? या लोकांना त्यांच्या वेडेपणापासून

परावृत्त करण्याची प्रधानांनीं पराकाष्ठा केली पाहिजे हताश होऊन हातपाय गाळून न बसतां असे प्रयत्न करण्यास त्यांनीं झटावें.

गांधीजी बोलत होते. त्यांचा आवाज फारच हळू होता. तरीहि मृतवत् दिसणाऱ्या दिल्लींतील आपल्या संचाराची हकीकत ते सांगत होते. ते म्हणाले : मी ज्या घरांत राहतों, तेथें फळ नाहीं, भाजीपाला नाहीं ! कांहीं मुसलमानांनीं गोळीबार केला म्हणून भाजीबाजारांत भाजी मिळूं नये ही किती शरमेची गोष्ट ! हिंडतांना मीं ऐकलें कीं निराश्रितांना अन्न मिळत नाहीं. जें कांहीं देण्यांत येतें तें खाण्यालायक नसतें. परंतु सरकारचा यांत दोष आहे त्याप्रमाणें निराश्रितांचाहि आहे. या निराश्रितांनीं सारा गाडाच बंद पाडला आहे. अवश्यक हालचालीहि होऊं शकत नाहींत. आपण आपलेंच नुकसान करीत आहों हें या निराश्रितांच्या ध्यानांत कसें येत नाहीं ? आपलीं सर्व योग्य तीं दुःखें दूर व्हावीं म्हणून सरकारवर जर ते विश्वास ठेवतील तर त्यांच्या बऱ्याचश्या अडचणी दूर होतील ही गोष्ट या शरणार्थींच्या लक्षांत यायला हवी.

मी हुमायून बादशहाच्या कबरेजवळील मेयो लोकांच्या छावणींत गेलों होतों. अलवार आणि भरतपूर संस्थानांतून आम्हांला हांकलून देण्यांत आलें असें त्यांनीं सांगितलें. मुसलमान मित्र पाठवितात त्यापलीकडे दुसरें अन्न आम्हांला मिळत नाहीं असेंहि ते म्हणाले. मेयो लोक एकदम भडकतात व गडबड करतात. त्यांचा हा स्फोटक स्वभाव मला माहीत आहे; परंतु त्यांची इच्छा नसतांना त्यांची पाकिस्तानांत रवानगी करणें हा मार्ग निश्चितच योग्य नव्हे. इतर रोगांवर आपण उपचार करतों त्याप्रमाणें त्यांच्या मनोविकृतींवर आपण उपचार केले पाहिजेत, त्यांचीं मनें निरोगी होतील अशी खटपट केली पाहिजे.

मी जामिया–मिलियामध्येंहि गेलों होतों. या संस्थेच्या निर्मितींत माझाहि मोठा हिस्सा आहे. डॉ० झकीर हुसेन माझे प्रिय मित्र आहेत. डॉक्टरांनीं आपले अनुभव मला सांगितले. त्यांना दुःख होत होतें, परंतु त्यांत कटुता नव्हती. नुकतेच ते जलंदरला गेले होते. प्रक्षुब्ध शीख त्यांचा मुडदा पाडायच्या बेतांत होते. मुसलमान असणें हाच त्यांचा अपराध होता. रेल्वेंतील एक हिंदु कर्मचारी आणि एक शीख कॅप्टन यांची वेळेवर मदत न मिळती तर डॉ० राहते ना. त्यांनीं कृतज्ञतापूर्वक तो अनुभव मला निवेदिला. जामिया–

मिलिया ही राष्ट्रीय संस्था आहे. किती तरी हिंदूहि येथें शिकून गेले आहेत. प्रक्षुब्ध निर्वासित आणि त्यांचे पक्षपाती अशा संस्थेलाहि वांचवूं इच्छीत नाहींत असें दिसतें. आज 'जामिया—मिलिया'मध्यें शंभरएक मुसलमान शरणार्थी कसेबसे जीव धरून राहिले आहेत. त्यांच्या अडचणी मी खालीं मान घालून ऐकत होतों. दिवाणहाल, वेव्हेल कॅन्टीन कँप आणि किंग्स्वे कँप येथेंहि गेलों होतों. तेथें शीख आणि हिन्दू शरणार्थी होते. मी पूर्वी केलेली पंजाबची सेवा ते अगदींच विसरले नव्हते. परंतु या सर्व छावण्यांतून क्रोधी चेहरे मला मधून मधून दिसत होते. त्यांना राग येणें स्वाभाविक होतें. तें क्षम्य आहे. मी हिंदूंच्या बाबतींत कठोर हृदयानें वागतों असा त्यांनीं माझ्यावर आरोप केला. ते म्हणाले : तुम्हांला आमच्यासारख्या आपत्ती थोड्याच भोगाव्या लागल्या आहेत ? आमची प्रिय मंडळी, आप्तेष्ट मंडळी आम्ही गमावून बसलों. तुमचें तसें थोडेंच झालें आहे ? आमचें घरदार गेलें, जवळ दिडकी नाहीं, केवळ निराधार बनलों. तुमचें सारें ठीक आहे. तुम्हांला आमची काय कल्पना ? " मी त्यांचें समाधान कसें करणार ? हिंदुस्थानची राजधानी—ही दिल्ली मी शांततामय करूं पाहत आहें, येथें पूर्ववत् सारा व्यवहार सुरू व्हावा म्हणून मदत करण्यासाठीं मी येथें आलों आहें, असें त्यांना सांगून त्यांचें थोडेंच समाधान होणार होतें ? मी मृतांना जिवंत करूं शकत नाहीं. परंतु मानवी वा मानवेतर जीवनाला—सर्वच जीवनाला मृत्यूचा आशीर्वाद आहे. मृत्यु ही प्रभूची कृपाच आहे. जीवनाला जोडूनच मरण आहे. मरण कधीं व कसें येणार येवढाच काय तो प्रश्न असतो. सदाचार हाच जीवनाचा खरा मार्ग आणि या मार्गानें जाणाऱ्याला मृत्यु सुसह्य होतो येवढेंच नाहीं तर तो सुंदर वाटतो, रमणीय वाटतो.

## खरा शीख

दिवसां मला एक शीख मित्र भेटला. तो म्हणाला, " मी शीख असलों तरी 'ग्रंथसाहेबांच्या प्रकाशांत' मी खरा शीख आहें असें मी म्हणूं शकणार नाहीं. " मीं त्याला विचारलें, " मी खरा शीख आहें असा दावा करणारा आजपर्यंत तुम्हांला कोणी आढळला का ? " त्यानें नकार दिला. तेव्हां मीं नम्रपणें म्हटलें, " मी खरा शीख आहें. ग्रंथसाहेबांच्या शिकवणीप्रमाणें

जगण्याचा मी प्रयत्न करीत असतों." एके काळीं शीख मला आपला खरा मित्र मानीत. गुरु नानक हिंदु–मुसलमानांत भेद करीत नसत. सारी मानवजात त्यांना एक वाटे. माझा सनातन हिंदुधर्महि असाच आहे. याच अर्थानें मी मुसलमानहि आहें. 'ईश्वर एक आहे आणि दिवसां, रात्रीं तो सर्वांचा संभाळ करतो' अशी जी मुस्लिम प्रार्थना आहे ती मीहि म्हणत असतों.

माझें सर्व शरणार्थींना सांगणें आहे कीं सत्यानें वागा; निर्भय असा; मनांत कोणाहिविषयीं द्वेषमत्सर बाळगूं नका. मोठ्या कष्टानें मिळालेलें स्वातंत्र्याचें फळ, रागाच्या भरांत वेडेंवांकडें वागून, गमावून बसूं नका.

२

१२-९-'४७

## सरहद्दप्रान्तांतील वार्ता

सरहद्दप्रान्तांतून दुःखदायक बातम्या येत होत्या. गांधीजी म्हणाले, "माझ्या दुःखाला सीमा नाहीं. सरहद्दप्रान्ताला मी चांगल्या रीतीनें ओळखतों. मीं कित्येक आठवडे तिकडे दौरा काढलेला आहे. खानबंधूंच्या घरीं मी निश्चिन्त असें, परिपूर्ण सुरक्षितता मला वाटे. परंतु माजी मंत्री श्री० गिरिधारीलाल पुरी यांची तार आली आहे. 'माझा आणि माझ्या पत्नीचा बचाव करा' असें ते कळवितात. दोघें उत्कृष्ट कार्यकर्ती आहेत. ती तार मला दाखविण्यांत आली. माझी वेदना मी कशी सांगूं? अशी बातमी ऐकून लज्जेनें माझी मान खालीं होते. मुसलमानांइतकेंच हिंदूंना नि शीखांना सुरक्षित वाटेल असें करणें हें तेथील सरकारचें काम आहे. कायदेआझम यांनीं या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे."

## क्रोध म्हणजे अविवेकाचा लहान भाऊ

सरहद्दप्रान्तांतील दुर्दैवी घटनांसंबंधीं दुःखानें बोलतां बोलतां गांधीजी पुढें म्हणाले : "प्रक्षुब्ध होऊन, रागावून कांहींएक होणार नाहीं. क्रोधानें

सूडबुद्धि जन्मते. आणि सर्वत्र आजचे भीषण प्रकार होत आहेत ते सूडबुद्धीमुळेंच होत आहेत. दिल्लींतील गोष्टींचा बदला तिकडे मुसलमानांनीं घेतला तर त्यांत त्यांचा काय फायदा? किंवा सरहद्दप्रान्तांत आणि पश्चिम पंजाबांत हिंदु–शीखांवर जे क्रूर हल्ले होत आहेत, त्यांचा बदला येथील हिंदु–शीखांनीं घेतला तर त्यानें काय साधलें? एकादा मनुष्य किंवा एकादा जमाव पिसाटाप्रमाणें वागूं लागला तर सर्वांनीं का पिसाट व्हायचें? माझें हिंदूंना आणि शीखांना सांगणें आहे कीं खून, लूटमार, जाळपोळ करून स्वतःच्या धर्माचा नाश नका करूं. मीं धर्मांचा अभ्यास केला आहे. कोणताहि धर्म असा वेडेपणा शिकवीत नाहीं. इस्लामहि याला अपवाद नाहीं. हे अविचारी अत्याचार एकदम थांबवा अशी माझी तुम्हांला कळकळीची प्रार्थना आहे. स्वातंत्र्याची मिळालेली गोड भाकरी आपणांस पचवितां न आल्यामुळें आपण गमावून बसलों असें भावी पिढ्यांना म्हणायला न लागो! तुम्ही हा पागलपणा न सोडाल तर जगाच्या दृष्टीनें भारताचें नांव कलंकित होईल ही गोष्ट ध्यानांत धरा.

## झालें गेलें विसरा

मी जुम्मा मशिदींत गेलों होतों. जगांत अशी सुंदर मशीद नाहीं. परंतु तेथील दृश्य पाहून मी विव्हळ झालों. मुस्लिम बंधु–भगिनी अपार दुःखकष्ट भोगीत आहेत. मी त्यांचें समाधान करीत होतों. मरण सर्वांनाच यायचें आहे असें मीं म्हटलें. मृतांसाठीं रडण्यांत अर्थ नाहीं. रडण्यानें मेलेले परत थोडेच यायचे आहेत? या महान् देशाचा भविष्य काल तरी उज्वल करूं या, तो तरी सारे मिळून संभाळूं या. किती तरी मुस्लिम मित्र दररोज मला भेटायला येतात. मोकळेपणें सारें सांगा, बोला, असें मी त्यांना म्हणत असतों. दिल्लींत किंवा हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत आपले प्राण धोक्यांत आहेत असें मुसलमानांना वाटावें याचें मला वाईट वाटतें. केवढी दुःखाची ही गोष्ट! मी अनेक अनुभवांतून गेलों आहें. मी आतां वृद्ध झालों आहें. या म्हाताऱ्याचें ऐका. ‘बदल्यास बदला’ या मार्गानें प्रश्न कधींहि सुटत नसतो. अपकाराचा अपकारानेंच प्रतिकार नका करूं. भल्याजवळ भलेपणानें वागणें हा कांहीं मोठा सद्गुण नव्हे, तर

वाइटाजवळ चांगलें वागणें, अपकाराची फेड उपकारानें करणें हा खरा सत्याचा मार्ग होय. किती तरी मुस्लिम मित्रांचीहि मदत करण्याची इच्छा आहे; परंतु आजकालच्या दिल्लींत त्यांची प्रत्यक्ष मदत घेणें दुरापास्त होऊन बसलें आहे.

मी तुमच्या आत्म्याला हांक मारीत आहें. झालें गेलें विसरून जा अशी शीख, हिंदू, मुसलमान, सर्वांना माझी प्रार्थना आहे. दुःखें उगाळीत बसूं नका. मैत्रीचा हात एकमेकांना द्या. एकमेकांजवळ शांतीनें राहण्याचा निश्चय करा. गुण्यागोविंदानें राहण्याची प्रतिज्ञा करा. हिंदी संघराज्यांत राहण्यांत मुसलमानांना अभिमान वाटला पाहिजे. त्यांनीं तिरंगी झेंड्याला प्रणाम केला पाहिजे. ते स्वतःच्या धर्माशीं प्रामाणिक असतील तर कोणीहि हिंदु त्यांचा शत्रु होऊं शकणार नाहीं. हिंदु-शीखांनींहि शांतिप्रिय मुसलमानांना आपल्यामध्यें आनंदानें राहूं दिलें पाहिजे. त्यांचें तुम्हीं स्वागत करायला हवें. मुसलमानांजवळ शस्त्रास्त्रें आहेत असें मला सांगण्यांत आलें. त्यांनीं तीं ताबडतोब परत करावीं आणि सरकारनेंहि त्यांच्यावर खटले भरूं नये. हिंदू आणि शीख यांनींहि याचप्रमाणें केलें पाहिजे. पश्चिमपंजाबसरकार मुसलमानांना हत्यारें देत आहे असें मला सांगण्यांत आलें. ही गोष्ट खरी असेल तर ती फार वाईट गोष्ट आहे. असें करणें चूक आहे. अशानें अखेरीस त्यांचाच सर्वनाश होईल. ही गोष्ट ताबडतोब थांबली पाहिजे. कोठेंहि कोणाजवळ बिगरपरवाना हत्यार असतां कामा नये.

दिल्लींत लवकर शांति आणा. मला ही भिक्षा घाला. येथें शान्ति येतांच मला पूर्व नि पश्चिम पंजाबांत जातां येईल. माझें एकच जीवित-कार्य आहे. सर्वांसाठीं माझा एकच संदेश आहे. दिल्लीचे नागरिक थोडा वेळ पागल झाले, परंतु लवकरच ते शान्त नि समतोल झाले, शहाणपण परत आलें असें सर्वांना म्हणूं दे. तुमचे मुख्य मंत्री नि उपमुख्य मंत्री—जवाहरलाल आणि सरदार—यांना पुनः आपलें शिर उंच करतां येऊं दे. आज त्यांचें मस्तक लाजेनें नि दुःखानें खालीं आहे. अमोल असा तुमचा वारसा आहे आणि हा तुम्हां सर्वांचा संयुक्त असा वारसा आहे हें विसरूं नका. हा वारसा संभाळा, तो कलंकित करूं नका. तुमचें हें कर्तव्य आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

माझें आणि डॉक्टर दिनशा मेथांचें राष्ट्रीय स्वयंसेवक-संघाच्या गुरुजीं-जवळ बोलणें झालें. या संस्थेचेहि हात रक्तानें माखलेले आहेत असें मला सांगण्यांत आलें होतें. परंतु संघाचे गुरुजी मला आश्वासनपूर्वक म्हणाले, " ही गोष्ट साफ खोटी आहे." ते म्हणाले, " आमची संघटना कोणाचीहि शत्रु नाहीं. मुसलमानांना ठार करणें हें तिचें ध्येय नाहीं. सर्व शक्तीनें हिंदु धर्माचा बचाव करणें हें संस्थेचें ध्येय आहे. आमची संस्था शान्ती-साठींच आहे. माझें हें सांगणें तुम्ही सर्वांना जाहीर करा." त्यांचें म्हणणें मीं तुम्हांला सांगितलें आहे.

## ३

१७-९-'४७

## सरकारवर विश्वास ठेवा

प्रार्थना संपली आणि गांधीजी बोलूं लागले :

"मला १९१५मधील आठवण येते. त्या वेळेस मी दिल्लींत आचार्य रुद्र यांच्याकडे राहत होतों. आचार्य रुद्र निष्ठावंत खिस्ती होते आणि भारतमातेचेहि सत्पुत्र होते. हकीमसाहेब आणि डॉ० अन्सारी यांच्याशीं त्यांनींच माझा प्रथम परिचय करून दिला. दोघेहि हिंदू, मुसलमान व इतर हिंदी जनता यांच्याकडे समान प्रेमानें नि आदरानें बघत. हकीमसाहेब हजारों हिंदूंना मोफत औषध देत ही गोष्ट मला माहीत आहे. साऱ्या दिल्लीचे ते आवडते सरदार होते. अशा लोकांना का तुम्ही नालायक समजणार? हिंदु-शीखांच्या भीतीनें डॉक्टर अन्सारींची मुलगी जोहरा आणि तिचे पति डॉ० शौकतुल्ला खान यांना घर सोडून एका उपाहारगृहांत जाऊन राहावें लागत आहे! खरोखर किती शरमेची ही गोष्ट! ज्या मुसलमानांत हकीम अजमल-खान, डॉ० अन्सारी अशी माणसें झालीं, त्यांना हिंदी संघराज्यांत जर सुरक्षितपणें राहतां येत नसेल तर मी कशासाठीं जगूं? खरोखर सांगतों कीं

अश्या परिस्थितींत जगण्यांत मला राम वाटत नाहीं. हिंदी संघराज्यांतील मुसलमान सारे पंचमदळी आहेत असें मला सुचविण्यांत आलें. परंतु एकजात सर्वच मुसलमानांवर केलेल्या या आरोपावर मी विश्वास ठेवूं शकत नाहीं. हिंदी संघराज्यांत साडेचार कोटी मुसलमान आहेत. ते सारेच नतद्रष्ट असतील तर इस्लाम–धर्माला स्वतःच्या हातांनींच ते मूठमाती देतील. कायदेआझमांनीं हिंदी संघराज्याशीं निष्ठावंत राहा असें येथील मुसलमानांस फर्माविलें आहे. जे देशद्रोह करतील त्यांचें शासन हिंदी सरकार करील. तुम्हीं आपल्याच हातांत कायदा घेतां कामा नये.

## प्रभु सर्वांचा त्राता

आज मी एकाच निराश्रितांच्या छावणीला भेट देऊं शकलों. ही छावणी जुन्या किल्ल्यांत आहे. तेथें किती तरी मुसलमान शरणार्थी आहेत! त्यांच्या थव्यांतून माझी गाडी जात होती. आणखी पुष्कळ शरणार्थी येत होते. जरी जमाव मोठा होता आणि मुख्य अधिकारी उपस्थित नव्हता, तरीहि मीं त्या शरणार्थींना चार धीराच्या गोष्टी सांगण्याचा हट्ट धरला. मुस्लिम सेवकांनीं सर्वांना खालीं बसायला सांगितलें. शान्तपणें ऐका असें त्यांनीं त्यांना विनविलें. सारे खालीं बसले. कडेकडेचे थोडे उभे होते. त्यांच्या मुद्रेवर क्रोध होता. उपहास करणाऱ्यांना व टिंगल करणाऱ्यांना मुस्लिम स्वयंसेवकांनीं परोपरीनें समजावून शान्त बसविलें. मला फार बोलायचें नव्हतें. मी माझ्या दुबळ्या आवाजांत बोलत होतों. दिवाण चमनलालांच्या खांद्यांवर हात ठेवून मी बोलत होतों. मी जें बोलत होतों तें दिवाण चमनलाल मोठ्यानें सांगत होते. मीं त्यांना काय बरें सांगितलें? येवढेंच सांगितलें कीं, "शान्त व्हा; क्रोध सोडा. ईश्वर सर्वांचा आधार आहे. मनुष्य कितीहि मोठ्या पदावर असला तरी तो कितीसा पुरणार? खरा आधार प्रभूचा! माणसानें बिघडविलेलें परमात्मा दुरुस्त करील. मनुष्यानें वांकडें केलें, ईश्वर सारें सरळ करील. दिल्लींत पूर्ववत् शान्ति नांदूं लागेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं. हिंदु–मुसलमान पूर्वीं जसे गुण्यागोविंदानें नांदत तसे नांदूं लागेपर्यंत मी तडफडत राहीन, धडपडत राहीन. मी वचन देतों."

## दोन्ही सरकारांचें कर्तव्य

दिवसां अनेक हिंदुमुसलमान मित्र मला भेटले. तीच करुण कहाणी, तींच दुःखें! हिंदूंनीं मुसलमानांबद्दल सांगायचें, मुसलमानांनीं हिंदूंविषयीं. दोघांनाहि हें लाजिरवाणें आहे. मी उभयतांचा, सर्वांचाच सेवक असण्याचा दावा करतों. हिंदू आणि मुसलमान दोघांनींहि एकमतानें एक गोष्ट निश्चित करावी कीं लोकसंख्येची अदलाबदल ही फार घातुक गोष्ट आहे. या भयंकर जाळ्यांत फसूं नका असें माझें सांगणें आहे. अशी अदलाबदल म्हणजे आणखी भीषण आपत्ति; दुसरें तिसरें कांहीं नाहीं. आपापल्या मूळच्या घरांतच सारे आनंदानें राहा. जेथें असाल तेथेंच शांतीनें नि मैत्रीनें नांदा. अशानेंच खरोखर प्रश्न सुटेल. आज परस्परांचीं मनें दुखवलीं गेलीं आहेत. परंतु त्यांतून का कायम-चें वैर तुम्ही निर्माण करणार? असें करणें केवळ वेडेपणाचें आहे. अल्पसंख्य लोकांना संपूर्ण संरक्षण देणें हें उभय सरकारांचें आद्य कर्तव्य आहे. दोन्ही सरकारांनीं आपसांत या प्रश्नाचा नीट निकाल लावावा. वाटलें तर लढाई करावी नि साऱ्या जगांत स्वतःचें हंसें करून घ्यावें.

कायदेआझमांनीं हिंदी संघराज्यांतून जाणाऱ्या मुस्लिम शरणार्थींसाठीं मदत करा म्हणून कळकळीचें पत्रक काढलें आहे. परंतु पाकिस्तानांतील मुसलमानांनीं जे अत्याचार केले त्यांचा त्यांत उल्लेखहि नाहीं. दोन्ही सरकारांनीं बहुसंख्य जमातींनीं जे अत्याचार केले त्यांची धैर्यानें नि मोकळेपणानें कबुली दिली पाहिजे.

## आसफअली साहेब

आणि मला एक गोष्ट सांगायची आहे. आसफअली अमेरिकेंत हिंदी संघराज्याचे वकील आहेत. त्यांच्याविषयीं उगीच विपर्यास केला जात आहे. मला माहीत असल्यापासून आसफअली कॉंग्रेसवाले आहेत. हकीमसाहेब, डॉक्टर अन्सारी, यांचे ते मित्र होते, जसे ते आज मौलानासाहेबांचे मित्र आहेत. मौलानासाहेब कित्येक वर्षें कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. ते कट्टे राष्ट्रवादी आहेत. अशांचे आसफअली मित्र आहेत. त्यांना अमेरिकेंतून परत नाहीं बोलावण्यांत आलें. पुष्कळशा महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं मुख्यमंत्र्यांजवळ विचार–

विनिमय करायला ते आले आहेत. अशा मुसलमानांना प्रत्येक हिंदूजवळ, प्रत्येक शीखाजवळ सुरक्षितपणाचें वाटूं नये ही शरमेची गोष्ट आहे. एकाहि मुसलमानाला त्याच्या या दिल्ली राजधानींत असुरक्षित वाटलें तर तें बरें नाहीं. असें न होवो !

## ४

१४-९-'४७

## आपला अधःपात

'इदगा' येथल्या आणि त्याच्यासमोरच्या अशा दोन्ही मुस्लिम—शरणार्थी—छावण्यांना आज मीं भेट दिली. एकाहि मुसलमानाच्या तोंडावर राग नव्हता. ते गरीब दिसले. त्यांच्यांत एक अति वृद्ध मनुष्य होता. केवळ अस्थिचर्म उरलें होतें. बरगडीन् बरगडी दिसत होती. अनेक ठिकाणीं त्याला भोंसकण्यांत आलें होतें. त्याच्याजवळ एक जखमी स्त्रीहि होती. ती तितकी वृद्ध नव्हती, तरीहि ती गलितगात्रच दिसत होती. त्यांना पाहून माझी मान खालीं झाली. धर्म कोणताहि असो, सर्व नरनारींना मी समान मानतों.

## निर्वासितांच्या छावण्यांतील सफाई

छावण्यांतून मला घाण दिसली. कल्पनातीत दुर्गंधि तेथें होती. इदग्यांतील हौद कोरडा होता. पाणी तुम्हांला कोठून मिळतें म्हणून मीं विचारलें नाहीं. वाटेल तेथें मलमूत्रविसर्जन केलेलें दिसलें. छावणीचा मी जर अधिकारी असतों आणि माझ्या हाताखालीं लष्कर नि पोलीस असते, तर मीं आधीं हातांत कुदळ, फावडें, घमेलें घेतलें असतें व पोलिसांना आणि लष्कराला तेंच करायला लावलें असतें. तेथील सर्व शरणार्थींनाहि 'चला काम करायला' असें मीं म्हटलें असतें. आणि सारी छावणी स्वच्छ झाली असती व आरोग्य तेथें खेळूं लागलें असतें. खरें म्हणजे तेथील सारी जमीनच कचऱ्याची जागा होती. जागा साफ केल्याशिवाय कोणासहि कोठें राहूं दिलें जाऊं नये. याला पैशाची जरुरी नाहीं. स्वच्छतेची जाणीव असली, थोडी दूरदृष्टि असली,

म्हणजे झालें. अस्वच्छता आपणांस सहन नाहीं होतां कामा. हिंदूंच्या छावण्याहि या बाबतींत बऱ्या नव्हत्या. अस्वच्छता हा आपला राष्ट्रीय दोष आहे. हा दुर्गुण आहे. तुम्ही आतां स्वतंत्र राष्ट्र म्हणून आहां. हा दुर्गुण जितक्या लवकर दूर कराल तितकें चांगलें.

## सरकार आणि जनता यांचें कर्तव्य

आणि हें सारें कां होत आहे ? राष्ट्राची प्रगति आज अडून बसली आहे. सारें जीवन विस्कळित झालें आहे. सारी घडीच बिघडली आहे. पश्चिम पाकिस्तानी प्रांतांतून इतके हिन्दू व शीख कां येत आहेत ? कां हे निर्वासितांचे लोंढे ? हिंदु किंवा शीख असणें म्हणजे का गुन्हा ? कीं हे लोक केवळ हद्दास पेटून येत आहेत ? कीं त्यांच्या धर्मबांधवांनीं पूर्वेकडे जें कांहीं केलें त्याची शिक्षा यांना दिली जात आहे ? आपल्या या हिंदी संघराज्यांतहि काय चाललें आहे ? दिल्लींतील मुसलमान घरेंदारें सोडून जाऊं लागले आहेत. त्यांना अशी भीति कां वाटते ? दोन्ही सरकारें का हतबल झालीं ? जनता सरकारची जणूं दखलच घेत नाहीं असें दिसतें ! असें कां झालें ? मुसलमानांजवळ विगरपरवाना शस्त्रास्त्रें आहेत. अशा लोकांजवळचीं हत्यारें काढून घेणें हें सरकारचें काम आहे. सरकार नालायक असेल, असमर्थ असेल, तर त्यांनीं दुसऱ्या लायक नि समर्थ लोकांना जागा करून द्यावी. जें सरकार आहे तें जनतेनेंच निर्मिलेलें आहे. परंतु व्यक्तींनीं आपल्याच हातीं कायदा घेणें चूक आहे. याला लोकशाही नाहीं म्हणत. गुंडगिरीनें कोणाचेंच कल्याण होणार नाहीं, मग ती पाकिस्तानांत असो वा हिंदी संघराज्यांत असो ! मी दिल्लींत 'करीन किंवा मरेन' या निर्धारानें उभा आहें. ही अविवेकी यादवी, हें भावानें भावाला मारणें, ही राष्ट्राची हत्या, आपल्याच सरकारला धोका देण्याची ही वृत्ति, हें सारें बघण्याची मला इच्छा नाहीं. प्रभु करो नि तुम्हां सर्वांना सद्बुद्धि सुचो !

नगर वाचनालय, सातारा.

५

१५-९-'४७

## आत्म-परीक्षण

रात्रीं पाऊस पडत होता. जीवनप्रद अशा त्या शान्त वृष्टीच्या आवाजानें वास्तविक हृदयाला विसांवा मिळायला हवा होता. परंतु माझे विचार छावणींतील शरणार्थींकडे गेले. दिल्लींतील त्या उघड्या छावण्यांत ते लोक पडलेले होते. मी नीट आरामशीर झोंपलों होतों. मला कसली तकलीफ नव्हती. भावांनीं भावांवर निर्दयपणें हल्ला केला नसता तर हे सारे शरणार्थी आपापल्या घरीं सुखांत असते. असें अन्नहीन व निराधार त्यांना उघड्यावर पडावें लागलें नसतें. आज त्यांची काय दशा असेल? ढोंपर ढोंपर पाण्यांतहि त्यांना रात्रीं राहावें लागलें असेल. हें सारें का अपरिहार्यच होतें? माझ्या हृदयांतून निःशंक आवाज आला कीं "नाहीं!" स्वातंत्र्याचें बाळ अजून पुरें महिन्याचेंहि झालें नाहीं, तों त्याचें का असें फळ मिळावें? गेले चोवीस तास हे असे विचार मनांत राहून राहून येत होते. माझें मौन आशीर्वादरूप वाटलें. मी अंतःकरणास विचारूं लागलों: दिल्लीचे नागरिक का वेडे झाले? त्यांच्याजवळ माणुसकी शिल्लकच नाहीं का? देशभक्ति, स्वातंत्र्य, यांचें त्यांच्या हृदयाला कांहींच वाटत नाहीं का? हिंदू आणि शीख यांना मी आधीं दोष देतों म्हणून मला क्षमा करा. त्यांना ही द्वेषाची लाट थोपवितां नाहीं का येणार? खरी माणुसकी त्यांना नाहीं का दाखवितां येणार? दिल्लीच्या मुसलमानांना माझें सांगणें आहे कीं त्यांनीं सारी भीति झुगारून द्यावी, अल्लावर विश्वास ठेवावा; हिंदु-शीखांना त्यांच्याजवळच्या हत्यारांची भीति वाटते; मुसलमानांनीं हीं सारीं हत्यारें शोधून सरकारच्या स्वाधीन करावीं. हिंदु-शीखांजवळहि हत्यारें नसतील असें नाहीं; किती

प्रमाणांत येवढाच प्रश्न. अल्प-संख्य जमातीनें प्रभूवर आणि प्रभूनेंच निर्माण केलेल्या मानवावर विश्वास ठेवून तरी वागावें किंवा ज्यांच्यावर त्यांना विश्वास ठेवतां येत नाहीं, अशांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं त्यांनीं हत्यारांवर विश्वास ठेवावा.

## आपल्या सरकारवर भरंवसा ठेवा

माझा सल्ला स्पष्ट नि निश्चित आहे. तोच खरा उपाय आहे. अत्याचार करणारे कितीहि शस्त्रास्त्रसंपन्न असले तरी प्रत्येक नागरिकानें सरकार आपलें रक्षण करील हा विश्वास बाळगावा. अल्पसंख्याकांपैकीं जर कोणाचें सारें अन्यायानें हिरावून घेण्यांत आलें असेल तर सरकार नुकसान-भरपाईची मागणी करील व ती मिळवून देईल, असा सर्वांनीं विश्वास बाळगावा. सरकार——मग तें हिंदी असो वा पाकिस्तानी असो——एक गोष्ट मात्र करूं शकणार नाहीं. त्याला मृतांना पुनः सजीव करतां येणार नाहीं. दिल्लींतील जनता पाकिस्तान-सरकारपासून न्याय मागणें कठिण करीत आहे. न्यायाची मागणी करणारांनीं स्वतः न्यायी असलें पाहिजे, स्वतःचे हात निष्कलंक ठेवले पाहिजेत. हिंदु-शीखांनीं योग्य पाऊल टाकावें. घरांदारांतून हांकललेल्या मुसलमानांना त्यांनीं परत बोलवावें. कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी असें करणेंच योग्य आहे असें दिसून येईल. धैर्यानें व उदारपणानें जर असें कराल तर हा शरणार्थींचा प्रश्न अगदीं सोपा व सरळ होईल. मग तुमचें म्हणणें पाकिस्तानच काय, सारी दुनियाहि ऐकेल. तुम्ही दिल्लीचा व हिंदुस्थानचा बचाव कराल, दिल्लीचें नांव राखाल, देशाचीहि प्रतिष्ठा सांभाळाल. लाखों हिंदू, शीख आणि मुसलमान यांची अदलाबदल मी कल्पूंच शकत नाहीं. असें करणें बरोबर नाहीं. पाकिस्ताननें केलेली चूक तुम्ही लोकांची अदलाबदल न करण्याचें निश्चित धोरण ठेवून सुधारा. तुमच्या सत्कृत्यानें त्यांचें दुष्कृत्य दुरुस्त करा. या मताचा कदाचित् मी एकटाच असेन. माझाच फक्त हा अपवादात्मक आवाज असेल; परंतु माझ्या या विचाराला चिकटून राहण्याचें धैर्य माझ्याजवळ असेल अशी मला आशा आहे.

## ६

१७-९-'४७

# जबरदस्ती नाहीं

दिल्लीच्या गिरण्यांतील कामगार आज मोठ्या संख्येनें आले होते. इतरहि बाहेरची मंडळी आली होती. गणेश–लाइन्सच्या मोठ्या आवारांत थवे लोटले होते. कामगारांच्या बोलावण्यावरून आज गांधीजी तेथें आले होते. जेव्हां जेव्हां गांधीजी भंगी–वस्तींत उतरत, तेव्हां तेव्हां हे कामगार स्वयंसेवक पुरवीत असत. साडेसहा वाजतां गांधीजी तेथें जाऊन पोंचले. ध्वनिक्षेपक यंत्रांत कांहीं बिघाड होता. दुसरें यंत्र आणण्यांत आलें. त्यानें कामचलाऊ काम दिलें; परंतु दूरच्या लोकांना नीटसें ऐकूं जात नव्हतें. एक पंजाबी मित्र पुढें आला. तो आपल्या खड्या आवाजानें गांधीजींचें वाक्यन् वाक्य लोकांस सांगूं लागला. त्यामुळें नीट जमलें. गांधीजी म्हणाले,

"काल सायंकाळच्या अनुभवामुळें मी एका निर्णयावर आलों आहें. सर्व श्रोते निरपवादपणें प्रार्थनेला तयार नसतील तर जाहीरपणें मी प्रार्थना करणार नाहीं. मीं आजपर्यंत कधींहि कोणावर कांहीं लादलें नाहीं. आणि प्रार्थनेसारखी परम पवित्र आध्यात्मिक वस्तु तर मी नाहींच नाहीं लादणार! तुमच्या अंतःकरणानें तुम्हांस सांगितलें पाहिजे. केवळ मला खुष करण्यासाठीं कांहीं एक करूं नका. माझ्या प्रार्थनासभा लोकप्रिय झाल्या आहेत यांत शंका नाहीं. लाखों लोकांना त्यांपासून कांहीं मिळालें आहे असें वाटतें. परंतु आजचा काळ तेढीचा आहे. ज्यांना भोगावें लागलें ते रुष्ट आहेत. त्यांचा क्रोध मी समजूं शकतों. परंतु त्यांना प्रार्थनेंतील जो भाग आक्षेपार्ह वाटतो तो मी गाळूं शकेन अशी अपेक्षा कोणीहि नका ठेवूं. प्रार्थनेचा सर्व भाग एक तर जशाचा तसा सारा स्वीकारा किंवा त्याज्य माना. मला कुराणांतील भाग माझ्या प्रार्थनेंतीलच प्राणमय भाग वाटतो."

## क्रोध आंवरा

गांधीजी नंतर रोजच्या जळत्या प्रश्नाकडे वळून म्हणाले, “लोक अधीर झाले आहेत, रागावले आहेत. त्यांची उताविळी, त्यांचा घुस्सा समजून घ्यायला मी तयार आहें. परंतु स्वातंत्र्याला पात्र असाल तर सरकारवर विश्वास ठेवा. सरकार उत्कृष्ट तें करील, शक्य तें सारें करील. मला माझा अहिंसेचा मार्ग तुम्हांला दाखवावा म्हणून कितीहि वाटलें तरी तो आज मी दूर ठेवीत आहें. कारण, माझा मार्ग तुम्हांला अव्यवहार्य वाटत आहे. ठीक. तर मग जगांतील सारीं लोकसत्ताक राष्ट्रें जो मार्ग स्वीकारतात तो घ्या. लोकशाहींत व्यक्तीची इच्छा सामाजिक इच्छेनें मर्यादित केलेली असते, नियंत्रित केलेली असते. समाजाची इच्छा म्हणजेच सरकार. सरकार लोक–शाहीसाठीं लोकशाही मार्गानें जात असतें. प्रत्येक व्यक्ति आपल्याच हातीं कायदा घेईल तर सरकारच राहणार नाहीं. सारें अराजक माजेल! सार्वजनिक कायदाच उरणार नाहीं, शासनसंस्थाच नाहीं असें होईल आणि स्वातंत्र्याचा नाश होईल. म्हणून तुम्हीं आपला क्रोध आंवरला पाहिजे. आणि सरकारला तुम्हांला न्याय मिळवून देऊं दे. सरकारला आपलें कर्तव्य करायला जर तुम्ही अवसर द्याल, परवानगी द्याल, तर मला वाटतें कीं प्रत्येक हिंदु नि शीख स्वाभिमानानें नि अब्रूनें परत आपापल्या घरीं जाऊं शकेल. मला यांत संशय वाटत नाहीं. पाकिस्तानांत तुम्हांला अपार आपत्ती भोगाव्या लागल्या, शेंकडों घरें ओसाड पडलीं, प्राणहानि झाली, मुलींना पळविण्यांत आलें, सक्तीनें धर्मान्तर करायला लावण्यांत आलें, सारें खरें; परंतु जर तुम्हीं संयम राखला, क्रोधानें सद्बुद्धि नष्ट होऊं दिली नाहीं, तर पळविलेल्या मुली परत केल्या जातील, सक्तीचें धर्मान्तर फोल ठरेल, माल–मत्ता परत मिळेल. परंतु न्यायाच्या सरळ मार्गांत जर तुम्ही अडथळे आणाल तर हें होणार नाहीं. मग स्वतःची बाजू तुम्हीं लंगडी केली असें होईल. हिंदी संघराज्यांतून मुस्लिम बंधुभगिनींना घालवून द्यावें असें म्हणाल तर मग वरील गोष्टी होणार नाहींत. साऱ्या मुसलमानांना येथून हांकला असें म्हणणें राक्षसी आहे. अशानें कांहीं जमणार नाहीं. मुसलमानांशीं अन्यायानें वागून तुम्हांला न्याय मिळणार नाहीं. पाकिस्तानांत हिंदु–

शीखांना वाईट रीतीनें वागविण्यांत आलें ही गोष्ट जशी खरी, त्याचप्रमाणें पूर्व पंजाबांत मुस्लिम अल्पसंख्याकांस वाईट रीतीनें वागविण्यांत आलें ही गोष्टहि खरी. गुन्हा कोणाचा, किती, ही कांहीं सोनें तोलायच्या तराजूंत तोलण्यासारखी गोष्ट नाहीं व कोणाचा कमी, कोणाचा जास्त याचा निर्णय द्यायला माझ्याजवळ पुरावाहि नाहीं. दोन्ही बाजू अपराधी आहेत येवढें कळलें तरी पुरे. योग्य तडजोड करायची असेल तर सर्वमान्य असा एकच मार्ग आहे. दोन्ही सरकारांनीं आपापल्या राज्यांत झालेल्या गोष्टी प्रांजलपणें कबूल करणें आणि नंतर दोघांनीं करार करणें, तडजोड करणें. तडजोड आपसांत न झाली तर नेहमींप्रमाणें त्रयस्थांचें न्यायमंडळ नेमणें, लवाद नेमणें. दुसरा रानटी मार्ग म्हणजे युद्ध पुकारणें. युद्धाचा विचारच मला सहन होत नाहीं; परंतु जर सारे उपाय थकले तर त्याच्याशिवाय गति नाहीं. मला आशा आहे कीं सुविचार दोघांनाहि सुचेल. जे मुसलमान पाकिस्तानांत स्वेच्छेनें गेलेले नाहींत त्यांना विश्वासपूर्वक त्यांचे शेजारी परत बोलावतील नि त्यांना संरक्षण देतील अशी मला आशा आहे. लष्कराच्या साह्यानें हें होणार नाहीं. त्या त्या लोकांनीं विवेकाचा अंगीकार केला तरच हें शक्य होईल. मीं माझ्याबाबतींत अखेरचा निर्णय घेतला आहे. या यादवीनें होणारा हिंदुस्थानचा सत्यानाश पाहायला जगण्याची माझी इच्छा नाहीं; या थोर सुंदर देशावर अशी आपत्ति ओढवण्यापूर्वींच प्रभूनें माझे डोळे मिटावे अशी त्याला मी सारखी प्रार्थना करीत आहें. या प्रार्थनेंत तुम्हीहि सारे सहभागी व्हा.

## कामगारांचें कर्तव्य

हिंदू आणि मुसनमान कामगार परस्पर प्रेमानें राहत आहेत हें पाहून मी त्यांना धन्यवाद देतों. जर तुम्ही खरोखरच परिपूर्ण ऐक्यानें वागत असाल तर देशाला तुम्हीं फार मोठें उदाहरण घालून दिल्यासारखें आहे. कामगारांनीं कधींहि जातीय वादाला थारा देतां कामा नये. मीं कितीदां तरी सांगितलें आहे कीं कामगार जर आपल्या सामर्थ्याचा शहाणपणानें आणि विधायक रीतीनें उपयोग करतील तर तेच खरे सत्ताधीश होतील. मालक मग विश्वस्त आणि खऱ्या अर्थानें मित्र बनतील. परंतु हें केव्हां होईल? ‘ पृथ्वीच्या

फोटांतून श्रमानें तुम्ही जी मोलवान् खनिज संपत्ति बाहेर काढतां, जें चांदी-सोनें काढतां, तें खरें भांडवल नसून, खरें भांडवल तुमचे श्रम हें होय', ही गोष्ट जेव्हां तुमच्या ध्यानांत येईल, तेव्हांच मीं वर सांगितलेली सुखाची परिस्थिति निर्माण होईल, तोंवर नाहीं.

७

१८-९-'४७

## अविभाज्य प्रार्थना

दर्यागंजमधून परतल्यावर बिर्लाभवनाच्या आवारांत गांधीजी प्रार्थनेसाठीं गेले. आज लोक थोडे होते. गांधीजी म्हणाले, "कुराणांतील प्रार्थना म्हणायला विरोध करणारा एकादा जरी निघाला तरी मी सार्वजनिक प्रार्थना करणार नाहीं. कारण, प्रार्थनेचा हेतु कोणाच्या भावना दुखविणें हा नाहीं. आणि पुष्कळ काळजीपूर्वक विचार करून ज्या प्रार्थना मीं निवडल्या आहेत, त्यांतील कोणताहि भाग मीहि वगळूं शकत नाहीं. तेव्हां मीं सार्वजनिक प्रार्थना येथें करावी कीं न करावी हें हात वर करून दाखवा." एकहि विरोधी हात वर झाला नाहीं, म्हणून नित्याप्रमाणें प्रार्थना झाली. आज फरक एकच करण्यांत आला : कुराणांतील प्रार्थना नेहमीं शेवटीं म्हणण्यांत येत असे, ती आज आरंभीं म्हणण्यांत आली.

## गजेंद्र–मोक्ष

प्रार्थनोत्तर गांधीजींचें प्रवचन झालें. ते म्हणाले, "प्रार्थना हें आत्म्याचें अन्न, जसें भाकरी हें शरीराचें अन्न; तुम्हां सर्वांना प्रार्थनेचें महत्त्व पटलेलें पाहून मला आनंद होतो."

भजनाला अनुलक्षून बोलतांना ते म्हणाले, "गजेंद्र–मोक्षाची कथा त्या भजनगीतांत होती. प्रभूनें गजेंद्राला नक्रापासून वांचविलें. आपला गजेंद्र म्हणजे ही प्रिय भरतभूमि. रानटीपणाच्या नक्रापासून देशाचा बचाव करायचा आहे. ईश्वरी कृपेनेंच हें काम शक्य होईल.

नगर वाचनालय, सातारा.

## दिल्लीनंतर पंजाब

दर्यागंजमधील मुसलमानांना आज मी भेटलों. प्रत्येक मुसलमान, प्रत्येक हिंदु–शीख पाकिस्तानांत वा हिंदी संघराज्यांत आपल्या पूर्वीच्या घरांत पुनः नीट नांदूं लागेपर्यंत मला शान्ति नाहीं, स्वस्थता नाहीं. दिल्लींत वा हिंदी संघराज्यांत एकहि मुसलमान राहायचा नसेल तर हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी जी जुम्मा मशीद तिचें काय करायचें? आणि पाकिस्तानांत जर एकहि शीख नांदायचा नसेल तर नानकानासाहेब आणि पंजासाहेब यांचें काय होणार? या पवित्र स्थानांचा का दुसरा उपयोग करणार? नाहीं, कधींहि नाहीं. (गांधीजींनीं आणखीहि अशीं पुष्कळ उदाहरणें दिलीं, तीं विस्तारभयास्तव येथें देण्यांत आलेलीं नाहींत.)

मी पंजाबांत जाणार आहें. ज्या चुका मुसलमानांनीं केल्या म्हणून सांगण्यांत येत असतें, त्या दुरुस्त करा असें मी त्यांना तेथें सांगेन. परंतु दिल्लींतील मुसलमानांना जोंवर मी न्याय मिळवून देऊं शकत नाहीं, तोंवर मला पंजाबांत यश येणें अशक्य आहे. तुम्ही पिढ्यान् पिढ्या दिल्लींत नांदत आलां. पुनः जर हिंदु–मुसलमान येथें भाऊभाऊ म्हणून नांदूं लागतील तरच मी पंजाबांत जाईन; तेथें 'करीन किंवा मरेन' या निश्चयानें जाईन. हिंदी संघराज्यांतील सर्वांनीं जर आपले हात निष्कलंक ठेवले तरच मला यश मिळण्याची शक्यता आहे. समुद्र कधींहि अपवित्र होत नसतो, घाण होत नसतो. हिंदी संघराज्यानें सागराप्रमाणें असावें. ज्या हाल–अपेष्टा भोगाव्या लागल्या, त्यामुळें हिंदु–शीखांना क्रोध येणें साहजिक आहे; परंतु न्याय मिळावा म्हणून त्यांनीं सारी जिम्मेदारी आपल्या सरकारवर सोंपवावी.

## लष्कराचें नि पोलिसांचें कर्तव्य

लष्कर आणि पोलीस पक्षपात करतात असें सांगण्यांत आलें, तें जर खरें असेल तर वाईट आहे. कायदा नि सुव्यवस्था राखणारेच जर पक्षपाती बनून गुन्ह्यांत सामील होऊं लागले तर कायदा नि सुव्यवस्था राहणार कशी? लष्करानें नि पोलिसांनीं निःपक्षपाती असावें. त्यांनीं पूर्वग्रहदूषित असतां कामा नये, भ्रष्ट होतां कामा नये. जातिपंथातीत व धर्मातीत दृष्टि घेऊन सर्व जनतेचे प्रामाणिक सेवक म्हणूनच त्यांनीं वागलें पाहिजे.



नगर वाचनालय, सातारा.

## ८

१९-९-'४७

## अतिशयोक्ति टाळा

सायंकाळीं पांच वाजतां गांधीजींनीं कूचा ताराचंद नांवाच्या एका लहान मोहल्याला भेट दिली. तेथें हिंदु–वस्ती आहे. हिंदूंच्या एका मोठ्या सभेंत एका हिंदु प्रतिनिधीनें सांगितलें कीं "या हिंदु–वस्तीच्या चारी बाजूंना मुसलमानांची वस्ती आहे." हिंदूंच्या हालअपेष्टांचें अतिशयोक्ति–पूर्ण वर्णन करून हा प्रतिनिधि पुढें म्हणाला, "येथील सारे मुसलमान लीगवाले आहेत. हिन्दूंच्या विरुद्ध त्यांचीं भयंकर कारस्थानें सुरू आहेत. म्हणून या जागेंतून साऱ्या मुसलमानांची हकालपट्टी करण्यांत आली पाहिजे. पाकिस्तानी मुसलमान तिकडे जसे वागत आहेत, त्याचप्रमाणें आपण येथें वागलें पाहिजे.

## शूर आणि निर्भय बना

बिर्लाभवनाच्या आवारांत प्रार्थनेच्या वेळेस गांधीजींनीं यासंबंधीं भाषण केलें. प्रार्थनेला फार गर्दी नव्हती. गांधीजी म्हणाले, "पाकिस्तानी मुसलमान सर्व मुस्लिमेतरांना घालवून देत आहेत, त्याचप्रमाणें हिंदी संघ–राज्यानेंहि सारे मुसलमान घालवून द्यावे या विचाराशीं मी सहमत होणें अशक्य आहे. दुसरा वाईट वागतो म्हणून आपणहि तसेंच वागण्यानें कल्याण नाहीं. दोन वाईट कृत्यांतून एक चांगलें कृत्य कसें निर्माण होणार ? म्हणून माझें सांगणें ऐका. आजूबाजूला मुस्लिम वस्ती असली तरीहि तेथेंच शौर्यानें नि निर्भयपणें राहा. मी पतौडी–हाउसमधील अनाथालयांतहि गेलों होतों. भीतीनें ज्या निराधार बालकांना दूर नेण्यांत आलें आहे त्यांना परत आणा म्हणून मीं सांगितलें. मला तेथें सांगण्यांत आलें कीं शेजारच्या

मुसलमानी घरांतून अनाथालयावर गोळ्यांचा वर्षाव करण्यांत आला, एक मूल ठार झालें, एक जखमी झालें. सप्टेंबर तारीख ७ची ही हकीकत आहे. मौलाना अहंमद सय्यद आणि दुसरे मुसलमान मित्र माझ्याबरोबर होते. ते म्हणाले कीं अनाथालयांतील रहिवाशांना इजा पोंचणार नाहीं अशी हमी शेजारचे मुस्लिम देतील. त्यानंतर मी श्री० भार्गव यांच्या घराजवळ गेलों. तमाम मुस्लिम वस्तींत ते एकटेच एक हिंदु राहत आहेत. मुसलमानांची खूप गर्दी जमली होती. मीं त्यांना सांगितलें कीं माझें स्वप्न पुरें करा. वयाच्या बाराव्या वर्षापासून हिंदू, मुसलमान वगैरे हिंदी लोक गुण्यागोविंदानें भावांभावांप्रमाणें मैत्रीनें एकत्र नांदतील असें स्वप्न मी मनांत खेळवीत आहें. तुम्हीं मुसलमान बंधू तें पुरें कराल अशी मला आशा आहे.”

या गोष्टी सांगून गांधीजी श्रोत्यांना म्हणाले, “ईश्वरानें हें माझें स्वप्न पुरें करावें म्हणून तुम्हीहि माझ्या प्रार्थनेंत सामील व्हा. ईश्वरानें माझें स्वप्न तरी पुरें करावें किंवा मला न्यावें. हिंदुस्थानच्या एका भागांत केवळ हिंदूच राहत आहेत, एका भागांत फक्त मुसलमान राहत आहेत, असें भयानक दृश्य या डोळ्यांनीं पाहायला लावण्यापूर्वींच प्रभूनें मला न्यावें. माझी अशी प्रार्थना आहे; तुम्हीहि तींत सहकारी व्हा.”

९

२०-९-’४७

## ईश्वरच भयहर्ता

‘कुराण शरीफ’मधील प्रार्थना म्हणायला कोणीं विरोध न केल्यामुळें नेहमींप्रमाणें सायंप्रार्थना सुरळीत पार पडली.

प्रार्थनेच्या वेळेस जें प्रार्थनागीत म्हणण्यांत आलें त्याचाच उल्लेख करून गांधीजी म्हणाले, “ईश्वरावर जे श्रद्धा ठेवतात, त्यांच्या हृदयांतील भीति तो दूर करतो असें आतां म्हटलेल्या प्रार्थनागीतांत होतें.

आजकाल दिल्लीचे हिंदु–शीख मुसलमानांस भय घालीत आहेत. ज्यांना स्वतः निर्भय व्हायचें असेल त्यांनीं दुसऱ्यांच्या हृदयांत भय निर्माण करूं नये.

सरहद्द प्रान्तांत बन्नू आहे. एका मुसलमान मित्राच्या घरीं तेथें मी राहिलेलों आहें. बन्नूचे कांहीं लोक येऊन म्हणाले कीं जर त्यांना तेथून लवकर हलविण्यांत आलें नाहीं तर सर्वांना ठार करण्यांत येईल, सारा विध्वंस होईल. ज्या मुसलमानाच्या घरीं मी राहिलों होतों, तो पूर्वीप्रमाणेंच खरा मित्र आहे. परंतु तो एकटा काय करणार? तो सर्वांना कसा वांचविणार? सरहद्दीवरचेहि इतर मुसलमान येऊन तेथील हिंदूंना धमकावीत आहेत. बन्नूच्या लोकांचें म्हणणें कीं त्यांना त्वरित वांचवावें, लवकर सर्वांना काढून न्यावें; परंतु माझी येवढी शक्ति कोठें आहे? मी पंडितजी नि सरदार यांच्या कानीं ही गोष्ट घालीन. बन्नूचे लोक म्हणतात कीं हिंदी लष्करानें त्यांच्या मदतीस यावें. परंतु मी शतवार सांगत आलों आहें कीं ईश्वराशिवाय दुसरा त्राता नाहीं. माणूस माणसाला वांचवूं शकणार नाहीं. आपण पुढच्या क्षणीं जिवंत असूं कीं नसूं हें कोणीहि सांगूं शकणार नाहीं. एक ईश्वरच सदैव होता, आहे आणि सदैव असेल. म्हणून सर्वांचें एकच कर्तव्य कीं त्याला हांक मारावी, त्याच्यावर विसंबावें. एक गोष्ट मात्र कधींहि विसरूं नका : वाइटाची फेड वाइटानें करूं नका.

## अल्पसंख्याकांचें रक्षण

पाकिस्तानांतील हिंदु–शीखांना भय वाटतें हें तेथील सरकारला भूषण नाहीं. स्वतः कायदे–आझमांनीं अल्पसंख्य लोकांना अभयवचन दिलें आहे. असें असूनहि अशा गोष्टी होणें बरें नाहीं. पाकिस्तानांतील काय, हिंदुस्थानांतील काय, दोन्ही राज्यांतील बहुसंख्य लोकांनीं अल्पसंख्य लोकांचें रक्षण केलें पाहिजे. त्यांचे प्राण, त्यांची अब्रू, त्यांची मालमत्ता बहुसंख्य लोकांच्या हातीं आहेत.

## भाऊच शत्रू झाले

जे कालपर्यंत भाऊ भाऊ म्हणून राहत होते, ज्यांचें रक्त जालियनवाला बागेंत एकत्र सांडलें गेलें, तेच आज एकमेकांचे कट्टे दुश्मन व्हावे हें पाहून माझी मति तर गुंग होऊन जाते! जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी म्हणत राहीन, सांगत राहीन, कीं असें नाहीं होतां कामा. माझ्या

हृदयांत अपार वेदना आहे. क्षणाक्षणाला प्रभूला मी विव्हळून प्रार्थीत आहें कीं प्रभो, शान्ति आण. जर शान्ति येणार नसेल तर त्यानें मला न्यावें अशी माझी प्रार्थना आहे.

## शरणार्थी

पावसांत शरणार्थींची काय दैना असेल? दिल्लींतील आणि पूर्व नि पश्चिम पंजाबांतील शरणार्थींचे हाल अशा पावसांत कुत्राहि खाणार नाहीं! कोठें आसरा नाहीं, घरदार नाहीं, डोकें टेंकायलाहि जागा नाहीं. कोणाच्या पापां-मुळें त्यांना हे हाल भोगावे लागत आहेत? पश्चिम पंजाबांतून पूर्व पंजाबकडे निर्वासितांचा तांडा येत होता. तो ५७ मैल लांब होता असें मला सांगण्यांत आलें. या गोष्टीचा विचार करतां माझें मस्तक फिरूं लागलें. जगाच्या इतिहासांत अशी घटना घडत आहे म्हणून माझें मस्तक तर लज्जेनें अवनत होतें आणि तुम्हां सर्वांचेंहि व्हायला हवें. कोणाचें पाप अधिक, कोणाचें कमी, असा हिशेब करीत बसण्याची ही वेळ नाहीं, या पागलपणाला आधीं बंदी घाला. हा वेडेपणा आधीं एकदम थांबवा.

## मुस्लिमांचीहि हिंदीसंघराज्यनिष्ठा अवश्यक

हिंदी संघराज्यांतील प्रत्येक मुसलमान हिंदी संघराज्याशीं निष्ठावंत नसून पाकिस्तानाविषयीं निष्ठा राखणारा आहे असें कांहींनीं मला सांगितलें. हा आरोप खोटा आहे असें मी सांगूं इच्छितों. किती तरी मुसलमान माझ्याकडे येऊन याच्या उलट सांगतात. कांहीं असो, हिंदी संघराज्यांतील बहुसंख्य जमातींना अल्पसंख्य जमातीचें भय बाळगण्याचें कारण नाहीं. हिंदी संघराज्यांतील साडेचार कोटी मुसलमान सर्व संघराज्यांत सर्वत्र पांगलेले आहेत. खेड्यांत राहणारे मुसलमान तर गरीब व निरुपद्रवी असतात; सेवाग्रामला मी पाहतोंच. त्यांना पाकिस्तानशीं काय करायचें आहे? त्यांना काय म्हणून घालवायचें? जर कोणी देशद्रोही असतील तर कायदा त्यांचा समाचार घेईल. देशद्रोह्यांना तर गोळ्या घालण्यांत येतात! अॅमेरीच्या मुलालाहि गोळी घालण्यांत आली! अर्थात् माझा कायदा हा नव्हे. दुसरे कोणी म्हणतात कीं कांहीं मुसलमान अधिकारी येथें मुद्दामच राहिले आहेत; हिंदी

संघराज्यांतील मुसलमान पाकिस्तानशीं निष्ठावंत राहावे, हा त्यांचा हेतु आहे. कांहींचें म्हणणें असें कीं मुसलमान सर्व हिंदूंना काफर म्हणूनच समजतात. परंतु विद्वान् मुसलमानांनीं मला सांगितलें कीं, ' असें मानणें साफ चूक आहे. मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू हे ज्याप्रमाणें दैवी धर्मग्रंथांचे अनुयायी, त्याचप्रमाणें हिंदूहि त्यांच्या दैवी ग्रंथांचे अनुयायी. ' कांहीं असो, माझें हिंदु-शीखांना एकच सांगणें आहे कीं मुसलमानांविषयींची भीति अंतःकरणांतून काढून टाका. त्यांच्याशीं स्नेहानें वागा, उदारपणानें वागा, कठोर नका होऊं. त्यांना परत बोलवा; त्यांच्या घरींदारीं त्यांना पुनः येऊन राहूं दे; त्यांना संरक्षणाची हमी द्या. तुम्ही असें कराल तर पाकिस्तानी मुसलमानहि मैत्रीचा हात पुढें करतील. सरहद्दीपलीकडचे टोळीवालेहि निराळे बनतील. भारताचा तरी शान्तीचा नि जीवनाचा हाच मार्ग आहे. हिंदुस्थानांतील सारे मुसलमान हांकलणें, पाकिस्तानांतून सारे मुस्लिमेतर हांकलणें, म्हणजे युद्धच पुकारणें होय. तो मार्ग चिर विनाशाचा आहे. दोन्ही राज्यें याच आत्म-घातकी मार्गाचा अवलंब करतील तर इस्लाम आणि हिंदुधर्म दोन्ही नष्ट होतील. चांगल्यांतून चांगलें संभवतें, प्रेमच प्रेमाला प्रसवतें. माणसानें पाप-कर्म करणाऱ्याला ईश्वराच्या हातीं सोंपवावें, स्वतः सूड घेण्याच्या भानगडींत पडूं नये; प्रभु पाहून घेईल. मला तरी याहून दुसरा मार्ग माहीत नाहीं.

## १०

२१-९-'४७.

## विरोधकालाहि मान

बिर्ला-भवनाच्या आवारांत प्रार्थनेला मंडळी जमली. परंतु कुराणांतील ' अल फतेहा ' ही प्रार्थना म्हणायला एकानें विरोध दर्शविला, तेव्हां गांधीजींनीं सार्वजनिक प्रार्थना बंद ठेवली; परंतु श्रोत्यांना उद्देशून दोन शब्द त्यांनीं सांगितले. ते म्हणाले, " विरोधकाशीं मी चर्चा करणार नाहीं, बुद्धिवाद करणार नाहीं. लोकांच्या हृदयांत आजकाल क्रोध आहे. मी ती गोष्ट समजूं शकतों. वातावरण इतकें विद्युन्मय आहे कीं एकाहि विरोधकाला

मी सन्मानूंच इच्छितों. याचा अर्थ असा नाहीं कीं मीं ईश्वराला सोडलें, त्याची पूजा मनांतून सोडली. प्रार्थनेला पवित्र वातावरण हवें असतें. अशा आक्षेपांपासून एक गोष्ट सर्वांनीं ध्यानांत घ्यावी; ती ही कीं ज्यांना सेवा करायची आहे त्यांनीं अपार सहनशीलता तशीच सहिष्णुता दाखवायला हवी. कधींहि कोणावर आपले विचार लादूं नये.

## फलहीन वृक्ष सुकूं लागतो

आज मी श्रीमती इन्दिरा गांधींबरोबर एका मोहल्यांत गेलों होतों. तेथें हिंदू पुष्कळ होते; जवळच मुसलमानहि भरपूर राहत होते. 'महात्मा गांधीकी जय!' असा घोष करून हिंदूंनीं माझें स्वागत केलें; परंतु आज माझा जय नाहीं हें त्यांना कळलें नाहीं. जोंवर हिंदू, शीख व मुसलमान शान्तीनें एकत्र राहूं इच्छीत नाहींत, तोंवर मलाहि जगायची इच्छा नाहीं. ऐक्यांत सामर्थ्य असतें, दुहींत दुबळेपणा असतो. तुम्हां सर्वांना या सत्याची नीट जाणीव व्हावी म्हणून मी माझी पराकष्ठा करीत आहें. ज्या झाडाला फळें येईनाशीं होतात, तें ज्याप्रमाणें मरतें, त्याप्रमाणें माझ्या सेवेलाहि अपेक्षित फळ येत नसेल तर हा देह काय कामाचा? हें सारें खरें असलें तरी अनासक्त राहून निष्काम कर्म करीत राहणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. आसक्तीपेक्षां अनासक्ति अधिक फलदायी आहे. खऱ्या गोष्टींचाच सत्यार्थ मी सांगत आहें. तर्कशुद्ध गोष्टीच मी मांडीत आहें. निरुपयोगी शरीर गळून पडणार, नवीनाला जागा देणार! आत्मा अमर आहे, अविनाशी आहे; सेवेच्या द्वारा स्वतःचा मोक्ष मिळवण्यासाठीं तो नवीन नवीन आकार सदैव घेत असतो.

## आपलीं घरें सोडूं नका

आज मुसलमानांच्या सभेला मी गेलों होतों. हिंदू शेजाऱ्यांनीं छळलें ठार केलें तरी आपलीं घरें सोडूं नका असें मीं त्यांना सांगितलें. माझा शहाणपणाचा मार्ग पसंत नसेल तर प्राण वांचविण्यासाठीं तुम्ही निघून जाऊं शकतां; परंतु माझें म्हणणें ऐकाल तर इस्लाम नि हिंदुस्थान, दोहोंचीहि तुम्ही सेवा कराल. तुम्हांला सतावणारे हिंदु-शीख हिंदुस्थानची अपार हानि करतील, स्वतःच्या धर्मालाहि कलंक लावतील! साडेचार कोटी मुसलमानांना

एकजात नष्ट करणें किंवा हांकलून लावणें म्हणजे केवळ वेडेपणा आहे; हें अशक्य आहे. तुम्हीहि हेंच करूं इच्छितां असें कांहीं लोक मला म्हणाले. पोलीस आणि लष्कर यांची मदत घेऊन मुसलमानांना त्यांच्या घरीं पुनः नेणें ही गोष्ट मला नको आहे. तसें करण्याची मला इच्छा नाहीं. मात्र अशी इच्छा नि आशाहि आहे कीं क्रोध–द्वेष शांत झाल्यावर हिंदू आणि शीख यांनीं आपण होऊन मुसलमान निर्वासितांना सन्मानपुरस्सर पुनः आणावें. तोंवर शरणार्थींचीं, निर्वासितांचीं घरेंदारें सरकारनें विश्वस्त म्हणून काळजीपूर्वक संभाळावीं.

## सरकारनें राजीनामा केव्हां द्यावा ?

जर सरकारजवळ ही शक्ति नसेल, म्हणजेच जनता सरकारला जर योग्य तें करूं देणार नसेल, तर ज्यांना मुसलमानांना हिंदुस्थानांतून घालवून द्यायचें आहे किंवा ठार करायचें आहे, अशांसाठीं सरकारनें राजीनामा द्यावा असा मी सल्ला देईन. एका वर्तमानपत्रानें अशी सूचना गंभीरपणें केली होती, ती मीं पाहिली आहे. परंतु असा सल्ला देणें म्हणजे राष्ट्रीय हत्या करणें होय. हिंदुधर्माचा त्यांत नाश आहे, राष्ट्राचें त्यांत मरण आहे. स्वतंत्र हिंदुस्थानांत असें वर्तमानपत्र आस्तित्वांत असावें याचें मला आश्चर्य वाटलें. जनतेच्या मनांत विष पेरणें म्हणजे का मुद्रणस्वातंत्र्य ? मुद्रणस्वातंत्र्य म्हणजे का बेछूटपणें विषारी प्रचार करणें ? असें धोरण असावें असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं सरकारजवळ राजीनाम्याची मागणी करावी. आजपर्यंत जग आशेनें हिंदुस्थान-कडे बघत होतें; अतःपर तुमच्याकडे तसें कोणी पाहणार नाहीं. तें कांहीं असो, माझ्या जिवांत जीव असेंपर्यंत 'असा आत्यन्तिक अविवेक करूं नका, केवळ वेडेपिसे होऊं नका', असें मी सारखें सांगतच राहीन.

## ११

२२-९-'४७.

## विरोधकांचें कर्तव्य

प्रार्थनेला काल विरोध करणारा एकच होता. त्याच्या विरोधाला मीं मान दिला; मीं सार्वजनिक प्रार्थना काल केली नाहीं. मीं केलें तें चांगलेंच केलें; परंतु या गोष्टीचें आणखी थोडें खोल जाऊन परीक्षण केलें तर अनुचित होणार नाहीं. सार्वजनिक प्रार्थना याचा अर्थ इतकाच कीं कोणालाहि तेथें मज्जाव नाहीं. ही प्रार्थना खासगी जागेंत होत असते. कुराणांतील भागासह होणारी ही प्रार्थना ज्यांना रुचत असेल, अशा प्रार्थनेवर ज्यांची श्रद्धा असेल, त्यांनींच खरोखर येथें येणें योग्य होईल. प्रार्थनेची जागा म्हणजे वादविवादाची जागा नव्हे. एकाच जागेवर नानापंथीयांची एकत्र प्रार्थना होणें शक्य आहे. विशिष्ट प्रार्थनेला ज्यांचा विरोध असतो त्यांनीं अशा प्रार्थनांना उपस्थित न राहणेंच समंजसपणाचें होईल. नाहीं तर प्रक्षोभाशिवाय, बखेड्याशिवाय एकहि सभा होणें शक्य नाहीं. सभेंत व्यत्यय आणणें हाच जर धर्म होऊं लागला, तर पूजास्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, वाक्स्वातंत्र्य, यांना कांहीं अर्थच राहणार नाहीं. सदाचारयुक्त समाजांत या प्राथमिक हक्कांचें रक्षण करण्या-साठीं हत्यारांची जरुरी भासूं नये. सर्वांनींच हा सदाचार, हा शिष्टसंकेत पाळला पाहिजे.

## निरोगी सहिष्णुता

कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे प्रसंगीं प्रदर्शन–जागेवर नानापंथीयांच्या, नाना राजकीय पक्षांच्या विरोधी मत प्रदर्शित करणाऱ्या सभाहि तंट्याबखेड्या-शिवाय नीट पार पडत असत व तें दृश्य पाहून मला फार आनंद होत असे. नाना मतमतांतरें व आत्यान्तिक प्रतिकूल मतेंहि मांडलीं जात असत; तरी पोलिसांचें रक्षण कधींहि मागावें लागलें नाहीं. या मूलभूत नियमाविरुद्ध कोणीं

वर्तन केलें तर जनता त्याचा निषेध करी. ती निरोगी परमतसहिष्णुता आज कोठें गेली ? राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर, त्याचा दुरुपयोग करून, त्याची कसोटी का आपण पाहत आहों ? राष्ट्रीय जीवनांतील ही एक तात्पुरती क्षणजीवी लहर आहे अशी आपण आशा करूं या.

हे सारे प्रकार मुस्लिम लीगच्या दुष्कृत्यांमुळेंच होत आहेत असें मला नेहमींप्रमाणें नका सांगूं. समजा, ती गोष्ट खरी असली, तरी आपली सहिष्णुता का इतकी तकलादू असावी कीं जरा ताण पडतांच ती भंगावी, नष्ट व्हावी ? सदाचार नि सहिष्णुता तरच यथार्थ, जर आत्यंतिक प्रसंगींहि तीं टिकून राहतील. कितीहि का ताण पडेना, सहिष्णुता संपतां कामा नये, सदाचार सुटतां कामा नये. जर तीं टिकणार नसतील, तर भारताला वाईट दिवस आले असें समजा. स्वराज्याला आपण पात्र नाहीं असें म्हणायला टीकाकारांना वाव देऊं नका ! आणि असे टीकाकार थोडे नाहींत. अशा टीकाकारांना द्यायला पुष्कळ उत्तरें माझ्या मनांत आहेत; परंतु त्यानें मनाचें समाधान नाहीं होत. आपली सहिष्णु, संमिश्र संस्कृति स्वतःसिद्ध नसावी या विचारानें माझा अभिमान खंडित होतो. भारतावर, हिंदमातेच्या कोट्यवधि लेंकरांवर मी प्रेम करतों आणि म्हणूनच मला दुःख होतें.

## जर हिंदुस्थान घसरेल तर ?

हिंदुस्थान घसरेल तर आशिया मेला असें समजा. हिंदुस्थान म्हणजे अनेक संमिश्र संस्कृतींचें नि सुधारणांचें माहेरघर असें म्हटलें जातें. किती यथार्थ आहे हें म्हणणें ! जगांतील सर्व पददलितांची आशा हें हिंदुस्थानच असो !—मग ते दुःखी दलित लोक, ते शोषित लोक, आशियांतील असोत, आफ्रिकेंतील असोत वा जगाच्या कोणत्याहि भागांतील असोत.

## बिगरपरवाना शस्त्रास्त्रें

आणि आतां मी बिगरपरवाना हत्यारांच्या मुद्द्यावर येतों. अशा गुप्त हत्यारांचा फार बाऊ करण्यांत येत आहे. अशीं कांहीं हत्यारें मिळालींहि. कांहीं लोक आपण होऊन माझ्यापाशीं हत्यारें आणून देत आहेत ! पण जीं कांहीं हत्यारें आतांपर्यंत सांपडलीं, तीं दिल्लीच्या मानानें फार आहेत असें

मला वाटत नाहीं. ब्रिटिश राजवटींतहि छुपीं हत्यारें आपल्याजवळ असत; त्या वेळेस त्यांची फिकीर कोणी करीत नसे. एकाद्या विशिष्ट ठिकाणीं दारूगोळा, हत्यारें आहेत असें तुम्हांला नक्की समजलें तर त्यांना बेशक उडवून द्या. फिरून फिरून त्याच त्याच गोष्टी बोलण्यांत काय अर्थ? इतकीं हत्यारें आहेत, इतका गोरूगोळा आहे असें बडबडायचें आणि सांपडायचें कांहीं नाहीं, हा खेळ पुरे! आपण राजकीय रीत्या आतां स्वतंत्र आहों. ब्रिटिशांना एक कायदा आणि आपल्याला दुसरा असें नाहीं होतां कामा. मारण्याला निमित्त म्हणून कुत्र्याला उगीच नांवें नका ठेवूं. साठ वर्षांच्या परिश्रमानंतर मिळालेल्या स्वातंत्र्याला आपण पात्र आहों असें दाखवायचें असेल तर सर्व संकटांना शौर्यधैर्यांनीं तोंड द्या. किती का कठिण नि महान् संकटें असेनात, त्यांचा मुकाबला केलाच पाहिजे. अशानेंच आपण अधिक लायक ठरूं, अधिक थोर होऊं.

## बहुसंख्याकांचें कर्तव्य

अल्पसंख्याक लोक देशद्रोही होतील अशा भीतीनें त्या सर्वांना हद्दपार करूं पाहणें बहुसंख्याकांना शोभत नाहीं. तो केवळ भित्रेपणा होय. अल्पसंख्य जमातींच्या हक्कांचें निरपिवाद रक्षण करण्यांतच बहुसंख्याकांचा मोठेपणा आहे. त्या हक्कांविषयीं बेदरकार राहाल तर जगांत हास्यास्पद व्हाल. स्वतःवर दृढ श्रद्धा आणि शत्रूवरहि शूराला शोभेसा विश्वास, हाच खरा संरक्षणाचा मार्ग. म्हणून अंतःकरणांतील सारी तळमळ नि कळकळ माझ्या शब्दांत ओतून मीं सांगतों कीं दिल्लींतील सर्व हिंदु–शीख–मुसलमानांनीं प्रेम–स्नेहानें एकत्र जमावें, एकमेकांस हृदयाशीं धरावें आणि सर्व हिंदुस्थानला, नव्हे, सर्व जगाला उदात्त उदाहरण घालून द्यावें. हिंदुस्थानांतील इतर भागांनीं जें कांहीं केलें असेल तें दिल्लीनें विसरून जावें. सूड, प्रतिसूड यांच्या खासगी दूषित चक्रांतून अशा रीतीनेंच दिल्ली मार्ग मोकळा करील. दिल्ली असें करील तर तो केवढा मोठेपणा! सूड घेणें, बदला घेणें, या गोष्टी कोणाच्या असतीलच तर त्या नागरिकांच्या अगर व्यक्तींच्या नसून, सरकारच्या आहेत.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# १२

२३–९–'४७

## सार्वजनिक माफी

आदल्या दिवशीं श्रीमती मनु गांधी नि अभा गांधी यांनीं क्षमायाचना-पत्र वाचून दाखविलें होतें. रविवारीं सायंकाळीं प्रार्थना चालू असतां बेसूरपणा आला. मनु नि अभा यांना हसूं आंवरेना. गांधीजींना त्यामुळें फार दुःख झालें. प्रार्थनेचें महत्त्व त्यांना कळलें नाहीं असें दिसलें. नंतर गांधीजींपाशीं त्यांनीं क्षमा मागितली. आज प्रार्थनेनंतर आरंभीं गांधीजी त्यासंबंधींच बोलले. ते म्हणाले, " क्षमेची जरुरी नव्हती. मी कांहीं त्यांच्यावर रागावलों नव्हतों. परंतु मी स्वतःवर मात्र रागावलों होतों. कारण, त्या मुली माझ्या देखरेखीखालींच वाढल्या होत्या. प्रार्थनेच्या वेळेला ईश्वरांत विलीन व्हायची अवश्यकता मी त्यांच्या मनावर ठसवूं शकलों नव्हतों. दोघींनीं पश्चाताप दर्शविला, चूक कबूल केली, मला बरें वाटलें. परंतु मीं त्यांना सर्वांसमोर माफी मागा म्हणून सांगितलें. त्यांनीं माझी सूचना आनंदानें मानली. माझी अशी श्रद्धा आहे कीं प्रामाणिकपणें आणि खऱ्या अर्थानें जर जनतेसमोर आपण आपली चूक कबूल केली तर त्यामुळें आपला बचाव होतो. पुनः ती व्यक्ति—मग ती व्यक्ति स्त्री असो वा पुरुष असो—तशी चूक करीत नाहीं.

## ज्ञान–रत्नें

पाकिस्तानांत हिंदू आणि शीख यांना ज्या रीतीनें वागविण्यांत येत आहे त्याचा तुम्हांला राग येणें साहजिक आहे. परंतु म्हणून तुम्हीं कुराणांतील प्रार्थना म्हणायला विरोध करावा असें नाहीं. गीता, कुराण, बायबल, ग्रंथ-साहेब, झेंद अवेस्ता, या सर्वांतून ज्ञानाचीं रत्नें आहेत. त्या त्या धर्मग्रंथांचे अनुयायी त्यांतील शिकवणुकीच्या विरुद्ध वागतात म्हणून त्या ग्रंथांचाच तिरस्कार तुम्ही नाहीं करतां कामा.

## शूराप्रमाणें मरण्याची कला.

आज रावळपिंडी आणि डेरागाझीखान येथील हिंदु–शीखांचीं शिष्ट–मंडळें मला भेटलीं. रावळपिंडीला हिंदू नि शीख यांनींच वैभव प्राप्त करून दिलेलें आहे. ते तेथें सुखी होते. परंतु आज ते निराधार निर्वासित झाले आहेत. मला अति दुःख झालें. आजच्या लाहोरला वैभव कोणीं दिलें? हिंदू आणि शीख यांनींच लाहोरला मोठेपणा दिला; परंतु स्वतःच्या भूमींतून आज ते निर्वासित केले गेले आहेत. तसेंच दिल्लीच्या थोर वैभवांत मुसलमानांचा थोडाथोडका का हिस्सा आहे? खरें म्हणजे ऑगस्ट १५ला जो हिंदुस्थान होता, तो तसा बनवायला सर्वांचेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. सर्व जातींजमातींनीं त्यांत भर घातली आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनीं पाकिस्तांनांतील प्रत्येक भागांत जे हिंदू व शीख उरलेले आहेत, त्यांना संपूर्ण संरक्षण द्यावें. त्यांचें हें कर्तव्य आहे यांत शंका नाहीं. रावळपिंडींत अजून अठरा हजार हिंदु–शीख आहेत; वाह येथील छावणींत तीस हजार आहेत. माझा तर सदैव एकच संदेश आहे कीं आपलीं घरेंदारें सोडण्याऐवजीं सर्वांनीं मरायला तयार व्हावें. शौर्यानें मरण्याची कला शिकायला कांहीं विशेष शिक्षण मिळावें लागतें असें नाहीं. फक्त ईश्वरावर जिवंत श्रद्धा असायला हवी. अश्या रीतीनें मरायची तयारी कराल तर सक्तीचीं धर्मान्तरें होणार नाहींत वा मुलींनाहि कोणी पळवून नेणार नाहीं. मीं शक्य तितक्या लवकर पंजाबांत जावें अशी तुमची सर्वांची उत्कट इच्छा आहे हें मी जाणतों. मीहि जायला अधीर आहें. परंतु दिल्लींत जर मला यश येत नसेल तर पाकिस्तानांतहि मला यश येणें अशक्य आहे. कारण, पाकिस्तानांतील सर्व प्रान्तांत नि भागांत मला एका ईश्वरावरच श्रद्धा ठेवून जायचें आहे. कोणाचेंहि संरक्षण न घेतां एका ईश्वरावरच भरंवसा ठेवून मी जाणार आहें. मी मुसलमानांचा त्याचप्रमाणें सर्वांचा मित्र म्हणून तिकडे जाऊं इच्छितों. माझें जीवित त्यांच्या स्वाधीन आहे. ज्याला माझे प्राण घ्यायचे असतील, त्यानें खुशाल घ्यावे! कोणाच्याहि हातून मरण येतांना माझ्या तोंडावर आनंद असावा येवढीच माझी आशा आहे. म्हणजे इतरांना जें करायला मी सांगतों, तें मींहि केलें असें होईल.

## निर्वासितांसाठीं घरें

निर्वासितांनीं माझ्याजवळ घरांची मागणी केली आहे. मीं त्यांना म्हटलें, "वरतीं आकाशाचें छत नि खालीं धरित्री–माय यांतच समाधान माना. मुसलमानांचीं परित्यक्त घरें बळजबरीनें ताब्यांत घेऊन तेथें राहण्यापेक्षां आकाशाखालीं राहणें बरें. तुम्ही सारे जर काम कराल तर एका दिवसांत जरुरीपुरता निवारा निर्मू शकाल. आणि असा निवारा करून दिला तर निर्वासितांचा घुस्साहि कमी होईल, कटु भावना जरा शांत होतील व असें वातावरण निर्माण होईल कीं मी ताबडतोब पंजाबांत जाऊं शकेन.

# १३

२४–९–'४७

## भारताची दुबळी नौका

प्रार्थनोत्तर प्रवचनाला भजनांतील गीतार्थानेंच गांधीजींनीं आज आरंभ केला. ते म्हणाले, "भजन–गीतांत जणूं हिंदुस्थानचीच स्थिति हुबेहूब वर्णिलेली आहे ! सागरांतून आपली लहानशी नाव प्रभूनें पार न्यावी म्हणून कवीनें त्याची करुणा भाकली आहे, प्रभूजवळ साहाय्य मागितलें आहे.

## सरकारांना अवसर द्या

आज सर्वत्र सूड आणि बदला घेण्याची बुद्धि वातावरणांत भरून आहे. दिल्लींतील हिंदु–शीखांना मुसलमान तेथें नको आहेत. जर आम्हांला पाकिस्तानांतून पिटाळण्यांत येतें तर मुसलमानांना हिंदुस्थानांत जागा कां म्हणून असावी, निदान दिल्लींत तरी नकोच नको, असें त्यांचें म्हणणें. मुस्लिम लीगनें आह्वान दिलें आहे, तें स्वीकारलें पाहिजे, असा त्यांचा दावा. 'लडके लेंगे पाकिस्तान' ही घोषणा करण्यांत मुस्लिम लीगनें चूक केली ही गोष्ट मीहि मानतों. अशी गोष्ट शक्य होईल असें मला कधींहि वाटलें नव्हतें. बळजबरीनें देशाची फाळणी त्यांना कधींच करतां आली नसती. काँग्रेस आणि ब्रिटिश जर या गोष्टीस तयार नसते तर आज पाकिस्तान दिसलें नसतें.

परंतु आतां जें झालें तें झालें. पाकिस्तानांतील मुसलमानांचा तो हक्क आहे. फक्त त्यांनीं क्षणभर हें पाकिस्तान आपणांस कसें मिळालें याचा विचार करावा. कॉंग्रेसच मुख्यत्वेंकरून स्वातंत्र्यासाठीं लढत होती. अहिंसक प्रतिकार हें आमचें हत्यार होतें. ब्रिटिश या शांततामय प्रतिकारापुढें नमले. ते आज निघून गेले आहेत. बळजबरीनें पाकिस्तान नष्ट करूं पाहणें म्हणजे स्वराज्यच नष्ट करणें होय. हिंदुस्थानांत आतां दोन सरकारें आहेत. त्या दोन सरकारांना आपसांत झगडूं दे. नागरिकांनीं सरकारांवर सारें सोंपवावें. जो कत्तलखाना रोज चालला आहे, त्यानें काय होणार? अशा खुनाखुनींतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. ही फुकट मारामारी बंद करा. तिनें भलें कोणाचेंच नाहीं, अपार नुकसान मात्र होऊन राहिलें आहे. बंडखोर बनून लोकच आपसांत लढूं लागतील, तर ते स्वातंत्र्य पचविण्याची स्वतःची नालायकी मात्र सिद्ध करतील. कोणतेंहि एक सरकार जर अखेरपर्यंत योग्य त्या मार्गानेंच जाईल तर आज ना उद्यां दुसऱ्यासहि भला मार्ग स्वीकारावाच लागेल. योग्य मार्गानें जाणाऱ्याला साऱ्या जगाचा पाठिंबा मिळेल. कॉंग्रेसचा इतिहास का आतां निराळा लिहिणार? संघराज्यांत फक्त हिंदूंनाच जागा राहणार का? बाकीच्यांना का हांकलणार? तुमची अशी इच्छा असेल असें मला वाटत नाहीं. पूर्वींच्या आपल्या चांगल्या कामावर तुम्ही बोळा फिरवणार नाहीं अशी मला आशा आहे.

## जुनागड

जुनागडमध्यें काय चाललें आहे याचा थोडा विचार करा. जुनागड आणि इतर काठेवाडी संस्थानें यांच्यांत एक युद्ध पेटणार? इतर सारे संस्थानिक नि त्यांची प्रजा जर खऱ्या अर्थानें एक-मती असतील तर जुनागड काठेवाडपासून अलग राहूं इच्छिणार नाहीं. म्हणून सर्वांचें कर्तव्य आहे कीं कायद्याप्रमाणें वागणें.

# १४

२५-३-'४७

## हिंदी संघराज्यसरकारचें कर्तव्य

प्रार्थनेपूर्वी कोणीं तरी गांधीजींच्याकडे हळूच एक चिठ्ठी पाठविली : " पाकिस्तान–सरकार तेथील हिंदु–शिखांना घालवून देत आहे आणि इकडे तुम्ही तर हिंदी संघराज्यसरकारला 'मुसलमानांना येथें समान नागरिक म्हणून नांदवा' असें सांगत आहां. येथील हिंदी सरकारला हा दुप्पट बोजा कसा झेपणार ? "

प्रार्थनोत्तर या प्रश्नाला उत्तर देतांना गांधीजी म्हणाले, " पाकिस्तानांत हिंदू आणि शीख यांना वाईट रीतीनें वागविण्यांत येतें, तिकडे हिंदी सरकारनें लक्ष देऊं नये असें मीं सुचविलेलें नाहीं. तिकडील हिंदु–शीखांना वांचविण्याची पराकाष्ठा हिंदी संघराज्यसरकारनें केली पाहिजे. परंतु येथील मुसलमानांना हांकलून पाकिस्तानी पद्धतीचा अवलंब आपणहि करणें हें पाकिस्तानला उत्तर नव्हे. ज्यांना पाकिस्तानांत आपखुषीनें जाण्याची इच्छा आहे, त्यांना सीमेपर्यंत सुरक्षित पोंचविण्यांत यावें. पाकिस्तानांतील हिंदु–शीखांच्या संरक्षणाची जबाबदारी हिंदी सरकारवर आहे. त्यांचें संरक्षण होईल अशी खातरजमा हिंदी सरकारनें द्यावी. परंतु सरकारला सर्वांनीं पूर्ण वाव द्यावा. प्रत्येक हिंदी माणसानें सरकारला मनापासून सहकार्य द्यावें. स्वतःच्या हातांत कायदा घेणें म्हणजे सरकारशीं सहकार्य नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचें बालक केवळ महिन्यादीडमहिन्याचें आहे. जर तुम्ही सूडबुद्धीचा वेडेपणाच सुरू ठेवाल तर हें स्वातंत्र्याचें बाळ पाळण्यांतच मरेल !

## धर्माचा विजय

रामायण तुम्हांला माहीत आहे. रावण किती बलाढ्य ! परंतु वनवासी रामच अखेर विजयी झाला. कारण तो धर्मानें वागत होता. दोन्ही पक्ष जर

बेकायदा असतील तर अमुक वाईट असें कोणाकडे बोट दाखविणार ? कोणीं आधीं आरंभ केला, कोणाचा अत्याचार कमी, कोणाचा अधिक, असे प्रश्न उभे करण्यांत अर्थ नाहीं. अशानें स्वतःच्या वर्तनाचें कांहीं समर्थन होत नसतें.

## देशद्रोह्याला शिक्षा

तुम्ही शूर लोक आहां. बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याशीं तुम्हीं सामना दिला. आजच एकाएकीं तुम्ही दुबळे कसे बनलां ? शूरानें ईश्वराशिवाय कोणाचें कधींहि भय धरूं नये. मुसलमान देशद्रोह करतील तर ते स्वतःच प्राणांस मुकतील. कोणत्याहि देशांत देशद्रोह हा सर्वांत मोठा गुन्हा मानला जातो. कोणतेंहि सरकार देशद्रोह्यांना वाव देऊं शकणार नाहीं. परंतु केवळ संशयानें माणसांना हद्दपार करणें बरें नाहीं. तें शोभत नाहीं.

## पोलिसांचें नि लष्कराचें कर्तव्य

हिंदी संघराज्यांत तद्वतच पाकिस्तानांत पोलीस आणि लष्कर अनुक्रमें हिंदु-शीखांची नि मुसलमानांची बाजू घेतात असें मीं ऐकलें. तें ऐकून मला अति दुःख झालें. जोंपर्यंत परकी सत्तेखालीं पोलीस होते नि सैन्य होतें, तोंपर्यंत देशाच्या सेवेचा विचारच त्यांना करतां येत नसे. परंतु आज ते सारे राष्ट्राचे सेवक आहेत. ब्रिटिश अधिकारी जे आहेत तेहि राष्ट्राचे सेवकच आहेत. त्यांनीं पक्षपातातीत राहिलें पाहिजे, प्रामाणिक असलें पाहिजे.

जनतेनें पोलीस आणि लष्कर यांची भीति धरूं नये. कारण, जनता कोट्यवधि आहे, तर पोलीस आणि लष्कर मूठभर आहेत. जर जनता बरोबर वागेल तर पोलिसांना आणि लष्करासहि बरोबर वागण्यावांचून गत्यंतर नाहीं.

## आग कशी विझवायची ?

आज व्हाइसरॉय साहेबांची मीं भेट घेतली. दिल्लींतील सर्व जातीं-जमातींतील प्रमुख लोकांना नि कार्यकर्त्यांनाहि मी भेटलों. नंतर काँग्रेसच्या कार्यकारिणी समितीसहि मी उपस्थित राहिलों. जेथें जेथें मी गेलों तेथें तेथें एकच

प्रश्न चर्चिला गेला. द्वेषाच्या व सूडबुद्धीच्या ज्वाला कश्या विझवायच्या या एकाच प्रश्नावर बोलणें होई. मनुष्यानें स्वप्रयत्नाची पराकाष्ठा करावी आणि मग श्रद्धेनें व विश्वासपूर्वक फळ प्रभूच्या हातीं सोंपवावें. जे स्वतः उत्कृष्ट व पराकाष्ठेचे प्रयत्न करतील, त्यांनाच प्रभूहि हात देईल.

## १५

२६-९-'४७

प्रार्थनेच्या आधीं कुराणांतील प्रार्थनेला कोणाचा विरोध आहे का म्हणून गांधीजींनीं विचारलें. एक तरुण म्हणाला, "कुराणांतील भाग वगळा." "मी तसें करूं शकत नाहीं," गांधीजी म्हणाले. पुढें ते म्हणाले, "इच्छा असेल तर मी सर्वच प्रार्थना बंद ठेवतों." श्रोते म्हणाले, "आम्हांला सर्व प्रार्थना हवी आहे." विरोधी तरुणहि शांत बसला.

### ग्रन्थसाहेब

प्रार्थनेनंतर गांधीजी म्हणाले, "आज बाबा खरगसिंघांचे अनुयायी असणारे कांहीं शीख मित्र भेटायला आले होते. ते मला म्हणाले, "आज चाललेलें हत्याकाण्ड शीखधर्माच्या विरुद्ध आहे येवढेंच नव्हे तर कोणत्याहि धर्माच्या विरुद्ध आहे. एकानें ग्रन्थसाहेबांतील नानकांचें एक वचन म्हणून दाखविलें. नानक म्हणतात, "ईश्वराला अल्ला, रहीम, अशा नाना नांवांनीं संबोधण्यांत येतें. कोणत्या नांवानें त्याला हांक मारतां, हा मुख्य प्रश्न नाहीं. तुमच्या हृदयांत तो असला म्हणजे झालें. कबीरांप्रमाणेंच सर्व धर्मांचा समन्वय करण्याचा नानकांचाहि प्रयत्न होता. नानकांचा तो चरण तुम्हां सर्वांना ऐकविण्यासाठीं मीं टिपूनहि घेतला होता, पण येथें आणायला विसरलों. उद्यां आणीन.

### माझी महत्त्वाकांक्षा

लाहोरचे पंडित ठाकुरदत्त माझ्याकडे आले होते. त्यांनीं स्वतःची करुण कथा निवेदिली. सांगतां सांगतां त्यांचे डोळे भरून आले. अगतिक होऊन

त्यांना लाहोर सोडणें भाग पडलें. ते म्हणाले, "पाकिस्तानांतील स्वतःचें घर-दार न सोडतां तेथें मरणहि पत्करावें असें जें तुम्हीं म्हणतां, तें मलाहि मान्य आहे. परंतु तदनुसार वागण्याचें मला धैर्य वा सामर्थ्य नव्हतें. आज पुनः परत जावें नि मृत्यूला तोंड द्यावें असें मला वाटतें. मी जायला तयार आहें." त्यांनीं परत जावें असें नाहीं मी म्हणत. माझें त्यांना तसेंच दिल्लींतील सर्व हिंदु-शीख मित्रांना आज एकच सांगणें आहे कीं दिल्लींत शांति राखायला मला सारे मदत करा. म्हणजे मग मी नव्या दमानें पश्चिम पाकिस्तानांत जाऊं शकेन. लाहोर, रावळपिंडी, शेखपुरा इत्यादि पश्चिम पंजाबांतील सर्व ठिकाणीं जायची मला इच्छा आहे. सरहद्दप्रांतांत आणि सिंधमध्येंहि मी जाऊं इच्छितों. मी सर्वांचा सेवक आहें. मी सर्वांचें कल्याण चिंतितों, सर्वांविषयीं सदिच्छा बाळगतों. माझ्याबरोबर लष्करी संरक्षण नको. पाकि-स्तानांतून घालविलेला प्रत्येक हिंदु-शीख पुनः आपल्या घरीं सन्मानानें नि प्रतिष्ठेनें जाईपर्यंत मला विश्रांति नाहीं. तोंवर माझी बेचैनी संपणार नाहीं.

## लज्जास्पद वस्तु

पंडित ठाकुर दत्त हे विख्यात वैद्य आहेत. किती तरी मुसलमानांना त्यांनीं मोफत दवा दिला आहे. किती तरी मुसलमान त्यांचे मित्र आहेत. त्यांना लाहोर सोडावें लागावें ही किती लज्जास्पद गोष्ट! हकीम अजमल-खानांनीं सुद्धां दिल्लींतील हिंदु-मुसलमानांची अभिन्न सेवा केली होती. दिल्लींतील तिब्बिया कॉलेज त्यांनींच सुरू केलें होतें. माझ्या हस्तें त्याचें उद्घाटन झालें होतें. हकीम अजमलखानांच्या वंशजांना आज दिल्ली सोडून, तें तिब्बिया कॉलेज सोडून, जायला लागावें हीहि किती शरमेची गोष्ट! सारेच मुसलमान देशद्रोही असणें शक्य नाहीं. ज्यांचा देशद्रोह सिद्ध होईल त्यांना सरकारकडून कडक शासन केलें जाईल.

## अन्याय सहन नाहीं करतां काम।

सर्व प्रकारच्या युद्धाला मी सदैव विरोधच करीत आलों आहें. परंतु पाकिस्तानपासून न्याय मिळवायचे सारेच उपाय जर थकतील, सिद्ध करून दिलेलीहि चूक, पदरांत घातलेलेंहि पाप, जर पाकिस्तान हटवादीपणानें ना-

कबूलच करीत राहील व आपण कांहींच केलें नाहीं असेंच जर म्हणत राहील, तर हिंदी संघराज्याला पाकिस्तानशीं युद्ध करण्यावांचून गत्यंतर नाहीं. युद्ध म्हणजे थट्टा नाहीं. युद्ध कोणासहि नको आहे. तो मार्ग विनाशाचा आहे. परंतु अन्याय सहन करा असें मी कधींच कोणाला सांगणार नाहीं. न्याय्य गोष्टींसाठीं सारे हिंदू कामीं आले तरी मी त्याची पर्वा करणार नाहीं. युद्ध आलेंच तर पाकिस्तानमधील हिंदूंनीं पंचमदळी होतां कामा नये. तें कोणीहि सहन करणार नाहीं. पाकिस्तानविषयीं त्यांना निष्ठा वाटत नसेल तर त्यांनीं निघून यावें. त्याप्रमाणेंच हिंदी संघराज्यांतील ज्या मुसलमानांचा पाकिस्तानकडे ओढा असेल त्यांनीं पाकिस्तानमध्यें जावें. हिंदू आणि शीख यांना न्याय मिळवून देण्याचें काम सरकारचें आहे. लोकांनीं आपल्या इच्छेप्रमाणें सरकारला करायला लावावें. माझा मार्ग विचाराल तर तो निराळा आहे. मी ईश्वराचा पुजारी आहें आणि सत्य–अहिंसा हें माझ्या ईश्वराचें स्वरूप आहे.

## हिंदुधर्माचा नाश फक्त हिंदूच करूं शकतील

एक काळ होता जेव्हां हिंदुस्थान माझें ऐके. आज मीं जणूं जुनाट झालों आहें. नवीन रचनेंत तुम्हांला स्थान नाहीं असें मला सांगण्यांत येतें. या नवीन रचनेंत यंत्रें, आरमार, वैमानिक दल, काय काय तरी असणार ! ठीक. मी या गोष्टींना कधींच संमति देऊं शकणार नाहीं. ज्या साधनानें आम्हीं स्वातंत्र्य मिळविलें, त्यानेंच त्याचें रक्षणहि करूं असें म्हणण्याचें धैर्य तुम्हांला असेल तर मी तुमचा आहें. मग एका क्षणांत माझी शारीरिक दुर्बलता, माझी मानसिक खिन्नता नष्ट होईल. ‘ हंसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान ’ अश्या घोषणा मुसलमान करतात म्हणून बातम्या आहेत. जर माझें चाललें तर हत्यारांच्या जोरावर मी त्यांना हिंदुस्थान कधींच घेऊं देणार नाहीं. सारा हिंदुस्थान इस्लामी करूं असेंहि कांहींचें स्वप्न आहे. युद्धानें तर हें कधींच शक्य होणार नाहीं. पाकिस्तानला हिंदुधर्म केव्हांहि नष्ट करतां येणार नाहीं. तें अशक्य आहे. फक्त हिंदूच हिंदुधर्माला नि स्वतःला नष्ट करूं शकतील. इस्लामहि पाकिस्तानी मुसलमानच नष्ट करूं शकतील; हिंदुस्थानांतील हिंदू नाहीं नष्ट करूं शकणार.

## सत्यमेव जयते

" तुम्ही महात्मा असाल तर चमत्कार करा नि हिंदुस्थान, हिंदू, शीख, यांना वांचवा, " असें परवां प्रार्थनेनंतर एकानें मला सांगितलें. मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं मी महात्मा आहें म्हणून मीं कधींच दावा केला नाहीं. मी तुमच्यासारखाच एक सामान्य जीव आहें. फरक इतकाच कीं तुमच्याहूनहि मी दुर्बल आहें. माझ्या बाजूनें कदाचित् येवढेंच म्हणतां येईल कीं तुमच्यापेक्षां ईश्वरावर माझी श्रद्धा अधिक आहे. सर्व हिंदी जनता—हिंदू, शीख, पारशी, मुसलमान, ख्रिश्चन, सारे—हिंदुस्थानसाठीं प्राण द्यायला तयार होतील तर देशाचें कधींहि नुकसान होणार नाहीं. 'सत्यमेव जयते, नानृतम्' अशी ऋषींची वाणी आहे. 'सत्याचाच जय होतो, असत्याचा नाहीं', ही गोष्ट तुम्ही कधींहि विसरूं नका, येवढेंच मला सांगायचें आहे.

## १६

२७-९-४७

## राम हाच सर्वोत्कृष्ट धन्वन्तरी

माझ्या आजारीपणाविषयीं वर्तमानपत्रांत आलें आहे. तें छापलेलें मला माहीतहि नव्हतें. ती बातमी मला न कळत दिलेली पाहून मला वाईट वाटलें. कामांत व्यत्यय आणण्याइतपत आजारीपण नाहीं. आणि मला बरेंहि वाटत आहे. या गोष्टीला इतकें महत्त्व द्यायला नको होतें. डॉ० दिनशा मेथा हे माझे खासगी वैद्य आहेत असें वर्णिण्यांत आलें आहे. परंतु तें बरोबर नाहीं. डॉ० दिनशा मला म्हणाले, " या वर्णनाला मी जबाबदार नाहीं. " डॉ० दिनशा माझ्याच बोलावण्यावरून आले. परंतु ते मला तपासण्यासाठीं म्हणून आले नव्हते. त्यांच्या मनांत कांहीं आध्यात्मिक प्रश्न उभे राहिले होते, म्हणून ते आले होते. डॉ० मेथा निसर्गोपचारी आहेत. ते माझे मित्र आहेत. त्यांनीं मला अनेकदां मदत दिली आहे. परंतु आज आजारीपणांत अशी त्यांची मदत नको होती.

डॉ० सुशीला नायर, डॉ० जीवराज मेहता, डॉ० विधानचंद्र रॉय, डॉ० गिल्डर आणि मरहूम डॉ० अन्सारी हे माझे खासगी वैद्य होते; परंतु मला दाखविल्याशिवाय कोणींहि वर्तमानपत्रांत कधीं कांहीं दिलें नाहीं. आजकाल माझा वैद्यराज एकच आहे, तो म्हणजे राम. आजच्या भजनांत होतेंच कीं सर्व रोगांवर उपाय म्हणजे राम. मग ते रोग, तीं दुखणीं, शारीरिक असोत, मानसिक असोत वा नैतिक किंवा आध्यात्मिक असोत. निसर्गोपचारी डॉ० दिनशा मेथा यांच्याबरोबरच्या संवादांत या गोष्टीचा मला स्पष्ट साक्षात्कार झाला. निसर्गोपचारांत माझ्या मतें रामनामाला पहिलें स्थान आहे. ज्याच्या हृदयसिंहासनावर राम अधिष्ठित आहे, त्यांना अन्य उपचारांची अवश्यकता नाहीं. राममय माणसाला पाणी, माती यांच्या उपचारांचीहि जरुरी नाहीं. ज्यांना सल्ला हवा असतो, त्यांना मी अलीकडे हाच देतों. आणि मीच जर अन्य उपायांचा अवलंब करूं लागलों तर तें मला मुळींच शोभणार नाहीं. सेवेच्या हेतूनें मोठमोठ्या डॉक्टरांनीं, हकीमांनीं व वैद्यांनीं मानवजातीची सेवा केली आहे. या तुमच्या दिल्लींतीलच डॉ०जोशी यांनीं हिंदु–मुसलमान, राव–रंक सर्वांची किती सेवा केली होती ? थोर होते ते डॉक्टर जोशी. गरिबांना ते मोफत दवा देत, येवढेंच नव्हे तर, त्यांना जेवूं घालीत व परत जायला भाड्याचे पैसे देत. परंतु वैद्यशास्त्रांतील सारें ज्ञान असूनहि एक ईश्वरावरच भरंवसा ठेवावा असें त्यांना वाटे.

## ग्रंथसाहेबांतील तो चरण

मीं तुम्हांला म्हटलें होतें कीं ग्रंथसाहेबांतील तो चरण मी आणीन म्हणून. तो चरण नानकांचा नसून गुरु अर्जुन देवांच्या गीतांतील आहे. परंतु आपल्याकडे प्रथाच होती कीं स्वतः लिहिलेलें गुरूच्या नांवें प्रसिद्ध करायचें. काय आहे बरें त्या चरणांत ? त्या गीतांत ?

" मनुष्य ईश्वराला राम, खुदा इत्यादि नांवांनीं हांका मारतो. कोणी यात्रेला जातात, गंगादि नद्यांत स्नानें करतात, कोणी मक्केला जातात, कोणी त्याची मंदिरांत पूजा करतात, कोणी मशिदींत करतात, कोणी भक्तिभावानें मनोमय प्रणाम करतात; कोणी वेद वाचतात, कोणी कुराण; कोणी निळा पोषाख करतात, कोणी पांढरा; कोणी स्वतःला हिंदु म्हणवितात, कोणी मुसलमान. नानक

म्हणतो, ‘ जे ईश्वरी कायदा मानतात, तेच खरोखर त्याचें रहस्य जाणतात.’ नानकाची ही शिकवण हिंदुधर्मांत सर्वत्र दिसेल. म्हणून साडेचार कोटी मुसलमानांना हिंदीसंघराज्यांतून घालवूं पाहणें केवळ वेडेपणाचें आहे. मी ही गोष्ट समजूंच शकत नाहीं.

## ...... ... . ही का चूक आहे?

एका आर्यसमाजी मित्रानें मला पत्र लिहिलें आहे. तो लिहितो, ‘ कॉंग्रेसनें आधींच तीन घोडचुका केल्या आहेत आणि ती आतां आणखी एक चौथी करीत आहे व तिला सीमा नाहीं. हिंदुस्थानांत हिंदु–शीखांच्या बरोबर तुम्ही मुसलमान राखूं इच्छितां ही फार मोठी चौथी चूक होय. ’ मी कॉंग्रेसविषयीं बोलत नाहीं. मी स्वतःविषयीं हें निःशंकपणें सांगण्याचें धाडस करतों कीं पत्रकारानें जी चौथी फार मोठी चूक म्हणून सांगितली आहे, ती करायला मी बेशक सिद्ध आहें. पाकिस्तान पिसाट झालें म्हणून आपणहि पिसाट व्हायचें का? असें करणें म्हणजे मात्र मोठी चूक होईल, येवढेंच नव्हे तर तो अति मोठा गुन्हा होईल. हा तुमचा वेडेपणा जेव्हां थांबेल, तेव्हां तुम्हांला कळून येईल कीं मी बरोबर होतों आणि तुम्ही चूक होतां.

## सैतानी असहिष्णुता नि ढवळाढवळ

आणि राजकुमारी अमृत कोर यांचा काय दुःखदायी अनुभव आहे, तुम्हांला माहीत आहे? आरोग्यखातें त्यांच्याकडे आहे. त्या ख्रिश्चन आहेत. आणि त्याच जोरावर त्या हिंदु नि शीखहि आहेत. सर्व छावण्यांच्या हित-मंगलांकडे त्या लक्ष देतात. मग त्या छावण्या मुसलमानांच्या असोत वा हिंदूंच्या असोत. अमृत कोरनें मुस्लिम छावण्यांत काम करण्यासाठीं ख्रिश्चन मुलींचें नि पुरुषांचें एक सेववापथक तयार केलें. आतां कांहीं संतप्त नि अ-विवेकी लोकांनीं ख्रिश्चनांना धमकी दिली आहे. अनेक ख्रिश्चन त्यामुळें घरेंदारें सोडून गेले. खरोखर हा राक्षसी प्रकार आहे! राजकुमारी मला म्हणाल्या, “ एका ठिकाणच्या हिंदूंनीं गरीब ख्रिश्चनांचा संभाळ करण्याची हमी दिली आहे. ” तें ऐकून मला बरें वाटलें. सारे ख्रिश्चन आपापल्या घरीं शान्तपणें परत येतील, त्यांना दुःखीकष्टी आणि आजारी मानवजातीची

सेवा करूं दिली जाईल, त्यांना कोणी सतावणार नाहीं, अशी मी आशा राखतों.

## माझी श्रद्धा का दुबळी झाली ?

युद्धासंबंधींच्या माझ्या शब्दांना वर्तमानपत्रांनीं फारच महत्त्व दिलें आहे असें दिसतें. कलकत्त्याहून मला विचारण्यांत आलें आहे, " आपण खरोखरच युद्धाचा प्रचार करूं लागलां कीं काय ? " माझें अहिंसेशीं चिरलग्न लागलेलें आहे. मी युद्धाचा प्रचार कधींहि करूं शकणार नाहीं. मीं जर शासनतंत्र हातांत घेतलें तर पोलीस, लष्कर तेथें दिसणार नाहीं. परंतु हिंदी संघराज्य–सरकार कांहीं मी चालवीत नाहीं. मी काय काय शक्यता आहेत त्या दाखवून देत होतों. हिंदुस्थान नि पाकिस्तान, दोघांनीं शान्ततेनें सारे प्रश्न एकत्र बसून सोडवावे. तें अशक्य झालें तर लवादमंडळ नेमावें. परंतु एक पक्ष सारखीं दुष्कृत्यें करीत राहून वरील कोणत्याहि मार्गाला तयार नसेल, तर शेवटीं युद्धाशिवाय कोणता उपाय ? युद्धाची संभाव्यता मीं कोणत्या परिस्थितींत सांगितली तें लक्षांत घ्या. दिल्लींतील माझ्या बहुतेक सर्व प्रार्थनोत्तर प्रवचनांत हीच गोष्ट मी पुनः-पुनः सांगत आलों आहें कीं लोकांनीं कायदा आपल्याच हातांत घेऊं नये. त्यांना सरकार न्याय मिळवून देईल. पाकिस्तानपासून न्याय मिळविण्याचे सर्व योग्य ते मार्ग मी लोकांसमोर ठेवीत आहें; मीं मारामारीचा, खुनाखुनीचा मार्ग तेवढा ठेवलेला नाहीं. कारण, लोक खुनाखुनी सुरू करतील तर भलें सरकार अशक्य होईल. अहिंसेवरील माझी श्रद्धा तिळभरहि कमी झालेली नाहीं असें दिसून येईल.

१७

२८-९-'४७

## चर्चिलचा अविवेक

नेहमींपेक्षां आज अधिक गर्दी होती. कुराणांतील प्रार्थनेला कोणाचा विरोध आहे का असें त्यांनीं विचारलें. दोन माणसांनीं विरोध दर्शविला. गांधीजी म्हणाले, "तुमच्या विरोधाला मी मान देतों. परंतु बाकीच्या लोकांची केवढी निराशा होईल बरें? अहिंसा हा माझा धर्म असल्यामुळें प्रार्थना बंद ठेवण्याशिवाय मला इलाज नाहीं. परंतु दोन माणसांनीं बहुसंख्य लोकांची इच्छा धुडकावणें बरें नव्हे. देशांत सर्वत्रच जें असहिष्णु वातावरण आहे, त्याचाच परिणाम या दोघांवरहि झालेला आहे. परंतु अशा ह्या असहिष्णु धोरणामुळेंच चर्चिलसारख्यांना टीका करायला फावतें. आजच्या सकाळच्या वर्तमानपत्रांत रूटरनें पाठविलेला चर्चिलच्या भाषणाचा सारांश आला आहे. मी तो हिंदुस्थानींत सांगतोः—

आज रात्रीं चर्चिल आपल्या भाषणांत म्हणाले, "हिंदुस्थानांत ज्या भेसूर कत्तली चालल्या आहेत त्यांचें मला आश्चर्य नाहीं वाटलें. अत्याचारांचा, कत्तलींचा हा नुसता आरंभ आहे. परमोच्च संस्कृतीची ज्यांच्यांत पात्रता आहे, ब्रिटिशांच्या उदार, सहिष्णु आणि पक्षातीत राजवटींत कित्येक पिढ्या जे गुण्यागोविंदानें एकत्र नांदत आले, तेच आज नरभक्षक राक्षसांप्रमाणें एकमेकांचें गळे कापीत आहेत! परंतु यांच्याहून भीषण प्रकार होतील. साठसत्तर वर्षे जो भाग जगांतील अत्यन्त शान्त म्हणून मानला जात होता, तेथें किती तरी लोकसंख्या या कत्तलींनीं कमी होईल. भीषण भविष्य मला दिसत आहे. या प्रचंड भागांत, या विस्तीर्ण खंडांत संस्कृतिसुधारणा किती तरी शतकें मागें जाईल! आशिया खंडांत कधीं झाली नसेल अशी ही अति करुण व कठोर घटना आहे."

चर्चिल असें बोलले. तुम्हांला माहीत आहे कीं चर्चिल एक बडे गृहस्थ आहेत. खानदानी इंग्रज रक्त त्यांच्या नसांत आहे. मार्लबरोवंशी लोक इंग्रजी इतिहासांत विख्यात आहेत. दुसरें महायुद्ध पेटल्यावर ग्रेट ब्रिटन संकटांत होतें. अशा कठिण काळीं चर्चिलसाहेबांनीं सुकाणूं हातीं घेतलें. त्या वेळच्या संकटापासून त्या वेळचें साम्राज्य त्यांनींच वांचविलें यांत शंका नाहीं. अमेरिकेची नि इतर दोस्तांची मदत नसती तर ग्रेटब्रिटनला जय मिळाला नसता असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. कारण, या सर्व दोस्तांना एकत्र कोणीं आणलें? चर्चिलचीच जोरदार मुत्सद्देगिरी याला कारणीभूत होती. युद्धांत विजय मिळाला. परंतु ज्या थोर राष्ट्राचे चर्चिल हे तेजस्वी प्रतिनिधि होते, त्या राष्ट्रानें चर्चिलची थोर सेवा मान्य करूनहि केवळ मजूर–सरकार निवडून द्यायला मागेंपुढें पाहिलें नाहीं. कारण, प्राणहानि तशीच वित्तहानि अपार झालेली होती; नवीन पुनर्रचना करायची होती. नवयुगाला शोभेसेंच ब्रिटिश वागले. स्वेच्छेनें साम्राज्य मोडून टाकायचा त्यांनीं निर्णय घेतला. त्या कायदेशीर सत्तासाम्राज्याच्या जागीं, अंतःकरणांतील ऐक्याचें अदृश्य परंतु भव्य–दिव्य असें साम्राज्य उभें करायला ते उभे राहिले. हिंदुस्थानची फाळणी केली गेली तरी हे दोन भाग ब्रिटिश राष्ट्रसंघांत स्वेच्छेनें राहिले आहेत असें जाहीर करण्यांत आलें. ब्रिटिश राष्ट्रानें हा जो थोर निर्णय घेतला, त्यांत सर्व पक्ष सहमत होते. चर्चिल आणि त्यांचा पक्षहि यांत सहकारी होता. ब्रिटिशांनीं घेतलेला निर्णय बरोबर कीं चूक तें भविष्य काळ ठरवील. मला जें म्हणायचें आहे त्याचा त्याच्याशीं संबंध नाहीं. मला येवढेंच सुचवायचें आहे कीं जो निर्णय घेण्यांत चर्चिलनें आणि त्याच्या पक्षानेंहि सहकार्य केलें, त्या निर्णयाचें महत्त्व जेणेंकरून कमी होईल असें चर्चिलनें कांहीं एक करतां कामा नये वा बोलतां कामा नये. ब्रिटिशांनीं आपण होऊन सत्ता सोडणें याला अर्वाचीन इतिहासांत तरी तोड नाहीं! उदारचरित अशोकाचें उदाहरण डोळ्यांसमोर येतें. अशोकाचें दर्शन म्हणजेच परम सुदैव नि सौभाग्य मानण्यांत येई. परंतु अशोक तो अशोक! तो अद्वितीय आहे. आणि पुनः तो अर्वाचीन काळांतीलहि नाहीं. रूटरनें चर्चिलच्या भाषणाचा जो सारांश पाठविला आहे तो चुकीचा असणें शक्य नाहीं. रूटर–संस्था जगद्विख्यात आहे. चर्चिलनीं असें बोलावें याचें मला

वाईट वाटतें. ज्या राष्ट्राची चर्चिलनीं थोर सेवा केली आहे, त्याच राष्ट्राची असें बोलून त्यांनीं हानि केली आहे. ब्रिटिशांच्या सत्तेपासून मुक्त होतांच भारतावर अशा आपत्ती कोसळतील अशी चर्चिलना जाणीव होती वाटतें? आणि जर होती तर त्यांनीं स्वतःच्याच मनाला प्रश्न करायला पाहिजे होता कीं त्यांच्या स्वतःच्याच मतानें ज्या जातीजमाती परमोच्च–संस्कृति–क्षम अश्या आहेत त्या जर असें कांहीं विपरीत करूं लागतील तर त्याचा दोष ज्यांनीं साम्राज्य उभारलें, त्यांच्यावरच नाहीं का येत? चर्चिलसाहेबांनीं असें सरास विधान करण्यांत उतावीळपणा केला असें मला वाटतें. हिंदुस्थानांत कोटयवधि जनता आहे. त्यांतील कांहीं लाख लोक रानटी बनले म्हणून मामला कांहीं बिघडत नाहीं. मी चर्चिलसाहेबांना सांगण्याचें धाडस करतों कीं त्यांनीं स्वतः हिंदुस्थानांत यावें आणि परिस्थितीचा अभ्यास करावा. मात्र त्यांनीं पूर्व–ग्रह–रहित दृष्टीनें यावें; पक्षापेक्षां प्रामाणिकपणाला श्रेष्ठ मानणाऱ्या खऱ्या सज्जन इंग्रजाप्रमाणें येथें यावें; ब्रिटिशांनीं सत्तासंक्रमणाचा जो निर्णय घेतला, तो यशस्वी व्हावा अशा सद्‌बुद्धीनें त्यांनीं येथें यावें नि सारें बघावें. हिंदुस्थानचे दोन तुकडे करणें म्हणजेच यादवीला आह्वान करण्याप्रमाणें होतें. याची कल्पना नसेल, परंतु हें असें झालें खरें. दोन भाग करून, दोघांना अलग अलग स्वातंत्र्य देण्यांत आलें, यांतच बिघडलें. ब्रिटिशांच्या देण्यांत हा कलंक होता, हा दोष होता. तें निर्मळ, निष्कलंक सत्तादान नव्हतें. ब्रिटिश राष्ट्रसंघांतून फुटून जाण्याचें दोघांसहि स्वातंत्र्य आहे असें म्हणणें व्यर्थ आहे. मीं अधिक बोलणें व हा मुद्दा अधिक वाढविणें बरें नाहीं. चर्चिलसाहेबांनीं सावधानता ठेवून बोलावें हें मला सांगायचें होतें व जें मी बोललों तेवढें त्यासाठीं पुरेसें आहे. परिस्थिति स्वतः नीट समजून घेण्याच्या आधींच चर्चिलसाहेबांनीं मजूर पक्षाची——म्हणजेच स्वतःच्या सहकारी मित्रांची निंदा केली आहे.

आणि तुम्हां सर्व श्रोत्यांना मला येवढेंच सांगायचें आहे कीं चर्चिलसारख्यांना तुम्हीच वाव देतां, असें बोलायला संधि देतां. म्हणून अजून वेळ आहे तोंच वर्तन सुधारा. चर्चिलसाहेबांनीं भाकित केलेलं भीषण भवितव्य खोटें पाडा. माझें सांगणें उपड्या घड्यावर पाणी आहे, अरण्यरुदन आहे, हें मी जाणतों. जर माझ्या सांगण्यांत शक्ति असती, स्वातंत्र्याचीं बोलणीं सुरू होण्यापूर्वीं माझ्या शब्दांत जें सामर्थ्य होतें, तें जर आजहि असतें, तर



नगर वाचनालय, सातारा.

चर्चिलसाहेबांनीं ज्या रानटीपणाचें अवास्तव नि अतिशोक्तिपूर्ण वर्णन जणूं मिटक्या मारीत केलें, तसा रानटीपणा कोठेंहि दिसला नसता. तुम्ही शांतपणें आपले आर्थिक नि इतर घरगुती प्रश्न सोडवायला लागलां असतां व त्या मार्गांत तुम्हीं प्रगति केली असती.

## १८

२९-९-'४७

## भातृहत्येचा परिणाम

पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें युद्धाची शक्यता आहे म्हणून मी जें बोललों, त्यामुळें पाश्चिमात्य देशांत बाऊ निर्माण झाला आहे. वार्ताहरांनीं तिकडे काय लिहून पाठविलें मला माहीत नाहीं. सारांश पाठविण्याचा उद्योग पुष्कळ वेळां धोक्याचा असतो. वक्त्याच्या मताचें यथार्थ प्रतिबिंब त्यांत असेल तर गोष्ट निराळी. १८९६मध्यें दक्षिण आफ्रिकेविषयीं मीं लिहिलेल्या एका पत्रकाचा अनधिकृत सारांश पाठविण्यांत आला आणि त्यासाठीं मला माझ्या प्राणांची किंमत द्यायची वेळ आली होती. तो सारांश इतका चुकीचा होता कीं माझ्यावर प्राणांतिक हल्ला होऊन चोवीस तासहि झाले नव्हते तोंच दक्षिण आफ्रिकेंतील युरोपियनांच्या प्रक्षुब्ध मनोवृत्ती निवळल्या आणि एका निरपराधी माणसाला, जी गोष्ट त्यानें केलीच नव्हती तिच्यासाठीं यमयातना सोसाव्या लागाव्या, याचें त्यांना वाईट वाटलें. यावरून आपण हा धडा घ्यायचा कीं ज्यानें जी गोष्ट सांगितली नाहीं किंवा केली नाहीं, तिच्यासाठीं त्याला जबाबदार धरूं नये.

पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें युद्ध होणें अपरिहार्य होईल येवढेंच मीं म्हटलें. युद्धाला मीं प्रोत्साहन दिलें किंवा युद्धाला संमति दिली असा अर्थ माझ्या एकाहि शब्दांतून निघणार नाहीं. केवळ युद्ध शब्द उच्चारण्यानें कांहीं युद्ध होत नाहीं. परंतु आपल्यांत एक समजूत आहे कीं एकाद्या मुलानेंहि घरांत साप शब्द उच्चारला तर खरेंच घरांत साप

येतो. मी आशा करतों कीं युद्ध शब्द उच्चारण्यासंबंधीं अशी वेडगळ समजूत हिंदुस्थानांत कोणी धरीत नसेल.

सद्यःपरिस्थितीचें नीट परीक्षण नि पृथक्करण करून युद्धाशिवाय तरणोपाय केव्हां नाहीं हें मीं दाखवून दिलें. आणि असें करून दोन्ही राज्यांची मीं सेवाच केली आहे असें मी निःशंकपणें म्हणूं शकतों. युद्ध भडकावें म्हणून मीं बोललों नाहीं, तर शक्य तों तें टाळलें जावें म्हणून बोललों. मीं आणखी असेंहि सांगितलें कीं लोक जर खुनाखुनी, जाळपोळ, लूटमार चालू ठेवतील तर आपापल्या सरकारांना ते युद्धांत लोटल्यांशिवाय राहणार नाहींत. क्रमप्राप्त व तर्कशुद्ध गोष्टी लोकांसमोर गंभीरपणें ठेवणें म्हणजे का पाप ?

यादवी थांबून युद्ध भडकूं नये म्हणून मी माझ्या रक्ताचा थेंबन्थेंब आटवीत आहें ही गोष्ट हिंदुस्थान जाणतो व जगानेंहि जाणली पाहिजे. मानवी व्यवहार अहिंसाधर्मानें चालावे या सिद्धान्ताला जो मनुष्य निष्ठेनें व व्रत म्हणून, जीवनावधि चिकटून बसला आहे, तो जेव्हां युद्धाचा उच्चार करतो, तेव्हां सारी शक्ति एकवटून तें टाळावें म्हणूनच करीत असतो. अशी माझी मूलभूत भूमिका आहे व या भूमिकेपासून मरेपर्यंत मी विचलित होणार नाहीं अशी मला आशा आहे.

१९

३०-९-'४७

## सरकारचें कर्तव्य

प्रार्थनेनंतर बोलतांना गांधीजी म्हणाले, " आज मियांवलीचे कांहीं लोक माझ्याकडे आले होते. ज्या मित्रांना पाकिस्तानमध्यें सोडून ते इकडे आले, त्यांच्याविषयीं त्यांना चिन्ता आहे. ते मला म्हणाले, " मागें राहिलेल्यांना जबरदस्तीनें बाटविण्यांत तरी येईल किंवा त्यांना भुकें किंवा अन्य रीतीनें मारण्यांत येईल; स्त्रियांना ते पळवून नेतील. हिंदीसंघराज्याचें हें



४

कर्तव्य नाहीं का कीं त्यानें त्या सर्वांचा बचाव करावा ? अशाच प्रकारच्या कथा अन्य ठिकाणचे लोकहि येऊन माझ्याजवळ सांगत असतात. मी तर मानतों कीं सरकारकडे संरक्षणाच्या आशेनें जे बघतात, त्यांचें संरक्षण करणें सरकारचें कर्तव्य आहे. त्यांना तें करतां येत नसेल, तर त्यांनीं राजीनामा द्यावा. जनतेचेंहि कर्तव्य आहे कीं सरकारचे हात तिनें बळकट करावे. पाकिस्तानमधील अल्पसंख्य लोकांचें रक्षण करण्याचे दोन मार्ग आहेत. उत्कृष्ट मार्ग म्हणजे कायदेआझम जिना आणि त्यांचे मंत्री यांनीं अल्पसंख्य लोकांना संरक्षणाची निःशंक ग्वाही द्यावी. लोकांना आपलें रक्षण होईल असा विश्वास वाटेल असें त्यांनीं केलें पाहिजे; म्हणजे हिंदुस्थान–सरकारकडे बघण्याची त्यांना अवश्यकताच वाटणार नाहीं. परित्यक्त मालमत्तेचें, निर्वासितांसाठीं पाकिस्तान–सरकारनें विश्वस्त बनून, रक्षण केलें पाहिजे. सक्तीचें धर्मांतर, बळजबरीनें पळवून नेणें या गोष्टी तर नाहींच होतां कामा. अगदीं लहान मुलीलाहि—मग ती हिंदु असो वा मुसलमान असो—पाकिस्तानांत वा हिंदुस्थानांत सुरक्षित नि निर्भय वाटलें पाहिजे. कोणाच्याहि धर्मावर हल्ला नाहीं होतां कामा. लोकशाहींत सरकारला बनविणें व बिघडविणें या दोन्ही गोष्टी जनता करूं शकते. प्रजा सरकारला सामर्थ्यसंपन्न करूं शकते वा दुर्बल करूं शकते, कमजोर बनवूं शकते. परंतु शिस्तीशिवाय त्यांना कांहींच करतां येणार नाहीं.

## व्यक्तीची शक्ति

माझें मत विचाराल तर तुम्ही असंतुष्ट झालां तरी मी हेंच सांगेन, पुनः पुनः सांगेन कीं स्वतःच्या धर्माचें रक्षण करणें स्वतःच्याच हातीं असतें. आपल्या धर्मासाठीं प्राण देण्याचें शिक्षण प्रत्येक लहान मुलासहि मिळालें पाहिजे. प्रल्हादाची कथा तुम्हां सर्वांना माहीत आहेच. बारा वर्षांचें त्याचें वय; परंतु स्वतःच्या श्रद्धेसाठीं जन्मदात्या पित्याच्याहीविरुद्ध तो उभा राहिला ! प्रत्येक धर्मांत अशी शौर्यधैर्यांचीं उदाहरणें आहेत. मीं माझ्या मुलांना हेंच शिक्षण दिलें. त्यांच्या धर्माचा मी नाहीं रक्षक. स्त्रियांना अबला म्हणणें चूक आहे. जिची अढळ श्रद्धा आहे, त्या नारीला भय नाहीं. स्वतःचें सतीत्व, स्वतःचा धर्म यांच्यावर आक्रमण होईल अशी भीति अश्या

साध्वीला नसते. सरकारनें त्यांना रक्षण द्यावें. परंतु समजा, सरकारला न जमलें, यश न आलें, तर का कपडे बदलतात त्याप्रमाणें त्यांनीं धर्महि बदलावा?

## हिन्दुस्तानी मुसलमान

मुसलमानांवर होणाऱ्या हल्ल्यांचा उल्लेख करून गांधीजी म्हणाले, "हे मुसलमान कोण आहेत? ते का सारे अरबस्तानांतून आले आहेत? थोडेसे मुसलमान बाहेरून आले. बाकीचे कोट्यवधि मुसलमान मुळांत हिंदूच होते. जे लोक स्वेच्छेनें, जाणूनबुजून आपला धर्म बदलतात, त्यांचा प्रश्न निराळा; परंतु जे अस्पृश्य व जे शूद्र मुसलमान झाले ते कांहीं जाणूनबुजून नाहीं झाले; त्याचा दोष आपणांवरच आहे. अस्पृश्यांना आपण छळलें, म्हणून त्यांनीं इस्लामचा अंगीकार केला. म्हणून मुसलमान बंधु-भगिनींना—जीं मुळांत हिंदूच होतीं, परंतु आपल्या छळामुळें परधर्मांत गेलीं, त्यांना—ठार करणें वा त्यांना छळणें आपणांस शोभत नाहीं.

ता० ११५४/३६३७/३५२

२०

१-१०-'४७

## सेवेचें क्षेत्र अनंत आहे

प्रार्थनोत्तर गांधीजी म्हणाले, "काल सायंकाळीं एका भगिनीनें मला एक चिठी दिली. तींत ती लिहिते, "मी नि माझे पति सेवेसाठीं उत्सुक आहों; परंतु काम काय करावयाचें तें आम्हांला कोणीच सांगत नाहीं." अशा अनेक तक्रारी माझ्याकडे येत असतात. या सर्वांना माझें एकच एक उत्तर आहे: सत्तेचें क्षेत्र छोटें असतें; परंतु सेवेचें क्षेत्र अनन्त आहे. या पृथ्वीयेवढें तें विस्तृत आहे: अगणित कार्यकर्ते सेवेच्या कामांत समावूं शकतील. या दिल्ली शहरांतच आदर्श स्वच्छता आणायला हवी आहे. आधींच असलेली गलिच्छता निर्वासितांच्या येण्याजाण्यानें आणखी वाढली आहे. हें काम कोणीहि आपल्या हातांत घेऊं शकतो. तुम्हांला निर्वासितांच्या छावण्यांत



दा नं 3.6364
स.नं

जाऊन तेथें स्वच्छता निर्मितां येईल. तेथील सफाई संतोषजनक नाहीं. तेथें बहुत काम आहे. त्यांच्या छावण्यांपर्यंत नसेल तुम्हांला जातां येत, तर आसपास स्वच्छता आणा. त्याचाहि सर्व शहरावर परिणाम होईल. मार्गदर्शनासाठीं कोणावर विसंबून नका राहूं. बाहेरच्या सफाईबरोबरच मनाची नि बुद्धीची सफाईहि हवी आहे. हें केवढें थोरलें काम आहे ! आणि यांत किती महान् भवितव्यता सांठविलेली आहे !

## शान्तीच्या अटी

बाबा बचित्तरसिंघांनीं बोलावलेल्या एका सभेला मी गेलों होतों. दिल्लींतील प्रमुख नागरिकांची ही सभा होती. पंडित जवाहरलाल नेहरू या सभेंत बोलणार होते; परंतु लियायतअलीसाहेब चर्चेसाठीं आले, शिवाय चार वाजतां काँग्रेस–कार्यकारिणीची सभा होती व पांच वाजतां मंत्रिमंडळाची बैठक होती; या सर्व कामांमुळें पंडितजी येऊं शकले नाहींत. त्यांनीं दिलगिरी पाठविली होती. बाबा बाचित्तरसिंघांनीं त्या सभेंत बोलण्याविषयीं मला सांगितलें. मीं हो म्हटलें. सभेंत आलेल्या लोकांना प्रश्न विचारा म्हणून मीं सांगितलें. एक मित्र प्रश्न विचारण्यासाठीं म्हणून उभे राहिले. त्यांनीं जणूं एक व्याख्यानच दिलें. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा:—दिल्लीचे लोक मुसलमानांबरोबर शांतीनें राहायला तयार आहेत; परंतु एक अट आहे: मुसलमानांनीं हिंदीसंघराज्यसरकारशीं निष्ठेनें राहिलें पाहिजे आणि जवळ जीं बिगरपरवाना हत्यारें आहेत तीं त्यांनीं परत केलीं पाहिजेत.

जे लोक हिंदीसंघराज्यांत राहूं इच्छितात त्यांनीं संघराज्याशीं निष्ठेनें राहिलें पाहिजे या बाबतींत कोणाचेंच दुमत नाहीं—मग ते लोक कोणत्याहि धर्माचे असोत. बिगरपरवाना हत्यारेंहि सरकारच्या स्वाधीन करायला हवीं. हें सारें ठीक. मीं त्या मित्राला म्हटलें कीं तुमच्या दोन शर्तींना माझी आणखी एक तिसरी शर्त जोडा. ती अशी कीं या सर्व शर्तींची अंमलबजावणी करून घेण्याचें काम सरकारवर सोंपवावें.

## बदला घेणें हा खरा उपाय नव्हे

आज जुन्या किल्ल्यांत जवळजवळ पन्नास हजार मुसलमान शरणार्थी आहेत. हुमायूनच्या कबरेजवळच्या मैदानांत यांहूनहि अधिक मुसलमान निर्वासित पडलेले आहेत. तेथें त्यांची दशा अति दीनवाणी आहे. ‘ हिंदु-शीखांनाहि आपत्ती भोगाव्या लागत आहेत, मग मुसलमानांना भोगाव्या लागल्या म्हणून काय झालें ? ’ असें म्हणूं नये. पाकिस्तानांत हिंदू आणि शीख लोकांना अपार आपत्ती भोगाव्या लागल्या यांत शंकाच नाहीं. हिंदूंना आणि शीखांना पाकिस्तान-सरकारकडून न्याय मिळवून देण्याचें काम हिंदुस्तान-सरकारचें आहे. लाहोर शहर सुंदर सुंदर शाळा व कॉलेजें यांसाठीं प्रसिद्ध आहे. या सर्व संस्था खासगी होत्या. पंजाबी लोक मोठे मेहनती असतात. ते पैसे मिळवितात आणि चांगल्या कामांत खर्च करतात. हिंदूंनीं आणि शीखांनीं बांधलेलीं सुंदर रुग्णालयें लाहोरमध्यें आहेत. या शाळा, हीं कॉलेजें, हे दवाखाने ज्या त्या संस्थांना परत मिळतील असें झालें पाहिजे. ज्याची त्याची मालमत्ताहि ज्याला त्याला परत मिळाली पाहिजे. परंतु हें सारें व्हायला हवें असेल तर लोकांनीं स्वतः बदला घेणें सोडून दिलें पाहिजे. पाकिस्तानी सरकार हिंदूंना आणि शीखांना न्याय देतें कीं नाहीं हें पाहणें हिंदुस्तान-सरकारचें कर्तव्य आहे. मुसलमानांसाठीं हिंदीसंघराज्यापासून न्याय मिळविणें हें पाकिस्तानचें कर्तव्य आहे. आपण दोघें एकमेकांच्या वाईट गोष्टींचें अनुकरण करून न्याय मिळवूं शकणार नाहीं. दोन माणसें घोड्यावर स्वारी करून फिरायला बाहेर निघालीं. समजा, त्यांतील एकजण खालीं पडला, तर दुसऱ्यानेंहि का खालीं पडलेंच पाहिजे ? असें केलें तर दोघांचींहि हाडें मोडतील येवढाच फायदा. समजूं या, कीं मुसलमान हिंदी संघराज्याशीं राजनिष्ठ नाहींत, ते आपलीं हत्यारेंहि परत करीत नाहींत; तर मग का तुम्ही निर्दोष स्त्री-पुरुषांची, निष्पाप बालकांची हत्या करीत राहणार ? देशद्रोही बंडखोरांना शासन करणें सरकारचें काम आहे. हिंदुस्थानानें जगांत चांगलें नांव मिळविलें होतें. परंतु दोन्ही भागांतील लोकांनीं रानटीपणा करून देशाच्या निष्कलंक नांवावर शाई फांसली आहे. दोन्ही लोक आपापला धर्म नष्ट करूं पाहत आहेत आणि गुलामीला जणूं पुनः बोलावूं

बघत आहेत. तुमची तशीच इच्छा असेल तर तुम्ही तसें करूं शकतां. परंतु भारताच्या स्वातंत्र्यासाठीं मीं माझें सारें जीवन पणाला लावलें होतें. मी हें सारें उघड्या डोळ्यांनीं कसें बघूं शकूं ? जें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मीं प्राण हातांत घेतले, तें स्वातंत्र्य पुनः मातींत जात आहे हें मी कसें बघूं ? त्यापेक्षां माझे डोळे मिटोत ! मी प्रत्येक श्वासागणिक प्रभूची प्रार्थना करीत आहें कीं या ज्वाला विझवायला त्यानें मला शक्ति तरी द्यावी किंवा मला पृथ्वीवरून घेऊन तरी जावें.

## मुसलमानी दोस्तांच्या तारा

उम्मन तसेंच मध्यपूर्व भागांतील मुसलमान मित्रांच्या तारा आल्या आहेत. ते म्हणतात, " हिंदुस्थानांतील ही यादवी, ही भ्रातृहत्या अधिक दिवस टिकणार नाहीं अशी आम्ही आशा करतों. आपलें प्राचीन वैभव हिंदुस्थान लवकर प्राप्त करून घेवो, आपलें निष्कलंक थोर नांव पुनः मिळवो, हिंदु-मुसलमान भावांभावांप्रमाणें पुनः एकत्र नांदूं लागोत !"

## दुष्टपणाची नि रानवटपणाची हद्द !

दिल्लींतील एका इस्पितळावर जवळच्या गांववाल्या लोकांनीं हल्ला केला हें ऐकून मला किती दुःख झालें म्हणून सांगूं ? चार आजारी माणसें त्या हल्ल्यांत मारलीं गेलीं, कांहीं माणसें जखमी होऊन घायाळ झालीं. खरोखरच जंगलीपणाची आतां सीमा झाली ! कोणत्याहि परिस्थितींत या कृत्याचें समर्थन करतां येणार नाहीं.

दुसरीहि एक गोष्ट वर्तमानपत्रांत आली आहे. नैनीहून अलाहाबादला रेल्वे-गाडी येत होती, तिच्यांतील कांहीं मुसलमान-वाटसरूंना बाहेर फेंकण्यांत आलें. मला तर या गोष्टींचा अर्थच समजत नाहीं. हें चाललें आहे तरी काय ? अशा कृत्यांनीं प्रत्येक हिंदी माणसाचें तोंड शरमेनें खालीं झालें पाहिजे.

## २१

२-१०-'४७

# शीखांच्या गुरूंचा सन्देश

गांधीजी म्हणाले, "आज बाबा खड्गसिंघांचे मंत्री बाबा संतोषसिंघ यांच्याबरोबर बोलणें झालें. परवां मीं गुरु अर्जुनदेवांचा चरण सांगितला ना? अगदीं तसेंच गुरु गोविंदसिंघ यांनींहि म्हटलें असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. पुष्कळ लोकांची चुकीची समजूत आहे कीं गुरु गोविंदसिंघांनीं मुसलमानांस मारायला सांगितलें आहे. बरेचसे शीखहि अज्ञानामुळें असें मानतात. गांधीजींनीं या दहाव्या गुरूचें भजन म्हणून दाखविलें. गुरु गोविंद म्हणतात, "देवाला कोणत्या नांवानें तुम्ही हांक मारतां, हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. ईश्वर एकच आहे, तो सर्वांना सारखाच आहे आणि मानवहि येथून तेथून एकच आहे," गुरु गोविंदसिंघ म्हणतात, "माणसांमाणसांत भेद नका करूं. स्वाभावभिन्नता असते, चेहरे निरनिराळे दिसतात, परंतु एकाच मसाल्यांतून सर्वांची निर्मिति आहे. त्याच भावना सर्वांना असतात. सर्वांना मरण आहे, सर्वांनाच धरित्री-माईच्या पोटांत जायचें आहे. हवा, सूर्य, सर्वांच्या बाबतींत सारखींच. गंगा का मुसलमानाला स्वतःचें पाणी नाकारते? देवाचे मेघ सर्वांसाठीं पाऊस पाडतात. ज्याला ज्ञानदृष्टि नाहीं असा मनुष्यच 'आप-पर' असा भेद करीत असतो." अशा रीतीनें शीख गुरूंची शिकवण काय किंवा दुसऱ्या धर्मांतील थोर संतांची शिकवण काय, ती एकच आहे. आणि ती जर तुम्ही खरोखर मानीत असाल तर हिंदीसंघराज्य फक्त हिंदूंचेंच इत्यादि म्हणणें चूक आहे असें तुम्हांला दिसून येईल.

## कृपाणाचा योग्य उपयोग

माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाहीं कीं शीखांनीं अहिंसा–व्रत मानलेलें आहे; ते अहिंसेचे पुजारी नाहींत. परंतु सरदार संतोषसिंग मला म्हणाले, "गुरु गोविंदसिंघांच्या काळीं मुसलमान धर्मांप्रमाणें वागत नव्हते; ते अधर्मी बनले होते; आणि म्हणून त्यांच्याशीं लढण्याचा आदेश गुरु गोविंदसिंघांनीं दिला. शीखलोक जवळ कृपाण बाळगतात तें कशासाठीं? निरपराधी माणसांचें जुलुमापासून रक्षण करण्यासाठीं. तें कृपाण अन्यायाशीं लढण्यासाठीं आहे; निर्दोष स्त्रिया, मुलें, वृद्ध लोक, अपंग लोक, यांचा खून करण्यासाठीं नव्हे. मुसलमानांशीं लढतांना देखील पूर्वीं कांहीं मर्यादा पाळल्या जात; दोन्ही बाजूंच्या घायाळ लोकांची भेदभावरहित सेवा केली जाई. परंतु आज चुकीच्या कामासाठीं कृपाणाचा उपयोग करण्यांत येतो. जो शीख चुकीच्या कामासाठीं कृपाणाचा उपयोग करतो, त्याला तें वापरण्याचा हक्क नाहीं.

## जन्मदिवसाचें अभिनंदन

आज दिवसभर माझ्या भेटीसाठीं झुंडी येत होत्या, रीघ लागली होती. परदेशी वकील आणि लेडी माउंटबॅटन ही सारी मंडळी माझ्या वाढदिवसानिमित्त अभिनंदन करण्यासाठीं येत होती. जगांतून शेंकडों तारा आल्या आहेत! प्रत्येक तारेला उत्तर देणें अशक्य आहे. परंतु मीं स्वतःला विचारलें, "आज अभिनंदनाची वेळ कोठें आहे? आज तर दुःखाचा समय आहे." निराश्रितांच्या छावणींतूनहि फुलांची भेट आली आहे. अनेकांनीं पैसे दिलें आहेत, अनेकांनीं सदिच्छा व्यक्त केल्या आहेत. परंतु माझ्या अंतःकरणांत आज दुःखसंतापांशिवाय दुसरें कांहीं नाहीं. एक वेळ होती, ज्या वेळेस माझें म्हणणें जनता मानीत होती; परंतु आज माझें कोणीहि ऐकत नाहीं. आजकाल लोकांच्या तोंडून मी एकच गोष्ट ऐकतों आहें कीं हिंदी संघराज्यांत आम्ही मुसलमानांना राहूं देणार नाहीं. आज मुसलमानांच्या विरुद्ध भाषा आहे; उद्यां पारशी, खिश्चन, युरोपियन यांच्यावरहि काय बेतेल कोणीं सांगावें? अनेक मित्रांनीं मी १२५ वर्षें

जगेन अशी आशा प्रकट केली आहे; परंतु अधिक दिवस जगण्याची इच्छा मीं सोडून दिली आहे. तेव्हां आतां १२५ वर्षांचा प्रश्नच उरला नाहीं. आजचीं हीं वाढदिवसाचीं अभिनंदनें स्वीकारायला मी असमर्थ आहें. द्वेष आणि खून यांनीं वातावरण विषमय बनलें असतां मला जिवंत राहण्याची इच्छा नाहीं. म्हणून माझी तुम्हां सर्वांना प्रार्थना कीं सारा वेडेपणा सोडा. पाकिस्तानांत मुसलमानेतरांचें काय केलें जात आहे तें विसरा. एक पक्ष अधःपतित होत आहे, म्हणून का दुसऱ्यानेंहि व्हायचें? अशा दुष्कृत्यांचा अखेर परिणाम काय होईल याचा जरा शान्तपणें विचार करा. अंतःकरणांतून सारा द्वेषमत्सर काढून टाका. आपल्या सर्व अडचणी तुम्ही सरकारसमोर मांडा. त्या दूर केल्या जाव्या म्हणून मागणी करा. परंतु आपणच कायदा हातांत घेणें हें अगदीं अयोग्य. असें करणें चूक आहे. अशानें सर्वांचा सत्यानाश होईल.

## २२

३-१०-'४७

### सारेच समान दोषी

प्रार्थनेनंतर गांधीजी म्हणाले, " अभिनंदनांच्या तारांचा माझ्यावर वर्षाव होत आहे ! सर्वांना उत्तरें पाठविणें मला अशक्य आहे. कांहीं संदेश मीं प्रसिद्ध करावे असें मित्रांनीं सुचविलें आहे. मुसलमान मित्रांचेहि सुंदर संदेश आले आहेत. परंतु हें सारें प्रसिद्ध करायला आज अनुकूल काल आहे असें मला वाटत नाहीं. सत्य-अहिंसेवर जनतेचा आज विश्वास नसल्यामुळें हे संदेश छापून तिला त्यांचा काय फायदा ? माझ्या दृष्टीनें वाईट कर्मे करणारे सारे समान दोषी आहेत—मग ते कोणीहि असोत.

### सत्याग्रह आणि दुराग्रह

अनेक ठिकाणीं सत्याग्रह सुरु झाल्याच्या बातम्या माझ्या कानांवर येत आहेत. पुष्कळदां हा सत्याग्रह म्हणजे दुराग्रह तर नाहीं ना, असें माझ्या

मनांत येतें. गिरण्या, रेल्वे, पोस्ट यांतील संप असो किंवा संस्थानांतील संप असो, सत्ता हातीं घेणें हाच सर्वांचा हेतु दिसतो. आज वैरभावाचें जहरी विष सर्व समाजांत पसरून राहिलें आहे. साध्य आणि साधन हीं अन्तीं एक–रूप आहेत असें जो मानत नाहीं, तो संधि आली कीं आपलें घोडें पुढें दामटूं बघतो. एकहि मोका तो चुकूं देणार नाहीं.

## सत्कर्म हेंच सत्कर्माचें फळ

आमच्या चळवळींना आशीर्वाद द्या, आमच्या कामाला आशीर्वाद पाठवा, अशी मागणी करणारीं पत्रें मला सारखीं येत असतात. सत्कर्माला माझा किंवा कोणाचाच पाठिंबा असण्याची जरुरी नाहीं. सत्कर्मामध्येंच त्या कर्माला आशीर्वाद असतो. चांगली सेवा करणारा एक भला माणूस माझ्या-कडे आला होता. त्याला माझें म्हणणें लगेच पटलें. सत्य सदैव स्वयंसिद्ध असतें आणि कांहींहि झालें तरी त्याला न सोडणें हेंच सर्वांचें कर्तव्य आहे. सत्याग्रह करणाऱ्यांनीं आधीं हृदयसंशोधन करावें. आपण खरोखर सत्याचाच शोध करीत आहों का, हें त्यानें स्वतःला विचारावें. तसें नसेल तर तो तुमचा आग्रह म्हणजे सत्याची विटंबना होईल. आपली स्वतःची जी वस्तु नाहीं, ती मिळवायला जेव्हां मनुष्य प्रवृत्त होतो, तेव्हां ती त्याला अहिंसेनें मिळणें कठिण असतें आणि अहिंसेशिवाय तर सत्यप्राप्ति नाहीं.

## स्वच्छता आणि निर्वासितांच्या छावण्या

नंतर गांधीजी निर्वासितांच्या छावण्यांसंबंधीं बोलतांना म्हणाले, “ तेथें फार अस्वच्छता आहे. शहरांत घाण वाढत आहे. स्वच्छतेचें काम दुसऱ्यानें करावें असें प्रत्येकाला वाटतें. जे छावण्यांत राहत नसतील, त्यांनीं आपल्या आसपास स्वच्छता आहे कीं नाहीं हें पाहावें. अस्पृश्यतेमुळें हिंदु धर्माचें थोर नांव कलंकित होत आहे. अस्पृश्यता दूर करण्याचा एक मार्ग म्हणजे सर्वांनीच भंगी बनणें हा आहे. झाडूवाल्याचें काम कांहीं वाईट नाहीं, घाणेरडें नाहीं. तें स्वच्छता निर्माण करण्याचें काम आहे. दिल्लींतील नागरिक जर आपण होऊन स्वच्छतेकडे लक्ष देतील, तर ते दिल्ली शहरच सुंदर करतील असें नाहीं, तर त्यांच्या उदाहरणाचे परिणाम दूरवर होतील. ज़र मी या

छावण्यांचा अधिकारी असतों तर आपापलें सारें काम करायला निर्वासितांचें मन मीं वळविलें असतें. आळशी बनून भाकर खाणें यांत नैतिक अधःपात आहे. जुगार खेळून, पत्ते खेळून, दिवस दवडणें हें पाप आहे. स्वतःला आवडेल असा कोणताहि धंदा उचलावा नि काम करायला लागावें. सूत कांतणें, विणणें, शिवणकाम, सुतारकाम, शेती, कोणतें तरी काम हातीं घ्या. अश्या रीतीनें काम कराल तर दुसऱ्यावर विसंबून न राहतां स्वतःच्या पायांवर तुम्ही उभे राहाल यांत संशय नाहीं. आणि तुम्ही कामांत रंगलां म्हणजे दुःखेंहि विसराल. तुम्हांला केवढालीं दुःखें भोगावीं लागलीं, त्याची मला कल्पना आहे. ज्यांनीं या अनन्त आपत्ती तुमच्यावर लोटल्या, त्यांची मी गय करतों आहें असें क्षणभरहि समजूं नका; परंतु वाइटाची फेड चांगल्यानें करणें हाच खरोखर कल्याणाचा मार्ग आहे, हेंच मला पुनः पुनः सांगायचें आहे.

## एका फ्रेंच मित्राचा सल्ला

माझें अभिनंदन करतांना एक फ्रेंच मित्र मला म्हणतो, "आपलें काम पुरें करण्यासाठीं १२५ वर्षें जगायची आशा करा. तुम्हीं किती तरी काम केलें आहे आणि सर्व गोष्टी जर ईश्वराच्या हातीं आहेत तर तो वाइटांतूनहि शेवटीं चांगलेंच आणील. तुम्ही दुःखी–कष्टी नका होऊं, हताश नका होऊं." परंतु या प्रेमळ शब्दांनीं मीं माझी फसवणूक करून घेतां कामा नये. मीं मागें जें कांहीं केलें तें आज विसरून जायला हवें आहे असें मला वाटतें. कोणींहि भूतकालावर जगूं शकत नाहीं. मी जनतेची सेवा करूं शकेन असें मला वाटलें तरच मी जगायची इच्छा करीन. म्हणजेच लोकांनीं आपली चूक नीट बघावी आणि मी म्हणतों तें ऐकावें. मी ईश्वराच्या हातांत आहें. माझ्याकडून अधिक काम त्याला करून घ्यायचें असेल तर तो करून घेईल; परंतु मला आज निश्चितपणें असें वाटत आहे कीं माझ्या शब्दांत आज प्रभाव नाहीं. असें जर असेल तर मग जगण्यांत काय अर्थ ? मी जर अधिक सेवा करायला असमर्थ असेन तर प्रभूनें मला न्यावें हेंच बरें.

## २३

४-१०-'४७

# कांबळ्यांची मागणी

प्रार्थना संपली. गांधीजी म्हणाले, "डॉ० सुशीला नायर येथें बसलेल्या आहेत. शरणार्थींना वैद्यकीय मदत देण्याचें काम त्या सध्यां करीत आहेत. हिंदू, मुसलमान, दोघांच्याहि सेवेंत त्यांनीं सारी शक्ति केन्द्रित केली आहे. पुराणा किल्यांतील निराश्रितांमध्यें त्या चार तास जातात. परवां कुरुक्षेत्र छावणीसहि त्या भेट देऊन आल्या. 'रेडक्रॉस' पथकाबरोबर त्या गेल्या होत्या. डॉ० पंडितहि त्याच्या बरोबर होते. 'रेडक्रॉस' संस्थेच्या 'प्रसूति नि बाल–संगोपन'–शाखेचे डॉ० पंडित हे मुख्य आहेत. त्यांच्याबरोबर मित्र–सेवासंघाचे प्राध्यापक होरेस अलेक्झांडर आणि श्री० रिचर्ड सिमॉङ्स् हेहि होते. कुरुक्षेत्र छावणींत हिंदू नि शीख शरणार्थी आहेत. त्यांची संख्या जवळजवळ पंचवीस हजार आहे आणि प्रतिदिनीं तींत भर पडत आहे. शरणार्थींना निवारा म्हणून तंबू उभारण्यांत आले आहेत; परंतु ते सर्वांना पुरेसे नाहींत. उपासमारीनें मरण येणार नाहीं इतकेंच त्यांना खायला मिळतें; परंतु तो कांहीं चौरस आहार नसतो. पोट नीट भरत नसल्यामुळें आणि सर्वरसात्मक अन्न मिळत नसल्यामुळें अशक्तता आणि रोगराई वाढत आहेत. शरीरांतील प्रतिकारशक्ति कमी होत आहे. एका पक्षानें तरी निदान विवेकाचें वर्तन ठेवलें असतें तर मानवी हालअपेष्टा कमी झाल्या असत्या. सूड आणि बदला घेण्याची बुद्धि यांमुळें आपण दुष्ट वर्तुळांत फिरत राहिलों आहों, अधिकाधिक संकटें ओढवून घेत आहों. दुष्टपणांत कोण वरचढ, कोण अधिक क्रूर, यांची हिंदु–मुसलमानांत जणूं स्पर्धा लागली आहे ! स्त्रिया, बालकें, अर्भकें, वृद्ध, कोणाचीच कदर केली जात

नाहीं. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं मीं अविरत कष्ट उचलले आहेत आणि या देशांत, या भरतभूमींत रामराज्य, प्रभूचें राज्य स्थापलेलें बघावें म्हणून सव्वाशें वर्षें जगायची मला इच्छा होती. परंतु माझ्या डोळ्यांसमोर आज तरी अशी शक्यता दिसत नाहीं. लोकांनीं आपल्याच हातांत कायदा घेतला आहे. आणि जी दुःखद घटना होऊन राहिली आहे, ती का दुबळेपणानें मी पाहत बसूं? ईश्वरानें लोकांना चूक पटवून देण्याची, ती त्यांना दुरुस्त करायला लावण्याची शक्ति तरी मला द्यावी किंवा मला न्यावें. एक काळ होता, जेव्हां प्रेमानें तुम्ही निःशंकपणें माझ्या पाठोपाठ येत होतां. तुमचें प्रेम कदाचित् आजहि जिवंत असेल; परंतु तुमच्या हृदयाला नि बुद्धीला पोंचायला मीं मारलेली हांक आज निष्प्रभ ठरली आहे. तुम्ही गुलामींत होतां तोंपर्यंतच का तुम्हांला माझी जरूर होती? स्वतंत्र झाल्यावर आतां का माझी तुम्हांला जरूर नाहीं? स्वातंत्र्य म्हणजे का मानवतेला तिलांजलि, संस्कृतीला रामराम? इतकीं वर्षें जी एक गोष्ट मी तुम्हांला पुनः पुनः सांगत आलों, तिच्याशिवाय दुसरा कोणता संदेश मी तुम्हांला देऊं शकणार?

आणि आतां थंडीचा मोसम येणार. दिल्ली—पंजाबमधील थंडी कडाक्याची असते. ज्यांना ज्यांना देतां येतील त्यांनीं गरम पांघरुणें, कांबळीं, रजया द्याव्या. जाड्या पासोड्याहि चालतील. पाठविण्यापूर्वीं स्वच्छ धुऊन व नीट दुरुस्त करून त्या पाठवा. या भूतदयेच्या कामांत हिंदू व मुसलमान दोघांनींहि भाग घ्यावा. विशिष्ट जातीच्या उपयोगासाठीं म्हणून देणें बरें नव्हे. योग्य त्यांनाच या वस्तू आधीं देण्यांत येतील याची खात्री बाळगा. उद्यांपासूनच गरम पांघरुणें येऊं लागतील अशी मी आशा करतों. लाखों निराधार लोकांना सरकार किती पांघरुणें देणार? दुर्दैवी बंधूंच्या मदतीसाठीं कोट्यवधि हिंदी जनतेनेंच पुढें आलें पाहिजे."

नगर वाचनालय सातारा
संग्रहार्थ स्वीकृत

## २४

५-१०-'४७

### माझें आजारीपण

वर्तमानपत्रांतून माझ्या आजारीपणाची वार्ता पुनः आली आहे, याचें मला वाईट वाटतें. कोणीं बातमी दिली मला माहीत नाहीं. थोडा कफ नि थोडा ताप होता; परंतु प्रसिद्ध करण्यापासून ना माझा फायदा, ना दुसऱ्या कोणाचा. अनेकांना उगीच चिन्ता मात्र वाटते. माझ्या आजारीपणाची वार्ता पुनः दिली जाऊं नये, अशी माझ्या मित्रांना माझी प्रार्थना आहे.

### कांबळीं

दोन मित्रांनीं दोन छान कांबळीं पाठविलीं आहेत. एकानें आणखी धाडलीं आहेत. ज्यांना जरुरी असेल त्यांनाच तीं दिलीं जातील, अशी देणाऱ्यांना मी हमी देतों.

### विसंगत सूचना

मला आज एक तार आली आहे : 'हिंदूंनीं आणि शीखांनीं बदला घेतला नसता तर आज कदाचित् तुम्हीहि जिवंत राहिलां नसतां ' असें त्या तारेंत आहे. तारेंतील हें म्हणणें अप्रस्तुत आहे, अप्रबुद्ध आहे. त्यांचा काय किंवा माझा काय प्राण प्रभूच्या हातीं आहे. ईश्वर माझे प्राण जोंवर राखूं इच्छीत असेल तोंवर ते कोणीहि घेऊं शकणार नाहीं. माझे किंवा कोणाचेच प्राण तुम्हांआम्हांला वांचवितां येणार नाहींत. या तारेंत आणखीहि मजकूर आहे. शेंकडा ९८ टक्के मुसलमान देशद्रोही आहेत आणि ठराविक क्षणीं पाकिस्तानची बाजू घेऊन ते उलटतील असें त्या तारेंत आहे. परंतु मी या म्हणण्यावर विश्वास ठेवीत नाहीं. खेड्यांतील मुसलमान देशद्रोही असूंच शकत नाहींत. जर असतील तर ते इस्लामचा नाश करतील. आणि जर आरोप सिद्ध

झाला तर सरकार त्या बाबतीत योग्य तें करायला समर्थ आहे. जर हिंदू आणि मुसलमान परस्परांचे वैरीच राहतील तर त्यांतून युद्ध पेटल्याशिवाय राहणार नाहीं आणि दोघांचाहि नाश होईल. जे जे सरकारकडे रक्षणार्थ बघतील, ते कोठेंहि असोत, कोणत्याहि धर्माचे असोत, त्यांचें रक्षण करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. आणि अखेरीला स्वतःच्या धर्माचें, श्रद्धेचें रक्षण आपणच करूं शकतों. तें ज्याच्या त्याच्यावरच शेवटीं अवलंबून असणार.

## पुनश्च चर्चिल

चर्चिल साहेबांनीं पुनश्च भाषण केलें आहे. त्यांनीं मजूर—मंत्रिमंडळावर हिंदी नाशाबद्दल तोशेरा झाडला आहे. चर्चिल म्हणतात, 'या मजूर—मंत्रिमंडळानें साम्राज्य गुंडाळून हिंदी जनतेला दुःखाच्या खाईंत लोटलें आहे. ब्रह्मदेशाचीहि तीच स्थिति होणार अशी भीति वाटते." तेथेंहि असेंच व्हावें असें का चर्चिल साहेबांच्या मनांत आहे ? चर्चिल बडे गृहस्थ आहेत. त्यांनीं पुनः अशा सुरांत बोलावें याचें मला वाईट वाटतें. राष्ट्रापेक्षां त्यांना पक्षाचीच प्रतिष्ठा अधिक वाटते. हिंदुस्थान म्हणजे सात लक्ष खेडीं. हीं खेडीं पिसाळलेलीं नाहींत. परंतु समजा, सारीं खेडींहि पेटलीं, म्हणून का हिंदुस्थानला तुम्ही गुलामींत ठेवणार ? स्वातंत्र्याचा हक्क का फक्त चांगल्यांनाच आहे ? ब्रिटिशांनींच तर आम्हांला शिकविलें कीं गुलामगिरींतील शहाणपणापेक्षां स्वातंत्र्यांतील दारू पिणेंहि बरें. सुराज्य केव्हांहि स्वराज्याची जागा घेऊं शकणार नाहीं. स्वराज्य म्हणजे चुका करण्याचें स्वातंत्र्य ! ब्रिटिशांनींच तर हें सारें आम्हांला शिकविलें. चर्चिलच्या डोळ्यांत समाजवाद फार खुपतो. कामगार समाजवादीच असणार. समाजवाद हें एक महान् तत्त्वज्ञान आहे. तें धुडकावून नाहीं लावतां येणार. शहाणपणानें तें अंमलांत आणायचें आहे. समाजवादी वाईट असतील; परंतु समाजवाद कधींच वाईट नसतो. इंग्लंडांतील कामगारपक्षाचा विजय म्हणजे समाजवादाचाच विजय होय. कामगार—मंत्रिमंडळ म्हणजे कामगारांचें सरकार. ज्या वेळेस कामगार आपली प्रतिष्ठा ओळखतील त्या वेळेस इतर सारे पक्ष हतप्रभ होतील. किती तरी वर्षांपासूनचें हें माझें मत आहे. इंग्लंडमधील कामगारांच्या सरकारनें हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्ता काढून घेतली आहे. सर्व पक्षांनीं या गोष्टीला

पाटिंवा दिला होता. पार्लमेंटनें जो थोर कायदा मंजूर केला, सर्वांच्या संमतीनें मंजूर केला, त्याला आतां नांवें ठेवणें चर्चिलसारख्यांना शोभत नाहीं. पुढच्या वेळेस आपण निवडून आलों तर हा कायदा मागें घेऊं असें चर्चिलच्या मनांत खात्रीनें नसेल. हिंदुस्थानला गुलामगिरीचा पुनः एक घुटका पाजूं असें का चर्चिल साहेबांच्या मनांत असेल? शक्य नाहीं. कारण, तसें तें करूं जातील तर कोट्यवधि जिवंत माणसांच्या विरोधाची भिंत त्यांच्यासमोर उभी राहील. ब्रह्मदेश साम्राज्यास जोडण्याचें काम किती नीचपणाचें होतें याची चर्चिलना कांहीं खबर आहे का? क्षणभर त्यांनीं त्याचा विचार करावा. हिंदुस्थानहि कश्या रीतीनें गुलाम करण्यांत आला याची चर्चिलसाहेबांना आठवण आहे का? तो काळाकुट्ट इतिहास उघडण्याची मला इच्छा नाहीं. त्यासंबंधीं जितकें कमी बोलावें तितकें बरें. मी हें सारें बोलत आहें. परंतु तुम्ही एक गोष्ट विसरूं नका. मोठ्या कष्टानें मिळालेलें स्वातंत्र्य जगांतील प्रबळ राष्ट्रें कदाचित् पुनः हिरावून घेतील. म्हणून माणसांप्रमाणें वागा. पशूंप्रमाणें वागाल तर अपार मोल देऊन मिळविलेलें स्वातंत्र्य हिरावलें जाईल. अशी भेसूर आपत्ति या राष्ट्रावर यायचीच असेल तर ती पाहण्याआधींच माझे डोळे मिटोत! कारण, मी एकटा हिंदुस्थानला कसा वांचविणार? मी एकटा कोण? चर्चिलचें भविष्य तुम्ही खोटें पाडा, हीच माझी इच्छा आहे.

२८

६–१०–'४७

## अन्नाचा प्रश्न

प्रार्थना संपली नि गांधीजींनीं सुरुवात केली. ते म्हणाले, " डॉ० राजेंद्रप्रसादांनीं बोलावल्यावरून अन्नधान्याच्या प्रश्नांतील तज्ज्ञ मंडळी जमली आहे. अन्नधान्याचा प्रश्न गंभीर होऊन बसला आहे. ही तज्ज्ञ मंडळी राजेंद्रबाबूंना आपल्या ज्ञानाचा फायदा देतीलच. हा प्रश्न अति महत्त्वाचा

आहे. या बाबतींत चूक झाली तर लाखोंजण उपासमारीनें मरतील. उपासमार या देशांत नवीन नाहीं. हिंदुस्थानला परिचित अशीच ही वस्तु आहे. निसर्गकृत वा मनुष्यकृत दुष्काळांत हजारोंनीं, लाखोंनीं मरून जाणें या देशाला माहीत आहे. सुसंघटित, सुव्यवस्थित समाजांत अन्नधान्याची टंचाई होण्यापूर्वींच तत्संबंधीं पूर्वयोजना हवी. अशी टंचाई आली तर तिला कसें तोंड द्यावयाचें याची आधींपासूनच नीट आंखणी केलेली असली पाहिजे. परंतु सुव्यवस्थित समाज म्हणजे काय, तेथें हा प्रश्न कसा सोडविला जाईल, हें सांगत बसण्याची ही वेळ नव्हे. आज आपणांस येवढेंच पाहायचें आहे कीं सद्यः—परिस्थितींत अन्नधान्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याची कांहीं आशा आहे का?

## स्वावलंबन

मला तर वाटतें कीं आपण हा प्रश्न सोडवूं शकूं. पहिली गोष्ट आपणांस शिकायला हवी आहे ती स्वावलंबनाची, स्वसाहय्याची. हा धडा जर आपण नीट शिकलों, तर परदेशांवर विसंबून राहण्याच्या भयंकर आपत्तींतून आपण सुटूं. परदेशांवर विसंबून राहण्यांत सर्वनाश आहे. आपण दिवाळखोर होऊन जाऊं. मी हें अहंकारानें सांगत नसून, वस्तुस्थिति काय आहे तेंच फक्त मी सांगत आहें. दुसऱ्यावर अन्नासाठीं अवलंबून असायला आपला का टीचभर देश आहे? आपला देश खंडप्राय आहे. चाळीस कोटींचा हा देश आहे. येथें प्रचंड नद्या आहेत, विविध धान्य देणारी सुपीक जमीन आहे, गुरांढोरांची अपार संपत्ति आहे. आपलीं गाईगुरें फार कमी दूध देतात, हा त्यांचा दोष नसून केवळ आपला आहे. अवश्यक तें सारें दूध आपलीं गाईगुरें पुरवूं शकतील. गेल्या कांहीं शतकांत या राष्ट्राची फार आबाळ झाली आहे. तसें नसतें तर या विशाल देशानें स्वतःलाच अन्न पुरविलें असतें असें नाहीं, तर युद्धामुळें साऱ्या जगाला जी आज अन्नधान्याची चणचण वाटत आहे, तीहि त्यानें दूर केली असती. आज हिंदुस्थानांतहि अन्नाची टंचाई आहे. युद्धाच्या परिणामांपासून तो कांहीं मुक्त नाहीं. ही टंचाई कमी होण्याऐवजीं वाढतच आहे. परदेशांनीं आपण होऊन धान्य दिलें तर तें नाकारा असें

नाहीं मी म्हणत. परंतु आपण भीक मागत नये जाऊं. त्यानें अधःपात होतो. दुसरी अडचण म्हणजे वाहतुकीची. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं अन्न पाठवायलाहि देशांत आज अडचणी आहेत. झटपट धान्याचे पुरवठे आज आपण करूं शकत नाहीं, सर्वत्र पाठवूं शकत नाहीं. आणि पुनः जें धान्य मिळतें तें खाण्याच्या लायकीचेंहि कधीं कधीं नसतें. आपण मनुष्यस्वभाव लक्षांत घेऊनच वागायला हवें हें खरें. मनुष्यस्वभाव लक्षांत न घेऊन कसें चालेल? जगांत कोठेंहि निर्दोष माणूस फारसा आढळणार नाहीं.

## परकी मदतीचा अर्थ

परदेशांतून कितीशी मदत मिळणार तें पाहूं या. आपणांस जेवढें धान्य लागतें, त्याचा शेंकडा तीन इतकाच भाग परदेशांतून फार तर मिळेल असें मला सांगण्यांत आलें. जर ही बातमी खरी असेल—आणि अनेक तज्ज्ञांनीं आंकडे पाहून ती सांगितली आहे—तर परदेशांवर अवलंबून राहण्यांत अर्थ काय? सारीच इमारत कोसळून पडते! परदेशांवर अवलंबून राहणें म्हणजे देशांतील लागवडीस आणतां येणारी तसून्‌तस् जमीन पिकविण्यांत आळस करणें होय आणि धान्याऐवजीं कापूस वगैरे इतर विकाऊ पदार्थ पिकवीत बसणें होय. सर्व शक्ति एकवटूं तर कमी पडणारें तीन टक्के धान्य का आपण निर्माण करूं शकणार नाहीं? पडीत जमिनीहि तावडतोब लागवडीस आणल्या पाहिजेत.

## केन्द्रीकरण कीं विकेन्द्रीकरण?

अन्नधान्याचें केन्द्रीकरण अपायकारक आहे असें मला वाटतें. विकेन्द्रीकरणानें काळ्या बाजाराला आळा बसेल, तसेंच इकडून तिकडे पाठविण्याचा वेळहि वांचेल व पैशांचीहि बचत होईल. अन्नधान्य, कडधान्य पिकविणाऱ्या खेड्यांतील शेतकऱ्यांना उंदीर वगैरेंपासून धान्याचा बचाव कसा करावा हें माहीत आहे. उलट हजारों स्टेशनांतून राहत राहत जाणारें धान्यच उंदीर अधिक फस्त करतात! यामुळें लाखों रुपयांचें नुकसान होत आहे. खंडोगणती गल्ला नष्ट होत आहे. आज कणन्‌कण वांचवायला हवा आहे. शक्य तेथें तेथें आज धान्योत्पादनाची जरूर आहे ही गोष्ट जर प्रत्येक हिंदी माणसाला

पटली तर देशांत टंचाई उरणार नाहीं. 'अधिक धान्य पिकवा' या प्रश्नाचा सर्वांगीण विचार मीं तुमच्यापुढें मांडला नाहीं. हा विषय मला फार आवडतो. परंतु बोललों येवढें पुष्कळ झालें. या स्तुत्य उद्योगांत प्रत्येक व्यक्तीला भाग घेतां येईल. माझ्या या शब्दांनीं जर विचारवंतांना चालना मिळाली, या विषयाची प्रेरणा मिळाली, सर्वांना या कामाला कसें लावतां येईल याचा जर विचार होऊं लागला, तर किती चांगलें होईल !

## टंचाई कशी दूर करावी ?

बाहेरून फक्त तीन टक्के धान्य येतें. हे तीन टक्के कसे मिळवायचे ? तीन टक्क्यांचा प्रश्न कसा सोडवायचा ? हिंदू प्रत्येक पंधरवड्याला एकादशी करतात. सबंध उपवास किंवा अर्धा उपवास पुष्कळजण करतात. लाखोंची उपासमार डोळ्यांसमोर असतांना मुसलमानहि आणि इतरीह उपवास करूं शकतील. महिन्यांतून दोन वेळां सर्व दिवस किंवा चार वेळां निम्मा दिवस जर सारें राष्ट्र उपवास पाळील तर ती किती सुंदर गोष्ट होईल ! मग परकी मदतीचा प्रश्नच उद्भवणार नाहीं. या स्वेच्छा–उपवासांतील गंमत—त्यांतील गोडी जर सर्वांना प्रतीत झाली, तर तीन टक्के परधान्याचा प्रश्न चुटकीसरसा सुटेल.

नियंत्रणाचा फार मर्यादित उपयोग असतो असें माझें वैयक्तिक मत आहे. नियंत्रण नसेल तर उत्पादन करणारे आपला माल बाजारांत आणतीलच आणि सर्वांना चांगलें खाण्यासारखें धान्य मिळेल. आज तें दुर्मिळ झालें आहे.

## अध्यक्ष ट्रूमन यांचा सल्ला

अध्यक्ष ट्रूमन यांनीं अमेरिकेंतील जनतेला दिलेला सल्ला वर्तमानपत्रांतून आला आहे. तोच तुम्हांला सांगून ही घाईघाईनें केलेली अन्नमीमांसा मी संपविणार आहें. ट्रूमन काय सांगतात ? ते म्हणाले, " अमेरिकेंतील लोकांनीं थोडी कमी भाकर खाऊन उपासमारींत सांपडलेल्या युरोपला पाठविण्यासाठीं थोडें अधिक धान्य शिल्लक टाकावें. या अल्पस्वल्प त्यागानें अमे-

रिकन जनतेची प्रकृति बिघडेल असें मानण्याचें कारण नाहीं. या उदार सूचनेबद्दल अध्यक्ष ट्रूमन यांचे मी आभार मानतों, त्यांचें अभिनन्दन करतों. अमेरिकेच्या आर्थिक फायद्याची क्षुद्र कल्पना या सूचनेच्या मागें आहे असें मला वाटत नाहीं. मनुष्याची परीक्षा त्याच्या कृतीवरून करावी. कोणत्या हेतूनें तो प्रवृत्त झाला तें पाहूं नये; कारण, मानवी हृदयें एका ईश्वरालाच माहीत ! उपाशी युरोपसाठींहि अमेरिका जर दोन घांस कमी खाऊं म्हणते, तर आपण आपल्याच देशासाठीं हा लहानसा त्याग नाहीं का करणार ? उपासमारीनें लाखोंना शेवटीं मरायचेंच झालें तर निदान स्वावलंबी नि स्वाश्रयी होण्याची पराकाष्ठा आपण केली, येवढें तरी श्रेय मिळवूं या. अशा त्यागी स्वाश्रयानें राष्ट्र उदात्त होत असतें.

देशासमोर अन्नधान्याची गंभीर समस्या आहे. डॉ० राजेन्द्र प्रसादांनीं बोलाविलेली समिति योग्य उपाय शोधून काढल्याशिवाय बरखास्त होणार नाहीं अशी आशा आपण करूं या. ”

## २६

७-१०-’४७

# अधिक कांबळ्यांची मागणी

प्रार्थनोत्तर प्रवचनांत गांधीजी म्हणाले, “ परवांनंतर आणखी कांहीं थोडीं कांबळीं आलीं आहेत. तीं ज्यांनीं दिलीं त्यांचे मी आभार मानतोंच. परंतु निराश्रितांची संख्या लक्षावधि आहे. ज्या प्रमाणांत कांबळीं येत आहेत, अशीच गति नि असेंच प्रमाण जर राहिलीं तर फारशी मदत होणार नाहीं. अल्पावधींत हजारों कांबळीं गोळा केलीं जातील अशी संघटना जनतेनें उभारली पाहिजे. कांबळीं माझ्याकडे पाठवा किंवा तुमच्या पसंतीचीं दुसरीं माणसें, दुसऱ्या संस्था असतील तर त्यांच्याकडे पाठवा. वांटणी नीट व्हावयाला हवी.

## कॉंग्रेसच्या ब्रीदाला जागा

आणि डेहराडूनच्या आसपास एका मातबर मुसलमानाचा खून झाल्याचें कानांवर आलें आहे. मोठ्या दुःखानें ही गोष्ट मला तुम्हांला सांगावी लागत आहे. मुसलमान असणें येवढाच त्याचा अपराध! हिंदी संघराज्यांतील लक्षावधि, कोट्यवधि मुसलमानांना 'येथून जा' असें का मी सांगू? कोठें जातील ते? आगगाड्यांतहि त्यांचा बचाव नसतो. पाकिस्तानांतील हिंदूनाहि समान आपत्ती भोगाव्या लागल्या ही गोष्ट खरी आहे. परंतु दोन पापांनीं एक पुण्य तयार होत नाहीं. एकानें गाय मारली तर दुसऱ्यानें का वासरूं मारावें? इकडील मुसलमानांवर बदला घेऊन पाकिस्तानांतील हिंदु-शीखांना तुम्ही कशी मदत देणार? स्वतःच्या धर्माशीं व कॉंग्रेसच्या ब्रीदाशीं सत्यनिष्ठ राहा. गेल्या साठ वर्षांत राष्ट्रसभेनें देशाचें कांहीं तरी नुकसान केलें आहे का? जर आज राष्ट्रसभेवर तुमचा विश्वास नसेल तर राष्ट्रसभेचे मंत्री तुम्ही दूर करूं शकतां. दुसऱ्या लोकांच्या हातीं सत्ता द्या. मला एकच सांगायचें आहे कीं जनतेनें आपल्या हातांत कायदा घेऊं नये. मागून पश्चाताप करण्याची पाळी येईल असें कृपा करून वागूं नका.

## अन्नधान्य-नियंत्रण

अन्नधान्यासंबंधीं मी काल बोललों होतों. मीं सांगितलेल्या उपायाचा अवलंब कराल तर चोवीस तासांत अन्नधान्याचा हा महान् प्रश्न सुटेल. तज्ज्ञांना माझी सूचना स्वीकारार्ह वाटते कीं नाहीं तें मला माहीत नाहीं.

## मंत्र्यांना धोक्याची सूचना

लोकांनीं निवडून पाठविलेले आजचे मंत्री अनियंत्रित पद्धतीनें वागत आहेत असें लोक येऊन सांगतात. पूर्वीच्या ब्रिटिश अमदानींत जसे मंत्री वागत तसेच आजहि, असें अनेकजण मजजवळ म्हणाले. यासंबंधीं किती तरी लेख माझ्याजवळ येऊन पडले आहेत! या बाबतींत प्रधानांजवळ मी बोललों नाहीं. मला येवढें तर सांगितलेंच पाहिजे कीं ज्या ज्या गोष्टींसाठीं ब्रिटिश सरकारवर आपण टीका करीत असूं, त्या त्या गोष्टी तरी लोकशाही राज्यांत

आतां नाहींच होतां कामा. ब्रिटिश राजवटींत व्हाइसरॉय वटहुकूम काढी, कायदे करी नि त्यांची अंमलबजावणी करी. तसेंच अंमलबजावणी–खातें नि न्याय–खातें हीं एकत्र असूं नयेत म्हणून आपण आजवर आरडाओरडा केला होता. तें पूर्वीचें मत बदलण्यासारखें कांहीं एक झालेलें नाहीं. अतःपर वटहुकुमी राज्य बंद झालेंच पाहिजे. विधिमंडळांनींच कायदे केले पाहिजेत. ती सत्ता दुसऱ्या कोणासहि असतां कामा नये. जनतेला आपल्या इच्छेनुसार मंत्री बदलतां आले पाहिजेत. त्यांनीं केलेल्या कायद्यांची न्यायालयांनीं परीक्षा–निरीक्षा करावी. न्याय स्वस्त मिळेल, लवकर मिळेल असें करण्यांत आलें पाहिजे. न्यायदानांत भ्रष्टता नको, लांचलुचपती नकोत. यासाठींच पंचायत-राज्याची योजना सुचविण्यांत आली. वरिष्ठ न्यायमंदिर लाखों खेड्यांना पोंचूं शकणार नाहीं. आणीबाणीच्या परिस्थितींतच झटपट कायद्यांची जरुरी असते. विधिमंडळांतून कायदे पास करून घ्यायला वेळ लागतो हें खरें असलें, तरी सत्ताधाऱ्यांनीं विधिमंडळाला कधींहि डावलूं नये. माझ्या डोळ्यांसमोर अमुक एकाचें उदाहरण आहे असें नाहीं. अनेक प्रान्तांतून माझ्याकडे खूप लिहून आलें आहे. त्याच्या आधारानें मी हें बोलत आहें. जनतेनें कायदा हातांत घेऊं नये असें जनतेला माझें सांगणें आहे; आणि ज्या पद्धतींचा आपण पूर्वीं धिक्कार केला त्याच पद्धतींचा अवलंब मंत्र्यांनीं करूं नये असें त्यांनाहि माझें सांगणें आहे.

## रामराज्याचें रहस्य

आपापल्या सरकारांशीं निष्ठावन्त राहा. त्यांना पाठिंबा द्या किंवा त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडा. तो तुमचा हक्क आहे. पंडित जवाहरलाल म्हणजे खरोखर जवाहर आहेत. तें एक रत्न आहे. केवळ हिंदूंचें राज्य करण्याला ते कधींहि संमति देऊं शकणार नाहींत आणि सरदारहि असें करणार नाहींत. सरदारांचे अनेक मुसलमान मित्र आहेत. त्यांची बाजू घेऊन ते अनेकदां उभे राहिलेले आहेत. मी स्वतःला सनातनी हिन्दु म्हणवीत असतों. परंतु आफ्रिकेंतून मी परत आलों तेव्हां मरहूम इमामसाहेब माझ्या बरोबरच आले. साबरमतीआश्रमांतच ते राहिले; तेथेंच त्यांचें देहावसान झालें. मला या गोष्टीचा अभिमान वाटतो. त्यांची मुलगी नि तिचा पति

नगर वाचनालय, सातारा.

आजहि साबरमतीआश्रमांतच आहेत. त्यांना का मीं किंवा सरदारांनीं येथून जा म्हणून सांगावें? माझा हिंदुधर्म मला सर्व धर्मांना मान द्यायला शिकवितो. हेंच तर रामराज्याचें रहस्य! जर पंडित जवाहरलाल, सरदार, यांच्यावर तुमचा विश्वास नसेल, त्यांच्याविषयीं आज तुम्हांला आदरभाव नसेल, तर ज्यांच्यावर तुमचा विश्वास आहे असे दुसरे मंत्री पाठवा. परंतु त्यांना त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध वागायला सांगूं नका. हिंदुस्थान केवळ हिंदूंचाच असें ते मानतील अशी अपेक्षा करूं नका. कारण, तो विनाशाचा मार्ग आहे."

## २७

८-७-'४७

### पैसे पाठविण्यापेक्षां कांबळीं पाठवा

गांधीजी म्हणाले, "आणखी कांहीं घोंगड्या आल्या आहेत. तिसरे प्रहरीं एक मित्र आला होता, त्यानें विचारलें, "पैसे देऊं कीं कांबळीं देऊं?" मीं त्याला सांगितलें, 'कांबळींच पाठीव.' प्रार्थनेला येतां येतां एकानें घोंगड्यांसाठीं पांचशें रुपये दिले. मीं ते स्वीकारले. परंतु मला पैशांपेक्षां घोंगड्या द्या. त्या मला हव्या आहेत.

### शूरांची अहिंसा

एक भले गृहस्थ मला भेटायला आले होते. ते डेहराडूनहून आले होते. ज्या डब्यांत ते होते, तो सारा हिंदु-शीखांनीं भरलेला होता. एक नवीन इसम डब्यांत येतांच त्यांना संशय आला. विचारल्यावर आपण चांभार असल्याचें त्यानें सांगितलें. परंतु त्याच्या हातावर कांहीं तरी गोंदलेलें होतें, त्यावरून तो मुसलमान सिद्ध होत होता. झालें. लगेच त्याला भोंकसण्यांत आलें आणि यमुनेंत फेंकण्यांत आलें! तो भला मनुष्य ही हकीगत सांगून मला म्हणाला, "तें दृश्य मला पाहवेना." मीं त्यांना म्हटलें, "तुम्ही कां मध्यें पडलां नाहीं? त्या मुसलमानाचे प्राण वांचवायला कां नाहीं उभे राहिलां?" त्या भल्या माणसानें जर असें धैर्य दाखविलें असतें तर



नगर वाचनालय, सातारा.

कदाचित् त्या मुसलमानाचे प्राण वांचते व त्याचे कदाचित् जाते. ती खरी शूराची अहिंसा झाली असती. कदाचित् त्याच्या त्या शौर्यानें दुसऱ्यांसहि प्रेरणा मिळाली असती आणि तेहि विरोध करायला उभे राहते. तो भला मनुष्य म्हणाला, 'मला तें सुचलें नाहीं, मला तें सुचायला हवें होतें ही गोष्ट खरी.'

त्या डब्यांतील सारेच लोक दुष्ट असतील, निर्दय असतील असें मला वाटत नाहीं. आणि समजा ते तसे असते तरीहि माझा मार्ग हाच. आपण ब्रिटिश सत्तेशीं लढलों; शूरांच्या अहिंसेवर तो लढा आधारला होता असें आतां मला वाटत नाहीं. म्हणून मला आणि माझ्या देशाला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. माझें उरलेलें आयुष्य शूराची अहिंसा तुमच्या मनावर ठसविण्यांत जावो! मला हें कितपत शक्य होईल प्रभु जाणे. हें काम कठिण आहे, दुष्कर आहे. आज पाकिस्तानांत जें होत आहे आणि जें आजवर झालें, तें सारें वाईट यांत संशयच नाहीं. परंतु हिंदी संघराज्यांतहि जें चाललें आहे, तेंहि तसेंच. कोणीं आधीं आरंभ केला, कोणाचा गुन्हा अधिक याच्या संशोधनांत काय अर्थ? दोघांना मित्र व्हायचें असेल तर झालें गेलें दोघांनींहि विसरून गेलें पाहिजे. कालचे शत्रू जर बदल्याची भाषा सोडतील, बदल्याची कृति दूर ठेवतील, तर आज ते मित्र होऊं शकतील.

## वर्तमानपत्रांचें कर्तव्य

वृत्तपत्रांची शक्ति मोठी असते. आपल्या पत्रांत खोटी बातमी येणार नाहीं, लोकांना प्रक्षुब्ध करणारें कांहीं येणार नाहीं हें पाहणें संपादकाचें आद्य कर्तव्य आहे. देवारी येथें मेओंनीं हिंदूंवर हल्ला केला असें एका वृत्तपत्रांत आलेलें मीं वाचलें. वाचून मी बेचैन झालों. दुसऱ्या दिवशीं ती बातमी खोटी आहे म्हणून वृत्तपत्रांत आलें. मला बरें वाटलें. हें एक उदाहरण दिलें आहे. अशीं कित्येक होत असतात. संपादक आणि त्यांचे सहकारी यांनीं बातमी देतांना खूप सावधानता नि दक्षता घ्यावी. तिच्यांत मालमसाला घालतांनाहि जपावें. स्वतंत्र देशांत मुद्रणस्वातंत्र्य नियंत्रित करणें अशक्य असतें. जनतेनेंच वृत्तपत्रांचें नीट नियंत्रण करावें, त्यांना योग्य मार्गावर ठेवावें. जनता जर जागृत नि सुसंस्कृत असेल तर आगलाव्या नि असंस्कृत वृत्तपत्रांना ती आधार देणार नाहीं.

## लष्कराचें नि पोलिसांचें कर्तव्य

वृत्तपत्रें म्हणजे शासनसंस्थेचा सामर्थ्यवान् बाहु होय., त्याचप्रमाणें लष्कर नि पोलीस. त्यांनीं पक्षपात नाहीं करतां कामा. लष्करांत नि पोलिसांत जातीय विभागणी करणें उद्वेगजनक आहे. जर लष्कर आणि पोलीस जातीय होतील तर फारच अनर्थ होईल. हिंदी संघराज्यांतील पोलिसांचें नि लष्कराचें अल्पसंख्य लोकांचें रक्षण करणें हें कर्तव्य आहे. त्यांत त्यांचे प्राण गेले तरी त्यांनीं आपलें कर्तव्य करायला हवें. हें मुख्य कर्तव्य त्यांनीं कधींहि क्षणभर देखील विसरून चालणार नाहीं. पाकिस्तानमधील लष्कर नि पोलीस यांनाहि माझें हेंच सांगणें आहे. तेथील अल्पसंख्याकांचा त्यांनींच संभाळ केला पाहिजे. पाकिस्तानमधले माझें ऐकोत वा न ऐकोत, हिंदी संघराज्यांतील पोलिसांना नि लष्कराला मी योग्य तेंच करायला लावूं शकलों, तर पाकिस्तानलाहि तसें करावें लागेल याविषयीं मला संदेह नाहीं.

रक्तपाताशिवाय हिंदुस्थाननें स्वातंत्र्य मिळविलें याचा सर्व जगावर परिणाम झाला आहे. योग्य वर्तन करून त्या स्वातंत्र्याला लायक ठरा. स्वातंत्र्यांत पोलीस नि लष्कर यांनीं कधींहि भ्रष्ट होतां कामा नये. प्रत्येक नागरिक आपलें कर्तव्य न करील तर कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्रांतील सरकारला कारभार करणें अशक्य होईल. तुम्ही अहिंसाच पाळा असें मी तुम्हांस येथें सांगत नाहीं. हिंसा अहिंसा दूर राहो, तुम्ही नीट वागा येवढेंच मला सांगायचें आहे. बिनचूक वागा. माझे शब्द ध्यानांत घेऊन न वागाल तर पुढें पस्तावाल, याद राखा."

## २८

९-१०-'४७

## लवकर घोंगड्या द्या

आजच्या दिवसांत तीस घोंगड्या मिळाल्या. दिल्लींतील हिंवाळा कडक होऊं लागला आहे; म्हणून देणाऱ्यांनीं त्वरा करावी. ऑक्टोबरच्या मध्याला

येथील थंडी वाटूं लागते. जें दान वेळेवर करण्यांत येत नाहीं, त्याची किंमत कमी होते.

## नुसतें शान्तपणें ऐकणें पुरेसें नाहीं

मी जें कांहीं सांगत असतों तें तुम्ही शान्तपणें ऐकून घेतां याबद्दल मी आभारी आहें. परंतु नुसतें ऐकून काय उपयोग ? माझ्या सांगण्यांत कांहीं अर्थ असेल तर तदनुरूप वागा.

## पाकिस्तानांतील अल्पसंख्य

पाकिस्तानांतील हिन्दु–शीखांची भयंकर दुर्दशा आहे. त्यांना तेथून काढून आणणें म्हणजे अति कठिण काम आहे. वाटेंत अनेक गतप्राण होतील ! आणि इकडे हिंदी संघराज्यांत आल्यावर पुनः तें छावणींतील जीवन कंठायचें ! तेथील हलाखी तुम्ही जाणतांच. कुरुक्षेत्रावर वैद्यकीय मदत अपुरी पडते. खाणें भिकार नि निःसत्त्व व तेंहि अपुरें, यथातथाच. सरकारला दोष देणें चूक आहे. लोकांना मी कोणता सल्ला देऊं ? पश्चिम पाकिस्तानांतील कांहीं मित्र आज मला भेटले. त्यांनीं करुण कथा निवेदिली. उरलेल्यांना लवकर आणा असें ते म्हणाले. परंतु मी सरकार नाहीं. आणि कितीहि कळकळीची व तीव्र इच्छा असली तरी जगांतील कोणत्याहि सरकारला अशा असामान्य परिस्थितींत मनाप्रमाणें करतां येणें केवळ अशक्य आहे. पूर्वबंगालमधूनहि पुनः पळापळ सुरू झाल्याच्या बातम्या येत आहेत. कारण काय तें मला माहीत नाहीं. माझे सहकारी अजून तेथेंच आहेत. खादी–प्रतिष्ठानचे सतीशबाबू व इतर कार्यकर्ते, प्यारेलालजी, कनु गांधी, अम्तुल सलाम बेन, सरदार जीवनसिंघजी वगैरे सारे अजून तिकडेच आहेत. मी स्वतः नौखालींत हिंडून आलों; सारी भीति सोडा म्हणून त्यांना परोपरीनें सांगितलें. लोकांचें आणि सरकारचें कर्तव्य काय याचा मी विचार करूं लागलों. तिकडून निघून येणाऱ्यांना वाटतें कीं इकडे परिस्थिति अधिक बरी असेल; परंतु त्यांची ही चूक आहे. इतक्या शरणार्थींची योग्य सोय लावणें सरकारच्या मनांत कितीहि असलें तरी अशक्य असतें. मूळची स्थिति येथें लगेच कशी निर्मितां येणार ? म्हणून

आपापल्या जागेलाच चिकटून राहा. संरक्षणासाठीं प्रभूवर भरंवसा ठेवा, असें मी पुनः पुनः सांगत आहें. मरायचेंच झालें तर आपल्या घरांत राहून शूराप्रमाणें मरा. अल्पसंख्याकांचें रक्षण करा म्हणून दोन्ही सरकारांनीं एकमेकांना स्पष्ट सांगितलें पाहिजे. सहकार्यानें नि बिनचूक वागणें हें दोन्ही सरकारांचें कर्तव्य आहे. ही स्पृहणीय गोष्ट जर अशक्यच ठरली तर शेवटीं युद्ध अपरिहार्य होईल. युद्धाचा पुरस्कार मी कधींच करूं शकणार नाहीं. परंतु ज्या सरकारांजवळ शस्त्रास्त्रें नि फौजफांटा असतात त्यांना युद्ध हाच अखेरचा निर्वाणीचा उपाय असतो. परंतु अशा मार्गाचा अवलंब म्हणजे सर्वनाश होय. लोकसंख्येच्या अदलाबदलींत मरण येणें यांत काय अर्थ? अशी अदलाबदल म्हणजे कांहीं साधी गोष्ट नाहीं. प्रचंड, अवाढव्य प्रमाणावर या सर्वांची पुनर्वस्ती करणें, या सर्वांची सोय करणें, म्हणजे भगीरथ काम आहे.

## २९

१०–१०–'४७

### अधिक घोंगड्या आल्या

गांधीजी म्हणाले, "अधिक घोंगड्या आल्या आहेत. कांहीं देणग्याहि मिळाल्या आहेत. एक आंगठीहि मिळाली आहे. 'आठशें घोंगड्या येथें जमविल्या आहेत आणि आणखीहि गोळा होतील. रेल्वेचा परवाना हवा.' अशी बडोद्याची तार आली आहे. या गतीनें जर घोंगड्या येतील तर थंडीच्या कडाक्यापासून शरणार्थींचा बचाव होईल अशी मला आशा आहे.

### अन्नवस्त्रांचा तुटवडा

देशांत आज अन्नाचा नि वस्त्रांचा तुटवडा तीव्रतेनें भासत आहे. स्वातंत्र्याच्या आगमनाबरोबर हे प्रश्न अधिकच तीव्र झाले आहेत. परंतु मला याचें कारण कळत नाहीं. हीं स्वातंत्र्याचीं लक्षणें खास नव्हेत. ज्या साधनांनीं आपण स्वातंत्र्य मिळविलें तीं साधनें जगन्मान्य असल्यामुळें व साऱ्या जगानें त्यांची स्तुति केल्यामुळें, मिळालेलें हें स्वातंत्र्य अधिकच मोलाचें

आहे. आपण रक्तहीन लढा दिला. अशा स्वातंत्र्यानें वास्तविक आपले प्रश्न झटपट सोडवायला मदतच केली पाहिजे.

अन्नधान्यांच्या बाबतींत माझें तर मत असें आहे कीं नियंत्रण आणि वांटप हीं अस्वाभाविक आणि अव्यावहारिक आहेत. सुपीक जमीन येथें मुबलक आहे, भरपूर पाणीहि आहे, कोट्यवधि माणसें आहेत. असें असूनहि धान्याचा तुटवडा कां ? लोकांना स्वावलंबी व्हायला शिकविलें पाहिजे. आपण स्वतःच्या पायांवर उभें राहिल्याशिवाय गत्यन्तरच नाहीं, याची लोकांना नीट जाणीव झालीच पाहिजे. आणि ही जाणीव झाली कीं वातावरण विद्युन्मय झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रत्यक्ष रोगानें मरण्यापेक्षां भीतीनेंच अधिक लोक मरतात हें सर्वश्रुतच आहे. संकटाची भीति झाडून टाका आणि स्वावलंबनाचा मार्ग धरा. अन्नधान्यनियंत्रणें दूर केल्यावार दुष्काळ आणि उपासमार येतील ही भीति सोडून द्या.

तसेंच हिंदुस्थानांत वस्त्राची उणीव भासावी हें केवढें आश्चर्य आहे ! गरजेपेक्षां अधिक कापूस येथें पिकतो. लोकांनीं कांतावें नि स्वतःच विणावें. वस्त्रनियंत्रणेंहि जावीं असें माझें मत आहे. त्यामुळें कदाचित् किंमती वाढतीलहि. परंतु सहा महिने पावेतों जर लोक कापड खरीदणारच नाहींत, तर किंमती खालीं आल्यावांचून राहणार नाहींत असें मला सांगण्यांत आलें आणि मलाहि तसेंच वाटतें. दरम्यान जर कापड लागलेंच तर तुम्ही तुमची खादी करा ना तयार ? आज मी 'खादीशिवाय इतर वस्त्रच नको' ही माझी श्रद्धा येथें सांगत नाहीं. एकदां लोक आपलें अन्नवस्त्र निर्मूं लागले म्हणजे त्यांची सारी दृष्टीच बदलेल. आज आपण फक्त राजकीय स्वातंत्र्य मिळविलें आहे. माझें म्हणणें ऐकाल तर आर्थिक स्वातंत्र्यहि तुम्ही मिळवाल आणि प्रत्येक खेडुताच्या तें अनुभवाला येईल. मग आपसांत भांडायला वृत्ति नि वेळच उरणार नाहींत. दारू, जुगार इत्यादि इतर व्यसनांचीहि त्यामुळें हकालपट्टी होईल. भारतीय जनतेचें सर्वार्थानें भलें होईल. ईश्वरहि तुम्हांला हात देईल. कारण, जो स्वतःला मदत करतो, स्वाश्रयी होऊं बघतो, त्यालाच ईश्वरहि मदत करतो."

## ३०

११-१०-४७

## चरखा-जयंती

गांधीजी म्हणाले, "आज भाद्रपद वद्य द्वादशी. गुजरात, कच्छ, काठेवाड या भागांत ही द्वादशी आतां रेंटियाबारस किंवा चरखा-जयन्ती म्हणून ओळखली जाते. या दिवशीं सभा होतात व चरख्याचा आणि तत्सम गोष्टींचा संदेश सर्वत्र दिला जातो. चरखा-जयन्ती उत्साहानें साजरी करण्याची आज वेळ नाहीं. चरख्याच्या व्यापक अर्थांत मी अहिंसा बघतों. चरखा म्हणजे अहिंसेचें प्रतीक; तें प्रतीक आज नष्ट झाल्यासारखें दिसत आहे. नाहीं तर मातृहत्येचीं दृश्यें बघावीं लागलींच नसतीं. चरखा-जयन्ती अजीबात बंद करावी असाहि विचार माझ्या मनांत येऊन गेला. परंतु इतस्ततः विखुरलेले चरख्याच्या संदेशासंबंधीं श्रद्धावान् असे जीव थोडेफार तरी असतील अशी आशा माझ्या हृदयांत लपून बसलेली आहे. त्यांच्यासाठीं चरखा-जयन्ती पाळायला हवी.

## हरिजनांसाठीं पट्टे

पाकिस्तान-सरकारांतील श्री॰ जोगेश्वर मंडल आणि आणखी कांहीं सभासद यांनीं 'हरिजनांनीं अस्पृश्यतेची खूण म्हणून पट्टे वापरावे' अशी सूचना केल्याचें वाचलें. हा जो पट्टा त्यावर अर्धचंद्र आणि तारा यांची खूण असायची आहे. हरिजनांना इतर हिंदूंतून ओळखतां यावें म्हणून हा त्यांचा खटाटोप. या सर्वांचा तर्कसिद्ध असा शेवटीं एकच परिणाम होईल कीं हरिजन मुसलमान होतील. हृदयांत वाटलें म्हणून, आध्यात्मिक अन्तः-प्रेरणा झाली म्हणून कोणी धर्मान्तर केलें तर त्यासंबंधीं मला कांहीं म्हणायचें नाहीं. मी स्वेच्छेनें हरिजन झालों असल्यामुळें

त्यांचें मन मी जाणतों. असा एकहि हरिजन आढळणार नाहीं कीं जो विचारपूर्वक व स्वेच्छेनें आध्यात्मिक ओढ म्हणून इस्लामी धर्म स्वीकारील. त्यांना इस्लाम म्हणजे काय कळणार? आणि आपण हिंदू तरी कां हेंहि त्यांना समजत नाहीं. सर्वच धर्मांच्या अनुयायांच्या बाबतींत हा प्रकार असतो. विशिष्ट धर्मांत जन्मल्यामुळें ते विशिष्ट धर्माचे असतात. त्यांनीं धर्मान्तर केलेंच तर तें सक्तीनें तरी असेल किंवा त्यांना दाखविलेल्या मोहांमुळें तरी असेल. आजच्या वातावरणांत कोणाचेंहि धर्मान्तर खरें समजलें जातां कामा नये. धर्म हा प्राणांहूनहि प्रिय हवा. हिंदुधर्मशास्त्रांत पारंगत असूनहि आणी-बाणीच्या वेळीं ज्यांची श्रद्धा अचल राहूं शकत नाहीं, अशांपेक्षां धर्मशास्त्रें न पढलेला, परंतु सत्यानुसार वागणाराच अधिक यथार्थपणें खरा हिंदु होय.

## दसरा आणि बक्र-ईद

आतां दसरा नि बक्र-ईद हे सण लवकरच येतील. एकमेकांच्या भावना कृपा करून तुम्ही दुखवूं नका. हिंदू, मुसलमान, सर्वांनीं याविषयीं सावधानता बाळगावी. या उत्सवप्रसंगीं जेणेंकरून दंगेधोपे होतील असें कांहीं एक करूं नका.

## दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह

उद्यांपासून दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रह सुरू होणार आहे. मागें कांहीं दिवस तो चालू होता. मध्यन्तरीं तो स्थगित करण्यांत आला होता. हिंदुस्थानचा प्रश्न संयुक्तराष्ट्रसंघासमोर आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदुमुस्लिमादि सर्व हिंदी लोकांनीं सत्याग्रह पुनश्च सुरू करण्याचें ठरविलें आहे. हिंदी संघराज्यसरकार आणि पाकिस्तानसरकार दोघांच्यापासून मदत घ्या असें ह्या सत्याग्रहींना माझें सांगणें आहे. द० आफ्रिकेंतील हिंदी जनतेला सर्व प्रकारचें साहाय्य नि उत्तेजन देणें हें उभय सरकारांचें कर्तव्य आहे. सत्याग्रह यशस्वी होण्यासाठीं दोन गोष्टी हव्या: आपलें ध्येय न्याय्य असावें आणि आपलीं साधनें संपूर्णपणें अहिंसक असावीं. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी जनता या दोन गोष्टी संभाळील तर यश निःसंशय त्यांचें आहे."

# ३१

१२-१-०'४७

## शरणार्थींना दोन शब्द

गांधीजी म्हणाले, " आणखी घोंगड्या आल्या आहेत. रजया देण्याचीं अभिवचनेंहि आज मिळालीं आहेत. कांहीं गिरण्याहि कांहीं रग तयार करीत आहेत. परंतु रग, रजया दंवानें भिजून जातात; तशी घोंगड्याकांबळ्यांची गोष्ट नाहीं. परंतु रजयांवरून कागद घालावे, हा सोपा उपाय. जुनी रद्दी या कामासाठीं वापरावी. रजयांचा एक फायदा असतो. त्या उसवतां येतात, वरचें आच्छादन धुतां येतें व कापूस हातांनीं पिंजून, मोकळा करून पुनः नीट भरतां येतो.

ईश्वराची मदत मागणारे दुर्दैवाच्या फेऱ्यांतूनहि भलें निर्माण करूं शकतात. कांहीं शरणार्थींचीं मनें हाल-अपेष्टांमुळें बिथरून गेलीं आहेत, कडू झालीं आहेत. ते क्रुद्ध आहेत. परंतु क्रोधानें काम होत नाहीं. रागावून काय उपयोग ? जोंपर्यंत त्यांना प्रतिष्ठापूर्वक स्वगृहीं परततां येत नाहीं, जोंवर तेथें संरक्षणाची शाश्वती नाहीं, तोंवर या छावण्यांतूनच शक्य तों नीट जीवन कंठायला हवें. त्यांतल्या त्यांत पराकाष्ठा करायची. स्वगृहीं परत जाणें ही गोष्ट कालावधीची आहे. परंतु तोंवर काय करायचें ? पाकिस्तानांतून येणाऱ्यांपैकीं शेंकडा पंचाहत्तर, धंदेवाले, व्यापारी, दुकानदार असे आहेत. त्या सर्वांना हिंदी संघराज्यांत लगेच उद्योगधंदा कसा करतां येणें शक्य आहे ? त्यांनीं तशी अपेक्षाहि करूं नये. कारण, त्यामुळें संघराज्याची सारीच आर्थिक घडी विस्कळित होईल. म्हणून स्वतःच्या हातांनीं काम करायला त्यांनीं शिकलें पाहिजे. जे कोणी डॉक्टर असतील, जर कोणी दादा असतील, तर अशांना मात्र तेव्हांच कामधंदा सुरू करतां येईल. पाकिस्तानमधून आपणांस हांकलून देण्यांत आलें असें ज्यांना वाटतें, त्यांनीं स्वतःला सर्व हिंदुस्थानचे नागरिक

समजावें. ते अतःपर केवळ पंजाब, सरहद्दप्रान्त किंवा सिंध येथील नाहींत. ते जेथें जातील तेथें त्यांनीं तेथील जनतेशीं दुधांत साखरेप्रमाणें एकजीव होऊन जावें. त्यांनीं उद्योगी नि प्रामाणिक असावें. भारताच्या सेवेसाठीं आपण जन्मलों आहों, भारताच्या कीर्तींत भर घालायला आपण जन्मलों आहों, त्याच्या नांवाला कमीपणा आणण्यासाठीं नाहीं, ही गोष्ट त्यांनीं सदैव ध्यानांत ठेवावी. दारू, जुगार व आपापसांतले झगडे यांत त्यांनीं वेळ दवडूं नये. चूक होणें स्वाभाविक आहे; परंतु चुकांपासून धडा शिकणें, त्या पुनः न करणें हेंहि मानवांच्या हातीं आहे. माझ्या सांगण्याप्रमाणें जर शरणार्थी वागतील, तर जेथें ते जातील तेथें उपयोगी ठरतील; त्या त्या प्रांन्तांतील लोक बाहू पसरून त्यांचें प्रेमानें स्वागत करतील."

## ३२

१३-१०-'४७.

## शरणार्थींना

काल शरणार्थींच्या छावण्यांसंबंधीं मीं कांहीं बोललों. त्याचा इंग्रजी सारांश जो मीं पाहिला, त्यांत माझ्या बोलण्यांतील कांहीं भाग दिसला नाहीं. मी जें बोललों तें मला फार महत्त्वाचें वाटतें. आज माझें बोलणें मी जरा विस्तारपूर्वक येथें सांगतों. आपल्याकडे जरी धार्मिक वा इतर यात्रा-जत्रा असल्या, जरी आपण सभा-संमेलनें वगैरे भरवीत असलों, तरी ज्याला छावणींतील जीवन म्हणतात, तें आपल्या राष्ट्राच्या अंगवळणीं पडलेलें नाहीं. राष्ट्रसभेचीं अनेक अधिवेशनें, इतर सभासंमेलनें आणि छावण्या यांना मी हजर राहिलेलों आहें. १९१५मध्यें हरद्वारच्या कुंभमेळ्याला मी उपस्थित होतों. दक्षिण आफ्रिकेंतील जे माझे सहकारी येथें परत आले होते, त्यांच्यासह भारतसेवकसमाजाच्या छावणींत राहून आम्हीं त्या मेळ्यांत काम केलें; मला नि माझ्या सहकारी सेवकांना तेथें सर्व प्रकारची सोय होती. परंतु आमच्या लोकांनीं जें छावणी-जीवन त्या वेळेस कंठिलें तें कांहीं नीट होतें असें मला वाटलें नाहीं. सामाजिक स्वच्छतेचें भानच आपल्या लोकांना

नाहीं. त्यामुळें सर्वत्र भीषण दुर्गंधि नि अनारोग्य फैलावतें. सांथी, स्पर्श–जन्य रोग यांचाहि उद्भव होण्याची शक्यता असते. आपले संडास म्हणजे तर मूर्तिमंत नरक ! त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे. संडास म्हणून वस्तु नसतेच म्हणा ना ? वाटेल त्यानें वाटेल तेथें जणूं हे विधी करावे ! कोणाला त्याचें कांहीं वाटतच नाहीं. पवित्र नद्यांच्या तीरींहि घाण करायला त्यांना दिक्कत नसते ! स्वयंपाकपाण्याची तीच तऱ्हा. माश्यांची तर सदैव संगति. त्या भणभण करीत असतात. क्षणापूर्वी वाटेल त्या घाणीवर बसून या माश्या आल्या असतील याची आपणांस कल्पनाहि नसते. त्या माश्यांनीं स्पर्शजन्य जंतू आणले असतील हा विचारहि आपल्या मनाला शिवत नसतो. कसें राहावयाचें, लोकांची कशी सोय करायची याची पूर्वयोजना अशा मेळाव्यांतून वा यात्रा–जत्रांतून मुळींच नसते; मी अतिशयोक्ति करीत नाहीं. आणि तेथें गलबला, गलका इतका होत असतो कीं बोलतां सोय नाहीं.

पद्धति, योजना व स्वच्छता या बाबतींत लष्करी छावण्या आदर्श असतात. लष्कराची अवश्यकता मी कधींच मानीत नसतों. परंतु त्यांच्यांत कांहींच चांगलें नसतें असें मात्र नाहीं. शिस्त, सामुदायिक जीवन, आरोग्य नि स्वच्छता, प्रत्येक उपयुक्त कामाचें वेळापत्रक नि त्याची तरतूद, या सर्व गोष्टींचे धडे लष्करी छावणीपासून घ्यावे. आणि शान्ति तर इतकी असते कीं टांचणी पडली तरी ऐकूं यावें. थोड्या वेळांत कंतानांच्या नि तंबूंच्या आच्छादनाखालीं निर्माण केलेलें तें शहर असतें. त्या आदर्शाप्रत आमचे शरणार्थींचे कॅंप, या शरणार्थींच्या छावण्या पोंचाव्या असें मला वाटतें. मग, पाऊस येवो वा न येवो, कोणतीहि गैरसोय होणार नाहीं.

सर्वजणांनीं काम केलें तर अश्या छावण्या उभारायला फारसा खर्चहि येणार नाहीं. कंतानांचें हें शहर शरणार्थींनींच स्वतः उभें करावें. त्यांनीं स्वतःच झाडूवाले बनावें, भंगी बनावें; रस्ते करणारे तेच, तेच स्वतःचे स्वयंपाकी, तेच धोबी. कोणतेंहि काम सारखेंच प्रतिष्ठित नि सन्मान्य आहे. काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक देखरेख करण्यांत आली, तर सामाजिक जीवनांत अवश्यक व स्पृहणीय स्थित्यंतर होईल. मग शरणार्थी कोठेंहि गेला तरी तो भाररूप होणार नाहीं. तो स्वतःचा एकट्याचा कधीं विचार करणार

नाहीं. तो सर्व आपद्ग्रस्तांचा विचार करील. जें इतरांना मिळूं शकत नाहीं, त्याची तो स्वतः कधींहि इच्छा धरणार नाहीं.

घोंगड्या, रग येत आहेत. येणाऱ्या हिंवाळ्यांत सर्वांचा संभाळ होईल, कोणाला पांघरूण कमी पडणार नाहीं, अशी आशा वाटते. ''

## ३३

१४-१०-'४७

### थोर उदाहरण

गांधींजी म्हणाले, " आज दिवसां बऱ्याच घोंगड्या मिळाल्या. आर्य-समाजाच्या मुलींच्या शाळेंतील दोन शिक्षक आणि कांहीं विद्यार्थिनी आल्या होत्या. त्यांनीं कांहीं घोंगड्या नि थोडे पैसे दिले. परंतु सर्वांत आनंदाची गोष्ट दुसरीच आहे. परवां अन्नधान्याच्या प्रश्नासंबंधीं बोलतांना सर्वांनीं पंधरा दिवसांतून एकदां उपवास करावा असें मीं सुचविलें होतें. बाहेरून धान्य फारसें येऊं शकत नाहीं, तेव्हां तूट उपवासानें भरून काढावी हा मीं सुचवलेला उपाय मुलींना नि शिक्षकांना आवडला. दर गुरुवारीं उपवास करायचें त्यांनीं ठरविलें आहे. बागेंतहि जें कांहीं धान्य पिकवितां येईल, तें ते पिकविणार आहेत. सर्वजण जर याप्रकारें करतील तर हां हां म्हणतां अन्न-धान्य-तुटवड्याचा प्रश्न सुटेल.

इराणचे वकील पत्नीसह माझ्याकडे आले होते. त्यांनींहि पुष्कळशीं कांबळीं दिलीं. मीं ती कृतज्ञतापूर्वक स्वीकारलीं.

### शीख मित्रांशीं बोलणें

दिवसां अनेक शीख मित्रांजवळ बोलणें झालें. दोन तुकड्या करून ते आले होते. मी बराच वेळपर्यंत त्यांच्याशीं बोललों. आपसांत लढाई करून प्रश्न सुटणार नाहीं, हें सर्व बोलण्याचें सार होतें. शक्य तें सारें त्या त्या सरकारमार्फत झालें पाहिजे, व्हायला पाहिजे.

## सरकार दुबळें नका करूं

सरकारनें कांहीं लोकांना अटक केली आहे. या अटकेविरुद्ध चळवळ होत आहे. सरकारला अटक करण्याचा हक्क आहे. हेतुपुरस्सर कांहीं आपलें सरकार निरपराधी लोकांना पकडणार नाहीं. परंतु आपण मर्त्य माणसें चुका करूं शकतों. कांहीं निरपराधी लोकांनाहि चुकीमुळें दुःख भोगावें लागणें शक्य आहे. अशी कांहीं चूक झाली असेल तर ती सरकार दुरुस्त करील. चुका असतील तर त्यांच्याकडे सरकारचें लक्ष वेधून घ्यावें. लोकशाहींत येवढें करून जनतेनें समाधान मानावें. इच्छा असेल तर सरकारला जनता दूर करूं शकते; परंतु चळवळ करून त्यांच्या कामांत अडथळा नका आणूं. प्रचंड लष्कर नि आरमार मदतीला असलेलें पूर्वीच्या परकी सरकारसारखें आतांचें हें आपलें सरकार नव्हे. आपल्या सरकारला जनतेपासून शक्ति मिळवायची आहे.

## स्वतःच्या दोषांकडे पाहा

खरी शांति कशानें बरें येईल ? दिल्लींत शांतता आली म्हणून तुम्हांला कदाचित् समाधान वाटत असेल; परंतु मला नाहीं वाटत. हिंदु–मुसलमान दुरावलेले आहेत. पूर्वींहि हिंदु–मुसलमान भांडत, लढत; परंतु एकदोन दिवसांनंतर सारें शान्त होई. ते झालें गेलें विसरून जात. परंतु आज इतका कडवटपणा आला आहे कीं जणूं आपण फार पूर्वीपासूनचे शत्रू असें एकमेकांस वाटत आहे. असें वाटणें म्हणजे दुबळेपणा होय. हा दुबळेपणा झुगारून द्या, म्हणजेच तुम्ही थोर राष्ट्र व्हाल. तुमच्यासमोर दोन मार्ग आहेत: तुम्ही बलाढ्य राष्ट्र होऊं शकतां किंवा माझ्या मार्गानें जाल तर तुम्ही अजिंक्य असें थोर अहिंसक राष्ट्र होऊं शकाल. तुम्हांला कोणताहि मार्ग पसंत करायचा असला, तरी भीतीचा त्याग हा करायलाच हवा.

एकमेकांच्या जवळ यायला एकच मार्ग आहे; दुसऱ्याचे दोष विसरणें आणि स्वतःचे मोठे करणें. मी ही गोष्ट माझ्या सर्व शक्तीनें मुसलमानांना सांगत आहें, तद्वतच हिंदु–शीखांनाहि सांगत आहें. कालचे शत्रू आज मित्र होऊं शकतात. आपली चूक कबूल करण्यानें हें होऊं शकतें. जशास तसें

हा मार्ग मैत्रीचा नाहीं. माझ्या सांगण्याप्रमाणें अन्तःकरणपूर्वक वागाल तर दिल्ली सोडून मी पाकिस्तानमध्यें माझ्या शान्तिकार्यार्थ जाऊं शकेन. ”

## ३४

१९-१०-'४७

## सोन्यासारखीं कृत्यें गोळा करा

वीज बंद पडली, त्यामुळें ध्वनिक्षेपक काम देऊं शकत नव्हता. गांधीजींनीं श्रोत्यांना जवळ बोलाविलें. नंतर ते म्हणाले, “ अधिक कांबळीं येत आहेत; पैसेहि. एका भगिनीनें दोन हजारांची हुंडी पाठविली आहे. दोन मुसलमान मित्रांनींहि कांहीं कांबळीं नि पैसे पाठविले आहेत; मीं त्यांना सांगितलें, “ तुम्हीच कांबळी वांटा; पैसेहि तुमच्याजवळच ठेवा. ” परंतु ते म्हणाले, “ हिंदू आणि शीख निर्वासितांनाच या घोंगड्या द्या. या पैशांतून ज्या येतील त्याहि त्यांनाच द्या. तुमच्याजवळच आमची ही देणगी ठेवा. ” ते आणखी पुढें म्हणाले, “ पूर्वीं आम्ही तुम्हांला नांवें ठेवीत असूं. परंतु तुम्ही सर्वांचे मित्र आहां, कोणाचेहि शत्रू नाहीं, ही गोष्ट आम्हांला आतां निर्विवाद पटली. ” आज सर्वत्र अविश्वास आणि कडूपणा आहेत. अशा वातावरणांत अशीं कृत्यें अधिकच स्मरणीय वाटतात. इंग्रजींत एक पुस्तक आहे, त्याचें नांव सुवर्ण–कर्मे ( Book of Golden Deeds ). आपणहिअसें एकादें पुस्तक तयार करायला हवें. भलें कर्म करणाराच्या मनांत कांहीं हेतु असेल असें नका म्हणूं. हेतूचा आरोप आपण कोणावरहि करूं नये. त्या दोन मुसलमान मित्रांनीं आपलीं नांवेंहि नाहीं सांगितलीं. आजकाल प्रत्येक मुसलमान शीखाला शत्रु समजतो, प्रत्येक शीख मुस्लिमाला शत्रु समजतो. अनेक मुसलमान वेडेपिसे झाले आहेत, तद्वतच हिंदू नि शीखहि. परंतु व्यक्तींच्या चुकांसाठीं सर्व समाजाला नांवें ठेवणें हें अगदीं गैर आहे. किती तरी हिंदू आणि शीख लोकांनीं मला येऊन सांगितलें आहे कीं त्यांचे प्राण मुस्लिम मित्रांनीं वांचविले म्हणून. तसेंच मुसलमानांनींहि आपले प्राण हिंदु–शीख दोस्तांनीं वांचविल्याचें मला सांगितलें आहे. असे भले हिंदू,

शीख, मुसलमान प्रत्येक प्रान्तांत आहेत. वृत्तपत्रांनीं अश्या गोष्टींना अधिक प्रसिद्धि द्यावी. सूड आणि बदला घेण्याची वृत्ति ज्यांमुळें पेटेल, अशा दुष्कृत्यांना प्रसिद्धि देण्याचें टाळावें. अर्थात् सत्कर्मे वर्णितांनाहि अतिशयोक्ति नकोच.

## हिंदी कीं हिंदुस्तानी ?

वर्तमानपत्रांत मीं वाचलें कीं अतःपर युक्तप्रान्तीय सरकारी भाषा हिन्दी होणार व लिपि देवनागरी असणार. मला दुःख झालें. हिंदी संघ-राज्यांत जेवढे मुसलमान आहेत, त्यांतील चौथा हिस्सा एका युक्तप्रान्तांत आहेत. सर तेजबहाद्दर सप्रूंसारखे किती तरी उर्दू–पंडित युक्तप्रान्तांतच आहेत. त्यांनीं का उर्दू लिपि विसरून जावें ? दोन्ही लिप्या ठेवणें, कागदो-पत्रीं व सरकारदरबारीं दोन्ही लिप्यांना मान्यता देणें योग्य झालें असतें. म्हणजे दोन्ही लिप्या शिकणें अवश्यक झालें असतें.

मग भाषा आपलें काय व्हायचें तें पाहून घेती. मग हिंदुस्तानीच प्रांताची भाषा बनती. दोन्ही लिप्यांचें ज्ञान असणें म्हणजे वेळेचा अपव्यय नव्हे. तें ज्ञान निरुपयोगी नाहीं. त्यामुळें तुमची भाषा समृद्ध होईल, तुमचें जीवनहि समृद्ध होईल. म्हणून दोन्ही लिप्यांना नाक नका मुरडूं.

मुसलमानांना समान नागरिक म्हणून वागवा. समान वागणूक म्हटली म्हणजे उर्दू लिपीलाहि मान्यता द्यायला हवी. तुमची शासनपद्धति अशी नको कीं जेथें प्रतिष्ठापूर्वक जीवन अशक्य होईल. मुसलमानांनीं जाऊं नये असें जर प्रामाणिकपणें वाटत असेल तर त्यांना सन्मानपूर्वक जगतां आलें पाहिजे. खरोखरच समान वागणूक मिळत असूनहि पाकिस्तानांत जाणें त्यांनीं पसंत केलें तर त्यांची मर्जी ! आपल्या वर्तनांत त्यांना भिवविण्यासारखें कांहीं नसो म्हणजे झालें. आपलें वर्तन बिनचूक ठेवा, निर्दोष ठेवा. अशानेंच भारताची नि हिंदुधर्माची सेवा तुम्ही करूं शकाल. मुसलमानांना ठार करून, घालवून किंवा कोणत्याहि प्रकारें दडपून देशाची वा हिंदुधर्माची सेवा होणार नाहीं. पाकिस्तानमध्यें कांहीं झालें तरी आपण योग्य तेंच केलें पाहिजे. आपण पदच्युत नाहीं होतां कामा. ”



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

३५

१६-१०-'४७

## म्हैसूरचें उदाहरण

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, " म्हैसूरमधील सत्याग्रहाचा सुंदर शेवट झाला हें ऐकून मला समाधान वाटलें. म्हैसूर हिंदी संघराज्यांत सामील झालें. जबाबदार राज्यपद्धतीसाठीं तेथील लोक मागें चळवळ करीत होते. त्यांनीं पुनश्च सत्याग्रह सुरू केला होता. 'आम्ही सत्याग्रहाचे नियम पाळूं, तुम्ही मुळींच चिंता करूं नका' अशी तार तेथील कार्यकर्त्यांनीं मला केली होती. म्हैसूरचे मुख्य प्रधान रामस्वामी मुदलियार हे आहेत. ते खूप हिंडले-फिरलेले आहेत, संस्थानी कॉंग्रेसशीं त्यांनीं शेवटीं सन्मान्य समेट केला आहे. महाराज, दिवाण आणि संस्थानी कॉंग्रेस सर्वांना मी धन्यवाद देतों. शेवट गोड झाला. छान झालें. म्हैसूरचें उदाहरण मी सर्व संस्थानांसमोर ठेवूं इच्छितों. इंग्लंडच्या राजाप्रमाणें सर्व राजांमहाराजांनीं केवळ सनदशीर राजे बनावें. अशानेंच राजा आणि प्रजा सुखी व संतुष्ट होतील. . . . .

## सदाचार

आपण प्रार्थनेला खासगी जागेंत जमत असतों. आपल्या आवारांत बिर्लाबंधू तुम्हां सर्वांस येऊं देतात. त्यांचा हा चांगुलपणा तुम्हीं ओळखला पाहिजे. परंतु येथें येणाऱ्या कांहींनीं बागबगीच्याचें नुकसान केलें आहे, कोणीं फळें तोडून नेलीं आहेत, हें सारें ऐकून मला वाईट वाटलें. परवानगीशिवाय आपण एक पानहि तोडतां कामा नये. येथें माळी असतो, त्याची परवानगी असल्याशिवाय कशासहि हात नका लावूं. तुम्ही हालअपेष्टा भोगीत आहां; परंतु सदाचाराचे साधे नियम नका विसरून जाऊं.

## खात्यांपासून अपेक्षा

सनदी नोकरांना, पोलिसांना व लष्कराला तुम्हीं उगीच प्रशस्तिपत्र दिलें अशी तक्रार माझ्याकडे करण्यांत आली आहे. परंतु मीं असें कांहीं एक केलेलें नाहीं. राष्ट्राचीं हीं जीं खातीं, त्यांच्यापासून मी काय अपेक्षितों येवढेंच मीं सांगितलें. माझ्या अपेक्षा त्यांनीं पुऱ्या केल्या असा नाहीं माझ्या म्हणण्याचा अर्थ. सनदी नोकर, पोलीस, लष्कर आणि त्यांतील ब्रिटिश अधिकारीहि, या सर्वांनीं अतःपर स्वतःला प्रजेचे सेवक म्हणून समजलें पाहिजे. पूर्वीं परकी सरकारनें दिलेला पगार घेऊन हे सारे स्वतःला जनतेचे धनी समजत. परंतु ते दिवस गेले. त्यांनीं आतां 'पंचायत–राज्या'चे खरेखुरे सेवक झालें पाहिजे. मंत्री जे हुकूम करतील तदनुसार त्यांनीं वागावें. त्यांनीं भ्रष्ट होतां कामा नये, पक्षपात करतां कामा नये. जनतेनेंहि सरकारी कारभार नीट चालावा म्हणून संपूर्णपणें सहकार्य द्यावें. जर हीं खातीं नीट कामें न करतील तर तो देशद्रोह होईल, विश्वासघात होईल, कर्तव्यचुकारपणा होईल. त्यांना याबाबत चुकांची दुरुस्ती करायला भाग पाडलें पाहिजे. या खात्यांतील भ्रष्ट नोकरांविषयीं जनतेनें आपलीं गाऱ्हाणीं निर्भयपणें मांडावीं. जनतेला तसा हक्क आहे.

## पूर्व पाकिस्तानांतील अल्पसंख्य

पूर्व पाकिस्तानांतील कांहीं मंडळी भेटायला आली होती. बरेचसे हिंदू पूर्व बंगाल सोडीत आहेत. माझा सल्ला घ्यायला मित्र आले होते. मीं शंभरदां सांगितलें तेंच पुनः सांगणार. शूर नरनारींनीं भिऊन घरेंदारें सोडून जाणें शोभत नाहीं. त्यांनीं तेथेंच राहावें. स्वाभिमानहानीपेक्षां मरण पत्करावें. ईश्वराशिवाय कोणासहि त्यांनीं भिऊं नये. त्यांनीं आपल्या स्वधर्माचें रक्षण करावें; आपल्या नागरिकहक्कांचें व आपल्या अब्रूचें त्यांनीं प्राणांची किंमत देऊनहि रक्षण करावें. असें धैर्य नसेल तर मग निघून यावें; परंतु निघून येतांनाहि मागसलेले वर्ग व गरीब लोक यांची आधीं रवानगी करण्याची खबरदारी डॉक्टर, वकील, व्यापारी वगैरे प्रतिष्ठित हिंदू लोकांनीं घ्यावी. या वरच्या वर्गांनीं सर्वांच्या शेवटीं निघून यावें, सर्वांच्या

आधीं नाहीं. मी एकाच वेळेस सर्वत्र कसा असूं शकेन? परंतु माझा आवाज सर्वांना दूरवर ऐकूं जाईल येवढें मीं करूं शकेन. स्वतःच्या धर्मासाठीं, स्वाभिमानासाठीं हरिजनांनीं मरावें अशा अर्थाचें पत्रक डॉ० आंबेडकरांना काढायला मीं सुचवावें असें मला सांगण्यांत आलें. मी सभांतून हें आनंदानें सांगत आहें.

सुऱ्हावर्दीसाहेबांनीं बंगालमध्यें जाऊन ख्वाजा नजिमुद्दिनांना त्यांच्या कठिण कामांत मदत करावी असें मीं त्यांना सांगावें म्हणून मला सुचविण्यांत आलें आहे. सुऱ्हावर्दीसाहेब सध्यां दिल्लींत नाहींत; परंतु ते आल्यावर आनंदानें बंगालमध्यें जातील याविषयीं मला शंका नाहीं. पूर्व बंगालमधील मुस्लिम नेत्यांनीं अल्पसंख्य जनतेच्या मनांत विश्वास उत्पन्न होईल असें वातावरण निर्माण करायला हवें. त्यांचें तें कर्तव्य आहे. शान्तीसाठीं काम करणें सर्वांचें काम आहे. पाकिस्तान केवळ मुस्लिम राष्ट्र आणि हिंदी संघराज्य केवळ हिंदु-राष्ट्र म्हणून जर होणार असेल, उभयत्र जर विधर्मीयांस वाव नसेल, हक्क नसतील, तर दोन्ही देशांचा नाश होईल. हा धोका टाळून आपापली राष्ट्रनौका नीट हांकण्याचें शहाणपण दोघांनाहि प्रभूनें द्यावें अशी प्रार्थना मी करीत असतों. अशी बुद्धि दोघांनाहि सुचेल अशी मला आशा आहे."

१७-१०-'४७

## ३६

## सार्वभौम उपाय

गांधीजी म्हणाले, "मला अनेकांचीं पत्रें येत आहेत, निरोप येत आहेत. तुम्हांला खोकला, कफ आहे, याची चिंता वाटते," हेंच येऊन जाऊन सर्वांचें सांगणें. माझें भाषण ध्वनिक्षेपित केलें जातें आणि बोलण्याबरोबरच माझा खोकला ध्वनिक्षेपित होतो. सायंकाळीं उघड्यावर जरा खोकल्याचा अधिक त्रास होतो. गेले चार दिवस खोकल्याचा त्रास कमी आहे आणि लवकरच

तो अजीबात जाईल अशी आशा आहे. मीं वैद्यकीय उपचार संपूर्ण टाळले म्हणून खोकला पुनः पुनः सतावतो. मीं आरंभींच पेनिसिलीन घेतलें असतें तर तीन दिवसांत साफ बरा झालों असतों, असें डॉ० सुशीला म्हणाल्या. आतां तीन आठवडे लागतील. पेनिसिलीनची क्षमता मी नाकारीत नाहीं. परंतु सर्व आधिव्याधींवर मी रामनाम हा सार्वभौम उपाय मानतों. इतर उपचारांचा हा राजा आहे. सर्व बाजूंनीं मला ज्वाळांनीं घेरलें आहे; अशा प्रसंगीं तर ईश्वरावर श्रद्धा असण्याची अधिकच अवश्यकता आहे. ईश्वरच आग विझवायची शक्ति सर्वांना देऊं शकेल. ईश्वराला माझ्यापासून अजून काम घ्यायचें असेल तर तो मला जिवंत ठेवील, नाहीं तर घेऊन जाईल.

तुम्हीं आतांच जें भजनगीत ऐकलें त्यांत 'रामनाम कधीं सोडूं नका' असेंच नाहीं का कवीनें सांगितलें, आग्रहानें प्रतिपादिलें? सद्यःपरिस्थितींत सर्वत्र आणीबाणीची स्थिति असतांना मी स्वतःला संपूर्णपणें ईश्वराच्या स्वाधीन करूं इच्छितों. शारीरिक दुखण्यांखुपण्यांसाठीं अतःपर वैद्यकीय मदत मला नको.

## कांबळीं

कांबळीं, रग, रजया भराभर येत आहेत; आनंद. जरूर त्यांना तीं लवकरच वांटण्यांत येतील.

## नियंत्रणें उठवा

डॉ० राजेन्द्रप्रसादांनीं नेमलेल्या समितीचें विचारविनिमयाचें काम पुरें झालें आहे. ही समिति अन्नधान्याच्या प्रश्नापुरतीच होती. परंतु थोड्या दिवसांपूर्वीं मीं सुचविलें होतें कीं अन्न आणि वस्त्र दोहोंवरचें नियंत्रण ताबडतोब काढून टाकण्यांत यावें. युद्ध कधींच संपलें; परंतु किंमती वाढतच आहेत. देशांत अन्न आहे आणि कापडहि आहे; परंतु लोकांपर्यंत अन्नवस्त्र जात नाहीं. फार वाईट आहे ही गोष्ट. सरकार जनतेला चमच्याचमच्यानें खाऊं घालीत आहे. हें बंद करा. जनतेला स्वतःच्या आधारावर सोडून द्या. सनदी नोकरांना कचेरींत बसून कामें करण्याची संवय. त्यांचें सारें काम चाकोरींतून जायचें. त्या शेंकडों सह्या नि नाना प्रकार. सनदी नोकरांचा कधीं जनतेशीं

संबंध आलेला नसतो. त्यांना शेतकऱ्यांची स्थिति माहीत नसते. परंतु आज बदल झाला आहे. लोकांच्या मनोवृत्तींत झालेला बदल या सनदी नोकरांनीं ध्यानांत घेतला तर बरें असें मला वाटतें. लोकांची स्वयंस्फूर्ति, कर्मशक्ति नियंत्रणें घालून गुदमरवूं नका. त्यांना स्वावलंबी व्हायला वाव द्या. लोक–शाहीनें त्यांना दुबळे व अगतिक नाहीं बनवतां कामा. समजा, नियंत्रणें काढल्यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली, तर तीं पुनः बसवा. मला तर वाटतें कीं तीं दूर केल्यामुळें परिस्थिति निवळेल, लोकच आपापले प्रश्न सोडवायला लागतील आणि मग भांडायला वेळच उरणार नाहीं.

## दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाविषयीं मी जें मागें बोललों त्याचें अभिनंदन करणारी तार मला आली आहे. मला जें सत्य वाटलें तेंच फक्त मीं बोलून दाखविलें. सत्याग्रहांत पराजयाला जागा नाहीं, मागें फिरायला वाव नाहीं. स्वर्गीय पंडित रामभुजदत्त चौधरींचा एक चरण आहे :

**" पराभवाहुनि मरण बरें "**

असें त्यांनीं म्हटलें आहे. पंजाबांतील लष्करी कायद्याच्या धिंगाण्याच्या वेळचे हे कवीचे उद्गार आहेत. त्या वेळेस अश्रुतपूर्व असे अपमान जनतेवर लादण्यांत आले होते. परंतु ते चरण त्या वेळचे असले तरी ते सर्व काळाला लागू आहेत. ते चिरंजीव चरण आहेत. एक अट आहे, ती कधीं विसरूं नका म्हणजे झालें. तुमचें उद्दिष्ट न्याय्य नि सत्य असायला हवें. हिंदुस्थानचा स्वाभिमान संभाळण्यासाठीं मूठभरहि खरे सत्याग्रही पुरेत.

सत्याग्रहासाठीं लोकांना निधि गोळा करायला मीं सांगावें अशी त्यांनीं मला विनंति केली आहे; परंतु दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी समाज कांहीं गरीब नाहीं. थोड्याफार सत्याग्रहींना आर्थिक अडचण असणें शक्य आहे. परंतु आज हिंदुस्थान आर्थिक संकटांतून जात आहे. भ्रातृहत्या, यादवी, लाखों निर्वासित, यांमुळें सरकारचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें आहे. कोण कर भरणार, कोण जमीनमहसूल भरणार ? दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह्यासाठीं हिंदी जनतेजवळ मदत मागायला आज मला धैर्य नाहीं. कोणीं

आपण होऊन मदत दिलीच, तर मला आनंदच आहे. समुद्रपार पूर्व आफ्रिकेंत, मॉरिशस येथें व इतर ठिकाणीं बरेच हिंदी लोक आहेत, ते सुखवस्तू आहेत. हिंदु–मुस्लिम–भेदाचा तेथें सवाल नाहीं. तेथें ते सारे हिंदी म्हणूनच वागतात. त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या भावांना ( जे हिंदी प्रतिष्ठेसाठीं लढत आहेत त्यांना ) मदत पाठवावी. ते पाठवितील अशी मला अपेक्षा आहे. सत्याग्रह्यांना ऐषआरामाची जरुरी तर नसतेच. जीवनाच्या अपरिहार्य गरजांपुरतें त्यांना मिळालें म्हणजे पुरे. म्हणून अशा सत्याग्रह्यांना जरूर ती सारीं मदत देणें हें समुद्रपार असलेल्या हिंदी जनतेचें कर्तव्य आहे. ”

•

३७

१८–१०–'४७

## कुरुक्षेत्रावर कांबळीं धाडलीं

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, “ अधिक घोंगड्या नि अधिक पैसे येत आहेत हें सांगायला मला आनंद वाटतो. ज्या गतीनें कांबळीं येत आहेत, त्याच गतीनें आलीं तर सर्व गरजूंना वेळेवर पुरेशीं देतां येतील. सरदारांनींहि या बाबतींत एक विनंतिपत्र काढलेलें पाहून मला आनंद झाला. डॉ० सुशीला नायर आज कुरुक्षेत्रावर गेल्या आहेत. शरणार्थींच्या सुखसोयींसाठीं त्या जिवापाड श्रम करीत असतात. श्रीमती मथाई, श्रीमती आर. शरण, श्रीमती कृष्णाबाई ह्याहि डॉ० सुशीला नायर यांच्याबरोबर गेल्या आहेत. शरणार्थींना देण्यासाठीं भरपूर कांबळीं नि कपडे त्यांनीं बरोबर नेले आहेत.

## राष्ट्रीय भाषा

हिंदुस्तानी राष्ट्रभाषा असावी म्हणून मी त्या दिवशीं बोललों. तत्संबंधीं अनेक पत्रें माझ्याकडे येत आहेत. सर्व हिंदी जनतेसाठीं हिंदुस्तानीच उत्कृष्ट अशी राष्ट्रभाषा होऊं शकेल याविषयीं मला शंका नाहीं. पर्शियनप्रचुर उर्दू

किंवा संस्कृतप्रचुर हिंदी बहुजनसमाजास समजणें कठिण आहे. ब्रिटिश सत्ते-बरोबरच इंग्रजी भाषाहि राजभाषा म्हणून गेली. अतःपर सरकारदरबारीं ती दिसणार नाहीं. बोलण्याचें सर्वसाधारण वाहन आतां इंग्रजी नसणारच. इंग्रजी भाषेला तिच्या योग्य स्थानीं मी मान देईन; पण हिंदुस्थानची राष्ट्र-भाषा ती कधींच होणें शक्य नाहीं. एका भल्या मित्रानें मला सुचविलें आहे कीं इंग्रजी भाषा नको, इंग्रजी नको, असें म्हणतां म्हणतां, ती भाषा बोल-णारे जे इंग्रज त्यांच्याविषयींहि आपण कदाचित् नापसंती दर्शवायला लागूं. असें जर झालें तर मी विद्ध होईन; अनपेक्षित अशी ही दुःखान्त घटना जर झाली तर मी वेदनेनें वेडा होईन ही गोष्ट हा मित्र जाणून होता, म्हणून त्यानें धोक्याची सूचना दिली. सूचना यथासमयच आहे. कर्ता आणि त्याचें कर्म यांत मी सदैव फरक करीत आलों ही गोष्ट तुम्हीं सर्वांनीं ध्यानांत घ्यायला हवी. कृत्य तिरस्करणीय, नापसंत असूं शकेल; परंतु कर्ता नाहीं असतां कामा. हा फरक क्वचितच कोणीं ध्यानांत घेतात हें मला माहीत आहे. लोक साधारणपणें कर्ता नि त्याचें कर्म एकरूपच मानतात आणि दोहोंचाहि तिरस्कार केला जातो. हे सन्मान्य मित्र पुढें लिहितात, "अँग्लोइं-डियन, गोंवेकर आणि असेच कांहीं लोक इंग्रजीच मायबोली मानतात. हिंदी वा हिंदुस्तानी आंतरप्रान्तीय भाषा म्हणून ठरल्यावर या लोकांना त्या भाषेचें ज्ञान नसेल तर का हांकलून देणार ?" मी असें कधींहि कल्पूं शकणार नाहीं ही गोष्ट लेखक जाणतो. लेखकाला वाटणारी भीति सार्थ आहे. परंतु ठरा-विक मुदतींत हे लोकहि कामचलाऊ हिंदुस्तानी शिकूं शकतील असें मला वाटतें. अल्पसंख्य लोक किती का कमी असेनात, त्यांना जुलूम नाहीं वाटतां कामा. हे सारे प्रश्न अति हळुवारपणें आणि अति सौम्यतेनें सोडविण्याची अवश्यकता आहे.

हेच कळकळीचे स्नेही पुढें म्हणतात, "तुम्ही दोन्ही लिप्यांचा आग्रह धरतां, याचा परिणाम कदाचित् त्या दोन्ही जाऊन रोमन लिपि येण्यांत व्हायचा." माझे हे मित्र रोमन-पक्षपाती आहेत, मी तसा नाहीं. या दोन्ही लिप्यांची जागा रोमन लिपी कधीं काळीं घेऊं शकेल असें मला वाटत नाहीं. या प्रश्नासंबंधीं वाद घालीत बसण्याची माझी इच्छा नाहीं. मी

या विषयाचा येवढ्याचसाठीं उल्लेख केला कीं जर दोन्ही लिप्या शिकायला तयार नसाल तर तुमची राष्ट्रीयता यथातथाच आहे असें म्हणावें लागेल. देशावर प्रेम असेल तर दोन्ही लिप्या शिकण्यांत तुम्हांला अपार आनंद वाटायला हवा. शेख अबदुल्लासाहेबांचेंच उदाहरण घ्या. आजच तिसरे प्रहरीं ते मला भेटले होते. काश्मीरमध्यें अटकेंत असतांना ते हिंदी शिकले, नागरी लिपि शिकले. शेखसाहेब जें करूं शकले तें इतरहि राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांस तितकेंच सोपें नाहीं का ?"

## ३८

१९-१०-'४७

गांधीजी म्हणाले, " दिवस आतां लहान लहान होत आहेत. सहाची वेळ लोकांना उशिराची वाटते. ठीक. सोमवारपासून सहाच्या ऐवजीं साडेपांच ही प्रार्थनेची वेळ करूं.

### हें का स्वराज्य ?

आज आपण जें भजनगीत म्हटलें त्याच्या सहृदय आठवणी आहेत. भजनावलींतील बहुतेक भजनगीतांच्या मागें इतिहास आहे. स्वर्गीय पंडित खरे यांनीं भजनसंग्रह तयार केला. श्री० काकासाहेबांनीं त्यांना मदत केली. आज आपण जें भजन म्हटलें तें स्वर्गीय मगनलाल गांधी वारंवार म्हणायचे. मगनलाल साबरमती येथील आश्रमाचे व्यवस्थापक होते. माझ्याबरोबर ते दक्षिण आफ्रिकेंतहि होते. राष्ट्रसेवेला त्यांनीं वाहून घेतलें होतें. त्यांची प्रकृति दणकट होती, आवाज गोड होता. हिंदुस्थानांत आल्यापासून त्यांची प्रकृति खालावली. त्यांच्यावर अपार काम पडे. एका माणसाच्या शक्तीच्या बाहेर तें असे. स्वराज्याचा नि विधायक कामाचा संदेश लाखोंना नेऊन देणें सोपें काम नाहीं. हें भजन मगनलाल अनेकदां आळवीत. त्यांच्या आळवण्यांत करुणा असे. ईश्वर समोर मूर्तिमंत दिसत नाहीं म्हणून कवि

बेचैन आहे. एकेक रात्र वाट पाहणें हें त्याला युगाप्रमाणें वाटतें. मगनलालांना कोणता साक्षात्कार हवा होता ? स्वराज्याचा म्हणजेच प्रभूच्या राज्याचा. तें स्वप्न अजून दूर दूर आहे असें त्यांना वाटे आणि अजूनहि तें दूरच आहे. विधायक कामाच्या द्वाराच हें स्वप्न प्रत्यक्षांत येऊं शकेल. लोकांनीं विधायक कार्यक्रम अंमलांत आणला असता तर जे प्रकार आज बघावे लागत आहेत तें बघावे लागले नसते. ऑगस्ट महिन्याच्या पंधराव्या तारखेस स्वराज्य आलें असें सांगण्यांत आलें; मी त्याला स्वराज्य म्हणूं शकत नाहीं: स्वराज्यांत भाऊ भावाचा गळा कापण्यास धांवून जात नाहीं. स्वतंत्र हिंदुस्थान सर्वांशीं मैत्री जोडण्याची आकांक्षा धरील. साऱ्या जगांत आपला कोणीहि शत्रु नाहीं असें घोषविण्याची त्याला उत्कंठा असेल. परंतु अरेरे ! आज काय दिसत आहे ? एकीकडे हिंदू आणि शीख व दुसरीकडे मुसलमान उभे असून एकमेकांच्या रक्तांसाठीं ते जणूं तहानले आहेत.

मी हें सारें कां सांगत आहें ? जर खऱ्या स्वराज्याचें स्वप्न तुम्हांला प्रत्यक्षांत आणायचें असेल तर स्वर्गीय श्री० मगनलाल गांधींप्रमाणें तुम्हांला अखंड तळमळ लागायला हवी. तुमच्या मनांवर ही गोष्ट मला ठसवायची आहे, म्हणून मी हें सांगत आहें. ईश्वर निराकार आहे. मनुष्य अनेक स्वरूपांत त्याची कल्पना करतो. रामराज्याच्या स्वरूपांत परमेश्वर पाहावा असें तुम्हांस वाटत असेल तर पहिली गोष्ट तुम्हीं करायला हवी आत्मनिरीक्षणाची. अन्तर्मुख व्हायला शिका. शेजाऱ्यांच्या दोषांकडे न बघतां स्वतःच्या चुका हजारपट करून बघा. अशानेंच खरी प्रगति होते, उन्नति होते. आज सर्वांचा अधःपात झाला आहे. मुसलमानांना हिंदु–शीख शत्रू वाटतात आणि हिंदु–शीखांना मुसलमान. मंदिरांच्या मशिदी बनविण्यांत येत आहेत आणि मशिदींचीं मंदिरें. किती दुःखदायक आहेत हे प्रकार ! अशानें दोन्ही धर्मांचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## एकच मार्ग

वणवे कसे विझवायचे, आग कशी विझवायची ? जो एकच मार्ग आहे तो मीं तुम्हांला दाखविला आहे. दुसरे कांहींहि करोत, स्वतःचें वर्तन बिन–

चूक ठेवणें हाच एक उपाय आहे. पाकिस्तानांत हिंदू आणि शीख यांना काय काय भोगावें लागलें तें का मी जाणत नाहीं ? मला का त्याची कल्पना नाहीं ? परंतु तें सारें जाणूनहि तिकडे मी दुर्लक्ष करूं इच्छितों. नाहीं तर मी वेडा होऊन जाईन. मग भारताची सेवा कशी करूं शकेन ? हिंदी संघ–राज्यांतील मुसलमानांना सख्खे भाऊ माना. दिल्ली शांत आहे म्हणतात. परंतु मला फारसें समाधान नाहीं. शांतता आहे ती पोलिसांमुळें नि लष्करा-मुळें. हिंदु–मुसलमानांत बंधुभाव नाहीं, प्रेम नाहीं; अजून हृदयें दुरावलेलीं, दुखावलेलींच आहेत. येथील श्रोत्यांत मुसलमान आहेत कीं नाहींत मला माहीत नाहीं. जर कोणी असलाच तर त्याला सुरक्षित नसेल वाटत. आपण घरीं आहों असें नसेल बहुधा वाटत. परवां प्रार्थनेला शेख अबदुल्लासाहेब नि कांहीं मुसलमान होते. मसुरी येथें किडवाईसाहेबांच्या बंधूचा क्रूर खून करण्यांत आला. कांहींहि अपराध नव्हता त्यांचा. त्यांची पत्नीहि परवां प्रार्थनेला उपस्थित होती. ती मंडळी प्रार्थनेला हजर असतांना मी अस्वस्थ होतों; त्यांच्या शरीरांच्या चिंतेनें मात्र नव्हे: माझ्या समक्ष तरी वेडेंवांकडें कांहीं होणार नाहीं असा आत्मश्लाघी भरंवसा मी राखीत असतों. मला एकच चिंता वाटत होती. त्यांचा कोणीं अपमान तर नाहीं ना करणार ? त्यांचा कोणी अपमान करता, तर मला शरमेनें मान खालीं घालावी लागली असती ! मुसलमान बंधूंना कां बरें भीति वाटावी ? ते मुसलमान बंधूंमध्यें जेवढे सुरक्षित असतील तेवढेच येथेंहि, तुमच्याआमच्यांत असले पाहिजेत. तितकीच सुरक्षितता त्यांना येथेंहि वाटली पाहिजे. शेजाऱ्याचे दोष कमी मानणें, स्वतःचे मोठे करून पाहणें, हीच खरी जीवनकला आहे. जोंपर्यंत तुम्ही ही शिकत नाहीं तोंवर शान्ति कशी येणार ? हिंदुस्थान हें आशिया व आफ्रिका यांचेंच नव्हे, तर सर्व जगाचें आशास्थान आहे. सर्वांचे डोळे हिंदुस्थानकडे लागले आहेत. ती आशा तुम्हांला सत्य–सृष्टींत आणायची असेल तर भ्रातृहत्या थांबवा. सारे भाऊ भाऊ बना, मैत्रीनें नांदा. तसें वातावरण निर्माण व्हायला निर्मळ अंतःकरण हीच पहिली जरुरी आहे."

## ३९

२०-१०-'४७.

# हा का शेवटचा गुन्हा ?

काल प्रार्थनेनंतर राजकुमारीनें मला बातमी दिली कीं, आपलें काम करीत असतां एका आरोग्यखात्यांतील मुस्लिम अधिकाऱ्याचा खून करण्यांत आला. ती मला म्हणाली कीं, तो मनापासून काम करणारा अधिकारी होता. त्याच्या पाठीमागें त्याची विधवा पत्नी नि मुलें आहेत. पत्नी तर दुःखानें वेडी झाली आहे. ती म्हणते कीं, आमचा पोशिंदा, आमचा एकमात्र आधार जर ठार केलात तर आम्हांलाहि सर्वांना ठार करा.

मीं कालच तुम्हांला सांगितलें कीं, वरवर ठीक दिसलें तरी दिल्ली अंतरंगीं शांत नाहीं. जोंवर अशी दुःखद घटना घडत आहे तोंवर वरपांगी शांतीनें समाधान मानण्यांत अर्थ नाहीं. ही स्मशानशांति आहे. लॉर्ड आयर्विन, ज्यांना आतां लॉर्ड हॅलिफॅक्स म्हणण्यांत येतें, त्यांनीं आपल्या कारकिर्दींत असणाऱ्या शांतीला स्मशानशांति असें संबोधिलें होतें.

राजकुमारी म्हणाली कीं, कुराणांत सांगितल्याप्रमाणें दफनविधि करायलाहि पुरेसे मुसलमान मित्र येऊं शकले नाहींत.

हृदय म्हणून ज्याला आहे त्याला त्याला ही गोष्ट ऐकून धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. दिल्लीची कां अशी दशा व्हावी ? अल्पसंख्य जमात कितीहि बलवान् असो, तिला बहुसंख्य जमातीनें भिणें ही भ्याडपणाची पक्की निशाणी आहे.

सरकार गुन्हेगाराचा तलास लावून त्याला सजा देईल अशी मला उमेद आहे.

हा गुन्हा अखेरचाच असेल तर मला फार बोलायचें नाहीं. अर्थात् असलें कृत्य लज्जास्पदच आहे. वारा कसा वहात आहे त्याची ही खूण आहे. दिल्लीची सद्सद्विवेक बुद्धि जागी व्हायला हवी.

कांबळ्यांसाठीं पैसे येत आहेत. सर्व दात्यांना धन्यवाद. या किंवा त्या जातीसाठीं म्हणून हे पैसे देण्यांत आले नाहींत ही चांगली गोष्ट आहे.

## एक अनावृत पत्र

दुसऱ्या एका धोक्याकडे मोठ्या दुःखानें तुमचें ध्यान मी खेंचूं इच्छितों. एका इंग्रजानें एक अनावृत पत्र प्रसिद्ध केलें आहे. " ज्याचा संबंध असेल त्याला " असें त्या पत्राला शीर्षक आहेः

"दंगलग्रस्त भागांतील एका दूर कोंपऱ्यांत आम्ही पडून आहोंत. आम्ही अस्सल ब्रिटिश आहोंत. या देशांतील लोकांच्या हितकल्याणासाठीं कित्येक वर्षें त्यागपूर्वक आम्हीं सेवा केली आहे......आतां असें कळतें कीं उरलेल्या सर्व ब्रिटिशांची चटणी उडवा असा एक संदेश सर्वत्र धाडण्यांत आला आहे. सरकार प्रत्येक राजनिष्ठ माणसाचे प्राण, मालमत्ता यांचा सांभाळ करील असें पंडित नेहरूंनीं दिलेलें आश्वासन आम्हीं वृत्तपत्रांत वाचलें आहे. परंतु दूर खेड्यांत अडकलेल्या लोकांच्या रक्षणाचें साधन काय ? आम्हांला तर बचावाचें साधन दिसत नाहीं. तें केवळ अशक्य असें वाटत आहे."

या पत्रांतील आणखीहि भाग देण्यासारखा आहे. परंतु जेवढा भाग वाचला तेवढ्यावरूनहि लपून असलेल्या संकटाची कल्पना येईल. कदाचित् ही अफवा असेल, भ्रममूल भीति असेल. असें एकादें गुप्त पत्रक नसेलहि गेलेलें.

परंतु सावध राहण्यांत दूरदर्शित्व आहे. लेखकाची भीति निराधार असेल अशी मला आशा आहे. दूरच्या कोंपऱ्यांत रक्षण होणें कठिण हें मलाहि पटतें. सरकारनें आश्वासन दिलें तरीहि तें अशक्य असतें. पोलीस नि लष्करी खातें कितीहि कार्यक्षम असलें तरीहि तें शक्य नसतें. आज तर हीं खातीं तितकीं कार्यक्षमहि नाहींत हें कबूल करायलाच हवें. संरक्षण सर्वांआधीं आपल्या हृदयांतूनच यायला हवें; ईश्वरावरील अभंग श्रद्धेंतून यायला हवें; आणि नंतर शेजारच्या जनतेच्या सदिच्छेंतून यायला हवें. जर दोन्हींचा अभाव असेल, तर हिंदुस्थानचा अनातिथ्यशील किनारा सोडून जाणें हाच बचावाचा सर्वोत्तम मार्ग. परंतु या थराला गोष्टी आल्या असतील असें वाटत



नगर वाचनालय, सातारा.

नाहीं. ज्या ज्या ब्रिटिशांना हिंदुस्थानचे प्रामाणिक सेवक म्हणून रहायचें असेल त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणें हें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे. त्यांचा अपमान नाहीं होतां कामा, त्यांची उपेक्षा नाहीं होतां कामा. स्वतंत्र आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून आपणांस जर नीट हिशेब द्यायचा असेल, तर या आणि अशाच इतर बाबतींत वृत्तपत्रें नि जनता यांनीं दक्ष असलें पाहिजे. आपले शेजारी कितीका थोडे असेनात, त्यांचा स्वाभिमान जर आपल्या हातीं सुरक्षित नसेल, तर आपल्या स्वतःच्या स्वाभिमानाचा दावाहि आपणांस करतां येणार नाहीं.

## ४०

२१–१०–'४७

# आणखी एक गुन्हा

प्रार्थनोत्तर प्रवचनांत गांधीजी म्हणाले : मीं आणखी एक दुःखद घटना ऐकली. हा खून जातीय नव्हता. एक हिंदु सरकारी अधिकारी ठार मारला गेला. एका शिपायानें त्याला गोळी घातली. शिपायाला सांगितलेलें काम करायची इच्छा नव्हती. आणि त्यानें गोळी झाडली. जरा कांहीं होतांच गोळी झाडण्याची प्रवृत्ति उत्पन्न होणें ही गंभीर घटना आहे. चिन्हें बरीं नाहींत. ज्यांना मानवी जीवनाची किंमत वाटत नाहीं. असे रानटी लोक जगांत आहेत. पशुपक्ष्यांना मारावें त्याप्रमाणेंच ते मानवांनाहि मारतात. स्वतंत्र हिंदुस्थान अशा रानटी लोकांतच जमा व्हायचा का ? जीवन निर्माण करण्याची मानवाला शक्ति नाहीं; म्हणून त्यानें जीवन संहारूंहि नये. तरीहि मुसलमान हिंदु-शीखांचे प्राण घेत आहेत आणि हिंदु-शीख त्यांचे. परंतु ही दुष्ट लीला संपल्यावर मुसलमान मुसलमानांस मारूं लागतील, हिंदु-शीख हिंदु-शीखांना. कारण रक्ताची लागलेली चटक थोडीच जाणार आहे? अशा रानटी दशेला हें राष्ट्र न जावो. अजून वेळ आहे तोंच हिंदुस्थान नि पाकिस्तान, दोघांनीं सारी नीट घडी बसवावी. ते असें न करतील तर वरील स्थिति येईल.

## कायद्यांत ढवळाढवळ नको

गांधीजी म्हणाले, "दुसऱ्या एका गोष्टीविषयीं मला तुम्हांला सांगायचें आहे. दंगलींत अनेकांना सरकारनें अटक केली आहे. जुन्या राजवटींत गुन्हा माफ करून दया दाखवा म्हणून व्हाइसरॉयांना लोक प्रार्थीत. व्हाइसरॉयला कितीहि सदोष नियम असले, तरी तदनुरूपच वागावें लागे. आज लोक आपल्याच प्रधानांना अर्ज करीत आहेत. तर काय प्रधानांनीं आपल्या मर्जीप्रमाणें वागायचें ? मला तर वाटतें, कीं त्यांना असें वागतां येणार नाहीं. कायद्याला आपल्या रस्त्यानें जाऊं दे. सरकारनें दया केव्हां दाखवायची त्यालाहि कांहीं मर्यादा आहे, काळ-वेळ आहे. अशा प्रकारच्या फिर्यादी काढून घेण्याचा एकच मार्ग आहे. कैद्यांना सोडून देण्याविषयीं न्यायालयालाच फिर्यादींच्या वतीनें अर्ज केले जावेत. अत्यन्त नीच गुन्ह्यांच्या बाबतींत गुन्हेगारांना सहजासहजीं सोडणें शक्यच नसतें. फिर्यादीपक्षानें गुन्हेगारांच्या विरुद्ध पुरावा मांडला नाहीं एवढ्यावरूनहि प्रश्न संपणार नाहीं. आरोपीनें गुन्हा कबूल करून दयेची याचना करावी. आणि फिर्यादीपक्षानेंहि या बाबतींत जर मनःपूर्वक संमति दिली तरच गुन्हेगाराला माफी केली जावी. हें सारें सांगण्याचा हेतु एवढाच, कीं स्वजनांना वांचवण्यासाठींहि मंत्र्यांना कायद्यांत हस्तक्षेप करतां येणार नाहीं. लोकशाही राज्यांत न्यायाचें काम स्वस्त असावें; न्याय लौकर मिळावा; आणि शक्य तितका चोख न्याय मिळण्याची वहिवाट असावी. परंतु प्रधान जर न्यायालयांतील माणसें बदलून दुसरीं नेमतील किंवा तेथें कांहीं लुडबूड करूं लागतील, तर ते स्वतःच लोकशाहीच्या कायद्याचा भंग करणारे होतील.

एका मित्रानें मला सूचना केली, कीं तुमचीं भाषणें ध्वनिक्षेपित केलीं जात असल्यामुळें पंधरा मिनिटांपेक्षां अधिक नका बोलत जाऊं. ही सूचना मला मान्य आहे. म्हणून आज पुरें करतों आणि पुढेंहि असेंच चालवण्याची इच्छा आहे."

## ४१

२२-१०-'४७

गांधीजी म्हणाले: कांबळीं आणि तीं खरीदण्यासाठीं पैसे येतच आहेत. लोकांच्या उदारतेनें मला खूप समाधान आहे.

## एका उर्दू दैनिकांतील उतारा

आज दुपारीं एका मित्रानें उर्दू पत्रांतील एक उतारा मला वाचून दाखविला. उर्दू पत्रें मी क्वचितच वाचतों. मला उर्दू समजतें परंतु तितक्या सहजतेनें मी वाचूं शकत नाहीं. म्हणून माझे मित्र मधूनमधून उर्दू पत्रांतील उतारे मला वाचून दाखवितात. संपादकानें चिथावणी देणाऱ्या अनेक गोष्टी लिहिल्या आहेत. हिंदी संघराज्यांतून मुसलमानांना हांकलून लावायचें हिंदूंनीं निश्चित केलें आहे अशीहि त्यांत एक गोष्ट होती. संपादक लिहितो, 'मुसलमानांनीं येथून जावें नाहीं तर डोकीं गमावून बसतील.' हें संपादकाचेंच मत असावें अशी मी आशा राखतों. जनतेंतील पुष्कळांना जर असेंच वाटत असेल, तर ती शरमेची गोष्ट आहे; आणि चिंतेचीहि. कारण भारताच्या अस्तित्वालाच मग धोका आहे. मीं तुम्हांला कालच सांगितलें, कीं अशा धोरणानें सर्वनाश आहे. कारण शेवटीं हिंदु-शीख मग हिंदु-शीखांना मारूं लागतील. असा आरंभहि झाल्याचें एका मित्रानें सांगितलें. आज वृत्तपत्रें म्हणजेच लोकांना गीता, बायबल, कुराण वाटतात. छापलेला कागद त्यांना वेदवाणी वाटतो. आणि म्हणूनच संपादक आणि वार्तालेखक यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडते. आज तिसरे प्रहरीं मला जें वाचून दाखविण्यांत आलें, तसें कधींहि प्रसिद्ध होऊं देतां कामा नये. अशा वृत्तपत्रांना बंदी घातली पाहिजे.

## संस्थानें कोठें चाललीं ?

आज संस्थानांत सर्वत्र गोंधळ माजल्याचें एका मित्रानें सांगितलें. संस्थानिकांवर ब्रिटिशांची एक प्रकारची हुकुमत होती. परंतु ब्रिटिश सार्वभौमत्व संपल्यामुळें ती हुकुमतहि संपली. ती जागा सरदारांनीं घेतली आहे ही गोष्ट खरी. परंतु ब्रिटिशांची लष्करी शक्ति त्यांच्या पाठीमागें नाहीं. बरीचशीं संस्थानें हिंदी संघराज्याची अधिसत्ता मानतात. परंतु मध्यवर्ति सत्तेला आपण बांधलेलें आहोंत असें त्यांना फारसें वाटत नाहीं. ब्रिटिश सत्तेपेक्षां आतां आपण अधिक स्वतंत्र आहोंत असें त्यांना वाटतें. त्यामुळें प्रजेला वाटेल तसें वागवतां येईल अशी त्यांची कल्पना झालेली दिसते. मी एका संस्थानचाच आहें. मी संस्थानिकांचा मित्र आहें. आणि

म्हणूनच संस्थानिकांना मी सांगूं इच्छितों, कीं त्यांनीं प्रजेचें खरेंखुरें विश्वस्त व्हावें. अनियंत्रित सत्ताधारी म्हणून त्यांना राहतां येणें अशक्य आहे. प्रजेला ते नष्ट करूं शकणार नाहींत. हिंदुस्थानचें भवितव्य कांहींहि असो; संस्थानिक जर अनियंत्रित सत्ताधारी होऊं पाहतील, तर ती त्यांची मोठी चूक होईल. प्रजेच्या सदिच्छेवरच त्यांना जगतां येईल. हिंदुस्थानांतील लक्षावधि लोकांनीं ब्रिटिश साम्राज्यसत्तेशीं मुकाबला केला आणि स्वातंत्र्य मिळविलें. आज ते पागल झाल्याप्रमाणें वागत आहेत. पाठोपाठ संस्थानिकांनींहि पागल बनूं नये. अनियंत्रित सत्ता, व्यभिचार, दारू हा निश्चित नाशाचा मार्ग आहे.

नि-१११४/३६३४४/३५२

## दसरा आणि बक्र ईद

आणि आतां दसरा, बक्र ईद हे सण येत आहेत. सर्व सचिंत आहेत. हिंदी संघराज्यांत दंगाधोपा आतां झालाच, तर हिंदूंकडूनच तो होईल. दसऱ्याच्या सणाचा इतिहास तुम्हांला सांगतों. रामानें रावणावर जो विजय मिळविला, त्याची ही खूण. दुर्गापूजा म्हणजे विश्वव्यापक शक्तीची पूजा. दहा दिवसांनन्तर भरतभेटीचे दिवस. नवरात्राचे नऊ दिवस माझी आई उपवास करी. आम्हां मुलांनाहि शक्य तितका संयम या दिवसांत पाळायला शिकवण्यांत येई. असे हे पवित्र दिवस भावांना ठार मारून, सतावून का साजरे करणार? संघराज्यांतील मुसलमानांना, राष्ट्रीय मुसलमानांनाहि, उद्यां आपल्यासाठीं काम वाढून ठेवलें आहे याची चिन्ता आहे. सक्तीच्या धर्मान्तराची आपत्ति सहन करून का त्यांनीं येथें हिंदी संघराज्यांत रहायचें? सक्तीच्या धर्मान्तरापेक्षां सचिन्त जगणेंहि परवडलें. हिंदु-शीखांना सक्तीनें मुसलमान करण्यांत येई. मीं त्याचा सक्त निषेध केला होता. बळजबरीनें धर्मान्तर करण्यापेक्षां त्यांनीं मरण पत्करावें असें मी इच्छीन. जें त्यांना मी सांगें तेंच मी मुसलमानांनाहि सांगेन. कपडे बदलावे त्याप्रमाणें धर्म बदलणारे मला नको आहेत. असे लोक कोणत्याहि धर्माचें बळ नाहीं वाढवूं शकत. जे वर तीन विकल्प सांगितले, त्यांतील कोणत्याहि मार्गानें हिंदुधर्माचें रक्षण होणार नाहीं. हिंदी संघराज्यांतील सर्वांनीं भावाभावाप्रमाणें नांदणें हाच एक सन्मान्य मार्ग आहे. या सणांच्या दिवशीं सारें



दा. नं. ३६३४४
स. नं. १११४
३६, भवानी पेठ

शत्रुत्व नि कडवटपणा झुगारून द्या. असें कराल तर दुप्पट आत्मविश्वासानें मी पाकिस्तानांत जाईन. प्रत्येक हिंदु-शीख त्याप्रमाणेंच मुसलमानहि सुरक्षितपणें आणि स्वाभिमानपूर्वक आपापल्या घरीं जोंवर जात नाहीं, तोंवर मला समाधान नाहीं.

## ४२

२३-१०-'४७

## मित्रांच्या घरीं राहणाऱ्या निर्वासितांना

रावळपिंडीहून आलेल्या दोन निर्वासितांनीं लिहून दिलेली एक चिठ्ठी गांधीजींनीं वाचून दाखविली. दिल्ली शहरांतील आपल्या मित्रांकडे ते रहात होते. त्यांनीं सर्वस्व गमावलें होतें. कांबळीं, रजई वगैरे मिळण्याचा कांहीं मार्ग आहे का म्हणून त्यांनीं विचारलें होतें. तें पत्र वाचून दाखविल्यावर गांधीजी म्हणाले:

जे निर्वासितांच्या छावणींत राहतात, ज्यांना खरोखरच कोठें आधार नाहीं, अशांना देण्यासाठींच मोफत कांबळीं आहेत. जे मित्रांकडे राहतात, त्यांना त्या मित्रांनीं आंथरूण पांघरूण देणें त्यांचें कर्तव्य आहे. परंतु महिन्याचीं दोन्ही टोंकें मिळविणेंहि ज्यांना कठिण जातें अशांची हालत मी कल्पूं शकतों. ते त्यांच्याकडे रहायला येणाऱ्यांना पांघरूण देऊं शकणार नाहींत. अशांना मदत करण्याचा कांहीं तरी मार्ग शोधून काढलाच पाहिजे. अडचण अशी येते, कीं जे खरोखरच परित्यक्त नाहींत तेहि मोफत कांबळीं मागतात! जे जे मागतील त्यांना जर मी देऊं लागलों, तर मला ती मागणी कधींच पुरी करतां येणार नाहीं. जे खरोखर गरजू होते त्यांना मीं दिलीं आहेत. इतरहि कांहींना ते मला फसवणार नाहींत अशा आशेनें दिलीं आहेत.

बिर्लामंदिर निराश्रितांनीं भरलें आहे. शक्य तितक्यांची व्यवस्था लावण्यासाठीं बिर्ला-बंधू मेहनत घेत आहेत. गोस्वामीहि निर्वासितांना मदत

देण्याची पराकाष्ठा करीत आहेत. परंतु हा प्रश्न अवाढव्य आहे. समाधानकारक रीतीनें तो सोडवणें कठिण आहे. हिंवाळा तर जवळ येत आहे. घोंगडी नाहीं म्हणून एकहि माणसाला त्रास होऊं नये अशी माझी इच्छा तर आहे. मी अधिक काय सांगूं ?

## आणखी एक गुन्हा

आणखी एका खुनाची बातमी दुःखानें ऐकली. तो एक गरीब मुसलमान होता. चष्म्यांचें त्याचें दुकान होतें. परिस्थिति निवळली असें वाटून तो दुकान उघडायला गेला. दुकान उघडीत असतांनाच त्याचा खून करण्यांत आला. असें कां व्हावें ? पोलीस कोठें आहेत ? लष्कर कोठें आहे ? तें दुकान कांहीं सांदीकोंपऱ्यांत दूर एका बाजूला नव्हतें. कोणी जवळपासचे तें खुनी कृत्य अडवायला कां नाहीं धांवून आले ? पाकिस्तानमध्यें हिंदु-शीखांना ज्या आपत्ती भोगाव्या लागत आहेत त्या मी समजूं शकतों. येथील हिंदु-शीखांच्या मनांत भडका उडाला, तरी त्यांनीं सूडाची, प्रतिकाराची भावना आंवरली पाहिजे. हिंदी संघराज्यांतील निरपराध मुसलमानांवर सूड उगवून स्वतःचा अधःपात नका करून घेऊं. दिल्ली हें हिंदु-शिखांचें जसें घर, तसेंच मुसलमानांचेंहि.

## वर्ध्याची महारोगी-परिषद्

आज सायंकाळीं हिंदुस्थानांतील महारोग्यांच्या प्रश्नासंबंधीं बोलायचें माझ्या मनांत होतें. हिंदुस्थानांत लाखों लोक या रोगामुळें हालअपेष्टा भोगीत आहेत. लोक महारोग आणि महारोगी यांचा तिटकारा करतात. जे शरीरानें महारोगी आहेत, अशांच्यापेक्षां जे मनांत अपवित्र विचार राखतात, ते अधिक महारोगी आहेत असें मी मानतों. इतर रोग तसाच हाहि. याच्याविषयीं विशेष घृणा कां वाटावी ?

महारोग्यांची सेवा भूतकाळांत बहुतेक ख्रिश्चन पाद्रीच करीत असत. अलीकडे थोडे दयाळू हिंदी लोक या सेवेसाठीं पुढें येत आहेत. फार थोडे आहेत ते. अशी एक संस्था कलकत्त्यास मीं पाहिली होती. दुसरे एक असेच थोर दयामय सेवक श्री. मनोहर दिवाण हे आहेत. ते श्री. विनोबाजींचे

शिष्य. विनोबांनींच त्यांना या सेवेला प्रवृत्त केलें. मी मनोहरजींना खरा महात्मा म्हणेन. ते कांहीं डॉक्टर नाहींत. परंतु त्यांनीं या विषयाचा अभ्यास केला आहे. या सेवेंत त्यांनीं सारा आत्मा ओतला आहे. वर्ध्याजवळ यामुळें महारोग्यांची एक वसाहत उभी राहिली आहे. मध्यप्रान्तांत महारोगी सेवामंडळ स्थापन झालें आहे. तें या कामाला मार्गदर्शन करीत आहे, या कामाची नीट घडी बसवीत आहे. या महिन्याच्या ३० तारखेला वर्ध्याला महारोगी परिषद् भरणार आहे. श्री. जगदीश यांना ही कल्पना प्रथम सुचली. जगदीश हे स्वर्गीय श्रीनिवास शास्त्री यांचे भक्त नि शिष्य. त्यांना स्वतःलाहि या रोगामुळें वेदना भोगावी लागली होती. परिषदेची कल्पना त्यांनीं कस्तुरबानिधि-विश्वस्तमंडळाच्या वैद्यकीय-शाखेसमोर मांडली. आणि त्याचा परिणाम म्हणून ही परिषद् भरत आहे. डॉ. सुशीला नायर या कामासाठीं वर्ध्याला जात आहेत. राजकुमारी अमृत कौर, डॉ. जीवराज महेता यांनींहि जायला हवें होतें; परंतु राष्ट्रीय कामांत गुंतल्यामुळें त्यांना सध्यां दिल्ली सोडतां येत नाहीं. मी हें कां सांगतों आहें? तुमचें लक्ष महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधावें म्हणून. तुम्ही आपली सर्व उत्साहशक्ति राष्ट्राच्या उभारणीच्या कामांत वापरणार कीं भावाभावांच्या हत्या करण्यांत? अत्यन्त वाईट कोणता महारोग असेल, तर जातीय द्वेष हा होय. मरणान्तिक अशा या रोगापासून बचावायचें असेल, तर जातीयतेचा अत्यन्त तिटकारा करायला शिका. नको हें पाप असें तुम्हांला वाटलें पाहिजे. मी अशी आशा तर करतों.

## ४३

२४-१०-'४७

## एकच एक ध्यास

प्रार्थनेनंतर गांधीजी म्हणाले : ''वर्तमानपत्रांत थोड्या दिवसांपूर्वीं वाचलें कीं १७ तारखेला दिल्लीस भरणाऱ्या आशियाई कामगार परिषदेचें मीं उद्घाटन करणार म्हणून. वृत्तपत्रांना ही बातमी कोणी दिली मला माहीत

नाहीं. मला यांतील कांहींहि माहीत नाहीं. मीं या बातमीचा इन्कार करायला एका वार्ताहरास सांगितलें, परंतु अद्याप वृत्तपत्रांत तसें आलें नाहीं. मला सांगायचें आहे, कीं माझी सारी शक्ति एका आणीबाणीच्या प्रश्नावर मीं केन्द्रित केली आहे. दुसऱ्या कशांतहि मी सध्यां मन घालूं शकत नाहीं. हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन सारे हिंदुस्थानचे. भारतमातेचीं सारीं लेंकरें. सर्वांना नागरिकत्वाचे समान हक्क. माझ्या अगदीं लहानपणापासून हें ध्येय माझ्या डोळ्यांसमोर आहे. परंतु आज स्वातंत्र्य आलें आणि हें ध्येय दूर चाललें ! आतां तुम्हीं भजन ऐकलेंत. कोणी वंदो किंवा निंदो; 'सारें ईश्वरार्पण करायचें असल्यामुळें चिंता करू नये', असें त्यांत होतें ना ? हेंच करण्याचा माझा प्रयत्न असतो. कोणाला आवडो नावडो. मला जें सत्य म्हणून वाटतें, तें मी सारखें सांगतच राहीन."

## तुमची श्रद्धा तेजस्वी राखा

कालचे कुबेर आज कंगाल झाले आहेत. त्यांना ना घर, ना निवारा, ना अन्न-वस्त्र. प्रभु लौकरच त्यांचीं हीं दुःखें दूर करील. तुम्ही श्रद्धा ज्वलंत ठेवा, सत्पथाला चिकटून रहा म्हणजे झालें.

## महारोग्यांचा प्रश्न

मी काल महारोग्यांसंबंधीं बोललों. श्री. जगदीश त्यांच्यासाठीं खूप करीत आहे. कारण स्वतः ह्या रोगाची वेदना त्यानें अनुभवलेली आहे. जगदीश नेहमीं मद्रासला राहतात. महारोगी-परिषदेच्या तयारीला मदत म्हणून दोन आठवड्यांपासून ते वर्ध्याला आले आहेत. त्यांनीं कांहीं वस्तू व पत्रव्यवहार पाठवला आहे. आज सकाळीं मीं तो वाचला. श्री. जगदीश म्हणतात, 'या रोगानें पछाडलेल्यांना महारोगी असें नये म्हटलें जाऊं. त्या शब्दाला एक-प्रकारचा डाग लागलेला आहे. महारोगानें पीडलेले असें म्हणावें.' खरूज, पटकी, प्लेग, साथेसें पडसें, हे सारे स्पर्शजन्य रोग आहेत. महारोग यांच्या-पेक्षां जरा कमीच स्पर्शजन्य आहे. इतर स्पर्शजन्य रोगांविषयीं इतकी घृणा वाटत नाहीं, मग याच रोगाविषयीं कां वाटावी ? मीं तर काल सांगितलें, कीं खरा महारोग मलिन मन असणें होय. इतर मानवांना तुच्छ मानणें,

एकाद्या जातिजमातीला धिक्कारणें, म्हणजे विकृत मनाचें लक्षण होय. शारीरिक महारोगापेक्षां हा मानसिक महारोग मला अधिक भयंकर वाटतो. असे विकृत मनाचे लोक म्हणजे समाजांतील खरे महारोगी. कोणत्याहि नांवानें संबोधा. नांवांत काय ? गुलाबाला दुसरें नांव दिलेत, तरी त्याचा सुगंध का जाणार आहे ?

राजकुमारी अमृत कौर, डॉ. जीवराज यांना वर्ध्यास परिषदेसाठीं जातां येणार नाहीं म्हणून म्हटलें. त्यांना दिल्लींत महत्त्वाचें काम आहे. परंतु जीवराजांना परिषदेस हजर राहणें शक्य होईल असें ऐकून आनंद झाला.

उद्यांची प्रार्थना तुरुंगांत व्हावयाची आहे. म्हणून शनिवारीं तुमच्याशीं येथें सहयोग नाहीं.

## ४४

२४-१०-'४७

## दिल्लीचे कैदी

आज सायंकाळीं दिल्लीच्या मध्यवर्ति तुरुंगांत प्रार्थना होती. जवळजवळ तीन हजारकैद्यांसमक्ष प्रार्थना झाली. गांधीजी म्हणाले, "कैद्यांमध्यें प्रार्थनेला या असें मला आमंत्रण आलें. मीं खुषीनें स्वीकारिलें. मीहि अनुभविक पक्का कैदी आहें. दक्षिण आफ्रिकेंत आणि हिंदुस्थानांत मी अनेकदां तुरुंगांत होतों. द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांना त्या वेळेस कुली असें म्हणत. नीग्रो आणि युरोपियनहि तेथें होते. तुरुंगांत या तिघांना अलग अलग ठेवण्यांत येई. सत्याग्रही कैद्यांची गर्दी झाल्यावर नीग्रोंना नि हिंदींना एकत्र ठेवूं लागले. तुरुंगाचे कायदे फार कडक होते. राजकीय कैदी, सामान्य कैदी असा भेद नव्हता. सारे गुन्हेगार. आणि एका अर्थी बरोबरच. कारण ज्यांनीं कायदा मोडला ते कायद्याच्या दृष्टीनें गुन्हेगारच झाले.

## कैद्यांचे वर्ग पाडणें अनिष्ट

हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याचा लढा प्रचंड होता. मोठमोठ्यांनीं, परमोच्च श्रेणीच्या माणसांनींहि त्यांत भाग घेतला. परिणाम असा झाला कीं केवळ

राजकीय व राजकीयेतर एवढा भेद करूनच गाडें नाहीं थांबलें. तर राजकीय कैद्यांतहि पुन्हां अ, ब, क असे वर्ग पाडण्यांत आले. अशा वर्गवारीवर माझा विश्वास नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे सारेच लोक लहानमोठे गुन्हे करीत असतात. जे सांपडतात, त्यांना तुरुंगांत पाठवतात. बाकीचे हुशारीनें निसटतात. एका हिंदी तुरुंगाच्या मुख्य तुरुंगाधिकाऱ्यानें एकदां मला सांगितलें "हाताखालच्या कैद्यांपेक्षांहि मी अधिक गुन्हेगार आहें असें कधीं कधीं मला वाटतें." परंतु तो जो वर सर्वांहून मोठा जेलर बसलेला आहे, त्याला कोण फसवूं शकेल?

तुरुंग म्हणजे मन-दुरुस्तीचे दवाखाने. स्वतंत्र हिंदुस्थानांतील तुरुंग कसे असावेत? कितीतरी दिवसांपासून मला वाटत आहे, कीं सारे कैदी म्हणजे एक प्रकारचे रोगी मानले जावेत. रोग्यांची आपण शुश्रूषा करतों, उपाय करतों, तसेंच यांच्या बाबतींत व्हावें. गंमत म्हणून कोणी गुन्हा करीत नाहीं. विकृत मनाचें तें लक्षण असतें. विशिष्ट रोगांचीं कारणें शोधून तीं दूर करायचीं असतात. तुरुंग हे दवाखाने झाले म्हणजे त्यासाठीं प्रचंड हवेल्या पाहिजेत असें नाहीं. कोणत्याहि देशाला तें परवडणार नाहीं. गरीब हिंदुस्थानला तर नाहींच नाहीं. तुरुंगावरचे जे अधिकारी असतात, त्यांच्या हातांखालीं जे असतात, त्या सर्वांची दृष्टि, दवाखान्यांतील डॉक्टरांची दायांची दृष्टि असते तशी व्हावी. अधिकारी आपले मित्र आहेत असें कैद्यांना वाटलें पाहिजे. त्यांचें मानसिक आरोग्य तुम्हांला त्यांना परत द्यायचें आहे. कोणत्याहि रीतीनें त्यांचा छळ नाहीं होतां कामा. आतां लोकांचें सरकार आहे. सरकारनें योग्य ते हुकूम दिले पाहिजेत. परंतु दरम्यान तुरुंगाधिकाऱ्यांना आपल्या कारभारांत भूतदया नि मानवता कितीतरी आणतां येईल. आणि कैद्यांचें कर्तव्य काय?

## कैद्यांचें कर्तव्य

मी एक माजी कैदीच आहें. त्या नात्यानें माझें तुम्हांला सांगणें आहे कीं आदर्श कैदी बना. तुरुंगाची शिस्त पाळा. जें काम सोपवलेलें असेल तें मनःपूर्वक करा. तुमची रसोयी तुम्हांलाच करावी लागते. तांदूळ, डाळ नीट निवडा. त्यांत दगड, गार किंवा आळ्या नाहींत ना पहा. ज्या तुमच्या तक्रारी असतील त्या नीट शांतपणें अधिकाऱ्यांसमोर मांडा. जेलमधील लहानशा

जगांत असें वागा, कीं बाहेरच्या मोठ्या जगांत गेल्यावर उत्तम नागरिक म्हणून राहतां येईल.

- तुमच्यांत हिंदू, शीख, मुसलमान आहेत. जातीयतेचें विष तुमच्यांत न येवो. मित्रांप्रमाणें, भावांप्रमाणें रहा. म्हणजे सुटून बाहेर याल तेव्हां बाहेरच्या मूर्खपणाला आळा घालूं शकाल. मुस्लीम कैद्यांना मी ईद मुबारक इच्छितों. येथें जे मुसलमानेतर आहेत तेहि आज आपल्या मुस्लिम बांधवांना ईद मुबारक इच्छितील अशी मला आशा आहे.

## ४५

२६-१०-'४७

## दसऱ्याची शिकवण

श्रोत्यांपैकीं एकानें गांधीजींना एक पत्र दिलें. त्यांत लिहिलें होतें, "तुमचे अनुयायी प्रतिवर्षी राम रावणाची मूर्ति जाळीत आहे असें दाखवतात. दसऱ्याच्या दिवशीं हे जे प्रकार केले जातात, त्यांनीं सूडबुद्धीच नाहीं का शिकविली जात? सूडबुद्धि नको, बदला घेऊं नका, असें म्हणण्यांत काय अर्थ?" गांधीजींनीं या पत्राचा उल्लेख करून प्रवचनाला प्रारंभ केला. ते म्हणाले, "माझे अनुयायी कोण तें मला माहीत नाहीं. मी एक मात्र माझा अनुयायी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे राम रावणाची प्रतिमा जाळीत आहे असें जें दाखविण्यांत येतें त्यांतील भावार्थ पत्रलेखक लिहितो तसा नाहीं. निराळा आहे. त्याचा अर्थ हा कीं तुम्ही व्यक्तिशः कोणी शासन करण्याच्या भानगडींत नका पडूं. प्रभु पाहून घेईल. राम म्हणजे परमात्मा. त्याचें तें काम आहे. मानवांचीं हृदयें तोच एक अचूक ओळखणारा तो अन्तर्यामी. रावण कोण हें त्यालाच कळणार. प्रत्येकजण रामाचा अधिकार घेऊं लागला तर रावण कोण? अपूर्ण मानवाला दुसऱ्या अपूर्ण मानवाचा न्यायनिवाडा करण्याचा काय अधिकार? मुसलमानांवर हिंदूंनीं हात टाकणें किंवा हिंदूंवर मुसलमानांनीं, हें नामर्दपणाचें व अधार्मिक कृत्य होय. अशानें हिंदुधर्म, इस्लामधर्म, दोघांचा नाश होईल. सनातनी हिंदु

या नात्यानें मी केवळ हिंदूंचाच नव्हे, तर मुसलमान आणि इतर धर्मीयांचाहि मी प्रतिनिधि आहें. मला त्यांत मोठा आनंद वाटतो.

## काश्मिरांतील घटना

काश्मीरांत घडत आहे तें आहे का माहीत, असें कोणी मला विचारतील. वृत्तपत्रांतील बातम्या जेवढें देतात, तेवढ्याशीं मी परिचित आहें. जर या बातम्या खऱ्या असतील तर जें घडत आहे तें निःसंशय वाईट आहे. पाकिस्तान-सरकार काश्मीरनें पाकिस्तानला मिळावें म्हणून सक्ती करीत आहे असा त्यावर आरोप आहे. या किंवा त्या वसाहतीला मिळण्याबाबत कोणावरहि कोणी सक्ती करूं शकत नाहीं. काश्मीर असो, हैदराबाद असो वा जुनागड असो. प्रश्न सोडवायचा कसा? मी सर्व राजामहाराजांना नम्रपणें सांगतों कीं ते संस्थानांचे खरे राज्यकर्ते नव्हत. आजचे राजेराजवाडे म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीची निर्मिति. ब्रिटिश सत्ता येथून निघून गेली. आतां प्रजाच अधिकारी, प्रजेची इच्छाच सार्वभौम. राजामहाराजांना विश्वस्त म्हणून राहतां येईल. आंतून वा बाहेरून कोणाचीहि सक्ती न होतां काश्मीरच्या जनतेनें कोणाला मिळायचें तें ठरवावें. हाच नियम सर्वत्र लावला जावा.

## कलकत्त्यांत शान्ति आहे

दसरा आणि ईद कलकत्त्यांत शांतपणें पार पडल्याची तार आली आहे. तेथें शान्तिसेना उभारण्यांत आली आहे. त्या वेळेस मी तेथें होतोंच. शान्तिसेना खूप काम करीत आहे असें तारेंत होतें. त्यांनीं आपले कांहीं सभासद पूर्व बंगालमध्येंहि पाठविले आहेत. तिकडेहि दोन्ही सण शांतपणें पार पडले असें दिसतें. कलकत्त्याचें उदाहरण दिल्लींत व अन्यत्र कां गिरवलें जाऊं नये? आज दिवसा कांहीं मुसलमान भेटायला आले होते. मी सर्वांचा मित्र असल्यामुळें सारे माझ्याकडे येतात. मी मुस्लिम मित्रांना ईद मुबारक तर इच्छितों; परंतु सर्वत्र अविश्वासाचें वातावरण पाहून हृदय जड होतें.

## शाबास रतलाम !

रतलामच्या हरिजनसेवासंघाच्या चिटणिसांची तार आली आहे. तेथील महाराजांनीं अत:पर जबाबदार राज्यपद्धति अस्तित्वांत येईल, मी केवळ विश्वस्त बनेन, हरिजनांना संस्थानांतील सारीं मंदिरें मोकळीं आहेत, अशी घोषणा केली आहे. हरिजन व सवर्ण हिंदू संस्थानच्या मुख्य मंदिरांत महाराजांसह गेले. हिंदुधर्माला जगायचें असेल, तर प्रत्येक हिंदुहृदयांतून संपूर्णतः अस्पृश्यता दूर व्हायला हवी. अस्पृश्यतेच्या काळपुळीशींच जातीयतेचा प्रश्नहि निगडित आहे. ईश्वरासमोर सारे मानव समान आहेत. एकादा मनुष्य दुसऱ्या धर्माचा आहे म्हणून त्याला तुच्छ मानणें हा मानवाविरुद्ध व ईश्वराविरुद्ध गुन्हा आहे. तें पाप आहे. अस्पृश्यतेचाच तोहि एक प्रकार.

## ४६

२७-१०-'४७

## सोडून जाण्याची सक्ती

गांधीजी म्हणाले : " हिंदी संघराज्यांतील आपलीं पिढीजात घरें सोडून मुसलमानांनीं पाकिस्तानांत चालतें व्हावें, अशी सक्ती केल्याच्या तक्रारी माझ्याकडे कितीतरी येत आहेत. अनेक मार्गांनीं त्यांना घरें सोडणें भाग पाडलें जात आहे. ते छावणींत येऊन रहात आहेत, पायीं वा गाडीनें पाकिस्तानांत पाठवले जाण्याची वाट पहात आहेत. मंत्रिमंडळाचें असें धोरण नाहीं याची मला खात्री आहे. मीं जेव्हां या तक्रारी मंत्र्यांच्या कानीं घालतों तेव्हां ते हंसतात व म्हणतात एक तर तुमची बातमी चूक असेल किंवा हाताखालचे लोक आमच्या धोरणाप्रमाणें वागत नसतील. परंतु माझी बातमी खरी आहे. मग का निरनिराळीं हाताखालचीं खातीं द्रोही बनलीं आहेत ? आशा राखतों कीं तीं तशीं नसतील. परंतु तक्रार तर सर्वत्र आहे. सरकारी नोकर असें कां वागतात. याचीं अनेक कारणें सांगण्यांत येतात. लष्कर व पोलीस यांची जातीय दृष्टीनें विभागणी करण्यांत आली आहे. सर्वत्र जो

पूर्वग्रह पसरला आहे, त्याचा त्यांच्यावरहि पगडा बसला आहे. कायदा नि सुव्यवस्था ज्यांच्यावर विसंबून, तेच जर जात्यन्ध झाले तर व्यवस्थित सरकारला अव्यवस्थेला जागा करून द्यावी लागेल. आणि अव्यवस्था सुरू होणें म्हणजे समाजाचा नाश. पोलीस, लष्कर यांतील वरच्या अधिकाऱ्यांनीं जाति-धर्मभेदातीत दृष्टि घेऊन ती दृष्टि खालपर्यंत नेऊन पोंचवली पाहिजे.

## नैतिक शक्ति विरुद्ध भौतिक शक्ति

असें सुचवण्यांत येतें कीं जुन्या नोकरशाहीच्या काळांत हातांखालच्या लोकांकडून जसें दमांत काम करून घेतां येत असे, तसें लोकराज्यांत शक्य होत नसतें. या म्हणण्यांत थोडें सत्य आहे; परंतु थोडेंच. कारण परदेशी सरकारला रुबाब दाखविण्यासाठीं भौतिक शक्तीचा आश्रय घ्यावा लागे. लोकसरकारला तर त्या शक्तीहून अनंतपटींनीं थोर अशी नैतिक शक्ति आहे. या नैतिक शक्तींत जनतेचा देशी राज्यसत्तेला पाठिंबा आहे, ही राजकीय दृढताहि अन्तर्भूत आहे. लोकांचा पाठिंबा आज कमीहि असेल. मध्यवर्ति सरकारनें राजीनामा देऊनच तें अजमावलें पाहिजे. मध्यवर्ति सत्तेची खरी स्थिति तरी आज काय आहे त्याचा आपण विचार करीत आहोंत. मध्यवर्ति सत्तेनें दुबळें असून चालणार नाहीं; महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिला असें वाटतां कामा नये. स्वतःच्या सामर्थ्याची तिला जाणीव हवी. खालचीं खातीं निष्ठेनें काम करीत नाहींत अशी थोडीहि शंका येतांच त्यांना दूर केलें पाहिजे किंवा त्या मंत्र्यानें राजीनामा देऊन तो अव्यवस्थितपणा जो यशस्वी रीतीनें नाहींसा करूं शकेल त्याला जागा करून दिली पाहिजे. माझ्याकडे तक्रारी तर सारख्या येत आहेत. त्या निराधार असाव्यात अशा आशेला मी चिकटून तर आहें. परंतु मन साशंक आहे. जर अशा तक्रारी असतील, तर ज्या मानानें त्या साधार असतील त्या मानानें त्यांचें निराकरण वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं नीट केलें पाहिजे.

## नागरिकांचें कर्तव्य

हिंदी संघराज्यांतील ज्यांचा या परिस्थितीशीं संबंध येतो, त्या नागरिकांचें कर्तव्य काय ? नागरिकाला त्याचें घर सोडायला भाग पाडणारा कायदा नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. तसें करण्यासाठीं अधिकाऱ्यांना खास हुकूम

काढण्याची सत्ता द्यावी लागेल. असे हुकूम काढण्यात आले आहेत असें म्हणतात. परंतु लेखी हुकूम कोणाला दिले गेले आहेत असें मला तरी माहीत नाहीं. अशा शाब्दिक हुकुमांत हजारोंचा प्रश्न आज गुंतला आहे. गणवेश घातलेल्यानें यावें, घर सोड हुकूम द्यावा. परंतु अशा दमदाटीनें जे घाबरतील त्यांना कोण काय करणार? लेखी हुकूम द्या असें त्या अधिकाऱ्याला सांगावें. म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेहि समाधानकारक दाद न लागली तर शहानिशा न्यायमंदिरांत तरी करून घेतां येईल. माझें सर्वांना सांगणें आहे, निक्षून सांगणें आहे, कीं लेखी हुकूम मागा.

बहुसंख्य जमातीचें ( द्वेषग्रस्त शब्द ) या बाबतींतील कर्तव्य स्पष्ट आहे. त्यांनीं कायदा बिलकुल आपल्या हातांत घेतां कामा नये. जर ते असें न करतील, तर ज्या फांदीवर बसावें तिलाच तोडावें त्याप्रमाणें तें होईल. ज्यांतून पुन्हां वर उठतां येणार नाहीं अशा खड्ड्यांत ते पडतील. अजून वेळ गेली नाहीं तोंच शहाणपण येवो, सुविचार सुचो. हिडीस गोष्टी कानांवर येत असतात. समजा त्या खऱ्याहि आहेत. तरीहि विचलित होतां कामा नये. न्यायासाठीं प्रतिनिधीभूत अशा मंत्र्यांवरच त्यांनीं विश्वास ठेवला पाहिजे.

## ४७

२८-१०-'४७

## सचोटीचा व्यवहार

प्रार्थनोत्तर प्रवचनांत गांधीजी म्हणाले : एक पत्र आलें आहे. पत्रलेखक श्रोत्यांपैकींच आहे. एका मुसलमान तंबुविक्यापासून त्यांनीं कांहीं पडदे व तंबू खरेदी केले होते. परंतु दुकानदार तर पाकिस्तानांत गेला. मालकाच्या गैर-हजेरींत या भाड्यानें आणलेल्या वस्तू कोणाला द्याव्या असा त्यांना प्रश्न पडला आहे. त्यांनीं सरदारांना किंवा श्री. नियोगी यांना या बाबतींत विचारावें.

### अलीगडचे विद्यार्थी

अलीगडचा एक कॉलेज-विद्यार्थी भेटायला आला होता. पाकिस्तानांतील

तील कित्येक विद्यार्थी परत आले नाहींत असें तो म्हणाला. जे राहिले आहेत त्यांनीं शान्तपणें जातीय सुसंवाद निर्माण करण्याचा निश्चय केला आहे असेंहि त्यानें सांगितलें. तो म्हणाला, " हिंदु-शीख निर्वासितांच्या छावण्यांतून कांबळीं वांटणें हें काम उत्कृष्ट नाहीं का होणार ? " मीं त्याला म्हटलें, " इच्छा तर चांगली आहे. परंतु सध्यां या गोष्टीची आवश्यकता राहिली नाहीं. आणि त्याचा उपयोगहि फारसा होणार नाहीं. तुम्ही पाकिस्तानांत जा व हिंदु-शीखांना घरें-दारें सोडून कां जावें लागलें तें विचारा. तुम्ही त्या त्या संबद्ध निर्वासितांकडे जाऊन त्यांचें परत जाण्याविषयीं मन वळवा. हिंदु-शीखांनीं मुसलमान निर्वासितांचें मन वळवावें. कारणाशिवाय कां कोणी घरदार सोडून जातो ? असें होईपर्यंत, ते ते निर्वासित पुनरपि आपल्या घरीं-दारीं जाईपर्यंत दोघांत शान्ति नांदणें अशक्य आहे.

## तिकिटाशिवाय जाण्याची घातुक प्रथा

अलीकडे तिकिटाशिवाय जाणें जणूं रूढीच होत आहे. फार वाईट आहे ही गोष्ट. लोकांची अशी समजूत झालेली दिसते, कीं स्वराज्यांत रेल्वेंतून वा बसमधून मोफत जातां येतें. सरकारचें आठ कोटींचें नुकसान झालें आहे. हें नुकसान कोणी सोसायचें ? आणि लाखों निर्वासितांना इकडे अन्न-वस्त्र द्यावें लागत आहे. हीं प्रचंड ओझीं झेपण्यासारखी हिंदुस्थानची शक्ति नाहीं. हा देश गरीब आहे. अशा गोष्टी चालू राहिल्या तर देशाचा सत्यानाश होईल. रेल्वेंतून कोट्यवधि आवक होत असली तरी खर्चहि कोट्यवधि होत असतो. हे बिनतिकिट प्रकार लौकर बंद न झाले तर समोर स्पष्ट विनाश आहे. पाकिस्तानमध्येंहि हीच हालत असल्याचें समजतें.

रेल्वेंतील स्वच्छतेकडेहि आपण लक्ष दिलें पाहिजे. डब्यांतच थुंकणें कां बरें ? कोणी विशेष कारण नसतांना सांखळी ओढून रेल्वेच्या नियमांचा उपमर्द करतात. चांगलें नाहीं असें करणें.

मी जर रेल्वे-कारभाराचा मुख्य असतों तर तिकिटें जोंवर घेत नाहींत

किंवा त्यांचे पैसे देत नाहींत, तोंवर गाडी चालूच केली नसती. 'गाड्या बंद करा' मीं हुकूम सोडला असतां.

## ४८

२९-१०-'४७

## दिलीप कुमार रॉय

आज प्रार्थनेंत ज्यांनीं भजन म्हटलें ते श्री. दिलीप कुमार रॉय. मला गायनकलेंत कांहीं समजत नाहीं. परंतु कैदी असतांना ससून हॉस्पिटलमध्यें पुण्यास माझ्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली होती, त्या वेळेस दिलीप कुमारांचें गाणें मीं प्रथम ऐकलें. त्या वेळेच्या आवाजापेक्षां आजचा त्यांचा आवाज अधिक गोड व भरदार वाटला. असा गोड आवाज फारच थोड्यांचा या जगांत असेल. दिलीप कुमार ऋषि अरविंदांच्या पॉंदिचरीच्या आश्रमांत असतात. त्या आश्रमांत धर्मभेद-जातिभेद यांना स्थान नाहीं, लक्षांत ठेवा. एकदां मरहूम सर अकबर हैदरी हेहि यात्रेकरू बनून पॉंदिचरीचा आश्रम पहायला गेले होते. स्वाभाविकपणेंच श्री. रॉय हे जुन्या वृक्षाचीच ढलपी आहेत. त्यांच्याजवळ पूर्वग्रह नाहींत. ते माझ्याकडे आज आधींहि येऊन गेले होते व दोन गीतें त्यांनीं म्हणून दाखविलीं. 'वंदे मातरम्' आणि इक्बालांचें 'सारे जहांसे अच्छा' हीं तीं दोन गाणीं. आतां त्यांनीं जें प्रार्थनागीत म्हटलें त्यांत काय होतें माहीत आहे? त्यांत म्हटलें आहे, कीं श्रीमंतांची धनदौलत पैशाअडक्यांत, माड्यामहालांत, गाड्याघोड्यांत असते; परंतु भक्त म्हणतो, माझें सर्वस्व त्या मुरारीच्या ठिकाणीं आहे, प्रभूच्या ठायीं आहे; त्या रामाच्या, हरीच्या ठायीं आहे. तुम्ही जर ही शिकवण हृदयाशीं धराल, तर सारे पूर्वग्रह गळून जातील.

### काश्मीरी वेदना

काश्मीरचा उल्लेख करून गांधीजी म्हणाले: काश्मीरचे महाराज संकटांत होते. हिंदी संघराज्यांत सामील होण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. गव्हर्नर जनरल त्यांना दूर कसे लोटणार? म्हणून ते व त्यांचें मंत्रिमंडळ यांनीं

काश्मीरला विमानमार्गें कुमक पाठवली. परंतु त्यांनीं महाराजांना साफसाफ सांगितलें होतें, कीं हिंदी संघराज्यांत तुमचें सामील होणें हें तात्पुरतें आहे. पुढें धर्मांतीत असें सर्व जनतेचें मत घेऊनच काय तें ठरेल. महाराजांनीं शेख अब्दुल्लांना मुख्य मंत्रि नेमलें ही फार चांगली गोष्ट केली. आणि केवळ नामधारी मंत्रि नाहीं नेमिलें, तर त्या स्थानाच्या सर्व सत्तेसह. शेखसाहेबांनींहि मोठ्या मनानें हें बोलावणें स्वीकारल्याचें वाचून मला संतोष वाटला. काश्मीरमध्यें चाललें आहे तरी काय, तुम्ही विचारल. आफ्रिडी वगैरे लोकांचें बंडखोर सैन्य श्रीनगरवर चालून येत होतें. या सैन्याला सेनापति होते, लायक अंमलदार होते. असें हें सैन्य वाटेंतील गांवांची जाळपोळ, लुटालूट करीत येऊं लागलें. विद्युत्–शक्ति–केन्द्रहि त्यांनीं भस्म केलें. श्रीनगरमध्यें अंधार झाला. पाकिस्तान सरकारच्या प्रोत्साहनाविना हें आक्रमण होणें अशक्य आहे. एकंदर प्रकरणाबाबत सारा पुरावा अजून माझ्याजवळ नाहीं. त्याची आवश्यकताहि मला नाहीं. हिंदी सरकारनें सैन्य पाठवलें तें रास्त होतें, एवढेंच मला सांगायचें आहे. श्रीनगरला जें थोडें सैन्य पाठवलें, तें पाठवणें बरोबर होतें. त्यामुळें काश्मीरी जनतेला आत्मविश्वास येईल. शेखसाहेबांना, ज्यांना प्रेमानें शेरे काश्मीर–काश्मीरचा सिंह— म्हणून संबोधिण्यांत येते, त्यांना धीर येईल. परिणाम अखेर प्रभूच्या हातीं. करूं वा मरूं एवढेंच माणसाच्या हातीं. हिंदी संघराज्यानें पाठवलेलें छोटेंसें लष्कर स्पार्टन वीरांप्रमाणें काश्मीरच्या बचावांत सारें गारद झालें तरी मी एकहि अश्रु ढाळणार नाहीं. शेखसाहेब आणि त्यांचे हिंदू, शीख, मुस्लिम सहकारी काश्मीरच्या रक्षणांत आपापल्या जागीं काम करतांना कामीं आले, तरी मी डोळ्यांत पाणी आणणार नाहीं. इतर हिंदुस्थानला तें भव्य-दिव्य उदाहरण होईल. असा शौर्यधैर्यशाली बचाव साऱ्या राष्ट्रास प्रेरणा देईल. हिंदु, मुस्लिम, शीख परस्पर शत्रु होते ही गोष्टहि पुसली जाईल. मग आपल्या लक्षांत येईल, कीं सारेच मुसलमान, हिंदु, शीख कांहीं राक्षस नाहींत. सर्व धर्मांत सर्व जातींत भलीं माणसें असतात. बंडखोर सैन्याचाहि कदाचित् हृदयपालट होईल. भजनांतील पालुपद ध्यानांत ठेवा. " ईश्वराला कोणत्याहि नांवानें भजा. त्या एकाचेच आपण सारे, त्या एकापासूनच सारे आलों. "



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

३०-१०-'४७

## अहिंसेची रीत

कुराणांतील प्रार्थना म्हणायला कोणाची हरकत आहे का, असें नित्याप्रमाणें विचारलें गेलें. एकानें उठून विरोधाचा हट्ट दाखविला. विरोध असेल तर सार्वजनिक प्रार्थना होणार नाहीं, प्रार्थनोत्तर भाषण होणार नाहीं, असें गांधीजींनीं कधींचें सांगून ठेवलें होतें. म्हणून गांधीजींनीं निरोप पाठवला, कीं आज सार्वजनिक प्रार्थना नाहीं, भाषणहि नाहीं. परंतु गांधीजींच्या दर्शनावांचून श्रोते जात ना. अखेर गांधीजी व्यासपीठावर आले व त्यांनीं दोन शब्द सांगितले. ते म्हणाले, "प्रार्थनेला कोणी विरोध करणें बरें नाहीं. विशेषतः अशा खाजगी जागेंत येऊन विरोध करणें शोभत नाहीं. परंतु 'एकानेंहि अक्षेप घेतला, तरी तो मान' असें माझी अहिंसा सांगते. बाकी सारे अनुकूल असले तरी एकाचा आहे ना विरोध ? जाऊं दे, नको. परंतु समजा अधिकांश लोकांचा विरोध असता तर ? तर मीं सारा त्रास सहन करून प्रार्थना म्हटली असती, तें माझें कर्तव्य ठरलें असतें; परंतु एकाच्या आक्षेपासाठीं, विरोधासाठीं सर्वांची निराशा व्हावी हें तरी बरें का ? असाहि प्रश्न उभा राहतो. उपाय सोपा आहे. जर बाकीचे सारे शान्त राहतील, त्या एका विरोधकाबद्दल कोणी मनांत क्रोध धरला नाहीं, त्याच्याविषयीं वाईट चिन्तिलें नाहीं, तर प्रार्थना करणें माझा धर्म ठरेल. कारण बहुसंख्य लोक शान्तदान्त राहिले, तर तो विरोधकहि कदाचित् शान्त राहण्याचा संभव. अहिंसेचा असा मार्ग आहे. सत्य आणि अहिंसा म्हणजे कांहीं तज्ज्ञांची मिरास नव्हे. सदाचाराचे सारे सनातन नियम म्हणजे ईश्वरी आदेश. हे नियम सोपे असतात, सर्वांना समजतात; इच्छा असेल तर तदनुरूप वागतांहि येते. परंतु आपली बुद्धि जड बनते. एक प्रकारचें आलस्य, मांद्य येतें. त्यामुळें त्या नियमानुसार वागणें कठिण वाटतें. मनुष्य विकासशील आहे. सृष्टींत स्थाणुवत् कांहींएक नाहीं. एक परमात्माच स्थिर आहे; तो होता, आहे, असेल; सदैव एकरूपच. परंतु स्थिर असूनहि प्रभु सदैव गतिमान् आहे.

परंतु ईश्वराच्या गुणधर्मांची आपणांस चिंता नको. आपणांस अनुभव येऊं दे कीं आपण सदैव प्रगत होत आहोंत. म्हणून मी मानतों कीं मानवाला जगायचें असेल, तर सत्य-अहिंसेच्या कक्षेंत त्यानें अधिकाधिक आलें पाहिजे. सत्य नि अहिंसा हीं दोन मूलभूत आचारतत्त्वें. त्यांना धरून मीं व तुम्हीं सर्वांनीं वागलें पाहिजे, जगलें पाहिजे.

## ५०

३१–१०–'४७

## आदर्श वर्तन

प्रार्थनेच्या वेळेस दोघांनीं फिरून आज विरोध केला. एक आदल्या दिवशींचाच होता. विरोध करतांना दोघे संयमी होते. एक-दोघांचा विरोध आहे. मीं प्रार्थना करावी कीं न करावी? एक-दोघांसाठीं सर्वांची निराशा करणें बरें का, असा गांधीजींनीं श्रोत्यांना प्रश्न विचारला. ते म्हणाले, "कुराणांतील उतारा म्हणायला ज्यांचा विरोध असेल त्यांनीं प्रार्थनेस न येणें हा नाहीं का शिष्टसंमत मार्ग? श्रोतेच मार्ग काढूं शकतील. मीं काल सांगितल्याप्रमाणें सारे शान्त राहणार असाल, विरोधकांचें वाईट करणार नसाल, तर प्रार्थना करतां येईल. पोलिसांनीं विरोधकांच्या बाबतींत कांहीं करूं नये." सारे लोक एका आवाजानें म्हणाले, "आम्ही विरोधकांना त्रास देणार नाहीं." प्रार्थना सुरू झाली. दिलीप कुमार आजहि उपस्थित होते. त्यांनीं भजन म्हटलें.

विरोधकांच्या संयमी वर्तनाची, श्रोत्यांच्या साहिष्णुतेची गांधीजींनीं तारीफ़ केली. सर्वांनीं आदर्श शान्ति राखल्याबद्दल त्यांनीं अभिनन्दन केलें.

## मन हेंच मंदिर

गांधीजी म्हणाले : आजचें भजनगीत साधें सोपें होतें. परंतु दिलीप कुमारांचा कमावलेला आवाज, आधींच त्यांना ईश्वरी देणगी, त्यामुळें त्या साध्या गीतांतहि अपार मधुरता आली. गीताच्या पालुपदांत म्हटलें आहे,

कीं आपलें मन हेंच प्रभूचें मंदिर. शुद्ध प्रीतीनें भरलेलें व प्रकाशमान् होणारें हृदय हेंच प्रभूचें राऊळ. हृदय प्रकाशित झालें, कीं दृष्टि निर्मळ होतें, स्वच्छ सारें दिसतें. कृतींत येणारी अहिंसा ती हीच. प्रभूवर न जडलेलें मन इतस्ततः भटकतें. तें पूजामंदिर कसें होणार ?

## श्रीमंत नि गरीब

निर्वासितांचा उल्लेख करून गांधीजी म्हणाले : निर्वासितांमध्यें श्रीमंत-गरीब असे प्रकार असतात. नौखालींत व दिल्लींतहि मीं पाहिलें, कीं दंगलीच्या भागांतून श्रीमंत लोक भराभरा निघून जात. मागें गरिबांना निराधार स्थितींत सोडून ते जातात. असें नाहीं होतां कामा. ज्यांच्याजवळ साधनें आहेत, जे श्रीमंत आहेत, त्यांच्याजवळ गरिबांसाठीं कळवळा हवा, बंधुभाव हवा. त्यांना अंधारांत, संकटांत सोडून जातां कामा नये. बरोबर तरा किंवा मरा. आपत्तींत, संकटांत राव-रंक, उच्च-नीच सारे भेद लोपले पाहिजेत. तरच निर्वासितांच्या छावण्या आदर्श स्वच्छतेचीं स्थानें होतील, दृढ सहकाराच्या जागा होतील.

## सक्तीनें धर्मांतर

गांधीजी म्हणाले : कांहीं मुसलमान मित्र भेटायला आले होते. ते म्हणाले, शेंकडों मुसलमानांना सक्तीनें हिंदु-शीख करण्यांत येत आहे. असें करणें पाप आहे. धर्म का सक्तीनें लादतां येतो ? जो जो सक्तीनें हिंदु वा शीख करण्यांत आला असेल, त्यानें आपलें धर्मान्तर झालेंच नाहीं असें समजावें व स्वतःच्या धर्मानुसार वागावें. ज्यांना बळजबरीनें इस्लामी करण्यांत आलें आहे त्यांनींहि याचप्रमाणें करावें. जर असें न होईल, तर तिन्ही धर्मांचें मरण आहे. अल्पसंख्याकांना भीति वाटणार नाहीं अशा रीतीनें वागणें हें बहुसंख्याकांचें कर्तव्य आहे. ज्या मुसलमानांस पाकिस्तानांत जायचें असेल त्यांना जाऊं द्यावें. परंतु जे हिंदी संघराज्यांत राहूं इच्छितात त्यांना योग्य तें रक्षण मिळालें पाहिजे. कोणत्याहि परिस्थितींत सक्ती होतां कामा नये. माझें तर म्हणून सांगणें, कीं दोहोंकडील निर्वासितांनीं पुन्हां सन्मान्यपणें नि सुरक्षितपणें आपापल्या घरीं परतावें. आजची अस्वाभाविक परिस्थिति कायमचीच रहायची असेल, तर ती पहायला मी कशाला जगूं ?

१-११-४७

आजहि तो परवांचा विरोधक उभा राहिला. गांधीजी म्हणाले : " सभ्यपणें विरोध दर्शवलात. छान." श्रोत्यांनीं शान्त व अक्रोध राहण्याचें पूर्ववत् अभिवचन दिलें. रीतसर प्रार्थना झाली. श्री. दिलीप कुमारांनीं भजनगीत म्हटलें. गांधीजी भाषणांत म्हणाले, " भजनाच्या पहिल्या चरणांत होतें, कीं भक्त अशा लोकीं राहतात, जेथें दुःख ना दैन्य. याचा अर्थ दोन प्रकारचा आहे असें मला वाटतें. एक अर्थ असा कीं आपण हिंदुस्थानांत राहतों, जेथें दुःख नाहीं, दुर्दशा नाहीं. परंतु या देशांत दुःख-दैन्य कधीं नव्हतें असा काळ मला माहीत नाहीं. हा अर्थ घेतला, तर कवीची ही आकांक्षा आहे एवढेंच फार तर म्हणतां येईल. दुसरा अर्थ म्हणजे आत्मा व शरीर यांचा संबंध. आत्मा या शरीरांत नांदतो. गीतेच्या शब्दांत म्हणायचें झालें तर शरीर हें खऱ्या धर्माचें स्थान आहे, क्षणिक वासनाविकारांचें नाहीं. तेव्हांच ध्येय प्राप्त होईल, जेव्हां षड्रिपूंपासून आपण मुक्त होऊं. प्रत्येकाला ती परम सुखाची स्थिति प्राप्त करून घेतां येईल. जर थोड्या-फार प्रमाणांत असें होऊं लागेल, तर कवीचें भारताविषयींचें स्वप्नहि लौकर साध्य होईल. हिंदुस्थानची आज काय हालत आहे ? कुरुक्षेत्र छावणीहून परतलेल्या एका स्त्री-डॉक्टर-जवळ माझें बोलणें झालें. फार करुण आहे परिस्थिति. तेथें किती तरी डॉक्ट-रांची, औषधांची, कपड्यांची, गरम वस्त्रांची जरुरी आहे. कित्येकांना बदलायला वस्त्र नाहीं. मातांना मोठ्या मुष्कीलीनें मुलांना उबेंत ठेवण्यांत येतें.

## शेख अब्दुल्ला

आणि काश्मीरकडे मनश्चक्षू दवडा जरा. तेथील लोकांची स्थिति डोळ्यां-समोर आणा. काश्मीरकडे जाणाऱ्या विमानांचा आवाज कानीं पडतांच मुख्य मंत्रि शेख अबदुल्ला व त्यांचे लोक यांच्याकडे माझें हृदय वळलें. शेख-साहेब सर्वांचे दोस्त आहेत. माणसांमाणसांत ते फरक नाहीं करीत. मुस्लिम व मुस्लिमेतर दोघांचे ते प्रतिनिधि आहेत. काश्मीरमधून कोणीहि घाबरून

पळून येऊं नये. शूर नि निर्भय व्हायला शिकलें पाहिजे. आपल्या घरादारांच्या रक्षणासाठीं मरणाची तयारी ठेवली पाहिजे. तुम्ही तरुण असा वा वृद्ध असा; स्त्री असा वा मूल असा. सर्वांनीं उभें राहिलें पाहिजे. सुंदर काश्मीरच्या रक्षणासाठीं सारें हिंदी सैन्य नि काश्मिरी जनता ठार झाली तरी मी चिंता करणार नाहीं. आफ्रिडी वगैरे स्वच्छंदी लुटारूंनीं काश्मीरला मोकळें सोडून निघून जावें म्हणून मला किती वाटतें.

## कुरुक्षेत्रांतील निर्वासित

कुरुक्षेत्रावरील निर्वासितांना ज्या हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत, तशाच पाकिस्तानमधील निर्वासितांना तिकडे भोगाव्या लागत आहेत. आज चालू असलेल्या पागलपणासाठीं असें दुःख भोगावें लागणें ही अपार किंमत आहे. म्हणून मनांत विचार बाळगा. दुःखदैन्यांतून मुक्त व्हायचा एकच उपाय आहे. सारें वैर सोडा. मुसलमान व सर्व मित्र म्हणून माना. असें केल्यानेंच तुम्ही मदत कराल.

## ८२

२-११-'४७

## संपूर्ण सहकार्याची आवश्यकता

श्री. व्रजकृष्ण गांधीजींना आधीं म्हणाले, कीं आज श्रोते बरेच आहेत. कुराणांतील प्रार्थनेला विरोध करणारे आज दहा आहेत. या दहाजणांत पहिले विरोधकहि होतेच. विरोधक पूर्णपणें शांत नि संयमी होते. अप्रकट विरोधीहि बरेच आहेत असें गांधीजींना सांगण्यांत आलें. म्हणून प्रार्थनेला प्रारंभ करण्यापूर्वीं गांधीजी म्हणाले, "आपला विरोध दाखविण्याइतका मोकळेपणा तुम्हीं दाखवलात याचा मला आनंद आहे. राष्ट्राचीं बरींच वर्षें मी सेवा करीत आलों आहें. लोक मला महात्मा म्हणतात. मला बघायला किंवा ऐकायला तुम्ही येतां. परंतु माझ्याबरोबर ईश्वराला भजायला तुम्ही येत नाहीं याचें मला वाईट वाटतें. प्रार्थना सर्वसंग्राहक असते. ईश्वराला अनेक नांवें आहेत. शेवटीं तर असें म्हणावें लागेल, कीं जितक्या मानवी

व्यक्ती तितकीं देवांचीं नांवें. पशुपक्षी पाषाणहि देवाची पूजा करतात असें सांगण्यांत येतें आणि तें वाजवी आहे. एका मुस्लिम संताचें एक भजनगीत भजनावलींत आहे. तो म्हणतो पक्ष्यांची सकाळची, सायंकाळची किलबिल म्हणजे विश्वकर्त्याचें स्तोत्रच असतें तें. कुराणांतून किंवा आणखी एखाद्या धर्मग्रंथांतून उतारा प्रार्थनेसाठीं घेतला, तर त्याला विरोध करण्यांत अर्थ नाहीं. कांहीं मुसलमान समजा दोषी असले ( त्यांची किती संख्या हा प्रश्न नाहीं ) तरी सर्व मुसलमानसमाजच दोषी असें नाहीं म्हणतां येणार; आणि पैगंबरांना त्यासाठीं थोडाच दोष द्यायचा ? त्यांच्या शिकवणुकीला थोडाच दोष द्यायचा ? मीं सारें कुराण वाचलें आहे. मला त्यामुळें फायदाच झाला, तोटा नाहीं. जगांतील इतर धर्मग्रंथ वाचल्यानें मी अधिकच चांगला हिंदु झालों. कुराणाचे कट्टे टीकाकार आहेत मला माहीत आहे. मुंबईच्या एका मित्रानें मला प्रश्न विचारला आहे. या मित्राचे किती तरी मुसलमान मित्र आहेत. तो विचारतो : "कुराणाच्या दृष्टीनें हिंदू हे काफीर नाहींत का ?" हिंदू हे काफीर नाहींत असें कित्येक वर्षांपूर्वी मीं निश्चित केलें. मी अनेक मुसलमान मित्रांजवळ या बाबतींत बोललों. ते तर ज्ञाते होते. ते म्हणाले, काफीर म्हणजे नास्तिक. हिंदू काफीर कसे होऊं शकतील ? तेहि एका ईश्वराला भजतात. कुराणाचे विरोधी टीकाकार म्हणतात तेंच खरें मानून कुराणाची नि पैगंबरांची निंदा कराल तर कृष्णहि व्यभिचारी होता, सोळा-हजार त्याला गोपी होत्या असें म्हणून मुसलमानहि टीका करतील. कृष्णावर कोणी टीका केली तर मी म्हणतों माझा कृष्ण निष्कलंक आहे. लंपट आणि दुराचारी याच्यासमोर मी माझें शिर कधींहि वांकवू शकणार नाहीं. तुम्ही रोज माझ्याबरोबर ज्या प्रभूची प्रार्थना करतां तो सर्वांमध्यें आहे,सर्वशक्तिमान् आहे. म्हणून तुम्हांला कोणी शत्रु असूं शकत नाहीं. तुम्हांला भीतीहि कोणाची नाहीं. कारण ईश्वर सदासर्वदा तुमच्याजवळ आहे. सामुदायिक प्रार्थनेचें असें स्वरूप असल्यामुळें जर तुम्ही मनःपूर्वक निःसंकोचपणें प्रार्थनेंत सामील होऊं शकत नसाल तर अशी प्रार्थना न करणें बरें. जर तुम्ही समरस व्हाल, तर सभोंतींचा अंधार दूर करण्याची शक्ति दिवसेंदिवस आपणांला मिळत आहे असा तुम्हांला अनुभव येईल." महात्माजींनीं प्रार्थना हवी का म्हणून

विचारलें. मोकळेपणें, निर्भयपणें मत सांगा म्हणून म्हणाले. श्रोते म्हणाले, " प्रार्थना हवी. विरोधकांविषयीं आमच्या मनांत ना क्रोध, ना दुष्ट भाव." नंतर रीतसर प्रार्थना झाली. गुरुदेवांची नात नंदिता कृष्ण कृपलानी हिनें भजनगीत म्हटलें.

## काळाचें महत्त्व

काश्मीरसंबंधीं गांधीजी म्हणाले, " हिंद सरकार अधिक सैन्य व अधिक कुमक पाठवीत आहे. सरकारजवळ विमानें नाहींत. परंतु खाजगी कंपन्यांनीं आपलीं विमानें सरकारच्या हवालीं केल्याचें ऐकून मला आनंद झाला. शिस्तबद्ध सैन्य, शिस्तबद्ध व्यवस्थित सरकार, यांना काळ अनुकूल आहे. लुटारूंना प्रतिकूल आहे.

## आझाद हिंद फौजेचे अधिकारी

काश्मीरवर जे आक्रमक चालून आले आहेत, त्यांचें नेतृत्व करण्यांत आझाद हिंद फौजेचे दोन माजी अधिकारी आहेत हें ऐकून वाईट वाटलें. श्री. सुभाषबाबूंच्या प्रभावी नेतृत्वाखालीं आझाद सेना शौर्यानें लढली. तिच्यांत हिंदू, मुस्लीम, शीख सारे होते. आपापला धर्म पाळीत, परंतु जातिभेद, पंथभेद नव्हते. मैत्रीच्या, भ्रातृभावाच्या बंधनानें ते एकत्र जोडले गेले होते. आपण हिंदी आहोंत याचा त्यांना अभिमान वाटे. दिल्लीच्या किल्ल्यांत ( तेच असतील तर ) मी त्यांना भेटलों होतों. सुटकेनंतरहि भेटलों होतों. आज लुटारू टोळ्यांचें नेतृत्व ते कां करतात मला कळत नाहीं. निरपराधी स्त्री-पुरुषांची कत्तल करणाऱ्यांचें, गांवें लुटणाऱ्यांचें, जाळणाऱ्यांचें ते नेतृत्व कसें करूं शकतात ? निषिद्ध व वाईट कृत्यें करण्याला प्रोत्साहन देऊन टोळीवाल्यांचें, आफ्रिडी लोकांचें ते नुकसान करीत आहेत. त्यांच्या जागीं मी असतों, तर टोळीवाल्यांना चुकीपासून मीं परावृत्त केलें असतें. शेख अबदुल्ला इस्लामचें किंवा हिंदचें नुकसान करीत आहेत असें त्यांना वाटत असेल, तर त्यांनीं शेखसाहेबांस भेटावें. माझें हें म्हणणें टोळीवाल्यांच्या नि या अधिकाऱ्यांच्या कानांवर जाऊन ते आपलीं चूक पावलें मागें घेतील अशी मी आशा करतों.

या लुटारूंना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाकिस्तान सरकार प्रोत्साहन देत आहे अशा निर्णयावर आल्यावांचून गत्यन्तर नाहीं. सरहद्द प्रान्ताच्या मुख्य प्रधानानें लुटारूंना चिथावणी दिली, इतकेंच नव्हे, तर साऱ्या मुस्लिम जगाला हांक मारली असें वृत्त आलें आहे. हिंद सरकारनें— पंडित नेहरूंच्या सरकारनें— काश्मीरला मदत पाठविली. हिंदी संघराज्यांत काश्मीरनें सामील व्हावें म्हणून केव्हांपासून कारस्थान चाललें होतें, हें सारें कपटी वर्तन आहे, असे आरोपहि करण्यांत आलेले वाचण्यांत आले. पाकिस्तान-मंत्र्यानें शेजारच्या भ्रातृसम सरकारवर असे निराधार बेछूट आरोप करावे, हें पाहून तर मी थक्कच झालों. काश्मीरसंबंधीं मी बोलत आहें. कारण मित्रांपासून मिळालेली आनंदवार्ता तुम्हांला सांगायची आहे. कायदेआझम तर सांगत आहेत, कीं पाकिस्तानला एक शत्रु आहे. तो म्हणजे हिंदी संघराज्य असें त्यांच्या मनांत असावें. परंतु या त्यांच्या म्हणण्याशीं मला मिळालेल्या बातमीचा मेळ बसत नाहीं. कराचीचे एक हिंदु मित्र आणि एक लाहोरचे मला भेटले. दोघांनीं सांगितलें कीं, परिस्थिति पूर्वीपेक्षां बरीच सुधारली आहे, लौकरच अधिक सुधारेल. एका मुसलमान कुटुंबानें एका शीख मित्रास आश्रय दिला. त्यांच्या ग्रंथसाहेबासाठीं एक स्वतंत्र खोली दिली. हिंदूंनीं, शीखांनीं मुसलमानांस, मुसलमानांनीं हिंदु-शीखांस अशा रीतीनें आश्रय दिल्याचीं उदाहरणें किती तरी सांगतां येतील असें ते म्हणाले. कांहीं मुसलमान मित्र माझ्याकडे येऊन म्हणाले, "लाखों लोकांचीं ही जी अदलाबदल चालली आहे, किती पापमय आहे ती ! केवढा मोठा हा गुन्हा !" ते म्हणाले, "इकडे येणाऱ्या हिंदु-शीख निर्वासितांना जशा हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत, तशाच मुस्लिम निर्वासितांना पाकिस्तानांत भोगव्या लागत आहेत." घरदारविहीन झालेल्या लाखों लोकांचा बोजा कोणतें सरकार सोसूं शकेल ? पाण्याचा गिळंकृत करणारा प्रचंड लोंढा यावा त्याप्रमाणें हें आहे. ही अविवेकी धांवाधांव थांबवतां नाहीं का येणार, असें मला मित्र विचारतात. जर एकमेकांचा संशय घेणें, निराधार आरोप करणें बंद पडेल, तर हें शक्य आहे यांत संशय नाहीं. या दुर्दैवी

देशांत ईश्वरानें विवेक आणावा म्हणून माझ्याबरोबर प्रार्थना करा. अडथळा न करतां प्रार्थना शांतपणें पार पडूं दिलीत म्हणून मी विरोधकांचें त्यांच्या विवेकी संयमाबद्दल अभिनंदन करतों.

## ५३

३–११–'४७

### जातीयतेचें विष

दोन विषें एकांत एक कालवलीं गेलीं आहेत. कोणतें विष त्याजागीं प्रथम होतें याचा शोध लावणार कोण ? आणि याची चर्चा करून किंवा शोध लावूनहि फायदा काय ? पश्चिम पाकिस्तानभर हें विष पसरलें आहे हें आपण जाणतों. परंतु तेथील सत्ताधारी अजूनहि त्याची दखल घेत नाहींत. हिंदी संघराज्यांत तें थोड्याच भागांत पसरलें आहे. तें तेथेंच मर्यादित राहो. इतरत्र न पसरो. प्रभूला माझी अशी प्रार्थना आहे. जर पसरलें नाहीं तर योग्य वेळीं दोन्ही भागांतून तें नाहींसें करतां येईल अशी आशा करतां येईल.

### अन्न-नियंत्रणें उठवा

डॉ. राजेन्द्रप्रसादांनीं सर्व पंतप्रधानांची किंवा त्यांच्या प्रतिनिधींची अन्न-नियंत्रणाबाबत सल्ला मिळावा म्हणून बैठक बोलावली आहे. आज सायंकाळीं याच अति महत्त्वाच्या प्रश्नावर मीं बोलावें असें मला वाटतें. लौकरांत लौकर, सहा महिन्यांच्या आंत संपूर्णपणें नियंत्रण उठवा अशा निर्णयावर मी कधींचा आलों आहें. त्या निर्णयांत बदल करावा असें मला वाटत नाहीं. तारा पत्रें सारखीं येत आहेत. कांहीं मोठीं माणसें आहेत. अन्न आणि वस्त्र दोहोंवरचीं नियंत्रणें उठवा म्हणत आहेत. मी कपड्याचा प्रश्न सध्यां दूर ठेवीत आहें.

### नियंत्रणामुळें अनिष्ट निर्मिति

नियंत्रणामुळें सत्य दडपलें जातें: खोटेपणा, फसवाफसवी यांना ऊत येतो. काळा बाजार वाढतो. कृत्रिम दुष्काळ पैदा होतो. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे

सारें राष्ट्र पंगू होतें. तें परावलंबी होतें. कांहीं आपण होऊन करावें असें वाटतच नासें होतें. गेल्या पिढीभर आपण स्वावलंबनाचे धडे शिकत आलों. आज का विसरायचे? तिकडे जी प्रचंड प्रमाणावर भ्रातृहत्या चालली आहे, लोकांची अविवेकी अदलाबदल होत आहे, उपासमार, घरदार नाहीं, येणाऱ्या झोंबणाऱ्या हवेसाठीं पांघरूण नाहीं, ही जी महान् आपत्ति कोसळली आहे, तिच्याच तोडीची ही अन्नधान्याच्या बाबतींतील आपत्ति आहे. निर्वासितांचा प्रश्न अधिक उत्कटपणें दिसतो. हा तितक्या प्रचंड स्वरूपांत दिसत नाहीं एवढेंच.

गेल्या महायुद्धाची अन्नधान्यनियंत्रण ही दुष्ट देणगी आहे. त्या वेळेस नियंत्रण आवश्यक असेल. कारण अन्न, गळितांचीं धान्यें पुष्कळशीं बाहेर पाठविलीं जात. या अनैसर्गिक निर्यातीमुळें मनुष्यकृत दुष्काळ येणें अपरिहार्य होतें. आणि म्हणून नियंत्रणांत अनेक दोष असले, तरी त्याचा स्वीकार करणें भाग पडलें. अन्नधान्य-शिधावांटपाची पद्धति आणि जर तुमची इच्छा असेल, तर आतां अन्नधान्य बाहेर पाठवणें बंद करतां येईल. अन्नधान्याच्या रूपानें बाहेरच्या जगांतून आपण मदत अपेक्षिली नाहीं, तर ती मदत जगाच्या इतर उपासमारीच्या प्रदेशांना मिळेल व आपण त्यांना एक प्रकारें मदत करूं शकूं.

मी माझ्या दोन पिढ्यांच्या आयुष्यांत अनेक दैवी दुष्काळ पाहिले. परंतु शिधावांटपाचा विचार कधीं कोणाला सुचल्याचें स्मरत नाहीं.

या वर्षी ईश्वराच्या कृपेनें पाऊसहि बरा पडला आहे. अन्नधान्याची खरी टंचाई नाहीं. हिंदुस्थानच्या खेड्यांतून डाळी, गळितांचीं धान्यें, इतर अन्नधान्य भरपूर आहे. भावनियंत्रण—कृत्रिम भावनियंत्रण—धान्योत्पादन करणाऱ्यांना कळत नाहीं, कळूं शकणारहि नाहीं. खुल्या बाजारांत त्यांना जी किंमत मिळूं शकेल, तिच्यापेक्षां कमी किंमतीला जवळचें धान्य द्यायला ते नाखूष असतात. हें उघडें सत्य सिद्ध करून दाखविण्याची जरुरी नाहीं. अन्नधान्याची टंचाई कां आहे तें सिद्ध करायला टेबलाजवळ बसून आंकडेमोड करण्याची, विस्तृत अहवाल तयार करण्याची कांहीं जरूर नाहीं. लोकसंख्येची बेसुमार वाढ हा मुद्दा घेऊन आम्हांला घाबरवायला कोणी पुढें येणार नाहीं अशी आशा आहे.

## मुरब्बी लोकांचा सल्ला

आमचे मंत्री लोकांचे आहेत, जनतेंतूनच आलेले आहेत. मंत्र्यांच्या खुर्च्यांवर न बसणारे परंतु जे अनुभवी लोक आहेत, त्यांच्यापेक्षां आपणांस अधिक कळतें असें मंत्र्यांनीं समजूं नये. हे अनुभवी लोक तर सांगत आहेत, कीं नियंत्रणें जितकीं लौकर उठवाल तितकें चांगलें. एक डॉक्टर लिहितो, " रद्दी अन्न, भिकार धान्यच, ख्यावें लागतें. रोग्यांना चांगलें धान्य मिळूंच शकत नाहीं. आजार उगाच वाढत आहेत. "

## लोकशाही आणि विश्वास

नियंत्रित अन्नधान्यापेक्षां त्याच दुकानांतून सरकारनें उघड्या बाजारांत धान्य विकत घेऊन तें चांगलें धान्य विकावें. असें केल्यानें किंमती आपोआप नियंत्रित होतील. सांचवलेले अन्नधान्याचे, डाळ-तांदुळाचे सांठे बाहेर येतील. धान्योत्पादन करणारे व धान्याचे व्यापारी यांच्यावर विश्वास नाहीं का तुमचा ? लोकशाही ताणल्यानें, जखडल्यानें तुटते. विश्वासावरच ती जगते. बोट धरून लोकांना किती दिवस चालवणार ? त्यांना स्वावलंबी होऊं दे. श्रम न केल्यामुळें एकमेकांस फसवल्यामुळें लोक मरणार असतील, तर मरोत. ती इष्टापत्तीच समजूं. जे उरतील ते तरी आळशी बनण्याचें, निर्दयपणें स्वार्थी बनण्याचें पाप करणार नाहींत. ते धडा घेतील.

# ५४

४-११-'४७

## क्रोधाचा संभव

आज त्या सभ्य विनयी वृद्ध मित्राच्या विरोधाशिवाय कोणाचा विरोध नाहीं. परंतु प्रार्थना सुरू करण्यापूर्वीं मी एका पत्राविषयीं बोलणार आहें. तें पत्र अति करुण आहे. एका पंजाबी हिंदु निर्वासिताचें तें पत्र आहे. त्याला अपार भोगावें लागलें आहे. त्या पत्रांत त्यानेंहि विरोध दर्शविला आहे. ते

येथें उपस्थित आहेत कीं नाहींत माहीत नाहीं. हजर असोत वा नसोत. त्या पत्राची मी उपेक्षा नाहीं करूं शकणार. कारण खोल वेदनेनें तें लिहिलेलें आहे. पत्र नीट मुद्देसूद असलें तरी अज्ञानमय आहे. आणि तें अज्ञान क्रोधामुळें जन्मलेलें आहे. पत्रांतील अक्षराअक्षरांत संताप आहे, क्रोध आहे. माझा बहुतेक वेळ हिंदु-शीख निर्वासितांच्या किंवा स्थानिक मुस्लिम दुःखितांच्या करुण कहाण्या ऐकण्यांतच जातो. मीहि सद्गदित होतों, दुःखी होतों, विद्ध होतों. परंतु मी जर खिन्न-उदास झालों, तर ती अहिंसा नव्हे. मी दिवसभर रडतच बसलों, तर प्रभूची प्रार्थना करायला, जेवायला, झोंपायला तरी अवसर कोठला? मी लहानपणापासून अहिंसेचा उपासक या नात्यानें दुःख पाहून कधीं रडायचें तर नाहींच, उलट, त्या दुःखांचा मुकाबला करण्यासाठीं हृदय अधिक कठोर करायचें असें करीत आलों आहें. प्राचीन ऋषिमुनींनीं नाहीं का सांगितलें, कीं जो अहिंसक असतो, त्याचें हृदय पुष्पाप्रमाणें मृदु व वज्राहूनहि कठोर असतें म्हणून? त्या उपदेशानुसार जगायचा मी सतत प्रयत्न करीत आलों आहें. आणि म्हणून पत्रांत लिहिलेल्या तक्रारीसारख्या तक्रारी किंवा भेटायला येणाऱ्यांच्या दुःख-क्रोधाच्या कहाण्या जेव्हां मी ऐकतों, तेव्हां आजकालचा हा प्रश्न सोडविण्यासाठीं मी अधिकच माझें मन घट्ट करतों. मला आलेलें पत्र उर्दू लिपींत आहे. त्या पत्रांतील मुद्दे टिपून घ्यायला मी श्री. बाळकृष्णजींना सांगितलें आहे.

## असत्य विरुद्ध अर्धवट सत्य

या पत्रांत एक आरोप पहिल्या प्रथम असा आहे, कीं मी वचन मोडलें आहे. एक जरी विरोधक असला, तरी मी त्याच्या विरोधाला सन्मानून सामुदायिक सार्वजनिक प्रार्थना करणार नाहीं, असें तुम्ही नव्हतें का म्हटलेंत? असा मला प्रश्न केला आहे. परंतु हें अर्धवट सत्य आहे, जें असत्याहूनहि भयंकर असतें. मी एकदां पहिल्यानेंच जेव्हां प्रार्थना बंद केली, तेव्हां स्पष्ट केलें होतें, कीं प्रार्थना यासाठीं बंद करीत आहें कीं श्रोते विरोधकाला कदाचित् त्रास देण्यापर्यंत संतापायचे म्हणून. त्याला कित्येक महिने झाले. त्यानंतर

श्रोते संयम शिकले. आणि विरोधकांविषयीं आम्ही मनांत घुस्सा किंवा संताप ठेवणार नाहीं, असें आश्वासन श्रोत्यांपासून मिळाल्यावरच मीं सार्वजनिक प्रार्थना पुन्हां सुरू केली. आणि परिणाम सुखकारक आहे हें मी जाणतों. विरोधकहि अति सभ्यतेनें वागतात. विरोध नमूद करण्यापलीकडे ते कोणताहि व्यत्यय आणीत नाहींत. तेव्हां मीं वचनभंग तर नाहींच केला, उलट, परिणाम मधुर झाला आहे, ही गोष्ट पत्रलेखकाच्या ध्यानांत येईल. सार्वजनिक जीवनाच्या प्रदीर्घ कालांत मीं वचनभंग केल्याचें, विश्वासघात केल्याचें एकहि उदाहरण मला तरी माहीत नाहीं, अशी श्रोत्यांना मी हमी देतों. पत्रलेखकाचा दुसरा आरोप असा, कीं शीखांच्या जपजीमधून किंवा बायबलमधून मी प्रार्थना म्हणत नाहीं. कुराणांतूनच फक्त कां ? या बाबतींतहि पत्रकाराचें अज्ञान दिसून येतें. आश्रमभजनावलींतील गीतांची रचनाहि त्याला माहीत नाहीं. ग्रंथसाहेबांतील, बायबलांतील भजनेंहि भजनावलींत संग्रहीत आहेत.

## सुखी निर्वासित

पत्रलेखकाची तिसरी तक्रार अशी, कीं पश्चिम पंजाबांतून किंवा पश्चिम पाकिस्तानच्या कोठल्या तरी भागांतून जे सुखवस्तू प्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते आले, ते त्यांच्या पाकिस्तानमधील घरांपेक्षांहि ऐटबाज अशा राजवाड्यांतून रहात आहेत. त्यांना इतर निर्वासितांच्या हालअपेष्टा भोगाव्या लागत नाहींत. ते त्यांत सहभागी होत नाहींत. ते निर्वासितांपासून सर्वतोपरि विभक्त राहतात. इकडे बिचारे निर्वासित निराधार पडून आहेत. ना निवारा, ना गरम कपडा, ना बदलायला वस्त्र, ना पोटभर अन्न ! ही तक्रार जर खरी असेल, तर लज्जास्पद आहे. मीं प्रार्थनासभांतून अनेकदां श्रीमंत निर्वासितांची कठोरपणें कानउघाडणी केलेली आहे. गरीब निर्वासितांबरोबर राहून त्यांच्या हालअपेष्टांत सहभागी न होतां जे श्रीमंत निर्वासित पृथक्पणें दूर राहतात, त्यांची स्पष्ट निंदा केली आहे.

## दिल्लींतील कर्तव्य

उपरोधिकपणें पत्रकार विचारतो, पाकिस्तानमध्यें ना जाणार होतांत ? कां

नाहीं जात ? मुसलमानांना मदत करणेंच कां पसंत करतां ? पाकिस्तानांत जाऊन हिंदु-शीखांना कां नाहीं करीत ? दिल्लींतील कर्तव्य सोडून मी पाकिस्तानांत हिंदु-शीखांना धीर द्यायला, त्यांचीं दुःखें कमी करायला जाईन, तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं हें लेखकाला काय कळे ? मी मुसलमानांचा, इतरांचा मित्र आहें. कारण मी हिंदू आणि शीख यांचाहि तितकाच मित्र आहें. मी कोणाची सेवा करतों, तेव्हां तो हिंदुस्थानी आहे, एकाद्या धर्माचा आहे, या जाणिवेनें नाहीं करीत. तो मानवजातीचा एक अंश आहे या भावनेनें मी करतों. माझी सेवा संग्राहक आहे, अभेदमय आहे. दिल्लींतील हिंदु-शीखांनीं, निर्वासित वा इतरांनीं मुसलमानांविषयीं मैत्री दाखवून माझें दिल्लींत राहणें अनावश्यक आहे असें सिद्ध करावें. मग मी पाकिस्तानला माझी भेट निरर्थक होणार नाहीं या आशेनें नि श्रद्धेनें दौडतों कीं नाहीं तें बघा.

## आक्षेपांचें निरसन

आक्षेपकानें कस्तुरबाफंडहि सोडला नाहीं. काय करतां या निधीचें ? निर्वासितांसाठीं त्याचा कां नाहीं उपयोग करीत ? म्हणून विचारलें आहे. पहिली गोष्ट म्हणजे मी तुरुंगांत असतांना विशिष्ट कार्यासाठीं म्हणूनच तो निधि जमविण्यांत आला. हिंदुस्थानमधील खेड्यांतील स्त्रियांच्या नि मुलांच्या सेवेसाठीं म्हणूनच तो निधि उभारला गेला. निधीसाठीं विश्वस्तमंडळ आहे. सदा दक्ष श्री. ठक्करबापा त्याचे चिटणीस आहेत. चोख हिशेब आहेत. जनता पाहूं शकते. लेखकानें सुचविल्याप्रमाणें निधीचा दुसऱ्या कामांत उपयोग करतां येणार नाहीं, करण्याची जरुरीहि नाहीं. कारण उदार हातानें निर्वासितांना साहाय्य होत आहे. घोंगड्यांचीच लहानशी मागणी बघा. किती पाठिंबा मिळाला. सरदारांनीं खास विनंतिपत्रक काढलें आहे आणि जनतेची उदार मदत होत आहे. त्या पत्रकाचें स्वागत होत आहे.

## डुकरांची हत्या

शेवटची तक्रार अशी कीं पाकिस्तानमध्यें डुक्कर मारायची बंदी केली आहे. इकडे गोवधबंदी कायद्यानें कां होऊं नये ? पाकिस्तानमध्यें कायद्यानें डुक्करवधबंदी केली आहे कीं काय तें मला माहीत नाहीं. जर ती वार्ता

खरी असेल, तर मला वाईट वाटतें. इस्लामी कायद्याप्रमाणें डुकराचें मांस खायला निषिद्ध आहे हें मी जाणतों. परंतु मुसलमानेतरांनाहि त्याची बंदी करणें समर्थनीय नाहीं.

## पाकिस्तान का धार्मिक राष्ट्र आहे ?

कायदेआझम जिनांनीं घोषणा नव्हती का केली कीं पाकिस्तान हें धर्मावर अधारलेलें राष्ट्र नसून, त्याला तसें स्वरूप देण्यांत येणार नाहीं म्हणून ? अर्थात् त्यांनीं दिलेली ग्वाही प्रत्यक्षाशीं पडताळून पाहतां खरी ठरत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंदी संघराज्यानेंहि का हिंदुधर्मी राष्ट्र बनावें ? हिंदू कायदे अहिंदूंवर लादावे ? असें होऊं नयेसें मला तर वाटतें. तसें होईल तर हिंदी राष्ट्र आशेचें, भविष्याचें प्रतीक म्हणून राहणार नाहीं. साऱ्या आशियाई नि आफ्रिकी जातिजमाती, एवढेंच नव्हे, तर सारी दुनिया तुमच्याकडे आशेनें बघत आहे. हिंदी संघराज्य किंवा पाकिस्तान यांच्यापासून दुनिया क्षुद्रतेची, धर्मांधतेची नाहीं अपेक्षा करीत. सभोंवतींच्या अंधारांत ज्यापासून प्रकाश मिळेल, मार्ग दिसेल, धडा मिळेल, अशा प्रकारच्या चांगुलपणाची नि मोठेपणाची दुनिया तुम्हांपासून अपेक्षा करीत आहे.

## गायी-गुरांची निगा

गोभक्तींत मी कोणाहूनहि कमी नाहीं. परंतु ती भक्ति कायद्याच्या सक्तीनें नाहीं लादतां येत. अहिंदूंशीं, मुसलमानांशीं स्नेहभाव वाढवून व योग्य वर्तन ठेवूनच ती भक्ति पैदा होईल. गायीला वांचवण्यांत गुजराती आणि मारवाडी सर्वांत पुढें असें मानलें जातें. परंतु हिंदुधर्माची शिकवण ते इतकी विसरून गेले, कीं स्वतः गायीला व तिच्या संततीला निर्दयपणें वागवीत असतां, दुसऱ्यावर मात्र मोठ्या खुशीनें ते बंधनें घालूं इच्छितात. हिंदुस्थानांतील गायीगुरांची इतकी दुर्दशा कां ? जगांत कमींत कमी दूध देणारीं गुरें कोठें असतील तर तीं येथें. त्यामुळें गायीगुरें म्हणजे मोठा बोजा वाटतो, भार वाटतो. त्यांना नांगरांना, गाड्यांना जुंपतां, परंतु किती निर्दयपणें वागवतां !

पांजरपोळ अभिमानाच्या वस्तू नाहींत. किती तरी पैसा त्यांत गुंतलेला आहे. परंतु शास्त्रीय अशी गुरांची काळजी तेथें क्वचितच दिसते. हिंदी गुराढोरांची अशानें सुधारणा होणार नाहीं. आधीं नीट दयेनें वागायला शिका. हिंदी मुसलमानांशीं मीं मैत्री जोडल्यानें खाटकाच्या सुरीपासून कोणाहि व्यक्तीपेक्षां अधिक गायींचा प्राण वांचवायला मी कारणीभूत झालों आहे असें दाव्यानें सांगूं इच्छितों.

५५

५-११-'४७

## हरिजनांची कामाला लायक बनण्याची पात्रता

नेहमींच्या त्या सभ्य मित्राशिवाय कुराणांतील प्रार्थना म्हणायला कोणाचा विरोध नव्हता म्हणून प्रार्थना रीतसर पार पडली. किंग्जवे येथील हरिजननिवासांतील एका हरिजनानें आज भजन म्हटलें. गांधीजी म्हणाले: " या मुलाचा आवाज किती सुरेल व गोड आहे ! मला फार आनंद झाला. समान संधि सर्वांना मिळाली, तर हरिजन कोणाहि सवर्णीयांहून कमी नाहीं असें दिसून येईल. मला तर कांहीं बाबतींत असा अनुभव आला आहे, कीं वादन-गायनांत किंवा हस्तकौशल्याच्या बाबतींत सर्वसामान्य हरिजन अधिक हुशारी दाखवितो. इतर मानवांप्रमाणें हरिजनहि दुर्वर्तनी असूं शकतील. त्यांच्यांत कांहीं वाईट नाहीं असें नाहीं मला म्हणायचें. मला एवढेंच सांगायचें, कीं सवर्ण लोकांनीं इतकीं बंधनें घातलीं तरी आज जर त्यांना समान संधि मिळाली, तर ते इतरांप्रमाणें प्रगति करूं शकतील. दुसरी एक आनंदाची गोष्ट म्हणजे पंढरपूरचें सुप्रसिद्ध मंदिर इतर हिंदूंप्रमाणेंच हरिजनांना मुक्त करण्यांत आलें आहे. हें मंदिर जर अखेर उघडलें नाहीं, तर मी मरणान्तिक उपवास करीन अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्री. साने गुरुजींना याचें मुख्य श्रेय जातें. मंदिराचे विश्वस्त व पंढरपूरचे नि आसपासचे लोक यांनींहि योग्य तें पाऊल टाकलें म्हणून मी त्यांचें अभिनंदन करतों. अस्पृश्यतेचा शेवटचा मागमूसहि लौकरच नष्ट होईल अशी मला आशा आहे. हिंदुस्थानच्या

दोन्ही भागांत जें जातीय विष पसरलें आहे तें अस्पृश्यता दूर झाल्यानें पुष्कळसें कमी होईल."

## शाकाहार कसा फैलावेल ?

नंतर टपालांतून आलेल्या अनेक प्रश्नांकडे गांधीजी वळले. एका मुसलमानानें लिहिलें आहे, कीं मी ज्या भागांत राहतों तेथील हिंदू मला म्हणतात, कीं आमच्यामध्यें रहायचें असेल, तर मांसमच्छर कांहींहि खातां कामा नये. अशा असहिष्णू नि संकुचित लोकांची वृत्ति मला पसंत नाहीं. धार्मिक श्रद्धेनें मांसाहारी नसलेले लोक हिंदुस्थानांत अल्पसंख्य आहेत. बहुसंख्य हिंदू हिंदुस्थानच्या सर्व भागांत संधि मिळतांच, मांसमच्छर खायला मागेंपुढें नाहीं बघत. म्हणून मुसलमानांवर शाकाहारी संप्रदाय लादण्याचा काय अधिकार ? मांसाहारी हिंदूंवर अशी सक्ती करायची आहे का छाती ? सारें हास्यास्पद आहे. शाकाहाराचा प्रसार करण्याचा खरा मार्ग म्हणजे त्यांतील सुंदरता पटविणें, ती स्वतःच्या जीवनांत दाखविणें. दुसऱ्यांना आपल्या मताकडे वळवण्याचा हाच राजमार्ग आहे.

## आपल्या घरीं रहा

एका हिंदु टीकाकारानें लिहिलें आहे कीं, "तुम्ही नि तुमच्याप्रमाणें दुसरेहि कांहीं लोक मुसलमानांस सारखें सांगत असतात कीं, कांहीं झालें तरी घर नका सोडूं. सुरक्षितपणें घरदार सोडून जातां येत असलें, तरी नका जाऊं. परंतु मुसलमान जर आपल्याच मोहल्ल्यांत राहतील, तर त्यांना पोटासाठीं बाहेर पडतां येत नाहीं. प्रामाणिक उद्योगधंदा करतां येत नाहीं. बहुसंख्य हिंदूंचा त्यांच्यावर बहिष्कार. किती तरी मुसलमान पाकिस्तानांत जात आहेत. डोळ्यांदेखत कांहींची कत्तल होत आहे. असें असूनहि उरलेल्या गरीब मुसलमानांनीं येथेंच रहावें अशी अपेक्षा करणें म्हणजे फार आहे. तें कसें शक्य होईल ?" या टीकाकाराच्या म्हणण्यांत सत्याचा अंश आहे. तरीहि मुसलमानांस दुसरा सल्ला माझ्याजवळ नाहीं. घरदार सोडून जाण्यांत अधिक हालअपेष्टा आहेत असें मला वाटतें. आपत्ती सोसूनहि प्रामाणिकपणें नि शौर्यधैर्यानें उरलेले मुसलमान जर राहतील, तर शेजारच्या हिंदूंचीं कठिण

हृदयें वितळविल्याशिवाय ते राहणार नाहींत. आणि मग दोन्ही भागांतील हिंदू-मुसलमानांना मुक्तीचा लाभ निश्चितपणें होईल. बऱ्याचशा मुसलमानांकडून प्रामाणिकपणें प्रकट केलेलें अहिंसात्मक शौर्य साऱ्या हिंदुस्थानला बदलून टाकील. त्याचा परिणाम सर्वांवर होईल.

## अहिंसेवर अचल श्रद्धा

दुसऱ्या एका लेखकानें सर्वस्व गमावण्याची पाळी आली असतांहि मीं चर्चिल, हिटलर, मुसोलिनी, जपानी, वगैरेंना माझें अहिंसक तंत्र वापरा असें सांगितलें म्हणून मला दोष दिला आहे. त्या वेळेस तसा सल्ला दुसऱ्यांस देणें तुम्हांला सुरक्षिततेचें वाटलें; परंतु काँग्रेस-सरकारांतील तुमचेच मित्र अहिंसा सोडून काश्मीरला फौजाहि पाठवतात त्याचें काय? आज अहिंसा कां सोडलीत, असें मला विचारण्यांत आलें आहे. काश्मीरी लोकांनीं अहिंसेनें आक्रमकांचें कसें संकट परतवावें, त्यांचा कसा मुकाबला करावा, तें निश्चितपणें सांगा असेंहि पत्रलेखकानें शेवटीं लिहिलें आहे. लेखकानें दाखविलेलें अज्ञान पाहून वाईट वाटतें. या बाबतींत मंत्रिमंडळांतील सभासदांवर माझें वजन नाहीं म्हणून मी पुनःपुन्हां सांगितलेलें श्रोत्यांना स्मरत असेल. मी पूर्वीप्रमाणेंच अहिंसेवर दृढ उभा आहे. परंतु मंत्रिमंडळांतील लोक माझे उत्तम मित्र असले, तरीहि मी माझीं मतें त्यांच्यावर लादूं शकत नाहीं. त्यांनीं त्यांच्या दृढ नि निश्चित मतांविरुद्ध कसें वागावें? मी अशी अपेक्षा नाहीं करूं शकत. आणि माझ्या मित्रांवर पूर्ववत् माझें वजन नाहीं ही मी कबुली देतों. एवढ्यानें सर्वांचें समाधान झालें पाहिजे. लेखकानें विचारलेला प्रश्न नेमका उलटा आहे. माझें उत्तर साधें आहे.

## योग्य माणसाची स्तुति केलीच पाहिजे

माझी अहिंसा जेथें योग्य तेथें श्रेय द्यायला तयार असते. जरी मग तो मनुष्य हिंसेवर श्रद्धा ठेवणारा असला, तरीहि मी त्याला वाखाणीन. सुभाषबाबूंची हिंसेवरील श्रद्धा मी स्वीकारूं शकत नाहीं; अर्थात् तदनुरूप झालेलें कार्यहि मी स्वीकारूं शकत नाहीं. असें असलें, तरीही त्यांची देशभक्ति, शौर्य, योजकता यांची मीं मुक्तकंठानें स्तुतीच केली आहे. त्याप्रमाणेंच जरी हिंदी

संघराज्य–सरकारनें काश्मीरला मदत करण्यासाठीं शस्त्र धारण करणें मला पसंत नसलें, शेख अब्दुल्लांनीं शस्त्र घेऊन उभें राहणें पसंत नसलें, तरीहि हिंदी सैन्य व काश्मीरचें संरक्षक शेवटच्या माणसापर्यंत जर लढत धारातीर्थीं पडले, तर त्यांच्या स्तुत्य वर्तनाबद्दल, त्यांच्या धैर्यशौर्याबद्दल, समयसूचकते-बद्दल तारीफ केल्याशिवाय माझ्याच्यानें कसें राहवेल ? जर ते असे लढत मरतील, तर ते हिंदुस्थानचा कदाचित् कायापालट करतील हें मी जाणतों. परंतु हा बचाव कृतीनें नि हेतूनें जर शुद्ध अहिंसक असता, तर मग मला 'कदाचित्' शब्द वापरावा लागला नसता. अहिंसक रीतीनें बचाव करणाऱ्यांना पाकिस्तान-मंत्रिमंडळाचें मत जरी बदलवतां आलें नसतें, तरी हिंदी संघ-सरकारचें मत बदलवतां आलें असतें, हिंदी जनतेवर प्रचंड परिणाम घडवतां आला असता.

अहिंसक तंत्र म्हणजे सशस्त्र मदत पाठविणें नव्हे. परंतु अहिंसक मदत बिनदिक्कत हिंदसरकारला पाठवतां येईल. परंतु संरक्षकांना अशी मदत मिळो न मिळो; ते आक्रमकांच्या शक्तीचा, एवढेंच नव्हे, तर प्रचंड संख्येनें येणाऱ्या शिस्तशीर सैन्याचाहि मुकाबला करूं शकतील. निर्मत्सर बुद्धीनें संरक्षक लोक आपापल्या ठायीं उभे राहून जर मरतील, तर इतिहासाला अजून अज्ञात असें शौर्य मूठहि न उगारतां ते दाखवून देतील. मग काश्मीर पुण्यभूमि होईल. काश्मीरचा सुगंध हिंदुस्थानांतच नव्हे, तर साऱ्या जगांत दरवळेल. अहिंसक तंत्र म्हणजे काय तें मीं सांगितलें. माझी असमर्थता मला कबूल करणें भाग आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकांत आत्म-संयमानें मिळणाऱ्या ज्या शक्तीचें वर्णन आहे, ती माझ्या शब्दांत नाहीं. त्या-साठीं लागणारी तपश्चर्या माझ्याजवळ नाहीं. मी प्रार्थना मात्र करूं शकतों. तुम्हीहि माझ्याबरोबर प्रार्थना करा नि प्रभूला म्हणा, कीं त्याची इच्छा असेल तर त्यानें मला गीतेंतील गुण देऊन बलवान् करावें.

५६

६-११-'४७

## विपर्यस्त वार्ता

एका मित्रानें दोन वर्तमानपत्री कात्रणें पाठवलीं होतीं. प्रार्थनोत्तर

बोलतांना गांधीजी म्हणाले : कात्रणें पाठवणाराचें नांव मला माहीत आहे. परंतु तें नांव किंवा कात्रणांतील मजकूर मी सांगूं इच्छीत नाहीं. एवढेंच सांगतों, कीं हिंदुधर्माची सेवा करण्याच्या हेतूनें तीं दोन्ही लिखाणें आहेत. परंतु हेतु-पुरस्सर असत्यानें तीं भरलेलीं आहेत. अगदींच काल्पनिक लिहिणें नसलें, तरी सत्याचा विपर्यास येथें आहे. कोणत्याहि कामांत असत्यामुळें सफलता येत नसते. धर्माची सेवा मग तर दूरच राहो. जेव्हां हल्ला सत्यावर आधारलेला नसतो, तर कल्पित कथेवर आधारलेला असतो, तेव्हां ज्यांच्यावर हल्ला होत असतो त्यांना कांहींच अपाय होत नसतो. लोकांनीं असल्या वर्तमानपत्रांस थारा देतां कामा नये. मग ते लेखक किती का प्रसिद्ध असेनात !

## नियंत्रणें दूर करा

तुम्हांला एक आनंदाची गोष्ट सांगायची आहे. प्रांतिक मंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधि डॉ. राजेंद्रप्रसादांना भेटायला आले होते. अन्नमंत्र्यांनीं बिनसरकारी समिति या बाबतींत सल्ला द्यायला नेमली होती. तिनें आपला अहवाल दिला आहे. आतां अन्नमंत्र्यांना शेवटचा निर्णय घ्यायचा आहे. मी प्रांतिक मंत्री वा त्यांचे प्रतिनिधी यांना भेटलों. त्यांना भेटून त्यांच्या शंका दूर करायची माझी इच्छा आहे, असें मींच राजेंद्रबाबूंना म्हटलें होतें. मी ज्या निर्णयावर आलों आहे तो योग्य आहे याविषयीं मी निःशंक आहें. राजेंद्रबाबूंनींहि माझी सूचना तत्काळ स्वीकारली. निरनिराळ्या प्रांतांतील जुने मित्र भेटले. मला आनंद झाला. जातीय अशांततेबद्दलचीं माझीं मतें जरी पटलीं नाहींत, तरी अन्नधान्य-परिस्थितीबाबतच्या मतां-विषयीं तसें झालें नाहीं हें सांगायला आनंद होत आहे. अन्नधान्यनियंत्रणें, कापडनियंत्रणें दूर करा हें माझें मत आजचेंच नाहीं. बंगालचे गव्हर्नर कॅसी यांच्याशीं मागें माझ्या अनेक मुलाखती झाल्या, त्या वेळेपासूनचें माझें हें मत आहे. मला कोणाचा पाठिंबा आहे कीं नाहीं हें त्या वेळेस मला माहीत नव्हतें. परंतु आजकाल या प्रश्नाची चर्चा चालली आहे. आणि जनतेंतील पुष्कळ प्रसिद्ध-अप्रसिद्ध लोकांचा मला पाठिंबा आहे हें पाहून मला आश्चर्य वाटलें. या विषयासंबंधीं भरपूर पत्रव्यवहार माझा झाला आहे.

एकहि लेखक विरोधी नाहीं आढळला. श्री. घनश्यामदास बिर्ला, लाला श्रीराम यांच्यासारखे उद्योगपती यांची मतें मला माहीत नव्हतीं; तद्वतच समाजवादी पक्षाचे डॉ. राम मनोहर लोहिया भेटून माझ्या सूचनेला संपूर्ण पाठिंबा देईपर्यंत या पक्षाकडून मला पाठिंबा मिळेल हेंहि मला माहीत नव्हतें. देशांतील आजच्या अन्नाच्या टंचाईच्या काळांत डॉ. राजेंद्रप्रसादांनीं सरकारी नोकरांनीं दाखविलेल्या मार्गानें न जातां या बिनसरकारी समितीच्या एक किंवा अनेक सभासदांच्या सल्ल्याप्रमाणें वागावें, असें सांगायला मला बिलकुल दिक्कत वाटत नाहीं.

## खादी विरुद्ध गिरणीचें कापड

आतां कापडावरील नियंत्रणाचा प्रश्न. अन्नाच्या प्रश्नाप्रमाणेंच या प्रश्नावरहि माझें मत तसेंच असलें, तरी हीं नियंत्रणें दूर करण्यांत मला तितकासा इतरांचा पाठिंबा नाहीं. माझें म्हणणें तर अगदीं सरळ आहे. परदेशांतून येणाऱ्या वा देशांतील गिरण्यांत बनणाऱ्या कापडाची संपूर्ण जागा खादी घेऊं शकेल या माझ्या मताचा काँग्रेसनें संपूर्णपणें स्वीकार केला होता. काँग्रेसनेंच स्वर्गीय जमनालालजींच्या नेतृत्वाखालीं खादी-बोर्ड स्थापिलें होतें. मी येरवडा तुरुंगांतून सुटल्यावर यालाच अखिल भारतीय चरखा संघाचें मोठें रूप देण्यांत आलें. हिंदुस्थानांत ४० कोटी लोक आहेत. पाकिस्तान वगळून तर ३० कोटी आहेत. जरूर तेवढा कापूसहि देशांत पिकतो. कापसाचें सूत काढून देणारे भरपूर आहेत आणि त्या सुताचें कापड विणून देणारेहि जरुरीपेक्षां अधिक इतके आहेत. फारसें भांडवल न गुंतवतां चरखे, माग व इतर साधनें निर्माण करतां येतील. खादीशिवाय कांहीं वापरणार नाहीं हा निर्धार आणि दृढ श्रद्धा या दोन गोष्टींची फक्त जरुरी आहे. वाटेल तितकी तलम खादी निर्माण होऊं शकते. मिलच्या कापडाहूनहि सुंदर नि तलम नमुने खादी देऊं शकते हें तुम्ही जाणतां. आज परसत्ता गेल्यामुळें पूर्वीं खादीला जो विरोध होत असे तोहि नाहीं. परंतु आज आपल्या हातीं सूत्रें आल्यावर खादीबद्दल कोणीच कांहीं बोलत नाहीं हें पाहून मला आश्चर्य वाटतें. खादीविषयींची माझी श्रद्धा कोणाजवळ आहे

असें दिसत नाहीं. हिंदुस्थानला कापड पुरवायचें म्हणजे त्यांना गिरणीच दिसते. खादीचें अर्थशास्त्र हेंच हिंदुस्थानचें निर्दोष अर्थशास्त्र आहे या-विषयीं मला तिळमात्र शंका नाहीं.

५७

७-११-'४७

## टेहर गांवाचा दौरा

टेहर गांवच्या सतावलेल्या मुसलमानांस भेटायला गांधीजी गेले होते. तेथें त्यांना अपेक्षेहून अधिक वेळ रहावें लागलें. म्हणून ते आले ते सरळ प्रार्थनेलाच आले. प्रार्थनेनंतर म्हणाले, " टेहर व आसपासच्या मुसलमानांना निष्कारण त्रास सहन करावा लागत आहे. मला दुःख होतें याचें. त्यांतील बरेचसे शेतीवाडी असलेले आहेत. परंतु त्यांना शेतांत जातां येत नाहीं. बैल, नांगर आणि इतर जंगम सामान त्यांनीं विकून टाकलें. लष्कर त्यांचें रक्षण करीत आहे. माझ्याभोंवतीं ती दुःखी-कष्टी जनता गोळा झाली. दोन हजार लोक जमले. पुढाऱ्यांच्या तोंडानें ते म्हणाले, ' आम्ही पाकिस्तानांत जातों. कारण येथें जीवन अशक्य आहे. अनेक मित्र, आतेष्टहि आधींच गेलेहि आहेत. शक्य तितक्या लौकर आम्हांला लाहोरला पाठवाल, तर दया होईल. लष्करी पहारा जो आहे त्याच्याविषयीं आमची कांहीं तक्रार नाहीं.' परंतु टेहरचें सारें वर्णून मी वेळ घेऊं इच्छीत नाहीं. मीं तेथील जमलेल्या लोकांना म्हटलें, कीं माझ्या हातीं सत्ता नाहीं. मी तुमचा निरोप प्रधान-मंत्रि व उपप्रधान-मंत्रि जे गृहमंत्रीहि आहेत, त्यांना आनंदानें कळवीन."

## एक धडा

मला दिल्लींतील शरणार्थींच्या प्रश्नासंबंधीं सांगायचें आहे. हा प्रश्न दिवसें-दिवस गुंतागुंतीचा होत आहे. शरणार्थींना वाटतें, कीं आपण दुखावलेले असल्यामुळें आपणांस कांहीं विशेष हक्क आहेत. दुकानदारांनीं मोफत माल द्यावा किंवा पुष्कळशा कमी किंमतींत द्यावा असें त्यांना वाटतें. कधीं कधीं

एकेक व्यक्ति शेंकडों रुपयांचा माल घ्यायला येते. टांगेवाल्यांनीं फुकट किंवा अगदीं थोड्या भाड्यांत न्यावें अशी त्यांची इच्छा असते. जर या गोष्टी खऱ्या असतील, तर आपत्तीमुळें सामान्यतः जो धडा आपद्ग्रस्त शिकतात तो हे लोक शिकले नाहींत, असें मला म्हणणें प्राप्त आहे. शरणार्थी अशा वर्तनानें स्वतःचें आणि देशाचें नुकसान करीत आहेत. आणि आधींच गुंतागुंतीचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा करीत आहेत. जर असें वर्तन चालू राहील, तर दिल्लीच्या दुकानदारांची सहानुभूति हे लोक गमावून बसतील.

## शरणार्थींना सल्ला

ज्यांचें सारें गेलें ते शरणार्थी इतकी खरेदी कशी करूं शकतात, मी समजूं शकत नाहीं. ईश्वरानें पाय दिले आहेत. योग्य अशा वेळीं वाहन वापरावें. नाहीं तर पायांनीं जावें. शरणार्थी आल्यावर दारूचें उत्पन्न बरं अपार वाढल्याचें कळतें. प्रान्तिक व मध्यवर्ती सरकारें काँग्रेसच्या ठरावाशीं निष्ठावंत असतील, तर दारू, अफू, गांजा या वस्तू कोठेंच मिळतां कामा नयेत. पाकिस्तानला असें करायला काँग्रेसच्या ठरावाची जरुरीहि नाहीं. अपरंपार हाल-अपेष्टा ज्यांनीं भोगल्या त्या शरणार्थींनीं एवढाहि संयम शिकूं नये का? दारू पिणें, मादक पदार्थ घेणें, ऐषारामांत रमणें याचा त्यांनीं त्याग नको करायला? मीं माझ्या पूर्वींच्या प्रार्थनोत्तर प्रवचनांत अनेकदां सांगितल्याप्रमाणें शरणार्थी वागतील अशी मला आशा आहे. ज्यांच्यामध्यें राहतां त्यांना ओझें नका होऊं. दुधांत साखर, त्याप्रमाणें तुमचें हें राहणें होवो. श्रीमंत वा गरीब शरणार्थींनीं त्याच अंगणांत, त्याच शिबिरांत, छावणींत एकत्र नांदावें. आदर्श नागरिक होण्यासाठीं, स्वावलंबी होण्यासाठीं एकत्र सहकार्यानें काम करा.

## ५८

८-११-’४७

नेहमींच्या विनयी विरोधकाहून आणखी तीन विरोधक कुराणांतील भाग

म्हणायला आज होते. गांधीजींनीं श्रोत्यांना विचारलें, " पूर्वींची अट तुम्हांला माहीत आहे. तुम्ही लक्षपूर्वक प्रार्थना करणार असाल, मनांत त्या विरोधकांविषयीं जर असद्भाव बाळगणार नसाल तर प्रार्थना करूं. " सारे श्रोते म्हणाले, " आम्ही त्याप्रमाणें वागूं." विरोधक सर्व प्रार्थनेंत शान्त होते. म्हणून गांधीजींनीं शेवटीं त्यांना धन्यवाद दिले.

## शीख-धर्मग्रंथांतून पठण

गांधीजींनीं एका शीख मित्राच्या पत्राचा उल्लेख केला. नेहमीं प्रार्थनेला हजर राहणारा तो शीख होता. त्याला प्रार्थना आवडे. त्यानें पत्रांत लिहिलें होतें, " प्रार्थनेंतील सर्वसहिष्णु वृत्ति मला फार आवडते. ग्रंथसाहेब, सुखमणि, जपजी वगैरेंचा गांधीजी उल्लेख करतात, किती छान. मीं शीख-धर्मग्रंथांतून अनेक उतारे आणले आहेत. त्यांतून रोज जर कांहीं म्हणण्यांत येतील, तर साऱ्या शीखांचें हृदय उचंबळेल असें मला वाटतें. मी ते उतारे तुम्हांला म्हणून दाखवीन." गांधीजी म्हणाले, " मी ते उतारे ऐकून घेईन नि मग निर्णय घेऊं. असें करायला कांहींच हरकत नाहीं. पत्रलेखकानें श्री. व्रजकृष्णजींना भेटून वेळ ठरवून घ्यावी."

## कापसाच्या गांठींविषयीं

मीं शरणार्थींसाठीं सुया, कापूस व कांहीं छापलेलें कापड मिळावें म्हणून सुचविलें होतें. म्हणजे त्यांना रजया करतां येतील. यामुळें लाखों रुपये वांचून पुन्हां थंडीपासून बचाव होईल. मुंबईच्या कापूसव्यापाऱ्यांनीं या बाबतींत सामान पुरवायचें ठरवलें आहे. अशा मार्गानें शरणार्थींची प्रतिष्ठाहि वाढेल. सुंदर सहकार्याचा धडाहि ते शिकतील. स्वतः दिल्लींतहि कापसाच्या गिरण्या कमी नाहींत. त्या चालू आहेत. परंतु मुंबईच्या देणगीचा मी स्वीकार करतों. स्वेच्छेनें देणाऱ्यांवर मी अनावश्यक ओझें घालूं इच्छीत नाहीं. दान देणारे जितके अधिक, तितका शरणार्थींचा नि देशाचा फायदा होईल. यासाठीं मुंबईचे कापसाचे व्यापारी कापसाच्या ज्या गांठी पाठवूं शकणार असतील, त्या त्यांनीं लौकरांत लौकर पाठवाव्या. धनवान् लोक असा सहकार करतील, तर सरकारचें ओझें कमी होईल. आपण स्वतंत्र

झालों असल्यामुळें प्रत्येकाला स्वेच्छेनें सरकारच्या कामांत भाग घेतां येईल. स्वतंत्र देशांतील नागरिकांच्या सर्व जबाबदाऱ्या नीट ओळखून प्रत्येकानें त्या स्वेच्छेनें बिनशर्त पार पाडाव्या.

## खादीची निर्मिति

कापूस आला म्हणजे मिलमालकांना मी पुरेसें कॅलिको कापड रझयांसाठीं द्यायला सांगेन. त्यासाठीं त्यांचें मन वळवणें शक्य होईल. कापसाच्या गांठींमुळें मला वस्त्रनियंत्रणाचा प्रश्नहि समोर दिसतो. सर्वांना पुरेसा कापूस जर देशाच्या सर्व भागांना पुरवला, तर सर्व देशाला पुरेशी खादी हातानें देतां येईल. आणि हिंदुस्थानांत कापसाचा दुष्काळ पडलेला मला माहीत नाहीं, आणि कधीं पडणारहि नाहीं. कारण जरुरीपेक्षां अधिक आपण पिकवीत असतों. देशांतील हजारों कापसांच्या गांसड्या परदेशांत जातात, तरी देशी गिरण्यांना कांहीं कापूस कमी पडत नाहीं. मीं मागेंच सांगितलें, कीं हातानें पिंजणें, कांतणें, विणणें याला लागणारीं सारीं साधनें येथें होऊं शकतात, मिळूं शकतात, आणि लोकसंख्याहि भरपूर आहे. मग देशांत वस्त्र-टंचाई कां? आळस, एवढेंच मी म्हणूं शकेन. वस्त्र-नियंत्रण कोणालाच नको आहे. गिरण्यांना, गिरणी-कामगारांना, विकत घेणाऱ्या जनतेला, कोणालाच नको आहे. नियंत्रणामुळें देशाचें नुकसान होत आहे. आळशी लोकांची संख्या वाढत आहे. उद्योगधंदा मिळत नसल्यामुळें हे बेकार लोक मग सतत वेडेंवाकडें करीत राहतात, तो एक त्रास.

## स्वावलंबन आणि सहकार

माझें शरणार्थींना सांगणें, कीं त्यांनीं रजया केल्यावर मग मिळेल तो प्रत्येक क्षण सर्व स्त्री-पुरुषांनीं, कापूस लोढण्यांत, पिंजण्यांत, कांतण्यांत, विणण्यांत वगैरे दवडावा. अशा सहकारी उद्योगांतून प्रकट होणारी शक्ति साऱ्या देशाला विद्युन्मय करूं शकेल. सारी जनता शरणार्थींचें अनुकरण करून कामाला लागेल. आळसांत जाणारा प्रत्येक तास अधिक अन्न नि अधिक कपडा निर्माण करण्यांत जाईल. आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवा, कीं शेतांतील कापूस तसाच कांतणाऱ्यांच्या घरीं गेला, तर एक प्रक्रिया

वांचेल. कापूस दुखावला जाणार नाहीं, पिंजणें सोपें जाईल, सरकीहि घरीं उपयोगाला राहील.

## भूतदयेची मूर्ति

आणि लेडी माउंटबॅटन भेटायला आल्या होत्या. त्या तर भूतदयेची मूर्ति बनल्या आहेत. दोन्ही भागांत त्या सतत हिंडत आहेत. आजारी आपद्ग्रस्त जे असतील त्यांना भेटून जो कांहीं दिलदिलासा देतां येईल तो देत आहेत. त्या कुरुक्षेत्र छावणीवर गेल्या होत्या. 'गांधीजी केव्हां येणार' म्हणून शरणार्थींनीं त्यांना विचारलें. मला त्या म्हणाल्या, "गांधीजी येतील अशी आशा मीं त्यांना दिली. माझी आशावाणी ऐकूण त्यांच्या तोंडून उत्कट उद्गार बाहेर पडत." तुम्ही त्यांना आशा दिलीत ती योग्यच होती असें मीं त्यांना म्हटलें. पानिपतला जायचें मीं ठरवलेंच आहे. तेथें हिंदू-मुसलमान दोघेहि मला भेटायला उत्सुक आहेत. त्याच वेळेस मीं कुरुक्षेत्रां-सहि भेट द्यायचें ठरविलें होतें; परंतु त्याच फेरींत जमणार नाहीं असें दिसून आलें आहे. म्हणून अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या बैठकीनंतर केव्हां तरी जाण्याचें ठरवावें लागेल. कुरुक्षेत्राला प्रचंड छावणी आहे. तेथें ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करणें जड आहे. परंतु दिल्लीहूनच रेडिओवरून मी तेथील छावणींतल्या लोकांना उद्देशून बोलूं शकेन. फक्त छावणींत जरूर तो यांत्रिक संबंध जोडला गेला म्हणजे झालें. तसें झालें, तर मंगळवारीं किंवा बुधवारीं मी त्यांच्याशीं बोलेन. पुढें भेट देईन. दरम्यान पानिपतला जाऊन येईन.

## ५९

९-११-'४७

उद्यां पानिपतला जायचें असल्यामुळें आज लौकरच प्रार्थनोत्तर गांधी-जींनीं लिहिलेलें निवेदन वाचून दाखवण्यांत आलें.

मला मौन सुरू करावें लागलें. कारण पानिपतला गेल्याबरोबरच तेथील

हिंदू-मुसलमानांसमोर मला बोलायचें आहे. तेथून मी उद्यां प्रार्थनेला वेळेवर येईन अशी उमेद आहे. त्या वेळेस मी बोलेन. उद्यां मी कुरुक्षेत्राला जात आहे असें वृत्तपत्रांतून आलें आहे तें चुकीचें आहे. मीं निश्चितपणें सांगितलें होतें, कीं अ. भा. कॉंग्रेस समितीच्या बैठकीनंतर मी जायचें म्हणत आहें. कदाचित् बुधवारीं आकाशवाणीवरून त्यांना उद्देशून मी बोलेन. वेळ योग्य वेळेस जाहीर करण्यांत येईल.

## दिवाळी-उत्सव नको

लौकरच दिवाळी येईल. एक शरणार्थिनी भगिनी लिहितेः

" आम्हीं दिवाळी साजरी करावी कीं न करावी याविषयीं आमच्यांतील पुष्कळांना सुचत नाहीं. मी माझ्या मोडक्यातोडक्या हिंदी भाषेंतून आमचे विचार तुमच्यासमोर मांडीत आहें. मी गुजराणवाला येथील शरणार्थिनी. माझें तेथील सर्वस्व गेलें. तरीहि आपलें स्वातंत्र्य आलें म्हणून आमचीं मनें आनंदानें भरलेलीं आहेत. स्वतंत्र भारतांतील ही पहिलीवहिली दिवाळी. म्हणून आम्हीं आमचीं दुःखें विसरणें चांगलें. हिंदुस्थानभर दीपोत्सव होवोत अशी आमची इच्छा असावी. आमच्या दुःखक्लेशांनीं तुमचें हृदय विदीर्ण झालें आहे हें मी जाणते. हिंदुस्थाननें उत्सव करूं नये असेंच तुम्ही म्हणाल. तुमच्या सहानुभूतीबद्दल आम्ही ऋणी आहोंत. परंतु तुम्ही सर्व शरणार्थींना नि हिंदवासीयांना आनंदोत्सव करायला सांगा. जे निराधार आहेत, त्यांना धनवंतांनीं साहाय्य करावें म्हणून सांगा. स्वातंत्र्यानंतर येणाऱ्या सर्व उत्सवांतून आम्ही आनंदानें भाग घेऊं असें शहाणपण तो परमात्मा आम्हांस देवो."

ही बहीण आणि तिच्याच सारखीं आणखी माणसें यांच्या या वृत्तीचें जरी मीं कौतुक केलें, तरी मला सांगणें भाग आहे, कीं ही विचारसरणी चूक आहे. ज्या कुटुंबावर आपत्ती कोसळतात, तें कुटुंब शक्य तों आनंदोत्सवांत भाग घेत नाहीं हें आपण जाणतों. एकतेचें लहान प्रमाणांतील तें उदाहरण असतें. या मर्यादितपणाच्या थरांतून पलीकडे चला आणि सारें हिंदुस्थान म्हणजे एक कुटुंब होईल. साऱ्याच सीमा ओलांडू, तर आपण वसुधैव कुटुंबकम्

बनूं. आणि खरोखरच सारें जग म्हणजे एक कुटुंब नाहीं का? असल्या संकुचितपणाच्या सीमा न ओलांडणें म्हणजे मानवाला मानव बनवणाऱ्या सर्व सुंदर भावनांना दूर फेंकणें होय. आपण स्वार्थी होऊन नाहीं चालणार; खोट्या भावनांनीं विवश होऊन वस्तुस्थितीकडे डोळेझांक करणें हेंहि बरें नव्हे. दिवाळीचा उत्सव नका करूं असें जेव्हां मी म्हणतों, त्या वेळेस माझें म्हणणें निराळ्याच थोर विचारांवर आधारलेलें असतें. शरणार्थींचा प्रश्न हिंदू, मुसलमान, शीख सर्वांना व्यापून उभा आहे. अन्न आणि वस्त्र यांची (मनुष्यनिर्मित असली तरीहि) टंचाई आहे. अधिक खोल कारण म्हणजे जे सार्वजनिक मताला वळण देऊं शकतात त्यांचा अप्रामाणिकपणा आहे; ज्यांच्यावर हालअपेष्टा कोसळल्या आहेत, त्यांचाहि त्यांतून धडा न घेण्याचा हटवादीपणा आहे; माणसामाणसांतील अपार अमानुषता आहे. या दुःखराशींत मी आनंद मानायचें चिन्ह पाहूं शकत नाहीं. उत्सव-समारंभांत भाग घ्यायचा नाहींच असें निर्धारानें सारे ठरवतील, तर आत्मनिरीक्षणाला आणि आत्मशुद्धीला त्यामुळें चालना मिळेल. अपार कष्ट आणि वेदना यांनीं आशीर्वादरूप जें मिळविलें, तें ज्यायोगें मातींत जाईल असें आपण नाहीं कांहीं करतां कामा.

## परकीय वसाहतींतील स्वातंत्र्य

या आठवड्यांत फ्रेंच हिंदुस्थानांतील कांहीं मित्र भेटायला आले होते. त्यांच्या बाबतींत कांहीं सांगणें जरूर आहे. चंद्रनगरमध्यें जो सत्याग्रह म्हणून मानला गेला, त्या बाबतींत मीं जें म्हटलें त्याचा उपयोग तेथील लोकांच्या आकांक्षा दडपून टाकण्यांत केला जात आहे असें ते म्हणाले. फ्रेंच संस्कृतीचा सत्परिणाम राखून चंद्रनगर हिंदी संघराज्यांतील स्वायत्त भाग व्हावा म्हणून तेथील लोकांची आशा-अपेक्षा आहे. ते आणखी असेंहि म्हणाले, कीं ब्रिटिश हिंदुस्थानांत पंचमस्तंभी असत तसे तेथेंहि आहेत. ते आपल्या स्वार्थासाठीं फ्रेंच अधिकाऱ्यांशीं संगनमत करतात. फ्रेंच अधिकारीहि फ्रेंच हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वाभाविक आकांक्षा दडपून टाकतात. फ्रेंच हिंदुस्थानांतून आलेल्या मित्रांनीं सांगितलेला वृत्तान्त

खरा असेल, तर मला फार वाईट वाटतें. तें कांहीं असो. माझें मत निश्चित आहे. ब्रिटिश सत्तेपासून कोट्यवधि लोक मुक्त झाले असतां त्यांचे या छोट्या छोट्या वसाहतींतील भाऊबंद गुलाम राहणें अशक्य आहे. चंद्रनगरच्या बाबतींतील माझ्या स्नेहमय सांगण्यासंबरण्याचा विपर्यास केला जात असेल, तर आश्चर्य होय. हिंदुस्थानांतील या छोट्या छोट्या परकी वसाहतींतील हिंदी लोकांचा दर्जा कमी असला तरी मला चालेल, असें कोणी माझ्या शब्दांतून काढणें म्हणजे सत्याचा विपर्यास होय. मी हें कसें सहन करीन? मी आशा राखतों, कीं मला मिळालेली माहिती निराधार असेल; थोर फ्रेंच राष्ट्र हिंदुस्थानांतील वा अन्य ठिकाणचे काळे वा पिंगट कोणाहि लोकांना दडपून टाकण्याच्या धोरणाशीं एकरूप होणार नाहीं, अशी मला उमेद आहे.

६०

१०-११-'४७

## देवाचे सेवक बना

भजनगीताचा उल्लेख करून गांधीजी म्हणाले, " मीराबाईप्रमाणें ईश्वराचे, फक्त त्याचेच सेवक आपण बनूं, तर सारीं दुःखें दूर होतील. मी जें काय सांगणार आहें तें ऐकल्यावर संदर्भ तुमच्या लक्षांत येईल. जुनागडविषयीं तुम्हीं वृत्तपत्रांतून सारें वाचलें आहे. राजकोटहून दोन तारा मला मिळाल्या आहेत. वृत्तपत्रांतील बातमी बरीचशी बरोबर आहे हें पाहून मला समाधान झालें. जुनागडचे मुख्य मंत्रि भूतोसाहेब, तसेंच नबाबसाहेब कराचीला गेले आहेत. उपमुख्यमंत्रि मेजर हार्वे जोन्ससाहेब जुनागडमध्यें आहेत. जुनागडनें हिंदी संघराज्यांत सामील व्हावें असें या सर्वांचें मत होतें. कायदेआझम जीनांचेंहि असेंच मत होतें, असा तर्क करण्याचा तुम्हांला हक्क आहे. जर जीनांचेंहि तसेंच मत खरोखर असेल, तर काश्मीर-हैदराबादचा प्रश्नहि पटकन सुटेल, सारी कटकट मिटेल. आणखीहि पुढें जाऊन मग मी म्हणूं शकेन, कीं दोन्ही वसाहतींतहि मैत्री होऊन सहकार्यानें सारें होऊं लागेल.

कायदेआझमांकडे मी गव्हर्नर-जनरल म्हणून नाहीं बघत. गव्हर्नर-जनरल या नात्यानें पाकिस्तानांतील भानगडींत, कारभारांत त्यांना हस्तक्षेप करतां येणार नाहीं. त्यांची स्थिति माउंटबॅटनसारखीच केवळ सनदशीर गव्हर्नर-जनरल म्हणून आहे. माउंटबॅटनच पहा. त्यांना इंग्लंडांत पुत्राहूनहि प्रिय अशाच्या लग्नाला मंत्रिमंडळाच्या परवानगीनेंच जातां आलें. ब्रिटिश सिंहासनावर वारसा असणारणीशीं वराचें लग्न व्हायचें होतें. माउंटबॅटन २४ ला परत येतील. परंतु अशा दृष्टीनें कायदेआझमांकडे मी नाहीं बघत. आजकालच्या मुस्लीम लीगचे निर्माते व ज्यांच्या परवानगीशिवाय व ज्यांना कळवल्या-शिवाय पाकिस्तानांत कांहीं घडूं शकत नाहीं, अशा दृष्टीनें मी बघून बोलत आहें. जुनागडनें हिंदी संघराज्यांत सामील होण्याच्या पाठीमागें जर जीनासाहेबांचीहि संमति असेल, तर मोठी आनंदाचीच गोष्ट; भविष्या-बद्दल आशा वाटूं लागते.

## पानिपतला भेट

परंतु तुम्हांला मुख्यतः पानिपतची हकिकत सांगायची आहे. माझ्याबरोबर मौलाना अबुल कलम आझाद होते. राजकुमारी अमृतकौरहि येणार होत्या. परंतु मला माझ्या घड्याळांतील साडेदहाच्यापुढें अधिक वाट पाहणें शक्य नव्हतें. त्या तर सरकारी कचेरींत होत्या. पानिपतला गेल्यानें बरें वाटलें. दवाखान्यांतील मुसलमान आजारी पाहिले. कांहींना भीषण जखमांच्या वेदना झालेल्या आहेत. म्हणून शक्य तें सारें लक्ष त्यांच्याकडे देण्यांत येत आहे. राजकुमारी अमृतकौर यांनीं चार डॉक्टर, सेविका आणि इतर वैद्यकीय साधनें पाठवून दिलीं आहेत. मी मुसलमानांच्या प्रमुखांना भेटलों. स्थानिक हिंदू व शरणार्थींचे प्रतिनिधी यांच्याहि भेटी घेतल्या. शरणार्थींची संख्या जवळजवळ २० हजार आहे म्हणतात. दररोज अधिकाधिक येतच आहेत. डेप्युटी कमिशनर आणि पोलिस सुपरिंटेंडेंट फिकिरींत आहेत. हिंदू व मुसल-मान दोघेहि या अधिकाऱ्यांविषयीं फारच चांगलें बोलतात, हें सांगायला मला आनंद होतो. शरणार्थी तर बोलतातच. म्युनिसिपलगृहाजवळ शरणार्थी जमले होते. पाकिस्तानमध्यें, पानिपतमध्यें त्यांना अपार मुसीबती झेलणें भाग पडलें आहे. कितीकांना स्टेशनच्या फलाटावर राहावें लागलें. कांहींना तर अगदीं

उघड्यावर निराधार पडावें लागलें. सीमातीत दुःख. तरीहि त्यांच्या मनांत चिडचिड नव्हती. आम्हांला पाहून त्यांना बरें वाटलें. डेप्युटी कमिशनर किंवा कोणाला न कळवतां, आधीं सूचना न देतां भराभरा पानिपतकडे शरणार्थी आणून कोंबले जात आहेत हें निर्दयपणाचें आहे. स्टेशनवर गाड्या आल्या म्हणजे किती आले आहेत तें कळतें. खरोखर ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शरणार्थींत स्त्रिया, मुलें, म्हातारी मंडळीहि आहेत. कांहीं शरणार्थिंनीं स्टेशन-प्लॅटफॉर्मवर प्रसूत झाल्याचें मला सांगण्यांत आलें.

## डॉ. गोपीचंद

हें सारें पूर्व पंजाबांतील आहे. तेथें डॉ. गोपीचंद भार्गव मुख्य प्रधान आहेत. ते माझे थोर सहकारी आहेत. ते समर्थ असे संघटक असल्याचें मला कित्येक वर्षांपासून माहीत आहे. पंजाबी लोकांवर त्यांचें वजन आहे. हरिजन-सेवक-संघ, अखिल भारतीय चरखा संघ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, यांतून त्यांनीं काम केलें आहे. पूर्व पंजाबचा प्रश्न त्यांच्या शक्तीच्या बाहेर आहे असें मला वाटत नाहीं; परंतु पानिपत म्हणजे जर त्यांच्या कर्तृत्वाचा नमुना असेल, तर त्यांच्या सरकारला मान खालीं घालण्यासारखी ती गोष्ट आहे. सूचना न देतां वाटेल तसे आणून शरणार्थी कां कोंबतां ? त्यांच्या सत्कारार्थ पुरेशी व्यवस्था कां नाहीं ? कोण किती येतात हें अधिकाऱ्यांना आगाऊ कां कळूं नये ? आणि बातमी नुकतीच कळली, कीं गुरगांव जिल्ह्यांतील तीन लाख भीतीनें निघून जाण्याच्या बेतांत आहेत. ते उघड्यावर रहात आहेत. रस्त्यावर आहेत. बायकामुलें, गुरेंढोरें सारें घेऊन कडक थंडींत ३०० मैलांचा प्रवास करीत आपणांस जावें लागणार असें त्यांना वाटत आहे. माझा या गोष्टीवर विश्वास नाहीं बसत. मित्रांनीं सांगितलेल्या हकिकतींत कांहीं चूक असावी; अतिशयोक्ति असावी असें प्रथम वाटत होतें. परंतु पानिपतला जें पाहिलें, त्यावरून तें खरें असावें सारें असें वाटतें. कांहीं असो. डॉ. गोपीचंद आणि त्यांचें मंत्रिमंडळ यांनीं वेळींच सावध व्हावें. सर्व शरणार्थींची नीट व्यवस्था लाविल्याशिवाय त्यांनीं विश्रांति घेऊं नये. अत्यंत दक्षता, दूरदर्शीपणा यांनींच हें शक्य होईल.

# ६१

१९-११-'४७

## जुनागड

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, " जुनागडच्या मुख्य व उपमुख्य मंत्र्यांच्या सांगण्यावरून तात्पुरतें सरकार जुनागडमध्यें शिरलें आहे, अशी बातमी काल मीं दिली होती. जुनागडच्या जनतेच्या लढ्याचा सुखद शेवट म्हणून कांहींशी आनंदानें नि आश्चर्यानेंच मीं ती वार्ता दिली होती. परंतु जुनागडच्या अधिकाऱ्यांच्या विनंतीस कायदेआझमांची संमति नसेल, तर आनंद मानणें अकालीं ठरेल. रयतेच्या वतीनें तात्पुरत्या सरकारनें जुनागडचा ताबा घेतलेला पाहून पाकिस्तानचे अधिकारी संतापले आहेत. त्यांचें असें मागणें, कीं हिंदी लष्कर संस्थानांतून काढून घेण्यांत यावें; कायदेशीर सरकारच्या हातीं कारभार सोंपाविणें, हिंदी संघराज्यांतील लोकांकडून संस्थानी प्रजेवर होणारे अत्याचार नि हल्ले यांना बंदी घालणें. त्यांचें पुढें असें म्हणणें, कीं दिवाण किंवा राजा यांना हिंद सरकारशीं तात्पुरती वा कायम स्वरूपाची तडजोड करण्याचा हक्कच नाहीं! हिंद सरकारचें कृत्य म्हणजे पाकिस्तान-प्रदेशाची उघड उघड पायमल्ली आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा हा भंग आहे.

## हिंदी संघराज्यांत सामील होणें

परंतु काल वृत्तपत्रांत आलेल्या बातम्यांवरून पाहतां आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग झाला आहे असें मला दिसत नाहीं. हिंदी संघराज्यानेंहि ताबा नाहीं घेतलेला. जुनागडच्या लोकांच्या वतीनें तात्पुरत्या सरकारनें चालवलेल्या संमग्र चळवळींत मला तरी असनदशीर, बेकायदेशीर असें कांहीं दिसत नाहीं. संपूर्ण काठेवाडच्या सुरक्षिततेसाठीं म्हणून काठेवाडी राजेरजवाड्यांनीं विनंति केल्यावरूनच हिंद सरकारनें आपल्या सैन्याचा उपयोग करूं दिला; म्हणून या सर्व घडामोडींत कांहीं बेकायदा आहे असें मला तरी दिसत नाहीं. आणि जुनागडच्या दिवाणांनीं जी आतां उलटी कोलांटी मारली आहे, तिचेंहि माझ्या मतें समर्थन करतां येणार नाहीं. मी

या बाबतींत एकंदरींत पुढीलप्रमाणें बघतों. जुनागड संस्थानांत ८५ टक्के हिंदु प्रजा आहे. प्रजेच्या संमतीशिवाय पाकिस्तानमध्यें सामील होण्याचा जुनागडच्या नबाबसाहेबांना बिलकुल अधिकार नाहीं. गिरनारच्या पवित्र टेकडीवर अनेक मंदिरें आहेत. हिंदूंनीं अपार पैसा तदर्थ खर्चिलेला आहे. सर्व हिंदुस्थानांतून तेथें यात्रेकरू येतात. हा भाग जुनागडमध्येंच येतो. स्वतंत्र हिंदुस्थानांत आतां सर्व हिंदची मालकी हिंदी प्रजेची आहे. आतां व्यक्तिगत राजेरजवाड्यांची मालकी नाहीं. ते जनतेचे विश्वस्त म्हणून होतील, तरच त्यांचा हक्क राहील. प्रत्येक करारासाठीं म्हणून जनतेची परवानगी हवी. या राजेरजवाड्यांना आपण प्रजेचे केवळ प्रतिनिधि आहोंत या गोष्टीचें अजून भानच नाहीं! प्रजेसहि एकंदरींत आपण खरे मालक याची जाणीव कांहीं सन्मान्य अपवाद वगळले, तर संस्थानांतून आली आहे असें नाहीं. असें असलें तरीहि मीं मांडलेल्या सिद्धान्तांत कांहीं चूक आहे असें नाहीं. कोठें सामील व्हायचें हें जनतेनेंच ठरवावयाचें. तात्पुरतें सरकार जुनागडच्या प्रजेचें प्रतिनिधि म्हणून नसेल, तर तें दरोडेखोर ठरेल. दोन्ही सरकारांनीं त्याला थारा नाहीं देतां कामा. त्याप्रमाणेंच एखादा राजा व्यक्तिगत या वा त्या राज्यांत सामील होऊं म्हणेल, तर जगाच्या न्यायासनासमोर हिंद वा पाक सरकारला त्याचें समर्थन नाहीं करतां येणार. जुनागडच्या नबाबसाहेबांच्या पाकिस्तानांत सामील होण्याला प्रजेची संमति जोंवर नाहीं, तोंवर तें बेकायदा आहे. कोणत्या भागांत जुनागडनें सामील व्हायचें याविषयीं मतभेद असेल, तर जनमत घेऊन ठरवावें. असें करतांना सत्तेचें प्रदर्शन नसावें म्हणजे झालें. पाकिस्तान-सरकारनें घेतलेल्या वृत्तीमुळें, तद्वतच आतां जुनागडच्या मुख्य मंत्रानें अंगीकारलेल्या धोरणामुळें एक विचित्रच परिस्थिति उत्पन्न झाली आहे. पाकिस्तानची गोष्ट खरी, कीं हिंद सरकारची? कोणीं ठरवायचें? तलवारीनें प्रश्न सोडवणें दूर राहो. नेहमींप्रमाणें लवादपद्धतीनें प्रश्न सोडवावा. हिंदुस्थानांत हें काम पार पाडायला योग्य अशा स्त्री-पुरुषांची उणीव नाहीं. हिंदी लवाद नको असेल, तर जगांतील कोणत्याहि भागांतील निःपक्षपाती मनुष्य आणला, तर निदान माझी त्याला हरकत नाहीं.

## काश्मीर आणि हैदराबाद

जें मी जुनागडबाबत म्हणत आहें, तेंच काश्मीर व हैदराबादबाबतहि. प्रजेच्या ज्ञात संमतीशिवाय काश्मीरच्या महाराजांना किंवा निजामांना कोठें सामील व्हावचें तें ठरविण्याचा अधिकार नाहीं. काश्मीरच्या बाबतींत हें कधींच स्पष्ट करण्यांत आलेलें आहे. केवळ महाराजांची हिंदी संघराज्यांत सामील व्हायची इच्छा असती, तर मीं कधींच त्यांची बाजू उचलली नसती. हिंद सरकारनें काश्मीरचे महाराज व शेख अबदुल्ला हे काश्मीर व जम्मूच्या प्रजेच्या वतीनें बोलत आहेत असें धरून हें सामील होणें तात्पुरतें मान्य केलें आहे. शेख अबदुल्ला 'जम्मू आणि काश्मीरच्या केवळ मुसलमानांचेंच नव्हे, तर सर्व प्रजेचें मी प्रतिनिधित्व करण्याचा दावा करतों' असें म्हणतात; म्हणून त्यांचा या बाबतींत उल्लेख.

## काश्मीरची फाळणी

कर्णोपकर्णीं काश्मीरच्या फाळणीची गोष्ट ऐकिली. जम्मू भाग हिंद संघराज्यांत यावा, काश्मीर भाग पाकिस्तानांत जावा अशी कुणकुण आहे. अशी खंडित निष्ठा मी समजूं शकत नाहीं. हिंदी संस्थानांचे असे खंड पाडणें मला तरी बरें नाहीं वाटत. मी आशा राखतों, कीं हिंदुस्थानांत शहाणपणाचा उदय होईल. ही हिडीस परिस्थिति दूर होईल. निदान लाखों निर्वासितांच्या हाल-अपेष्टा बघून तरी सुविचार सुचो.

# ६२

१२-११-'४७

## दीपावलि-उत्सव

आज दिवाळी. या प्रसंगीं तुमचें अभिनंदन करायला हवें. पंचांगांतील हा महान् दिवस. विक्रमसंवताप्रमाणें गुरुवारपासून नवीन वर्ष सुरू होईल. हा दिवस दीपोत्सवानें आपण कां साजरा करतों तें समजून घेतलें पाहिजे. राम-रावणाचें युद्ध झालें. रामानें रावणावर विजय मिळविला. राम म्हणजे

सत् शक्तींचा प्रतिनिधि, रावण दुष्ट शक्तींचा. रामाच्या विजयानें रामराज्य स्थापलें गेलें.

## खरा दीपोत्सव

परंतु आज काय आहे ? आज रामराज्य नसल्यामुळें दीपोत्सव कसा करायचा ? ज्याच्या हृदयांत राम असेल, त्यानें रामविजय साजरा करावा. ईश्वरच तुमच्या आत्म्यांना प्रकाशित करूं शकेल. आणि तो प्रकाशच काय तो खरा. भजनांतहि ईश्वर पाहण्याची लेखकाची उत्कंठा प्रतीत होते. मनुष्यकृत दीपोत्सव बघायला गर्दी जमते, थवे लोटतात; परंतु आज हृदयांत प्रेमाचा प्रकाश हवा आहे. तरच अभिनंदनाला पात्र ठरूं. आज हजारोंची दुर्दशा आहे. श्रोत्यांतील एकादा तरी आपल्या हृदयावर हात ठेवून म्हणूं शकेल, कीं या दुःखी विपन्न निर्वासितांपैकी सारे माझे भाऊ, साऱ्या माझ्या बहिणी ? ते कोणीहि असोत, हिंदू, मुसलमान, शीख. ही आहे कसोटी. दैवी आणि आसुरी वृत्तींतील चिरंतन झगडा म्हणजे राम-रावणाचें युद्ध होय. खरा प्रकाश आंतून मिळायला हवा.

## कलंकित काश्मीर

दुःखी जखमी काश्मीरला भेट देऊन आजच पंडित जवाहरलाल परत आले. त्यांना काल किंवा आज तिसरे प्रहरींहि काँग्रेसच्या कार्यकारिणीला हजर नाहीं राहतां आलें. माझ्यासाठीं त्यांनीं बारामुल्लाहून थोडीं फुलें आणलीं होतीं. निसर्गाची ही देणगी सदैव सुंदरच असते. परंतु त्या सुंदर प्रदेशाचें सौंदर्य आज रक्तपातानें, लूटमारीनें कलंकित झालें आहे. पंडित जवाहरलाल जम्मूसाह गेले होते. तेथेंहि सारें ठीक नाहीं.

श्री. शामळदास गांधी आणि श्री. ढेबरभाई यांना मार्गदर्शन हवें होतें. म्हणून सरदार जुनागडला गेले आहेत. हिंद-सरकार दगा देत आहे, जुनागडवर सामील होण्याची सक्ती करीत आहे, असें जीनासाहेब व भूतोसाहेब यांना वाटत असल्यामुळें त्यांना घुस्सा आला आहे.

## द्वेष नि संशय दूर करा

सर्व देशांत शांति आणि सदिच्छा यावी म्हणून आपापल्या हृदयांतून

द्वेष आणि संशय काढून टाकणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. आपण आपसांतले क्षुद्र भेद न विसरूं, अंतःकरणांत ईश्वराचें अस्तित्व न अनुभवूं, तर काश्मीर वा जुनागड येथील विजयांचा काय उपयोग ? भीतीनें जे मुसलमान येथून गेले त्या सर्वांना जोंवर तुम्ही परत आणीत नाहीं, तोंवर खऱ्या अर्थानें दिवाळी नाहीं साजरी होणार. हिंदू आणि शीखांच्या बाबतींत पाकिस्तानहि याप्रमाणें न वागेल, तर त्यालाहि जगणें अशक्य आहे.

मी आकाशवाणीगृहांत गेलों होतों. तेथून कुरुक्षेत्रींच्या निर्वासितांना उद्देशून बोललों.

कॉंग्रेसच्या कार्यकारिणींत जें चाललें आहे त्यांतील मला जें सांगतां येणें शक्य आहे तें उद्यां सांगेन. गुरुवारपासून नवीन वर्ष सुरू होईल. हें नवीन वर्ष सर्वांना सुखाचें जावो अशी आशा करतों. ईश्वर तुमचीं हृदयें प्रकाशमय करो. त्या प्रकाशांत एकमेकांची, हिंदुस्थानची सेवा करा आणि त्या सेवेद्वारा जगाचीहि सेवा करा.

६३

१३-११-'४७

## विक्रम संवत्

गांधीजींनीं पूर्वी दिवाळीचा उल्लेख केला होता. आज त्यांनीं नववर्षदिनाचा उल्लेख केला. ते म्हणाले, नवीन वर्षाला प्रारंभ होतो तेव्हां आपण नवीन शुभ संकल्प करतों. हेतु हा, कीं पुढची दिवाळी तरी नीट उजवतां यावी. दीपोत्सव साजरा करायला संकोच नसावा. त्या दीपोत्सवाचा अर्थ हा, कीं केलेले सत्संकल्प वर्षभर पार पाडले.

## आसुरी शक्तींना जिंकून घेणें

मी आशा करतों, कीं येथील सारे श्रोते हिंदुस्थानांत वा पाकिस्तानांत कांहींहि होवो वा न होवो, तरी मुसलमानांचे खरे मित्र होण्याचा परम थोर प्रयत्न करतील. याचा अर्थ असा, कीं येत्या सर्व वर्षांत त्यांनीं

स्वतःच्या हृदयांतील आसुरी वृत्ति काढून टाकून तेथें दैवी वृत्तीचा प्रतिनिधि प्रभु राम स्थापिणें. दरसाल या वेळेस दीपोत्सव असतात. यंदां नाममात्र दीपोत्सव होता. जर मुळींच दिवे लावले नाहींत, तर सारें वर्ष वाईट जाईल अशी समजूत आहे; म्हणून तुरळक दिवे लावण्यांत आले. मी याला एक समजूत म्हणतों. कारण बाहेर कितीहि दिवे लावलेले असले, तरी जोंवर आंत प्रकाश नाहीं तोंवर हें सारें फोल आहे; त्यानें काय फायदा होणार ?

## मागें जाणें नाहीं

कॉंग्रेस-कार्यकारिणीच्या तीन बैठका झाल्या. मीं तुम्हांला तेथील सांगणें शक्य तें सांगेन म्हणून कबूल केलें होतें. अजून येत्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीसमोर मांडण्यासाठीं म्हणून निश्चित ठराव करण्यांत आला नाहीं. तरी पण कार्यकारिणीचे सभासद व इतर निमंत्रित यांचें एकमत आहे, कीं राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून गेलीं साठ वर्षें ती संपूर्ण जातीय ऐक्यासाठीं म्हणून उभी आहे. अनेक आपत्तींतूनहि हें ध्येय तिनें कधीं सोडलें नाहीं. ध्येयाची ही अखंड उपासना आहे. त्यापासून कॉंग्रेस मागें नाहीं जाणार. या ध्येयापासून च्युत नाहीं होणार. कदाचित् कांहीं काळ कॉंग्रेसला बहुमताचा पाठिंबा नाहीं मिळणार. तरीहि चालू असलेल्या वेडेपणाला बळी न पडतां आनंदानें नि धैर्यानें कॉंग्रेसनें त्या सत्त्व-परीक्षेंतून जावें.

## धर्मांत सक्तीला जागा नाहीं

धर्मजातिनिरपेक्ष समानता स्वातंत्र्यांत अभिप्रेत नसेल, तर त्या स्वातंत्र्याची कॉंग्रेसला काय मातब्बरी ? दुसऱ्या शब्दांत हेंच सांगायचें, तर असें म्हणतां येईल, कीं कॉंग्रेस किंवा कॉंग्रेसचें प्रतिनिधित्व करणारें कोणतेंहि सरकार केवळ लोकशाहीचें असलें पाहिजे; सरकारची कोणतीहि आडकाठी न येतां प्रत्येकाला जो आवडेल तो धर्म अनुसरतां आला पाहिजे. एकाच शासनसत्तेखालीं, एकाच झेंड्याखालीं, अमिश्र आणि अविभक्त निष्ठेनें राहणाऱ्या जनतेंत किती तरी समान असें असतें. माणसामाणसांतहि इतकें समान असतें, कीं धर्माच्या नांवानें भांडणें व्हावींत हें आश्चर्य आहे. जो

धर्म किंवा पंथ, किंवा संप्रदाय विशिष्ट पद्धतीनेंच जाण्याची सर्वांवर सक्ती करतो, त्याला धर्म म्हणतां येणार नाहीं. धर्मांत सक्तीला स्थान नाहीं. जें सक्तीनें लादण्यांत येतें तें अल्पजीवी असतें. तें मरणारच. तुम्ही चार आणे कॉंग्रेस-सभासद असा वा नसा तुम्हांला अभिमान वाटला पाहिजे, कीं अशी एक संस्था आपल्यांत आहे, कीं जी धर्माधिष्ठित शासनतंत्र बनवायला तयार नाहीं; जिची शासनसंस्थेची कल्पना जातिधर्मनिरपेक्ष अशी आहे. या दृष्टीनें पाहतां कॉंग्रेस संस्था अद्वितीय आहे. तिला लोकशाही शासनसंस्था पाहिजे आहे. समाजांतील निरनिराळ्या घटकांत संपूर्णपणें मेळ रहावा असें तिला वाटतें. हिंदी संघराज्यांतील मुसलमानांची दुर्दशा पाहून त्यांना सामान्य जीवन जगणेंहि कांहीं ठिकाणीं कसें मुष्किलीचें झालें आहे तें पाहून, येथून मुसलमानांचे लोंढे सारखे जात आहेत हें पाहून, जे लोक अशी परिस्थिति निर्माण करण्याला जबाबदार असतील, ते कॉंग्रेसला कसे शोभादायक ठरतील असें मनांत येतें. म्हणून जें नवीन वर्ष सुरू होत आहे, त्यांत तरी हिंदू आणि शीख यांनीं असें वर्तन करावें, कीं कोणाहि मुसलमानास मग तो मुलगा असो वा मुलगी असो, हिंदी संघराज्यांत मोठ्यांतल्या मोठ्या हिंदु आणि शीख माणसाप्रमाणें सुरक्षित आणि स्वतंत्र असें वाटेल.

## अखिल भारतीय कॉंग्रेस-समिति

येत्या शनिवारीं अखिल भारतीय कॉंग्रेस समिति भरेल. कॉंग्रेसच्या परम थोर परंपरेस साजेसे ठराव ते करतील अशी मी आशा राखतों. सर्व लोकांचें—गरीब वा श्रीमंत, राव वा रंक—कल्याण जेणेंकरून होईल असे ते ठराव असोत. असें होईल तरच जी प्रतिष्ठा आजवर कॉंग्रेसनें मिळविली, ती टिकेल. त्या प्रतिष्ठेनें हिंदुस्थान दुनियेंतील सर्व शोषित राष्ट्रांच्या हक्कांचा आणि स्वाभिमानाचा रखवालदार म्हणून होईल.

६४

१४–११–'४७

## रामनामाची सर कशाला नाहीं

सायंकाळच्या भजनाला लक्षूनच गांधीजींनीं प्रवचन सुरू केलें. ते



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

म्हणाले, मी आगाखान-पॅलेसमध्यें उपवास करीत होतों. राजवाड्यालाच तुरुंगाचें रूप मिळालें होतें. तेथें देवी सरोजिनी नायडू, मिराबेन, महादेवभाई आणि मी होतों. त्या वेळेस या भजनानें असेंच मला वेड लावलें होतें. त्या वेळच्या उपवासाच्या कारणांत मी जाऊं इच्छीत नाहीं. पाणी किंवा कांहीं दिवस घेतलेल्या मोसंब्यांचा रस, किंवा वैद्यकीय उपचार व मदत यांनीं मला वांचवलें असें नाहीं मला वाटत. अंतःकरणांत ज्याला राम म्हणून मी ओळखतों, त्या ईश्वरला स्थापूनच मी निभावलों. त्या भजनांतील ओळींनीं मला वेड केलें. सारे चरण आठवत ना म्हणून एकाला तार केली, कीं सारें भजन नीट पाठवा म्हणून. तारेनें भजन आलें. मला अपार आनंद झाला. गाण्याचें धृपद असें आहे, कीं रामनाम म्हणजेच सारसर्वस्व. इतर देव त्याच्यापुढें कांहींच नाहींत. मी ही बोधप्रद घटना कां सांगत आहें? शनिवारीं दिल्लीस अखिल भारतीय कॉंग्रेस-समितीचें ऐतिहासिक अधिवेशन भरणार आहे. तेथें सर्वांनीं अंतःकरणांत ईश्वराला स्मरून कामकाज करावें म्हणून मी हें सांगत आहें. कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून ते जमणार आहेत. हृदयांत प्रभूच्याऐवजीं सैतान असेल, तर ते प्रामाणिक प्रतिनिधी होऊं शकणार नाहींत.

## शरणार्थींनीं परत जाणें

अखिल भारतीय कॉंग्रेस समितीसमोर जे ठराव मांडायचे, त्यांवर कार्यकारिणीनें तीन तास पुरी चर्चा केली. हिंदू आणि शीख शरणार्थी स्वाभिमानपूर्वक व सुरक्षित असे पश्चिम पाकिस्तानमधील आपापल्या घरींदारीं परत कसे पाठवतां येतील, यावर सारी चर्चा केन्द्रीभूत झाली होती. पाकिस्तानमध्यें पापाला सुरुवात झाली असली, तरी हिंदू व शीखांनींहि पूर्व पंजाबांत व जवळच्या हिंदी संघराज्यांतील भागांत भरपूर बदला घेतलेला आहे. म्हणून कोणी आधीं सुरुवात केली याला फारशी किंमत नाहीं राहिली, असें कार्यकारिणीचें म्हणणें. म्हणून अखिल भारतीय कॉंग्रेस-समितीला जर असा विश्वासपूर्वक निर्वाळा देतां आला, कीं हिंदी संघराज्यापुरता तरी सारा वेडपणा थांबला आहे, विवेक जागा झाला आहे, तर पाकिस्तानासहि

शरणार्थींना 'या परत, स्वाभिमान राहील, सरक्षण मिळेल' असें म्हणणें भाग पडेल, असें समितीला वाटणें स्वाभाविक आहे. परंतु आपणांस असें म्हणतां येण्याची जी अट आहे, ती अट तेव्हांच पुरी करतां येईल, जर श्रोत्यांतील सारे हिंदू-शीख हृदयांत रामनामाला, रामाला जागा देतील व रावणाला— सैतानाला दूर करतील. सैतानाला जेव्हां दूर साराल, चालू असलेला विचारहीन प्रकार थांबवाल, तेव्हांच हिंदू-शीखांच्या मुलांप्रमाणें मुसलमान मुलेंबाळेंहि मोकळेपणानें हिंडूंफिरूं शकतील. मग परिस्थितीच्या दडपणानें निघून गेलेले मुसलमान परत येतील अशी मला श्रद्धा आहे. आणि हिंदू-शीखांनाहि सन्मानपुरस्सर परत जायला रस्ता मोकळा होईल.

माझ्या शब्दाला तुमच्या हृदयांत साथ मिळेल. अखिल भारतीय काँग्रेस-समिति शहाणपणाचे नि न्याय असे निर्णय घेईल अशी मला आशा आहे.

## ६५

१५-११-'४७

## राष्ट्रपिता ?

तिसरे प्रहरीं अखिल भारतीय समितींत जें मी बोललों, तें मीं तुम्हांला सांगावें अशी साहजिकच तुमची अपेक्षा असेल. परंतु तें पुन्हां सारें सांगावें असें नाहीं वाटत. मी इतके दिवस जें तुम्हांला सांगत आहें तेंच वास्तविक तेथें बोललों. जर अंतःकरणपूर्वक तुम्ही मला राष्ट्रपिता म्हणून म्हणत असाल, तर तें या अर्थानें म्हणतां, कीं १९१५ मध्यें दक्षिण आफ्रिकेंतून आल्यानंतर काँग्रेसला आजचें स्वरूप देण्यांत माझा बराचसा भाग होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे देशावर माझा बराच परिणाम झाला आहे. परंतु आजकाल माझें वजन राहिलें नाहीं; परंतु त्यामुळें मला वाईट नाहीं वाटत. वाईट वाटतांहि कामा नये. सर्वांनीं आपापलें कर्तव्य करावें, बाकीचें प्रभूच्या हातीं सोंपवावें. ईश्वरेच्छेशिवाय कांहीं घडत नसतें. प्रयत्न करणें आपल्या हातीं. मी कर्तव्य म्हणून अखिल भारतीय काँग्रेस-समितीच्या बैठकीला गेलों होतों. समितीचें काम सुरू करण्यापूर्वीं परवानगी मिळाली, तर मला जें सत्य वाटतें तें त्यांना सांगायला मी गेलों होतों.

## नियंत्रणें अहितकारी

परंतु मला तुम्हांला नियंत्रणाविषयीं सांगायचें आहे. अ. भा. काँ. समितींत तत्क्षणींच्या इतर गोष्टींवर बोलण्यांतच माझा बराच वेळ गेल्यानें या नियंत्रणाच्या प्रश्नाला मी तेथें नुसता स्पर्श केला. नियंत्रणें ठेवणें म्हणजे गुन्हा आहे असें मला वाटतें. युद्धकाळांत ही पद्धत भली असेल कदाचित्, लष्करी राष्ट्राला ही पद्धति हितकारक असेल; परंतु भारताला तिच्यानें नुकसान आहे. देशांत अन्न-वस्त्राची टंचाई नाहीं. मी याविषयीं निःशंक आहे. पाऊसहि नव्हता असें नाहीं. भरपूर कापूस आहे. सूत कांतायला नि विणायला भरपूर माणसें आहेत. गिरण्याहि आहेत. म्हणून अन्न-वस्त्र-नियंत्रणें बरीं नाहींत. पेट्रोल, साखर वगैरे इतर पदार्थांवरहि नियंत्रणें आहेत. तींसुद्धां अनाठायीं आहेत असें वाटतें. या नियंत्रणांमुळें माणसें परावलंबी नि आळशी बनतात. आळस आणि परावलंबन राष्ट्राला केव्हांहि हानीकारकच. दररोज या नियंत्रणांबाबत माझ्याकडे तक्रारी येत आहेत. देशाचे प्रतिनिधी शहाणपणाचा निर्णय घेतील, अशी आशा आहे मला. ज्या नियंत्रणांमुळें खोटेपणा, भ्रष्टता, काळेबाजार यांना उत्तेजन मिळतें, तीं दूर करण्याचा सल्ला हे प्रतिनिधी सरकारला देतील, अशी मला आशा आहे.

# ६६

१६–११–'४७.

## ईश्वर-प्राप्ति

आजच्या भजनांत होतें, कीं मनुष्याचा परमोच्च प्रयत्न परमेश्वर-प्राप्तीसाठीं असावा. प्रभूची प्राप्ति मनुष्यनिर्मित मंदिरांतून, मूर्तींतून किंवा अशा पूजा-स्थानापासून नाहीं होत. तर वैराग्यानेंच प्रभुप्राप्ति होते. पार्थिव नाहीं, तर दैवी प्रेमानेंच ईश्वर मिळेल. मीराबाईचें जीवन म्हणजे अशा प्रेमाचें जीवन. वस्तुमात्रांत ती प्रभूला पाही. तिला प्रभु म्हणजेच सारें कांहीं वाटे.

## रामपूर संस्थान : पूर्वीं आणि आतां

भजनगीत रोजच्या जीवनांत कसें आणायचें हें सांगतां सांगतां गांधीजी

रामपूर संस्थानकडे वळले. तेथील अधिपति मुस्लिम असला, तरी तें संस्थान मुस्लिमच आहे असें नाहीं होत. पुष्कळ वर्षांपूर्वी अलीबंधूंनीं मला तेथें नेलें होतें. मी त्यांच्या घरीं राहिलों होतों. त्या वेळच्या नबाबसाहेबांनाहि मी भेटलों होतों; कारण हकीम अजमलखान, डॉ. अन्सारी इत्यादि राष्ट्रीय मुसलमानांचे नबाब मित्र होते. त्या काळीं हिंदु-मुसलमान आजच्यापेक्षां अधिक शान्तीनें नि गुण्यागोविंदानें रहात होते. परंतु जे हिंदू मित्र रविवारीं मला भेटायला आले होते त्यांनीं वेगळीच कथा सांगितली. ते म्हणाले, कीं जरी रामपूर संस्थान हिंदी संघराज्यांत सामील झालें असलें, तरी मुस्लिम लीगचें अनिष्ट वातावरण अजून तेथें आहे. परंतु तेवढीच अडचण असती, तरी तिच्यांतून आम्ही पार पडलों असतों. तेथें राष्ट्रीय स्वयंसेवक संघहि आहे आणि त्यांची महत्त्वाकांक्षा तर हिंदी संघराज्य निर्मुस्लिम व्हावें अशी आहे.

## सत्याग्रह: अत्यन्त प्रभावी शस्त्र

तेव्हां प्रश्न असा होता, कीं जे काँग्रेसच्या ध्येयाशीं निष्ठावान् असतील त्यांनीं आपलें ब्रीद कसें राखायचें ? निष्ठा कशी प्रकटवायची ? सत्याग्रह करणें यशदायी होईल का ? अ. भा. काँ. समिति काँग्रेसच्या ध्येयावर अढळ उभी आहे हें पाहून त्यांना आनंद झाला. जेथें फक्त हिंदूच धनी असतील असा हिंदुस्थान अखिल भारतीय काँग्रेस समिति कल्पूं शकत नाहीं, हें ध्येय तिचें नाहीं. हें पाहून रामपूरच्या या मित्रांचीं हृदयें उचंबळलीं. सर्व जातिजमातींचा समावेश करण्याइतकें काँग्रेसचें ध्येय विशाल आहे. संकुचित जातीयतेला तेथें वाव नाहीं. सर्वांपेक्षां काँग्रेस ही जुनी राजकीय संस्था आहे. जनतेची सेवा हें तिचें ध्येय आहे. अ. भा. काँ. समितींत जें घडलें त्यामुळें रामपूरच्या या मित्रांची श्रद्धा दृढावली. तरीहि माझ्यापासून दोन शब्द त्यांना हवे आहत. परंतु तेथील स्थानिक परिस्थिति माहीत नसल्यामुळें मी निश्चित असें काय सांगणार ? तेथील परिस्थितीचा अभ्यास करा. मला वेळहि नाहीं; परंतु मी एक सांगेन, कीं सत्याग्रह हें सर्वांहून बलिष्ठ असें शस्त्र आहे. त्या शस्त्रासमोर या मित्रांनीं सांगितलेले विरोधी गट फार दिवस टिकाव धरूं शकणार नाहींत.

## भावार्थ

आजकाल सत्याग्रह शब्द सर्वत्र लावण्याची रूढि होत आहे. कोणत्याहि प्रतिकाराला, मग तो सशस्त्र वा निःशस्त्र असो, त्याला सत्याग्रहच म्हणतात! यामुळें समाजाचें नुकसान होतें, सत्याग्रहहि अधःपतित होतो. सत्याग्रहांतील सर्व भावार्थ जर त्यांच्या लक्षांत येईल, सत्याग्रहीबरोबर सत्याचा नि प्रेमाचा जिवंत परमेश्वर सदैव असतो, हें जर ते जाणतील, तर सत्याग्रह अजिंक्य आहे असें मानायला ते कधींच कचरणार नाहींत. हिंदुमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याविषयीं जें मी बोललों, तें बोलतांना वाईट वाटतें. माझें म्हणणें चुकीचें ठरलें, तर मला आनंद होईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुखांना मी भेटलों. संघाच्या सभासदांच्या बैठकीला हजर होतों. मी तेथें गेलों म्हणून माझी कानउघाडणी होत आहे. संघाच्या संघटनेविषयीं तक्रार करणारीं अनेक पत्रें मला येत आहेत.

## दक्षिण आफ्रिकेबाबत हिंदु-मुस्लिम-ऐक्य

आपण देशांतील जातीय वणवे विझवण्यांत सारे मग्न असलों, तरी परदेशांतील आपल्या बांधवांना आपण विसरतां कामा नये. युनोमध्यें हिंदी प्रतिनिधी एकजुटीनें व धैर्यानें हिंदी बाजू मांडीत आहेत. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित सर्वांच्या परिचयाच्या आहेत. पंडित नेहरूंच्या भगिनी या नात्यानें त्या तेथें नसून त्या कार्यक्षम व सुपात्र आहेत म्हणून गेल्या आहेत. त्यांच्याबरोबर भलीं माणसें गेलीं आहेत. सारीं एका आवाजानें बोलत आहेत. इस्पहानीसाहेब आणि झाफरुल्लासाहेब यांचीं आज वृत्तपत्रांत आलेलीं भाषणें वाचून फारच आनंद झाला. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी जनतेला कसें पक्षपातानें वागवण्यांत येतें, त्यांना बहिष्कृताप्रमाणें कसें वागवतात तें दोघांनीं युनोमधील श्रोत्यांना स्पष्टपणें सांगितलें. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोक दरिद्री नाहींत ही गोष्ट खरी. त्यांना अन्नाची ददात नाहीं. परंतु भाकरीनेंच केवळ मनुष्य जगत नाहीं. मानवी हक्कांपुढें पैशाची काय मातब्बरी? द. आफ्रिकन सरकार हे मानवी हक्क हिंदीजनांस नाकारीत आहे. बाहेरील हिंदी लोकांच्या बाबतींत हिंदू आणि मुसलमानांचीं निरनिराळीं

मतें नाहींत. यावरून द्विराष्ट्र-सिद्धान्त चूक आहे असें सिद्ध होतें. यापासून मी जो धडा शिकलों आणि तुम्हींहि जो शिकावा असें मला वाटतें, तो म्हणजे प्रेम ही परमोच्च वस्तु होय. जर हिंदुस्थानबाहेर आपण एका आवाजानें बोलूं शकतों, तर येथेंहि आपल्या मनांत प्रेम असेल, तर आपण खात्रीनें बोलूं शकूं. चुकणें मनुष्यस्वभाव आहे. परंतु चूक सुधारणें हाहि मानवी स्वभाव आहे. विसरणें, क्षमा करणें केव्हांहि शक्य असतें. तें आज जर आपण केलें, एका आवाजानें बाहेरच्या जगांत बोलतों तसें येथें बोलूं लागलों, तर आपण खात्रीनें या संकटांतून पार जाऊं. दक्षिण आफ्रिकेबाबत मला एवढेंच म्हणायचें आहे, कीं नामांकित हिंदु-मुसलमान या बाबतींत एका आवाजानें जें सांगत आहेत, त्यामुळें दक्षिण आफ्रिकन सरकार व तेथील गोरे लोक यांचा फायदाच होईल, अशी मला आशा आहे.

## ६७

१७–११–'४७

## हिंदुस्थान आणि द. आफ्रिका

काल रामपूरविषयीं व दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांविषयीं मी बोललों. आज द. आफ्रिकेसंबंधीं मीं अधिक स्पष्टपणें बोलावें असें मला वाटत आहे. १८९३ पासून १९१४ पर्यंत मध्यंतरींचें एक वर्ष सोडून जवळजवळ २० वर्षें मी द. आफ्रिकेंत होतों. माझ्या जीवनांतील तो प्रदीर्घ काळ माझें जीवन बनवणारा होता. हिंदुस्थानप्रमाणेंच तो खंडप्राय देश आहे. सर्व प्रकारच्या हिंदी लोकांशीं तद्वतच गोऱ्यांशीं माझा अति निकट परिचय झाला. त्या काळच्या द. आफ्रिकेपेक्षां आजची द. आफ्रिका जरी पुढारली असली, तरी हिंदुस्थाननेंहि प्रचंड प्रगति केली आहे. कालपर्यंत अशक्य दिसणारें आज प्रत्यक्ष घडलें आहे. कारणांत जाण्याची जरूर नाहीं. ब्रिटिश राष्ट्रसंघांत आज हिंदुस्थान आहे आणि द. आफ्रिकेच्या बरोबरीचा दर्जा त्याला प्राप्त झाला आहे. एका वसाहतींतील लोक दुसऱ्या वसाहतींत कां गुलाम असावेत ? ब्रिटिश राष्ट्रसंघांतील सर्वांच्या स्वेच्छेच्या संमतीनें इतिहासांतच पहिल्यानेंच एक आशियाई राष्ट्र या संघांत सामील होत आहे.

## ब्रिटिश राष्ट्रसंघांतील हिंदुस्थान

हिंदुस्थान ब्रिटिश राष्ट्रसंघांत शिरून पांचच दिवस झाले असतां डॉ. एस्. पीं. बर्नार्ड--जे ऑरेंजियाचे कारभारी आहेत, त्यांनीं दर्बानच्या नाताळ इंडियन कॉंग्रेसला पुढील संदेश धाडला होता :

" तुम्ही तुमच्या दोन भागांना मिळालेल्या स्वातंत्र्याचा उत्सव करीत आहांत. तुमच्या इतिहासांतील हा दिवस तुम्हांला मोठा वाटत आहे. 'मी आशा करतों, कीं दक्षिण आफ्रिकेंतील सर्व हिंदी लोक आतां स्वेच्छेनें आपापल्या मायभूमीला परत जातील. दक्षिण आफ्रिकेंत शांतीनें नि शिस्तीनें एकत्र रहायला तुम्ही शिकलां आहांत. हिंदुस्थानांत जातीय दंगलींत आज शेकडों मारले जात आहेत. तुम्ही येथें जी शिकवण घेतली तिचे प्रचारक म्हणून मायभूमींना परत जा."

## वर्ण : पूर्वग्रह

डॉ. बर्नार्ड यांना हा दिवस मोठा वाटत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ब्रिटिश राष्ट्रसंघांत समानतेनें प्रवेश हिंद नि पाक यांना मिळालेला पाहून हा प्रवेश-दिन महत्त्वाचा मानायचा कीं नाहीं, याची त्यांना उघड उघड शंका वाटत आहे आणि नाताळ हिंदी कॉंग्रेसला आपल्या देशांत जाऊन शांततेनें व सुव्यवस्थेनें राहायला, येथें जो धडा शिकलांत तो द्या असा सल्लाहि अनाहूतपणें द्यायला त्यांना कांहीं वाटत नाहीं. द. आफ्रिकेंतील सर्वसाधारण गोऱ्यांच्या मनाची ठेवण या संदेशांत आहे असें भीतभीत मला म्हणावेसें वाटतें आणि म्हणूनच आशियांतील आहेत, काळे आहेत, या अपराधास्तव तेथील आपल्या देशबांधवांवर अनेक बंधनें सारखीं लादण्यांत येत असतात. दक्षिण आफ्रिकेंतील सुबुद्ध लोकांना मी मनःपूर्वक सांगतों, कीं आशिया-विरोधी-वर्णविरोधी वृत्ति आतां बदला, तिचा फेरविचार करा. त्यांच्यामध्यें किती तरी आफ्रिकन वस्ती आहे. आशियांतील लोकांहूनहि कांहीं बाबतींत त्यांना वाईट रीतीनें बागवण्यांत येत असतें. युगसंदेश ओळखा असें युरोपियन वसाहतवाल्यांस माझें साग्रह सांगणें आहे. हा

वर्णविद्वेष तरी सर्व दृष्टीनें चूक असला पाहिजे, किंवा आशियांतील राष्ट्रांना ब्रिटिश राष्ट्रसंघाचे सभासद करून घेण्यांत ब्रिटिश लोक व त्यांचे सहकारी सभासद यांनीं तरी अक्षम्य चूक केली असावी. ब्रह्मदेशाला लौकरच स्वातंत्र्य मिळणार. सीलोनहि थोड्या दिवसांनीं ब्रिटिश राष्ट्रसंघाचा सभासद होईल. या सर्वांचा अर्थ काय? राष्ट्रसंघाचें सभासदत्व स्वातंत्र्याहूनहि कदाचित् उच्चतर नसलें, तरी निदान स्वातंत्र्याइतकें तरी सुप्रतिष्ठित आहे असें मला शिकवण्यांत आलेलें आहे. या स्वतंत्र देशांतील जबाबदार नर-नारींनीं आपल्या स्वातंत्र्याचें काय करायचें त्याचा विचार करायला हवा. अधिकाधिक राष्ट्रें स्वतंत्र करण्याची चळवळ होत आहे. ही चळवळ जरी वस्तुतः योग्य व आरोग्यदायी असली, तरी का आणखी एकाद्या तिसऱ्या महायुद्धांत तिचें पर्यवसान होणार आहे? आणि मागील दोन महायुद्धांपेक्षां हें तिसरें युद्ध अधिकच भयाण होईल, कीं ही चळवळ विश्वव्यापक बंधुतेंत—ज्याप्रमाणें वास्तविक ती व्हायला हवी त्याप्रमाणें—अखेर परिणत होईल?

## विचारानुरूप मनुष्य

उपनिषदांतील मंत्र म्हणतो, "विचारानुरूप मनुष्य बनतो." शहाण्यांचा अनुभवहि या मंत्रांतील सत्यता सिद्ध करीत आहे. जगांतील शहाणे जसा विचार करतील तसें जगाचें स्वरूप होईल. कर्महीन विचार हा विचारच नव्हे. म्हणून विचार न करतां वागणाऱ्या लोकांप्रमाणें जग बनेल असें मानणें फार मोठी चूक होईल. बहुजनसमाज फारसा विचार नाहीं करीत. स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही. लोकशाहींत प्रत्येकाला—नुसतें घडामोडींचें, वस्तुस्थितीचें ज्ञान नव्हे, तर शहाणपणाहि शिकण्याची संधि असलीच पाहिजे. दक्षिण आफ्रिकेंत हुशार शेतकरीहि असणारे जसे अनेक शिपायीगडी आहेत, तसे तेथें पुष्कळ शहाणे स्त्री-पुरुषहि आहेत. सभोंवतालच्या संकुचित परिस्थितीचा त्याग करून जर ते उच्च दृष्टि घेणार नाहींत, गोऱ्यांच्या प्रभुत्वाच्या त्रास देणाऱ्या प्रश्नाच्या बाबतींत जर योग्य मार्गदर्शन ते करणार नाहींत, तर जगाला तें शापदायक ठरेल. गोऱ्यांच्या प्रभुत्वाचा प्रश्न आतां संपल्यासारखा नाहीं का?

# जनतेचा आवाज

तुम्हांला आणखी थोडा वेळ मी थांबवणार आहें. नियंत्रणांच्या प्रश्नाची खूपच चर्चा चालली आहे. नियंत्रणाच्या गुणाविषयीं आम्ही सारें जाणतों असें म्हणणाऱ्या पंडितांच्या आवाजांत जनतेचा आवाज का नाहींसा केला जाणार ? आजचे मंत्री जनतेचे आहेत, जनतेंतून निवडून आलेले आहेत. ज्या वेळेस आजचे मंत्री वनवासांत होते, त्या वेळेस ज्या अधिकाऱ्यांनीं अपार त्रास दिला, त्यांचें ऐकण्याऐवजीं त्यांनीं जनतेचें ऐकावें असें मला वाटतें. हे नियंत्रणपंडित त्या वेळेस जनतेचे वैरी बनून जणूं राज्य चालवीत होते. आजहि का त्यांच्याच इच्छेप्रमाणेंच राज्य चालायचें ? लोकांना चुका करायची व त्या सुधारायची का संधीच असतां कामा नये ? नियंत्रणें दूर केल्यामुळें लोकांचें नुकसान होत आहे असें दिसून आलें, तर पुन्हां नियंत्रणें ठेवण्याची सत्ता आपल्याजवळ आहे हें का मंत्र्यांना कळत नाहीं ? कशावरचीं नियंत्रणें उठवावींत याची मी एक यादी देतों. ही यादी अगदीं पूर्ण आहे असें नाहीं. उदाहरणादाखल म्हणून ही आहे. जरूर तेव्हां यांतील वस्तूंवर पुन्हां नियंत्रणें बसवावीं. या यादीनें माझें साधें मन तर गोंधळतें. कांहीं वस्तूंवर नियंत्रणें राखण्यांत कदाचित् भलेंहि असेल. माझें एवढेंच म्हणणें, कीं नियंत्रणाचें शास्त्र—जर तें शास्त्र असेल—तर निःपक्षपातीपणानें परीक्षिलें जावें; जनतेलाहि सर्वसाधारण नियंत्रणाचें किंवा विशिष्ट पदार्थांबाबतींतील नियंत्रणाचें शिक्षण द्यावें. माझ्याजवळ जी यादी आली आहे तिच्यांतील कांहीं नांवें, त्यांचे गुणदोष न बघतां मी सांगतों. हुंड्या, भांडवल गुंतविणें, भांडवल मोकळें करणें, पेढ्यांच्या शाखा काढणें आणि त्यांत भांडवल गुंतवणें, विमा कंपन्यांत भांडवल गुंतवणें, सर्व पदार्थांच्या आयाती-निर्याती, अन्न-धान्य, साखर, गूळ, ऊंस, काकवी, वनस्पती, गरम व सुती कपडा, सूत, यंत्र चालवायला उपयोगी पडणारें स्पिरीट, पेट्रोल, घासलेट, कागद, सीमेंट, लोखंड, पोलाद, मिका, मँगनीज, कोळसा, वाहतूक, नवे कारखाने काढणें, यंत्रें, कारखाने, विशिष्ट प्रान्तांतील मोटार-विभागणी, चहाचे मळे, या सर्वांवरचीं नियंत्रणें दूर व्हावींत.

१८-११-'४७

## अ. भा. काँ. समितीचे ठराव

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजींनीं अ. भा. कॉंग्रेस-समितीच्या ठरावांचा उल्लेख केला. बहुतेक ठराव लोकांपासून, मध्य सरकारपासून आणि प्रांतिक सरकारपासून विशिष्ट कर्तव्याची अपेक्षा करणारे आहेत.

## हिंदु-मुस्लिम-संबंध

मुख्य ठराव म्हणतो, कीं प्रत्येक अ-मुस्लिमानें मुस्लिमाजवळ नीट वागावें. प्रत्येक मुसलमानास हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत प्राणांची व मालमत्तेची शाश्वती वाटेल अशा रीतीनें मुस्लिमेतरांचें वर्तन असावें. सरकारनेंहि त्याच्या शक्तीनुरूप असें संरक्षण द्यावें. जनतेनें नि सरकारनें परिस्थितीच्या दडपणामुळें जे मुसलमान घरेंदारें सोडून निघून गेले आहेत, ते परत येऊन पूर्ववत् आपापले उद्योगधंदे सुरू करतील असा विश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीनें वागावें. पाकिस्तानकडे जे जथे पायीं जात आहेत ते परत माघारीं वळतील हीच खरी कसोटी. गुरगांव जिल्ह्यांतून जाणाऱ्या मुस्लिम जथ्यांतील कांहीं लोक परत फिरले आहेत हें सांगायला मला आनंद होत आहे. जर लोक बरोबर वागतील, नीट वागतील, तर हा सारा जथा परत फिरेल अशी माझी खात्री आहे.

## पानिपतच्या मुस्लिमांचें उदाहरण

पानिपतच्या मुस्लिमांबाबतहि असेंच मला सांगण्यांत आलें आहे. रेल्वेची शक्यता झाली, तर दडपणामुळें मुसलमान पाकिस्तानांत जातील. परंतु परवां जेव्हां मी पानिपतला गेलों होतों, तेव्हां मला सांगण्यांत आलें, कीं कोणाहि मुसलमानानें घरदार सोडून जावें असें हिंदूंना वाटत नाहीं. कारण एकमेकांची एकमेकांस मदत होत असते. मुसलमान हे हुशार कारागीर आहेत. आणि हिंदू हे दुकानदार, व्यापारी आहेत. मुसलमानांच्या मालावरच ते विसंबून असतात. परंतु शरणार्थींची प्रचंड संख्या आल्यामुळें

शान्त जीवनांत व्यत्यय आला. मी पानिपतला भेटून आल्यानंतर मुसलमानांच्या घरांचा शरणार्थींनीं कबजा घेतल्याचें कळलें. मनोवृत्तींतील हा बदल मी समजूं शकत नाहीं. घरें गेल्यामुळें तेथील मुसलमान निघून जात आहेत. परंतु असें वर्तन कॉंग्रेसच्या ठरावाला विसंगत आहे, संपूर्णपणें सोडून आहे. पानिपतला जाऊन रहावें, तेथील परिस्थिति खरोखरच अशी आहे कीं काय पहावें, असें माझ्या मनांत येत आहे.

## नियंत्रणें दूर केल्यावरची अपेक्षा

नियंत्रणांवरचाहि ठराव आहे. श्रीमंत वा गरीब, प्रत्येक नागरिकानें जोंवर अन्नधान्याची टंचाई भासत आहे, तोंवर जरुरीपेक्षां अधिक अन्न-धान्याचा सांठा करूं नये. नियंत्रण उठलें म्हणजे धान्योत्पादन करणारे वरीं सांठे न ठेवतां खुल्या बाजारांत धान्य आणतील. डाळी, इतर पदार्थ मिळूं लागतील. धान्याचे व्यापारी जनतेला योग्य नफा घेऊन स्वस्तांतील स्वस्त दरानें हें सारें विकतील अशी आशा आहे. आणि असें झालें, तर सरकार नियंत्रणें ढिलीं करील, तितकेंच नव्हे, तर जास्तींत जास्त लौकर तीं अजिबात उठवील अशी आशा आहे.

तीच गोष्ट कपड्याचीहि. परंतु मला असें कळलें, कीं अ. भा. कॉं. समितीच्या ज्या सभासदांनीं नियंत्रणें उठवावीं म्हणून मत दिलें, त्यांना मनापासून कांहीं तसें वाटत नव्हतें. हें ऐकून मी अशान्त झालों. ही बातमी निराधार असेल अशी मी आशा करतों. जनतेचे हे इतके प्रतिनिधी लोकांच्या वर्तनांत हितपरिणामी बदल घडवून आणतील अशी मी निःशंक आशा राखतों. १५ ऑगस्ट व नंतर थोडे दिवस हिंदुस्थानची जी पत होती, ती परत प्रस्थापित होईल अशा रीतीनें लोक वागोत.

### ६९

१९-११-’४७

## लज्जास्पद दृश्य

मीं काल तुम्हांला हिंदु-मुसलमानांच्या संबंधाविषयींच्या अ. भा. कॉं. समितीच्या मुख्य ठरावाविषयीं सांगितलें. परंतु दिल्लींतच त्या ठरावाला

विरोधी वर्तन कसें घडत आहे तें सांगण्याचें आज माझ्या नशिबीं आहे ! ज्या सायंकाळीं मी माझ्या मनांतील आशंका बोलून दाखवीत होतों, त्याच सायंकाळीं जुन्या दिल्ली-भागांत त्या आशंकेनुरूप वर्तन घडेल असें माझ्या ध्यानींमनींहि नव्हतें. चांदणी चौकांतील एका मुसलमानाच्या दुकानासमोर हिंदु-शीखांची गर्दी जमली असें काल रात्रीं मला सांगण्यांत आलें. दुकानाचा मालक परत आल्यावर त्याला तें द्यायचें अशा अटीवर तें दुकान एका शरणार्थीला देण्यांत आलें होतें. आणि आनंदाची गोष्ट, कीं तो दुकानदार परत आला. कायमचा धंदा सोडण्याची त्याची इच्छा नव्हती. त्या बाबतींतील अधिकारी, ज्यानें घर घेतलें होतें त्याला म्हणाला, "मालक आला आहे, तुम्ही खालीं करा." शरणार्थी कांकू करीत होता. शेवटीं म्हणाला, "घराचा ताबा घ्यायला सायंकाळीं या." अधिकारी सायंकाळीं आला. परंतु त्या शरणार्थीनें ताबा देण्याऐवजीं आपल्या मित्रांना वार्ता दिली. ते मोठ्या संख्येनें जमले. दुकान नाहीं खालीं करून देण्यांत येणार असें दरडावून म्हणाले. चांदणी चौकांतील मूठभर पोलीस काय करणार ? त्यांनीं अधिक मदत मागितली. कुमक आली. लष्करानें वा पोलिसांनीं हवेंत बार काढले. भयग्रस्त लोक पांगले; परंतु जातां जातां एका जाणाऱ्याला त्यांनीं भोकसलें. जखम प्राणांतिक ठरली नाहीं, हें सुदैव. परंतु या बंडखोर प्रदर्शनाचा परिणाम काय झाला ? तें दुकान अखेर खाली करून देण्यांत आलें नाहीं ही आश्चर्याची गोष्ट ! लोकांनीं अधिकाऱ्यांना धाब्यावर बसविलें म्हणून कीं काय ? कां आतां तें दुकान खालीं करून देण्यांत आलें आहे ? मला कळलें नाहीं. परंतु मी आशा राखतों, कीं जें मोलवान् स्वातंत्र्य भारताला मिळालें आहे, त्या स्वातंत्र्यांत सरकारची सत्ता— जर ती सत्ता असेल, तर कधींहि धाब्यावर बसवली जातां कामा नये. एकंदरींत हा सारा प्रकार लज्जास्पद आहे, एवढेंच मला सांगायचें आहे. दोन हजारांहून कमी गर्दी तेथें नसावी असें मला सांगण्यांत आलें.

हकिकत कानीं आली तशी मीं सांगितली आहे. मीं ती कमी करून सांगितली आहे: जर कांहीं चूक झाली असेल व ती माझ्यासमोर आली, तर मी आनंदानें तुम्हांला सांगेन.

## शीखांचे दोष

परंतु एवढ्यानेंच नाहीं संपलें. दुसऱ्या एका भागांत मुसलमानांना त्यांच्या जागांतून हांकलून हिंदू आणि शीख निर्वासितांना जागा मिळावी म्हणून सक्ती करण्यांत येत आहे. शीख तरवारी परजीत जातात. मुसलमानांना घाबरवतात. घरेंदारें सोडून न जाल, तर भयंकर सूड उगवूं याद राखा, अशी धमकी देतात. असें हें शीखतंत्र आहे. मला असेंहि सांगण्यांत आलें, कीं शीख लोक दारूहि घेतात. दारूचे परिणाम तुम्ही सहज समजूं शकाल. नागव्या तरवारी घेऊन ते रस्त्यांतून नाचतात. जाणारे-येणारे भयभीत होतात. दुसरी गोष्ट अशी कीं, कबाब किंवा असेच मांसान्नाचे दुसरे पदार्थ चांदणी चौकांत मुसलमानांनीं विकायचे नाहींत अशी रूढि आहे. परंतु शीख आणि बहुधा इतर निर्वासितहि हे निषिद्ध पदार्थ तेथें खुलेपणानें विकतात, त्यामुळें येथील हिंदू लोकांना खूपच त्रास होतो. चांदणी चौकांतील ही परिस्थिति अशा थराला पोंचली आहे, कीं रस्त्यांतून जाणाऱ्याला आपणांवर केव्हां आपत्ति कोसळेल असें सारखें भय वाटत असतें. स्वतःच्या आणि देशाच्या कल्याणार्थ माझ्या निर्वासित मित्रांनीं हे असले प्रकार सोडून द्यावे, अशी माझी त्यांना विनंति आहे.

## कृपाणाचा हक्क

विशिष्ट आकाराहून मोठ्या कृपाणांना कांहीं काळ बंदी होती. ही बंदी दूर व्हावी आणि विशिष्ट आकाराचें बंधन नसावें यासाठीं मीं रदबदली करावी म्हणून अनेक शीख मित्रांनीं येऊन मला गळ घातली. त्यांनीं प्रिव्ही कौन्सिलचा एक निर्णयहि मला वाचून दाखविला. शीखांनीं कोणत्याहि आकाराचें कृपाण बाळगावें असें त्यांत होतें. मीं स्वतः तो निर्णय वाचलेला नाहीं. कृपाण म्हणजे कोणत्याहि आकाराची तरवार असा अर्थ न्यायाधिशांनीं केला असावा असें मी समजतों. त्या वेळच्या पंजाब-सरकारनें कोणालाहि तरवार बाळगायला हरकत नाहीं असें प्रिव्ही कौन्सिलच्या निर्णयानुसार जाहीर केलें. म्हणून पंजाबांत कोणीहि वाटेल त्या आकाराची तरवार बाळगूं शकतो, नेऊं शकतो.

परंतु शीख किंवा पंजाब-सरकार कोणाबद्दलहि मला या बाबतींत सहानुभूति नाहीं. कांहीं शीख मित्र ग्रंथसाहेबांतील उतारे घेऊन माझ्याकडे येऊन म्हणाले, कीं कृपाण हें वाटेल तसें वापरण्यासाठीं नसे; कृपाण हें हल्ला करण्यासाठीं नसे. ग्रंथसाहेबांतील आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या शीखालाच कृपाण वापरतां येईल. प्रचंड संख्येविरुद्ध निरपराधी स्त्रिया, मुलें, वृद्ध, आणि अल्पसंख्य लोक यांच्या रक्षणार्थच तें वापरायचें असतें. आणि म्हणूनच एक शीख सव्वा लाख शत्रूंच्या बरोबरीचा आहे असें समजलें,जाई. तेव्हां जो शीख दारू पितो, इतर व्यसनांत बुडालेला आहे, त्याला पावित्र्य व संयम यांची खूण असणारें कृपाण बाळगण्याचा हक्कच उरत नाहीं. कृपाण ग्रंथसाहेबांत सांगितलेल्या नियमांनुसारच वापरायचें असतें.

स्वैराचाराचें समर्थन करण्यासाठीं प्रिव्ही कौन्सिलचे न्यायनिवाडे पुढें आणणें, त्यांची मदत घेणें हें माझ्या मतें निरर्थक आहे; इतकेंच नव्हे, तर हानिकारकहि आहे. नुकतेच आपण बंधनांतून मुक्त झालों आहोंत. समाज ज्या आरोग्यदायी बंधनांत राहूनच वाढूं शकतो, तीं बंधनें झुगारणें हें स्वातंत्र्याच्या स्थितींत संपूर्णपणें अहितकारक आहे. कृपाण वाटेल तसें वापरून थोर शीख-पंथाला काळिमा लावूं नका असें शीख मित्रांना माझें सांगणें आहे. ज्यांच्या शौर्य-धैर्याचा सर्व मानवजातीला अभिमान वाटतो, अशा हुतात्म्यांच्या रांगापाठीमागून रांगांनीं जें निर्माण केलें, तें व्यर्थ नका दवडूं.

## लष्कर आणि पोलीस

आतां दुसऱ्या एका दृश्याकडे नजर दवडा. जेथें लष्करचे लोक उद्धटपणें वागतात अशा एका छावणीचें वर्णन माझ्याजवळ देण्यांत आलें आहे. छावणीचें समग्र जीवन अंतर्बाह्य स्वच्छतेचा आदर्श नमुना म्हणून असायला हवें. लष्कर आणि पोलीस अशा जीवनाचे जाणीवपूर्वक रखवालदार असायला हवेत. कायदा नि सुव्यवस्था यांच्या रखवालदारांविषयीं जी माहिती मला देण्यांत आली आहे, ती सर्वांना लागू असणार नाहीं, ती अपवादात्मक असेल अशी मी आशा राखतों. लष्कर आणि पोलीस यांना सर्वांच्या आधीं स्वातंत्र्याच्या प्रभेची अनुभूति यायला हवी. त्यांच्यावर जे भीषण अंकुश

असतात, त्यामुळेंच ते नीट वागतात, असें त्यांच्यासंबंधीं म्हणण्याची पाळी न येवो. जगांतील कोणत्याहि आदर्श नागरिकाप्रमाणें हिंदी लोकहि असूं शकतात, हें त्यांनीं आपल्या योग्य वर्तनानें सिद्ध करावें. कायद्याचे हे रखवालदारच जर कायद्याची अवगणना करूं लागतील, तर सरकारी कारभारच अशक्य होईल. आणि अ. भा. कॉं. कमिटीचे ठराव जे अंमलांत आणायचे आहेत, त्यांची अंमलबजावणी अशक्यप्राय होऊन जाईल.

## शेरवाणींचें हौतात्म्य

चित्राची काळी बाजू मीं दाखविली. आतां उजळ बाजूहि आनंदानें दाखवतों. नमुनेदार शौर्याची एक सत्यकथा प्रत्यक्ष पाहणाऱ्यानें मला लिहून दिली आहे. तिच्यांतून मी वाचून दाखवतों.

" मीर मकबुल शेरवाणी हे बारामुल्लांतील काश्मीरच्या राष्ट्रीय परिषदेचे एक तरुण व शूर पुढारी होते. तिशीच्या आसपास त्यांचें वय. राष्ट्रीय परिषदेचे ते एक महत्त्वाचे पुढारी आहेत असें कळल्यावर आक्रमकांनीं निशात बोलपटगृहाजवळ दोन खांबांशीं त्यांना बांधलें. त्यांनीं प्रथम त्यांना मारहाण केली. नंतर अखिल जम्मू आणि काश्मीर राष्ट्रीय परिषद् व तिचे नेते शेरे काश्मीर शेख अबदुल्ला यांचा इन्कार करायला त्यांनीं त्यांना सांगितलें. पालनदरींत ज्याची मुख्य कचेरी होती त्या आझाद काश्मीरच्या तात्पुरत्या सरकारविषयीं राजनिष्ठेची शपथ घ्या असेंहि त्यांना फर्मावण्यांत आलें.

" शेरवाणींनीं या गोष्टीला निर्भयपणें नकार दिला; एवढेंच नव्हे, तर ते म्हणाले, कीं शेरे काश्मीर हे आतां सर्वसूत्रधार आहेत; हिंदी फौजाहि आल्या आहेत; थोड्याच दिवसांत तुम्हां आक्रमकांस हांकून लावण्यांत येईल.

" यामुळें ते आक्रमक भयभीत झाले व संतापलेहि. त्यांनीं १४ गोळ्या शेरवाणींना घातल्या. त्यांनीं त्यांचें नाक कापून त्यांचें तोंड विद्रूप केलें. त्यांच्या शरीरावर खालील अक्षरें असलेला त्यांनीं एक फलक लावला :

‘ हा देशद्रोही आहे.
याचें नांव शेरवाणी.
सर्व देशद्रोह्यांची ही दशा होईल.’

"परंतु हा क्रूर खून, ही यातनादायी घटना होऊन ४८ तास झाले नाहींत, तोंच शेरवाणींचें भविष्य खरें ठरलें. हिंदी फौजा आल्या. आक्रमक वाट फुटेल तिकडे पळत सुटले."

हें खरें हौतात्म्य. हिंदु, शीख, मुसलमान वा आणखी कोणी असो; सर्वांना अभिमान वाटावा असें हें बलिदान आहे.

## अभिमान आणि मैत्री

आणखी एक गोष्ट सांगतों. दुःखदायी घटनांनींहि जो स्वाभिमान दाबला गेला नाहीं अशा स्वाभिमानाची आणि वाटेल तो ताण सहन करणाऱ्या मैत्रीची ही कथा एका मित्रानें मला निवेदिली. नारायणसिंगाची ही गोष्ट. तो बऱ्याच वर्षांचा अंमलदार. पश्चिम पंजाबांत त्यांची किती तरी मालमत्ता. परंतु सारें गेलें. ते आतां दिल्लींत आहेत. ते याचना करीत नाहींत. मालमत्ता गेली म्हणून ते दुःख मानीत नाहींत. एक जुना मित्र त्यांना भेटला. परंतु ते त्याला म्हणाले, "मजवर अपत्ति आली म्हणून दुःख नको करूं, माझी कींव नको करूं, मला तिचें कांहीं वाटत नाहीं." या शीख अंमलदाराला एक बरोबरचा जुना मुस्लिम अंमलदार भेटला. दोघे मित्र होते. या अंमलदाराचें नांव अलिशहा. त्याचेंहि सर्वस्व गेलें आहे; परंतु ही अपत्ति जातीय दंगलीमुळें त्याच्यावर नव्हती आलेली. नारायणसिंगाप्रमाणेंच अलिशहाहि धीराचा. एकमेकांना एकमेकांच्या मैत्रीचा अभिमान वाटतो. २५ वर्षांच्या वियोगानंतर ते भेटले. यांतच त्यांना आनंद वाटतो आणि स्वतःचें ते दुःख विसरून जातात.

### ७०

२०-११-'४७

## अतःपर असहकार नाहीं

गांधीजी प्रार्थनेच्या श्रोत्यांना म्हणाले, "एकाच गृहस्थानें मला दोन चिठ्ठ्या लिहिल्या आहेत. एकींत ते म्हणतातः मीं नोकरी सोडून दिली आहे.

मला तुमच्या हाताखालीं काम करूं दे. दुसरींत ते म्हणतातः प्रार्थनेच्या वेळेस मी एक भजन म्हणूं का? यांनीं नोकरी सोडून दिली ही चूक केली असें मला म्हणणें भाग आहे. ब्रिटिशांच्या राजवटींत मी असहकार पुरस्कारीत असें ही गोष्ट खरी. परंतु आतां परकी सत्ता नाहीं. पोटासाठीं कोठेंहि नोकरी करीत असतांहि इच्छा असेल, तर आतां मनुष्याला येथें देशाचीहि सेवा करतां येईल. प्रामाणिकपणें उपजीविका करणारा, कोणत्याहि हिंसेंत भाग न घेणारा मनुष्य देशाची सेवाच करीत असतो. मला त्यांना देण्यासारखें काम नाहीं, ही गोष्ट त्यांनीं समजून घ्यावी. परंतु कांहीं सेवा त्यांना करायचीच असेल, तर जिचा मीं उल्लेख करणारच आहे त्या गोशाळेंत त्यांनीं जावें.

प्रार्थनेंत वाटेल त्याला भजन म्हणायची परवानगी नाहीं देतां येत. जे ईश्वराचे सेवक म्हणून ओळखले जातात आणि ज्यांनीं आगाऊ परवानगी घेतली असेल, त्यांना भजन म्हणतां येतें.

## ओखलाला भेट

सुचेतादेवी आणि त्यांचे कांहीं सहकारी यांच्यासमवेत मी ओखला येथील निर्वासितांच्या छावणीला भेट द्यायला गेलों होतों. तेथील आदर्श सफाई पाहून मी खूष झालों. ओखला येथें यात्रेला येणाऱ्या लोकांसाठीं म्हणून अनेक धर्मशाळा बांधलेल्या आहेत. त्यांतून हे निर्वासित सध्यां रहात आहेत. या यात्रा मधूनमधून सारख्या भरत असतात. येथें पाण्याचा नीटसा पुरवठा नाहीं. परंतु व्यवस्थापक त्यासाठीं खटपट करीत आहेत. आज आहेत त्यापेक्षां अधिक निर्वासितांना पुरेल अशी पाण्याची व्यवस्था झाली, तर आणखी पुष्कळ निर्वासितांची येथें सोय होऊं शकेल.

## अंमलदारांसंबंधीं

मला आणखीहि कांहीं गोष्टी निर्वासितांचा प्रश्न निघालाच आहे म्हणून सांगायच्या आहेत. हे निर्वासित लोक आपापसांत काळाबाजार करतात असें मला कळलें. निर्वासितांची व्यवस्था लावण्याचें काम ज्यांच्याकडे सोंपवण्यांत आलेलें आहे, ते अंमलदारहि या बाबतींत निर्दोष नाहींत. अंमलदाराला

लांच दिल्याशिवाय येथें जागा मिळत नाहीं असें कळलें. इतरहि बाबतींत त्यांचें वर्तन सदोष आहे असें कळतें. अर्थात् सारेच अंमलदार असे असतील असें नाहीं म्हणणें; परंतु एकादा असला, तरी त्याच्यामुळें सर्वांना भोगावें लागतें.

## निर्वासितांमधील दुराचार

निर्वासितांमधें छोट्या छोट्या चोऱ्या होतात. असें नाहीं होतां कामा. मी त्यांच्यापासून चोख वर्तनाची अपेक्षा करतों. ज्या रजया देण्यांत आल्या होत्या, त्या फाडून आंतील कापूस फेकून देऊन, त्या कापडाचे शर्ट करण्यांत आले आहेत असें कळतें. दुसऱ्या अशा अनेक गोष्टी माझ्या कानांवर घालण्यांत आल्या आहेत. परंतु तीं सर्व दुष्कृत्यें सांगून मी तुमचा वेळ घेऊं इच्छीत नाहीं. मला आज सायंकाळीं ज्या विषयासंबंधीं मुख्यतः बोलायचें होतें, त्याकडे पटकन् वळतों.

## हिंदुस्थानांतील गायीगुरें

दिल्लींतील किशनगंज भागांतील गोशाळेच्या वतीनें वार्षिक मेळावा भरत असतो: तो सध्यां चालू आहे. आचार्य कृपलानी उद्यां तेथें अध्यक्ष आहेत. निदान दहा मिनिटें तरी या, म्हणून मला आग्रह करण्यांत आला आहे. केवळ शोभेसाठीं म्हणून मी कोठेंहि जातां कामा नये. दहा मिनिटांत मी कांहीं करूं शकणार नाहीं, कांहीं पाहूं शकणार नाहीं. आज-काल जातीय प्रश्नांत माझी सारी शक्ति जाते असल्यामुळें इतर बाबतींत मला फारसें कांहीं करतांहि येत नसतें. व्यवस्थापकांना माझी अगतिकता पटली. ते मला म्हणाले, "प्रार्थनेच्या वेळेस गोसेवेसंबंधीं विशेषतः गोशाळांना उद्देशून तुम्हीं कांहीं सांगितलेंत, तरी तेवढ्यानेंहि आम्हांला समाधान होईल." मीं ही गोष्ट आनंदानें मान्य केली. मीं तर हें कधींच जाहीर केलें आहे, कीं राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षांहि हिंदुस्थानांतील गायीगुरांची संपत्ति वांचविणें, विशेषेंकरून गाय व तिची अवलाद यांची नीट जोपासना करणें, हें काम अधिक कठिण आहे. गोपाल-नांतील मी एक निष्ठावान् कार्यकर्ता आहे; गायीचें रक्षण कसें करतां

येईल याविषयींचें माझ्याजवळ खरें ज्ञान आहे असा माझा दावा आहे. परंतु जनतेचें लक्ष या प्रश्नाकडे तीव्रतेनें मी खेंचू शकलों नाहीं ही गोष्ट खरी. गोशाळांचे व्यवस्थापक त्यांची आर्थिक बाजू सांभाळतात. परंतु हिंदुस्थानांतील गोधनासंबंधींचें शास्त्र त्यांना अवगत नसतें. जेणेंकरून दूध वाढेल, बैल सुधारतील, अशा रीतीनें गायीची अवलाद सुधारण्याचें ज्ञान त्यांच्याजवळ नसतें.

## गोशाळांची व्यवस्था

खरें म्हणजे हिंदुस्थानांतील गोशाळांतून गायीगुरांची अवलाद कशी सुधारावी याचें ज्ञान मिळायला हवें; या गोशाळा आदर्श दुग्धालयें म्हणून व्हायला हव्यात. तेथें उत्तम दूध, उत्तम गायी, उत्तम वळू, धष्टपुष्ट बैल मिळायला हवेत. परंतु असें असण्याऐवजीं या गोशाळांतून कशीं तरी गुरें ठेवलेलीं असतात. याचा परिणाम असा होत आहे, कीं उत्कृष्ट गायी-गुरें व स्वस्त भरपूर शुद्ध दूध यासाठीं हा देश विख्यात होण्याऐवजीं, आज या बाबतींत अत्यन्त मागासलेला असा हा देश झाला आहे. गुरांच्या शेणामुताचाहि आपणांस नीट उपयोग करतां येत नाहीं. मृत पशूंचाहि उपयोग करणें माहीत नाहीं. या अज्ञानामुळें कोट्यवधि रुपयांचें नुकसान होत आहे. कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें, कीं आजचीं गायीगुरें केवळ भारभूत झालीं आहेत. त्यांचा नाश करणेंच योग्य. मी या मताचा नाहीं. परंतु आज जसें सार्वत्रिक अज्ञान या बाबतींतलें आहे, तसेंच जर आणखी कांहीं वर्षें राहिलें, तर गायीगुरें भूभार झालीं, तर मला आश्चर्य नाहीं वाटणार. म्हणून किशनगंजमधील ही गोशाळा तरी सर्व दृष्ट्या आदर्श संस्था होईल अशी मी आशा करतों.

### ७१

२१-११-'४७

## हिंदुस्थानांतील दुग्धालयें

काल प्रार्थनेच्या वेळेस ज्या गोशाळेच्या मेळाव्यासंबंधीं मीं उल्लेख केला, तो मेळावा आतां चालूच असेल. मी काल गोपालनासंबंधीं बोललों. आणखी

एक गोष्ट मला सांगायची आहे. हिंदुस्थानांतील अनेक दुग्धालयें शिपायांसाठीं, सैन्यासाठीं चालवण्यांत येतात. मीं त्यांचा काल उल्लेख नाहीं केला. डॉ. राजेंद्रप्रसाद मला म्हणाले, कीं हीं दुग्धालयें अजूनहि चालू आहेत. पुष्कळ वर्षांपूर्वी बंगलोर मध्यवर्ती गोदुग्धालय मीं पाहिलें होतें. कर्नल स्मिथ त्या दुग्धालयावरचे प्रमुख होते. उत्तम गायीगुरें मीं तेथें पाहिलीं होतीं. एक गाय तर सर्व आशियांतील उत्तमोत्तम म्हणून होती. तिला बक्षिसें मिळालीं होतीं. ती ७५ पौंड दूध देई, एका वेळेला कीं संबंध दिवसाचें मिळून तें मला आतां आठवत नाहीं. ती गाय मोकळी असे. तिला बंधन नसे. सर्वत्र चारा असे. तिनें मनसोक्त खावा. गोपालनांतील, दुग्धालयांतील ही झाली उजळ बाजू.

## वांसरांची कत्तल

परंतु या चित्राची दुसरी बाजू आहे. मीं ती प्रत्यक्ष पाहिलेली नाहीं. परंतु मला अधिकृतपणें सांगण्यांत आलें, कीं नर-वांसरांची बहुतेक कत्तल करतात. कारण त्या वांसरांचे बैल करणें जमत नाहीं. वास्तविक या दुग्धालयांना शेंकडों एकर—अधिकहि असेल—जमीन असते. हें सारें गोऱ्या शिपायांसाठीं असतें. या दुग्धालयांना कोट्यवधि खर्च येतो. परंतु ब्रिटिश टॉमी अतःपर येथें नसल्यामुळें अशा गोष्टींची आतां जरूर नाहीं. आपल्यासाठीं इतक्या खर्चाचीं दुग्धालयें चालवलीं जातात हें हिंदी सैनिकांना कळलें, तर त्यांना लाज वाटेल. सामान्य जनतेला जें मिळत नाहीं, त्याहून निराळें आपणांस मिळावें असें हिंदी सैनिक कधींहि अपेक्षिणार नाहीं, याची मला खात्री आहे.

## सतीशबाबूंची गोसेवा

खादीप्रतिष्ठानचे श्री. सतीशचंद्र दासगुप्ता यांनीं लिहिलेल्या महान् ग्रंथांत गाय आणि म्हैस यांविषयींची समग्र माहिती अद्ययावत् अशी दिली आहे. प्रमाणभूत आणि जास्तींत जास्त माहिती देणारा हाच ग्रंथ असावा. उपलब्ध वाङ्मयांतील उताऱ्यांनीं हा ग्रंथ भरलेल्या नसून व्यक्तिगत अनुभवानें हा भरलेला आहे. तुरुंगवासांतच हा ग्रंथ त्यांनीं लिहिला. बंगाली आणि हिंदुस्थानींत त्याचे अनुवाद झाले आहेत. हिंदुस्थानांतील गायीगुरांची कशी

जोपासना करावी, गुरांचें दूध कसें वाढवावें, याविषयीं हा ग्रंथ वाचणाऱ्यांस भरपूर ज्ञान मिळेल. गाय आणि म्हैस यांची तुलनाहि या ग्रंथांत आढळेल.

## हिंदु आणि हिंदुधर्म

एकानें मला प्रश्न विचारला आहे: हिंदु म्हणजे काय? या शब्दाची उत्पत्ति काय? हिंदुधर्म म्हणून कांहीं आहे का?

आजकाल विचारण्यासारखा हा प्रश्न आहे. मीं इतिहासज्ञ नाहीं. खूप पांडित्याचा, गाढ्या विद्वत्तेचा मी दावा करीत नाहीं. परंतु कांहीं प्रमाणभूत अशा हिंदुधर्मावरील ग्रंथांत मीं वाचलें आहे, कीं 'हिंदु' शब्द वेदांत नाहीं; परंतु अलेक्झांडरनें जेव्हां हिंदुस्थानवर स्वारी केली, तेव्हां सिंधूच्या पूर्वेकडील लोकांना हिंदू म्हणून संबोधण्यांत येत असे. इंग्रजी बोलणारे हिंदी लोक सिंधु नदीला इन्डस असें म्हणतात. 'स' अक्षर ग्रीकमधें 'ह' झालें. या लोकांच्या धर्माला हिंदुधर्म म्हणण्यांत येऊं लागलें. आणि हा धर्म अत्यन्त सहिष्णु होता हें तुम्ही जाणतांच. जुलूम आणि छळ चांचावा म्हणून इकडे ख्रिश्चन आले, त्यांनाहि हिंदुधर्मानें आश्रय दिला. बेने इस्त्राइल नांवानें ओळखले जाणारे ज्यू आले; पुढें पारशी आले. सर्वांना हिंदुधर्मानें आश्रय दिला. सर्वांना जवळ घेणारा, सहिष्णु असा जो हिंदुधर्म त्या हिंदुधर्माचा मी आहें, याचा मला अभिमान वाटतो. विद्वान् आर्यलोक स्वतःला वैदिक धर्मी म्हणवतात व हिंदुस्थानला आर्यावर्त म्हणण्याचा आग्रह धरतात. मला अशी महत्त्वाकांक्षा नाहीं. माझ्या कल्पनेचा हिंदुस्थान मला पुरेसा आहे आणि त्या नांवानें मला समाधान आहे. यांत वेदाचा अन्तर्भाव होतोच, शिवाय आणखीहि कांहीं अधिक आहे. हिंदुधर्माची प्रतिष्ठा कोणत्याहि प्रकारें कमी न करतां मी इस्लामी, ख्रिश्चन, झोरोआस्ट्रियन व ज्यू या धर्मांत जें जें उत्तम आहे, त्यालाहि तितक्याच आदरानें मानतों. यांत कांहीं विसंगति आहे असें मला वाटत नाहीं. असा हिंदुधर्म सूर्यचंद्र आहेत तोंवर राहील. तुलसीदासांनीं एका दोह्यांतच या धर्माचें सार दिलें आहे:

"दया धर्मको मूल है पापमूल अभिमान
तुलसी दया न छांडिये जब लग घटमें प्रान"

## सर्वसामान्य छावणीसंबंधीं

मी ओखला छावणीला भेट द्यायला गेलों, त्या वेळेस माझ्याबरोबर ज्या भगिनी आल्या होत्या, त्यांना वाटलें, कीं मी निर्वासितांच्या छावणींतील ज्या दुराचारांसंबंधीं बोललों तें बहुधा ओखला छावणीला उद्देशूनच असावें. त्यामुळें त्या बेचैन झाल्या. परंतु ओखला छावणीला मीं धांवती भेट दिली होती. अशी धांवती भेट देऊन मी त्या छावणीसंबंधीं असें कांहीं बोलणें अशक्य होतें. मी जें बोललों, तें सर्वसाधारण छावणींतील वाईट प्रकारांसंबंधीं बोललों.

## ईश्वराचा द्रोह

या वेळच्या दंगलींत दिल्लींतील जवळजवळ १३७ मशिदींची कमी-अधिक मोडतोड झाली आहे हें मला सांगणें भाग आहे. कांहींचीं मंदिरें बनवण्यांत आलीं आहेत. अशी एक मशीद कॉनॉट प्लेस नांवाच्या भागांत आहे. कोणाच्याहि ती सहज ध्यानांत येईल. तिरंगी झेंडा तिच्यावर लावण्यांत आला आहे. आंत एक मूर्ति बसवून मशिदीचें मंदिर करण्यांत आलें आहे. असें करणें म्हणजे हिंदु व शीख धर्माला कलंक लावणें होय. असें करणें म्हणजे माझ्या मतें ईश्वराचा द्रोह आहे. पाकिस्तानांतहि असेंच करण्यांत आलें आहे, असें म्हटल्यानें हा कलंक कांहीं कमी होत नाहीं. हिंदुधर्म, शीखधर्म वा इस्लामी धर्म अशानें नाशाप्रत जातील. अखिल भारतीय कॉंग्रेस-समितीचा या बाबतींत ठराव तुम्ही लक्षांत आणा.

## रोमन कॅथॉलिकांचा छळ

नेहमींपेक्षां उशीर होत असला, तरीहि एक गोष्ट सांगणें भाग आहे. गुरगांव जिल्ह्यांत रोमन कॅथॉलिकांचाहि छळ करण्यांत आला असें मला सांगण्यांत आलें. ज्या गांवीं ही गोष्ट झाली त्याचें नांव कन्हाई. दिल्लीपासून २५ मैलांवर हा गांव आहे. ज्यांनीं माझ्याकडे ही तक्रार आणली त्यांतील एक रोमन कॅथॉलिक पाद्री होते, आणि दुसरे गृहस्थ धर्मशिक्षण देणारे एक

शिक्षक होते. हिंदूंनीं केलेल्या छळाची हकिकत देणारें रोमन कॅथॉलिकांनीं लिहिलेलें एक पत्र त्यांनीं मला दिलें. आश्चर्य हें, कीं तें पत्र उर्दूत होतें. याचा अर्थ, कीं त्या भागांतील रहिवाशी मग ते हिंदू असोत वा इतर असोत, हिंदुस्तानीच बोलूं शकतात व उर्दूत लिहूं शकतात. गांव सोडून जा नाहीं तर बघा, अशी रोमन कॅथॉलिकांना धमकी देण्यांत आली आहे असें ते दोघे म्हणाले. मी आशा करतों, कीं ही दमदाटी उगीचच असेल. ख्रिश्चन बंधूंना स्वतःच्या धर्माप्रमाणें आपापले उद्योगधंदे करीत निश्चितपणें राहतां येईल असें मी मानतों. आज राजकीय गुलामगिरी देशांतील गेली आहे. ब्रिटिशांच्या राजवटींत जें स्वातंत्र्य या ख्रिश्चन बंधू-भगिनींना लाभत होतें तें त्यामुळें कमी नाहीं होणार. स्वातंत्र्य का येथें फक्त हिंदूंना आणि पाकिस्तानांत फक्त मुसलमानांना मिळालें ? मीं मागें एकदां तुम्हांला सांगितलेंच होतें, कीं मुसलमानांवरचा क्रोध-संताप कमी झाला, कीं तो दुसऱ्यांवर वळेल. परंतु माझी भीति इतक्या लौकर खरी ठरेल असें नव्हतें मला वाटलें. मुसलमानांवरचा राग अजून शमलेला नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें हे ख्रिश्चन निरपराधी होते. ते ख्रिश्चन आहेत व गोमांस व डुकराचें मांस खातात, हाच काय तो त्यांचा अपराध. परंतु माहितीसाठीं म्हणून मीं त्या पाद्रीबंधूंना विचारलें कीं ‘ गोमांस व डुकराचें मांस खातां का ? ’ तर ते मला म्हणाले, कीं आपण होऊन कधींच तेथील रोमन कॅथॉलिकांनीं तें मांस खाणें सोडलें आहे. अशा प्रकारचे बुद्धिहीन पूर्वग्रह जर आपण ठेवूं, तर स्वतंत्र हिंदुस्थानचें भवितव्य अंधारमय आहे. आलेल्या पाद्री मित्राची तो रेवारी येथें असतांना सायकलहि हिरावून घेण्यांत आली. एवढेंच नव्हे, तर त्याचे प्राणहि मोठ्या मुष्किलीनें वांचले. जे हिंदू नाहींत आणि शीख नाहींत, त्या सर्वांचें निसंतान करूनच ही वेदना थांबायची आहे का ?

हिंदुस्थानचा असा नाश होत असलेला बघायला जगण्याची माझी इच्छा नाहीं. या भागांतील हिंदू आणि शीख यांना सुबुद्धि येवो म्हणून माझ्याबरोबर तुम्हीहि प्रार्थना करा.

## ७२

२२-११-'४७

## सोनपतचे ख्रिस्ती

काल मी गुरगांव जिल्ह्यांतील ख्रिश्चनांच्या छळाविषयीं बोललों. सोनपत येथील ख्रिश्चनांचीहि तीच दशा आहे अशी वार्ता मला मिळाली आहे. तेथील मिशनऱ्यांना प्रथम विनवण्यांत आलें, कीं निर्वासितांसाठीं घरें द्या. त्यांनीं आनंदानें आपल्या घरांचा उपयोग करूं दिला. त्याबद्दल त्यांचे आभारहि मानण्यांत आले असें मला सांगण्यांत आलें. परंतु या आभारांचें अखेरीस शापांत पर्यवसान झालें. मिशनरीबंधूंजवळ त्यांच्या इतर इमारतीहि मागण्यांत आल्या. आणि अखेरीस तुम्हांला त्रास व्हायला नको असेल, तर सोनपत सोडून निघून जा कसे, असें त्यांना बजावण्यांत आलें. जर खरेंच असें घडलें असेल, तर हा प्लेग फैलावत चालला आहे हें उघड आहे. आणि हा प्लेग शेवटीं हिंदुस्थानला कोठें नेऊन सोडणार समजत नाहीं.

## जशास तसें

कांहीं मित्रांजवळ चर्चा झाली. पाकिस्तानमधील परिस्थिति निवळल्याशिवाय इकडे अधिक सुधारणा अपेक्षितां येणार नाहीं असें त्यांचें म्हणणें. लाहोरसंबंधीं वर्तमानपत्रांतून जें आलें तें उदाहरण म्हणून मला सांगण्यांत आलें. वर्तमानपत्रांतील वृत्तान्त मी खरे घेऊन जात नसतों. त्यांतील गोष्टी वाचून वाचकांनीं मनावर एकदम परिणाम होऊं देऊं नये, अशी माझी त्यांना सूचना आहे. अतिशयोक्ति नि तिखटमीठ लावणें यांपासून उत्तम वृत्तपत्रेंहि मुक्त नसतात. परंतु तुम्ही वृत्तपत्रांत वाचतां तें खरें आहे असें धरलें, तरीहि वाईट गोष्टींचें कांहीं अनुकरण करायचें नसतें.

## सदाचाराविषयीं सांगणें

पाटीवर काढल्याशिवाय एका चौरसाची कल्पना करा. त्याला जर आपण काळजीपूर्वक वापरलें नाहीं, तर थोड्याच वेळांत काटकोनाचे लहान

वा मोठे निराळेच कोन होतील. पुन्हां या चौरसाला काळजीपूर्वक एका कोनांत धराल, तर बाकीचे तीन कोनहि नीट काटकोनांत होतील. त्याच-प्रमाणें हिंद-सरकार व हिंदी जनता जर नीट वागेल, तर पाकिस्तानहि तदनुरूप वागेल याविषयीं मला तिळभरहि शंका नाहीं. आणि सारा हिंदुस्थान शहाणपणानें वागूं लागेल. पागलपणा आणखी वाढूं नाहीं देतां कामा. ज्या ख्रिश्चनांना वाईट रीतीनें वागवण्यांत आलें, त्यांचा कांहीं अपराध होता असें मला कळलें नाहीं. म्हणून त्यांतून बोध घेऊन हा पागलपणा ताबडतोब थांबवा. जगासमोर आदर्श राष्ट्र म्हणून उभें रहायचें असेल, तर हें सारें पागलपण समूळ दूर केलें पाहिजे.

## निर्वासितांमध्यें परस्पर-सहकार

निर्वासितांमध्यें डॉक्टर, वकील, विद्यार्थी, शिक्षक, सेविका सर्व प्रकार आहेत. गरीब निर्वासितांपासून हे जर दूर जातील, तर समान आपत्तीपासून ते कांहीं धडा शिकले असें म्हणतां येणार नाहीं. धंदेवाले किंवा बिन-धंदेवाले, श्रीमंत वा गरीब, सर्वांनीं एकत्र रहावें, आदर्श नागरिकजीवन निर्मावें; हिंदू आणि शीखांना लाहोर सोडावें लागलें; परंतु श्रीमंत हिंदु-शीखांनीं तें एक नमुनेदार शहर केलें होतें. तशीं नवीन शहरें निर्मा म्हणजे दिल्लीसारख्या शहरांतील दाटी कमी होईल. शहरांतील राहणारांचें आरोग्य सुधारेल, प्रकृति बरी राहील. कुरुक्षेत्र येथील प्रचंड छावणींत दोन लाखांहून अधिक निर्वासित आहेत. ते जर अन्तर्बाह्य स्वच्छ नि शुचि जीवन जगतील, श्रीमंत नि धंदेवाले गरीब निर्वासितांबरोबर समतेनें वागतील, तंबूंतील जीवन समाधानानें कंठतील, नीट रस्ते वगैरे आंखतील, स्वेच्छेनें संपूर्ण सहकारी जीवन अवलंबितील, साफसफाईपासून तों इतर सर्व सेवेचीं कामें स्वतः करतील, सदैव उपयोगी कामांत मग्न राहतील, तर सरकारी तिजोरीवर त्यांचा बोजा पडणार नाहीं; त्यांचें सहकारी साधें जीवन सर्वांच्या कौतुकाचा नि आदराचा विषय होईल. शहरवासी लोक त्यांच्याकडे आदरानें बघतील. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या चांगल्या गोष्टी स्वतःहि करूं लागतील. आजकाल सर्वत्र दिसणारा कडवटपणा, परस्पर द्वेषमत्सर क्षणांत नाहींसे होतील. मग निर्वासितांची संख्या केवढी कां असेना; मध्यवर्ती

सरकारला त्याची चिंता नाहीं वाटणार; स्थानिक सरकारांनाहि त्रास नाहीं वाटणार. लाखों निर्वासित असें आदर्श जीवन जगूं लागले, तर त्रस्त जग त्यांचें कौतुक करील.

## सरकारचा गोंधळ

आणि अन्न-वस्त्रनियंत्रणाचा प्रश्नहि समोर आहे. सरकारला वाटत आहे, कीं अन्नधान्य नि कपडा यांची खरोखरच देशांत वाण आहे; नियंत्रणें दूर केलीं, कीं किंमती भरमसाट वाढतील; नियंत्रणांमुळें गरीब जनता भुकेच्या लांडग्याला कशी तरी दूर राखीत आहे; स्वतःची नग्न दशा वांचवीत आहे; या विचारानें नियंत्रणें दूर करावीं कीं न करावीं, सरकारला समजत नाहीं. व्यापारी, दलाल व धान्योत्पादन करणारे यांच्या प्रामाणिकपणाविषयीं सरकारला शंका आहे. नियंत्रणें कधीं उठतात आणि गरीब जनतेवर गिधाडाप्रमाणें आपण झडप घालून खिसे कधीं भरूं, असें या लोकांना वाटत आहे, असें सरकारला वाटतें. सरकारसमोर दोन अनिष्ट गोष्टी आहेत. नियंत्रणें राखणें ही त्यांतील कमी अनिष्ट अशी गोष्ट असें सरकारला वाटतें.

## व्यापाऱ्यांना विनंति

व्यापारी, दलाल, धान्य निर्मिणारे सर्वांना माझी विनंति, कीं त्यांनीं सरकारची भीति दूर करावी. नियंत्रणें दूर झालीं, तर किंमती वाढणार नाहींत, एवढेंच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेला—जरी काळाबाजार व भ्रष्टता दूर झालीं नाहींत समजा, तरी—अधिक सुखाचे दिवस येतील अशी ग्वाही या लोकांनीं सरकारला द्यावी.

## ७३

२३–११–'४७

## प्रार्थनेच्या वेळेस शान्ति

गांधीजी म्हणाले, " प्रार्थनेच्या वेळेस शान्ति राखण्याची आपली पद्धति

आहे. परंतु आज भगिनी मोठ्या संख्येनें हजर असल्यामुळें त्यांच्यांत कुजबूज चाले व शान्ति भंगे.' (गांधीजींच्या या शब्दांनंतर संपूर्ण शांतता झाली.)

## मर्यादेच्या पलीकडे

आकाशवाणीवाले मला सांगत असतात, कीं पंधरा मिनिटांहून अधिक बोलणें नसावें. २० मिनिटें म्हणजे हद्द झाली. मला त्यांची माफी मागितली पाहिजे. कधीं कधीं हा नियम मला पाळतां येत नाहीं. कारण जे श्रोते प्रत्यक्ष माझ्या समोर असतात त्यांच्या हृदयाला पोंचणें हा मुख्य उद्देश असतो. आकाशवाणीचे नियम नंतर. अधिक वेळ चालणारीं भाषणें नोंदून घेण्याची आकाशवाणीजवळ सोय आहे कीं नाहीं, मला माहीत नाहीं. हेतुहीन बोलायची किंवा आपला आवाज आपणच ऐकण्याची मला संवय नाहीं.

## हिंसेचें समर्थन नाहीं

श्रोत्यांतील एकानें एक लेखी प्रश्न दिला आहे. आपला हक्क धोक्यांत असतां हिंसेनें त्याचा बचाव करावा कीं नाहीं? माझें उत्तर असें, कीं हिंसा हक्काचें किंवा कोणाचेंच रक्षण खऱ्या अर्थानें करीत नसते. सम्यक् रीतीनें बजावलेल्या कर्तव्यानेंच हक्क मिळत असतो, आणि त्याच्यावर आक्रमण होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, मी माझें काम नीट करीन तरच मजुरीचा माझा हक्क शाबीत होतो. काम पुरें न करतां मजुरी घेईन, तर ती चोरी होईल. कर्तव्यपालनांतूनच हक्क पैदा होतो. कर्तव्यपालन हाच त्याचा आधार. हक्कांची भाषा येतां-जातां बोलणाऱ्याच्यामध्यें मी नाहीं सामील होऊं शकत.

## हरिजनांचा छळ

रोहटक व अन्यत्र जाट लोकांनीं हरिजनांच्या स्वातंत्र्यावर गदा आणल्याचें कळलें. असे जुलूम नवीन नाहींत. ब्रिटिश राजवटींतहि हे प्रकार चालत. आश्चर्य हें, कीं जें नवीन स्वातंत्र्य आपण मिळविलें, त्यांत हे जुलूम नष्ट होण्याऐवजीं आणखीच उग्र होत आहेत. आलेलें स्वातंत्र्य प्रत्येक हिंदी

माणसाचें नाहीं का? मनुष्य कोणत्याहि सामाजिक थरांतील असो, त्या सर्वांसाठीं हें स्वातंत्र्य नाहीं का? कालपर्यंत हरिजन गुलाम होते तसेच ते अजूनहि राहणार का? एक अन्याय दुसऱ्या अन्यायाला जन्म देतो. पाकिस्तानांत कांहींहि झालेलें असो, तेथें आपण मुसलमानांजवळ जें अन्याय्य वर्तन केलें, त्यांतूनच खिश्चनांजवळहि अन्याय्य रीतीनें वागूं लागेपर्यंत मजल आली. हरिजनांजवळचें हें वर्तन हीच गोष्ट दाखवीत आहे. ज्यांना आपण चुकीनें अस्पृश्य संबोधीत असूं व तदनुरूप वागवीत असूं, त्या हरिजनांवर इतर हिंदू जे अन्याय करतात त्यांचें निराकरण करण्यासाठीं हरिजन-सेवक-संघ स्थापण्यांत आला. गेल्या १५ ऑगस्टला देशांत जो बदल झाला, त्याचें पुरें महत्त्व जर आपणांस समजलें असतें, तर देशांतील दीनाहून दीनालाहि स्वातंत्र्याच्या प्रभेचा अनुभव घेतां आला असता. ज्या भीषण घटना अगतिकपणें आपणांस पहाव्या लागत आहेत, त्या तशा मग पहाव्या लागल्या नसत्या. प्रत्येकजण स्वतःच्या प्रगतीपुरतें पहात आहे आणि हिंदच्या प्रगतीची कोणालाच दखल नाहीं असें दिसत आहे.

## ७४

२४–११–'४७

## विधायक कामाची जरुरी

मी प्रार्थनासभेला येतों, तेव्हां तुमच्यामधून जायला मला व माझ्या मुलींना अडचण पडूं नये म्हणून तुम्ही भरपूर जागा ठेवतां ही चांगली आहे गोष्ट. हाच चांगुलपणा प्रार्थनेनंतर मी जातों तेव्हांहि व्यवस्थितपणें दाखवा असें माझें आग्रहपूर्वक सांगणें आहे. मी जातों तेव्हां माझ्या पायांना स्पर्श करण्यासाठीं बेसुमार गर्दी होते. तुमचें प्रेम मी जाणतों. त्याची मला कदर नाहीं असें नाहीं; परंतु तुमचें हें उतू जाणारें प्रेम क्षणभंगुर न ठरतां त्याला कांहीं देशसेवेचें विधायक स्वरूप यावें अशी माझी इच्छा आहे. किती तरी वेळां किती तरी लेखांतून विधायक कामाविषयीं मीं सांगितलें आहे. आज सर्वप्रथम जातीय ऐक्याची गोष्ट समोर आहे. पूर्वीं जातीजातींमधील तेढ अकरणात्मक होती.

परंतु आज तिला भयानक असें प्रत्यक्ष रूप आलें आहे. एका बाजूला हिंदू-शीख व दुसऱ्या बाजूला मुसलमान एकमेकांचे शत्रू होऊन उभे आहेत. त्याचे लज्जास्पद असे कोणते परिणाम झाले ते आपण पहातच आहोंत.

प्रार्थनेला येणाऱ्यांनीं एकमेकांविषयीं मनांत द्वेष-मत्सर बाळगूं नये एवढेंच नव्हे, तर जातीय ऐक्य पुन्हां स्थापण्यासाठीं त्यांनीं प्रत्यक्ष मदत केली पाहिजे. खिलापतीच्या काळांत हें ऐक्य केवढी अभिमानाची गोष्ट होती! त्या काळांतील प्रेमस्नेहानें उचंबळणाऱ्या प्रचंड सभांना का मी हजर नव्हतों? त्या सभा बघून माझें हृदय आनंदानें नाचे. ते दिवस का पुन्हां कधीं येणार नाहींत?

## ताजी करुण घटना

कालच या राजधानींत घडलेली ताजी करुण घटना बघा. कांहीं हिंदू नि शीख शरणार्थी एका मुसलमानाच्या रिकाम्या घराजवळ गेले व त्याचा बेकायदा ताबा घेण्याचा प्रयत्न करूं लागले असें ऐकलें. दंगा सुरू झाला. कांहींना दुखापती झाल्या. प्राणान्तिक दुखापत कोणाला झाली नाहीं. ही गोष्ट वाईट झाली यांत शंकाच नाहीं. परंतु मर्यादेपलीकडे अतिशयोक्ति करण्यांत आली. पहिली बातमी आली, कीं चार शीखांचे खून झाले. त्याचा परिणाम काय झाला असेल तें तुम्ही जाणतांच. भोसकाभोसकी अनेक ठिकाणीं झाली. एक नवीनच तंत्र येथें सुरू झालें आहे असें दिसतें. शीख लोक लहान कृपाणांऐवजीं नंग्या तरवारींनीं हिंडतात. कधीं हिंदू त्यांच्याबरोबर असतात, कधीं नसतात. ते मुसलमान वस्तींत जाऊन घरें खालीं करा फर्मावतात. खरें असेल, तर राक्षसी प्रकार आहे हा, आणि तो खुद्द राजधानींत. खरें नसेल, तर त्याची दखल घेण्याची जरूर नाहीं. परंतु खरें असेल, तर सरकारनेंच नव्हे, तर जनतेनेंहि ताबडतोब लक्ष दिलें पाहिजे. जनता पाठीशीं नसेल, तर सरकार तरी बिचारें काय करणार?

या बाबतींत माझें कर्तव्य काय याविषयीं मी अजून निःशंक नाहीं. परिस्थिति अधिकच बिघडत आहे. लौकरच कार्तिकी पौर्णिमा येईल.

सर्व प्रकारच्या अफवा उठत आहेत. दसरा आणि बकरईदच्या वेळच्या अफवा खोट्या ठरल्या तशाच याहि ठरतील, अशी मला आशा आहे.

या अफवांपासून एक धडा घ्यायचा तो हा, कीं आपण मोठ्या मुष्किलीनें जगत आहोंत. कोणत्याहि सरकारला किंवा राष्ट्राला ही स्थिति बरी नव्हे. देशाच्या जीवनाला पोखरणारी जी ही दुर्दशा, ती कमी करण्यासाठीं देशाच्या प्रत्येक सेवकानें गंभीरपणें स्वतःला काय करतां येईल त्याचा विचार करावा.

## कृपाणाचें रहस्य

मध्यवर्ती विधिमंडळाचे माजी सभासद लायलपूरचे सरदार संतसिंग यांनीं एक लांबलचक पत्र पाठवलें आहे. त्याचा या प्रश्नाच्या अनुरोधानें विचार करणें योग्य ठरेल. त्यांनीं शीखांची बाजू भक्कम रीतीनें मांडली आहे. मागील बुधवारच्या माझ्या प्रार्थना-प्रवचनांतील शब्दांत नसलेला व माझ्या मनांतहि नसलेला अर्थ त्यांनीं पाहिला. दक्षिण आफ्रिकेंतून १९१५ मध्यें आल्यापासून शीखांशीं माझा असलेला दृढ परिचय या भल्या सरदारांना बहुधा माहीत असेलच. एक काळ असा होता, जेव्हां माझा शब्द हिंदू आणि मुसलमानांप्रमाणें शीखांनाहि कायदा वाटे. बदलत्या काळाबरोबर गोष्टी बदलल्या आहेत; परंतु मी नाहीं बदललों. कोणत्याहि प्रकारचा स्वार्थ किंवा रागद्वेष मनांत न बाळगतां मी स्वतःला शीखांचा मित्र समजतों. शीखांमधील आजकालच्या कांहीं वृत्तींकडे मी ज्या दृष्टीनें पाहूं शकतों नि पाहतों, त्या दृष्टीनें सरदार संतसिंग कदाचित् बघत नसतील. मी खुल्या दिलानें आणि मोकळेपणें बोलूं शकतों; कारण मी त्यांचा खरा मित्र आहे. किती तरी वेळां सर्वसाधारण शीख माझ्या सल्ल्याप्रमाणें वागले म्हणून अनेक प्रसंगांतून ते निभावले, असें म्हणण्याचें मी धाष्टर्य करतों. शीख किंवा इतर कोणत्याहि जमातीविषयीं बोलतांना मी जपून बोलावें असा स्मरणार्थ इशारा मला देण्याची मुळींच जरूर नाहीं. ज्यांना ज्यांना शीख जमातीच्या भल्याची इच्छा आहे त्या सर्वांनीं आणि सरदार संत-सिंगांनींहि प्रवाहाबरोबर वाहून न जातां शीखांच्या या थोर बहादर जमातीस

आजच्या पागलपणापासून, तसेंच दारू वगैरे सर्व दुर्गुणांतून मुक्त करण्याला मदत करावी. जी तलवार जोरजोरानें ते परजीत आहेत आणि वेडेपणानें वापरीत आहेत, ती त्यांनीं म्यान करावी. कृपाण म्हणजे वाटेल त्या लांबीची तरवार अशा प्रिव्ही कौन्सिलच्या निकालानें त्यांनीं मूर्ख बनूं नये. तत्त्वहीन दारुड्याच्या किंवा वाटेल तसा उपयोग करणाऱ्याच्या हातांतील कृपाण पवित्र असूं शकत नाहीं. पवित्र वस्तु, पवित्र आणि कायदेशीर प्रसंगींच वापरायची असते. कृपाण हें निःसंशय सामर्थ्याचें प्रतीक आहे, आणि तें त्याला भूषवितें, जो आश्चर्यकारक संयम स्वतःवर ठेवतो आणि एकटा प्रचंड संख्येनें येणाऱ्यांचा मुकाबला करतो.

शीखांचा इतिहास मीं चांगल्या रीतीनें अभ्यासिला आहे आणि ग्रंथसाहेबाचेंहि खोल अध्ययन करून त्यांतील रस प्यालों आहें. सरदार संतसिंगांनीं मी असें म्हणतों तरी क्षमा करावी. ग्रंथसाहेबांतील शिकवणीप्रमाणें पाहूं, तर शीखांनीं जें केलें तें असमर्थनीय आणि आत्महत्या करणारें असेंच आहे. शीखांचें शौर्य नि त्यांची दृढता अशी वाटेल त्या गोष्टीसाठीं उधळतां कामा नये. सर्व हिंदुस्थानला त्यापासून बळकटी मिळूं दे. माझ्या मतें शीखांचें शौर्य-धैर्य आज देशाला भयप्रद होत आहे. असें तें होऊं नये असें मला वाटतें.

शीख हे इस्लामचे पहिल्या नंबरचे शत्रू आहेत असें सुचवणें अर्थातच वाह्यात आहे. मलाहि असेंच नसत का म्हणत? त्यांच्यांत नि माझ्यांत का हा मान विभागायचा आहे? परंतु त्या मानाची मीं कधींच इच्छा केली नाहीं. माझें सारें जीवन या आरोपाचा इन्कार करणारा पुरावा आहे. शीखांविषयीं असें म्हणतां येणें शक्य आहे का? शेरे काश्मीरच्या पाठीशीं उभे राहणाऱ्या शीखांचा धडा घ्या. शीखांच्या नांवानें केलेल्या अविवेकी कृत्यांचा अनुताप होऊं दे.

## दुष्ट सूचना

शीखांना पाकिस्तानांत कोणी राहूं देणार नाहीं हें स्पष्ट असल्यामुळें त्यांना येथें बळी दिल्यानें हिंदूंचाच फायदा होईल, असाहि एक विचार हवेंत

आहे. अशा भ्रातृहत्येच्या पापांत मी कधींच सामील होणें शक्य नाहीं. प्रत्येक हिंदु आणि शीख सन्मानानें आणि संरक्षणाच्या खात्रीनें जोंपर्यंत पश्चिम पंजाबांतील आपल्या घरीं जात नाहीं आणि स्वतःच्या व्यक्तिगत कारणास्तव जे पाकिस्तानांत राहणें पसंत करतात त्यांना वगळून बाकीचे निर्वासित मुसलमान जोंपर्यंत इकडे परत येत नाहींत, तोंपर्यंत या अभागी देशाला शान्ति नाहीं. एकमेकांस साहाय्य करणाऱ्या नि शान्तीनें नांदणाऱ्या शेजाऱ्यांप्रमाणें रहायचें असेल, तर जथाबंध लोकवस्तीच्या अदलाबदलीचें पाप धुऊन काढलेंच पाहिजे.

## पाकिस्तानचीं पापकृत्यें

पाकिस्तानच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचायला मला सांगूं नका. अशानें हिंदू किंवा शीख दुःखितांचा थोडाच फायदा होणार आहे? पाकिस्तानचीं पापें भयंकर आहेत हें मी जाणतों व त्यांचा बोजा त्यांना उचलावाच लागेल. माझें मतच हवें असेल, (जर त्या मताची कांहीं किंमत असेल) तर मीं एवढें सांगितलें म्हणजे पुरें, कीं १५ ऑगस्टच्या किती तरी आधींपासून मुस्लिम लीगनें आरंभ केलेला आहे. आणि गेल्या १५ ऑगस्टला त्यांनीं नवीन पान उघडलें असेंहि मला म्हणतां येणें शक्य नाहीं. परंतु माझें हें मत मांडल्यामुळें तुमचा फायदा होणार आहे असें नाहीं. महत्त्वाची गोष्ट एवढीच, कीं आपणहि इकडील लोकांनीं त्या पापाचें अनुकरण केलें आणि पापांत भागीदार झालों! दोघे सारखे झाले! आतां तरी मोहांतून शुद्धीवर येणार का? पस्तावून निराळीं पावलें टाकणार, कीं अधोगतीलाच जात राहणार!

### ७५

२५-११-'४७

## शरणार्थी कीं दुःखी?

काल एका शरणार्थी बंधूनें मला सांगितलें, कीं "आम्हांला शरणार्थी म्हणून कां ओळखतां? वास्तविक तुमच्या म्हणण्याप्रमाणें सारा हिंदुस्थान प्रत्येकाचें घर आहे. हिंदी राज्यांत कोठेंहि राहायला आम्हांला परवानगी

असायला हवी. तो आमचा हक्कच आहे. पाकिस्तानांत अपार हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, म्हणून तर आम्ही इकडे आलों. आम्हांला म्हणायचेंच असेल, तर 'दुःखी' म्हणा." दुःखी शब्दानें त्यांना अधिक बरें वाटत असेल, तर तो शब्द वापरायला माझी हरकत नाहीं. शरणार्थी 'रिफ्यूजी' हा परिचित असा इंग्रजी शब्द आहे. अजून त्या भाषेची पकड आपणांवर आहे. हिंदुस्थानी वृत्तपत्रांनीं त्याचा शरणार्थी असा बरोबर अनुवाद केला. भेटायला आलेल्या मित्रानें 'सफरर्स' हा इंग्रजी शब्दच वापरला. मीं त्या इंग्रजी शब्दाला 'दुःखी' हा शब्द सुचवला. त्या मित्रानें तो प्रतिशब्द स्वीकारला. आज या दुःखी लोकांसंबंधीं मी बोलणार आहें.

## मुसलमानांच्या घरांचा कबजा नका घेऊं

आज मला तीन प्रकारचे लोक भेटले. प्रथम लाहोरचें एक कुटुंब भेटलें. त्यांचें सारें बरबाद झालें आहे. कुटुंबांतील सतरा माणसेंहि दुरावलीं. आम्हांला दिल्लींत घर द्या मिळवून, ती मंडळी म्हणाली. मीं त्यांना म्हटलें, कीं मी कांहीं सरकार नाहीं. आणि सरकार असतों तरीहि मदत देऊं शकलों नसतों. कारण दिल्लींत रिकामीं घरें नाहींत. इतरांप्रमाणें तुम्हींहि छावणींत जाऊन राहिलें पाहिजे. ती मंडळी म्हणाली, दुसऱ्यांच्या दयेवर जगणारे आम्ही भिकारी नाहीं. मीं त्यांना म्हटलें, कीं दुसऱ्याच्या दयेवर जगणारी एकहि व्यक्ति मला नको आहे. छावणींत राहणाऱ्यांनीं अन्न-वस्त्र-निवाऱ्यासाठीं काम करावें. ते मला म्हणाले, आमचीं मुलें-बाळें आहेत. मीं म्हटलें, इतर दुःखी जनांनाहि आहेत. दुःखी लोकांत जे अधिक बुद्धिमान् आहेत त्यांनीं छावणींतील जीवन सुसंघटित करावें, स्वतःच्या अनुभवाचा नि ज्ञानाचा फायदा दुसऱ्या समदुःखितांना द्यावा. ते मला म्हणाले, येथें मुसलमानांचीं पुष्कळ घरें आहेत. त्यांचे ते शब्द ऐकून मी व्यथित झालों. माझी मान खालीं झाली. हजारोंना घरेंदारें सोडून जाणें भाग पडलें होतें. या दुःखितांचीं हृदयें दुःखानें कोमल नव्हतीं झालीं. माझ्या सांगण्याचा उपयोग नाहीं झाला. मीं शेवटीं त्यांना म्हटलें, कीं जे थोडे दुःखीकष्टी मुसलमान अजून घरांतून आहेत, त्यांना घरें खालीं करा म्हणण्यापेक्षां तुम्ही

मलाच हें सुखवस्तू घर तुमच्यासाठीं खालीं करायला कां नाहीं सांगत? या शब्दांनीं ते गप्प बसले.

## वाजवी मागणी

त्यानंतर हजारा येथील कांहीं शीख भेटले. त्यांच्यापाशीं कृपाणें नव्हतीं. ते म्हणाले, "आम्ही शेतकरी आहोंत. शेतीसाठीं आम्हांला कांहीं सोयीसवलती हव्या आहेत." पूर्व पंजाबमध्यें कां जात नाहीं असें मीं त्यांना विचारलें. ते म्हणाले, "पूर्व पंजाब पश्चिम-पंजाबांतल्याशिवाय कोणाला घ्यायला तयार नाहीं. शिवाय सरहद्द प्रांतांतील लोकांनाहि सामावून घेण्याइतकी जमीन पूर्व पंजाबजवळ नाहीं." या दुःखितांतील ८ हजार हजारा येथील होते. मध्यवर्ती सरकारकडे जायला त्यांना सांगण्यांत आलें होतें. सरकारनें शेतीच्या जमिनीवर शक्य तितक्या लौकर त्यांची व्यवस्था करावी असें मला वाटतें. मुसलमानांना त्यांच्या घरांतून हुसकून लावा, असें या शीख मित्रांचें म्हणणें नव्हतें. त्यांना जमीन हवी होती. आणि कर्ज म्हणून नांगर, बैल, बीं-बियाणें हवें होतें. ते म्हणाले, "आम्ही आपलें धान्य मग पिकवूं." शेतीची जमीन जेथें द्याल तेथें जायची त्यांची तयारी होती. हे दुःखित खरोखरच वाजवी मागणी करणारे होते, समजूतदार होते. त्यांची योग्य इच्छा पूर्ण केली पाहिजे.

## परत जाण्याची शर्त

आम्ही परत केव्हां जाऊं शकूं, अशी एकानें पृच्छा केली आहे. याक्षणीं जाऊं शकतां, परंतु तत्पूर्वीं हिंदी संघराज्यांतील मुसलमानांची ससेहोलपट आधीं थांबायला हवी. पाकिस्तानांत ज्यांना इच्छेविरुद्ध जाणें भाग पडलें, त्यांचें पुन्हां स्वागत करायला येथील जनता तयार हवी. असें झालें म्हणजे मग मी पश्चिम पंजाबांत जायला मोकळा होईन आणि तेथील मुसलमानांना सांगेन, कीं पाकिस्तानांतील घरें-दारें सोडून ज्या हिंदू-शीखांना जाणें भाग पडलें त्यांना परत बोलवा, त्यांचें स्वागत करा. परंतु हिंदी संघराज्यांतील ३॥ कोटी मुसलमान घालवून लावले पाहिजेत, अशी मूर्खपणाची भाषा मीं आज ऐकली. हें मला तरी असह्य आहे. अशी दुःस्थिति पाहण्याची मला

इच्छा नाहीं. मला कधीं कधीं वाटतें, कीं मी आतां उगीच भूभार आहें. परंतु माझे प्राण राहोत वा जावोत; ज्या दिवशीं सारे दुःखित आपापल्या घरीं परततील, असा दिवस उजाडेल.

## ७६

२६-११-'४७

## निराधार आरोप

गांधीजी म्हणाले, मुंबईहून एक पत्र आलें आहे. लेखकानें आपलें नांव दिलें नाहीं. त्यानें मुंबईच्या एका वृत्तपत्राचें कात्रण सोबत धाडलें आहे. त्या कात्रणांत असा मजकूर आहे कीं 'अखिल भारतीय आकाशवाणीचा गांधीजींच्या प्रार्थनोत्तर प्रवचनांसाठीं उपयोग करणें म्हणजे कॉंग्रेसचा प्रचार करणें होय. अहिंसेच्या बुरख्याखालचें हें फॅसिस्ट तंत्रच आहे. लोकांना गांधीजींचीं भाषणें ऐकण्याचा आतां वीट आला आहे.' माझें याला उत्तर असें, कीं जरी कांहींना असें वाटत असलें, तरी अनेकांचीं अशींहि पत्रें मला येतात, कीं तुमच्या भाषणांनीं धीर येतो. हा आरोप निराधार आहे. जें सरकार स्वतः-च्या स्तुतिस्तोत्रांसाठीं आकाशवाणीचा उपयोग करील, तें नालायक होय. सरकारचीं सत्कृत्यें हाच त्याचा खरा प्रचार, उत्तम प्रचार. माझ्याविषयीं म्हणाल, तर प्रार्थना आणि धर्म यांच्याशीं सलग्न गोष्टीच मी फक्त बोलतों. ज्यांना त्यांत रस नसेल वाटत, त्यांनीं तीं ऐकूं नयेत. आकाशवाणीसाठीं बोलण्याची मला हौस नाहीं. मानवांची सेवा हें एकच माझें ध्येय आहे; त्यासाठींच फक्त मी बोलतों. लोक प्रार्थनेला येण्याचें बंद करतील, तर प्रार्थनोत्तर भाषणेंहि थांबतील.

## अपहृत भगिनी

दुसरीं कांहीं पत्रें अपहृत भगिनींसंबंधीं आहेत. तीं वाचून मी अति दुःखी झालों. पाकिस्तानांत अनेक भगिनींचें अपहरण करण्यांत आलें. त्यांना निर्दयपणें वागवण्यांत आलें, त्यांना भ्रष्ट करण्यांत आलें. ज्या भगिनींना वांचवण्यांत आलें त्यांची दानत नि संस्कृति अशी, कीं त्या त्या दुःखानें मरत

आहेत. समाजहि त्यांच्याकडे तुच्छतेनें पहात आहे. असें करणें निर्दयपणाचें आहे. सीतेचें सतीत्व नि तेज जिच्या अंगांत आहे तिला कोणीहि स्पर्शूं शकणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु या युगांत सीता दुर्मीळ आहे. निदान प्रत्येक स्त्री त्या उंचीला पोंचूं शकणार नाहीं. जिला बळजबरीनें भ्रष्ट करण्यांत आलें तिनें लाजेनें मरूं नये. ती पापी, अनाचारी थोडीच आहे? अनैतिक वर्तनाचे स्त्री-पुरुष समाजांत खुशाल वावरत असतात. त्यांना ना शिक्षा, ना दंड. कांहीं प्रतिष्ठित स्त्री-पुरुषांचें अनैतिक वर्तन प्रकाशांत येत नसतें. असें असतां पशुतेला बळी पडलेल्या निष्पाप भगिनींना बहिष्कृत करायला हे लोक जातात! मला तर यानें वेदना होते. अशा पाशवी वर्तनाला माझी पत्नी किंवा मुलगी बळी पडली असती, आणि तिला वांचवून परत आणलें असतें किंवा ती निसटून आली असती, तर मीं तिला कधींहि घालवलें नसतें, तिरस्कारानें तिच्याकडे पाहिलें नसतें. अशा हिंदू व मुस्लिम भगिनी मला भेटल्या आहेत. तुम्ही मुळींच खंत करूं नका, लाज मानूं नका असें मीं त्यांना सांगितलें.

## पीक-पाण्याच्या वेळेस मदत

माझ्याकडे एका प्रान्तिक कॉंग्रेसचे सेक्रेटरी आले होते. ते स्वतः शेतकरी आहेत. ते म्हणाले, "पूर्वी हंगामाच्या वेळेस खेड्यांतील सर्व स्त्री-पुरुष एकमेकांस मदत करीत. परंतु आज शेतकऱ्यांना त्यासाठीं मजुरीनें मजूर लावावे लागतात. त्यामुळें धान्योत्पादनाचा खर्च वाढून धान्य महाग होतें; आणि स्वेच्छेची ती मोकळी सहकारी वृत्तीहि नष्ट होत आहे." मला ही भली चाल माहीत आहे. मी माझ्याजवळच्या सर्व शक्तीनिशीं सांगतों, कीं त्या चालीची अंमलबजावणी करा.

## किसान-राज्य

या सेक्रेटरींचें आणखी असें म्हणणें कीं, "अन्नधान्याचा मंत्रि—इतर बरेचसे नाहींत तर नाहीं—तरी शेतकरी असावा. आज एकहि प्रधान शेतकरी नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सरदार शेतकऱ्याच्या कुळांत जन्मले; त्यांना थोडें-फार शेतीचें माहीत असलें, तरी धंद्यानें ते बॅरिस्टर होते.

पंतप्रधान विद्वान् आहेत, थोर इतिहासकार आहेत, महान् लेखक आहेत. परंतु कृषिविषयक, शेतीविषयक, त्यांना कांहींच अवगत नाहीं. इतर मंत्री सुखवस्तू लोक आहेत. शेतांत त्यांनीं कधींहि काम केलेलें नाहीं. हिंदुस्थानांतील ८० टक्के लोकसंख्या शेतकऱ्यांची आहे. उत्पादन कसें वाढवावें, जमिनीचा कस कसा वाढवावा हें शेतकरीच जाणतो. शेतकरी नफेबाजी कां कशी करतो, हें शेतकरीच जाणू शकतो. तोच त्यावर उपाय योजूं शकेल. लोकशाहींत शेतकरीच सत्ताधारी असावा." प्रामाणिक नि कर्तबगार किसानाला पुढें आणण्यांत मला आनंदच वाटेल. अशा किसानाला कदाचित् इंग्रजी येणार नाहीं. मी पंडित जवाहरलाल यांना त्या शेतकऱ्याचे सेक्रेटरी व्हावयास व त्याच्या वतीनें परकी वकिलांच्या भेटीगांठीं व्यावयास सांगेन. अशा सेवेंत पंडितजींनीं अभिमान मानावा असेंहि मी सांगेन. असा शेतकरी पंतप्रधान रहायला राजवाडा मागणार नाहीं. तो शेणामातीच्या झोंपडींत राहील, आकाशाखालीं झोपेल; जेव्हां जेव्हां रिकामा असेल, तेव्हां तो आपल्या शेतांत काम करील. सारा नक्षाच बदलून जाईल. पंचायतीच्या राज्यांत हिंदुस्थानांत जर कोणाचें महत्त्व असेल, तर तें किसानाचें हें उघडच आहे. किसानाला कसें पुढें आणायचें हा प्रश्न आहे.

## ७७

२७-११-'४७

## अशक्य कांहींच नाहीं

मी आज गव्हर्नर-जनरलांना भेटायला गेलों होतों. तेथें लियाकत अलीसाहेबहि भेटले. मला तेथें कळलें, कीं गव्हर्नर-जनरल दोन्ही वसाहतींचे मुख्य प्रधान, सरदार पटेल व अर्थसचिव यांनीं परस्पर विचारविनिमय केला. कलहानें टेकीस आलेल्या दोन्ही देशांना शांति कशी लाभेल, यासंबंधीं त्यांनीं कांहीं निर्णय घेतले असेंहि कळलें. विसंवादांतून सुसंवाद निर्माण करणें प्रामाणिक नि कळकळीच्या माणसांना अशक्य नाहीं.

## शेरे काश्मीर

ज्यांना प्रेमानें शेरे काश्मीर म्हणण्यांत येते, ते शेख अबदुल्लाहि आज भेटले. काश्मीरमध्यें हिंदू व शीख मूठभर असले, तरी त्यांनाहि बरोबर घेण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. ते जम्मूलाहि गेले होते. तेथें जें झालें, तें हिंदू व शीख दोघांसहि लज्जास्पद आहे. परंतु त्यामुळें शेख अबदुल्लांनीं तोल नाहीं सोडला. जम्मूची त्यांची भेट सुपरिणामी ठरली. जर येथील आजचा सुसंवाद टिकला—आणि आशा तर आहे, कीं तो टिकेल म्हणून—तर जातीय ऐक्याबाबत खऱ्या हिंदुस्थानला तो धडा होईल.

काश्मीर हा पहाडी मुलूख आहे. हिंवाळ्यांत तिकडील जीवन कठिण असतें. अनेक रस्ते पाकिस्तानमधून जाणारे. फक्त एकच अरुंद चिंचोळा भाग पूर्व पंजाब व काश्मीर यांना जोडणारा आहे. सीमाप्रान्त आणि पश्चिम पंजाब यांतून हिंदूंना नि शीखांना ज्याप्रमाणें जाणें मुष्किल, त्याचप्रमाणें पूर्व पंजाबांतून मुस्लिमांना जातां येणें कठिण. मग रहायची गोष्ट तर दूरच राहो. अशा परिस्थितींत काश्मीरचा हिंदशीं व्यापार कसा चालायचा? पूर्व पंजाबांत असाच अविवेक राहील, पागलपणा चालेल, तर हिंदी संघराज्यांत काश्मीरनें सामील होण्यांत काय फायदा? पूर्व पंजाबांत शहाणपणाचा उदय होईल अशी मी आशा राखतों. काश्मीर आणि हिंद यांच्यामध्यें सुरक्षित रस्ता राहील असें करणें हें हिंद-सरकारचें कर्तव्य आहे. असें झालें तरच काश्मीरमधील लोकरीचा कपडा, इतर वस्तू, फळफळावळ वगैरे माल पूर्ववत् मोकळेपणें हिंदकडे येऊं शकेल.

## खरें असेल तर भयंकर

'डॉन' आणि 'पाकिस्तान टाईम्स' यांच्यावर कधीं कधीं मी नजर फिरवितों. पाकिस्तानांतील हीं वजनदार पत्रें आहेत. त्यांचें म्हणणें सहजा-सहजीं उपेक्षावें असें नाहीं. या पत्रांतून असें आलें आहे, कीं काठेवाडांत मुसलमानांचा छळ होत आहे. जाळपोळ, लूटमार, कत्तल, स्त्रियांचें अपहरण चालू आहे. यासंबंधीं कांहीं ताराहि मजकडे आल्या आहेत. जाळपोळ व लुटालूट कांहीं ठिकाणीं झाल्याचें कांहीं हिंदू मित्रांनीं मला

सांगितलें. परंतु खून, अपहरण, झाल्याचें आपणांस माहीत नाहीं असें ते म्हणाले. पाकिस्तानी पत्रांतील वृत्तान्त कितपत खरे आहेत, असें मीं लियाकत अलीसाहेबांना विचारलें. ते म्हणाले, कीं वृत्तान्त विश्वसनीय आहे. परंतु किती मोठ्या प्रमाणावर या गोष्टी झाल्या तें नाहीं नक्की सांगतां येणार. मला या हकिकतींनीं दुःख झालें. मी काठेवाडांत जन्मलों. जुनागडमधील हंगामी सरकारच्या प्रमुख स्थानीं माझा पुतण्या आहे. सरदार आणि श्री. शामळदास गांधी, दोघांनीं आपल्या काठेवाडमधील भाषणांतून ग्वाही दिली होती, कीं जर मुसलमान हिंदी संघराज्याशीं निष्ठावान् राहतील, तर जुनागडमध्यें किंवा काठेवाडांत कोणासहि धक्का लागणार नाहीं. जुनागडच्या हिंदू आणि मुसलमानांनीं आपल्या राजीखुशीनें हिंदी संघराज्यांत रहायचें ठरविलें आहे, हें ऐकून मला आनंद झाला. जर काठेवाडमधील हकिकती खऱ्या असतील, तर आपण जें स्वातंत्र्य मिळविलें, जें जुनागडमध्यें मिळविलें, तें अखेर गमावून बसूं. हे वृत्तान्त अतिशयोक्तिपूर्ण असतील असें मी मनापासून इच्छितों. ते अगदींच कदाचित् असत्य नसतील. या बाबतींत अधिकृत व खुलें असें पत्रक बाहेर पडलें, तर मला आनंद होईल. जर हें जहर हिंदुस्थानभर पसरलें, तर येथें जगण्यांत काय अर्थ ?

## ७८

२८-११ '४७

# गुरु नानकांची जयंति

आज गुरु नानकांची जयन्ति. शीखांच्या एका सभेला मला बोलावण्यांत आलें होतें. बाबा बचतरसिंग आले व त्यांनीं फार आग्रह केला. मी जायला प्रथम तयार नव्हतों. मीं बाबासाहेबांस सांगितलें, कीं मी ज्या कडू गोळ्या गिळायला देतों, त्यामुळें शीख माझ्यावर नाराज आहेत. मी जें कांहीं बोललों असेन तें खऱ्या प्रेमामुळें आणि भरलेल्या अंतःकरणानेंच बोललों. तथापि, अनेक शीखांना माझ्या बोलण्याचा राग आला आहे. म्हणून माझ्या येण्यानें कांहीं उपयोग नाहीं व्हायचा. परंतु बाबासाहेब म्हणाले, 'हजारों शीख स्त्री-पुरुष, मुलें-बाळें—ज्याच्यांपैकीं किती तरी जणांना

पाकिस्तानांत अपरंपार क्लेश भोगावे लागले ते तुमचे चार शब्द ऐकायला अधीर आहेत. त्यांना निराश नका करूं.' शेवटीं मीं संमति दिली. बाबासाहेब सभेला ही वार्ता देण्यासाठीं गेले. अर्ध्या तासांत येतां म्हणाले. येतांना त्यांनीं शेख अबदुल्लासाहेबांना बरोबर आणलें. मी चकित झालों. अलीकडे शीख व मुसलमान एकमेकांचें तोंड पहात नाहींत असें झालें आहे. अशा परिस्थितींत शेखसाहेब शीखांच्या सभेला हजर राहणें कसें शक्य? परंतु बाबासाहेब मला म्हणाले, कीं शेखसाहेबांनीं काश्मीरांतील हिंदू, शीख मुसलमान सर्वांना एकत्र आणलें आहे. त्यांनीं हें कसें केलें तें ऐकण्याची शीखांना इच्छा आहे. मीं आणि शेखसाहेब सभास्थानीं गेलों. हजारों शीखांनीं शांतपणें सारें ऐकलें. आमच्या बोलण्यानें त्यांना राग आल्यासारखें कांहीं दिसलें नाहीं. मला समाधान वाटलें. मीं त्यांना म्हटलें, कीं आज तुमचें नवीन वर्ष सुरू होतें. आजपासून नवा निर्मळ आरंभ करण्याचा संकल्प करा. पाकिस्तानांतील मुसलमानांनीं कांहींहि केलेलें असू दे. तुम्ही तुमचे हात निष्कलंक ठेवा. दोन पापांनीं पाप वाढतें; कमी होत नाहीं. गुरु नानकांच्या शिकवणीचें सहिष्णुता आणि हिंदु-मुस्लिम-ऐक्य हें सार होतें. एका मित्रानें मला लिहिलें आहे, कीं गुरु गोविंदसिंगांचे कितीतरी मुसलमान शिष्य होते. त्यांनीं त्या शिष्यांचा सांभाळ केला. दहाव्या गुरूनें जरी हातीं शस्त्र घेतलें असलें, तरी तें सतत अन्याय करणाऱ्यांविरुद्ध होतें; निरपराधी नि दीन-दुबळे यांच्या रक्षणार्थ होतें. चांदणी चौकांतून जातांना एकहि मुसलमान दृष्टीस पडत नाहीं. मला त्यामुळें अपार दुःख होतें. दिल्लींतील मुसलमान भयभीत व्हावेत याची हिंदू आणि शीखांना लाज वाटली पाहिजे.

## व्यापारांत जातीयता नाहीं

कलकत्त्याच्या मुस्लिम व्यापारी मंडळाचें मला पत्र आलें आहे. चिटणीस लिहितात, कीं मुस्लिम व्यापारी मंडळाला असलेली मान्यता मध्यवर्ती सरकारनें काढून घेण्याचें ठरविलें आहे. मुस्लिम व्यापारी मंडळाची ही तक्रार रास्त ठरेल, जर त्यांचीच मान्यता फक्त रद्द करण्यांत आली असेल; परंतु युरोपीय व्यापारी मंडळ, मारवाडी व्यापारी मंडळ, आणि अशा इतर मंडळांचीहि मान्यता काढून घेण्यांत आली असेल, तर हें करणें माझ्या मतें योग्यच ठरेल.

जातिधर्मनिरपेक्ष अशा शासनसंस्थेंत अलग अलग जातीय संघटनांना अंतर्गत सुधारणेव्यतिरिक्त अन्यत्र स्थान नाहीं. माजी परकी राजवटींत युरोपियन व्यापारी मंडळांस फाजिल महत्त्व असे. त्यांचा वार्षिक समारंभ महत्त्वाचा मानला जाई. व्हाइसरॉय तेथें जायचे व महत्त्वाच्या घोषणा करायचे. अतः-पर त्या मंडळाला अधिक महत्त्व दिलें जाणार नाहीं अशी मी आशा करतों. बऱ्या युरोपियन घराण्यांनीं येथील जनतेशीं आतां एकरूप व्हावें, सर्व हिंदुस्थानच्या हितांत स्वतःचें हित बघावें. स्वतःचें स्वतंत्र मंडळ बरखास्त करून त्यांनीं पुढाकार घ्यावा. हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पार्शी, ज्यू हे आधीं वा शेवटीं आतां हिंदीच आहेत. धर्म ही त्या त्या व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे. राजकारणांत, राष्ट्रीय कारभारांत, धर्म मिसळूं नये.

## सोमनाथ देवालयाचा जीर्णोद्धार

एका ख्रिश्चनानें सोमनाथाचा जीर्णोद्धार सरकारी तिजोरींतून होतां कामा नये म्हणून वृत्तपत्रांत पत्र लिहिलें आहे. या आक्षेपाशीं माझी सहानुभूति आहे. सरदार जवळ होतेच. मीं त्यांना तें कात्रण दाखविलें. ते म्हणाले, जुनागडच्या तिजोरींतून किंवा मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींतून एक पैहि या साठीं खर्चिली जाणार नाहीं. या मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा असें ज्या हिंदूंना वा इतरांना वाटतें, त्यांनीं दिलेल्या देणग्यांतूनच जीर्णोद्धार व्हायचा आहे. हिंदी संघराज्य जातिधर्मानिरपेक्ष आहे. तें धर्माधिष्ठित नाहीं. जुनागडमधील हंगामी सरकारचे श्री. शामळदास गांधी प्रमुख आहेत. त्यांनीं जमवलेल्या सार्वजनिक निधींतून पन्नास हजार देण्याचें अभिवचन दिलें आहे आणि जामसाहेबांनीं एक लाख द्यायचें कबूल केलें आहे.

## पापाला प्रोत्साहन का द्यायचें ?

पुष्कळ हिंदू आणि शीख मुलींचें मुस्लिम गुंडांनीं अपहरण केलें आहे. कांहीं लोकांनीं मला सांगितलें, कीं गुंड खंडणी मागत आहेत. परंतु असें करणें म्हणजे पापाला प्रोत्साहन देण्यासारखें आहे. मुलींना पळवणें हें माझ्या दृष्टीनें पाप आहे. मीं मुलींच्या पित्यांना नि पतींना या मोहांत फसूं नका असा सल्ला देईन. अपहृत मुलींना पाकिस्तान-सरकार वांचवील अशी मी श्रद्धा

राखतों. हिंदू नि शीखांनीं पळवलेल्या मुस्लिम मुलींबाबत हिंद-सरकारनेंहि असेंच वागावें.

## काठेवाडांत शान्ति

काल मीं तुम्हांला काठेवाडांत मुसलमानांच्या विरुद्ध होणाऱ्या घटनांविषयीं वाचलेलें सांगितलें होतें. जाळपोळ, लूट, खून, अपहरणें यांविषयीं सरदारांना मीं माहिती विचारली. सरदार म्हणाले, ' मीं जाण्यापूर्वीं जाळपोळ लुटालूट थोडी-फार झाली होती. मीं राजनिष्ठ मुसलमानांना संरक्षणाची हमी दिली आहे. जाळपोळ, लुटालूट यांचा बंदोबस्त करण्यांत आला आहे. खून किंवा मुस्लिम मुलींना पळवणें यांविषयीं मीं कांहींहि ऐकलें नाहीं. उलट, मुसलमानांचे प्राण नि मालमत्ता यांचें रक्षण व्हावें म्हणून कॉंग्रेसजनांनीं प्राण धोक्यांत घातले होते.' सरदारांनीं आरोपाचें निराकरण केलेलें ऐकून मी सुखावलों. वार्ताहरांनीं जाहीरपणें चूक सुधारावी. भ्रामक वृत्तान्त वृत्तपत्रांनीं देणें शोभत नाहीं. परंतु सरदारच अंधारांत असतील, तर जे गंभीर आरोप करण्यांत आले आहेत, त्यांचा अधिकृत पुरावा मांडण्यांत आला, तर मला बरें वाटेल.

## ७९

२९-११-'४७

## दिल्लींत दारू

गांधीजी म्हणाले, " दिल्लींत दारूचा खप बेसुमार वाढल्याचें मीं ऐकलें नि वृत्तपत्रांत वाचलें. दारूच्या पाठोपाठ अनेक व्यसनें येतात, अनेक दुर्गुण येतात. कालपासून शीखांनीं जर खरोखर नवीन पान उलटलें असेल, तर दारूचा खप पूर्वीपेक्षां कमी झाला पाहिजे.

## मशिदींचें नुकसान

दंग्यांत अनेक मशिदींचें नुकसान झालें आहे. कांहींचीं मंदिरें बनवण्यांत आलीं आहेत. पोलीस किंवा लष्कर यांच्या मदतीशिवाय तेथून मूर्तीं

हलवण्यांत यायला हव्यात. खरा पश्चात्ताप असेल, तरच हें शक्य होईल. शीख मशिदींत मूर्ती नेऊन बसविणार नाहींत हें मी जाणतों. परंतु मी म्हणतों त्याचा हा अर्थ, कीं शीखांत सुधारणा सुरू झाली, तर त्याचा साहजिकच हिंदूंवरहि हितपरिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. या विशिष्ट परिस्थितींत हिंदू आणि शीख दोघे संगनमतानेंच वागलेले आहेत.

## अपहृत मुली

पाकिस्तानांत किती तरी हिंदू आणि शीख मुलींचें अपहरण करण्यांत आलेलें आहे. कोणत्या भीषण परिस्थितींत त्या असतील तें एक प्रभूच जाणे. इकडील हिंदू आणि शीखहि चांगले वागले आहेत असें नाहीं. ज्या मुस्लिम मुलींचें अपहरण हिंदू-शीखांकडून करण्यांत आलें, त्यांच्यावरहि त्यांना पळवून नेणाऱ्यांनीं अपार जुलूम केल्याचें माझ्या कानांवर आलें आहे. पूर्व पंजाब सरकारनें अशा अश्लाव्य बंदीखान्यांतून प्रत्येक कन्यकेची मुक्तता करावी असें मी इच्छितों. प्रत्येक अपहरण, प्रत्येक बलात्कार, हें त्या त्या सरकारनें बेकायदा कृत्य ठरवावें आणि म्हणूनच आरंभापासून त्याला कोणतीहि मान्यता देऊं नये. त्या त्या मुली स्वतंत्र आहेत असेंच समजावें. प्रत्येक अशी मुलगी मुक्त करून त्या त्या विशिष्ट सरकारकडे परत पाठवीपर्यंत त्या त्या सरकारनें स्वस्थ बसूं नये. ती ती मुलगी आपण होऊन स्वेच्छेनें संगत झाली असेल किंवा परधर्मस्वीकार करती झाली असेल हें अशक्य आहे, हें सांगण्याची जरूरच नाहीं.

## नियंत्रणें

आणि आतां नियंत्रणें. साखरेवरचें नियंत्रण गेलें ही चांगली गोष्ट झाली. नियंत्रण उठल्यामुळें दर वाढणार नाहींत याची साखर-कारखानदारांनीं नि व्यापाऱ्यांनीं काळजी घ्यावी. जर उंसाचा भाव वाढला, तर साखरेच्या उत्पादनाचा खर्च वाढेल व म्हणून किंमती वाढतील हें मी समजूं शकतों. परंतु कारखानदार व व्यापारी यांच्या स्वार्थामुळें किंमती वाढतां कामा नयेत. उंसाचा भाव वाढला नाहीं तोंवर किंमती वाढवायच्या नाहींत, असें सर्व साखर-कारखानदारांनीं एकत्र येऊन ठरवावें. साखरेच्या बाबतींत

प्रामाणिकपणा दिसून आला, तर इतर अन्नधान्य व कपडा या बाबतींतील नियंत्रणें दूर व्हायलाहि जोराची चालना मिळेल. आणि साखरेपेक्षां गूळच खरोखर चांगला. तो खेड्यांतच तयार होतो. तो साखरेपेक्षां केव्हांहि स्वस्त मिळूं शकेल व सहजहि मिळेल.

## ऐषआरामी वस्तूंवर कर बसवा

तिसऱ्या वर्गाच्या रेल्वेच्या तिकिटांच्या दरांत वाढ झाल्याबद्दल एका मित्रानें तक्रार लिहिली आहे. तो म्हणतो, " यापेक्षां ऐषआरामाच्या तंबाकू, सिगार, सिगारेट्स इत्यादि वस्तूंवर अधिक कर बसविणें बरें." त्याची सूचना मला आवडली. परंतु या प्रश्नाचा मीं नीट अभ्यास केला नसल्यामुळें मी निश्चित मत देऊं शकत नाहीं. एतत्संबंधींच्या अधिकाऱ्यांचें लक्ष वेधून घेण्यासाठीं या सूचनेचा मीं फक्त उल्लेख केला. योग्य कारणाशिवाय एक पैहि खर्च होऊं नये म्हणून आमच्या मंत्र्यांनीं जपलें पाहिजे. याची एकच कसोटी आहे. खेडींपाडीं सरकारला जें देतात, तें नानाविध उपयुक्त खात्यांच्या द्वारा शतपट होऊन खेड्यांना परत मिळतें कीं नाहीं, सरकारकडून जो खर्च होतो, तो खेड्यांच्यासाठीं होतो असें सिद्ध करतां येतें कीं नाहीं, ही ती कसोटी होय.

स्वतंत्र भारताला प्रचंड लष्कर ठेवण्याची जरूर नाहीं. स्वयंसेवक वृत्तीचें गृह-रक्षक दल घरादारांचें रक्षण करील व देशाच्या रक्षणार्थहि उपयोगी पडेल.

### ८०

३०-११-'४७

## बरोबर आसन बाळगा

गांधीजी म्हणाले, " तुम्हांला गार जमिनीवर, थंडगार फरशीवर बसावें लागतें. हे हिंवाळ्याचे दिवस. जुनें वृत्तपत्र किंवा कशा तरी प्रकारचें आसन येतांना बसायला आणीत जा. प्राचीन काळीं अशी पद्धतच असे. अलीकडे आपण ती सोडून दिली असली, तरी ती उपयुक्त चाल होती. लोकांनीं नाजुक व्हावें असें नाहीं माझें मत; परंतु थंडीच्या दिवसांत विनाकारण

थंडगार जमिनीवर कां बसायचें? विशेषतः असें बसणें स्त्रियांना अहितकारकच आहे. असो.

## काठेवाडची तार

काठेवाडकडील अनेक तारा मला आल्या आहेत. तिकडील हकिकतीं-विषयीं मी बोललों होतों. पाकिस्तानी वृत्तपत्रांतून ज्या हकिकती येतात, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. हजारों लोक तीं वृत्तपत्रें वाचतात व त्यांवर विश्वास ठेवतात. म्हणून त्यांतील बातम्यांच्या खरे-खोटेपणाची शहानिशा करण्यासाठीं न थांबतां मी तत्संबंधीं बोललों होतों. जर बातम्या खोट्या ठरल्या, तर त्या देणाऱ्या वृत्तपत्रांना ती लज्जास्पद गोष्ट ठरेल. जर खऱ्या असतील, तर काठेवाडी जनतेला लज्जास्पद. सरदार या बाबतींत काय म्हणाले तें मीं तुम्हांस सांगितलें होतें. ते आज पुन्हां मला भेटले होते व म्हणाले, कीं काठेवाडमध्यें सारें ठीक आहे म्हणून राजकोटची एक तार आली आहे. कांहीं हिंदूंचा तोल जरा सुटला होता व थोडीं मुस्लिम घरें शिलगवलीं गेलीं हें खरें. कांहीं घरांचें थोडें नुकसान झालें; परंतु सरकारी साहाय्यानें काँग्रेस-कार्यकर्त्यांनीं आपले प्राण धोक्यांत घालून परिस्थिति काबूत ठेवली. श्री. ढेबरभाई हे राजकोटचे सुप्रसिद्ध वकील नि पुढारी. लोकांनीं त्यांना घेरलें, त्यांच्यावर हल्ला चढविला. इतर कांहीं काँग्रेस-कार्यकर्त्यांनाहि दुखापत झाली. अशा रीतीनें जनतेचा क्रोध काँग्रेस-कार्यकर्त्यांकडे वळला असला, तरी त्यामुळें मुसलमान वांचले हें खरें. तार पुढें म्हणते, " तुम्हांला मानसिक त्रास झाला हें ऐकून आम्हांस वाईट वाटलें. परंतु आतां राजकोटमधील जीवन नेहमींप्रमाणें चालू झालें आहे अशी आम्ही खात्री देतों. इतर ठिकाणचीहि चौकशी करीत आहोंत व निष्कर्ष कळवूं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदुमहासभा यांनीं या हल्ल्याची योजना केली होती असें म्हणतात. परंतु त्यांना यश आलें नाहीं." दुसरी एक तार आली आहे. ती म्हणते, " काँग्रेसजनांनीं जी सेवा केली तिच्यासाठीं मुसलमान कृतज्ञता प्रकट करीत आहेत." मुंबईच्या कांहीं मुसलमानांनीं तार केली आहे. ते म्हणतात, " आपण हा प्रश्न पुढें आणलांत ही समाधानाची

गोष्ट. काठेवाडी मुसलमान लुटले गेले. ते भयभीत झाले होते." तारेंत अपहरण किंवा खून याचा उल्लेख नाहीं ही प्रभूची कृपा. त्या तारेंत आणखी असें आहे, "अनेक मुसलमान काठेवाड सोडून निघून गेले आहेत. जर मुसलमानांना जनतेनें दिलेलीं आश्वासनें विश्वासार्ह असतील, तर हे निर्वासित परततील." अशा ह्या तारा आहेत. वृत्तपत्रांनीं निराधार बातम्या छापूं नयेत. शहानिशा .करून मग छापावें. अतिशयोक्तिपूर्ण वृत्तान्त प्रसिध्दूं नयेत. मित्रांची वंचना करून कोणता फायदा ? भावनगरच्या महाराजांचीहि एक आश्वासनपर तार आली आहे. राजकोटच्या पांच मुसलमानांची एक तार आहे. तेरा दुकानें लुटलीं गेलीं. जवळजवळ लाख रुपयांचें नुकसान झालें आहे; सरकार व काँग्रेस-कार्यकर्ते यांनीं परिस्थिति ताब्यांत घेतली आहे; असें तिच्यांत आहे, आणि आतां प्रार्थनेला येतां येतांच एक जुनागडची तार मिळाली. ती या सर्व तारांना प्रतिकूल आहे. मीं शुक्रवारीं प्रार्थनेच्या वेळेस जें भीतिप्रद वृत्त सांगितलें तें खरें आहे, असें ही तार म्हणते. चौकशीची मागणी ही तार करीत आहे. परंतु चौकशी करण्याची सत्ता मजजवळ कोठें आहे ? काठेवाडमधून आणखी तारांची मी वाट पहात आहें. परंतु सरकारी चौकशीपेक्षांहि जनता पूर्ण आश्वासन देईल तरच माझें समाधान होईल.

## हिंदुमहासभा नि रा. स्व. संघ यांना विनंति

मी हिंदुमहासभा नि संघ यांना विनंति करतों. या दोन्ही हिंदूंच्या संघटना आहेत. अनेक सुशिक्षित लोक या संस्थांमधून आहेत. ते जें काम करीत आहेत म्हणून सांगण्यांत येतें, त्यापासून त्यांनीं परावृत्त व्हावें. अशा आक्षेपार्ह रीतीनें वागून धर्माचें रक्षण होत नसतें. अन्यायाचें परिमार्जन करण्याचें कार्य, गुन्हेगारांचें शासन करण्याचें कार्य, त्यांनीं सरकारवर सोंपवावें.

## मशिदींत मूर्ती

वृत्तपत्रांतून एक सरकारी निवेदन आलें आहे:– "सात दिवसांच्या आंत मशिदींतील मूर्ती हलवल्या जाव्यात. सात दिवसांनंतरहि राहिल्या, तर पोलीस त्या उचलून नेतील." मशिदींचें नुकसान सरकार भरून देईल

असें सरदार म्हणाले आहेत. परंतु हें जनतेचें कर्तव्य आहे असें मला वाटतें. खऱ्या भक्तांनीं संस्कारपूर्वक विधिपुरस्सर मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना केल्याशिवाय मूर्तीला महत्त्व येत नाहीं. बळजबरीनें मशिदीचा ताबा घेणें हा हिंदु नि शीख धर्माला कलंक आहे. मशिदींतील मूर्ती हलवणें आणि मशिदींची नुकसानभरपाई करून देणें, हें हिंदूंचें कर्तव्य आहे. एखाद्या मशिदीचें गुरुद्वार केल्याचें ऐकलें नाहीं. शीख गुरुग्रंथसाहेबाची पूजा करतात. मशिदींत ग्रंथसाहेब नेऊन ठेवणें हा त्या ग्रंथसाहेबाचा अपमान होईल.

अर्धवट जाळलेल्या कुराणाची प्रत एका मुसलमानानें मला दाखविली. एका वस्त्रांत गुंडाळून त्यानें ती आणली होती. अश्रुपूर्ण नयनांनीं त्यानें ती प्रत मला दाखविली. एक शब्दहि न बोलतां तो बिचारा निघून गेला. कुराणाचा अशा रीतीनें अपमान करणाऱ्यानें स्वतःच्या धर्माचाच अपमान केला आहे. स्वतःच्या देशाचा नि धर्माचा अशा रीतीनें नाश ओढवून घेऊं नका, असें हिंदूंना नि शीखांना माझें पुनःपुन्हां मनःपूर्वक सांगणें आहे.

## ८१

१–१२–'४७

## 'जर तर' कशाला ?

मी माझ्या वक्तव्यांत 'जर तर' फार वापरतों म्हणून अनेक मित्रांनीं माझी कानउघाडणी केली आहे. परंतु सध्यां जें कार्य मी करीत आहें, ज्या गोष्टींची दाद लागावी म्हणून धडपडत आहें, त्या बाबतींत बोलतांसंवरतां हें लहानसें 'जर तर' उभयान्वयी अव्यय मला फार हिताचें वाटलें आहे. सध्यां काठेवाडी गोंधळाभोंवतीं रण माजलें आहे. निराधार अशा भीषण अत्याचारांना उगीच प्रसिद्धि मिळते म्हणून माझे मित्र रागावले आहेत. थोडेफार कांहीं घडलें असेल; परंतु सरकार नि काँग्रेस-कार्यकर्ते यांनीं ताबडतोब परिस्थिति आटोक्यांत आणली आहे असें त्यांचें म्हणणें. माझें असें सांगणें, कीं त्या त्या पक्षांनीं मला जी माहिती दिली ती सांगतांना मी 'जर तर' या शब्दांचा उपयोग केल्यामुळें सत्याची सेवाच झाली आहे. काठेवाडी

अधिकारी नि कॉंग्रेस-कार्यकर्ते हे ज्या मानानें सत्याची बाजू घेऊन उभे राहिले असतील त्या मानानें त्यांची प्रतिष्ठा वाढेल, त्यांची बाजू बळकट होईल. परंतु मित्रांचें म्हणणें असें कीं "असत्याला पकडीपर्यंत, ज्यांना सत्यासत्याचा विधिनिषेध नाहीं असे पक्ष माझ्या सांगण्यांतील 'जर तर' वगळून इतर बोलण्याचा स्वतःच्या असत्य गोष्टींच्या समर्थनार्थ उपयोग करून घेतात, त्याचें काय?" हा धोका आहे याची मला जाणीव आहे. परंतु ज्या ज्या वेळेस कोणी अशा रीतीनें प्रयोग केला, त्या त्या लोकांना शेवटीं फजीत व्हावें लागलें आहे हेंहि खरें. माझ्या 'जर तर' भाषेमुळें माझ्या मित्रांनीं गडबडून जाण्याचें कारण नाहीं. तडजोडी वृत्तीनें मी असे शब्द वापरीत असतों. ज्या पक्षांवर आघात असेल ते पक्ष निर्दोष असतील, तर त्यांना कशाचें भय?

उलट बाजू घेऊन पाहूं या. समजा, पाकिस्तानच्या मुख्य मंत्र्यानेंहि ज्या वृत्तान्तांना पाठिंबा दिला, असे पाकिस्तानी महत्त्वाच्या वृत्तपत्रांतील वृत्तान्त मीं उपेक्षिले असते, तर काय झालें असतें? प्रसिद्ध झालेले सारे वृत्तान्त खरे आहेत, निरपवाद खरे आहेत, असें मुस्लिम दुनियेंत मानलें गेलें असतें. परंतु जे सत्प्रवृत्त व थोर मनाचे मुसलमान आहेत, त्यांना माझ्या विवरणामुळें या वृत्तान्तांच्या सत्यतेविषयीं शंका वाटूं लागली आहे.

## सत्यमय असा

माझ्या काठेवाडी मित्रांनीं व तदनुषंगानें इतरांनींहि यापासून एक धडा घ्यायचा, कीं आपलें घर आधीं नीट व्यवस्थित हवें. कडू असली तरी टीका ऐकावी, तिच्यापासून स्वतःचा फायदा करून घ्यावा, चुका कळून आल्या तर त्या दुरुस्त कराव्या. आपण चूक कधीं करीतच नाहीं असें समजण्याची चूक आपण कधींहि करतां कामा नये. अत्यंत कडवट टीका करणारा कडू असतो; कारण त्याच्या मनांत तुमच्याविषयीं खरी वा खोटी कांहीं तरी अढी असते. आपण जर त्याच्या बाबतींत धीरानें नि सहनशीलतेनें वागूं तर कदाचित् त्याला त्याची चूक कळून येईल. जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां त्याला त्याची चूक दाखवावी, आपली असेल, तर आपणहि दुरुस्त करावी. अशानें आपण कधीं चुकण्याचा संभव नसतो. अर्थात् येथेंहि

प्रमाणाबाहेर कांहींच जातां कामा नये. सारासार विवेकाची सदैवच आवश्यकता असते. हेतुपुरस्सर खोडसाळ वक्तव्यांची उपेक्षाच करायला हवी. विवेकाची, सारासार निवडण्याची कला सतत प्रयत्नानें मी थोडीफार शिकलों आहे, असें मला वाटतें.

आजच्या प्रक्षुब्ध वातावरणांत, एकमेकांवर आरोप केले जात असतां, आपण कधींच चूक करणें शक्य नाहीं अशा प्रकारच्या स्वप्नांत आपण वावरतां कामा नये. तो वेडेपणा होईल. ती धन्यतम स्थिति, तिच्यावर आपण आज हक्क सांगू शकत नाहीं. सतत प्रयत्नानें खोडसाळपणा निवडून तो दूर करण्यांत जर आपणांस यश आलें, तर तें किती प्रशंसनीय होईल ! स्वतःचे दोष ऐकण्यासाठीं नि दिसावे म्हणून आपण आपले कान नि डोळे सतत उघडे ठेवूं, तरच हें शक्य होईल. आपल्या पाठीमागें काय चालतें तें आपणांस दिसत नाहीं; तें नेमकें इतरांना दिसतें. निसर्गानें असें आपणांस निर्मिलें आहे, म्हणून लोकांना जें दिसतें त्यानें स्वतःचा फायदा करून घेणें, हित करून घेणें, यांत शहाणपणा आहे.

## सत्यसंशोधन

काल प्रार्थनेला येतां येतां जी भली मोठी तार जुनागडहून आलेली मला मिळाली, तिचा मीं काल फक्त उल्लेख केला. नंतर मीं ती काळजीपूर्वक वाचली. मी ज्या आरोपांविषयीं बोललों ते सारे खरे आहेत, असें तार करणारे म्हणतात. जर ते आरोप खरे असतील, तर काठेवाडी हिंदूंचें त्यामुळें नुकसान आहे. मीं ज्या गोष्टी कबूल केल्या त्याच्याहि पलीकडे हे वृत्तान्त नि आरोप उगीच निराधारपणें केले जात असतील, तर त्यानें पाकिस्तानचें नुकसान होईल. स्वतः काठेवाडमध्यें येऊन परिस्थितीचा अभ्यास करा असें हे तार पाठवणारे मला म्हणत आहेत. मी जाऊं शकत नाहीं हें त्यांना पुरतेपणीं माहीत असावें असें मी समजून चालतों. चौकशी-मंडळ नेमा असें ते म्हणतात. परंतु अशा चौकशीची मागणी करण्यापूर्वीं त्यांनीं प्रथमदर्शनी बाजू तरी नीट मांडली पाहिजे ना ! काठेवाड किंवा जुनागड येथील हिंदूंचें नांव बदनाम करण्याचा त्यांचा हेतु नसून सत्य काय तें मिळावें, आणि मुसलमानांचें जीवित,

अब्रू, मालमत्ता सुरक्षित असावी हाच यांचा उद्देश असावा, असें मीं समजलेंच पाहिजे. वर्तमानपत्री प्रचारानें-आणि जेव्हां तो बिनदिक्कत वाटेल तसा केला जात असतो— जीविताची, मालमत्तेची वा अब्रूची सुरक्षा नसते हें तेंच काय, तर कोणीहि जाणतो. वित्त, जीवित आणि अब्रू तिहींचें संरक्षण कसोशीनें सत्याला चिकटून राहिल्यानें व आपले बरेच हिंदू मित्र आहेत असें तार पाठवणारे म्हणतात, तर त्या मित्रांकडे जाऊनच करणें शक्य होईल. मी काठेवाडपासून दूर असलों, तरी मी स्वस्थ बसलों नाहीं हें त्यांनीं ध्यानांत घ्यावें. मींच आपण होऊन या प्रकरणास हात घातला आहे आणि शक्य ती सारी माहिती गोळा करीत आहें. मी सरदारांना भेटलों. ते म्हणाले, 'मला शक्य तें सारें जातीय संघर्ष टाळण्यासाठीं व गुन्हेगारांचें शासन करण्यासाठीं करीन. ज्यांच्या मनांत जातीय पूर्वग्रह नाहींत, असे काठेवाडचे कार्यकर्ते सत्याचा तलास लावीत आहेत; स्वतःइतकेंच प्रिय असलेल्या मुसलमानांच्या बाबतींत झालेला प्रत्येक अन्याय दूर करायला ते तयार आहेत. तार पाठवणारेहि मदत करतील का?'

## ८२

२-१२-'४७

## पानिपतला भेट

पानिपतहून साडेपांच नंतर थोड्या वेळानें गांधीजी आले. ते प्रार्थनेच्या जागीं आले तों रामधून चालू होती. उशीर झाल्याबद्दल क्षमा मागून पानिपतच्या भेटीची हकिकत त्यांनीं सांगितली. ते म्हणाले, "पानिपत सोडून पाकिस्तानमध्यें जाऊं नका असें सांगण्यासाठीं तेथील मुसलमानांचें मन वळवण्यासाठीं मी गेलों होतों. स्वतःच्या घरींदारीं राहण्याचें शौर्य-धैर्य तुम्ही दाखवाल, तर पाकिस्तानसकट सर्व हिंदुस्थानवर त्याचा हित परिणाम होईल असें मीं त्यांना सांगितलें. मी हिंदू आणि शीख निर्वासितांनाहि भेटलों. ते स्वतःला 'दुःखित' न म्हणतां निर्वासितच म्हणतात. ते दुःखीकष्टी होते. आपल्या घरींदारीं पुन्हां जाईपर्यंत ते असे राहणें

साहजिक आहे. ज्यांना हिंदुस्थान सोडून सक्तीनें पाकिस्तानमध्यें जावें लागलें, त्या मुसलमानांचीहि हीच हालत आहे. आपण कां इथें राहूं शकत नाहीं, तें पानिपतच्या मुसलमानांनीं मला निवेदिलें.

## दोन मंत्री

डॉ. गोपीचंद आणि सरदार स्वर्णसिंग हे दोघे मंत्रीहि पानिपतीं होते. दिल्लीचे मौलाना आणि पानिपत येथेंच ज्यांचें घर ते देशबंधु गुप्ताहि तेथें भेटले. मुसलमान मित्र म्हणाले, "तुम्ही पूर्वीं आला होतां त्या वेळेस जरी आम्ही जाऊं इच्छीत नाहीं म्हटलें, तरी तदनंतर परिस्थिति बिघडली. आमचें जीवित, अब्रू, वित्त सुरक्षित नाहीं. कसें रहायचें मग?" मीं त्यांना म्हटलें, "ज्यांना परमेश्वराचा आधार वाटतो, ज्यांच्या हृदयांत अखिल मानवजातीविषयीं प्रेम आहे, त्यांना कोणाची भीति? वित्त, जीवन यांचा विनाश सोसूनहि स्वतःची प्रतिष्ठा, अब्रू तुम्ही सांभाळूं शकाल." मी दिल्लीहून सकाळीं १०॥ ला निघालों. पानिपतला ११॥ ला पोंचलों. ३ वाजेपर्यंत मुसलमानांशीं मी बोलत होतों. तदनंतर मी हिंदू-शीख निर्वासितांना भेटलों. २० हजारांचा जमाव असेल. डॉ. गोपीचंद आणि सरदार स्वर्णसिंग हेहि सभेंत बोलले. सरदारसाहेब उभे राहतांच श्रोत्यांचा धीर सुटला. सरदारांचा अपमान करण्याचा त्यांचा हेतु नव्हता. परंतु भाषणें पुरें झालीं असें त्यांना सुचवायचें होतें. आमचीं दुःखें ऐका असें त्यांना म्हणायचें होतें. ते सारे खवळले. मुसलमानांनीं येथून गेलेंच पाहिजे म्हणून गर्जले. त्यांच्या प्रतिनिधींनीं त्यांना शान्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या एका पुढाऱ्यानें एक पंजाबी गीत म्हटलें. तदनंतर सारें शान्त झालें. तो नेता पंजाबींत बोलला. सभेंत गोंधळ माजवल्याबद्दल त्यानें त्यांना दोष दिला. सरदार स्वर्णसिंग नंतर बोलले. त्यानींहि गोंधळा-बद्दल दोष दिला. ते म्हणाले, "दोन गोष्टी तुम्हीं केल्याच पाहिजेत व सरकारहि करूं इच्छितें. पाकिस्तान कांहींहि करो. अपहृत मुली पुन्हां त्यांच्या कुटुंबियांकडे पाठवल्याच पाहिजेत. दुसरी गोष्ट म्हणजे सक्तीचें घडवलेलें धर्मांतर. हें धर्मांतर नव्हे हें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. ज्या

मुसलमानांना हिंदू किंवा शीख करण्यांत आलें असेल, त्यांना आश्वासन द्या कीं हिंदुस्थानांत मुस्लिम धर्माचे म्हणून त्यांना विनात्रास राहतां येईल. मी सांगतों, कीं मशिदींचें संरक्षण करण्यांत येईल आणि ज्यांचें मंदिरांत रूपांतर करण्यांत आलेलें आहे त्या पुन्हां पूर्ववत् मशिदी होतील." दोन्ही मंत्र्यांचीं तीं आश्वासनें ऐकून मी आनंदलों. "जीवित आणि वित्त यांच्या रक्षणासाठीं सरकार शक्य तें करीलच करील. परंतु जनतेच्या सहकाराशिवाय सरकारला यश कसें मिळणार?" असेंहि ते म्हणाले.

## निर्वासितांचीं दुःखें

निर्वासितांचीं अनेक दुःखें होतीं. ते म्हणाले, "अन्न भिकार आणि तेंहि अपुरें. परंतु पूर्व पंजाबचे गव्हर्नर या बाबतींत लक्ष घालीत आहेत. निर्वासितांसाठीं म्हणून जे कपडे पाठवण्यांत येतात त्यांतील चांगलीं ब्लँकिटें नाहींशीं होतात." निर्वासित म्हणाले, "फाटकीं, जुनाट ब्लँकिटेंच आम्हांस देण्यांत येतात." एक मुलगा माझ्या समोर आला. माझ्यासमोर सारे कपडे काढून तो उभा राहिला व म्हणाला, "माझे बाबा मला द्या. ठार मारलें त्यांना त्यांनीं." परंतु हें कसें कोणाला शक्य? मुलाचें दुःख मी समजूं शकलों. मला करुणा वाटली, सहानुभूति दाटली.

मीं निर्वासितांच्या पुढाऱ्याला मोटरींत घेतलें नि परतलों. सध्यां स्थानिक हिंदूंकडे व्यवस्था आहे, त्याऐवजीं निर्वासितांच्या प्रतिनिधींकडे ती द्यावी, असें मी त्यांना म्हणालों. आज तेथें वशिलेबाजी आहे. मी त्या पुढाऱ्याला आणखी म्हटलें, कीं पानिपतच्या मुसलमानांना त्रास होतां कामा नये, त्यांना भीति वाटतां कामा नये, असें जर निर्वासितांना आपलें कर्तव्य वाटलें, तर तुम्ही निर्वासितांच्या वतीनें मुसलमानांना जाऊन आश्वासन द्या व घरेंदारें सोडून जाऊं नका म्हणून त्यांचें मन वळवा. असें झालें तरच लढ्यांसाठीं प्रसिद्ध असलेल्या पानिपतला खरा विजय मिळाला असें होईल.

मी हें सारें कां सांगत आहें? आपण किती अवनत झालों आहोंत, कोणत्या खालावलेल्या स्थितिप्रत गेलों आहोंत तें दाखविण्यासाठीं. आज तुमचें सरकार असून त्या सरकारचेंहि मानायला तुम्ही तयार नाहीं. प्रधान-

मंत्री म्हणण्याऐवजीं मला पहिला सेवक म्हणा, असें पंडित जवाहरलाल म्हणाले. सारे सरकारी अधिकारी खरोखरच जनतेचे सेवक आहेत का? असें असेल, तर ऐषआरामाला कोठला वाव? ते खरे सेवक झाले, तर रात्रंदिवस जनतेचा नि तिच्या गरजांचाच ते विचार करीत राहतील. त्यालाच रामराज्य म्हणतां येईल. खरें आणि पूर्ण स्वातंत्र्य तेव्हांच येईल. आजचें स्वातंत्र्य मला गुदमरवीत आहे. तें भ्रामक व अशाश्वत आहे.

## ८३

३-१२-'४७

## वचनांचें महत्त्व

दिवसां कांहीं मित्र भेटायला आले होते. ते म्हणाले, "१५ ऑगस्टला सत्ता हातीं घेतांना पुढाऱ्यांनीं अनेक वचनें दिलीं. तीं आज मोडलीं जात आहेत." पुढाऱ्यांनीं कोणतीं वचनें मोडलीं मला माहीत नाहीं. मी कांहीं सरकार नाहीं. परंतु वचनभंगाचें स्पष्ट उदाहरण कोणी दिलें, तर त्यासंबंधींच्या पुढाऱ्यांजवळ मी बोलूं शकेन. काळजीपूर्वक अशा आरोपांची छाननी केल्यावर असें दिसून येतें, कीं सांगणारा केवळ ऐकीव गोष्टी बोलत असतो. माझ्या बाबतींत असे गैरसमज अनेकदां झालेले आहेत. हेतुपुरस्सर मीं कोणालाच फसविलें नाहीं. तरीहि माझ्या शब्दांच्या पाठीमागें माझा जो हेतु नसे, तो ऐकणारे समजत व माझ्यावर वचनभंगाचा आरोप करीत. जगांतील पुष्कळसें दुःख गैरसमजामुळें होतें असें मला वाटतें. बोलण्यापूर्वीं माणसानें विचार करावा. एक शब्दहि व्यर्थ नये उच्चारूं. माणसाचें बोलणें त्याच्या विचाराचें स्पष्ट प्रतिबिंब असावें आणि कृतींत बोललेला शब्द दिसावा.

आज हिंदुस्थान स्वतंत्र आहे. पुढाऱ्यांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें आहेत. कोट्यवधि रुपयांचा कारभार त्यांना करावा लागणार. त्यांनीं दक्ष असलें पाहिजे. नम्र असलें पाहिजे. वचनपालनाचें लोकांना पुष्कळदां कांहीं वाटत नसतें. जें करतां येणें अशक्य तें लोकांनीं कधींहि कबूल करूं नये.

वचन दिल्यावर वाटेल ती किंमत पडली, तरी तें पाळलेंच पाहिजे. केवळ सरकारी सभासदांनींच नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीनेंच याप्रमाणें वागायला हवें.

## सिंधमधील हरिजन

सिंधमधील हरिजनांच्या दुर्दशेबद्दल तेथील एका वैद्यकीय मित्रानें मला लिहिलें आहे. तो मित्र लिहितो, "सारे सवर्ण हिंदू हरिजनांना येथें सोडून निघून जातील, तर हरिजनांचे हाल कुत्राहि खाणार नाहीं. तेथें मग तरच राहणें शक्य, जर संपूर्ण गुलामगिरी स्वीकारली व अंतीं इस्लाम स्वीकारला. पाकिस्तान-सरकार बोलतें पुष्कळ, परंतु त्याचे अधिकारी त्याप्रमाणें वागत नसतात. खरोखर ही दुःखद स्थिति आहे. आपल्याकडेहि पंडित जवाहरलाल आणि सरदार सांगतात, कीं सर्व मुसलमानांस आम्ही रक्षण देऊं, भीतीनें एकहि मुसलमान येथून न जावो असें आम्हांस वाटतें." परंतु काल पानिपतची जी हकिकत मीं सांगितली, तिच्यावरून सरकारचीं आश्वासनें तेथें प्रत्यक्षांत येत नाहींत, असेंच नाहीं का होत? आपल्याकडेहि जर अशीच स्थिति, तर मी पाकिस्तानला काय सांगूं, काय म्हणूं? सिंधी हरिजनांना येण्याची इच्छा आहे असें मला सांगण्यांत आलें; परंतु त्यांना तसें करूं देण्यांत येत नाहीं.' भंगीकामाची संवय नसतां त्यांना तें करायला लावण्यांत येत आहे. जर हें खरें असेल, तर संपूर्णतः चूक आहे. शीख आणि हिंदू यांच्या मनावर कायमची जखम राहील, अशा रीतीनें पाकिस्ताननें वागूं नये. ज्या हरिजनांना सिंध सोडायचा आहे, त्यांना जायला सर्व सवलती त्यानें द्याव्या. भंग्याचें काम सक्तीनें कोणावरहि लादणें शक्य नाहीं. आज हरिजनांना कोणताहि धंदा स्वेच्छेनें पसंत करतां येईल. श्री. जगजीवनराम तर म्हणाले, कीं सर्व हरिजनांनीं पाकिस्तान सोडून यावें म्हणून. परंतु जोंवर ते तेथें आहेत, तोंवर सन्मानानें त्यांना तेथें राहूं दिलें पाहिजे. दोन्ही वसाहतींमध्यें सर्व धर्मान्तरें—स्वेच्छेचीं सांगण्यांत आलीं तरी—कायदेशीर मानण्यांत येऊं नयेत.

## पुनश्च काठेवाड

काठेवाडमधून परस्परविरोधी तारा येतच आहेत. तुम्हीं केलेले आरोप

खरे आहेत असें कांहींचें म्हणणें, तर सर्वस्वीं निराधार असें दुसऱ्यांचें म्हणणें. कॉंग्रेसचे कार्यकर्ते दंगलीपासून सर्वस्वीं अलिप्त होते. जी कांहीं लुटालूट नि जाळपोळ झाली ती हिंदुमहासभेच्या नि रा. स्व. संघाच्या लोकांनीं केली. परंतु हिंदुमहासभा नि संघ यांच्याहि तारा कीं आमचाहि कशांत हात नव्हता. तिघांपैकीं कोणाची तरी चूक आहे खास. मनाचा तोल सुटल्यामुळें जर हिंदूंनीं मुसलमानांना सतावलें असेल, तर त्यांनीं छपवण्याचा प्रयत्न करूं नये; जर मुसलमानांनीं अतिशयोक्ति केली असेल, तर त्यांनींहि उघडपणें कबूल करावें. दंगलींत हिंदुमहासभा नि रा. स्व. संघ यांचा हात नव्हता असें सिद्ध झालें, तर मी त्यांचें अभिनंदन करीन. मी सत्य काय तें शोधण्याचा प्रयत्न करीत आहें. परंतु मी एक व्यक्ति आहे. माझ्याजवळ अधिकार नाहीं, सत्ता नाहीं.

## दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी

संयुक्त राष्ट्रसंघांत दक्षिण आफ्रिकेसंबंधींच्या प्रश्नांत हिंदुस्थानला यश नाहीं आलें. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस सांगितलें, कीं जरी यश न मिळालें, तरी पराभव नाहीं. कारण बहुमत आपल्या बाजूस होतें. परंतु ठराव पास व्हायला $\frac{2}{3}$ मतें लागतात तेवढीं नाहीं मिळालीं. हताश नका होऊं. हिंदुस्थानची प्रतिनिधि या नात्यानें मी आणखी कांहीं करूं शकत नव्हतें." परंतु एक पाऊल पुढें जाऊन मी म्हणतों, कीं पराभवाचा सवालच नाहीं. सत्याग्रहाचा सुवर्ण-नियम ज्यांना माहीत आहे, त्यांत पराभव कोठला? दक्षिण आफ्रिकेंतच हें सत्याग्रहाचें शस्त्र मीं शोधून काढलें. क्षणभर समजा, कीं संयुक्त राष्ट्रसंघांत हिंदचा विजय झाला आहे, द. आफ्रिकेंतील हिंदी जनतेचे हक्क मानायला जनरल स्मट्स् तयार आहेत, परंतु येथील गोरे लोक जर तदनुरूप वागायला तयार नसतील, तर शेवटीं काय? 'हिंदुस्थानांतहि आज अशाच गोष्टी नाहीं का घडत? पाकिस्तानांतून हिंदूंना आणि हिंदुस्थानांतून मुसलमानांना घालवून देण्यांत येत आहे. दोन्ही सरकारें सांगतात, कीं अल्पसंख्य जनतेचें रक्षण करायला आम्ही असमर्थ आहोंत. बन्नूमध्यें हिंदूंची बरीच वस्ती आहे. परंतु बाहेर पडण्याची सोय नाहीं. बाहेर पडणें म्हणजे प्राण गमावणें. घरांतच

रहावें, तर समोर उपासमार, काय करायचें त्यांनीं? येथील मुसलमानांना जो सल्ला मी देतों, तोच त्यांनाहि देतों. आम्ही घरदार सोडून जाणार नाहीं, असा निर्धार त्यांनीं उघडपणें स्पष्टपणें जाहीर करावा. जेथें जन्मलों-वाढलों, तेथेंच सन्मानानें आम्ही राहूं इच्छितों असें त्यांनीं सांगावें.

द. आफ्रिका हा वास्तविक नीग्रोंचा देश. तेथील बाहेरून आलेल्या बोअर लोकांना हिंदी लोकांपेक्षां अधिक हक्क कोठले? परंतु युरोपियनांनीं नीग्रोंना दडपून टाकलें आणि हिंदी वसाहतवाल्यांचे प्राथमिक हक्कहि हिरावून घेतले. संयुक्त राष्ट्रसंघासमोर हिंदुस्थानची बाजू मांडणें अगदीं वाजवी होतें. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाला द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हक्कांचें रक्षण करण्याची इच्छा नसेल किंवा शक्यता नसेल, तर का हिंदी जनतेनें तेथें आपल्या हक्कासाठीं लढूं नये? त्यांनीं लढावें असें माझें मत आहे. परंतु शस्त्रास्त्रांनीं नये लढूं. एकच खरें शस्त्र आहे. तें म्हणजे आत्म्याची शक्ति– सत्याग्रह– हें. आत्मा अमर आहे. शरीर नाशिवंत आहे. द. आफ्रिकेंतील हिंदी जनतेजवळ स्वाभिमान नि धैर्य हीं असतील, तर ते आत्मिक शक्तीनें आपल्या मूलभूत हक्कासाठीं लढतील.

## ८४

४–१२–'४७

## परदेशांतून प्रचार कां?

आज सायंकाळीं प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजींनीं पुन्हां काठेवाडप्रकरणाचा उल्लेख केला. ते म्हणाले, "आज श्री. शामळदासांची तार आली आहे. काल रात्रीं श्री. ढेबरभाईंचीहि आली होती. काठेवाडमध्यें मुसलमानांना सतावण्यांत आलें या गोष्टीचा दोन्ही तारांत इन्कार आहे. शामळदासांना माझ्या उद्गारांमुळें दुःख होऊन ते स्वतः मुंबईहून काठेवाडांत गेले. त्यांनीं स्वतः चौकशी केली. मुस्लिम स्त्रियांच्या अपहरणाची बातमी तर अगदींच निराधार आहे, असें ते कळवितात. त्याप्रमाणेंच खून वगैरेंचीहि बातमी. सरदारांच्या भेटीपूर्वीं, कांहीं जाळपोळ, लूटमार झाली; परंतु त्यांच्या भेटीनंतर कोणत्याहि प्रकारची

दंगल झाली नाहीं. मी आणखी चौकशी करीत आहें, तुम्हांला कळवीनच, असें शामळदास कळवितात. परंतु दरम्यान इराण, अमेरिका, लंडन येथून तारा येत आहेत. काठेवाडमधील मुसलमानांवर भयंकर अत्याचार होत आहेत असें त्या म्हणतात. या परदेशांतील तारांनीं मी दुःखी झालों. मुसलमानांचा मित्र या नात्यानेंच हें मी म्हणत आहें. जोंपर्यंत ते सत्याला धरून आहेत, तोंवरच त्यांचें कल्याण आहे. परदेशांना भीतिप्रद तारा पाठवण्याचा अर्थ काय? हिंदी सरकारची बदनामी करणें यावांचून त्यांचा काय हेतु? प्रमाणातीत अतिशयोक्ति करणें, अतिशयोक्तीवर आधारलेला प्रचार परदेशांत करणें हें अगदीं चूक आहे. असें करूं नका म्हणून या मित्रांना मी इशारा देतों.

## चांगली बातमी

एक आनंदाची बातमी आतां देतों. हुशंगाबादच्या मुसलमानांचें एक सुंदर पत्र मला आलें आहे. तेथील शीखांनीं गुरु नानकांच्या जयंतीच्या दिवशीं त्यांना बोलावलें होतें. "तुम्ही आमचे मित्र आणि भाऊ आहांत" असें त्या पत्रांत त्यांनीं त्यांना अभिवचन दिलें होतें. इतर ठिकाणच्या हिंदू आणि शीखांनींहि या गोष्टीचें अनुकरण करावें म्हणून मला किती वाटतें! आज हिंदुस्थानच्या सुंदर नांवाला लागलेला कलंक असें केल्यानेंच ते पुसून टाकूं शकतील.

## जातीय व्यापारी संघ

'मारवाडी व्यापारी संघा'चें मला एक पत्र आलें आहे. आमच्या संघाचें नांव जातीय दिसलें, तरी सभासद वाटेल त्याला होतां येतें असें त्यांत आहे. मारवाडी नसलेले किती सभासद आहेत तें मीं त्यांना विचारलें आहे. युरोपियन आणि मुसलमान व्यापारी मंडळेंहि असेंच म्हणतील. केवळ दाखवण्यापुरते एक-दोन विजातीय सभासद दाखवून कांहीं म्हणणें सिद्ध होत नाहीं. जर जातीय वृत्ति पाठीमागें नसेल, तर मग हे अलग अलग संघ कशाला? युरोपियन येथें हिंदी म्हणून राहतील, हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं काम करतील, तर त्यांच्यापासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. त्यांच्यांतील कांहीं हुशार व्यापारी आहेत. सेवाभावानें ते आपली ही व्यापारी बुद्धि हिंदुस्थानला देऊं शकतील. शोषण करणारांचा येथें उपयोग नाहीं.

'मारवाडी व्यापारी संघा'चा अहवाल नि पत्र दोन्ही इंग्रजींत आहेत. इंग्रजी भाषा स्वतःच्या घरीं शोभते. परंतु तिचें जेथें घर नाहीं तेथेंहि ती जर कब्जा घेऊन बसेल, तर मला वाईट वाटेल. स्वतःच्या मातृभाषेहून मला इंग्रजी अधिक कळतें असें जेव्हां कोणी मानतो, तेव्हां हिंदी या नात्यानें माझी मान खालीं होते. लेखकाला हिंदी येत असूनहि त्यानें मला इंग्रजींतून पत्र लिहिणें अगदीं निरर्थक आहे. आणि इंग्रजी अहवालाचेंहि तरच समर्थन करतां येईल, जर 'मारवाडी व्यापारी संघा'चे बहुसंख्य सभासद इंग्रज असतील किंवा इंग्रजी जाणणारे असतील. हा संघ जर हिंदी हितसंबंधाचा प्रतिनिधि असेल– मग ते केवळ मारवाडीच का असेनात– तर असें असणें शक्यच नाहीं. मारवाडी व्यापारी मंडळ मी ज्या हेतूनें हें बोलत आहे तो हेतु समजून घेईल अशी आशा आहे. एक सर्वसामान्य सत्य सर्वांना पटवण्यासाठीं या विशिष्ट गोष्टीचा मीं उल्लेख केला.

## ब्रह्मदेशाचे पंतप्रधान

ब्रह्मदेशाचे पंतप्रधान मला भेटायला आले होते. ते नम्रतेची मूर्ति होते. मीं त्यांना म्हटलें, कीं हिंदुस्थान भौगोलिक दृष्ट्या जरी विशाल देश असला आणि त्याची संस्कृति प्राचीन असली, तरी आजकाल हिंदुस्थानपासून ब्रह्मदेशानें शिकावें असें कांहीं नाहीं. सर्वांवर प्रेम करावें, सर्वांविषयीं सहानुभूति दाखवावी शिकवणारे असे गुरु नानक येथें जन्मले. शीखांनीं हिंदू, मुसलमान, एवढेंच नव्हे, तर सर्वांचे मित्र व्हावें. शीख आणि हिंदू यांत भेद पाडणें चूक आहे. मास्तर तारासिंगांनीं हिंदू आणि शीख म्हणजे खिळा नि खिळ्याचें वरचें टोपण असें वर्णन केलें. दोघांना अलग थोडेंच करतां येणार? तारासिंगांचें वर्णन ऐकून मला आनंद झाला. गुरु नानक हिंदु नव्हेत तर कोण? गुरु ग्रंथसाहेबांत वेदांचीच शिकवण आहे. हिंदुधर्म महान् सागराप्रमाणें आहे. तो सर्व धर्मांतील सत्यें स्वीकारतो, मिळवून घेतो. हा आपला वारसा हिंदुस्थान आणि हिंदू लोक विसरले ही मोठी दुःखाची गोष्ट. आज भ्रातृहत्येंत सारे मग्न झाल्याप्रमाणें दिसत आहेत. ब्रह्मदेशानें हिंदुस्थानपासून ही यादवी नये घेऊं, नये शिकूं. ब्रह्मी लोकांनीं हिंदुस्थानचें आजचें हिडीस स्वरूप विसरून जावें. मी आशा करतों, कीं

हें क्षणिक आहे. रक्त न सांडतां हिंदुस्थाननें स्वातंत्र्य मिळविलें, एवढेंच तुम्ही ध्यानांत ठेवा. हिंदुस्थाननें जी अहिंसा दाखविली ती शूराची नव्हती हें मीं कबूल केलेंच आहे. तरीहि ४० कोटी लोकांच्या महान् राष्ट्राला रक्तपाताशिवाय स्वातंत्र्य तिनें मिळवून दिलें आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानेंच ब्रह्मदेश आणि सीलोन यांना स्वातंत्र्य आणून दिलें आहे. शस्त्रास्त्रांशिवाय ज्या राष्ट्रानें स्वातंत्र्य संपादिलें, त्याला त्याच्याशिवाय तें राखतांहि आलें पाहिजे. आज हिंदुस्थानांत सैन्य आहे, आरमार तयार होत आहे, हवाई दल आहे, त्याची आणखी वाढ करण्यांत येत आहे, असें असूनहि मी हें म्हणत आहें. हिंदुस्थाननें जर अहिंसक सामर्थ्य वाढवलें नाहीं, तर त्यानें स्वतःसाठीं वा जगासाठीं कांहींहि मिळविलें नाहीं, असें मी निःशंकपणें म्हणेन. हिंदुस्थानचें लष्करीकरण म्हणजे हिंदुस्थानचें स्वतःचें व जगाचें मरण होय. ब्रह्मदेशाला बुद्धधर्महि हिंदुस्थानपासूनच मिळाला आहे. ब्रह्मी भिक्षूंशीं माझा संबंध आला आहे. हिंदुस्थानपासून बुद्धधर्मांतील उत्तम तें ब्रह्मदेशानें घ्यावें. मूळच्या बुद्धधर्मांतील शिकवण हिंडतफिरत ब्रह्मदेशाला आली. या परिभ्रमणांत मूळच्या शिकवणींत हिणकसपणा शिरला आहे. ब्रह्मदेश आणि सीलोन यांनीं परमोच्च दशेला जावें असें मला वाटतें. हिंदुस्थानांतील परमोच्च तेवढेंच घेऊन, वाईट व सदोष असेल तें टाकून त्यांना असें करणें शक्य होईल.

## ८५

५-१२-'४७

## मुसलमान आरोप मागें घेतात

मी प्रार्थनेला येत असतां पत्रें मला दिलीं गेलीं. मी तीं वाचूं शकलों नाहीं व म्हणून त्यांना उत्तरेंहि मला देणें शक्य नाहीं. उत्तराची आवश्यकता असेल, तर उद्यां देईन. एक पत्र म्हणतें, कीं लियाकतसाहेबांजवळ तुमचें जें बोलणें झालें, त्यांतील लियाकतसाहेबांनीं काठेवाडसंबंधीं सांगितलेलें सारें खोटें असें आढळून आलें आहे. या मित्रानें नंतरचीं माझीं भाषणें

ऐकलीं नसावींत असें उघड उघड दिसतें. श्री. शामळदास गांधींच्या तारे-बद्दल मीं सांगितलें. जें घडलें त्याची त्यांनीं कबुली दिली आहे; जें अतिशयोक्त होतें त्याचा त्यांनीं इन्कार केला आहे. पूर्वीं ज्या मुसलमानांची तार आली होती, त्यांचीच आज पुन्हां तार आली आहे. आमच्या आधींच्या तारांतील बराचसा मजकूर अतिशयोक्तीचा होता आणि पाकिस्तानमधील पत्रांतून काठेवाडसंबंधीं आलेलें बरोबर नाहीं असें ते म्हणतात. मुसलमान मित्रांना अतिशयोक्तीच्या बाबतींत मी इशारा देऊं इच्छितों, अशानें त्यांचेंच नुकसान होईल. परदेशांतून प्रचार करण्यानें काय भलें होणार ? काठेवाडी मुसलमानांचें रक्षण करायला का दुनिया येणार आहे ? ज्या वसाहतीनें गुन्हा केला असेल, तिचें फार तर सत्यशोधनानंतर ते पारिपत्य करतील. असत्य जिंकून घ्यायला सत्यावर विश्वास ठेवणें हाच योग्य मार्ग. आणि जें जें दुष्ट आहे तें असत्यच.

सहा ते तेरा डिसेंबरपर्यंत मी कोणाची मुलाखत घेऊं शकणार नाहीं. या सप्ताहांत दिल्लीला कस्तुरबा-निधि, तालिमी-संघ, चरखा-संघ, अखिल भारतीय ग्रामोद्योग-संघ, सर्वांच्या बैठकी आहेत. आणि शक्य तों त्या बैठकांसाठीं मी मोकळा राहूं इच्छितों.

## नियंत्रणें

अन्न-वस्त्रावरील नियंत्रणें लौकरच जातील अशी मला आशा आहे. नियंत्रणें उठल्यावर जनतेचें कर्तव्य काय ? शेतकऱ्यांनीं जवळ सांठवून सारें धान्य बाजारांत आणावें. व्यापाऱ्यांनीं नफेबाजींत गुंतूं नये. म्हणजे सरकार, जनता आणि सरकारी सनदी नोकर यांचा जीव खालीं पडेल. आज त्यांच्या मनांत भय आहे. हें भय निराधार ठरेल. काळाबाजार संपूर्णपणें नाहींसा नाहीं झाला, तरी कमी होईल अशी मला आशा आहे. थोडें अन्नधान्य कमी पडलें, तर लोकांनीं संयमानें कमी वापरून कोणी उपाशी मरणार नाहीं असें करावें. जनतेचें सरकार नफेबाजांना सर्हा गोळ्या घालूं शकत नाहीं. लोकशाहींत लोकांची इच्छा ही सार्वभौम हवी. हिंदी जनता का योग्य तें नाहींच करणार ? इतकी का ती अधःपतित झाली आहे ? तसें असेल, तर आजच्या सरकारनें अधिकारावर कां असावें ? परंतु नियंत्रणें उठल्यावर परिस्थिति

सुधारेल अशी मला आशा आहे. सरकारनेंच सारें करायचें आणि जनतेनें कांहींच करायचें नाहीं, कांहीं केलेंच, तर सरकारला अडचणींत आणण्यासाठींच मात्र, असें असेल तर तो लोकशाहीचा अभाव म्हटला पाहिजे. योग्य मार्गदर्शनानें किसान अधिक धान्य उत्पन्न करूं शकणार नाहींत असें नाहीं. उत्पादनवाढीच्या सर्व साधनांवर नि उपायांवर अन्नधान्य-खातें जर सारें लक्ष केन्द्रीभूत करील, तर अन्नाचा तुटवडा भासणार नाहीं अशी मला खात्री आहे.

कापडावरील नियंत्रणाबाबत मला चिंता नाहीं. देशांत पुरेसा कापूस नाहीं असें कोणाचेंच म्हणणें नाहीं. गिरण्यांच्या जोडीला देशांत भरपूर मनुष्य-शक्ति आहे. कांतायला आणि कांतलेलें विणून घ्यायला पुरून उरेल इतकी मानवशक्ति आहे. लाखों जर कांतूं लागले व विणकर हातसूत विणूं लागले, तर कांहीं कारणानें सर्व गिरण्या बंद पडल्या समजा, तरीहि कपड्याची टंचाई भासणार नाहीं.

## ८६

६-१२-'४७

## शेजारधर्म

दक्षिण हिंदुस्थानांतील प्रख्यात गायिका श्रीमती सुब्बलक्ष्मी यांनीं आज भजन म्हटलें; रामधून सांगितली. गांधीजी म्हणाले, "किती गोड यांचा आवाज ! प्रार्थनेच्या वेळेस रामांत विलीन होऊन गेलें पाहिजे."

काल सायंकाळीं मीं पंधरा मिनिटांहून अधिक वेळ घेतला. दिलगीर आहें. अतःपर अधिक कसोशीनें वागेन. आदल्या दिवशींच्या पत्राबद्दल मला अधिक सांगायचें आहे. लेखकानें "पाकिस्तानच्या बाबतींत सावध रहा, ते द्रोह करीत आहेत, त्यांनींच प्रथम संघर्ष सुरू केला, हिंदू आणि शीख यांनीं केवळ जशास तसें न्यायानें उत्तर दिलें. पाकिस्तान कांहीं सुधारणार नाहीं. हिंदू आणि शीख यांची तिकडे असलेली मालमत्ता कायमची गेली" वगैरे लिहिलें आहे. परंतु पत्रलेखकाच्या मताशीं मी सहमत नाहीं. सुरक्षितपणें आणि सन्मानानें प्रत्येक हिंदु नि शीख आपल्या घरीं जाईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं असें

मीं म्हटलें आहे. प्रत्येक मुसलमानहि हिंदुस्थानांतील आपल्या घरीं यावा असें मला वाटतें. मृतांना सजीव करतां येणार नाहीं किंवा भस्मीभूत प्रचंड इमारती पुनरुज्जीवित करतां येणार नाहींत. कोणत्याहि सरकारला तें शक्य नाहीं. जें राहिलेलें आहे, जी शेतवाडी आहे, ती कायदेशीर मालकाला परत मिळाली, तर मला समाधान आहे. पाकिस्तानांत लाहोर, लायलपूर आणि अशा अनेक ठिकाणचीं हिंदू-शीखांचीं घरें नि जमिनी यांचा मुसलमानांनीं कब्जा घेतला आहे. हा कब्जा उठवला गेला पाहिजे. जर हिंदू आणि शीख या भागांत नीट वागतील, तर पाकिस्तानी भागांत त्यांनाहि तसें करणें भाग आहे. ईश्वराची प्रतिकृति म्हणून मानव निर्मिला गेला. परंतु तो चुकांसहि पात्र आहे. चुका जर त्यानें दुरुस्त केल्या, तर त्याच्यांतील दिव्यता उभी राहील. असें व्हावें अशी मला उत्कट इच्छा आहे. हीच मला आशा. दोन्ही वसाहतींतील बहुसंख्य जनतेनें आपल्या कृत्यांबद्दल अनुतप्त होऊन अल्पसंख्य जनतेची क्षमा मागावी. मग आज शत्रु झाले आहेत तसें न होतां ते परस्परांचे भले शेजारी होतील. निर्दोष साधनांनीं तुम्हीं स्वातंत्र्य संपादिलेंत. त्यासाठीं जगानें तुमची पाठ थोपटली. मिळालेलें स्वातंत्र्य अशाच थोर मार्गानें टिकवा. भलेपणाला रजा द्याल, तर स्वातंत्र्यालाहि रजा द्यावी लागेल. अ. भा. काँग्रेस-समितीनें हिंदू, शीख, मुसलमान सर्वांनीं आपापल्या घरीं परत जावें वगैरे जो ठराव केला आहे, तो केवळ शाब्दिक आहे असें मला लोक म्हणाले. तो ठराव केवळ अर्थहीन शाब्दिक पसारा आहे असें मला वाटत नाहीं. हिंदी जनता थोडा वेळ विवेक विसरली. विवेकाला, शहाणपणाला लोकांनीं कायमचा फांटा दिला, असा नाहीं त्याचा अर्थ. दिल्ली मीं कसोटी ठरवली आहे. येथें मी हरलों, तर अन्यत्र यशाची आशा नाहीं.

## ८७

७-१२-'४७

## अपहृत स्त्रिया

हिंदी संघराज्यांतील कांहीं स्त्री-कार्यकर्त्या लाहोरला मुस्लिम स्त्रियांशीं

बोलणें करायला गेल्या होत्या. राजा गझनफरआलि व इतर कांहीं मंडळी हजर होती. पाकिस्तानांत २५ हजार हिंदू आणि शीख स्त्रियांचें व पूर्व पंजाबांत १२ हजार मुस्लिम स्त्रियांचें अपहरण झालें असें म्हणतात. कांहींच्या मतें आंकडा इतका मोठा नसावा. मला एकाहि स्त्रीचें अपहरण दुःखदायक आहे. मनुष्य इतका अधःपतित कसा होतो ? कमींत कमी १२ हजारांचा आंकडा उभयत्र धरला, तरी का ही लहान संख्या आहे ? त्या स्त्रियांच्या परिषदेंत असें ठरलें, कीं सर्वांचा शोध लावून त्यांना वांचविलें पाहिजे आणि त्यांच्या त्यांच्या कुटुंबांकडे त्यांना पाठविलें पाहिजे. राजा गझनफरआलि म्हणाले, कीं उभय वसाहतींना हा डाग आहे. कोणी अधिक पाप केलें, आरंभ कोणीं केला इत्यादि प्रश्न अप्रस्तुत आहेत. उभयपक्षीं अशा स्त्रियांना वांचवलें पाहिजे, सुरक्षित परत पाठवलें पाहिजे, असें ठरवल्यावर ही चर्चा नको. झालेलें पाप कसें निस्तरायचें ही महत्त्वाची बाब आहे.

परिषदेच्या कामाची संक्षिप्त हकिकत श्रीमती रामेश्वरी नेहरू आणि श्रीमती मृदुला साराभाई यांनीं मला निवेदिली आहे. कांहींनीं पाकिस्तानांत जायचें, कांहींनीं पूर्व पंजाबांत जायचें आणि पोलिस व लष्कर यांच्या मदतीनें स्त्रियांच्या बचावाचें हें काम करायचें असें सुचवण्यांत आलें आहे. परंतु माझ्या मतें ही पद्धति यशदायी ठरणार नाहीं. कांहीं अपहृत स्त्रिया परत येऊं इच्छीत नाहींत असेंहि सांगण्यांत येतें. धर्म बदलून त्यांनीं लग्नेंहि लावलीं असें सांगण्यांत येतें. मी यावर विश्वास ठेवीत नाहीं. अशीं लग्नें नि धर्मान्तरें अ-सिद्ध धरलीं पाहिजेत. तीं न झाल्याप्रमाणें आहेत. अशा स्थितींतील प्रत्येक स्त्री आपल्या कुटुंबांत पोंचवली जाईल असें करणें दोन्ही सरकारांचें कर्तव्य आहे. कुटुंबियांनींहि मोकळ्या मनानें त्यांचा स्वीकार करावा. दुष्टांच्या हातांत सांपडल्या म्हणून त्यांना बहिष्कृत करणें म्हणजे अक्षम्य क्रूरपणा होय.

२५ हजार स्त्रियांचें अपहरण करणारे निदान तितके तरी पुरुष असलेच पाहिजेत. हे का सारे गुंड होते ? मी असें गृहीत धरूं शकत नाहीं. सभ्य गृहस्थ म्हणून ओळखली जाणारीच ही मंडळी होती. परंतु त्यांनीं स्वतःला बट्टा लावला आहे. त्यांनीं ताळतंत्र सोडलें. सारी मर्यादा सोडली. स्त्रिया

पुन्हां परत केल्या जाव्यात म्हणून सार्वजनिक मनोभूमिका, सार्वजनिक वातावरण तयार केलें पाहिजे. स्त्रियांच्या या बचावाच्या कामीं दोन्ही सरकारांनीं सर्वस्व पणाला लावलें पाहिजे. इतर व्यक्ती व संस्था यांची मदत तीं मागूं शकतात. कार्य एवढें अवाढव्य आहे, कीं सरकारवांचून तें कोणीहि नीट हाताळूं शकणार नाहीं, करूं शकणार नाहीं.

## ८८

८-१२-'४७

## एका मुस्लिम संस्थेचा इशारा

एक मुस्लिम संस्था मला इशारा देते, कीं मीं या वा त्या पक्षाचें म्हणणें गृहीत धरून वाद करूं नये. दोन्हींतील सत्य शोधून तदनुरूप वागणें हा उत्तम मार्ग. ही संस्था पुढें आणखी मला असा सल्ला देते, कीं स्वतः मीं काठेवाडांत जावें व डोळ्यांनीं बघावें. परंतु मीं मागेंच सांगितलें, कीं सध्यां मी हें करूं शकत नाहीं. दिल्ली व आसपासचें कर्तव्य मीं प्रथम पाहिलें पाहिजे. हे सल्ला देणारे एक गोष्ट विसरतात, कीं ज्यांनीं तक्रार केली होती त्यांनींच आरोप परत घेतले आहेत. आणि मीं जी स्नेहमय पद्धति स्वीकारली, तिचाच हा परिणाम होतो. यांतून शिकावयाचें तें हें, कीं जेव्हां सत्यासाठीं म्हणून सत्याचा शोध असतो तेव्हां अनेक उदाहरणांवरून असें दिसतें, कीं परिणाम शेवटीं सुखदायी होतो. कोणत्याहि संशोधनासाठीं धीरवृत्ति नि सतत उद्योग यांची जरुरी असते.

## सिंधमधील केविलवाणीं पत्रें

दुःखींकष्टीं पत्रें सिंधमधून येतच आहेत. नुकतेंच आलेलें पत्र म्हणतें, कीं जरी खून होत नसले, तरी हिंदूंना स्वाभिमानानें जगणें अशक्य आहे. निर्वासित मुसलमान मन मानेल तेव्हां तुमच्या घरांत शिरतात व बिनदिक्कत म्हणतात, कीं याचा ताबा घ्यायला आम्ही आलों आहों. त्यांना तसा अधिकार वास्तविक नसतो. परंतु त्यांना नाहीं म्हणायला कोण धजणार? अशीं उदाहरणें किती तरी आहेत. कांहीं महिन्यांपूर्वींची कराची आतां स्वप्नवत्

झाली. मला आलेल्या लांबलचक पत्राचें असें हें सार आहे. तें पत्र मी विश्वसनीय मानतों. हीं अराजक असल्याचीं लक्षणें आहेत. तिळतिळ मारणें ज्याला म्हणतात तो हा प्रकार आहे. आत्म्याचाहि यांत वध आहे. हा बेकायदेपणा थांबवा असें पाकिस्तानी अधिकाऱ्यांस मी आर्जवून सांगतों. ही घटना हितावह नाहीं. अशी वृत्ति वाढूं देणें बरें लक्षण नव्हे. याला जितक्या लौकर आळा घातला जाईल तितकें बरें.

## पुनश्च नियंत्रणें

साखरेवरील नियंत्रण गेलें. अन्नधान्यें, डाळी, कापड यांच्यावरचेंहि जाईल. एका झपाट्यांत किंमती खालीं आणणें हा कांहीं निर्नियंत्रणाचा हेतु नाहीं. नेहमींच्या जीवनपद्धतीवर येणें हा हेतु आहे. सक्तीनें लादलेलें नियंत्रण कधींहि वाईटच आणि १९०० मैल लांब आणि १५०० मैल रुंद असलेल्या या अफाट देशांत, तर तें अधिकच वाईट. देशाची फाळणी हिशेबांत धरण्याची जरूर नाहीं. हें राष्ट्र कांहीं लष्करी राष्ट्र नाहीं. आपण पुरेसें अन्न नि वस्त्र निर्मूं शकूं. नियंत्रण गेल्यावर राष्ट्र मोकळेपणें श्वासोच्छ्वास करूं लागेल. चुका करण्याचाहि त्याला हक्क आहे. चुका कराव्या, त्या सुधारून पुढें जावें, ही प्रगतीची प्राचीन पद्धतीच योग्य आहे. मुलाला मोकळेपणें हिंडूंफिरूं न देणें, कपड्यांत गुंडाळून ठेवणें म्हणजे त्याची वाढ खुंटवणें होय, त्याला गुदमरवणें होय. धष्टीकष्टी वाढ व्हावी असें वाटत असेल, तुमचें मूल चांगलें तगडें नवजवान व्हावें असें वाटत असेल, तर सर्व प्रकारची हवा त्याला लागूं दे. सर्व प्रकारच्या थंडी-वाऱ्यांना तोंड द्यायला त्याला शिकवा. जें मुलाच्या बाबतींत तेंच राष्ट्राच्या. जें सरकार, सरकार या नांवाला पात्र आहे त्यानें तुटीला कसें तोंड द्यावें, हें राष्ट्राला शिकवलें पाहिजे; स्वतःच्या सामुदायिक प्रयत्नानें अडचणींना, संकटांना कसें तोंड द्यावें, प्रयत्नहीन परावलंबी जीवन जगण्यापेक्षां, असें स्वावलंबी जीवन कसें जगावें, तें सरकारनें दाखवलें पाहिजे.

## निर्नियंत्रणाचा अर्थ

या दृष्टीनें निर्नियंत्रणाकडे पाहिलें म्हणजे दूर दृष्टीचें काम सरकारी मूठभर सभासदांचें न राहतां तें राष्ट्रांतील कोट्यवधि जनतेचें होऊन राहतें.

राष्ट्रावर हीं जीं नवीन कर्तव्यें येऊन पडलीं आहेत, तीं त्यानें कशीं पार पाडावीं यासाठीं सरकारलाहि नवीन उद्योग, नवीन कामें हातीं घ्यावीं लागतील. वाहतुकीच्या पद्धतींत सुव्यवस्था निर्मावी लागेल; अधिक धान्योत्पादनाचे मार्ग झोंपडीपर्यंत सर्वांना नेऊन द्यायला हवेत. भांडवलवाल्या उत्पादकापेक्षां लहान उत्पादकांच्या अधिक उपयोगी कसें पडतां येईल हें शेतकीखात्यास शिकावें लागेल. राष्ट्राच्या सर्वच उत्पादकांवर सरकारनें विश्वास ठेवायला हवा; परंतु विश्वास ठेवीत असतांहि त्यांच्या व्यवहारावर देखरेखहि ठेवली पाहिजे. लहान उत्पादक हा लक्षावधि, कोट्यवधि जनतेचा प्रतिनिधि आहे, देशांत तेच बहुसंख्य आहेत. आजपर्यंत त्यांची उपेक्षा झालेली आहे. त्यांच्या हिताकडे अतःपर अधिक लक्ष दिलें गेलें पाहिजे. त्याला स्वतःचेंच धान्य लाभतें. थोडेंफार विकण्यासाठीं तो ठेवतो. हें विकून त्यांतून इतर जीवनाला आवश्यक वस्तु तो घेतो. त्या तो रोखीनें घेतो. नियंत्रणें म्हणजे, उत्पादकाला कमी मिळणें. खुल्या बाजारांत त्याला मिळेल त्यापेक्षां नियंत्रणामुळें त्याला कमी मिळतें. म्हणून त्याला ज्या मानानें अधिक मिळेल, त्या मानानें अन्नधान्याची किंमत वाढेल; परंतु यासाठीं गिऱ्हाइकानें, धान्य विकत ज्यांना घ्यावें लागतें त्यांनीं कुरकुरू नये. नवीन योजनेंत, किंमतींत जी वाढ होईल ती सारी उत्पादकाला मिळाली पाहिजे, याविषयीं सरकारनें लक्ष द्यावें. दररोज किंवा दर आठवड्याला सरकारनें हें सारें स्पष्टपणें जाहीर करावें. श्रीमंत कारखानदार किंवा दलाल यांनीं सरकारशीं सहकार्यानें आणि सरकारच्या सांगीप्रमाणें वागावें. अशा रीतीनें काम सुरू झालें आहे असें समजतें. या मूठभर पुंजीपतींमध्येंहि सुव्यवस्थित संबंध असायला हवेत. आजवर स्वार्थासाठीं त्यांनीं गरिबांना लुटलें आहे. आपापसांत दुष्ट स्पर्धा करायलाहि त्यांनीं मागें-पुढें पाहिलें नाहीं. अन्न आणि वस्त्र या बाबतींत त्यांनीं हे प्रकार थांबविले पाहिजेत. या दोन गोष्टींच्या बाबतींत नफ्याचा हेतूच असतां कामा नये. नियंत्रणें काढल्यामुळें त्यांना जर फायदा उकळतां येऊं लागला, तर नियंत्रणें दूर करण्यांतील हेतूच विफल होईल. हे भांडवलदार, हे धनिक वर्ग, प्रसंगानुरूप जरा उच्च भूमिकेवर येऊन व्यवहार करतील अशी आशा राखूं या.

१-१२-'४७

## हवापालट

गांधीजींनीं आरंभ केला. ते म्हणाले, वर्तमानपत्रांत बातमी आली आहे, कीं मी नि सरदार हवापालट म्हणून पिलानीस जाणार आहोंत. सरदारांना किंवा मला असा हवापालट करायला वेळ नाहीं. रात्रीं विश्रांति मिळाली म्हणजे हवापालट झाला. परंतु सरदारांविषयीं बोलण्याचा मला हक्क नाहीं. मुलाखती, सरकारी काम, यांपासून थोडी विश्रांति कदाचित् त्यांना हवी असेल, कोठें शांत जागीं जाणार असतील. परंतु माझ्या पाठीमागें सरकारी कामाचा लकडा नाहीं. शिवाय करेन किंवा मरेन या प्रतिज्ञेनें मी दिल्लीस बसलों आहें. आम्हां दोघांसाठीं सर्व प्रकारच्या सुखसोयी पाठवण्याचीहि मोठी तयारी चालली आहे, असेंहि मीं ऐकलें. हें सारें काल्पनिक आहे, केवळ खोटें आहे. मला आश्चर्य वाटलें ऐकून. पिलानीसंबंधींची बातमी मीं वर्तमानपत्रांत वाचली. सरदारांना किंवा मला विचारून बातमीचा खरेखोटेपणा ते कां नाहीं जाणून घेत, मला कळत नाहीं.

## खुनाहून वाईट

मागें मी एका सिंधी डॉक्टराच्या हरिजनांच्या परिस्थितीविषयींच्या पत्रासंबंधीं बोललों होतों. आतां दुसऱ्या एका सिंधी मित्राचें पत्र आलें आहे. त्यांत म्हटलें आहे, कीं त्या डॉक्टरांना अटक करण्यांत आली आहे. डॉक्टरांबरोबर नव्हे, परंतु इतरहि अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली आहे. हरिजनांची बाजू घेऊन जो कोणी बोलेल त्याला सिंधमध्यें मोकळें ठेवण्यांत येणार नाहीं, हा याचा अर्थ दिसतो. ही परिस्थिति भयावह आहे. मी पाकिस्तान-सरकारला असा इशारा देतों, कीं तुमचें असें वर्तन म्हणजे तेथील सर्व कार्यकर्त्यांना इकडे घालवणें होय. कारण हाच त्याचा परिणाम होईल. खुनापेक्षांहि हें वाईट आहे.

## कस्तुरबा-निधि-कार्यकर्त्यांस

आज तिसरे प्रहरीं कस्तुरबा-निधींतून काम करणाऱ्या स्त्री-कार्यकर्त्यांजवळ थोडें बोललों. हिंदुस्थानांतील स्त्रिया नि मुलें यांच्या सेवेसाठीं हा निधि आहे. कार्यकर्ते बहुतेक शहरांतील आहेत. आजवर शहरांनीं खेड्यांचें शोषण केलें आहे. आतां खेड्यांसाठीं शहरांचें शोषण होऊं दे. खेड्यांसाठीं शहरांचें शोषण होणें, हीच वास्तविक न्याय्य गोष्ट आहे. परंतु भांडवलदार खेड्यांतून कच्चा माल आणतात आणि त्यांतून पैसे करतात. जर तुम्हां सेविकांना खेड्यांची सेवा करायची असेल, तर आधीं मनानें खेडूत व्हा. शहरी मनोवृत्ति नको. शहरांतील आरोग्य, स्वच्छता इत्यादि गोष्टी खेड्यांत घेऊन जा. परंतु या गोष्टी खेड्यांमध्यें नेतांनाहि त्यांना खेडेगांवी पोषाख चढवावा लागेल. असें कराल तेव्हांच खेड्यांचें शोषण कमी होईल, त्याला आळा बसेल; आणि तेथील स्त्रिया नि मुलें यांची स्थिति सुधारेल.

### ९०

१०-१२-'४७

## चरख्याचा अर्थ

गांधीजी म्हणाले, काल हरिजन-निवासांत चरखा-संघाच्या बैठकीस गेलों होतों. आज तालिमी-संघाच्या गेलों होतों. चरखा-संघ चरख्याच्या प्रसारासाठीं, चरखा ज्या गोष्टीचें प्रतीक आहे, त्या अहिंसेच्या प्रचारासाठीं आहे. चरखा-संघ लोकांना स्वतःचें कापड तयार करा व वापरा असें सांगतो, त्याची शिकवण देतो, त्यासाठीं उत्तेजन देतो. सरकी काढणें, पेळू करणें, सूत कांतणें, विणणें, सर्व क्रियांचें तो शिक्षण देतो. लोक जर असें करतील, तर दुहेरी फायदा होईल. वस्त्र विकत घ्यावें लागणार नाहीं ही एक गोष्ट, आणि सुंदर अशा या हस्तोद्योगांत वेळ सार्थकीं लागेल. हिंदुस्थानांत कपड्यांची टंचाई असणें म्हणजे केवळ मूर्खपणा आहे. चरखा-संघामुळें खेडयांतील कांहीं लोकांना उपयुक्त काम मिळत आहे. कांहीं कोटी रुपये खेडुतांच्या घरीं जात आहेत. परंतु सात लक्ष खेडयांत चरखा

प्रिय करण्यांत चरखा-संघास यश आलेलें नाहीं. जर साऱ्या खेड्यांतून चरख्याचें गुंगूं सुरू झालें असतें, तर आज ज्या दुःखद घटना जगाला बघाव्या लागत आहेत, त्या बघाव्या लागल्या नसत्या. सारीं खेडीं सुखी, मधमाश्यांच्या पोवळ्याप्रमाणें उद्योगी झालीं असतीं. परंतु लोक गिरण्यांचा विचार करितात. गिरण्या कितीशा लोकांना काम पुरवणार? आज धनिकांचें हित आधीं बघितलें जात आहे. जनतेचें कोण बघतो? माझें भांडवलदारांशीं भांडण नाहीं. मी एका भांडवलदाराकडेच रहात आहें. परंतु माझे मार्ग नि त्यांचे भिन्न आहेत. 'गरिबांची सेवा' असें सारे बोलतात. समाजवादी जनतेच्या सत्तेविषयीं बोलत असतात. समाजवादी क्रांति आणि प्रचंड उद्योगधंदे राष्ट्राचें करणें या गोष्टी योग्य वेळीं येतील. परंतु आज समाजवादी लोकांनींहि चरखा चालवला पाहिजे, त्यांतील हेतु लक्षांत घेऊन काम केलें पाहिजे. वस्त्रांच्या बाबतींत तरी स्वावलंबी व्हा, असें लोकांना त्यांनीं सांगितलें पाहिजे.

## चरखा आणि जातीय ऐक्य

आज तीस वर्षें मी यासाठीं काम करीत आहें. चरखा म्हणजे अहिंसेचें प्रतीक असें मीं म्हटलें. चरख्याचा संदेश पसरला असता, तर मुसलमानांना घालवण्याचा प्रश्नच निघता ना. दिल्लीहून किती तरी निघून गेले. जे उरले त्यांनाहि घालवण्याचें ऐकूं येतें. हिंदू का त्यांच्या मशिदींत जाऊन राहणार? हिंदुधर्माचा तो नाश आहे.

## जगा नि जगूं द्या

अजमीरहून बातमी आली आहे, कीं तेथील किती तरी मुसलमान धमकीमुळें निघून गेले. उरलेल्यांपैकीं कांहींना ठार करण्यांत आलें. हें विष खेड्यांतूनहि पसरत आहे! अजमीरला मोठा दरगा आहे. हिंदु-मुसलमान दोघे तेथें भजतात. आज़ कां ते पागल बनले? सुविचार यावा म्हणून सर्वांनीं प्रार्थना करा. मुसलमानांना घालवाल किंवा ठार कराल, तर हिंदुधर्माला ठार कराल. तसेंच पाकिस्तानांतून हिंदू आणि शीख यांचें निसंतान केल्यानें मुसलमानहि इस्लामचाच नाश करतील. जगा आणि दुसऱ्यास जगूं द्या हाच एक मार्ग आहे.

११-१२-'४७

## कुराणांतील सुरा

प्रार्थना सुरू होण्यापूर्वी श्रोत्यांतील एकजण उठून म्हणाला, " प्रार्थनेंत कुराणांतील जी कविता म्हणण्यांत येते तिचा अर्थ कृपा करून सांगा." प्रार्थना संपल्यावर गांधीजी म्हणाले, त्या कवितेचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे : " भक्त अल्लाला म्हणतो तूं कृपाळू आहेस. दुष्ट सैतानाच्या कचाट्यांतून मला वांचव. तूंच शेवटच्या दिवशीं न्याय देणारा. तूं एक आहेस. तूं कोणाचा मुलगा नाहींस, तुला कोणी मूलबाळ नाहीं. तुझ्या कृपेनें जे कृतार्थ झाले, अशांचा मार्ग मला दाखव." तुम्ही मला विचाराल कीं, या अर्थाच्या विरुद्ध जाणारीं कृत्यें मुसलमान कां करतात. मी तुम्हांला उलट प्रश्न विचारीन, ख्रिश्चन लोक बायबलप्रमाणें वागतात का ? हिंदू लोक उपनिषदांप्रमाणें वागतात का ? सगळेच मुसलमान वाईट नाहींत, आणि सारे हिंदूहि सज्जन नाहींत.

## मुस्लिम शान्तिदूतांचें आश्वासन

युक्त प्रान्तांतील चार मुसलमान शान्तिकार्यार्थ पश्चिम पंजाबांत गेले होते. आज सकाळीं ते मला भेटले. ते म्हणाले, कीं हिंदूंनीं लाहोरमध्यें आतां परत जावें. तेथें सुरक्षितता आहे. ते त्यांच्याबरोबर जायला तयार आहेत. त्यांच्या एका केसालाहि धक्का लागण्याआधीं ते आपले प्राण देतील. मीं त्यांना सांगितलें, कीं तुम्हांला जें म्हणायचें आहे तें लिहून द्या. म्हणजे प्रार्थनोत्तर मी वाचून दाखवीन. तेव्हां त्यांनीं पुढीलप्रमाणें लिहून दिलें:—

"युक्तप्रान्तीय शान्तिदूत पश्चिम पंजाबांत दोन वेळां हिंडले. एकदां त्यांनीं एक महिना त्यांत दवडला. दुसऱ्या खेपेस सात दिवस हिंडले. परिस्थिति आतां बरीच सुधारली आहे. सरकार नि जनता शान्ति स्थापण्यासाठीं प्रयत्न करीत आहेत.

१. पश्चिम पंजाब सरकारची इच्छा आहे, की जे मुसलमानेतर रहात आहेत त्यांनीं रहावें आणि जे गेले आहेत त्यांनीं परतावें.

२. जे परत येतील त्यांची मालमत्ता त्यांना परत मिळावी म्हणून सरकारनें सूचना काढल्या आहेत.

३. जे मुसलमानेतर परत येतील त्यांना सरकार संरक्षण देणार आहे, उद्योगधंदा चालवायला सर्व सोयी मिळतील.

४. सरकारच्या सर्व प्रयत्नांनींहि मुसलमानेतर परत येणार नसतील, तर त्यांना त्यांची इस्टेट विकायचा किंवा अदलाबदल करायचा पूर्ण हक्क आहे.

५. दंगलखोरांना अद्दल घडेल अशा प्रकारें शिक्षा देण्यांत येत आहे. पुनश्च अशी दंगल होऊं नये म्हणून सर्व प्रकारची दक्षता घेण्यांत येत आहे. मुसलमानेतरांचें जीवित, वित्त, अब्रू यांच्या रक्षणाची जबाबदारी सरकारनें नि जनतेनें घेतली पाहिजे असें या शान्तिदूतांनीं त्यांना पटविलें. युक्तप्रान्तीय शान्तिदूत मुसलमानेतर बंधूंना आश्वासन देऊन सांगतात, कीं ज्यांना परत जाण्याची इच्छा असेल त्यांच्याबरोबर आम्ही जाऊं, त्यांना त्यांच्या घरींदारीं पोंचवूं. ते सुरक्षित पोंचेपर्यंत ते त्यांना सोडणार नाहींत. स्वतःच्या प्राणांनीं त्यांचा सांभाळ करतील."

एका हिंदूनेंहि मला एक पत्र दिलें आहे. त्यांत तो लिहितो. "सर्व दंगलींत मी लाहोरलाच होतों. माझें एक उपाहारगृह आहे. हजार एक लोक दिवसांत येत असतील. सरकार गुंडगिरी दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. लाहोर सोडणाऱ्या मुसलमानेतरांनीं परतावें, अशी मी विनंति करतों."

जर हें सारें खरें असेल, तर मला किती समाधान वाटेल. परंतु या मित्रांचें हें वक्तव्य कृतीनें सिद्ध व्हायला हवें. या बाबतींत काय करतां येईल तें मी बघेन.

९२

१२-१२-'४७

## निर्वासितांचे हाल

गांधीजी म्हणाले, "एका निर्वासितबंधूनें लिहिलें आहे, कीं आपण काल सायंकाळीं पाकिस्तानांत परत जावें म्हटलेंत, त्याप्रमाणें शक्य तितक्या

लौकर जायला मी उत्सुक आहें. इकडे निर्वासितांची कोणीहि काळजी घेत नाहीं. त्यांना फार हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत." पत्रलेखकाच्या म्हणण्याप्रमाणें सरकारनें पराकाष्ठेचे प्रयत्न केले तरीहि निर्वासितांना हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत ही गोष्ट खरी; परंतु लक्षांत घेतलें पाहिजे, कीं हा प्रश्न इतका विराट् आहे कीं उत्तमांतील उत्तम सरकारलाहि हें कार्य प्रत्येकाला समाधान होईल अशा प्रकारें पार पाडतां येणें अशक्य आहे. परंतु पाकिस्तानांत आज या क्षणीं कोणीहि जावें असा सल्ला द्यायला मी तयार नाहीं. शान्तिदूतांचें जें वक्तव्य आहे त्याची सत्यासत्यता पहावयाला हवी. आणि नंतर जे जायला इच्छीत असतील त्यांच्या जाण्याची योग्य ती व्यवस्था करून द्यायला हवी.

## दुसरी बाजू

मला एक ब्रह्मदेशांतून आणि एक मुंबईहून अशीं दोन पत्रें आलीं आहेत. दोन्ही संतापानें लिहिलेलीं आहेत. दोन्ही पत्रें मुसलमानांचीं आहेत. परंतु त्यांनीं नांवें नाहीं लिहिलीं. ते लिहितात, कीं काठेवाडी मुसलमानांनीं जरी आरोप मागें घेतले असले, तरी ते आरोप खरे आहेत. अशा बिनसहीच्या पत्रांना कितपत महत्त्व द्यायचें तें मला कळत नाहीं. या पत्रलेखकांनीं पुरावा मांडावा, नांवें द्यावीं, आंकडे द्यावे. असें होईल तरच मी स्थानिक अधिकाऱ्यांना चौकशी करा म्हणून लिहीन.

अजमीरची एक तार आली आहे. तार म्हणते, कीं तुम्हांला वाटलें एवढी दंगल नाहीं. आणि तिचा आरंभहि हिंदूंकडून नाहीं झाला. ही तार मीं एवढ्यासाठीं सांगितली, कीं निराळें मत असणारेहि लोक आहेत. सत्य कोठें आहे मला माहीत नाहीं.

सोमनाथाच्या जीर्णोद्धारासाठीं सरकारी तिजोरींतून खर्च केला जाणार नाहीं, असें सरदार वल्लभभाई पटेल म्हणाल्याचें मीं सांगितलें होतें. त्यावर टीका करून एक मित्र म्हणतो, कीं सरकारी तिजोरींतून खर्च केला म्हणून काय बिघडलें? माझें उत्तर असें, कीं सरकार एका जमातीसाठीं अशा रीतीनें पैसे खर्चील, तर दुसऱ्या जमातीसाठींहि खर्च केले पाहिजेत. म्हणून सरकारी तिजोरींतून खर्च करणें चूक आहे.

## कलकत्त्यांत गुंडगिरी

कलकत्त्यास गुंडगिरी आहे याचा अर्थ काय ? अत्याचारानें वाटेल तें आपण मिळवूं शकूं असें का लोकांना वाटूं लागलें आहे ? असें वाटत असेल, तर तें साफ चूक आहे. अशा अत्याचारांविरुद्ध मागें मीं उपवास केलेला आहे. परकी सरकाराविरुद्ध तो होता. आज आपलें सरकार आहे. परंतु म्हणून का बेबंदशाही सहन करायची ? अत्याचारी वर्तन दडपण्यासाठीं जे सरकारी उपाय अंमलांत आणले जातात, त्यांच्याविरुद्ध लोक तक्रार करतात. मला लोकांना असें सांगायचें आहे, कीं गुन्ह्याची शिक्षा न मिळणें म्हणजे स्वातंत्र्य नव्हे; जर लोकांना अमुक एक गोष्ट अन्याय्य आहे असें वाटत असेल, तर त्यांनीं योग्य मार्गानें त्याविरुद्ध चळवळ करावी. सनदशीर मार्ग वापरून त्यांनीं पाहिलें का ? ते का निष्फळ ठरले ? तुमचें स्वातंत्र्य तीन महिन्यांचें उणेंपुरें बाळ आहे. जर प्रसिद्ध झाल्याप्रमाणें लोक सरकारला अडथळा करतील, तर सरकारला जनतेला अन्नवस्त्रादि पुरवण्याचें कर्तव्य पार कसें पाडतां येईल ? हिंदी लोकांना विध्वंसकच काम करतां येतें, विधायक वृत्ति त्यांच्यांत नाहीं, हा का या सर्वांचा अर्थ ? ब्रिटिश सरकारविरुद्ध आपण निःशस्त्र प्रतिकारानें लढलों, हिंसेनें नव्हे. परकी सरकारविरुद्ध लढतांनाहि जे मार्ग आपण निषिद्ध ठरवले, ते मार्ग स्वतःचें सरकार आल्यावर उपयोगांत आणणें चूक आहे.

## ९३

१३-१२-'४७

## चरख्याचा संदेश

गांधीजी म्हणाले, हरिजन-वसाहतींत चरखा-संघाची बैठक होती. तेथें बोलणें झालें. मी चरख्यावर इतका जोर कां देतों ? मी कित्येक वर्षांपूर्वीं चरख्यासंबंधीं जेव्हां प्रथम बोलूं लागलों त्या वेळेस पंजाबांत तसेंच गुजरातच्या नि काठेवाडच्या कांहीं भागांत हा धंदा अजून जिवंत आहे हें मला माहीत नव्हतें. गरीब शेतकऱ्याला दुय्यम धंदा म्हणून, खेड्यांतील स्त्रियांना उत्पन्नांत

थोडी भर घालणारा धंदा म्हणून, प्रथम याच्याकडे मी पाहूं लागलों. परंतु नंतर चरख्यांतील प्रचंड अशी सुप्त शक्ति मला दिसून आली. चरख्यांत मला अहिंसेची शक्ति आढळली. मोठ्यांतील मोठ्या लष्करी सामर्थ्यांसहि अहिंसेचा पराभव करणें अशक्य आहे. या साक्षात्कारामुळें मी चरखा हें अहिंसेचें प्रतीक मानूं लागलों.

चरख्याचा इतिहास तुम्ही सारे जाणतां. डाक्क्याची मलमल आणि अशा इतर गोष्टी तुम्हांस माहीत आहेत. त्या काळांतील चरखा आपल्या दास्याची निशाणी होती. मालकांच्या हुकमाप्रमाणें तो देईल त्या मजुरीनें कांतावें लागे, काम करावें लागे. नाहीं म्हणतां येत नसे. परंतु तेंच चक्र जेव्हां त्यांतील सर्व अर्थ लक्षांत घेऊन फिरवलें चाऊं लागलें, तेव्हां तें स्वातंत्र्याचें प्रतीक बनलें. ४० कोटी हिंदी जनतेंतील सर्व स्त्री-पुरुष आणि वयांत आलेलीं मुलें जर चरखा चालवतील, तर सर्वांना पुरेल इतकी खादी तयार करायला पुरेसें सूत पैदा होईल. कोट्यवधि रुपयांची बचत होईल. परंतु पैसे वांचणें ही महत्त्वाची बाब नव्हे. ४० कोटी लोकांच्या सहकारी उद्योगांतून जी शक्ति निर्माण होईल ती सर्वांत महत्त्वाची बाब होय. मला तिचें महत्त्व आहे. कोणाचेंहि शोषण न करतां सर्वांना काम देईल असा आहे का दुसरा एकादा धंदा? गिरण्या हें कधीं करूं शकणार नाहींत. कांहीं लाखांना काम देऊन बाकी कोट्यवधींना त्या बेकारच ठेवणार. मागें तुम्ही मी म्हणत असें म्हणून कांतीत असा. परंतु त्यांतील संपूर्ण अर्थ लक्षांत घेऊन तुम्ही नसा कांतीत. म्हणून चरख्याचा पुन्हां बराचसा त्याग केलेला दिसतो. आतां हेतुपुरस्सर आणि विचारपूर्वक तो हातीं घ्या. चरखा म्हणजे शोषणापासून मुक्ति. चरखा माझ्या मतें अहिंसा आणि अहिंसा म्हणजे नैतिक जीवन; म्हणून या संपूर्णार्थानें जर चरखा उचलाल, तर पुन्हां मग तुम्ही फेंकणार नाहीं. सर्व जगासाठीं शान्ति आणणारे तुम्ही अग्रदूत ठराल.

## ९४

१४–१२–'४७

## मित्रभावाचें कर्म

मी प्रार्थनेला येत असतां एकानें पत्र दिलें. ते गृहस्थ म्हणतात कीं

“ परिस्थितीच्या दडपणामुळें माझ्या एका मुसलमान मित्राला पाकिस्तानांत जावें लागलें. त्यानें आपली कष्टाची शिल्लक सोन्याचांदीच्या रूपांत असलेली जातांना मजजवळ ठेवली होती. तुम्ही मालकाकडे ही सोनें-चांदी पाठवाल का ? ” मालकाचें नांव, पत्ता व सोनें-चांदी आणून देण्यांत आली, तर मालकाचा शोध करून त्याला त्याची मिळकत पोंचेल असें करा, म्हणून मी अधिकाऱ्यांना आनंदानें सांगेन.

## नई तालीम

हरिजन-निवासांत मी जातों. अनुक्रमानें विषय चर्चेस येतात. खादी-नंतर नई तालीमचा प्रश्न निघाला. नई तालीम सुरु होऊन आठच वर्षें झालीं. नव्या पायावर सर्व राष्ट्राला शिक्षण देऊं पाहणाऱ्या अखिल भारतीय संस्थेला हा आठ वर्षांचा अनुभव म्हणजे कांहीं फार मोठा नव्हे. उद्योग-द्वारा शिक्षण असें सर्वसामान्यपणें त्याचें वर्णन करण्यांत येतें आणि तें बरोबर आहे. परंतु हें संपूर्ण सत्य नव्हे, नवीन शिक्षणाचें मूळ आणखी खोलवर गेलेलें आहे. मानवाच्या सर्व व्यवहारांत नि उद्योगांत सत्य नि प्रेम दाखल व्हावींत हा त्यांत हेतु आहे. मग तें जीवन वैयक्तिक असो वा सामुदायिक असो. जीवनाच्या सर्व उद्योगांत सत्य नि प्रेम भरून राहिलीं आहेत अशा चिंतनांतून, अशा विचाराच्या मननांतून, उद्योगद्वारा शिक्षणाचा विचार स्फुरला. प्रेमामुळें स्फुरलें, कीं शिक्षण सर्वांना सुलभतेनें मिळालें पाहिजे आणि रोजच्या व्यवहारांत पुन्हां प्रत्येक शेतकऱ्याला तें उपयोगाचेंहि व्हायला हवें. असें शिक्षण पुस्तकांतून नाहीं मिळायचें. तें पुस्तकांवर अवलंबून नाहीं. त्याचा विशिष्ट धर्माशीं संबंध नाहीं. तें धार्मिक म्हणायचेंच झालें तर ज्या विश्वात्मक धर्मापासून ते ते धर्म निघाले, त्या विश्वात्मक धर्माचें म्हणतां येईल. **जीवनग्रंथांतूनच** हें शिक्षण व्यायचें असतें. त्याला पैसे मोजायला नकोत. आणि जगांतील कोणतीहि सत्ता तें तुमच्यापासून हिरावून घेऊं शकणार नाहीं. प्रश्न हा आहे, कीं सत्य आणि प्रेम यांनीं ज्यांचीं जीवनें व्यापलेलीं आहेत असे शिक्षक आहेत का ? आजच्या अश्रद्धेच्या नीतिहीन जगांत सत्य नि प्रेम यांच्याबद्दल ज्यांना आस्था आहे, असे विद्यार्थी तरी मिळतील का ? अध्यक्ष डॉ. झकीर हुसेन

आणि चिटणीस श्री. आर्यनायकम् आणि आशादेवी यांनीं या प्रश्नाचें उत्तर द्यायचें आहे. सत्य आणि अहिंसेकडे धोरण म्हणून न बघतां जीवनसिद्धान्त म्हणून जर त्यांची श्रद्धा असेल, तर लोहचुंबकाप्रमाणें अत्यंत कठोर हृदयी मानवासहि ते आकर्षिल्याशिवाय राहणार नाहींत. सायंकाळच्या प्रार्थनेंत स्थितप्रज्ञाचीं जीं लक्षणें सांगितलेलीं आहेत, तीं लक्षणें त्यांच्याजवळ असायला हवींत. जर हे गुण त्यांच्याजवळ नसतील, जर हातीं घेतलेलें कार्य ते अर्धवट सोडतील, तर हें आठा वर्षांचें बाळ मरणारच. या तिघांतहि पुन्हां दोघां चिटणिसांवर अधिक जबाबदारी आहे. तालिमी संघाचें संपूर्णपणें विकसित अशा संस्थेंत अजून रूपान्तर झालेलें नाहीं. संस्था म्हटली म्हणजे ती अमुक एका व्यक्तीवर विसंबून नाहीं राहतां कामा. व्यक्ती गेल्या, ती संस्था निर्मिणारे संघटकहि समजा गेले, तरी ती संस्था पुढें चालू रहायला हवी. तालिमी-संघ संस्थेला असें स्वरूप प्राप्त झालें आहे, असें मी म्हणूं शकत नाहीं.

९५

१५-१२-'४७

## लज्जास्पद बेकायदा वर्तन

वृत्तपत्रांतील पुढील वृत्त वाचून मला दुःख झालें :

"म्युनिसिपालटीच्या सहा शाळांचा निर्वासितांनीं कबजा घेतला आहे. दिल्ली म्यु. कमिटीनें किती समजावून सांगितलें, परंतु निर्वासितांनीं इमारती खालीं करून दिल्या नाहींत. इमारती खालीं करून मिळाव्यात म्हणून कमिटी पोलिस अधिकाऱ्यांकडे जाण्याच्या विचारांत आहे."

हें वृत्त विश्वसनीय दिसतें. बेकायदा वर्तनाचें हें लज्जास्पद उदाहरण आहे; एवढेंच नव्हे, तर याहूनहि वाईट गोष्ट ही, कीं दिल्ली राजधानींत ही गोष्ट घडावी. हें कांहीं कोणाला भूषण नाहीं. बेकायदा वर्तन करणारे पस्तावून इमारती खालीं करून देतील अशी आशा आहे. त्यांनीं नाहीं खालीं केल्या, तर त्यांच्या मित्रांनीं त्यांच्यावर दडपण आणून त्यांना खालीं करायल

लावावें. सरकारला सक्तीनें खालीं करायला लावण्याची पाळी न येवो. निर्वासितांवर सर्वसाधारण असा आरोप केला जातो, कीं इतक्या खडतर आपत्तींतून जाऊनहि ते शहाणे, धीरगंभीर झाले नाहींत; समतोल नि उद्यमी झाले नाहींत. निर्वासित आणि विशेषतः बेकायदा वागणारे लोक पश्चात्तापपूर्वक वागून हा आरोप खोडून काढतील अशी आपण आशा करूं या.

## गुंडगिरी आणि लांचलुचपत

शनिवारीं मीं कलकत्त्यांतील गुंडगिरीचा उल्लेख केला. ती गुंडगिरी कांहीं निर्वासितांची नव्हती. पुढाऱ्यांनीं— मग ते कोणत्याहि पक्षाचे वा मताचे असोत— भारताची प्रतिष्ठा डोळ्यांत तेल घालून सांभाळावी. जर गुंडगिरी आणि लांचलुचपत उजळ माथ्यानें वावरतील, तर देशाचें नांव कसें राहणार? मी गुंडगिरीबरोबरच लांचलुचपत वगैरेचा उल्लेख करीत आहें. कारण एकच जात आहे त्यांची. लांचलुचपत, काळाबाजार कमी न होतां वाढतच आहे, असें विश्वासार्ह ठिकाणाहून मी ऐकतों. जो तो स्वतःपुरता, व देशासाठीं कोणीच नाहीं का?

## धूर्त डाव

एक पत्रलेखक लिहितो :

१९४७, ११ डिसेंबरचें तुमचें प्रार्थनोत्तर भाषण आतांच रेडियोवरून ऐकलें. तुम्हीं त्यांत सांगितलेंत कीं युक्त प्रांतांतील कांहीं मुसलमान लाहोरला गेले होते. त्यांनीं पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या वतीनें मुसलमानेतरांना विशेषतः हिंदूंना असें आश्वासन दिलें आहे, कीं त्यांनीं लाहोरला परत यावें व पूर्ववत् उद्योगधंदा आरंभावा. पहिली गोष्ट म्हणजे हें आमंत्रण फक्त हिंदूंना आहे, शीखांना नाहीं. यांत पाकिस्तानी अधिकाऱ्यांचा हिंदु आणि शिख यांच्यांत दुफळी पडावी असा कावा आहे.

हीं अशीं सारीं आश्वासनें म्हणजे धूळफेक असते. हा सारा चावटपणा असतो. अशा मुसलमानांकडून तुमच्यासारखीं माणसेंच कदाचित् फक्त फसतील. ११-१२-४७च्या 'हिंदुस्थान टाइम्स'मधील एक कात्रण मी सोबत

पाठवीत आहे. त्यावरून पाकिस्तान-सरकारच्या कळकळीचें ढोंग सारें उघड होत आहे. हें कात्रण वाचल्यावरहि अशा मुसलमानांना तुम्ही प्रामाणिक मानणार का, तें कृपा करून सांगा. पाकिस्तानमध्यें प्रत्यक्ष परिस्थिति निराळीच असतां तेथें सारें आलबेल आहे असें जगाला दाखवायचें, अल्पसंख्य जमातींच्या बाबतींत पाकिस्तान-सरकार किती सुरेख वागत आहे असें भासवायचें, हा डाव असे मुसलमान पाठवण्यांत असतो. हे मुसलमान पुन्हां तुमच्याकडे आले, तर कृपेनें हें कात्रण त्यांना दाखवा.

१९४७ च्या २० नोव्हेंबरला बँकेंतून आपला ऐवज मागायला लाहोरला जेव्हां शीख गेले, तेव्हां त्यांची काय गत झाली तें तुम्हांला स्मरत असेल, याची मला खात्री आहे. ज्या हिंदी लष्कराच्या संरक्षणाखालीं हिंदू नि शीख गेले, त्या लष्करावरहि पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या देखत मुसलमानांच्या थव्यांनीं हल्ला चढविला. त्या दंगेखोरांना थांबवण्यासाठीं पाकिस्तानी अधिकाऱ्यांनींहि कांहींहि केलें नाहीं."

पत्रलेखकानें पाठवलेलें कात्रण पुढीलप्रमाणें आहे : "लाहोरच्या 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट'मध्यें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या वृत्तान्तांत म्हटलें आहे, कीं जे मुसलमानेतर धंदेवाले नि दुकानदार नुकत्याच झालेल्या दंगलींत पूर्वेकडे पळून गेले होते ते आपापले उद्योगधंदे सुरू करण्याच्या हेतूनें, कित्येक महिने बंद असलेलीं दुकानें उघडतां आलीं तर पहावें म्हणून हळूहळू येऊं लागले होते. परंतु दुकानांचा ताबा मिळण्यापूर्वीं अशक्य अशा अटींवर त्यांना सही करायला सांगण्यांत आलें. त्यामुळें गेलेले निराशेनें पुन्हां हिंदुस्थानकडे परतले."

'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट'मध्यें आणखी पुढीलप्रमाणें वृत्तान्त आहे :

मालकांच्या वतीनें पुनर्रचना-अधिकारी दुकानें उघडतात. दुकानदारांना पुढील अटींवर सही करावी लागते:—

१ सर्व विक्रीचा नीट हिशेब ठेवण्याचें वचन.

२ दुय्यम पुनर्रचना-अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय मालकानें दुकानांतील माल वा पैसा अन्यत्र नेतां कामा नये.

३ दुकानांतील धंदा दुकान या नात्यानें चालू राखण्याचें वचन.

४ रोजच्या रोज बँकेंत विक्रीची सारी रक्कम नेऊन ठेवणें. आणि परवानगीशिवाय त्यांतून रक्कम न हालवणें.

५ दुकानदारानें कायमचें लाहोरांतच राहिलें पाहिजे.

आपापलीं दुकानें उघडावीं, उद्योगधंदा सुरू करावा या हेतूनें जे धंदेवाले लाहोरला पुन्हां गेले होते, ते परत माघारे फिरत आहेत. दुकानांचा ताबा देण्यापूर्वीं ज्या अटी घालण्यांत येत आहेत त्या पाळायच्या म्हणजे धंदा चालवणेंच अशक्य होईल. सरकारची इतकी देखरेख व इतका हस्तक्षेप असल्यावर धंदा चालवणें केवळ कठिण असें त्यांना वाटतें.

शिवाय या लोकांचें म्हणणें, कीं ज्या अर्थीं पाकिस्तान-सरकारनें अल्पसंख्य जमातींना उदारतेनें वागवण्याचें वचन दिलें आहे, त्या अर्थीं मुसलमानेतरांना निराळ्या रीतीनें वागवणें त्यांना शोभत नाहीं. एक प्रमुख व्यापारी म्हणाला, ‘ मुसलमान व्यापारी नि उद्योगधंदेवाले यांच्यावर अशीं नियंत्रणें नि बंधनें नाहींत.’

## विश्वासानें विश्वास वाढतो

परवांच मी निराशेसंबंधीं बोललों. ही बातमी कदाचित् बिनचूक असेल. तरीहि त्या मुस्लिम मित्रांनीं जें सांगितलें. तें त्यामुळें गैरलागू होतेंच असें नाहीं. त्यांना स्वतःचेंच नांव राखायचें आहे असें नसून हिंदुस्थानमधील ज्यांचे ते प्रतिनिधी आहेत त्यांचें, तसेंच ज्यांनीं अभिवचनें दिलीं त्या पाकिस्तानी अधिकाऱ्यांचेंहि नांव राखायचें आहे. शिवाय ते मित्र निघून नाहीं गेले. ते माझ्याशीं संबंध ठेवीत आहेत. आजच पुन्हां भेटायला आले होते. माझें मौन असल्यामुळें आणि हें प्रार्थनोत्तर भाषण लिहिण्यांत गुंतलेला होतों म्हणून मी त्यांना भेटूं शकलों नाहीं. आपण स्वस्थ बसलों नाहीं असें आश्वासन त्यांनीं मला दिलें आहे. तें आपलें शान्तिकार्य पुढें चालवीत आहेत. माझ्या पत्रलेखकानें फाजील संयमी नि फाजील हळूवार असूं नये असें माझें त्यांना सांगणें आहे. विश्वासल्यामुळें त्याचें नुकसान नाहीं होणार. अविश्वास ही फसवी मैत्रीण आहे. म्हणून या पत्रलेखकानें जपून जावें. माझ्या बाबतींत म्हणाल, तर मला पश्चात्ताप करण्याचें कारण नाहीं. उघड्या डोळ्यांनीं सर्व जीवनावधि

मी विश्वास ठेवीत आलों आहें. असत्य आहेत असें सिद्ध होईपर्यंत या मुसलमान मित्रांवरहि विश्वास ठेवण्याचें मीं ठरविलें आहे. विश्वासानें विश्वास वाढतो. वंचना नि द्रोहाजवळ झगडायला त्यामुळें तुम्हांला शक्ति येते. निर्वासित दोन्ही बाजूंचे जर एक दिवस आपल्या घरीं जायचे असतील, तर जे उपाय नि साधनें मी उपयोजीत आहें, त्यानेंच तें शक्य होईल.

## अयोग्य भीति

शीख आणि हिंदू यांच्यांत दुही पाडण्याचा यांचा डाव आहे, अशी जी भीति पत्रलेखकास वाटते ती अनाठायीं आहे. मीं त्या मित्रांना असें असणें शक्य आहे म्हणून म्हटलें, तेव्हां त्यांनीं स्पष्टपणें इन्कार केला. तिकडे परत जाण्यासाठीं सुरळित मार्ग तयार करण्यानें कांहीं बिघडेल असें नाहीं वाटत. पाकिस्तानांत शीखांविरुद्ध आधिक जोरदार पूर्वग्रह आहेत, ही गोष्ट खरी; परंतु दोघांनीं बरोबरच तरलें पाहिजे किंवा बुडलें पाहिजे हें तितकेंच खरें. वाईट हेतू आपल्या मनांत नसले म्हणजे झालें. दोन कटवाल्यांत सन्मान्य भागीदारी असूं शकत नाहीं.

## अखंड हिंदुस्थानचे नागरिक

पूर्व पाकिस्तानांतील एक मित्र लिहितो : "अखंड भारताचा नागरिक म्हणून मी स्वतःला कसें जाहीर करूं ? एका भागाचें होणें म्हणजे दुसऱ्या भागापासून दुरावणें. कारण देश तर द्विखंड झाला आहे." कायदे जाणणारे पंडित कांहीं म्हणोत. मानवी मनावर ते सत्ता चालवूं शकत नाहींत. या मित्रानें स्वतःला जगाचें नागरिक म्हणूनहि उद्घोषिलें, तर कोण अटकाव कारणार आहे ? एवढी गोष्ट खरी, कीं अनेक राष्ट्रें त्यांच्या कायद्यांप्रमाणें त्याला यायला कदाचित् बंदी करतील, खचितच करतील. ज्यांनीं स्वतःला यंत्रवत् केलें नाहीं– अनेकांनीं असें केलें आहे– त्यांना कायदेशीर दर्जाची चिंता भासतां कामा नये. जोंवर नैतिक दर्जा भक्कम आहे, तोंवर चिंता नाहीं. तें तें राष्ट्र, तेथील जनता यांच्याविषयीं मनांत वाईट असूं नये म्हणजे झालें. एवढें पथ्य सांभाळलें पाहिजे. पाकिस्तान व हिंदुस्थान दोहोंचें नागरिकत्व सांगणाऱ्याला पाकिस्तानी मुसलमान व तेथील सरकार यांच्या-


नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

विषयीं मनांत वाईट बाळगतां येणार नाहीं. सर्वांनाच दुसऱ्याविषयीं असदिच्छा वाटूं लागली, तर त्यांतून युद्धच अखेर येणार. जो कोणी रहिवासी त्या त्या राष्ट्राचा द्रोह करून शत्रुराष्ट्राला मदत करील, तो देशद्रोही म्हणूनच जाहीर केला जाईल. निष्ठा विभागतां येत नसते.

## ९६

१६-१२-'४७.

## अनियंत्रणाचे परिणाम

श्री. व्रजकृष्ण चंडीवाल यांनीं नियंत्रणें जीं गेलीं आहेत, त्या बाबतींत कांहीं आंकडे मला दिले आहेत. मी ते तुम्हांला सांगणार आहें. गूळ रुपया शेर होता तो आठ आण्यांवर आला आहे. त्याचा भाव आणखीहि खालीं जाईल. माझ्या लहानपणीं एक आणा शेर गूळ होता. साखर ३४ रुपये मणावरून २४ रुपयें मणावर आली आहे. रुपयाला डाळी १४ छटाक मिळत त्या आतां १॥ शेर मिळूं लागल्या आहेत. चण्याचा भाव २४ वरून १८ रुपये मणावर आला आहे. गहूं काळ्या बाजारांत ३४ रुपये मण होता तो २४ रुपयांवर आला आहे. रूढ अर्थशास्त्रांत व किंमतीच्या चढउतारांच्या बाबतींत मला फारसें कळत नाहीं, असा माझ्यावर आरोप करण्यांत येतो नि तो बरोबर आहे. अज्ञानानेंच नियंत्रणें काढा म्हणून मी म्हणत होतों. माझ्या अज्ञानाचे परिणाम बिचाऱ्या जनतेला भोगावे लागले असते. परंतु परिणामावरून भीति खोटी ठरत आहे. नियंत्रणें उठवल्यानेंच गरिबांची स्थिति सुधारत आहे. नियंत्रणें दूर केल्यामुळें किती तरी अभिनंदनपत्रें मला येत आहेत. अनेक कारणांमुळें हीं अभिनंदनें मी स्वीकारूं शकत नाहीं. शिवाय नियंत्रणें जावींत म्हणून अनेकांचे प्रयत्न चालू होते. दलाल आणि उत्पादक स्वतःपेक्षां देशाचा विचार जर अधिक करतील, तर सर्व नियंत्रणें उठवणें एक अमिश्र आशीर्वादच ठरेल. धंदेवाले नीट वागणार नाहींत या संशयांतून सारी भीति जन्मली होती. उत्पादक आणि दलाल यांचाहि संशयात्म्यांना भरंवसा नव्हता. बहुसंख्य लोक जर स्वार्थी आणि बेपर्वा असतील, तर लोकशाही राज्य, पंचायती-राज्य कसें चालणार? सनदी नोकरांबरोबर इतर

असनदी सेवकांचाहि सरकारनें उपयोग करून घ्यावा. दोघांत फरक इतकाच, कीं सनदी नोकरांना बडा पगार असतो, दुसरे बिचारे स्वयंसेवक असतात. फसवतील, तर दोघांसहि कायद्याचा दंडक आहेच.

## सनदी नोकर नि त्यांचे पगार

सनदी नोकरांच्या लठ्ठ पगारांबद्दल अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. सनदी नोकरशाही एकदम दूर करतां येणार नाहीं. संख्या कमी झालीच आहे. उरलेल्यांना कामहि अधिक पडतें. म्हणून सरदारांनीं त्यांची पाठ थोपटली. ज्यांची पाठ थोपटायला हवी त्यांची थोपटली गेली, तर मला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. परंतु जे पगार राष्ट्रीय सभा पूर्वी अधिक मानीत असे, ते आज देण्यांत येत आहेत, हें माझ्या लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं हें खरें. खरे सनदी सेवक म्हणजे वास्तविक जनता होय. पूर्वी काँग्रेसचे लोक पगाराशिवायच काम करीत आले. आज जर एकादा काँग्रेसवाला पार्लमेंटरी सेक्रेटरी झाला, तर त्याला लठ्ठ पगार कशाला? पार्लमेंटरी सेक्रेटरींची आवश्यकता आहे कीं कसें, तें मला माहीत नाहीं. सरकारवर बड्या पगारांचे अधिक सेक्रेटरी लादण्याच्या बाबतींत काँग्रेस-पक्षानें दक्षता घ्यावी. काँग्रेसनें देशासमोर जो थोर आदर्श ठेवलेला आहे त्यापासून खालीं येणें बरें नव्हे. आज कोट्यवधि खजिना जवळ असतांना अधिकच काळजी घेण्याची जरूर आहे. उत्पन्न वाढत नसतां खर्च वाढूं देणें शहाणपणाचें होणार नाहीं. प्रत्येक धंदेवाल्यास खर्चापेक्षां जमा अधिक आहे ना, हें बघावें लागतें. हें मूलभूत तत्त्व विसरून स्वतंत्र हिंदुस्थानचा कारभार त्यांना चालवतां येणें शक्य वाटतें का? आज तुमच्याजवळ थोडा पैसा आहे. तो वाटेल तसा तुम्ही खर्चूं शकतां. परंतु हुशार धंदेवाईकाप्रमाणें न वागाल, तर ही पुंजी फार दिवस टिकणार नाहीं.

## ९७

१७-१२-'४७

## सक्तीनें कबजा घेणें

गांधीजी म्हणाले, पूर्व पंजाबांतील मित्राचें एक पत्र आलें आहे. त्याचें

तेथें घर होतें. त्याचा उद्योगधंदा पश्चिम पंजाबांत असे. इतरांप्रमाणें पश्चिम पंजाब सोडून त्यालाहि येणें भाग पडलें. परंतु पूर्व पंजाबांत आल्यावर एका सरकारी नोकरानें घराचा कब्जा घेतल्याचें त्याला आढळून आलें. त्यानें सारे प्रयत्न करून पाहिले. परंतु त्याला स्वतःचें घर खालीं करून मिळालें नाहीं. मोठ्या प्रयासानें दोन खोल्या त्याला मिळाल्या. पूर्व पंजाब-सरकार मला या बाबतींत मदत करील का? कीं मी दाद लागावी म्हणून न्याय-मंदिरांतच गेलें पाहिजे, असें या पत्रलेखकानें मला विचारलें आहे. माझ्या मतें स्वतःचें घर खालीं करून मिळावें म्हणून पूर्व पंजाब-सरकारनें त्याला मदत दिली पाहिजे. न्यायासाठीं न्यायमंदिरांत जायला नये लावूं. आणि घराचा कब्जा घेणारा ज्या अर्थी एक सरकारीच नोकर आहे, त्या अर्थी सरकारला तें जडहि नाहीं जाणार. निर्वासितांचीं घरें खालीं करून मिळावींत, त्याबरोबरच निर्वासितांनींहि बळजबरीनें दुसऱ्याच्या घरांचा कब्जा घेतलेला आहे याचीहि मीं आठवण करून दिली पाहिजे. रिकाम्या घरांचीं— विशेषतः मुसलमानांचीं असतील तर— कुलपें तोडून त्यांनीं तीं बळकावलीं अशा हकिकती आहेत. राष्ट्र वा व्यक्ति, कोणासहि असें वर्तन बरें नाहीं. रक्तपात, जाळपोळ, लुटालूट यानें का कधीं कोणाचा फायदा होऊं शकतो?

## गोड बोलणीं

मला इशारे देण्यांत येत आहेत, कीं पाकिस्तानांतील मुस्लिम पुढाऱ्यांनीं गोड गोड बोलणीं केलीं, तरी कोणीहि हिंदु वा शीख स्वाभिमानानें पाकिस्तानांत जगूं शकणार नाहीं. तेथें तो सुरक्षित राहणेंहि कठिण. कॉंग्रेसवाले नेहमीं सांगतात, कीं आमचें राष्ट्र जातिधर्मनिरपेक्ष आहे. येथें धर्म, पंथ, जात असा भेद नाहीं. परंतु किती तरी हिंदू आणि शीख या ब्रीदाच्या विरुद्ध वर्तन करीत आहेत. दोन्ही वसाहती ध्येयाला तिलांजलि देतील, तर दोघांचा विनाश आहे.

## परतीच्या अटी

एक मित्र पुढीलप्रमाणें लिहितो : "१७ ऑगस्टला परिस्थितीच्या दडपणामुळें आणि मोलवान् प्राण वांचावे म्हणून कुटुंबियांसह आम्हांला

लाहोर सोडणें भाग पडलें. दिल्लींत एका नातलगाकडे आधार घेणें नशिबीं आलें. आमचें लाहोरचें घर लुटलें गेलें. पाकिस्तान-सरकारनें आमचें दुकान एका मुसलमानास दिलें. दिल्लीच्या निर्वासित-मंत्र्यांना मीं या बाबतींत लिहिलें. ९–९–४७ रोजीं आमचा सारा माल सुरक्षितपणें इकडे यावा म्हणून मंत्र्यांना कळविलें. त्या वेळेपर्यंत दुकान नि माल सुरक्षित होता. परंतु पत्राची पोंचहि मिळाली नाहीं. पुढें घर लुटलें गेलें, दुकान एका मुसलमानास देण्यांत आलें, असें कळल्यावर आमचे प्रिय वडील लाहोरला गेले. एक डिसेंबरला ते गेले. ते पाकिस्तानच्या सरकारी अधिकाऱ्यांस भेटले. पाक-सरकार व हिंदी सरकार यांच्यामध्यें ज्यांना आपापल्या मूळच्या गांवीं जायचें असेल त्यांना आपापले उद्योगधंदे सुरू करण्यासाठीं सर्व प्रकारच्या सवलती देण्यांत येतील, संरक्षण मिळेल, असा जो करार झाला, तो करार आधार म्हणून घेऊन आमचे वडील पाक-सरकारला म्हणाले, 'आमचे कारखाने आमच्या ताब्यांत द्या. ते आम्हांला सुरू करूं दे.' परंतु आमच्या तेथील प्रतिनिधीकडून असें कळतें, कीं लाहोरच्या औद्योगिक डायरेक्टरनें असें कळवलें, कीं तुमचे कारखाने दहा निर्वासितांना समायिक-रीत्या चालवायला देण्यांत आले आहेत. (त्यांनाहि अजून ते मिळाले नाहींत.) तेव्हां हा निर्णय आतां बदलतां येणार नाहीं." मी या पत्राला उत्तरादाखल एवढेंच सांगेन, कीं पाकिस्तान-सरकारकडून निश्चित आश्वासन व व्यवस्था वगैरेंची सोय करतां, असें कळल्याखेरीज मीं कोणास परत जा असें म्हटलें नाहीं. हिंदू-शीख निर्वासितांनीं परत जावें म्हणून कांहीं मुसलमान खटपट करीत आहेत याचें मला समाधान आहे. परंतु परत जायला अजून योग्य वेळ आलेली नाहीं. सुरक्षितपणें जायला आतां हरकत नाहीं असें मला वाटलें, म्हणजे मी सांगेन. ज्या मुसलमान मित्रांचा मीं मागें उल्लेख केला ते व कदाचित् मीहि पहिल्या तुकडीबरोबर येऊं.

## पूर्व आफ्रिकेंतील हिंदीजन

आणि आतां पूर्व आफ्रिकेविषयीं. तेथील रेल्वे अनेक हालअपेष्टा सोसून शीखांनीं बांधली. शीख-जमात मोठी उद्योगी नि मेहनती. परंतु आतां तेथील विधिमंडळांत हिंदी लोकांच्या आगमनाविरुद्ध बिल आणण्यांत आलें

आहे. युरोपियनांच्याहि आधीं हिंदू, मुसलमान, शीख तेथें गेले. हातांत बंदूक घेऊन शोषणार्थ ते गेले नव्हते. ते उद्योगधंदेवाले होते. तेथील मूळच्या लोकांचे ते मित्र बनले. तेथील प्रदेशाच्या भरभराटीसाठीं ते श्रमले, मेहनत करते झाले. त्यांना उपटसुंभाप्रमाणें वागविणें अयुक्त आहे, अप्रशस्त आहे. पूर्व आफ्रिकेंतील हिंदी जनतेच्या प्रतिनिधींनीं पंडित नेहरूंना तार पाठविली आहे. तारेची एक प्रत त्यांनीं माझ्याकडेहि पाठविली आहे. हिंदी वसाहतवाल्यांच्या वतीनें हिंदी सरकारनें मध्यें पडावें, अशी त्यांनीं विनंति केली आहे. हिंदुस्थान स्वतंत्र आहे. स्वतःच्या देशबांधवांविरुद्ध केलेले कायदे हिंदुस्थान सहन करूं शकणार नाहीं. हिंदुस्थानची मैत्री गमावणें बरें नव्हे, ही गोष्ट पूर्व आफ्रिकन-सरकार ओळखील अशी मी आशा करतों. पूर्व आफ्रिकेंतील हिंदीजनांना शक्य ती सारी मदत पंडित नेहरू देतील, याची मला खात्री आहे.

९८

१८-१२-'४७

## समजुतींतील गोंधळ

एक पत्रलेखक लिहितो : " इंग्रजींतून आलेलीं पत्रें पाहून आपणांस दुःख होतें असें तुम्हीं प्रार्थनाप्रवचनांत म्हटल्याचें ऐकून आश्चर्य वाटलें. हिंदुस्थान सर्वांचा मित्र असें तुम्ही म्हणतां. मुसलमान आणि इंग्रज यांच्यासंबंधीं जर समान स्नेहाची भावना असेल, तर उर्दू रहावी म्हणून तुम्ही प्रयत्न करीत असतां इंग्रजीलाच कां दूर करूं बघतां ? " पत्रलेखकाचा हा प्रश्न वाचून मी चकितच झालों. इंग्रजी आंतरराष्ट्रीय भाषा आहे. ती हिंदुस्थानची राष्ट्रभाषा म्हणून कधींहि होणें शक्य नाहीं. उर्दू भाषा हिंदुस्थानांतच उत्क्रान्त झाली, नि ती एक हिंदी भाषा आहे याचा मला अभिमान वाटतो. मुसलमानी राजवटींत छावण्यांतून ही भाषा आरंभीं बोलली जात असे. लष्करांत हिंदी लोकच हिंदू नि मुसलमान बव्हंशीं असत. मुसलमानी सत्ताधीश एतद्देशीय झाले होते. मी बॅरिस्टर होऊन

हिंदुस्थानांत आलों तेव्हां अगदीं तरुण होतों. येथें दोन वर्षें राहून मी आफ्रिकेंत गेलों. तेथें वीस वर्षें राहून मी हिंदुस्थानांत परत आलों. येथें आल्यापासून मी सारखें उच्चरवानें सांगत आहे, कीं उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू नि मुसलमान जी भाषा बोलतात, जी नागरी वा उर्दूमधें लिहिली जाते, तीच राष्ट्रभाषा व्हायला हवी. तुलसीदासांची हीच भाषा. अरबी आणि पर्शियन शब्दांचा उपयोग करायला त्यांच्या काळीं त्यांना कमीपणाचें वाटलें नाहीं. अशी उत्क्रान्त होत गेलेली दोन्ही भाषांत लिहिली जाणारी ही भाषाच आन्तरप्रान्तीय अशी आहे. प्रान्तिक भाषांनाहि उत्तेजन नि साहाय्य मिळायला हवें. त्याहि समृद्ध व्हायला हव्यात. इंग्लिश भाषेनें सर्वच हिंदी भाषांचा विकास अडवून ठेवला आहे. राष्ट्रभाषेनें इंग्रजीला दूर केलेंच पाहिजे. इंग्रजी सत्तेच्या अस्ताबरोबर ती भाषाहि अस्तंगत व्हायला हवी. तिचें खरें स्पर्धातीत स्थान आंतरराष्ट्रीय वाहन ( माध्यम ) या नात्यानें आहे. उर्दू भाषा अरबी नि पर्शियन शब्दांनीं भरलेली आहे. त्या भाषांचें व्याकरणहि तिच्यांत कांहींसें आलें आहे. हिंदीची प्रवृत्ति अरबी नि पर्शियन शब्द वगळण्याकडे आहे. हिंदुस्थानी दोहोंचें मंगल मिश्रण आहे आणि अरबी वा पर्शियन भाषांमुळें तिच्या व्याकरणावरहि परिणाम होत नाहीं.

## केवळ अज्ञान

हा पत्रलेखक पुढें म्हणतो, 'जर सर तेजबहादूर सप्रू उर्दू विसरूं शकत नाहींत, तर त्याचप्रमाणें दाक्षिणात्यांनाहि इंग्रजी विसरून जाणें तसेंच कठिण नाहीं का ?' हा प्रश्नहि अज्ञानद्योतक आहे. मी मद्रासला अनेकवार गेलों आहें. महात्मा होण्यापूर्वी तिकडे एकदां गेलों असतां झटकावाल्याला माझें इंग्रजी कळेना. परंतु मोडक्यातोडक्या हिंदुस्थानींतून मी त्याला माझें म्हणणें समजवूं शकलों. उर्दू सर तेज यांची जशी मातृभाषा आहे, तशी का इंग्रजी तामील लोकांची आहे ? लालाजी माझे मित्र होते. शुद्ध हिंदींत कधीं बोलूं लागाल म्हणून लालाजींना मी चिडवीत असें. ते म्हणायचे मला नाहीं तें जमणार. आणि लालाजी कट्टे आर्यसमाजी होते. ते म्हणत उर्दू माझी मातृभाषा आहे. त्या भाषेंत बोलूनच मी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करूं शकतों. मी हिंदी

साहित्य-संमेलनाचा दोनदां अध्यक्ष झालों होतों. ज्या प्रकारें राष्ट्रभाषेची मी व्याख्या करीत असें, त्या प्रकारच्या राष्ट्रभाषेच्या माझ्या जोरदार प्रसाराचें ते त्या वेळेस स्वागत करीत असत. मग आजच कां त्याचा राग येतो लोकांना? हिंदी नि उर्दू यांचें मधुर मिश्रण करा असें मी म्हणतों, म्हणून का मी कमी हिंदु किंवा कमी हिंदी होतों ?

## धर्माचा इन्कार

अजमीरला झालेल्या दंगलीमुळें मी दुःखी आहें. हिंदी भागांतील मुसलमानांना मारून किंवा हांकलून हिंदुधर्म वांचेल असें का त्यांना वाटतें ? उर्दू लिपि नि भाषा वगळून अखिल भारतीय राष्ट्रभाषा वाढवतां येईल अशी का त्यांना आशा आहे ? मी या मताचा कधींच होणें शक्य नाहीं. मी मेल्यावर माझे शब्द तुम्हांला आवडतील. सारे धर्म शान्तीनें नि भलेपणानें रहा म्हणून शिकवतात. असहिष्णुता म्हणजे धर्माचा अभाव, धर्माचा इन्कार.

## ९९

१९-१२-'४७

## गुरगांव जिल्ह्यांतील एका खेड्याला भेट

गांधीजी म्हणाले, मी मेओ लोकांना भेटायला गेलों होतों. त्यांना आज घर ना दार. अलवार नि भरतपूर येथून पुष्कळांना हांकलून देण्यांत आलें आहे. कांहीं पाकिस्तानकडे गेले. जावें कीं रहावें अशा अनिश्चित स्थितींत कांहीं आहेत. माझ्याबरोबर डॉ. गोपीचंद भार्गव होते. ज्यांना रहायचें असेल त्यांना राहण्याचा पूर्ण हक्क आहे, असें त्यानीं त्यांना आश्वासन दिलें आहे. ते त्यांना म्हणाले, तुमचें वित्त नि जीवित सांभाळण्यासाठीं सरकार सारें कांहीं करील. लोकांची संपूर्णपणें अदलाबदल करायला मी कधींच संमत होणें शक्य नाहीं. लाखों लोक, स्त्रिया, मुलें यांना घरेंदारें सोडून जावें लागणें राक्षसी आहे. आज समोर भीषण आपत्ती असतांना कोणी अत्याचार सुरू केला याची चर्चा करणें विफल आहे, अप्रस्तुत आहे. अशा हिशेबीपणानें शान्ति येत नसते. ज्यांना स्वेच्छेनें पाकिस्तानांत जायचें

असेल ते सुखानें जाऊं शकतात. त्यांना कोणी अडथळा नाहीं करणार. त्याचप्रमाणें कोणी जाण्याची त्यांना सक्तीहि करूं शकणार नाहीं. मेओ लढवय्ये आहेत. कोणी म्हणतात, कीं ते गुन्हेगार जातीप्रमाणें आहेत. समजा, हा आरोपहि खरा असला, तरी राष्ट्र त्यांना हद्दपार करूं शकत नाहीं. योग्य नागरिक बनण्यासाठीं त्यांचें मन वळविणें, त्या हेतूनें त्यांची सुधारणा करणें, हा खरा मार्ग.

## किंमती आणि निर्नियंत्रण

एक मित्र म्हणाला, "मी जेथें राहतों तेथें नियंत्रणें जातांच साखरेची किंमत वाढली." परंतु अन्यत्र किंमती कमी झाल्याचें वृत्त आहे. स्थानिक वाढीला स्थानिक कारण असलें पाहिजे.

## पेट्रोलवर नियंत्रण

योग्य वांटपाच्या आड वाहतुकींतील अडचणी येतात. डॉ. मथाई तरी काय करणार? कोळसा व डब्बे यांचा तुटवडा आहे. शक्य तितक्या लौकर हा तुटवडा दूर व्हावा म्हणून मंत्र्यांची खटपट आहे. पूर्वीं रेल्वे नव्हत्या. तेव्हांहि हिंदुस्थान व्यापारउद्योग चालवीतच होता. परंतु आज रेल्वे आहेत, आणि वाहतुकीच्या साधनांचा खराखुरा तुटवडाहि आहे. रेल्वे-वाहतुकीच्या ऐवजीं किंवा तिला जोड म्हणून दुसरें कोणतें साधन? डोळ्यांसमोर एकदम मोटारवाहतुक येते. परंतु पेट्रोल नसेल, तर तीहि अशक्य. म्हणून पेट्रोल-वरचें नियंत्रण दूर करायला हवें. तें कां कठिण वाटतें मला समजत नाहीं. अर्धवट कोणतेंहि धोरण बरें नाहीं. जर नियंत्रणें जायचीं असतील, तर पेट्रोल-वरचें जायला हवें. पेट्रोल कांहीं प्रत्येकाला नाहीं लागणार. सरकारनें स्वतः-च्या गरजेपुरतें राखून ठेवावें. काळ्या बाजारांत दिवसाढवळ्या पेट्रोल विकत मिळतें. मोटार-वाहतुक जर सहजप्राप्त झाली, तर मिठाच्या किंमतींत वाढ होणार नाहीं. मिठाची पैदास चांगली आहे; परंतु वाहतुकीची अडचण आड येते, असें मला सांगण्यांत आलें.

## संमिश्र खत

अन्नाचा तुटवडा अन्नोत्पादनच कमी होतें म्हणून आहे. योग्य खतानें

उत्पादन वाढण्याची चांगलीच शक्यता आहे. कृत्रिम खतें जमिनीच्या कसाला अहितकारक ठरतात असें मला सांगण्यांत आलें. श्रीमती मीराबेन या आज किसान बनल्या आहेत. गुरांढोरांवर, विशेषतः गायींवर, सर्व मानवांवरहि त्यांचें प्रेम आहे. दिल्लींत या खतासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं त्यांनीं एक बैठक भरविली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार तारासिंग इत्यादींनीं त्यांत भाग घेतला होता. तीन दिवसांच्या विचारविनिमयानंतर कांहीं निर्णयावर मंडळी आली. त्यांनीं ठराव मंजूर केले आहेत. गायीगुरांचें शेण, मानवी मलमूत्र व इतर केरकचरा यांपासून खत कसें तयार करावें याचे मार्ग नि उपाय त्यांनीं दाखविले आहेत. या संमिश्र खताला वाईट घाण येत नाहीं. लाखों रुपयांची बचत होऊन जमिनीचा कस कमी होऊं न देतां वाढेल. या बैठकींत भाग घेणाऱ्यांसमोर अधिक उत्पादनाची एकच दृष्टि होती. आज मीराबेन हृषीकेशला परत गेल्या. गायीगुरांची अवलाद सुधारणें, हिंदुस्थानभर हें संमिश्र खत सर्वत्र केलें जावें या कामांत त्या गुंतलेल्या आहेत. जनतेनें सहकार्य केलें, तरच हें अवघड काम सफळ होईल.

## १००

२०-१२-'४७

# भीति सोडा

दिल्लींत अल्प प्रमाणांत कां होईना, पुन्हां अत्याचारानें डोकें वर काढलें म्हणून गांधीजींना दुःख होत होतें. ते म्हणाले, दिल्लींतील हिंदू आणि शीख किंवा पाकिस्तानहून आलेले दुःखित यांनीं जर मुसलमानांना येथें नाहींच राहूं द्यायचें असें ठरवलें असेल, तर त्यांनीं तसें निर्भयपणें जाहीर करावें, उघड सांगावें. सरकारनेंहि जाहीर करावें, कीं आपद्ग्रस्त मुसलमानांना रक्षण देणें अशक्य आहे. सरकारनें असें जाहीर करणें म्हणजे दिवाळखोरी जाहीर करणें होय. हा रोग फैलावला तर हिंदु आणि शीख धर्मांचें त्यांत मरण आहे. त्याचप्रमाणें हिंदू आणि शीख यांना नाहींच राहूं द्यायचें असें जर पाकिस्ताननेंहि निर्धारिलें असेल, तर हिंदुस्थानांतून मुस्लिम धर्म नाहींसा होईल. सर्वांनीं भीतीचा त्याग करावा असें माझें सांगणें आहे.

अप्रत्यक्ष मार्गानें दुसऱ्यास जायला भाग पाडणें हा भ्याडपणा आहे. मुसलमान वाईट असतील, तर हिंदू आणि शीखांचा चांगुलपणा त्यांना चांगलें करील. मीराबाईचें आतां जें भजन ऐकलेंत त्यांत काय होतें? मीरा म्हणते, 'प्रभूचा भक्त पाहून मी सुखावतें, अभक्त पाहून मी दुःखी होतें. दैवी माणसांच्या दर्शनानें मी दैवत्वाचा अनुभव घेतें.' वाईट माणसांना सुधारणें हा त्यांच्याजवळ वागण्याचा मार्ग आहे. त्यांना घालवणें किंवा ठार मारणें हा नव्हे.

## ग्रामोद्योग

सहा ते तेरा तारखेपर्यंत हरिजन-वस्तींत ज्या अनेक बैठका झाल्या, त्यांत अखिल भारतीय ग्रामोद्योग-संघाचीहि झाली. मीं तिच्यासंबंधीं फारसें सांगितलें नाहीं. चरखा हा ग्रामीण जीवनाचा– मूठभर शहरांसाठीं कदाचित् नसला– तरी सूर्य आहे, असें मी म्हणत आलों आहें. नाना ग्रामोद्योग सूर्याभोंवतीं फिरणाऱ्या ग्रहोपग्रहांप्रमाणें आहेत. परंतु सूर्यच नसेल, तर ग्रहोपग्रह कोठें असणार? ग्रहोपग्रह नसतील तर सूर्यहि कोठें, असेंहि कदाचित् म्हणतां येईल. परंतु शास्त्रीय दृष्ट्या मी तसें विश्वासपूर्वक म्हणूं शकलों नाहीं, तरी खेड्यांच्या बाबतींत मी तसें म्हणूं शकतों. दिल्लीभोंवतीं किती तरी खेडीं आहेत. जर तेथील ग्रामोद्योग भरभराटले, तर खेडीं आणि दिल्ली शहर उभयतां एकमेकांच्या भरभराटीस हातभार लावतील. मग जातीय संघर्ष आठवणारहि नाहीं. भांडणाचा विचार करायला मग वेळच नसेल. दिल्लींतील व आसपासचे पुष्कळसे कारागीर मुसलमान आहेत असें ऐकतों. त्यांच्या जाण्यामुळें दिल्लींतील जीवनावर बराच परिणाम झाला आहे. पानिपतचे मुसलमान घोंगड्या करायचे, ब्लँकिटें बनवायचे. त्यांच्या जाण्यामुळें तें काम संपूर्णपणें बंद नसलें पडलें, तरी बरेंचसें अडून पडलें आहे. हिंदु-मुसलमानांचे किती तरी ठिकाणीं अलग अलग धंदे असत. परंतु दोघांच्या जाण्यामुळें हिंदुस्थान व पाकिस्तान उभयतांचें नुकसान होत आहे. जीवन निखळल्यासारखें झालें आहे.

## भांडवल आणि श्रम

मी काल संमिश्र खताविषयीं बोललों होतों. गुरांढोरांचें व माणसांचें

मलमूत्र केरकचऱ्यांत मिसळल्यानें सुवर्णखत तयार होतें म्हणून मीं म्हटलें. हें खत स्वतःच मौलवान् व किंमती वस्तु आहे. तें वापरल्यानें जमिनीचा कस वाढतो. हें खत तयार करणें हा एक महान् ग्रामोद्योग आहे. परंतु सर्व ग्रामोद्योगांप्रमाणें ह्या धंद्यांतहि लाखों खेड्यांतील कोट्यवधि लोक सहकार्य न करतील, तर दृश्य परिणाम कसा दिसणार? भांडवल आणि श्रम यांतील हा महत्त्वाचा नि मूलभूत फरक आहे. भांडवल स्वतः वाढण्यासाठीं थोड्यांच्या श्रमांचें शोषण करीत असतें. परंतु कोट्यवधि लोकांचे संयुक्त श्रम जर नीट वापरले गेले, तर आपोआप त्या सर्वांची संपत्ति वाढते. खरी लोकशाही, खरें पंचायत-राज्य यांत आहे. या विराट् विधायक कार्यावर सारी शक्ति एकत्रित न करतां हिडीस जातीय दंगलींतच सर्व शक्ति नि वेळ हिंदी लोक दवडणार असतील, तर दारू, व्यभिचार, जुगार यांत बरबटलेले यादव एकमेकांचे गळे कापून नष्ट झाले, तीच स्थिति यांचीहि होईल.

## १०१

२२-१२-'४७

## भ्रष्ट नका करूं

गांधीजी म्हणाले, येथून साधारण आठ-दहा मैलांवर मरोली येथें कुतुबुद्दीन बखत्यारकाकी चिस्तिसाहेब यांचा दरगा आहे. अजमीरच्या खालोखाल या स्थानाचें पावित्र्य आहे. दोन्ही जागीं मुसलमानच नव्हे, तर हिंदू आणि इतरहि मुसलमानेतर पूज्य भावनेनें हजारोंनीं जातात. गेल्या सप्टेंबरच्या आरंभीं हिंदूंचा क्रोध या जागेकडे वळला होता. तेथील आसपासच्या मुसलमानांस प्रिय स्थान सोडून जाणें भाग पडलें. जवळ-जवळ चार शतकें ते तेथें रहात आले आहेत. अजूनहि मुसलमान तेथें आले नाहींत. जरी दरग्याविषयीं त्यांना भक्ति-प्रेम असलें, तरी ते येत नाहींत, येऊं धजत नाहींत. ह्या दरग्याचें पूर्ववैभव त्याला प्राप्त करून देणें हें हिंदु-शीख यांचें, तेथील आधिकाऱ्यांचें, तद्वतच् मंत्र्यांचें कर्तव्य आहे.

असें करून त्यांनीं कलंक पुसून टाकावा. मी या पवित्र स्थानासंबंधीं जें बोलत आहें, तें दिल्ली व आसपासचा प्रदेश एवढेंच नव्हे, तर हिंदी संघराज्यांतील सर्वच मुसलमानांच्या पूजास्थानांसंबंधीं आहे असें समजावें. लहान वा महान् पूजास्थानांची भ्रष्टता सहन केली जाणार नाहीं, ही गोष्ट दोन्ही वसाहत-सरकारांनीं बहुसंख्य जमातीस स्वच्छ सांगून ठेवावी. अजून असें केलें नसेल, तर आतां तरी करावें. उशीर न लावतां या स्थानांची झालेली नुकसानभरपाई करण्यांत यावी.

## हिंदी संघराज्यांतील मुसलमानांचें कर्तव्य

कराचींत नुकतीच मुस्लिम लीगची बैठक भरली होती. तेथें कांहीं निर्णय घेतले गेले. मौलाना अबुल कलम आझाद यांच्या आदेशानुसार लखनौसहि एक बैठक व्हायची आहे. मुस्लिम लीगचे सभासद असलेले मुसलमान मला विचारीत आहेत, कीं आमचें कर्तव्य काय? आम्हीं मुस्लिम लीगचे सभासद असूनहि लखनौ-बैठकीस हजर रहावें का? येथें हजर राहून पुन्हां मद्रासला भरणाऱ्या लीगच्या परिषदेसहि हजर रहायचें का? हिंदी संघराज्यांतील मुस्लिम लीगच्या सभासदांनीं अतःपर कोणती वृत्ति स्वीकारावी? माझें असें सांगणें, कीं जाहीर रीतीनें किंवा मुद्दाम त्यांना लखनौस आमंत्रण असेल, तर त्यांनीं हजर रहावें. नंतरच्या मद्रासेस भरणाऱ्या सभेसहि त्यांनीं जावें. प्रत्येक ठिकाणीं स्वतःचे विचार त्यांनीं निर्भयपणें आणि खुल्या दिलानें मांडावे. हिंदी संघराज्यांतील मुसलमान अल्पसंख्य आहेत. पाकिस्तानांतील बहुसंख्य मुसलमानांचें रक्षण आतां त्यांना नाहीं. परंतु जर गेल्या ३० वर्षांतील अहिंसेचें तंत्र ते आत्मसात् करतील, तर त्यांना भय नाहीं, त्यांचें नुकसान नाहीं. अल्पसंख्य लोक किती कां कमी असेनात, त्यांना स्वतःची अब्रू, स्वतःचें सारें प्रिय नि जवळचें यांचें रक्षण करण्याच्या बाबतींत कधींहि भीति वाटतां कामा नये, इतकें त्यांच्या लक्षांत आलें तरी पुरें. हें लक्षांत यायला अहिंसेवर श्रद्धाच हवी असें नाहीं. ईश्वर आणि त्याची प्रतिकृति जो मानव यांचें स्वरूप जर नीट ध्यानांत आलें, तर जगांतील कोणतीहि शक्ति आपली अब्रू हिरावूं शकणार नाहीं. आपणच आपली अब्रू जायला कारणीभूत होऊं शकूं. ट्रान्स्वालच्या बलाढ्य सरकारशीं

मीं झगडत असतांना जोहान्स्बर्ग येथील एक प्रिय इंग्रज मित्र मला म्हणाला, "मी अल्पसंख्य जमातीशीं नेहमीं मित्रभाव ठेवतों. त्यांची बाजू घेतों, कारण ते क्वचितच् चूक असतात. आणि त्यांची चूकच होत असली, तर त्यांना परावृत्त करणेंहि कठिण नाहीं जात. परंतु बहुसंख्य जमातीला सत्तेचा अहंकार असतो. त्यांना त्यांच्या चुकी-पासून परावृत्त करणें कठिण जातें. हा मित्र बोलला तें एक थोर सत्य आहे. जर बहुसंख्य जमात याचा आणखी अर्थ विशिष्ट संघटित गटाच्याच हातीं मारक शस्त्रें असणें असा असेल, तर या मित्राचें म्हणणें खरें नाहीं का? मूठभर इंग्रज लोक हातांत शस्त्र असल्यामुळें येथें जणूं बहुसंख्य झाले आणि हिंदी जनता हातांत शस्त्र नसल्यामुळें आणि असतें तरी तें कसें वापरायचें हें माहीत नसल्यामुळें त्या इंग्रजांची गुलाम झाली. या देशांत इंग्रजी सत्ता चालत होती. तिच्यापासून हिंदू आणि मुसलमान यांनीं कांहींच धडा घेतला नाहीं, ही किती दुःखाची गोष्ट! हिंदी संघराज्यांतील मुसलमानांना पूर्वेकडे नि पश्चिमेकडे आपलें बहुमत आहे याचा खोटा अभिमान होता. परंतु आज त्यांच्या डोळ्यांवरची ही धुंदी उतरलेली आहे. अल्पसंख्य असण्यांतील गुण जर त्यांच्या ध्यानांत येईल, तर इस्लाममधील सर्वोत्कृष्ट भाग ते आपल्या आचरणांत आणूं शकतील. महंमद पैगंबर मक्केंत होते, त्याच वेळेस मुसलमान-धर्मानें जास्तींत जास्त चांगुलपणा जगास दिलेला आहे. त्यांनीं हें विसरूं नये. कॉन्स्टंटाईन बादशहा झाला आणि ख्रिस्ती धर्माचें तेजहि कमी होऊं लागलें. परंतु मी हा मुद्दा वाढवूं इच्छीत नाहीं. मी जें सांगत आहें, तें या गोष्टीवर माझी आत्यंतिक श्रद्धा आहे म्हणून. जर मुसलमानांजवळ माझी श्रद्धा नसेल, तर ते माझा सल्ला बेशक फेंकून देऊं शकतात.

## कॉंग्रेसचे असा

माझ्या मतें आतां मुसलमानांनीं कॉंग्रेसमधें सामील व्हायला तयार असायला हवें; परंतु निरपेक्ष समानतेच्या भूमिकेवरून आणि खुल्या दिलानें त्यांना आमंत्रण येईपर्यंत त्यांनीं आपण होऊन अर्ज नये करूं. तत्त्वतः तरी कॉंग्रेसजवळ अल्पसंख्य-बहुसंख्य ही दृष्टि नाहीं. तिच्याजवळ विशिष्ट धर्म नाहीं. असलाच, तर तो एक मानवतेचा. कॉंग्रेसला प्रत्येक नर-नारी समान

आहे. ही जातिधर्मनिरपेक्ष अशी राजकीय व राष्ट्रीय संघटना आहे. तिच्यांत हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारशी, ज्यू सारे समान आहेत. कॉंग्रेसला ध्येयानुरूप तितकें विशुद्ध वर्तन सदैव करतां आलें नाहीं, म्हणून ही मुख्यत्वें-करून सवर्ण हिंदूंचीच संघटना आहे असें त्यांना वाटूं लागलें. तें कांहीं असो. जोंपर्यंत आजची बेदिली आहे, मनावर जोंवर ताण आहे, तोंवर हिंदी मुसलमानांनीं धीरगंभीर पृथक्पणा ठेवावा. कॉंग्रेसला त्यांच्या सेवेची जरूर भासतांच ते कॉंग्रेसमध्यें जातील. दरम्यान ज्याप्रमाणें मी कॉंग्रेसचा आहें त्याप्रमाणें त्यांनींहि असावें. चार आण्यांचा सभासद नसतांहि कॉंग्रेसवर माझें वजन आहे. कारण द. आफ्रिकेंतून १९१५ मध्यें आल्यापासून मी तिची प्रामाणिकपणें सेवा करीत आलों आहें. प्रत्येक मुसलमानानेंहि यापुढें असें करावें. माझ्या सेवेप्रमाणेंच आपल्या सेवेचीहि कदर होत आहे, असें त्यांना आढळेल. आज प्रत्येक मुसलमान लीगचा म्हणूनच कॉंग्रेसचा शत्रु समजला जातो. जातीय विषापासून चार महिन्यांच्या अवधींत मुक्त होणें कठिण. दुर्दैवानें हिंदू, शीखहि जातीयतेच्या विषाला अमृत समजून वागूं लागले. हिंदी मुसलमानांचे ते शत्रू बनले आहेत आणि त्यांनीं बदला घेतला आहे. पाकिस्तानी मुसलमानांनींहि तेंच केलें. दोघांनींहि स्वतःला कलंकित केलें आहे. या विषारी वातावरणाच्या अतीत व्हा, असें अल्पसंख्य मुस्लिमांना माझें सांगणें आहे. मनांत कोणताहि किंतु न बाळगतां हिंदी संघराज्यांतील संपूर्ण नागरिक त्यांनीं व्हावें. आदर्श वर्तणूक दाखवून हिंदु शीखांच्या मनांतील विचारहीन गैरसमज त्यांनीं दूर करावे. या सर्वांचा निष्कर्ष हा, कीं ज्याप्रमाणें हिंदुमहासभा, शीखसभा, पारशी-सभा राजकीय संघटना म्हणून अतःपर राहूं शकणार नाहींत, तद्वतच मुस्लिम लीगहि राजकीय संघटना म्हणून नाहीं राहूं शकणार. धार्मिक सुधारणेसाठीं धार्मिक संस्था म्हणून त्या काम करूं शकतील. आपापल्या धर्मांतील उत्कृष्ट असेल तें शोधून तदनुरूप वागण्याची कोशीस करणें हें या संघटना करूं शकतील. तसें करतील, तर त्या संस्था जातीय विषापासून वातावरण मुक्त करूं शकतील; अधिक कल्याण कोण करीत आहे याची सात्त्विक चढाओढ त्या मग करूं शकतील. त्या परस्पर प्रेम स्नेह राखतील व शासनसंस्थेला, राष्ट्राला

मदत करतील. त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा–ते काँग्रेसमध्यें असोत वा नसोत–तिच्या द्वाराच पूर्ण होऊं शकेल. स्वतःच्या संघटनेंत जे असतील त्यांचाच फक्त काँग्रेस विचार करील, तर ती एक निवडणुका लढविणारी संस्था होईल. आजहि काँग्रेसमध्यें असे कितीसे लोक आहेत ? तरीहि ती आज अद्वितीय आहे. कोण तिची स्पर्धा करूं शकेल ? तिला हें स्थान सर्व राष्ट्रांची निरपवाद सेवा करण्याच्या दाव्यानें मिळालेलें आहे. गरिबांतील गरिबांची सेवा, हें तिचें ध्येय आहे.

## १०२

२३–१२–'४७

## प्रार्थनेची वेळ

एका मित्रानें चिठ्ठी पाठवली आहे, कीं 'वाढत्या थंडीमुळें प्रार्थनेची वेळ ५॥ ऐवजीं ५ करावी.' २१ डिसेंबरपासून दिवस तिळतिळ वाढूं लागतो. परंतु तुमची सर्वांची इच्छा प्रमाण. लौकर प्रार्थना असावी असें म्हणणाऱ्यांनीं हात वर करावे. बरेचजणांचे हात वर आहेत. विरोधी तर कोणीच नाहीं. ठीक तर. अर्धा तास प्रार्थना अलीकडे आणूं.

## भावलपूरचे मुसलमानेतर

आदल्या दिवशीं प्रार्थनेच्या वेळेस भावलपूरच्या कांहीं लोकांनीं "भावलपूरचे ७० हजार हिंदू नि शीख वांचवा" अशीं घोषवाक्यें असलेले फलक आणले होते. गांधीजी त्यांना उद्देशून म्हणाले, आज या बाबतींत दोन मित्र मला भेटले होते. भावलपूरच्या शीख नि हिंदू लोकांना सुरक्षितपणें घेऊन जाण्याची व्यवस्था होईपर्यंत गव्हर्नर जनरलांच्या दारांत उपवास करण्याचें आमच्या मनांत आहे असें ते म्हणाले. मीं त्यांना सांगितलें, कीं अशा मार्गाचा उपयोग नाहीं. आजकाल गव्हर्नर जनरलला मंत्रिमंडळ देईल तेवढीच सत्ता आहे. आणि ती सत्ताहि ते उपयोगांत आणणार नाहींत. ते खरे वीरपुरुष आहेत. त्यांनीं आपली सत्ता

बाजूला ठेवली आहे. परंतु भावलपूरहून हिंदू आणि शीख यांना आणण्याची तावडतोब व्यवस्था व्हायला हवी हें मलाहि पटतें. पाकिस्तानच्या बाहेर जेथें म्हणून त्यांची जायची इच्छा असेल, तेथें त्यांना पाठवण्याची व्यवस्था करणें हें तेथील नबाबाचें कर्तव्य आहे. मला वाटतें, कीं भावलपुरांत मुख्यतः शीख आहेत. तरीहि त्यांना नि हिंदूंना तेथें अपरंपार आपत्ती भोगाव्या लागत आहेत. या बाबतींत नबाबसाहेब जबाबदारी टाळूं शकत नाहींत. परंतु झालें तें झालें. शीख नि हिंदू यांच्या जाण्याची व्यवस्था होईपर्यंत त्यांच्या एका केसालाहि धक्का लागणार नाहीं असें जाहीर आश्वासन नबाबसाहेबांनीं द्यावें, अशी माझी त्यांना विनंति आहे. दरम्यान त्यांची नीट काळजी घेतली जावी.

## पाकिस्तानांतील निर्वासित

आजचा स्टेट्स्मन लिहितो :

" लाहोर तीन दिवस शीत-लाटेंत सांपडलें होतें. उष्णतामान ३४ ते ३६ च्या दरम्यान होतें. शनिवारीं सकाळीं पाऊस पडला. रविवारीं आणि आजहि पुन्हां पडला. हजारों निर्वासितांचे हाल विचारूं नका. आधींच अर्धपोटी. पुरेसें आंथरूण-पांघरूण नाहीं, अंगावरहि नीट कपडे नाहींत. निवारा नाहीं, आधार नाहीं. वरतीं आकाश नि खालीं धरित्री. मी ' माल ' भागांत काल फिरलों. रात्र निःस्तब्ध होती. या दुर्दैवी लोकांचें विव्हळणें, त्यांचें करुण आर्त स्वर मला ऐकूं येत होते. थोड्या दिवसांपूर्वीं कॉलराहि होता. ६ सप्टेंबरपासून आतांपर्यंत लाहोरांत २।। हजार कॉलऱ्यानें लागले. त्यांतील चौथा हिस्सा मृत्युमुखीं पडले असावेत. आणि आतां देवीची सांथ जोरांत आहे. दररोज सरासरी २० मरत आहेत. गेल्या तीन दिवसांत १२५ लोक देवीनें आजारी पडले, असें आरोग्याधिकाऱ्यांच्या कचेरींतील नोंदीवरून कळतें.

अति आरोग्यहीन परिस्थिति सर्वत्र असल्यामुळें सांथीचे रोग फैलावतात यांत आश्चर्य तें काय ?

मुरी आणि इतर ठिकाणांहून झाडूवाले आणण्यांत आले आहेत. परंतु आरोग्याधिकारी दुःखानें म्हणाले, कीं त्यांच्यापासून जास्तींत जास्त काम

आम्ही घेऊं शकलों नाहीं. शहरभर घाणीचे ढीग सांचले आहेत. शहरांतील दाट वस्तीच्या भागांतील रस्त्यांतून नि गल्लींतून जातांच अशी दुर्गंधी सुटते, कीं नाक धरणें भाग पडतें. जर लौकर आरोग्याची व्यवस्था करण्यांत आली नाहीं, साफसफाई झाली नाहीं, तर रोगराईला मोठ्या संख्येनें बळी पडावें लागेल."

गांधीजी म्हणाले, जरूर ती सेवा करण्यासाठीं निर्वासितांना नोकरांचाकरांची जरूर भासावी हें माझ्या मतें चूक आहे. निर्वासितांनींच हीं सारीं कामें करावीं. सर्व छावणीच्या वतीनें इतरहि कामें करावीं. आपल्या दुर्दैवांतूनहि त्यांनीं मंगल निर्मावें, दुर्दैवहि सार्थकीं लावावें. निर्वासितांना अन्न, वस्त्र, निवारा मिळतील अशी व्यवस्था उभय सरकारांनीं करणें त्यांचें कर्तव्य आहे. परंतु त्यांच्यासाठीं नोकरांचाकरांची फौज उभी करणें हें कांहीं कर्तव्य नाहीं. हिंदू असोत, शीख असोत, वा मुसलमान असोत, ज्याला हलकें काम म्हणतात त्याला कोणीहि नाक नये मुरडूं. मग तें संडास-सफाईचेंहि काम असलें म्हणून काय झालें? विशिष्ट जातीनेंच भंग्याचें काम करावें ही जी आपली चुकीची समजूत आहे, ती अतःपर दूर केलीच पाहिजे. पाकिस्तानांतील मुस्लिम निर्वासितांविषयीं मी इतकें सांगत आहें म्हणून श्रोत्यांनीं मला क्षमा करावी. मानवाला न शोभणारा भेद मी करूं शकत नाहीं.

## नौखालींतील बातमी

नौखालीहून श्री. प्यारेलाल आले आहेत. त्यांनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं तिकडे माझ्या मतें फार छान काम केलें आहे. माझ्या सांगण्यावरून प्राण धोक्यांत घालून ते तेथें राहिले. तेथील हिंदूंना यामुळें बरें वाटलें, धीरहि आला. हे स्वयंसेवक सर्वांचे मित्र आहेत. आणि त्यांना शान्ति नि सदिच्छा पुन्हां स्थापायचीं आहेत, याविषयीं मुसलमानांचीहि खात्री पटली. प्यारेलाल-जींनीं सांगितलेली एक गोष्ट मी तुम्हां सर्वांना सांगूं इच्छितों:

"दंगलीच्या वेळेस शाहपूर ही मोक्याची जागा होती. तेथूनच दंगल पेटली म्हणा ना. नौखालींतील गांधीजींच्या "करूं वा मरूं" मंडळाच्या वतीनें तेरा महिने मी येथें काम करीत होतों. आणि इतक्या दिवसांनंतर

पश्चात्तापाचें किंवा नुकसानभरपाईचें असें ज्याला म्हणतां येईल, असें कृत्य परवां मुसलमानांनीं केलें. एका स्थानिक धंदेवाल्या हिंदूचें घर उध्वस्त करण्यांत आलें होतें. त्या सामानानें त्याच जागीं एक मशीद उभारण्यांत आली होती. परंतु स्थानिक मुसलमानांनीं आपल्या हातांनीं ती मशीद दूर केली. तें सामान आणि ती जागा मूळच्या मालकास परत देण्यांत आलीं आहेत. स्थानिक वजनदार मुसलमानांनीं एक पत्रक काढलें आहे. त्यांत ते म्हणतात, हें कृत्य सदिच्छादर्शक आहे. हिंदूंनीं परत यावें याची ही खूण आहे." हें कृत्य बऱ्याचशा हृदयसंशोधनावांचून नाहीं झालें. अगदीं शेवटच्या घटकेसहि हिंदु-मुसलमानांची एक संयुक्त बैठक बोलावून तडजोड व्हावी म्हणून कोणते शान्तीचे मार्ग अवलंबावे, याची चर्चा करावी असें मुसलमानांतील कांहीं म्हणत होते. परंतु त्यांच्या लक्षांत आलें, कीं जेथें बहुसंख्य जमातीनेंच गुन्हा केलेला आहे, आणि त्यांनीं नुकसानभरपाई करून देण्याचा प्रश्न आहे, तेथें तडजोडीला जागा नाहीं. अल्पसंख्य लोकांनीं नुकसानभरपाई मागितली नाहीं, तरीहि ती करणें बहुसंख्य जनतेचें कर्तव्य आहे. मशीद दूर करायला लागण्यापूर्वीं प्रमुख मुसलमानांस मीं पुन्हां म्हटलें, अंतःकरणपूर्वक करीत असाल तर करा. नाहीं तर आणखी कांहीं दिवस ती मशीद तेथें असली, तरी चालेल. बाहेरचा फेरफार केला जात असतां, चुकीची दुरुस्ती केली जात असतां हृदयांतहि फरक पडायला हवा. तेथेंहि दुरुस्ती व्हायला हवी. बहुसंख्य लोकांची सदिच्छा त्या कर्माबरोबर हवी. मी जोंवर येथें आहे, तोंवर अधिकाऱ्यांना तुमच्यावर सक्ती करूं देणार नाहीं. मुसलमान मला म्हणाले, 'आम्ही अंतःकरणपूर्वक सारें करीत आहोंत. बिसमिल्ला म्हणून मशीद पाडण्याचें काम त्यांनीं आरंभिलें. स्थानिक मुसलमानांनीं दाखवलेल्या विवेकाला या गोष्टीचें श्रेय आहे. जिल्ह्यांतील अधिकारी विशेषतः जिल्हा-अधिकारी यांचे प्रयत्नहि कारणीभूत आहेत. जिल्हा-अधिकारी उभय जमातींत शान्ति नि सदिच्छा यावींत म्हणून अविश्रान्त खटपट करीत आहेत. याचा अर्थ असा नाहीं, कीं देव वर आहे आणि आतां नौखालीच्या जगांत सारें सत्यं शिवं आहे. जें काय लहानसहान झालें आहे, त्यामुळें आशा वाटते. जें बहुत करायचें राहिलें आहे, जें अद्याप हातांत

घ्यायचें आहे, सोडवायचें आहे. त्याला या अल्पारंभानें का होईना, उत्तेजन मिळतें एवढाच याचा अर्थ.

हिंदुस्थानांतील नि पाकिस्तानांतील सर्वांनीं जर या गोष्टीचें अनुकरण केलें, तर क्षणांत कायापालट होईल. प्रत्येकानें आपल्या धर्मांतील जें जें उत्कृष्ट आहे तदनुसार वागणें, इतर धर्म नि त्यांचे अनुयायी यांच्याविषयीं सद्भाव बाळगणें, ही मुख्य गोष्ट आहे.

## १०३

२४-१२-'४७

## ही का अहिंसा ?

अलीकडे अनेक शीख मला भेटायला येत असतात. मीं वर्तमानपत्रांतील कांहीं कात्रणेंहि पाहिलीं. मी शीखांचा शत्रु झालों आहें अशी सर्वसाधारण समजूत झाल्याचें दिसतें. त्यांनीं एरव्हीं माझी पर्वा केली नसती. परंतु हिंदुस्थानबाहेर माझ्या शब्दाला महत्त्व दिलें जातें म्हणून त्यांना चिंता. हिंदुस्थाननें आपलें स्वातंत्र्य अहिंसेनें मिळविलें आणि असें असेल, तर खरोखरच ती अपूर्व वस्तु आहे, असें बाहेरचें जग म्हणतें. असें असावें म्हणून मला किती वाटतें ! परंतु वस्तुस्थिति अशी नाहीं हें मागेंच मीं म्हटलें आहे. भ्याडांना, अश्रद्धावंतांना खरी अहिंसा आचरतां येणार नाहीं. जे शरीरानें अपंग आहेत त्यांना ईश्वरी कृपेनें सदैव अहिंसा आचरतां येणें शक्य आहे. हिंदी स्वातंत्र्याची लढायी अहिंसक होती असें मीपणानें मी मानीं; परंतु नंतरच्या घटनांनीं माझे डोळे उघडले. आमची अहिंसा ही दुर्बलांची होती. हिंदी लोक जर शूरपणानें अहिंसक असते, तर जीं गुन्हेगार कृत्यें त्यांनीं केलीं आहेत, तशीं ते करते ना. प्रल्हादाचें उदाहरण आपणांसमोर आहे. तो बारा वर्षांचा मुलगा; परंतु राजाच्या सत्तेविरुद्ध, पित्याच्या विरुद्ध तो एकटा उभा राहिला. एका ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणावर त्याचा विश्वास नव्हता.

### अनाठायीं राग

शीख मित्रांचा राग पाहून मला हंसू येतें. मीं न म्हटलेल्या अनेक गोष्टी

त्यांनीं मजवर लादल्या आहेत. मी हिंदू, शीख, मुसलमान यांत फरक नाहीं करीत. शीखांच्या मद्यपानावर आणि जीं भीषण कृत्यें त्यांनीं केलीं म्हणून सांगण्यांत येतें, त्यांवर मीं टीका केली. याचा अर्थ असा नव्हे, कीं सारे शीख असे वागले. किंवा हिंदू या गुन्ह्यांपासून अलिप्त आहेत असेंहि नाहीं. शीख ही शूराची जमात आहे. म्हणून मी त्यांच्यापासून अधिक अपेक्षितों. मीं त्यांचे दोष दाखविले त्याप्रमाणें मुक्तकंठानें त्यांच्या गुणांचीहि तारीफ केली आहे. केलेल्या क्रूर कृत्यांवर पांघरूण घालणें किंवा असें थोडें-फार व्हायचेंच असें म्हणणें म्हणजे शीखांचें शत्रु होणें होय. मला कोणी शत्रु नाहीं आणि मी असें करणार नाहीं. मी जें कांहीं बोललों, तें शीखांचा खरा मित्र म्हणून बोललों. ग्रंथसाहेबांतलि उदात्त शिकवणीशीं मी अपरिचित नाहीं. माझ्या म्हणण्यामुळें जग शीखांच्या बाबतींत गैरसमजूत करून घेईल, अशी शीख मित्रांना भीति वाटण्याचें कारण नाहीं.

## नाताळचें अभिनंदन

आणि उद्यां नाताळचा पहिला दिवस. हिंदूंची दिवाळी तसा ख्रिस्ती बंधूंचा नाताळ. दिवाळी असो वा नाताळ असो; मद्यपान, नाचरंग, ख्यालीखुशाली यांसाठीं हे सण नाहींत. हे पवित्र सण आहेत. या वेळेस हृदयसंशोधन करून पुढील वर्षी चांगलें वागण्याचा संकल्प करायचा असतो. मी हिंदुस्थानांतील नि बाहेरच्या सर्व ख्रिश्चन मित्रांचें अभिनंदन करतों. ख्रिस्ताची शिकवण आपल्या जीवनांत ते आणतील अशी आशा करतों. हिंदुस्थानांत ख्रिस्ती लोक अल्पसंख्य आहेत. हिंदू, शीख, मुसलमान कोणीहि त्यांच्याविषयीं मनांत असद्भाव बाळगूं नये. त्यांना हिंदुधर्मात किंवा शीख वा मुसलमान धर्मात आणण्याचें मनांत आणूं नये. अशा धर्मान्तरावर माझा विश्वास नाहीं. ख्रिस्ती लोकांनीं भले ख्रिस्ती असावें. मुसलमानांनीं चांगलें मुसलमान असावें; शीखांनीं, हिंदूंनीं भले शीख नि हिंदू असावें असें मला वाटतें. कोणतीहि परिस्थिति मग असो. हें खरें धर्मान्तर.

सरकार ख्रिस्ती धर्माला वा कोणत्याच धर्माला पुरस्कार देणार नसल्यामुळें हिंदुस्थानांतील शेंकडा पाउणशें चर्च बंद पडतील, असें वृत्तपत्रांत मीं

वाचलें. पैशानें धर्माची सेवा होते असें मी मानीत नाहीं. कृत्रिम आधार दूर झाला म्हणून खिस्ती बांधवांनीं उलट आनंदच मानावा. ईश्वर सर्वत्र आहे. दगडी इमारतीपेक्षां तुमचीं-आमचीं शरीरेंच प्रभूचीं खरीं मंदिरें आहेत. सामुदायिक प्रार्थनेसाठीं माझ्या मतें उत्कृष्ट जागा म्हणजे खालीं विशाल धरणी व वर अनंत आकाश हीच होय. सारें जग विरुद्ध असलें तरी प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माचें रक्षण करतां येईल.

## १०४

२५-१२-'४७

## काश्मीरचा सवाल

काश्मीरबाबत एकादें तटस्थ लवादमंडळ नेमलें जावें अशा प्रकारची सूचना वर्तमानपत्रांत मीं पाहिली. आपसांतले तंटे मिटवण्यासाठीं हिंद नि पाक सरकारें नेहमीं तिऱ्हाइतांवर विसंबून राहणार का? किती दिवस दोघेंजणें भांडत राहणार?

काश्मीरच्या विभागणीसंबंधींहि ऐकूं येतें. काश्मीरची फाळणी करूं पाहणें विचित्र आहे. हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडले गेले तेवढे पुरे. ईश्वरानें जो देश एक म्हणून निर्मिला त्याची फाळणी अशक्य असें वाटत होतें, परंतु ती फाळणी झाली आहे. कॉंग्रेस आणि लीग दोघांनींहि निरनिराळ्या दृष्टीनें कां होईना, तिला मान्यता दिली आहे. परंतु फाळणीचें हें काम असेंच आणखी पुढें चालवीत रहावें असा नव्हे त्याचा अर्थ. जर काश्मीरची फाळणी करायची, तर इतर संस्थानांचीहि कां नको? कोठें येणार अंत या गोष्टीला?

काश्मीरवर लुटारूंनीं आक्रमण केलें असें प्रथम सांगण्यांत येई. परंतु नंतर हळूहळू स्पष्ट होत गेलें, कीं या हल्ल्याच्या पाठीमागें पाकिस्तान आहे. म्हणून आज 'जमीनदार' नांवाच्या एका उर्दू पत्रांतील उतारा मला वाचून दाखविण्यांत आला. मुसलमानांनीं जिहादमधें सामील व्हावें, सैन्यांत दाखल व्हावें, म्हणून उघडपणें आवाहन केलेलें आहे. खिलापतीच्या वेळेस मौलाना झाफरुल्लाखानांशीं माझा परिचय झाला होता. त्या काळींहि त्यांना आपली

जीभ फारशी ताब्यांत ठेवतां येत नसे. हिंदू, शीख आणि मुसलमान हे कायमचे वैरी असावेत, असें त्यांचें म्हणणें आहे का ? संतापजनक परिस्थिति असली, तरी हिंदू आणि शीख यांनीं सूड घेऊं नये असें माझें सांगणें आहे.

काश्मीरवरील हल्ल्याच्या मागें पाकिस्तान आहे हें जवळजवळ सत्य आहे. काश्मीरच्या जनतेनें व तेथील महाराजानें त्या सुंदर दरीचें रक्षण करण्यासाठीं हांक मारली म्हणून हिंदी फौजा गेल्या आहेत. शेख अबदुल्ला हे काश्मीरचे खरे पुढारी मी मानतों. जो जो कोणी काश्मीरमधें जाऊन येतो, तो शेख अबदुल्लांना काश्मीरमधील मुसलमान आणि मूठभर मुसलमानेतरहि किती मानतात तें मला सांगतो. आजकालचा जमाना आतां असा आहे, कीं इंग्लंडमधील राजाप्रमाणें इकडील राजेरजवाड्यांनींहि अतःपर नामधारी राहिलें पाहिजे.

## जम्मू येथील घटना

जम्मू येथें किती तरी मुसलमानांची कत्तल झाली, आणि मुस्लिम मुलींचें अपहरण झालें म्हणून मीं ऐकलें. महाराजसाहेबांनीं ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. डोग्रा पलटणी त्यांच्या खास ताब्यांतील होत्या. अजून कांहीं ते केवळ सनदशीर महाराज झालेले नाहींत. म्हणून त्यांच्या कारकीर्दींत भल्याबुऱ्या होणाऱ्या सर्व कृत्यांची जिम्मेदारी त्यांच्यावरच आहे. त्यांनाच त्याबद्दल जबाबदार धरलें जाईल. शेख अबदुल्ला जम्मूस गेले होते. त्यांनीं वादळ शांत करण्याचे, भडकलेल्या भावना थंड करण्याचे प्रयत्न केले. जम्मूमधें जें कांहीं झालें आहे, त्यामुळें महाराज व त्यांचे मंत्री यांनीं दूर होऊन तेथील परिस्थिति सुधारावी म्हणून त्यांनीं शेख अबदुल्ला व काश्मीरची जनता यांना वाव द्यावा. हिंदुस्थानांतील मोठ्या नि महत्त्वाच्या संस्थानाचे अधिपति या नात्यानें महाराज असें पाऊल टाकतील, तर तें त्यांना फार शोभून दिसेल.

## पाकिस्तानचा अभिमान

जगांतील सर्वांत मोठी इस्लामी सत्ता म्हणून पाकिस्तानला अभिमान वाटत आहे. परंतु पाकिस्तानमधील प्रत्येक हिंदु नि शीख प्रजाजनाला जोंवर

न्याय मिळत नाहीं, तोंवर कशाचा अभिमान ? पाकिस्तानला जर थोर राष्ट्र व्हायचें असेल, तर त्याच्या नि हिंदच्या प्रतिनिधींनीं एकत्र बसावें. इतर प्रश्नांच्या बाबतींत त्यांनीं केलें, त्याचप्रमाणें काश्मीरचा प्रश्नहि त्यांनीं सोडवावा. आणि नाहीं सोडवतां आला, तर आपल्यांतूनच त्यांनीं भलीं सच्चीं माणसें निवडून त्यांचा सल्ला त्यांनीं कां नये ऐकूं ? पहिली गोष्ट म्हणजे उभय वसाहतींनीं आपल्या चुकांची मोकळेपणानें नि मनापासून कबुली द्यावी. अंतःकरणपूर्वक पश्चात्तापानें गुन्हा सौम्य होतो. आणि योग्य रीतीनें सारें समजून घेण्याची भूमिका तयार होते. काँग्रेस-सरकार जनतेच्याविरुद्ध राजेमहाराजांची बाजू कधींच घेणार नाहीं. जनतेचे केवळ विश्वस्त या दृष्टीनेंच तें त्यांच्याकडे पाहील.

## गझनीच्या महंमुदाला हांक

एका उर्दू मासिकांत एक कविता आली आहे. तें हिंदी संघराज्यांतीलच आहे. "आज सारे सोमनाथच्या मंदिराविषयीं बोलत आहेत. जुनागडमधील या घडामोडीचा बदला घेण्यासाठीं पुन्हां गझनीहून नवा गझनवी यायला हवा" अशा अर्थाची ती कविता आहे. मला ती वाचून अपार दुःख झालें. हिंदी संघराज्यांतील कोणीहि भला मुसलमान असे विचार मनांत कसे खेळवूं शकतो ? सोमनाथाचा जीर्णोद्धार करण्यांत स्वतःहि भाग घेण्यांत वास्तविक त्याला अभिमान कां वाटूं नये ? गझनीच्या महंमुदाच्या नांवाशीं जीं कृत्यें जोडलेलीं आहेत, त्याचा कोणाहि सच्चा मुसलमानास अभिमान वाटूं नये असें मला वाटतें. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या रक्षणार्थ मीं माझे प्राण ओलीस ठेवले आहेत. मी दिलेल्या शब्दापासून मागें फिरणार नाहीं. कारण वाइटाचीहि फेड चांगल्यानें करावी, यावर माझा विश्वास आहे. हिंदू आणि मुसलमान यांनीं विकारवश होऊं नये अशी माझी प्रार्थना आहे. परंतु मुसलमानांसहि माझें मनःपूर्वक सांगणें आहे, कीं दिलजमाई घडवून आणण्याचें कठिण काम त्यांनीं आणखी कठिण करूं नये. मीं या खोडसाळ कवितेचा उल्लेखहि केला नसता, परंतु एका वजनदार मासिकांत आल्यामुळें तसें करावें लागलें.



नगर वाचनालय सातारा

## १०५

२६–१२–'४७

गांधीजी म्हणाले, उद्यांची प्रार्थना येथून ११ मैल असणाऱ्या एका गांवीं होणार आहे. तेथें एक पंचायत स्थापन करण्यांत आली आहे. त्या भागांतील लोक प्रार्थनासभेंत भाग घ्यायला येणार आहेत, असें मला सागण्यांत आलें आहे.

## तिबिया कॉलेज

तुम्हांला तिबिया कॉलेजविषयीं थोडें सांगणार आहें. दिल्लीचें हें कॉलेज मरहूम हकीम अजमलखान यांनीं स्थापन केलें. हिंदु-मुस्लिम राजेरजवाड्यांनीं आणि लोकांनींहि या संस्थेच्या निधीस देणग्या दिल्या होत्या. परंतु १५ ऑगस्टपासून हिंदू आणि शीख मुसलमानांस शत्रु म्हणून मानूं लागले आहेत. दुर्दैव आहे. परंतु पूर्वी तसें नव्हतें. या तिबिया कॉलेजांत मुसलमान आणि मुसलमानेतर विद्यार्थीहि शिकत असत. कॉलेजच्या विश्वस्त-मंडळांत मुसलमान आणि मुसलमानेतर होते. मरहूम डॉ. अन्सारीहि त्यांपैकीं एक होते. आयुर्वेदिक पद्धतीनें शिकलेले, युनानी पद्धतीनें शिकलेले, तद्वतच पाश्चिमात्य वैद्यकीय शास्त्र शिकलेले विद्यार्थी येथून बाहेर पडत. आज त्या कॉलेजांत विद्यार्थी नाहींत. संस्था करोलबागेंत आहे. त्या भागांत मुसलमान जाऊं शकत नाहींत. तेथें जाणें म्हणजे मरणें. मुसलमानांना दिल्लींतील कोणता भाग आज सुरक्षित वाटेल हें शोधूनच काढायला हवें. आज कांहीं हिंदू मित्र मला भेटायला आले होते. या कॉलेजचें काय होणार त्यांनीं विचारलें. त्या कॉलेजची अशी दशा झालेली पाहून मला दुःख नि शरम वाटली. त्या बाबतींत जें कांहीं करतां येईल तें करण्याची मीं खटपट चालविलीच आहे. हिंदू आणि शीख यांनीं आपल्या नाशाचा मार्ग घेऊं नये म्हणून मी पुनःपुन्हां सांगत आहें. कारण जो दुसऱ्याच्या नाशाची खटपट करतो, त्याचा स्वतःचाच नाश होतो, हा जीवनाचा कायदाच आहे. स्वतःचा व स्वतःच्या धर्माचा नाश करून घेऊं नका.

## अपहृत स्त्रिया

आणि अपहृत स्त्रियांविषयीं पुन्हां सांगतों. मुसलमानांनीं किती तरी हजार हिंदू आणि शीख मुली पळविल्या आहेत. कांहीं थोड्यांचा पत्ता लागला आहे. परंतु किती तरी जणांची कांहीं माहिती नाहीं. ज्या कांहींचा पत्ता लागला, त्या परत येऊं इच्छीत नाहींत असें सांगण्यांत आलें. आपला समाज आपला स्वीकार करणार नाहीं अशी त्यांना भीति वाटते. आई-बाप, पति, मित्र आपणांकडे तिरस्कारानें पाहतील असें त्यांना वाटतें, माझ्या शब्दांत जी काहीं शक्ति आहे त्या सर्व शक्तीनिशीं मी सांगतों, कीं समाजानें या मुलींना सन्मानानें जवळ करावें. त्यांचा स्वीकार करावा. कांहीं गरोदर आहेत. तो त्यांचा अपराध नाहीं. तीं मुलें जन्मल्यावर इतर मुलांप्रमाणेंच वाढवावीं, प्रेमानें आदरानें संगोपावीं. मातेचा धर्म तोच. त्या मुलांचा वयांत आल्यावर आपला धर्म बदलावा असें त्या मुलांना वाटलें, तर तसें तीं करूं शकतील. जर अशी एकादी मुलगी माझ्याकडे आली, तर माझ्या जवळच्या इतर लोकांप्रमाणेंच मी तिला वागवीन. एकाद्या राक्षसाच्या पशुवृत्तीला बळी पडल्यामुळें या मुलींना बहिष्कृत करणें मानवाला न शोभणारें आहे. त्या मुली पतित नाहींत.

पतियाळा आणि काश्मीरमध्यें हिंदू नि शीख यांनीं पुष्कळ मुस्लीम मुलींनाहि पळवलें आहे, असें मला सांगण्यांत आलें आहे. कांहीं मुली, तर खानदान होत्या. या मुली जेथें असतील तेथवर माझा आवाज पोंचूं शकत असेल, तर त्या त्या अपराधी लोकांना माझें सांगणें आहे, कीं मुली उशीर न लावतां परत करा. त्या मुलींचा त्यांचे कुटुंबीय स्वीकार करतील याविषयीं मला शंका नाहीं.

## सौदा नको

एका मुसलमान पीराजवळ कांहीं हिंदू नि शीख मुली आहेत असें कळतें. पीरसाहेब म्हणतात, कीं "त्या मुलींना वाईट रीतीनें वागवण्यांत नाहीं येणार. परंतु मुस्लीम मुली परत आल्याखेरीज यांना परत करण्यांत येणार नाहीं." अशा गोष्टी का सौद्याच्या असतात ? दुसरी बाजू कांहींहि करो. अपहृत

मुलींचा शोध लावून त्यांना लौकरांत लौकर परत करणें हें उभय पक्षांचें कर्तव्य आहे. सन्मानार्ह नि सन्मान्य नागरिक म्हणून तेव्हांच जगतां येईल. नाहीं तर ४० कोटी गुंडांचें राष्ट्र म्हणून आपण होऊं. जो समाज असे गुन्हे चालू देतो, तिकडे डोकेझांक करतो, तो समाजहि अशाच गुंडांचा असेंच जग म्हणेल.

## १०६

२७-१२-'४७

## विचार, वाणी नि कृति यांत एकरूपता

शनिवारची आजची सायंप्रार्थना संमल्क गांवीं झाली. तेथें पंचायतघर बांधण्यांत आलें होतें. प्रवेशद्वारापाशीं गांधीजींना पुष्पहार घालण्यांत आले. मानपत्र देण्यांत आलें. प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, ही प्रार्थनासभा आहे, येथें पुष्पहार, मानपत्रें, टाळ्या यांना जागा नाहीं. या गोष्टी येथें विसंगत दिसतात. या गोष्टी वगळण्यांत आल्या असत्या, तर मला आनंद झाला असता. मानपत्रांत तुम्हीं सत्य नि अहिंसा यांचा उल्लेख केलात. परंतु जोंपर्यंत हे सद्गुण तुमच्या कृतींत येत नाहींत, तोंपर्यंत बोलण्यांत काय अर्थ ? कांहीं अर्थ नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यानें नुकसान आहे. द. आफ्रिकेंतून आल्यापासून हजारों गांवांना मीं भेटी दिल्या आहेत. हीं मानपत्रें कशीं करण्यांत येतात तें मला माहीत आहे. कोणी तरी लिहून देतो, कोणी तरी पोपटाप्रमाणें तें वाचून दाखवतो, नि सारें संपतें. विचार, उच्चार नि आचार यांत एकरूपता हवी. अल्पसंख्य लोकांना हांकलून लावणें किंवा त्यांना वाईट रीतीनें वागविणें हें अहिंसेच्या ब्रीदाशीं जमत नाहीं. स्वातंत्र्य म्हणजे स्वेच्छाचार नव्हे. खून करणें, असत्य बोलणें, यानें का प्रार्थना होईल, यानें का स्वातंत्र्याची सेवा होईल ?

## पंचायतीचें कर्तव्य

तुम्ही पंचायतघर बांधलेंत, मीं तुमचें अभिनंदन करतों. परंतु पंचायतीचें काम न कराल, तर हा सारा उद्योग व्यर्थ गेला असें होईल. तुमचा वेळ

नि तुमचे श्रम फुकट गेल्याप्रमाणें होतील. जगांतील विख्यात प्रवासी चीन आणि इतर देशांतून प्राचीन काळीं या देशांत येत. ते ज्ञानशोधासाठीं येत. प्रवासांतील हालअपेष्टा सहन करून येत. त्यांनीं लिहून ठेवलें आहे, कीं हिंदुस्थानांत चोरी नाहीं. लोक प्रामाणिक नि उद्योगी आहेत. त्यांच्या घरांना कुलपें लावावीं लागत नाहींत. आजच्याप्रमाणें अनेक जातीहि तेव्हां नव्हत्या. पंचायतीचें काम उद्योगधंदे पुन्हां सुरू करणें, प्रामाणिकपणा पुन्हां आणणें हें आहे. एका वर्षानें मीं विचारलें, तर निर्मळ अहवाल सादर कराल का? पंचायतीशिवाय दुसरें कोर्ट माहीत नाहीं असें दाखवाल का? भांडणें टाळायला शिकवणें, भांडणें झालींच, तर तीं मिटवायला शिकविणें हें पंचायतीचें काम आहे. खर्च न होतां अशानें न्याय लौकर मिळेल. मग पोलीस नकोत, लष्कर नको. मग तुम्ही श्री. रंधावासाहेबांस त्रास देणार नाहीं.

## गुरांढोरांची सुधारणा

पंचायतीनें गुरांढोरांची सुधारणाहि केली पाहिजे. अधिक दूध देणारीं गायीगुरें केलीं पाहिजेत. निष्काळजीपणामुळें आज गुरें ओझें वाटतात. गोवधासाठीं मुसलमानांना नांवें ठेवणें उघड अज्ञान आहे. हिंदूच गुरांना निर्दयपणें वागवून तिळतिळ मारतात असें माझें मत आहे. एकदम मारण्यापेक्षां तिळतिळ मारणें अधिकच वाईट.

## जमिनीचा कस वाढवणें

गांवांतील अन्नधान्याची पैदास वाढेल इकडेहि पंचायतीनें जरूर लक्ष पुरविलें पाहिजे. जमिनींत नीट खत घालून हें साध्य होईल. श्रीमती मीराबेन यांच्या प्रेरणेनें दिल्लींत नुकतीच संमिश्र खतांच्या विचारविनिमयासाठीं बैठक भरली होती. जर गुरांढोरांचें व माणसांचें मलमूत्र इतर केरकचऱ्याशीं नीट मिसळूं, तर किंमती खत तयार होतें. या खतानें कस सुधारतो. जमिनीचा मगदूर वाढतो. तसेंच गांव स्वच्छ राहील, लोक स्वच्छ वागतील, याचीहि दखल पंचायतीनें घ्यायला हवी. शरीरानें नि मनानें लोकांनीं निर्मळ आणि आरोग्यसंपन्न असलें पाहिजे.

## आदर्श व्हा

गांवांत बोलपटगृह नको. बोलपट शिक्षणाचें प्रभावी साधन होईल, असें लोक म्हणतात. तें कधीं काळीं कदाचित् खरें होईल. परंतु आजकालचे बोलपट किती हानि करून राहिले आहेत तें मला दिसत आहे. आपले देशी खेळ आहेत, ते खेळा. गांवांत नशा चढवणारीं पेयें नकोत, तसलीं औषधें नकोत. अजून तुमच्या गांवांत अस्पृश्यतेचा लवलेश असेल, तर तोहि काढून टाका. हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिस्ती, सर्वांनीं बहीणभावाप्रमाणें नांदावें. मीं सांगितल्याप्रमाणें वर्ताल, तर खरें स्वातंत्र्य तुम्ही दाखवाल; हिंदुस्थानांतून लोक तुमचा आदर्श गांव बघायला नि त्यापासून प्रेरणा घ्यायला येतील. तुमच्या प्रयत्नांना ईश्वर सफळ करो.

### १०७

२८-१२-'४७

## खुल्या मैदानांतील सभा

गांधीजी म्हणाले, हार्डिंग ग्रंथालयांत व्यापाऱ्यांच्या सभेला हजर राहण्यासाठीं मी गेलों होतों. इमारतीभोंवतीं लोकांचे थवे जमले होते. सभेचा दिवाणखाना तर लहान. त्यांत लोकसागर कसा सामावणार? सभेंत कोणी प्रसिद्ध मनुष्य येऊन बोलणार असेल, तर ती सभा उघड्यावर ठेवावी. मला तर अशा सभा आकाशाच्या छताखालीं भराव्या असें वाटतें. ज्यांना यायचें असेल ते येऊं शकतात. ते गडबड करतील आणि सभा होऊं न देतील, तर सभेचें काम होणार नाहीं. सभा बरखास्त करावी. लोक जर अशा खुल्या जागेंतील जीवनाशीं परिचित झाले, मोकळ्यावर राहण्याची संवय झाली, तर हजारोंसाठीं घरें शोधण्यांत जी माथाफोड करावी लागते तीहि वांचेल. बराचसा वेळ बाहेर उघड्यांत जाईल. किंवा उघड्यावर स्वतःच स्वतःसाठीं शाकारलेलीं घरें बांधावींत.

## नियंत्रणें दूर करणें

नियंत्रणें गेल्यामुळें रोज तारा नि पत्रें माझ्या अभिनंदनाचीं येत आहेत.

आश्चर्यकारक परिणाम झाला आहे आणि किंमती उतरल्या आहेत. अजून कापडावर नियंत्रण आहे. परंतु टॉवेल वगैरेंच्या किंमती कमी झाल्या आहेत असें मला सांगण्यांत आलें. नियंत्रणें जावींत असें मी म्हणें, त्या वेळेस कोट्यवधि लोकांचें मनोगतच मी बोलून दाखवीत आहें, ही गोष्ट धंदेवाल्यांना माहीत होती. म्हणून 'काळा बाजारी' माल बाहेर येत आहे. रास्त किंमतीला विकला जात आहे. साखरेचा सांठाहि भरपूर आहे म्हणून मला सांगण्यांत आलें. रुपयाला शेरभर मिळत आहे. कधीं १५ आणे, १४ आणेहि भाव होतो. नियंत्रणें गेल्यामुळें लोकांना बरेंच हायसें वाटत आहे असें मला सांगण्यांत येतें. नियंत्रणांच्या बाबतींत जें होत आहे, त्याचें श्रेय मी घेऊं शकत नाहीं. खरें श्रेय जनतेला आहे. त्यांची इच्छा मी बोलून दाखवीत होतों. माझ्या वैयक्तिक शब्दाला कांहीं किंमत असती, तर आजची हिडीस जातीय दंगल कधींच शमली असती. परंतु या बाबतींत ते मला अव्यवहारी आणि वेडा समजतात. परंतु ते चूक असून मीच बरोबर आहे हें मी जाणतों. भूतकाळांत जर अनेक प्रसंगीं मी बरोबर होतों, व्यवहारी होतों, तर आजच या जीवनमरणाच्या प्रश्नाच्या बाबतींत मी अव्यवहारी कसा ठरेन ? तुलसीदासांनीं म्हटलें आहे, कीं धर्माचें सार दया नि क्षमा हें आहे. मी तेंच नेमकें करा म्हणून नाहीं का सांगत ? असो. कापड, जळण, पेट्रोल यांच्यावरचीं नियंत्रणेंहि जायला हवींत. व्यापाऱ्यांच्या सभेंत कपड्यांवरील नियंत्रणाच्या बाबतींत मी बोललों. जळणाच्या बाबतींत म्हणायचें झालें, तर लोक जरुरीपेक्षां अधिक का जळण वापरणार आहेत ? नियंत्रण उठलें म्हणून कांहीं अधिक सर्पण नाहीं जाळणार. सर्पणावरील नियंत्रण गेलें, तर गरीबांना जड जाईल असें नाहीं मला वाटत. पेट्रोलवर नियंत्रण असल्यामुळें रस्ते-वाहतुक अडली आहे. त्यामुळें सर्वच बाजूंनीं कोंडमारा होत आहे. रेल्वे-वाहतुक पुरेशी नाहीं. नवीन रेल्वे, नवीन डब्बे हा दूरचा प्रश्न आहे. ती दूरची योजना. नवीन रेल्वेची जरुरीहि नाहीं. पेट्रोलवरचें नियंत्रण गेलें, तर मुळींच वाढीची जरूर वाटणार नाहीं. अन्न-धान्य, वस्त्र, मीठ हे पदार्थ झटकन् सर्वत्र जाऊं लागतांच त्यांच्या किंमती उतरतील. मिठावरचा कर तर गेला. परंतु मीठ पूर्वींपेक्षां महाग झालें आहे.

वाहतुकीची अडचण नि कंत्राटें देण्यांतील चुका यांमुळें मिठाची महर्गता. मूठभर मिठाचे कंत्राटदार अपरंचार नफा कमावीत आहेत. जनतेची त्यांना पर्वा नाहीं. हा अन्याय दूर केलाच पाहिजे. जेथें जेथें शक्य तेथें मीठ करायला लोकांना शिकविलें पाहिजे. आतां मीठ मुक्त असल्यामुळें तयार करणें कठिण जाऊं नये. माझ्या मतें तर अत्यंत सोपी अशी ही गोष्ट आहे.

## १०८

२९-१२-'४७

## हकीमसाहेबांचें स्मारक

हकीम अजमलखानांची काल पुण्यतिथि होती. हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारशी, ज्यू- सर्व हिंदी लोकांचें त्यांच्यावर प्रेम होतें. निष्ठावान् मुसलमान असूनहि त्यांनीं या सुंदर भूमीच्या सर्व रहिवाशांची समानतेनें सेवा केली. सुप्रसिद्ध तिबिया कॉलेज आणि हॉस्पिटल हेंच त्यांच्या श्रमांचें उत्तम स्मारक होय. या संस्थेंत आयुर्वेद, युनानी पद्धत आणि पाश्चिमात्य वैद्यकशास्त्र तिन्हींचें शिक्षण सर्व जातींच्या नि धर्मांच्या विद्यार्थ्यांस मिळत असे. हें जातिधर्मनिरपेक्ष विद्यादानाचें कामहि या संस्थेचा कल्पक नि संस्थापक पुरुष- तो कितीहि भला नि सर्वमान्य असला, तरी एक मुसलमान होता एवढ्यामुळेंच मला वाटतें, आज बंद पडलें आहे. ज्या देशभक्तांच्या मरणानें मागें आपण दुःखी झालों त्यांच्या स्मरणानें तरी या कॉलेजला पुनर्जीवन मिळावें. आजचें हिंदु-मुसलमान वैर त्यामुळें न शमलें, तरी निदान एवढें तरी व्हावें म्हणून किती किती मला वाटत आहे !

## खुल्या मैदानांतील सभा

आकाशाच्या छताखालीं जाहीर सभा नि कार्यक्रम व्हावेत म्हणून काल मीं म्हटलें. जर नेहमींची ही पद्धतच व्हायला हवी असेल, तर त्याची नीट योजना आंखली पाहिजे. मोठमोठ्या शहरांतून तसेच लहान शहरांतूनहि मोठमोठे मोकळे चौक या कामासाठीं असावेत. आपल्या संवयींतहि आमूलाग्र बदल व्हायला हवा. गडबड, आवाज, सारें बंद व्हायला हवें. संपूर्ण शांति

नि सुव्यवस्था राखली पाहिजे. आपण मग जरूर तेव्हांच आपसांत बोलूं, आवाज फार मोठा काढणार नाहीं. शेजाऱ्याच्या हक्कांची आपण जाणीव ठेवूं. आपण व्यक्तिशः किंवा आपला गट अत्यंत आदर्शपूर्वक वागेल. दुसऱ्यांच्या हक्कांवर आपण आक्रमण नाहीं करणार. याचा अर्थ कधीं कधीं फारच संयम राखावा लागेल. अशा प्रकारचें सार्वजनिक वर्तन आपलें होऊं लागलें, म्हणजे मग दिल्लीच्या भर वस्तींत जो लज्जास्पद आरडाओरडा, गोंधळ नि घाण दिसून येतात तसें कांहींएक दिसणार नाहीं. लोकांचे मोठ-मोठे जमावहि मग शांतीनें कोणाला धक्के न देतां जातील. हें अशक्य आहे असें कोणी समजूं नये. कांहीं लोकांनीं उत्कृष्टपणें कोठें तरी असा प्रारंभ केला पाहिजे. असें जीवन जगूं लागलों, तर किती वेळ नि उत्साह वांचेल याची कल्पना करा.

## पुनश्च कश्मीर

काश्मीर आणि त्यांचे महाराजसाहेब यांच्याविषयीं मी जें बोललों त्यासाठीं माझी कानउघाडणी होत आहे. परंतु असें करणाऱ्यांनीं माझें वक्तव्य काळजीपूर्वक वाचलें नाहीं, ही गोष्ट उघड आहे. मीं केवळ सल्ला दिला आहे. गरिबांतील गरीब मनुष्यहि सल्ला देऊं शकतो. कधीं कधीं कर्तव्य म्हणून असें करणें प्राप्त होतें. मलाहि कर्तव्य वाटलें म्हणून मी बोललों. कां बोललों? एकाच हेतूनें, कीं जगाच्या दृष्टीनें नि स्वतःच्या दृष्टीनें महाराजांची प्रतिष्ठा वाढावी म्हणून. त्यांची नि त्यांच्या संस्थानाची आज मोठीशी चांगली स्थिति नाहीं. ते हिंदु आहेत आणि त्यांच्या सत्तेखालीं मुसलमानांची मोठी संख्या आहे. हिंदूंच्या अन्यायी राजवटी-खालीं भरडल्या जाणाऱ्या मुसलमानांच्या बचावासाठीं आम्ही हें धर्मयुद्ध पुकारलें आहे, असें आक्रमक म्हणत आहेत. अत्यन्त आणीबाणीच्या प्रसंगीं महाराजसाहेबांनीं शेख अबदुल्ला यांना काम करण्यासाठीं बोलावलें आहे. महाराजांना जर शेख अबदुल्ला योग्य वाटत असतील, तर त्यांनीं त्यांना सर्व प्रकारें उत्तेजन दिलें पाहिजे. शेख अबदुल्लांना या कामाचा अनुभव नाहीं. मुसलमान आणि अल्पसंख्य यांना एकत्र नांदवण्याच्या

कामांत शेखसाहेब जर अपेशी झाले, तर आक्रमक काश्मीर घेतल्यावांचून राहणार नाहींत ही गोष्ट बाहेरच्या लोकांस, माझ्यासारख्यास तरी स्पष्ट दिसत आहे. हिंदी फौजा तें करूं शकतील असें मानणें चूक आहे. हल्ला परतवण्यासाठीं महाराजसाहेब आणि शेखसाहेब यांनीं गळ घातली म्हणून हिंदी फौजा गेल्या आहेत. महाराजसाहेबांनीं प्रसंगाला अनुरूप वागावें, इंग्लंडच्या राजाप्रमाणें नामधारी व्हावें, आपल्या डोग्रा पलटणींचा नि स्वतःच्या सत्तेचा उपयोग शेखसाहेब आणि त्यांचे संकटकालीन मंत्रिमंडळ सांगेल त्याप्रमाणें करावा, असा सल्ला मीं महाराजांना दिला यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे? सामीलनाम्याच्या अटी आहेत तशाच आहेत. सामीलनाम्यामुळें राजाचे कांहीं खास हक्क सांभाळण्यांत आले आहेत, कांहीं अधिक हक्क त्याला देण्यांतहि आले आहेत. मीं एक व्यक्ति या नात्यानें, राजानें आपले हक्क दूर सारावे किंवा त्यांना कमी मानावें आणि हिंदु राजा म्हणून जीं कर्तव्यें प्राप्त होत असतील तीं पार पाडावीं, असा सल्ला देण्याचें धाडस केलें आहे. मला जी हकिकत कळली आहे ती चूक असेल, तर त्या बाबतींतील माझी चूक तुम्ही दुरुस्त करूं शकतां; परंतु हिंदुधर्म नि हिंदु राजा यांच्यासंबंधींच्या माझ्या कल्पनाच तुम्हांस चूक वाटत असतील, तर प्रश्नच मिटला. मंत्रिमंडळाचा मुख्य या नात्यानें किंवा धर्मशील मुसलमान या नात्यानें शेखसाहेब चुकत असतील, तर त्यांनीं बाजूला सरून अधिक लायक माणसास जागा करून द्यावी. काश्मीरच्या भूमीवर आज इस्लाम आणि हिंदुधर्म यांचें वजनमाप होत आहे. दोन्ही धर्म तोलांत नीट उतरले, तर मुख्य सूत्रधारांच्या गळ्यांत यशोवैभवाची माळ पडल्याशिवाय राहणार नाहीं. उभयतांनाहि संयुक्त श्रेय मिळेल. माझी एकच आशा नि प्रार्थना आहे, कीं या अंधारमय भरतखंडाला काश्मीरनें दीपस्तंभाप्रमाणें व्हावें.

हें झालें महाराजसाहेब नि शेखसाहेबांविषयीं; परंतु पाकिस्तान नि हिंदुस्थान सरकारें एकत्र येऊन निःपक्षपाती हिंदी थोरांच्या मदतीनें आपला प्रश्न मिटवूं नाहीं का शकणार? हिंदुस्थानांतून निःपक्षपातीपणा का सारा नाहींसाच झाला? मला नाहीं असें वाटत.

## देणगी

निर्वासितांसाठीं मथुरेच्या एका भगिनीनें घोंगड्या घ्यायला ५० रुपयांची मनीऑर्डर पाठवली आहे. ती आपलें नांव मलाहि सांगूं इच्छीत नाहीं. प्रार्थनेच्या वेळीं मीं पोंचल्याचें जाहीर केल्यानें या भगिनीस समाधान होणार आहे. म्हणून आभारपूर्वक हें सांगत आहें.

## विचित्र विरोध

कांहीं संस्थानांच्या राजांनीं हिंदी संघराज्यांत विलीन व्हायची इच्छा दर्शविली आहे; परंतु आश्चर्य हें, कीं त्या संस्थानिकांच्या प्रजेच्या विरोधी तारा येत आहेत. जर एकाद्या राजाला किंवा जहागीरदाराला स्वतंत्रपणें नीट कारभार चालवतां येणार नाहीं असें वाटलें, अगदींच अलग तुटून गेल्याप्रमाणें वाटत असेल, तर त्याला सक्ती करायची कीं काय? अशा तऱ्हेच्या तारा पाठवणारांनीं उगीच तारांचा खर्च करूं नये. तारा पाठवणारांचा कांहीं तरी गैरसमज झाला आहे असें वाटतें. त्यांनीं प्रकाश मिळावा, मार्ग-दर्शन व्हावें, म्हणून गृहमंत्र्यास भेटावें.

## हिंदी मुसलमानांस सल्ला

पुष्कळ मुसलमान—विशेषतः पोस्ट आणि रेल्वे खात्यांतील— म्हणत आहेत, कीं आम्ही प्रचारार्थ तसे वागलों. आम्ही आतां फेरविचार करूं इच्छितों. हिंदविरुद्ध वर्तनाचा संशय आल्यावरून कांहीं मुसलमानांना कमी करण्यांत आलें असावें. या सर्वांबद्दल मला सहानुभूति वाटते. परंतु संशय आला तर क्षम्य आहे, मुसलमानांनीं त्यामुळें घुस्सा करूं नये. असा संशय घेणें कोणाच्या बाबतींत चुकीचेंहि कदाचित् असेल. मी माझा जुनाच अनुभवसिद्ध उपाय सांगणार. सरकारी खात्यांतून फारच थोड्या लोकांचा समावेश होऊं शकतो. सरकारी नोकरी मिळवणें हा कधींहि जीवनाचा हेतु नसावा. प्रामाणिकपणें उपजीविका मिळवणें हें जीवनाचें प्राप्तव्य असावें. कोणताहि मिळेल तो प्रामाणिक उद्योगधंदा करणें, कोणतेंहि काम करायला तयारी असणें, असें असलें म्हणजे कोठेंहि उपजीविका शक्य होईल. जोंवर जातीय विष शमलेलें नाहीं, त्याचा मनावर पगडा आहे, समाजपुरुषाच्या

अमलांत तें भिनलेलें आहे, तोंवर सरकारी नोकरीचाकरींतील तुकडे मिळवण्याचें ध्येय मुसलमानांनीं डोळ्यांसमोर न ठेवणें आवश्यक आहे व यांतच प्रतिष्ठाहि आहे. प्रामाणिक सेवेनें सत्ता मिळते. प्रत्यक्ष सत्ता प्राप्त झाल्यावर तिनें कोणी अधःपतितहि होतात. सत्तेसाठीं झगडणें तर शोभत नाहीं. परंतु त्याचबरोबर सरकारचेंहि हें निःसंदिग्ध कर्तव्य आहे, कीं सर्व बेकार स्त्री-पुरषांना त्यानें पोटापुरतें काम दिलें पाहिजे. मग बेकारांची संख्या किती कां असेना. शहाणपणानें हें केलें गेलें, तर सरकारला तोशीस न लागतां फायद्याचेंच ठरेल. एक गोष्ट मात्र आहे, कीं बेकार लोक शरीरानें काम करायला लायक असायला हेवत. त्यांनीं खुषीनें काम केलें पाहिजे. अळंटळं करणारे ते नसावेत.

१०९

३०-१२-'४७

## सामुदायिक शिस्त

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, प्रार्थना संपली म्हणजे लोक माझ्याभोंवतीं गर्दी करतात. सायंकाळीं शांतपणें फिरणेंहि ते मला अशक्यप्राय करतात. ज्यांना महान् राष्ट्र व्हावयाचें असेल, त्यांनीं सामुदायिक शिस्त जीवनांत आणणें अत्यंत आवश्यक आहे. लोक जर व्यवस्थितपणें वागायला शिकतील; तर लाखों लोकांच्या सभेंतहि गोंधळ होणार नाहीं. आरडा-ओरडा असणार नाहीं. 'लष्करी शिस्त' सर्वांनीं अंगीं आणावी असें मला वाटतें.

## भावलपूरमधील हिंदू आणि शीख

मला एक पत्र आलें आहे. मी पूर्वी जें म्हणालों होतों तेंच अधिक जोर देऊन मीं पुन्हां सांगावें, असें पत्रलेखक म्हणतो. मीं पूर्वी म्हटलें होतें, कीं भावलपूर संस्थानांतून ज्या हिंदू, शीख किंवा कोणाहि मुसलमानेतरास बाहेर जावयाचें असेल, त्याला जायला मोकळीक असावी. भावलपूरच्या

नबाबसाहेबांनीं जाहीर केलें आहे, कीं मीं मुसलमान आणि मुसलमानेतर असा फरक माझ्या प्रजाजनांत कधीं केला नाहीं. मी सर्वांना समान लेखतों. नबाबसाहेबांच्या या घोषणेचें मी स्वागत करतों. ज्यांना प्रदेश सोडून जावयाचें असेल, त्यांना सुरक्षित मार्ग नबाबसाहेब देतील, अशी मला आशा आहे. आपली मालमिळकत, चीजवस्त घेऊन जायची त्यांना मुभा असायला हवी. आणि यासाठीं त्यांना रेल्वेच्या खास सवलतीहि मिळतील असें त्यांनीं केलें पाहिले. जें झालें तें झालें. तें कांहीं अकृत करतां येणार नाहीं. परंतु नबाबसाहेबांनीं मीं आतां सांगितलें इतकें केलें, तरीहि सर्वांचे धन्यवाद मिळायला ते पात्र ठरतील.

## सिंधमधील मुसलमानेतर

मीं भावलपूरबद्दल जें म्हटलें तेंच सिंधलाहि लागू आहे. मिळालेल्या बातम्यांवरुन कोणाहि मुसलमानेतरांचें जीवित आज सिंधमध्यें सुरक्षित नाहीं. शिक्षणसंस्थांचाहि सरकारनें ताबा घेतला आहे. येणाऱ्या निर्वासितांची सोय व्हावी म्हणून सुखवस्तु, सन्मान्य गृहस्थांना जागा खालीं करायला सांगण्यांत येत आहे. दलितवर्गाला तर सिंध सोडायला परवानगीच देत नाहींत. कायदेआझम जीना, सिंधचे मुख्य मंत्री आणि त्यांचें मंत्रिमंडळ यांना माझी विनंति, कीं त्यांनीं ही परिस्थिति बदलावी. ज्यांना सिंध सोडायचा आहे, त्यांना मोकळेपणें जाऊं द्यावें. अल्पसंख्य लोकांचा विश्वास यामुळेंच राहील किंवा गेलेला पुन्हां येईल. सिंधमध्यें पुन्हां सारें स्थिरस्थावर झाल्यावर निघून गेलेल्यांनाहि कदाचित् पुन्हां यावें, आपल्या घरीं पुन्हां जावें असें वाटेल. परंतु सक्ती कराल, तर नेमका उलट परिणाम होईल. सक्तीनें जें करूं इच्छितां तेंच नेमकें साधणार नाहीं. मुसलमानेतरांना सर्वनिर्बंधमुक्त नागरिक म्हणून जर राहतां येत नसेल, तेथें केवळ गुलाम आणि हमाल म्हणूनच रहावें लागणार असेल, तर त्यानें पाकिस्तानची का प्रतिष्ठा वाढणार आहे ?

## विठ्ठलाचें मंदिर

एक तार आली आहे. पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिराबाबत ती आहे.

महाराष्ट्रांतील या मंदिराच्या विश्वस्तांनीं जरी हरिजनांना तें मोकळें करायचा निर्णय घेतला असला, तरी तेथील पुजारी मंडळींतील कांहींनीं या गोष्टीला आतां हरकत घेतली आहे. त्यांची संख्याहि कांहीं अगदींच कमी नाहीं. या बाबतींत अन्न-सत्याग्रहहि त्यांनीं सुरू केला आहे. या लोकांची ही वृत्ति असमंजसपणाची आहे. त्यांना असें करणें शोभत नाहीं. ही अ-हिंदु वृत्ति आहे. विठोबाचें मंदिर महाराष्ट्रांतील अत्यन्त पवित्र मंदिरांपैकीं एक आहे. योग्य तो विचार करूनच विश्वस्तांनीं तें हरिजनांना मोकळें करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळेस कोणी विरोध केला नाहीं. माझा आवाज अन्न-सत्याग्रह करणाऱ्यांच्या कांनीं गेला, तर मी त्यांना अत्यन्त नम्रपणें परंतु निर्धारानें सांगूं इच्छितों, कीं ते जें कांहीं करीत आहेत, त्यानें हिंदुधर्माचें नुकसान मात्र होईल. विष्णूचें मंदिर सर्वांना जवळ घेणारें. तेथें सर्वांना जागा. ईश्वराच्या समोर अशुद्धहि शुद्ध होतात. हरिजनांना प्रवेश दिल्यानें तें अपवित्र कसें होईल? हरिजनांना अपवित्र मानणें ही माझ्या मतें त्यांची नाहक निंदा आहे. सर्वच जातींत बरीं-वाईट माणसें असतात. हरिजनांतहि तसें असेल. जोंवर विठ्ठलाच्या मंदिरांत सारे– कोणत्याहि पंथाचे वा जातीचे असोत– निरपवाद जाऊं शकत नाहींत, तोंवर तें निर्जीव, चैतन्यहीन मंदिर आहे. सर्वांना मंदिर मोकळें ठेवाल, तेव्हांच खरी प्राणप्रतिष्ठापना होईल. म्हणून पुजाऱ्यांचा हा अन्नसत्याग्रह शुद्ध नसून माझ्या मतें अशुद्ध आहे. हें पाप आहे. आपली चूक ओळखून अन्नसत्याग्रह ते थांबवतील अशी मी आशा करतों.

## मुंबईतील नियंत्रण

मुंबईतील अन्नधान्य-वांटपाचे बाबतींत माझ्याकडे एक तक्रार आली आहे. मुंबईतील शिधावांटप-नियमानुसार आठवड्याचे फक्त एक शेर तांदूळ एका माणसाला मिळतात. मुंबईत राहणाऱ्या मद्रासी नि महाराष्ट्रीय जनतेची यामुळें मोठी कुचंबणा होते. निरुपाय म्हणून जरूर तितका तांदूळ त्यांनीं बाहेरून आणला, तर त्यांना जबर दंड केले जातात. वेळप्रसंगीं तुरुंग-वासहि नशिबीं येतो. माझें यावर इतकेंच सांगणें, कीं शहरांतील अन्नधान्य–

वांटप ताबडतोब बंद करा. शिधापद्धति रद्द करा. जर असें केलें जाईल, तर अन्नधान्याची टंचाई दूर होईल. धान्याच्या किंमतीहि खालीं येतील. नियंत्रणें काढल्यामुळें इतर वस्तूंचें झालें, तसें याबाबतहि होईल. अशानें अन्नधान्यांतील काळाबाजार, ज्यानें सरकारचें डोकें खाल्लें आहे– तोहि बंद होईल.

## ११०

३१-१२-'४७

## हृदयपालट नाहीं तोंवर परत नका फिरूं

गांधीजी म्हणाले, "आज कांहीं प्रश्नांचीं आधीं उत्तरें देतों. सिंधमध्येंहि जर हिंदू आणि शीखांना शान्तीनें नि सन्मानानें राहतां येत नाहीं, तर पश्चिम पंजाबांत परत जायला निर्वासितांना तुम्ही कसे सांगू शकतां, असा कांहींचा प्रश्न आहे. परंतु हा प्रश्न उद्भवूंच शकत नाहीं. कारण मीं नुकतेंच नाहीं कां सांगितलें, कीं कांहीं मुसलमान मित्रांनीं सुचवलें असलें, तरी सध्यांच पश्चिम पंजाबांत जा, असें निर्वासितांना मीं सांगू शकत नाहीं म्हणून? चित्रळ व आसपासच्या भागांतील २५१ माणसें येण्यासाठीं अडून बसलीं आहे. सिंधमध्यें तर हजारों इकडे येण्यासाठीं वाट पहात आहेत. ज्यांना यायचें असेल, त्या सर्वांची इकडे येण्याची व्यवस्था लावीपर्यंत हिंद-सरकार स्वस्थ बसणार नाहीं. हृदयपालट जोंवर नाहीं, तोंवर परत जाणें नाहीं. या बाबतींत प्रश्न विचारणाराचें व माझें एकमत आहे. दोन्ही वसाहती जोंवर नवीन पान उलटीत नाहींत, तोंवर निश्चित विनाश आहे. पश्चिम पाकिस्तानांतच प्रथम ही आग पेटली. नंतर हिंदी संघराज्यांतील कांहीं भागांनीं त्याचा सूड उगवला. कोणी किती केलें, कधीं केलें, हें आतां शोधण्यांत अर्थ नाहीं. जर दोहोंपैकीं एक वसाहत नीट वागूं लागेल, तर दुसरीवर त्याचा परिणाम होईल आणि दोघांचा बचाव होईल.

### निर्वासित परत जाईपर्यंत शान्ति नाहीं

या अदलाबदली कायम स्वरूपांत तशाच असाव्यात हें मला कधींहि

घटणार नाहीं. निर्वासितांची नीट व्यवस्था लागली, तरी आपल्या जुन्या घरांदारांची त्यांना आठवण आल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून ते ते लोक आपापल्या मूळच्या घरीं गेल्याविना खरी शान्ति मी कल्पूं शकत नाहीं.

## निर्वासित आणि प्रामाणिक मेहनत

निर्वासितांना काम द्या म्हणजे ते भीक मागणार नाहींत, असें हाच प्रश्नकारी लिहितो. सर्व निर्वासितांनीं कामाची मागणी करावी. मला त्यामुळें आनंदच वाटेल. सरकार तर या गोष्टीचें स्वागतच करील. कारण निर्वासितांच्या अन्न-वस्त्राची तरतूद करण्यांत कोट्यवधि रुपये खर्चीं पडत आहेत. प्रश्न विचारणारानें या कल्पनेचा प्रसार करावा. निर्वासित प्रामाणिक श्रम करूं लागतील, तर आजच्या प्रक्षुब्ध परिस्थितींत निश्चित सुधारणा दिसून येईल.

एका भगिनीनें एक तक्रार आणली आहे. ती आज घरीं नव्हती, तेवढ्यांत तिचें घर फोडून कांहीं शीख आंत जाऊन राहिले. एकाशिवाय सर्वांना अटक करण्यांत आली आहे. जर सारे प्रामाणिक श्रम करतील, निढळाच्या घामानें जगतील, तर अशा गोष्टी होणार नाहींत. जरी थोडी तकलीफ पडली, तरी श्रम करूनच प्रतिष्ठित नागरिक म्हणून नांदा.

## संपूर्ण प्रार्थना ध्वनिक्षेपित करा

एक पत्रलेखक सुचवितो, कीं प्रार्थनोत्तर भाषणच नव्हे, तर संपूर्ण प्रार्थना, भजन वगैरे सारेंच ध्वनिक्षेपित केलें जावें. अधिक लोकांना याचा फायदा मिळेल असें त्यांचें म्हणणें. आकाशवाणी-खात्याला माझें बोलणें ध्वनिक्षेपित करणें जनतेच्या हिताचें वाटतें म्हणून तें तसें करतें. प्रार्थनेंतील श्लोक नि भजनेंहि जर त्यांना ध्वनिपेक्षित करणें शक्य झालें, तर मला त्यानें आनंदच होईल. परंतु हीं भजनें सिनेमांतील गीतांइतकीं कदाचित् सुस्वर लागणार नाहींत. मी त्यांना भजन म्हणायला निवडतों, ज्यांची वृत्ति प्रार्थनामय आहे. परंतु माझें भाषण प्रार्थनेचेंच एक अंग म्हणून जनतेनें समजावें अशी माझी इच्छा आहे.

## अतिशयोक्तीनें कार्यनाश

अजमीर आणि जुनागड येथील अतिशयोक्तीनें भरलेल्या हकिकती माझ्याकडे पाठवण्यांत येतात. जुनागड येथील अतिशयोक्त बातम्यांविषयीं मी मागें बोललों आहें. अजमीरमध्यें खून, जाळपोळ, लुटालूट, इत्यादि प्रकार झाले ही गोष्ट खरी; परंतु पवित्र दर्गा सुरक्षित आहे. त्याला धक्का नाहीं लागला. अतिशयोक्तीनें कार्यनाश होतो. त्यामुळें मुसलमानांचें नुकसान होतें, त्यांच्या कार्याची हानि होते. आणि भले संबंध निर्मिणें, शान्ति आणणें, अधिकच कठिण होऊन बसतें.

# १११

१–१–'४८

## आध्यात्मिक अन्न

आज नवीन वर्षाचा पहिला दिवस. प्रार्थनेला आज बरीच मंडळी आलेली पाहून आनंद होतो. परंतु स्त्रियांच्या बसण्याची सोय करण्यांत सात मिनिटें गेलीं याचें वाईट वाटतें. सभेंत एक मिनिट दवडणें याचा अर्थ राष्ट्रानें किती तरी मिनिटें दवडणें होय. स्त्रियांना जागा करून द्यायला पुरुषांनीं शिकलें पाहिजे. जो समाज, जें राष्ट्र, स्त्रियांना सन्मानीत नाहीं, त्यांना सुधारलेलें म्हणतां येणार नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतंत्र आणि स्वाभिमानसंपन्न अशा राष्ट्राचे नागरिक या दृष्टीनें आपण अतःपर वागलें पाहिजे. यापुढें प्रार्थनासभा याहूनहि मोठ्या होतील अशी मला आशा आहे. परंतु सर्वांनीं प्रार्थनावृत्तीनें यायला हवें. कारण, प्रार्थना हें आत्म्याचें अन्न आहे. जे येथें येतात त्यांनीं येथेंच शान्त रहावें असें नाहीं, तर शान्तीचा संदेश त्यांनीं घरींहि न्यावा.

## हरिजन आणि दारू

युक्तप्रान्तांत नुकतीच एक हरिजन-परिषद् भरली होती. तेथें एका मंत्र्यानें हरिजनांना घाणेरडे कपडे न वापरण्याचा, दारू सोडायचा, उपदेश केला. एक हरिजन तत्काळ उठून म्हणाला, सरकारनें आधीं सारीं ताडीचीं

झाडें मुळासकट नष्ट करावीं, सारे दारूचे गुत्ते बंद करावे, आणि मग आमचे घाण कपडे त्यांनीं खुशाल जाळावे. या हरिजनबंधूच्या धैर्याची मीं तारीफ करतों. परंतु हरिजनांना व इतरांना माझें सांगणें, कीं उपाय त्यांच्याच स्वतःच्या हातीं आहे. दारू विकली जात असली, तरी विष समजून ती टाळावी. दारू खरोखरच विषाहूनहि वाईट आहे. विषानें देहच मरतो. परंतु दारू आत्म्याचाहि विसर पाडते. मानवांत जें जें उदात्त आहे, संयमाचा तो सार्वभौम सद्गुण, इत्यादि सर्वांचा त्याला दारू विसर पाडते. सरकारलाहि माझें सांगणें, कीं गुत्त्यांचें उपाहारगृहांत त्यांनीं परिवर्तन करावें. स्वच्छ आणि पथ्यकारक उपाहार तेथें मिळावा. तेथें बोधप्रद वाङ्मय वाचायला ठेवावें. व्यसनाची चटक असलेल्यांस मुक्त करण्यासाठीं इतरहि करमणूक, मनोरंजन वगैरे तेथें होईल असें करावें. अनेक देशांतील अनुभव आहे आणि आफ्रिकेंत व हिंदुस्थानांतहि मीं जें पाहिलें आहे, त्यावरून वाटतें, कीं मादक पदार्थांचें व्यसन सुटलें, तर कामगारांची शारीरिक नि नैतिक शक्ति वाढते; पैसे मिळविण्याची शक्तीहि वाढते. म्हणून १९२० पासून कॉंग्रेसच्या कार्यक्रमांत दारूबंदी घातलेली आहे. आतां स्वातंत्र्य आलें आहे. सरकारनें आतां वचनपूर्ति करावी. हें कलंकित उत्पन्न सोडून द्यायला सरकारनें तयार झालें पाहिजे. अंतीं असें आढळेल, कीं सरकारी तिजोरींत तूट येणार नाहीं. व्यक्तींना तर अपार फायदा होईल. आपल्या राष्ट्राच्या प्रगतीचा हा रस्ता आहे.

## ११२

२-१-'४८

# नौखालींतील टोपी

शुक्रवारीं सायंकाळीं आज पाऊस पडत होता. गांधीजी ती सुप्रसिद्ध नौखाली-टोपी घालून आले. श्रोत्यांना मौज वाटली. त्या गवती टोपीचा गमतीदार उल्लेख करूनच त्यांनीं प्रार्थनोत्तर प्रवचन सुरू केलें. ते म्हणाले, नौखालींतील शेतकरी उन्हापासून अशी गवती टोपी घालून स्वतःचा

बचाव करून घेतात. आज माझ्या डोक्यावर जी टोपी तुम्ही बघितलीत, ती मला मोलाची वाटते. एक तर एका मुस्लिम शेतकऱ्यानें दिलेली ती भेट आहे. दुसरें म्हणजे महाग छत्रीऐवजीं किती स्वस्त नि साधें हें साधन. पुन्हां गांवठी वस्तूंपासूनच ही टोपी बनलेली.

## भजन

आजच्या प्रार्थनेच्या वेळचें भजन-गीत फार मधुर नि सुस्वर वाटलें. परंतु हें गीत सकाळच्या प्रार्थनेला अधिक अनुरूप असें आहे. कारण मार्गप्रतीक्षा करणारा भक्त देवाला म्हणत आहे, " प्रभो जागे व्हा, मला दर्शन द्या." ईश्वर अर्थातच कधीं निजत नसतो. भक्ताची भावना गीतांत आहे.

## अविश्वास म्हणजे भीति

अलाहाबादचें एक पत्र नवथर आलें होतें. पत्र-लेखकाच्या मतें कांहीं सामान्य अपवाद वगळले, तर एकहि मुसलमान विश्वासार्ह नाहीं, हिंदी संघ-राज्याशीं कोणी निष्ठावान् राहणार नाहीं; विशेषेंकरून जर दोन्ही वसाहतींत युद्धच पेटलें, तर हें दिसून येईल. म्हणून कांहीं राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान वगळून बाकीच्यांना हांकलूनच लावावें. माझें उत्तर असें, कीं जोंवर विरुद्ध पुरावा नाहीं तोंवर मानवानें मानवावर विश्वास ठेवणें योग्य. मला तरी असें वाटतें. मानवाला हेंच शोभून दिसतें. गेल्या आठवड्यांतच लखनौला एक लाख मुसलमान जमले होते. त्यांनीं स्वतःच्या राष्ट्रीयतेची असंदिग्ध घोषणा केली आहे. जर उघड उघड कोणी देशद्रोही दिसला, तर त्याला गोळीहि घालूं शकाल. अर्थात् तो माझा मार्ग नाहीं. परंतु उगीचच अविश्वास दर्शविणें अज्ञानमूलक आहे. भ्याडपणाचें हें चिन्ह आहे. अशा अविश्वासांतूनच जातीय द्वेष माजला, रक्तपात झाले, अवाढव्य प्रमाणावर लोकांची अदलाबदल झाली. सतत अविश्वास राखाल, तर हिंदुस्थान सदैव दुखंडच राहील; आणि अंतीं उभय भागांचा नाश होईल. युद्ध पेटायचेंच असेल— ईश्वर-कृपेनें न होवो— तर तें बघायला जगण्याची मला इच्छा नाहीं. परंतु लोक माझी अहिंसेवरची श्रद्धा घेतील, तर युद्ध होणार नाहीं. अजूनहि सारें सुंदर होईल.

नगर वाचनालय, सातारा.

## ११३

३-१-'४८

### खरी शान्ति अंतरीं

आज शनिवार. आजची प्रार्थना वेव्हेल कॅन्टीनच्या जागेंत होती. आज प्रार्थनेला पुष्कळ गर्दी होती. गांधीजींचे शब्द त्यांना ऐकावयाचे होते. गांधीजी म्हणाले, दिलेला शब्द मी पुरा करीत आहें म्हणून मला बरें वाटत आहे. येथील छावणींतील निर्वासितांना दोन शब्द सांगण्याची संधि मिळाली म्हणूनहि आनंद होतो. येथें पुरुषांइतक्याच स्त्रियाहि आलेल्या आहेत. आपल्या देशाला नि जगाला शान्ति नि सद्भाव यांची जोड मिळावी म्हणून माझ्याबरोबर सारे प्रार्थना करा. संपत्ति, राजवाडे, अशा बाह्य साधनांनीं शांति मिळत नसते. शांति अन्तर्यामीं असते. सर्व धर्मांनीं हें सत्य उद्घोषिलें आहे. जेव्हां मनुष्याला अशी शान्ति लाभते, तेव्हां त्याचे डोळे, त्याचे शब्द, त्याची कृति सर्व त्या शान्तीला जणूं साक्षी असतात. असा मनुष्य झोंपडींतहि आनंदानें राहतो. त्याला उद्यांची चिन्ता नसते. उद्यां कोणतें ताट वाढून ठेवलेलें असेल, तें ईश्वरच जाणें. प्रभु रामचंद्रासहि तुम्हां-आम्हां प्रमाणेंच युवराज म्हणून गादीवर चढण्याच्या वेळेस वनवासांत जाण्याची वेळ येईल हें कोठें माहीत होतें? परंतु श्रीरामचंद्रास माहीत होतें, कीं खरी शान्ति परिस्थितिनिरपेक्ष असते. म्हणून समोर वनवास दिसत असतांहि लेशमात्रहि परिणाम त्यांच्या मनावर झाला नाहीं. केवढें हें प्रभुत्व! हिंदू आणि शीखांना हें सत्य माहीत असतें, तर वेडेपणाच्या लाटेंत ते सांपडले नसते. मुसलमानांनीं कांहींहि केलें असलें, तरी ते शान्त, दान्त राहिले असते. माझे हे शब्द तुमच्या अंतःकरणाला जर जाऊन पोंचले, तर मुसलमानांवरहि त्याचा आपोआप परिणाम होईल.

### छावणींतील जीवनाचा आदर्श

ही छावणी फार चांगल्या रीतीनें चालवण्यांत येत आहे असें कळतें. परंतु दिल्लीच्या रस्त्यांतून जी कांहीं स्वच्छता नि सफाई आढळते, त्याहून

अधिक स्वच्छता नि सफाई जोंवर तुमच्या छावणींतून दिसणार नाहीं, त्यासाठीं जोंवर तुम्ही सारे सहकार्यानें काम करणार नाहीं, व्यवस्था निर्माण करणार नाहीं, तोंवर तुमचा दावा मी कबूल नाहीं करणार. तुम्हांला ज्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या त्या मला ठाऊक आहेत. तुमच्यांपैकीं कांहीं घरंदाज घराण्यांतील आहेत. परंतु पूर्वीची राहणी येथें अपेक्षिणें व्यर्थ आहे. नवीन परिस्थितीशीं जुळवून घ्या. ती परिस्थिति शक्य तितकी सुधारा. १८९९ मध्यें बोअर-युद्धाच्या वेळेस ट्रान्स्वालमधून इंग्रज लोक नाताळांत निघून गेले. परिस्थितीचा जास्तींत जास्त चांगला उपयोग कसा करून घ्यावा तें त्यांना माहीत होतें. सारे समानतेनें रहात. एक इंजिनियर होता. परंतु बरोबरच्या सुताराप्रमाणेंच तोहि काम करी नि राही. शतकानुशतकें परकी सत्तेखालीं राहिल्यामुळें असें शिक्षण आपणांस नाहीं. आज आपण स्वतंत्र आहोंत. स्वातंत्र्य ही किती अमोल देणगी! माझें तुम्हांस सांगणें, कीं आलेल्या विपत्तींतूनहि सुंदरता निर्माण करा. ही छावणीच, परंतु ती आदर्श करा. साऱ्या जगाचें नाहीं, तरी साऱ्या हिंदुस्थानचे लोक छावणी बघायला यावेत नि त्यांना तिचा अभिमान वाटावा असें करा. प्रार्थनेच्या वेळेस मंत्र म्हटला त्यांत असें आहे, कीं जवळ जें कांहीं आहे तें ईश्वरार्पण करा. आपणांस जरूर तेवढेंच त्यांतील घ्यावें, वापरावें. हा मंत्र कृतींत आणूं, तर ही छावणीच नव्हे, तर जिचें नांव अलीकडे बदनाम झालें आहे ती सारी दिल्ली जणूं नवीन होऊन जाईल. आपणा सर्वांचीं जीवनें आंतरिक सुखानें भरून जातील.

## ११४

४-१-'४८

## युद्धाचा अर्थ

आजहि प्रार्थनेला बराच समुदाय होता. गांधीजी म्हणाले, पाऊस असूनहि इतक्या संख्येनें आलांत याचा आनंद वाटतो. परंतु तुम्ही केवळ गंमत म्हणून आलां नसाल, तर खऱ्या अर्थानें प्रार्थनेंत सामील होण्यासाठीं

आलां असाल अशी मी आशा करतों. दुःखाची गोष्ट, कीं उभय वसाहतींत युद्धच जुंपेल असें लोक सर्वत्र बोलत आहेत. राष्ट्रसंघांतील हिंदी प्रतिनिधींच्या म्हणण्याच्या सत्यतेविषयीं पाक-सरकारनें संशय प्रदर्शित केलेला पाहून मला आश्चर्य वाटलें. आक्रमकांनीं काश्मीरवर जो हल्ला केला, त्यांत पाकिस्तानचा हात आहे हा आरोप खरा नाहीं, असें पाक-सरकारचें म्हणणें. परंतु केवळ नाकारल्यानें वस्तु सिद्ध नाहीं होत. काश्मीरच्या बचावासाठीं जाणें हिंदला आवश्यक होतें, कर्तव्यप्राप्त होतें. कारण आक्रमकांना हांकून लावण्यासाठीं काश्मीरनें मदत मागितली. या आक्रमकांना हांकलून लावण्यांत हिंद-सरकारबरोबर पाकिस्ताननेंहि सहकार्य करायला हवें होतें. सहकार्य करण्यास तोंडीं तयारी पाकिस्तान दाखवी, परंतु कृतीच्या नांवें शून्य. पाकिस्तानच्या पुढाऱ्यांस मी सांगू इच्छितों, कीं फाळणी झाली, अतःपर वैरभाव मनांत धरायला रास्त कारण नाहीं. धार्मिक आणि जातीय आधारावर फाळणीची मागणी करण्यांत आली. पाकिस्ताननें आपल्या नांवाप्रमाणें अतःपर तरी पाक वर्तन ठेवावें. हिंदू आणि मुसलमान, दोघांनीं क्रूर कृत्यें केलीं आहेत. दोघांच्या अक्षम्य चुका आहेत. परंतु याचा अर्थ असा नाहीं, कीं ही पागलपणाची शर्यत शेवटीं युद्धांत परिणत व्हावी. युद्ध पेटलें, तर दोन्ही वसाहती आणखी एकाद्या तिसऱ्या सत्तेच्या ताब्यांत जातील. त्याहून अधिक दुर्दैव तें कोणतें? म्हणून पुनःपुन्हां सांगणें, कीं सद्भाव नि सदिच्छा बाळगा. तसें होईल, तर संयुक्त राष्ट्रसंघासमोर हिंदनें जें आरोपपत्र मांडलें आहे, तें धीरगंभीरपणें मागेंहि घेतां येईल. संयुक्त राष्ट्रसंघासहि तें करणें स्वागतार्हच वाटेल. माझ्या या प्रार्थनेंत सर्वांनीं सामील व्हावें. दोन्ही वसाहतींत मनापासून समझोता व्हावा एवढेंच सांगणें. मनांत द्वेष, मत्सर बाळगणें हें युद्धाहूनहि वाईट.

## भित्रेपणाहूनहि वाईट

आणि काल रात्रींची गोष्ट. रिकाम्या मुस्लिम घरांमध्यें निर्वासितांच्या एका टोळीनें बेकायदा प्रवेश करण्याची खटपट केली. पोलीस आले. अश्रुवायु वापरून त्यांना गर्दी मोडावी लागली. आज आपलें सरकार आहे.

लोक बेकायदा वागतील, तर सरकार समाधानकारक रीतीनें कारभार कसा चालवूं शकेल? पोलिसांनीं कांहीं करूं नये म्हणून या लोकांनीं स्त्रिया आणि मुलें यांना पुढें केलें, ही तर फारच वाईट गोष्ट. स्त्रीजातीचा हा उपमर्दच आहे, आणि पुरुषांचा हा नामर्दपणा आहे. पूर्वींच्या काळीं हल्ला चुकवण्यासाठीं हिंदूंबरोबर लढतांना मुसलमान गायी पुढें करीत, त्यानहूहि ही गोष्ट वाईट आहे. मी निर्वासितांना मनःपूर्वक सांगतों, कीं शान्ति धरा, नीट वागा. विशेषतः दोन्ही वसाहतींमधील संबंधांवर अत्यंत ताण पडत आहे अशा वेळीं तरी, जरा जपून चला. नवीन जन्मास आलेल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास अशा रीतीनें वागून मदत करा.

## ११५

६-१-'४८

## निर्नियंत्रणाचा परिणाम

नियंत्रणें गेल्याबद्दल अनेक अभिनंदनपर पत्रें नि तारा येत आहेत. उरलींसुरलीं नियंत्रणेंहि जावोत म्हणून म्हणत आहेत. एका सुप्रसिद्ध उद्योगपतीनें इंग्रजींतून पाठवलेलें एक पत्र नमुना म्हणून तुमच्यासमोर मांडणार आहें. मीं सांगितल्यावरूनच त्यांनीं तें सारें लिहून पाठवलें. पत्र पुढीलप्रमाणें :

" तुमच्या इच्छेनुरूप साखर, गूळ, गुळी साखर आणि इतर अन्न-धान्य पदार्थांच्या आजच्या नि नियंत्रणावेळच्या किंमती पाठवीत आहें :

| पदार्थ | आजचे भाव | साखरेवरचें नियंत्रण उठण्यापूर्वींचे नोव्हेंबरमधील भाव |
|---|---|---|
| साखर | ३७-८-० मण | ८० ते ८५ रु. मण |
| गूळ ( पानसेरा ) | १३ ते १५ रु. मण | ३० ते ३२ रु. मण |
| गुळी साखर | १४ ते १८ रु. मण | ३७ ते ४५ रु. मण |
| साखरेच्या वड्या | पौंडाचें पाकीट ११ आणे | १॥ ते १॥। रु. पाकीट |

| | | |
|---|---|---|
| देशी साखर | ३० ते ३५ रु. मण | ७५ ते ८० रु. मण |

अशा रीतीनें साखर आणि तत्सम वस्तूंचे भाव निम्म्यानें कमी झाले आहेत.

### अन्नधान्य

| | | |
|---|---|---|
| गहूं | १८ ते २० रु. मण | ४० ते ५० रु. मण |
| तांदूळ ( वसुमती ) | २५ रु. मण | ४० ते ४५ रु. मण |
| मका | १५ ते १७ रु. मण | ३० ते ३२ रु. मण |

### कडधान्यें

| | | |
|---|---|---|
| चणे | १६ ते १८ रु. मण | ३८ ते ४० रु. मण |
| मूग | २३ रु. मण | ३५ ते ३८ रु. मण |
| उडीद | २३ रु. मण | ३४ ते ३७ रु. मण |
| तूर | १८ ते १९ रु. मण | ३० ते ३२ रु. मण |

### डाळी

| | | |
|---|---|---|
| चण्याची डाळ | २० रु. मण | ३० ते ३२ रु. मण |
| मुगाची डाळ | २६ रु. मण | ३९ रुपये मण |
| उडदाची डाळ | २६ रु. मण | ३७ रुपये मण |
| तुरीची डाळ | २२ रु. मण | ३२ रुपये मण |

### तेलें

| | | |
|---|---|---|
| सरसाचें तेल | ६५ रु. मण | ७५ रु. मण |

## गरम आणि रेशमी कापड

गरम आणि रेशमी कापडावरचें नियंत्रण गेल्यामुळें बाजारांत या जातीचें कापड बेसुमार आलें आहे. या दोन्ही जातींच्या कापडाची किंमत निदान ५० टक्के तरी कमी झाली आहे. कांहीं ठिकाणीं तर ६६ टक्के किंमत उतरली आहे.

## सुती कापड आणि सूत

सुती कापड नि सूत यांच्यावरील नियंत्रणेंहि लौकरच जातील, या आशेनें किंमती कमी होत आहेत. साखरेवरील नियंत्रण गेल्यामुळें जें वातावरण निर्माण झालें आहे, त्यामुळें कापडाच्या किंमती उतरत आहेत. सुती कापडावरचें नियंत्रण अजिबात गेलें, तर ६० टक्के तरी किंमत खालीं येईल. आणि कापडाच्या वाणांतहि सुधारणा होईल. गिरणीमालकांची स्पर्धा सुरू होईल. नियंत्रणें मागेंच गेल्यामुळें रेशमी नि गरम कापड ज्याप्रमाणें बाजारांत भरपूर येत आहे, त्याचप्रमाणें सुती कापडहि वाटेल तितकें येईल. सुती कापडावरचें नियंत्रण गेल्यावर तीन वर्षें तरी परदेशांत कापड पाठवायची बंदी करायला हवी. तरच निर्नियंत्रण पुरेपूर सफल होईल.

## पेट्रोलचें वांटप

युद्धपरिस्थितीमुळें पेट्रोलवर नियंत्रण घालण्यांत आलें होतें. आज त्याची जरूर नाहीं. खरी गोष्ट अशी आहे, कीं कांहीं वाहतुक-कंपन्या अपरंपार नफा कमावीत आहेत आणि नियंत्रण असावें म्हणून त्यांचेंच म्हणणें आहे. कोट्यवधि लोकांचें या नियंत्रणाशीं सोहेरसुतकहि नाहीं. ज्याच्याजवळ एकच मोटार ट्रक, किंवा लॉरी, किंवा बस आहे, आणि ज्याला एकाच रस्त्यावरून जा-ये करायला परवानगी आहे, असा मोटारमालकहि त्या एका गाडीवर महिना दहा-पंधरा हजार रुपये मिळवीत आहे. पेट्रोलवरचें नियंत्रण गेलें व कोणासहि वाहतुक करण्याची परवानगी सर्रहा मिळूं लागली, तर ज्याच्याजवळ एकच गाडी आहे त्याला महिना ३०० रुपयांहून अधिक मिळणार नाहींत. आज पेट्रोलच्या कूपनांचा सर्रास व्यापार चालला आहे. एकाच मोटार लॉरीच्या पेट्रोलची चिठ्ठी दुसऱ्या एकाद्या वाहतुक-व्यापाऱ्याला विकून दहा हजारहि तो मूळचा मालक मिळवूं शकतो. पेट्रोलची वांटप-पद्धति जर गेली, तर वाहतुक, अन्न, वस्त्र, घरें बांधणें, आणि असेच देशासमोर असलेले इतर शेंकडों प्रश्न सुटूं लागतील. पेट्रोलच्या वांटप-पद्धतीमुळें, वाहतुकीच्या मक्तेदारीमुळें, वाहतुक-कंपन्यांचा फक्त फायदा होत आहे. परंतु त्यामुळें कोट्यवधि लोकांचीं जीवनें अस्ताव्यस्त झालीं आहेत.

नियंत्रणें उठवून रंजीस आलेल्या मानवांच्या साहाय्यार्थ तुम्ही धांवून या. देश मग मूठभर कृपापात्र लोकांनाच रहायला योग्य न ठरतां कोट्यवधि परित्यक्तांसहि तेथें नीट राहतां येईल. नियंत्रणें युद्धकालीन उपाय होते. स्वतंत्र हिंदुस्थानांत त्यांना थारा असतां कामा नये."

या पत्रांतील आंकडे बरोबर आहेत असें मला वाटतें. त्यांच्याविषयीं कोणी शंका नाहीं घेऊं शकणार. कदाचित् माझ्या अज्ञानामुळें मला असें वाटत असेल. तसें असेल, तर पंडितांनीं विरुद्ध पुरावा मांडून माझें अज्ञान कृपा करून दूर करावें. आतांच सांगितलेल्या गोष्टी मी मानतों. कारण या बाबतींतील जाणणारे लोकहि याच मताचे आहेत.

जेव्हां सर्वसाधारण जनता एकाद्या गोष्टीला मानते आणि ती व्हावी असें तिला वाटतें, तेव्हां लोकशाहींत भीतीला वाव असतां कामा नये. जनतेच्या प्रतिनिधींनीं त्यांच्या मागणीला आकार दिला पाहिजे; ती मिळेल, शक्य होईल असें केलें पाहिजे. जनतेचा मानसिक सहकार असेल, तर मोठमोठ्या लढाया जिंकतां येतात.

जगांतील पेट्रोलचा एकशतांश भाग हिंदुस्थानला मिळतो. परंतु म्हणून निराश वा हताश होण्याची जरूर नाहीं. आपल्या मोटारी कांहीं त्यामुळें पळायच्या थांबल्या नाहींत. याचा अर्थ हा, कीं आपण युद्धप्रिय राष्ट्र नसल्यामुळें आपणांस कमी पेट्रोल लागतें. आणि समजा, आपणांला अधिक लागलें आणि जगांतील पेट्रोलचा सांठा तर होता तेवढाच राहिला, तर का पेट्रोलच्या अभावीं जग उपाशी मरणार? टीकाकारानें माझ्या अज्ञानाचा उपहास नये करूं. मला प्रकाश हवा आहे. मी माझा अंधार जपून प्रकाश नाहीं मिळवूं शकणार. एक मार्मिक प्रश्न उभा राहतो. जर पेट्रोलचा आपणांस मिळणारा भाग इतका कमी आहे, तर काळ्या बाजारांत अपरंपार पेट्रोल कोठून येतें? आणि जरूर नसलेल्या मोटारी सुखासुखी इतक्या धांवतात कशा?

पत्रलेखकानें मला लिहिलेलें सत्य असेल, तर चकित होण्यासारखें सारें आहे खरें. नियंत्रणें गरिबांच्या नांवानें ठेविलीं जातात. परंतु तीं श्रीमंतांना आशीर्वाद ठरत आहेत, आणि गरिबांना शापरूप होत आहेत. जर

मक्तेदारी खरोखरच असेल आणि पत्रलेखकानें लिहिलें आहे त्याप्रमाणें सारा कारभार चालत असेल, तर हीं नियंत्रणें क्षणाचाहि विचार न करतां दूर केलीं पाहिजेत.

## कापड-नियंत्रण

कापड-नियंत्रण असावें म्हणून एकहि मुद्दा मांडतां येण्यासारखा नाहीं, जर स्वातंत्र्याची खूण ठरलेली खादी आपण विसरून गेलेले नसूं. येथें भरपूर कापूस आहे. चरखा चालवायला नि मागावर काम करायला समर्थ असे लाखों हात खेड्यांतून आहेत. आपण आपणांस चांगल्या रीतीनें वस्त्राच्छादित करूं शकूं. पुन्हां आरडाओरड, आदळआपट नको. वाहतुकीच्या प्रचंड सोयीसवलतींचीहि जरूर नाहीं पडणार. जी राजवट आतां संपली, तिनें रेल्वे प्रथम लष्करी कामासाठीं म्हणून येथें सुरू केली; नंतर कापसाचे गठ्ठे निर्यातीसाठीं त्या त्या बंदरांत नेणें व आयात परदेशी कापड हिंदुस्थानभर नेणें हा त्यांचा उद्देश होता. हें सारें केन्द्रीकरण निरर्थक ठरेल. जेव्हां आपली खादी निर्माण होऊं लागेल व खेड्यांत वापरली जाऊं लागेल, आपण आपलें अज्ञान किंवा आळस लपविण्यासाठीं खेड्यांतील जनतेला नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं.

## ११६

६-१-'४८

## ही बळजोरी थांबली पाहिजे

गांधीजी म्हणाले : मुसलमानांचीं रिकामीं घरें बळकावण्याचा अजूनहि निर्वासितांचा उद्योग चालूच आहे. गर्दी मोडण्यासाठीं पोलिसांना अश्रु-वायूचा उपयोग करावा लागत आहे. निर्वासितांना मोठ्या संकटांना तोंड द्यावें लागत आहे ही गोष्ट खरी. दिल्लीच्या झोंबणाऱ्या थंडींत उघड्यावर झोंपणें कठिण आहे आणि पाऊस आला, तर ते तंबूहि निरुपयोगी ठरतात. मुसलमानांचीं घरें लक्ष्य न करतां निर्वासित बंधू घरांसाठीं आरडाओरड करतील, तर मी तें समजूं शकेन. उदाहरणार्थ, येथें बिर्ला-भवनांत येऊन ते

मला, घरमालकांना, एका आजारी भगिनीलाहि घरांतून हांकलून लावून कब्जा घेऊं शकतील. तें करणें सभ्य नाहीं म्हटलें जाणार; परंतु तो सरळ सरळ व्यवहार होईल. मुसलमानांचींच घरें बळजबरीनें घेणें यांत वक्रता आहे, असभ्यताहि आहे. आधींच भयभीत झालेल्या मुसलमानांना आणखी घाबरवून त्यांना जायला भाग पाडायचें आणि मग त्यांच्या घरांचा कब्जा घ्यावयाचा हें कधींहि कोणीहि केलें, तरी चांगलें नाहीं. अधिकाऱ्यांनीं त्यांना अन्यत्र जागा द्यायची व्यवस्था केली. परंतु हीं मुसलमानांचींच घरें आम्हांला पाहिजेत असा हट्ट धरून ते बसले. यावरून स्पष्ट दिसतें, कीं गरजेमुळें असें करायला हे निर्वासित प्रवृत्त झाले नसून दिल्ली निर्मुसलमान करणें हा त्यांत त्यांचा हेतु आहे. जर अशी सर्वांची इच्छा असेल, तर अप्रत्यक्षपणें मुसलमानांस जायला भाग पाडण्यापेक्षां त्यांना स्पष्टपणें येथून चालते व्हा म्हणून सांगणें अधिक चांगलें. हिंदी संघराज्याच्या राजधानींत असें केल्याचे काय परिणाम होतील, ते त्यांनीं ध्यानीं घ्यावयाला हवेत.

## संपाचा प्लेग

मुंबईस गोदी-कामगार व इतरहि संपावर जाणार आहेत असें ऐकतों. मी सर्वांना, मग ते काँग्रेसचे असोत, समाजवादी असोत– ते काँग्रेसपासून अलग धरायचेच असतील तर– किंवा कम्युनिस्ट असोत, प्रार्थून सांगतों कीं संपापासून परावृत्त व्हा. ही संपांची वेळ नाहीं. असे संप ज्यांचा संबंध येतो त्यांचें नुकसान करतात; एवढेंच नव्हे, तर सर्व राष्ट्राचेंहि नुकसान करतात.

## खरी लोकशाही

औंधच्या राजेसाहेबांनीं आपल्या प्रजेला कधींच जबाबदार स्वराज्याचे हक्क दिले आहेत. त्यांचे चिरंजीव अप्पासाहेब यांनींहि आपलें जीवन जनतेच्या सेवेसाठीं वाहिलें आहे. राजेसाहेब व आणखी कांहींजणांनीं विलिनीकरणाच्या योजनेस मान्यता दिली आहे. राजांना पेन्शन मिळेल म्हणून सरदारांनीं सांगितलें आहे. परंतु औंधचे राजेसाहेब प्रजेवर ओझें घालण्याचें मनांतहि आणणार नाहींत. राजेसाहेब मला लिहून विचारतात, कीं विलिनीकरणानंतर जी पंचायतपद्धति संस्थानांत सुरू केलेली आहे, ती

टिकणार कीं नाहीं? कारण, त्याना असें सागण्यात आलें आहे, कीं विलिनीकरणानंतर त्यांच्या संस्थानांतील राज्यकारभार इतरत्र हिंदुस्थानभर आहे त्याच स्वरूपाचा होईल. माझ्या मतें जेथें जेथें लोकांची पंचायत चालवावयाची इच्छा असेल, तेथें त्यांना बंद करूं शकेल असा कायदा नाहीं. औंध संस्थान म्हणून नाहीं रहाणार. परंतु औंध या नांवानें कांहीं गांवांचा विशिष्ट संघ एकत्र राहूं शकेल. अशा प्रत्येक संघाला किंवा त्याच्या सभासदाला पंचायतपद्धत चालवणें शक्य आहे. मग तसें हिंदुस्थानच्या इतर भागांत असो वा नसो. कर्तव्यपूर्तींतून खरे हक्क मिळत असतात. असे हक्क कोणीहि हिरावूं शकत नाहीं. पंचायत जनतेच्या सेवेसाठीं म्हणून आहे. हिंदुस्थानच्या खऱ्या लोकशाहींत ग्राम हाच घटक आहे. एक का गांव असेना, जर तो पंचायत-राज्य मागेल—ज्याला इंग्रजींत रिपब्लिक म्हणतात, लोकसत्ताक राज्य म्हणतात—तर त्याला कोण अडवणारा? मध्यवर्ती सरकारांत वीस माणसांनीं काम करून कांहीं खरी लोकशाही येणार नाहीं. प्रत्येक खेड्याच्या लोकांनीं खालून वर लोकशाही न्यावयाची आहे.

## आयात-निर्यात मालाची तोंडमिळवणी

एका मित्रानें लिहिलें आहे, कीं सुखी आणि भरभराटीच्या राष्ट्राचें एक लक्षण आहे, कीं त्याच्या आयात-निर्यात मालांत मेळ हवा. एक दुसऱ्यापेक्षां फार अधिक नाहीं होतां कामा. हिंदुस्थाननें आयात थोडी कमी करणें प्राप्त आहे. निर्यातीपेक्षां आयात थोडी तरी कमी असावी. आज जी परिस्थिति आहे तशीच चालवूं, तर लौकरच हिंदुस्थान दिवाळखोर ठरेल. खेळणीं व अशाच प्रकारच्या अनावश्यक वस्तूंची अयात तर बंदच करावी. दुसरी गोष्ट म्हणजे आजवर हिंदुस्थान कच्चा माल बाहेर पाठवी व पक्का मागवी. असें करण्यानें जमाखर्चाची तोंडमिळवणी होणें कठिण. देश अनेक दृष्टींनीं यामुळें दरिद्री होत जातो. पत्रलेखकाचें हिंदुस्थाननें शक्य तितकें स्वाश्रयी नि स्वावलंबी बनावें हें मत मला मान्य आहे; तसेंच हिंदुस्थान व इतर देश यांच्या दरम्यान होणारा व्यापार हा शोषणावर आधारलेला न राहतां अन्योन्य साहाय्याच्या तत्त्वावर आधारलेला असावा, या विचाराशींहि मी सहमत आहें.

७-१-'४८

## चुकीचा उपवास

प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले : एकानें चिठी लिहून मला कळविलें आहे, कीं उपवास सुरू केला आहे व तो चालवला जाणार आहे. मला तो उपवास चुकीचा वाटतो. मी अशा मताचा आहें, कीं जोंवर मी जिवंत आहें, तोंवर असे उपवास सुरू करूं पाहणाऱ्यांनीं आधीं माझ्याशीं विचारविनिमय करावा.

## विद्यार्थ्यांचा संप

वर्तमानपत्रांत वाचलें, कीं ९ तारखेस दिल्लींतील विद्यार्थी सामुदायिक संप करणार म्हणून. कालच मीं सांगितलें, कीं ही वेळ संपाची नाहीं, आणि विद्यार्थ्यांनीं संप करणें हें सामान्यतः चूक होय असें माझें मत आहे. मी माझ्या आयुष्यांत अनेक लहानमोठे संप चालविले; कमी-अधिक यशहि मिळालें. परंतु सारेच संप बरोबर नसतात आणि अहिंसक, तर नसतातच हें मी सांगू शकतों. विद्यार्थी माझें ऐकणार असतील तर संपाचा विचार, ते सोडून देतील.

## निर्वासितांचीं दुःखें

पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांचे अनेक प्रतिनिधी मला भेटले. आमचीं दुःखें दूर व्हावीं म्हणून तुम्ही अधिक कां नाहीं कांहीं करीत ? अधिक लक्ष कां नाहीं घालीत, असें ते म्हणाले. मी दिल्लींत याच कामासाठीं म्हणून आहें हें त्यांच्या लक्षांतहि येत नाहीं. परंतु स्वातंत्र्याच्या आगमनापूर्वीं मी जेवढा प्रभावी होतों, तेवढा आज नाहीं. पूर्वीं मी अहिंसक हिंदी बंडखोरांचा नेता होतों. जरी प्रत्येकजण माझ्या सांगण्याप्रमाणें वागत नसे, तरी पुष्कळजण वागत. परंतु आज माझें सांगणें अरण्यरुदनवत् आहे. मानवजातीच्या थोर थोर शिक्षकांनीं सांगितलें आहे, कीं आपणांस जें सत्य म्हणून वाटतें तें आपण सांगत असावें. कोणी ऐको वा न ऐको. मी कांहीं सरकार

नाहीं चालवीत. ज्यांच्या हातीं सूत्रें आहेत ते माझे मित्र आहेत ही गोष्ट खरी. परंतु माझ्याविषयींच्या आदरामुळें किंवा प्रेमस्नेहामुळें माझ्या म्हणण्याप्रमाणें कोणी वागावें, असें मला मुळींच नको आहे. जर पटलें तरच करा. मंत्री, त्यांचे चिटणीस, त्यांच्या हाताखालची मंडळी, पोलीसहि, सारे जर माझें ऐकतील, तर साऱ्या गोष्टी निराळ्या होतील. परंतु तें अशक्य आहे. जुनीच नोकरशाही घेऊन मंत्र्यांना जावें लागत आहे आणि जें कांहीं त्यांतल्या त्यांत करणें शक्य, तें ते करीत आहेत.

## निर्वासितांचें कर्तव्य

निर्वासितांना अन्न, वस्त्र, निवारा एवढें तरी मिळालेंच पाहिजे. तुमचेच ते. तुमच्याच रक्तामांसाचे. मला मिळूं शकतें तें त्यांना मिळूं नये, हें अन्याय्य आहे. काय करावें त्यांनीं ? जो कांहीं निवारा मिळेल तो कृतज्ञतेनें स्वीकारा, असें मी त्यांस सांगतों. सतरंजीचें काम गवताच्या चटईवर भागवतां येईल. अन्न, वस्त्र, निवारा मिळावा म्हणून जें काम देण्यांत येईल, तें त्यांनीं करावें. मजुराला टेबलाशीं बसून लिहतां नाहीं येणार; परंतु जन्मभर टेबलाजवळ काम करणाऱ्यासहि शारीरिक काम करतां येईल. योग्य मनोवृत्ति वाढीस लावाल, तर हिंदुस्थान सहजपणें आलेल्या कांहीं लाखांना मिळवून घेऊं शकेल; आणखीहि आले, तरी सामावले जातील.

## कराचींतील घटना

कराचींतील हकिकती तुम्ही सारे जाणताच. सिंधमध्यें आतां सारें शान्त आहे, लोकांनीं तेथेंच राहावें, असें जरी पुष्कळ जण म्हणत असले, तरी मला माझे संशय आहेत. मला वाटणारी भीति खरी ठरली आहे. हिंदू आणि शीखच नव्हे, तर कोणीहि मुसलमानेतर सिंधमध्यें आज सुरक्षित नाहीं. पाकिस्तान-सरकार सांगत आहे, कीं अत्याचार थांबवायला आम्ही प्रथम असमर्थ होतों; परंतु आतां शक्य तितक्या लौकर त्यांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न करीत आहोंत. पाकिस्तान व हिंदुस्थान—दोन्ही सरकारांना माझें सांगणें, कीं अत्याचार नि दंगल तुम्ही थांबवूं शकत नसाल, तर राजीनामे द्या. असें केल्यामुळें थोडा वेळ परिस्थिति अधिकच बिघडेल; परंतु अंतीं ती सुधारेल.



नगर वाचनालय मातर

हळूहळू कां होईना परिस्थिति सुधारत असेल, तर आजच्या सरकारांनीं जागेवर रहावें. परिस्थिति अधिक तरी बिघडतां कामा नये.

निर्वासितांना आणि सर्वसामान्य हिंदु आणि शीख जनतेला माझें सांगणें, कीं बदला घेण्याची वृत्ति आंवरा. सूडाच्या भावनेवर अंकुश ठेवा. कराचींत जें काय घडत आहे त्यानें घाबरूं नये, गोंधळून जाऊं नये, अस्वस्थ नि प्रक्षुब्ध होऊं नये. हिंदी संघराज्यांत शंभर टक्के बिनचूक वर्तन ठेवणें हेंच योग्य असें उत्तर आहे.

## ११८

८-१-'४८

प्रार्थना सुरू होण्याच्या आधीं अनेक चिठ्ठ्या गांधीजींकडे आल्या. आदल्या दिवशींच्या माझ्या चिठ्ठीला उत्तर नाहीं मिळालें म्हणून एकाची तक्रार होती. गांधीजी प्रार्थनोत्तर म्हणाले, दिवसभर येणारीं सारीं पत्रें वाचणें मला अशक्य आहे. महत्त्वाचें असेल, तर मित्रानें पुनरपि विचारलें पाहिजे होतें.

## हरिजन आणि मद्यपान

एकानें गांधीजींनीं हरिजनांना दारूबाबतचें सांगितलें, त्याविषयीं प्रश्न विचारला होता. सैनिक आणि इतर श्रीमंत लोक दारू पीत असतां हरिजनांनींच दारू सोडून द्यावी असें कां सांगण्यांत यावें ? गांधीजी म्हणाले, हा अनाठायीं प्रश्न आहे. श्रीमंत दारू पितात म्हणून का गरिबांनींहि प्यायची ? दुसऱ्यांच्या वाईट संवयींचें कोणी काय म्हणून अनुकरण करावें ? माझ्या मतें वरच्या वर्गांना दारू पिण्याचें फारसें कारणच नाहीं. गरीब लोक दारूंत आपलें दारिद्र्य नि दुःख बुडवतात. तसें श्रीमंतांचें थोडेंच आहे ? सैनिकांचें दारूशिवाय कसें चालणार, असें कोणी म्हणेल. परंतु मला हें पटत नाहीं. दारूला स्पर्शहि न करणारे इंग्रज नि हिंदी सैनिक मला माहीत आहेत. दारूबंदीचे कायदे श्रीमंत, गरीब, हरिजन वा इतर असा भेद करणार

नाहींत. परंतु दारूची वाईट संवय सोडून देण्यासाठीं दारूबंदीच्या कायद्यांची वाट नको बघायला. दारूमुळें हरिजनांचा तसेंच कामगारवर्गाचा समाजांतील कोणत्याहि इतर वर्गापेक्षां अधिक सत्यानाश झाला आहे. म्हणून दारू सोडा अशी हरिजनांना खास विनवणी.

## सत्याग्रह कां नाहीं ?

मी पाकिस्तानमध्यें कां जात नाहीं म्हणून एकाचा प्रश्न आहे. हिंदी संघराज्यांत सारें स्थिरस्थावर होईपर्यंत मी जाऊं शकत नाहीं, म्हणून मागेंच सांगितलें होतें. माझें पाकिस्तानांत जाणें तुमच्यावर अवलंबून आहे. दिल्ली जर निर्मळ, निर्दोष झाली, दिल्लीनें नवीन पान उलटलें, तर मला पाकिस्तानांत जायची इच्छा आहे. हाच पत्रलेखक पुन्हां विचारतो, कीं सत्याग्रह जर प्रभावी शस्त्र आहे, तर पाकिस्तानांत त्याचा कां नाहीं प्रयोग करीत ? माझें उत्तर असें, कीं पाकिस्तानांतील हिंदू आणि शीख जर सत्याग्रहाचा अवलंब करतील, तर त्यांच्या तेथील सर्व आपत्तींवर तो रामबाण उपाय ठरेल. परंतु तो सत्याग्रह आज आहे कुठें ? हिंदुस्थानांत डोळ्यांत भरण्यासारखा सत्याग्रह कोठेंहि दिसत नाहीं. सर्व ठिकाणीं लोकांना आत्म-रक्षणार्थ पोलीस नि लष्कर हवें आहे. ईश्वराला पदच्युत करून आपण लष्कराला पसंत केलें आहे !

## हिंदी संघराज्यांत जातीयता नको

हाच मित्र पुढें विचारतो, पाकिस्तान हिंदू आणि शीखांना गुलाम म्हणून राहूं देईल, परंतु स्वतंत्र नागरिक म्हणून राहूं देणार नाहीं. त्यांचें हें धोरण स्पष्ट आहे, निश्चित आहे. मग आपणहि मुसलमानांस नको का दवडायला ? निदान जितके हिंदू-शीख तिकडून येतील, तितके मुसलमान येथून न घालवूं, तर येणाऱ्यांची व्यवस्था कशी लावायची ? या मित्राला माझें सांगणें असें, कीं जवळजवळ तितकेच मुसलमान गेलेहि असावेत. परंतु अजून इकडे मुसलमानांची मोठी संख्या आहे. मौलानासाहेबांनीं बोलावलेल्या परिषदेला ७० हजार जमले होते. हिंदी संघराज्यांतील मुसल-मानांचे ते प्रतिनिधी होते. यांना का घालवणार, नाहींसे करणार ? मला हें

कधींच पटणार नाहीं. असें करणें शौर्याचें नाहीं. दुसरे कांहीं करोत. हिंदी संघराज्यानें तरी जात्यन्ध होऊं नये. दुसऱ्याचें भलें घ्यावें, वाईट नये घेऊं.

## विद्यार्थ्यांतील पक्ष

विद्यार्थ्यांचें एक पत्र आलें आहे, कीं होणारा संप कम्युनिस्ट विद्यार्थी घडवून आणणार होते; काँग्रेस-विद्यार्थी नाहीं. मी काँग्रेस-विद्यार्थ्यांचें ते संपांत नाहींत याबद्दल अभिनंदन करतों. आणि अशा संपाविषयीं मीं पूर्वी सांगितलें तें पुन्हां सांगतों. विद्यार्थ्यांनीं पक्षनिष्ठ राजकारणांत पडूं नये. विद्यार्थ्यांत समाजवादी, कम्युनिस्ट, काँग्रेस आणि असेच इतर गट असूं नयेत. विद्यार्थ्यांनीं आद्यन्तीं विद्यार्थी म्हणूनच असावें; जितकें ज्ञान मिळविणें शक्य तितकें नोकरीचाकरीच्या दृष्टीनें न घेतां जनतेच्या सेवेसाठीं म्हणून मिळवावें.

## भावलपूरचें शिष्टमंडळ

भावलपूरच्या निर्वासितांचें एक शिष्टमंडळ भेटायला आलें होतें. मीरपूरचेहि कांहीं लोक आले होते. मीरपूरचे स्त्री-पुरुष माझ्याजवळ बोलत असतांनाच पंडित नेहरूहि आले. मीरपूरच्या सर्व हिंदूंना नि शीखांना आणण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत, म्हणून त्यांनीं त्यांना आश्वासन दिलें; परंतु दुस्तर अडचणी आहेत. शक्य तें सारें करीत आहोंत ते म्हणाले. भवलपूरचें शिष्टमंडळ म्हणालें, "पश्चिम-पंजाब आणि सीमाप्रान्त यांतून आलेले निर्वासित नोकरी-चाकरीसाठीं अर्ज करूं शकतात; परंतु आम्ही संस्थानी प्रजा, या सबबीखालीं आमचे अर्ज दूर सारले जातात. सरदार पटेलांनीं हे संस्थानी लोक आहेत, या सबबीखालीं त्यांचे अर्ज दूर करूं नका, असा पंक्तिप्रपंच करूं नका, म्हणून हुकूम सोडले आहेत. परंतु तरीहि असे प्रकार चालूच आहेत." परंतु त्यांच्या म्हणण्यावर माझा विश्वास बसेना. जर कांहीं असें होत असेल, तर तें गैरसमजामुळें होत असावें. मी आनंदानें चौकशी करीन आणि तुमचे पुढारी उद्यां आले, तर काय तें सांगेन. दोन्ही शिष्टमंडळांचे सभासद आपापलीं गाऱ्हाणीं मांडतांना मोठे संयमी दिसले.

२-१-'४८

## धीरता नि शूरता हवी

आज शुक्रवार. नेहमींप्रमाणें प्रार्थना झाली. नंतर गांधीजी म्हणाले : भावलपूरच्या मंदिरांतील मुख्य पुजारी आज मला भेटले होते. ते म्हणाले, 'कत्तल सुरू झाली तेव्हां किती तरी लोक आश्रयार्थ मंदिरांत आले. परंतु येथेंहि सुरक्षितता नव्हती. म्हणून ते व मी मागील दारानें निसटलों. जितक्या स्त्री-पुरुषांचे प्राण वांचविणें शक्य तितके वांचवले. परंतु मी सर्वांना वांचवूं शकलों नाहीं. जे मागें आहेत. त्यांच्यासाठीं तुम्ही कांहीं त्वरेनें करा.' एका माणसाला करणें शक्य तें मी सारें करीत आहे म्हणून त्यांना म्हटलें. देशाची फाळणी झाल्यामुळें एका भागांतील सरकारला दुसऱ्याच्या भागांत ढवळाढवळ नाहीं करतां येत. काळ असा आहे, कीं जास्तींत जास्त शूरता नि धीरता प्रत्येकानें प्रकट करायला हवी. जे कोणी आपल्या अब्रूसाठीं, आपल्या सत्त्वासाठीं प्राण द्यायला सिद्ध असतील, त्या स्त्री-पुरुषांची कोणीहि विटंबना करूं शकणार नाहीं. मृत्यु केव्हां तरी यायचाच आहे. भीतीचा त्याग करून ईश्वरावर श्रद्धा ठेवा. तोच सर्व शक्तिमान्. त्याच्या इच्छेशिवाय गवताची काडीहि हलत नाहीं.

## घरांचा प्रश्न

आज कांहीं निर्वासित भेटले. इतरांपेक्षां त्यांची हालत बरी आहे. येतांना थोडे-फार पैसे ते बरोबर आणूं शकले. ते म्हणाले, " आमच्या कांहीं मुसलमान मित्रांचें दिल्लींत घरदार आहे. ते दिल्ली सोडून गेले. जातांना ते आम्हांला म्हणाले, " आमचें घर तुम्ही घेऊं शकतां. म्हणून आम्ही त्यांत राहिलों. आतां सरकारनें खालीं करून द्यायला सांगितलें आहे." मीं त्यांना म्हटलें, कीं सरकारला कोणतेंहि घर मागायचा हक्क आहे. परंतु ज्यांनीं कायदेशीर रीत्या घराचा कब्जा घेतला आहे, त्यांना जा म्हणून सांगण्यापूर्वीं सरकारनें त्यांना कोठें तरी अन्यत्र जागा द्यायला हवी.

जा आणि बसा रस्त्यावर, असें सरकारी, अधिकारी त्यांना सांगूं शकत नाहींत. ज्यांनीं बळजबरीनें मुसलमानांचीं घरें बळकावलीं आहेत, त्यांना बाहेर काढणें हें सरकारचें कामच आहे. परंतु मी ज्यांची बाब मांडीत आहें, ती तशी नाहीं; म्हणून त्यांना निराळ्या रीतीनें वागवायला हवें.

## गैरसमज

मुंबईचें एक पत्र आलें आहे. लेखक म्हणतो, " तुम्ही दररोज शेरभर तांदूळ मिळतात म्हणून म्हटलेंत. तसें नाहीं. पावशेर रोज मिळतात." या लेखकाची चूक झाली आहे. माझी स्मृति मला फसवीत नसेल, तर मी आठवड्यास एक शेर असें म्हटल्याचें मला स्मरतें. याचा अर्थ दिवसास पावशेराहून कमी. या शिधा-वांटपाच्या दिवसांत प्रत्येकाला रोज शेरभर -तांदूळ मिळूं कसे शकतील ?

## बिर्लाभवन कां ?

एक मित्र लिहितो, " तुमची प्रार्थना बिर्लाभवनाच्या अंगणांत होते. कितीतरी गरीब लोकांना तेथें येतां येत नाहीं. पूर्ववत् तुम्ही भंगी-वस्तींत कां नाहीं रहात ? " मी दिल्लीस आलों त्या वेळेसच याचें कारण सांगितलें होतें. पुन्हां सांगतों. मी दिल्लीस आलों तेव्हां हें मृत शहर होतें. नुकतीच दंगल सुरू झाली होती. भंगी-वस्ती निर्वासितांनीं भरून गेली होती. म्हणून सरदारांनीं माझी येथें व्यवस्था केली. भंगी-वस्ती आतां मोकळी आहे कीं नाहीं, मला माहीत नाहीं. जरी ती रिकामी असली, तरीहि आतां तेथें जाणें मला योग्य वाटत नाहीं. मुसलमानांना शक्य ती मदत नि शक्य तें सुख देतां यावें म्हणून मी दिल्लींत आहें. तो हेतु बिर्लाभवनांत राहून अधिक फलद्रूप होतो. दिल्लीच्या गरीब वस्तींत जाण्यापेक्षां येथें येण्यांत मुसलमानांना अधिक सुरक्षित वाटतें. मंत्रिमंडळांतील सभासदांनाहि येथें येऊन मला भेटणें अधिक सुकर आहे. कारण ते जवळच राहतात. ते सारे कार्यमग्न असतात. बिर्लाभवनापेक्षां भंगी-वस्तींत जाण्यांत त्यांचा अधिक वेळ मोडेल.

## सभ्य चोर

हिंदुस्थानच्या राजधानींत शान्ति राखा. दिल्लींत चोरांचा, ठकांचा

सुळसुळाट झाला आहे असें ऐकतों. सभ्य लोकांप्रमाणें त्यांचा पोषाक असतो. उशीर न लावतां ही परिस्थिति सुधारण्यांत यायला हवी.

## १२०

१०–१–'४८

## शिस्तीची जरुरी

गांधीजींचें प्रार्थनोत्तर भाषण सुरू होण्यापूर्वीं साधूच्या वेषांतील एक मनुष्य उभा राहिला नि म्हणाला " तुम्हांला लिहिलेलें पत्र मी वाचूं इच्छितों." गांधीजी म्हणाले, " तें पत्र मजजवळ द्या." परंतु स्वतःच वाचून दाखवण्याचा हट्ट तो साधू घेऊन बसला. कांहीं वेळानें त्याची समजूत पटून तो खालीं बसला. गांधीजी म्हणाले, " स्वतःला जे साधू म्हणवतात, जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आम्ही संयम पाळतों, आम्ही धर्मग्रंथ अभ्यासतों, असा जे दावा करतात, त्यांनींहि असें वर्तन करावें, याचा अर्थ एवढाच, कीं आजची परिस्थितीच फार बिघडली आहे. ते मित्र शेवटीं खालीं बसले ही चांगली झाली गोष्ट; परंतु तेवढ्यासाठीं त्यांचें मन वळवण्याची, चार गोष्टी सांगण्याची कां आवश्यकता भासावी ?"

## भावलपूरच्या मित्रांना

प्रार्थनेच्या जागीं गांधीजी जेव्हां येत होते, तेव्हां भावलपूरच्या निर्वासितांनीं निदर्शनें केलीं. ७० हजार हिंदू नि शीख भावलपूरमध्यें मागें आहेत, त्यांना वांचवा, अशा घोषणा त्यांनीं केल्या. प्रार्थनेला गांधीजी बसले तेव्हां त्यांनीं अत्यन्त शान्तता धरिली. गांधीजी म्हणाले, " त्यांचें वर्तन प्रशंसास्पद आहे. इतरांनीं अनुकरण करण्यासारखें आहे. भावलपूरचे लोक आज प्रार्थनेंत व्यत्यय आणतील असें मला सांगण्यांत आलें होतें. मीं त्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाहीं. आणि माझ्या अपेक्षेप्रमाणें प्रार्थनेच्या वेळेस त्यांनीं पूर्ण शान्तता पाळली. अलीकडे प्रार्थनासभा अत्यन्त शान्तपणें पार पडतात म्हणून मला किती आनंद होत असतो ! भावलपूरच्या दुःखितांनीं अति संयमानें स्वतःची वेदना प्रकट केली. त्यांचीं दुःखें मी जाणतों.

भावलपूरच्या हिंदू नि शीखांसाठीं शक्य तें सारें करण्यांत येत आहे; असें मी आश्वासन देतों. नबाबसाहेबांचा मला शब्द मिळाला आहे, कीं "मृतांना जरी मी पुन्हां सजीव करीत नसलों, तरी उरलेले हिंदू-शीख येथें सुरक्षितपणें शांन्तीनें राहूं शकतील. त्यांच्या धर्मांत कोणी ढवळाढवळ करणार नाहीं." हिंद-सरकारहि कर्तव्यार्थ जागें आहे; शक्य तें सारें तें करीत आहे. लक्षांत धरा, कीं सिंधमध्यें हिंदू-शीखांची फार मोठी संख्या अडकून पडलेली आहे. त्यांत हरिजनांचीहि पुष्कळ संख्या आहे. त्यांना तिकडे सुरक्षितता वाटत नाहीं. सिंधमधून आतांच आलेली तार मीं वाचली. वर्तमानपत्रांमध्यें कराचीसंबंधीं जें कांहीं आलें आहे, त्यापेक्षां प्रत्यक्ष परिस्थिति किती तरी वाईट आहे, असें त्या तारेंत आहे. माझा त्या सर्वांना एकच सल्ला, कीं धीर सोडूं नका; धैर्य धरा. पराभूत वृत्ति कधीं नका बाळगूं. 'पराभव' हा शब्द कोषांतून काढून टाका. परंतु त्यासाठीं क्रोधावर ताबा ठेवायला आणि प्राप्त परिस्थितींत कर्तव्य काय त्याचा विचार करायला शिकलें पाहिजे. मी दररोज त्याविषयीं सांगतच आहें.

## इराण आणि हिंदुस्थान

आज पर्शियाचे प्रतिनिधी भेटायला आले होते. इराणचे वकील म्हणाले, "हिंदुस्थान आणि इराण फार प्राचीन काळापासून मित्र आहेत. एकाच आर्यशाखेंतील दोघे. हिंदुस्थान ही आशियांतील सर्वांत सामर्थ्यवान् अशी सत्ता आहे. हिंदुस्थानचा मोठेपणा हा आमचाच मोठेपणा. आम्हांलाहि त्यामुळें मोठें वाटतें. हिंदुस्थानचे नि इराणचे दृढ मैत्रीचे संबंध असावेत असें वाटतें." गुरुदेव इराणांत तेथील आमंत्रण आलें होतें म्हणून गेले होते. तेथें जें कांहीं त्यांनीं पाहिलें, त्यामुळें त्यांना आनंद झाला होता. इराणी लोक आपलेच आहेत, असे गुरुदेव त्या वेळेस म्हणाले. हिंदचे नि इराणचे संबंध कोणत्याहि प्रकारें ताणले जाऊं नयेत म्हणून इराणी वकिलानें काळजी व्यक्त केली. तुम्हांला अशी चिंता कां वाटते, म्हणून मीं त्यांना प्रश्न केला. ते म्हणाले, 'मुंबईत कांहीं इराण्यांना सतावण्यांत आलें. कांहीं मारलेहि गेले. लोक बेताल झाले आहेत. रागाच्या भरांत इराण्यांनाहि मुसलमान म्हणून

त्यांनीं ठार केलें असावें. मुंबई-सरकारनें ताबडतोब उपाययोजना केली आहे. प्रान्तिक नि मध्यवर्ती सरकारच्या धोरणानें मला बरें वाटलें. माझ्या सरकारच्या वतीनें मी आश्वासन देतों, कीं हिंदुस्थानांतील बातम्यांचे अतिशोक्त वृत्तान्त गेल्यामुळें जरी कांहीं लोकांना इराणांत गडबड करावी असें वाटत असलें, तरी इराणी सरकार दक्षतेनें आहे. हिंदुस्थानची मैत्री तुटूं नये, म्हणून माझ्या सरकारची मनापासून इच्छा आहे. इराणांतील हिंदू, मुसलमान, शीख व्यापारी आतांपर्यंत तरी पूर्ण शान्तीनें नि गोडीगुलाबीनें नांदत आहेत.

## स्वतः निर्णय घेत जा

एक मित्र पत्रांत म्हणतो, कीं जरी अनेकांनीं नियंत्रणें गेलीं म्हणून तुमचें अभिनंदन केलें असलें, तरी सारेंच कांहीं ठीक नाहीं. या मित्रांना माझें सांगणें, कीं जनतेसमोर तुमचें मत मांडा. लोक हेच माझे हात, डोळे, कान. लोक सांगतात त्यावर मला विश्वास ठेवावा लागतो. म्हणून नियंत्रणें गेल्यामुळें ज्या तारा व पत्रें आलीं तीं मी उपेक्षूं शकत नव्हतों. त्या सर्वांच्या पाठीमागें स्वार्थी हेतूच असेल, असें मला वाटत नाहीं. तथापि, दुसरी बाजूहि जाणून घ्यायला मी तयार आहें. मी पुरस्कारतों म्हणून कोणीहि कांहीं गृहीत धरूं नये असें माझें सांगणें आहे. जर तुमचा अनुभव विरुद्ध सांगत असेल, तर वीस महात्मे आले तरी तुम्ही स्वतःच्या अनुभवाला चिकटून रहा. तरच जें स्वातंत्र्य ( त्या नांवानें म्हणतां आलें तर ) आलें आहे. त्याचा तुम्ही चांगला उपयोग करूं शकाल.

## १२१

११-१-'४८

## प्रार्थना-सभेंत शान्ति

आज रविवार असल्यामुळें प्रार्थना-सभेला गर्दी होती. स्त्रिया आणि मुलें गलका करीत होतीं. प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले, " प्रार्थनेच्या वेळेस किती शान्त असतें म्हणून परवांच मीं तुमचें अभिनंदन केलें.

स्त्रियांना जर बोलल्यावांचून रहावत नसेल, मुलांनाहि गप्प बसायला त्यांनीं शिकवलें नसेल, तर इतरांना त्रास होऊं नये म्हणून त्यांनीं दूर रहावें. प्रार्थनेला अडथळा आणूं नये. ईश्वर सर्वत्र आहे, सर्वशक्तिमान् आहे. तो केवळ कृपासागर आहे. तुम्हां सर्वांसाठीं तोहि दुःखी आहे. प्रार्थना-सभेंत गडबड करुन प्रभूच्या औदार्याचा दुरुपयोग करणें शोभत नाहीं. मला वृद्धाला बघायला, माझे शब्द ऐकायला येतां; परंतु ती कांहीं गंमत नाहीं. मी जें सांगतों त्यांत कांहीं अर्थ असेल, तर तदनुरूप वागायचा प्रयत्न करा."

## आंध्रमधील पत्र

आंध्रमधील एक पत्र आलें आहे. त्यांतील योग्य ते उतारे वाचून दाखवितों :

"व्यक्तीचे दोष दाखवण्याचा मला तिटकारा आहे. परंतु जिचा जन्म उदात्त आहे, जिची कर्तबगारी कौतुकास्पद आहे, अशा कॉंग्रेससारख्या संस्थेंतील सभासदांच्या अधःपातानें जे भीषण परिणाम होत आहेत, तिकडे डोळेझांक करणें घोर पाप होईल. प्रान्तांतून जीं विधिमंडळें आहेत, त्यांत जनतेचे प्रतिनिधी म्हणून जे गेले आहेत, तेच भ्रष्ट होत आहेत. सर्वव्यापी काळाबाजार थांबवायला हवा म्हणून जास्तींत जास्त मोठ्यानें हेच ओरडतात आणि हेच जास्तींत जास्त स्वार्थी कृत्यें पुन्हां करीत असतात! परवाने मिळवून देण्यासाठीं लोकांपासून ते पैसे घेतात. अत्यंत वाईट प्रकारचा काळाबाजार हे करतात. जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेतात. न्यायदान भ्रष्टवतात, नाना नोकरांच्या बदल्या करायला लावतात. आमदार नि नोकरशाही या दोघांच्या मध्यें जनता भरडली जात आहे. आमच्या प्रान्तांत २५० आमदार आहेत. त्यांना कोण रोखणार, विरोध करणार? जनतेवर सोडलेले हे आमदार म्हणजे प्लेग आहे जणूं. किती तरी थोरा-मोठ्यांनीं जीवनें दिलीं, सर्वस्व दिलें, तें का एवढ्याच साठीं, कीं गोरे लुटारू जाऊन काळे यावेत? या घाणींतून मार्ग निघायलाच हवा. हे आमदार इतके नसते, तर भ्रष्टाकार कमी झाला असता. प्रांत पुढें भाषावार झाले म्हणजे लहानच होतील. कनिष्ठ विधिमंडळांत ५०, आणि वरिष्ठ विधिमंडळांत २५ पुरे होतील.

त्यामुळें त्रास कमी होईल. घटना-तज्ज्ञ याचा विचार करतील का? जितके लोक, कमी तितके आपल्या देशाच्या घटनेला बरें. त्यामुळें जनता या लुटारू आमदारांपासून बचावेल. तसेंच वर अपरंपार खर्च होत असतो, त्यापासूनहि नवीन घटना राष्ट्रास वांचवील का?"

## पक्षांना प्रार्थना

या पत्राला पुष्टि देणारें दुसरें एक पत्र वृद्ध अशा जुन्या आंध्र मित्राचें आलें आहे. काँग्रेसवाले, समाजवादी वा कम्युनिस्ट सर्वांना माझी प्रार्थना, कीं देशाच्या कल्याणार्थ जगा नि काम करा. सारेच सत्तेच्या पाठीमागें लागतील, तर हिंदुस्थानचें काय होईल? स्वतःचें, आपल्या मित्रांचें हित पाहण्यापेक्षां देशाच्या हिताचा या सर्वांनीं विचार करावा.

## आत्मघातकी प्रवृत्ति

कांहीं मुसलमान मित्र भेटायला आले होते. कोठवर आम्ही टोंचण्या-बोंचण्या सहन करायच्या, असें त्यांनीं विचारलें. जर काँग्रेस आम्हांला संरक्षूं शकत नसेल, तर तसें स्पष्ट, स्वच्छ सांगण्यांत यावें, म्हणजे आम्ही निघून तरी जाऊं. दररोजची मानहानि टळेल; संभाव्य शारीरिक अपायहि टळतील. हे मित्र सर्वसाधारणपणें दिल्लींतील मुसलमानांविषयीं बोलत होते. माझें यांना सांगणें, कीं आपापल्या जागीं असा. धर्म राजकरणांत मिसळूं नका, असें सर्व राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना माझें सांगणें आहे. तुम्ही सारे आधीं नि अखेरीस हिंदी म्हणून आहांत. धर्म ही व्यक्तिगत बाब आहे. काळ कठिण आहे. पाकिस्तानांतील मुसलमान बेताल झाले आहेत. त्यांनीं बहुतेक हिंदू नि शीख हांकलून लावले आहेत. हिंदमधील हिंदूहि असेंच करतील, तर ते स्वतःचा नाश करून घेतील. दुसऱ्यास दडपणें आत्मघातकी असतें. योग्य विचार करणाऱ्या सर्वांनीं ही आत्मघातकी वृत्ति वाढूं नये म्हणून प्रयत्न करावा.

## १२२

१२-१-'४८

## सार्वभौम सल्लादाता परमेश्वर

गांधीजी म्हणाले, आरोग्याच्या नियमानुसार कोणी प्रकृतीसाठीं उपवास

करतो; कोणी स्वतःच्या हातूत घडलेल्या चुकीसाठीं तसें वाटतें म्हणून प्रायश्चित्तरूप उपवास करतो. या दोन्ही प्रकारच्या उपवासांत उपवास करणाऱ्याची अहिंसेवर श्रद्धा असण्याची आवश्यकता नाहीं; परंतु तिसरा एक उपवास करण्याचा प्रकार आहे. अहिंसेच्या उपासकाला कधीं कधीं उपवास करण्यावांचून गत्यंतर नसतें. समाज जेव्हां अन्याय करतो, आणि तो दूर करायला जेव्हां अहिंसेच्या उपासकाजवळ अन्य उपाय नसतो, तेव्हां त्या अन्यायाच्या विरुद्ध म्हणून तो उपवासास प्रवृत्त होतो. असाच प्रसंग माझ्या-समोर आला आहे.

कलकत्त्याहून ९ सप्टेंबरला मी दिल्लीस आलों. पश्चिम पंजाबला जाण्यासाठीं म्हणून आलों. परंतु तें जाणें नव्हतें व्हायचें. आनंदी दिल्ली मृतवत् दिसली. गाडींतून उतरलों तेव्हां सर्वांच्या मुद्रेवर चिंता दाटलेली दिसली. सरदार नेहमीं विनोद करणारे, आणि विनोदामुळें मिळणाऱ्या आनंदानें आनंदी असणारे; परंतु तेहि अपवाद नव्हते. मला कारण कळेना. मला व्यायला ते स्टेशनवर आले होते. राजधानींत घडलेल्या अत्याचारी हकिकती त्यांनीं लगेच मला सांगितल्या. मीं दिल्लींतच राहणें आवश्यक, येथेंच केलें पाहिजे वा मेलें पाहिजे, असें तत्क्षणीं माझ्या ध्यानांत आलें. पोलीस आणि लष्कर यांच्या तडकाफडकी उपयोगामुळें वरपांगी शान्ति आहे. परंतु आंत तुफान आहे. तें केव्हांहि उठेल. करीन म्हणून जी प्रतिज्ञा केली, ती या वरपांगी शान्तीनें पुरी झाली असें मला वाटत नाहीं. ती प्रतिज्ञा पुरी झाली, तरच मी जगूं शकतों; ज्याच्यासारखा मित्र नाहीं अशा मृत्यूपासून दूर राहूं शकतों. हिंदू, शीख, मुसलमान यांच्यांत खरी अंतः-करणपूर्वक मैत्री यावी म्हणून माझें हृदय तहानलें आहे. परवांपर्यंत ती मैत्री होती. आज ती कोठेंच नाहीं. देशभक्त म्हणवून घेणाऱ्या कोणाहि माणसास शान्तीनें हें सारें कसें पाहवेल ? अंतःकरणांतील आवाज कधींपासून हांक मारीत आहे. परंतु मीं मुद्दाम कान बंद केले होते. कदाचित् सैतानाचा, म्हणजेच माझ्या दुबळेपणाचा हा आवाज असेल, असें मी मनांत म्हणें. सारे उपाय थकले असें मानणें मला कधींच आवडत नाहीं. सत्याग्रहीनें कधींहि निरुपाय होतां कामा नये. तरवारीच्या ऐवजीं मला

किंवा दुसऱ्याला शेवटचा उपाय उपवास हा असतो. दररोज मुसलमान मित्र भेटायला येतात. काय करूं म्हणून विचारतात. मी त्यांना उत्तर देऊं शकत नाहीं. अलीकडे माझी कर्महीनता मला चावत असते. उपवासानें तत्काळ मला शान्ति मिळेल. गेले तीन दिवस याचा मी सारखा विचार करीत आहें. अखेरचा निर्णय विजेप्रमाणें आला. मला त्यानें सुखी वाटत आहे. जो शुद्ध आहे, त्याला स्वतःच्या प्राणांहून अधिक मोलवान् असें द्यायला काय आहे ? जें पाऊल मी टाकीत आहें, त्याचें समर्थन करण्याइतपत विशुद्धता माझ्याजवळ आहे असें मला वाटतें; ती असावी अशी माझी प्रार्थना आहे.

## आशीर्वाद द्या

माझ्या प्रयत्नाला तुम्ही सारे आशीर्वाद द्या. माझ्यासाठीं नि माझ्या समवेत प्रार्थना करा. उद्यां दुपारचें जेवण झालें, कीं उपवास सुरू होईल. हा अनिश्चित कालमर्यादेचा उपवास आहे. मी मीठ घालून किंवा साधेंच पाणी पिईन. लिंबाचे थेंब कधीं वाटले, तर त्यांत घेईन. कोणाचें बाह्य दडपण न पडतां कर्तव्याचें भान येऊन जेव्हां सर्व जातिजमातींचें हृदयैक्य झालें आहे असें मला वाटेल, तेव्हां उपवास सुटेल. हिंदुस्थानची प्रतिष्ठा घसरत आहे. आशियाच्या आणि तद्द्वारा जगाच्या हृदयावर भारताची असलेली प्रभुता झपाट्यानें मावळत चालली आहे. ही प्रतिष्ठा, ही प्रभुता पुन्हां मिळेल. हेंच बक्षीस. हिंदुस्थाननें आत्मा गमावणें म्हणजे दुःखी, कष्टी, वादळांत हेलकावणाऱ्या बुभुक्षित जगाची आशा नष्ट होणें होय, असें मला वाटतें खरें. कोणाहि मित्रानें किंवा कोणी असेलच, तर शत्रूनें, मजवर रागवूं नये. मानवी मन चांगल्या मार्गावर यावें म्हणून उपवास करणें कांहीं मित्रांना पसंत नाहीं. अशा उपायानें कांहीं होईल असें त्यांना वाटत नाहीं. परंतु स्वतःसाठीं जें कृतिस्वातंत्र्य ते मागतात तेंच त्यांनीं कृपा करून मलाहि द्यावें. ईश्वरच माझा सार्वभौम सल्लागार. दुसऱ्या कोणाचा सल्ला न घेतांच निर्णय घ्यावा, असें मला वाटलें. आपण चूक केली असें मला आढळलें, तर मीच मोठ्यानें तसें सांगेन आणि पाऊल मागें घेईन. परंतु चूक केली आहे

असें बहुधा मला आढळणार नाहीं. तशी फारशी शक्यता नाहीं. आंतील आवाज स्पष्ट दाखवीत असेल, तर चूक होणें अशक्य. आणि मला तर आंतून निःशंकपणें वाटत आहे. मला चर्चा करायची नाहीं. मी जें पाऊल टाकीत आहें, त्याला सर्वांनीं अपरिहार्यपणें मान्यता द्यावी. सारा हिंदुस्थान जर कर्तव्य करायला प्रवृत्त होईल, निदान दिल्ली कर्तव्य करायला उभी राहिली, तरीहि माझा उपवास सुटेल.

## मृदुता नको

परंतु उपवास लौकर सुटतो कीं उशीरां, कीं सुटतच नाहीं, ती गोष्ट बाजूस असो. आज आणिबाणीची परिस्थिति आहे. गुळमुळीतपणें वागून भागणार नाहीं. टीकाकारांनीं माझे पूर्वींचे कांहीं उपवास सक्ती करणारे म्हणून संबोधिले. तुमच्या उपवासामुळें दडपण पडतें, नाहीं तर तुमच्या बाजूला न्याय दिसणार नाहीं, तुमची बाजू लंगडी दिसेल, असें ते म्हणत. परंतु जोंपर्यंत हेतु शुद्ध आहे तोंवर निकाल विरुद्ध गेला, तरी त्याची काय मातब्बरी ? शुद्ध उपवासाचें—कर्तव्याचें कर्तव्य हेंच बक्षीस त्याप्रमाणें—शुद्ध उपवास हेंच बक्षीस. उपवासानें जो काय परिणाम कदाचित् येणार असेल, त्यासाठीं मी तो करीत नाहीं. मला केलाच पाहिजे म्हणून तो मी करीत आहें. म्हणून निर्विकार बुद्धीनें माझ्या हेतूचें परीक्षण करा, असें माझें सर्वांना सांगणें आहे. आणि मरावेंच लागलें, तर मला शान्तीनें—जी खात्रीनें असेल—मरूं दे. हिंदुस्थानचा हिंदुधर्म, शीखधर्म, इस्लाम, या सर्वांच्या नाशाचा अगतिक साक्षी म्हणून जगण्यापेक्षां मरण आलें, तर ती भव्य मुक्तीच होय. जर पाकिस्तान नाना धर्मांच्या लोकांना समान नागरिकत्व देणार नसेल, जीवित-वित्ताच्या संरक्षणाची हमी घेणार नसेल, आणि हिंदुस्थानहि त्याचेंच अनुकरण करणार असेल, तर सर्वांचा नाश निश्चित आहे. इस्लाम हिंदुस्थानच्या दोन भागांतील मरेल; परंतु जगांत इतरत्र तो राहील. हिंदुधर्म नि शीखधर्म यांना हिंदुस्थानबाहेर दुनिया नाहीं. माझ्याशीं मतभेद असणारे दुराराध्यपणें जरी मला विरोध करीत असले, तरी त्यांनाहि मी मानतों. माझ्या उपवासानें सदसद्विवेक बुद्धि जागृत

होवो, ती मृतवत् न पडो. या प्रिय भरतभूमींत काय घाण भरली आहे, क्षणभर विचार तरी करा आणि मग या देशाचा एक विनम्र पुत्र हें सुखदायी पाऊल टाकायला पुरेसा समर्थ आणि बहुधा पुरेसा विशुद्ध असा उभा राहिलेला पाहून तुम्ही आनंदाल. जर तो समर्थ नसेल नि शुद्धहि नसेल, तर तो भूभार होय. जितक्या लौकर तो पडद्याआड जाईल आणि हें ओझें भारतीय वातावरणांतून दूर करील, तितकें त्याला आणि इतरांनाहि बरें !

बिर्लाभवनांत कोणी गर्दी करूं नये, मला परावृत्त करायचा कोणी प्रयत्न करूं नये, माझी चिंताहि करूं नये, अशी सर्वांना माझी प्रार्थना आहे. मी ईश्वराच्या हातांत आहें. आजचा काळ सर्वांच्या कसोटीचा आहे. सर्वांनीं आत्मनिरीक्षण करावें. जे कर्तव्यस्थानीं उभे राहून काळजीपूर्वक तें करीत राहतील, आतांपर्यंत करीत त्याहूनहि अधिक मनःपूर्वक करतील, तर त्यामुळें मला नि माझ्या हेतूच्या पूर्तीला त्यांची मदत होईल. उपवास म्हणजे अन्तःशुद्धीची प्रक्रिया.

## आत्मशुद्धीसाठीं हांक

काल मीं आंध्रमधून दोन पत्रें आलीं म्हणून म्हटलें. दुसरें पत्र त्या वृद्ध मित्राचें, देशभक्त कोंडा वेंकटपय्या यांचें हातें. त्यांतील कांहीं उतारे वाचतों :

" गुंतागुंतीचे असे राजकीय नि आर्थिक प्रश्न पुष्कळच आहेत. परंतु काँग्रेसच्या गोटांतील लोकांचा नैतिक अधःपात हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. मी इतर प्रांतांविषयीं फारसें बोलूं शकणार नाहीं. माझ्या प्रांतापुरतेंच म्हणायचें, तर परिस्थिति फारच खेदजनक आहे. राजकीय सत्तेची गोडी लागल्यामुळें त्यांचीं डोकीं फिरून गेलीं आहेत. किती तरी आमदार (वरिष्ठ नि कनिष्ठ) तापल्या तव्यावर पोळ्या भाजून घेत आहेत. आपल्या वजनाचा उपयोग करून पैसे कमावीत आहेत; न्यायदानांतहि अडथळे आणीत आहेत. मामलेदारांच्या फौजदारी कोर्टांत यांची लुडबूड चालू असते. आमदारांच्या वरचेवर लुडबुडीमुळें जमाबंदी-खात्याच्या अधिकाऱ्यांना, कलेक्टरांनाहि नीट कर्तव्य पार पाडतां येत नाहीं. आपापल्या लोकांच्या बाजूनें न्याय मिळावा, आपल्या

नि. ११११
३६३४४/३५२

गोतावळ्यांतील लोकांचें कार्य व्हावें म्हणून यांची नसती उठाठेव ! शिस्तीचा आणि प्रामाणिक असा अधिकारी आजकाल आपली जागा सांभाळूं शकत नाहीं. कारण खोटेंनाटें त्याच्या विरुद्ध मंत्र्यांच्या कानीं घालतात. आणि मंत्रीहि उथळ कानाचे, त्या तत्त्वहीन स्वार्थी लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष देतात.

स्त्री-पुरुष पूर्वी तुमच्या नेतृत्वाकडे वळले; कारण स्वराज्य हेंच एक सर्वव्यापी ध्येय होतें. परंतु तें ध्येय हस्तगत झाल्यावर आज सर्व नैतिक बंधनें शिथिल झालीं आहेत. ज्यांनीं पूर्वी स्वातंत्र्याच्या युद्धांत भाग घेतला, तेच आज ज्यांनीं स्वातंत्र्याच्या लढ्याला कट्टर विरोध केला अशांशीं हस्तांदोलन करीत आहेत, त्यांच्याशीं संगनमत करीत आहेत. पूर्वीचे कट्टर विरोधक आज स्वार्थासाठीं चार आणे सभासद होत आहेत. दररोज परिस्थिति अधिकाधिक असह्य होत चालली आहे. काँग्रेस आणि काँग्रेस-सरकार यांमुळें बदनाम होत आहेत. आंध्रमध्यें नुकत्याच स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकी झाल्या. काँग्रेसचें वजन कसें झपाट्यानें कमी होत आहे, तें त्या वेळेस स्पष्टपणें दिसून आलें. गुन्टूर शहरांतील म्युनिसिपल निवडणुकीची सर्व तयारी झाली होती. परंतु स्थानिक स्वराज्य-मंत्र्यांचा ऐनवेळीं संदेश येतो, कीं निवडणुकी थांबवा. गेलीं दहा वर्षे सरकारनियुक्त समिति कारभार पाहात आहे. गेलें वर्षभर म्युनिसिपल कारभार एका कमिशनरच्या हातीं आहे. आतां अशी वार्ता फैलावली आहे, कीं शहराच्या म्युनिसिपल कारभारासाठीं सरकार सभासद नेमणार आहे. मी आतां वृद्ध आहे. पाय मोडला आहे. कुबड्यांच्या आधारानें लंगडत चालतों. घरांतल्या घरांत कसा तरी वावरतों. मला कोणावर सूड उगवावयाचा नाहीं. कोणाचें उट्टें काढावयाचें नाहीं. कांहीं जिल्हा नि प्रांतिक समित्यांच्या विरुद्ध माझें तीव्र मत आहे. त्या समित्यांतहि दोन पक्ष पडले आहेत. परंतु मीं माझीं मतें कधीं लपवून ठेवलीं नाहींत.

काँग्रेसमधील दुफळी दोन्ही विधिमंडळांतील अनेक आमदारांचा पैसे कमावण्याचा धंदा, मंत्र्यांचा दुबळेपणा, या सर्व गोष्टींमुळें सामान्य जनतेंत बंडखोर वृत्ति बळावत आहे. 'ब्रिटिश सरकारच बरें होतें' असें लोक म्हणत आहेत आणि काँग्रेसला शिव्या देत आहेत."

हिंदुस्थानच्या या स्वार्थत्यागी सेवकाचे शब्द आंध्र प्रान्तांतील आणि

अन्य प्रान्तांतील लोकांनींहि तोलून बघावे. ते म्हणतात तें बरोबर आहे, कीं आन्ध्रपुरताच हा सारा भ्रष्ट कारभार आहे असें नाहीं. इतरत्रहि तोच प्रकार. परंतु आन्ध्रचा निर्विवाद पुरावा ते मांडूं शकतात. लोकांनीं सावध व्हावें.

भावलपूरच्या मित्रांना धीर धरायला मीं सांगितलें आहे. सरदार दुपारीं मला भेटले होते. परंतु मौन असल्यामुळें व इतर कामांत व्यग्र असल्यामुळें मी लिहूं वा बोलूं शकलों नाहीं. श्री. शंकरहि त्यांच्या कचेरींतल्या फार कामामुळें येऊं शकले नाहींत. या मित्रांची बाजू सरदारांपुढें म्हणून मी मांडूं शकलों नाहीं. सरदारांचाहि मोलाचा वेळ उगीच गेला.

## १२३

१३-१-'४८

नेहमींप्रमाणेंच गांधीजी प्रार्थनेला आले. प्रार्थनेनंतर म्हणाले, मी प्रार्थनेच्या जागीं चालत आलों म्हणून तुम्हांला आश्चर्य नको वाटायला. पहिल्या चोवीस तासांत उपवासामुळें कोणासहि थकवा येत नसतो. जो मधूनमधून २४ तासांचा उपवास करतो, त्याला त्यानें सामान्यतः फायदाच होतो. उद्यां कदाचित् मी येऊं नाहीं शकणार. तुम्हांला प्रार्थनेची उत्सुकताच असेल तर या; मी नसलों, तरी तुमच्याबरोबर मुली प्रार्थना म्हणतील.

## भावलपूरचे निर्वासित

काल मीं म्हटलें, कीं सरदारांच्या कचेरींतील श्री. शंकर यांना फार कामामुळें येतां आलें नाहीं. परंतु माझा थोडा गैरसमज झाला होता असें आज मला कळलें. श्री. शंकर भावलपूरच्या निर्वासितांच्या बाबतींतच माझ्याकडे येणार होते. ते येऊं शकणार नाहींत असें मणिबेन मला म्हणाल्या. आज मणिबेन यांनीं खुलासा केला, कीं शंकर २ वाजेपर्यंत येऊं शकणार नाहींत, नंतर केव्हांहि येऊं शकतील, असें मीं सांगितलें. मी बरोबर संदेश ऐकूं शकलों नाहीं, किंवा त्यांतील कांहीं भाग विसरलों, म्हणून मी दिलगीर आहें. त्यांना दिवसभर काम आहे असें मी समजलों यांत कांहीं गैर नव्हतें. सरकारी नोकरांनीं खाजगी व्यक्तींकडे खेटे घालावे असें मी कधींच

अपेक्षिणार नाहीं. परंतु श्री. शंकर माझ्याकडे दुसऱ्या कोणत्या तरी वेळीं येण्याची कृपा करणारच आहेत. भावलपूरच्या निर्वासितांचें समाधान करण्यासाठीं म्हणून मी हें सांगत आहें.

## दोषार्ह कोण?

उपवासासाठीं तुम्ही कोणाला दोष देतां, म्हणून मला प्रश्न विचारण्यांत आला. मी कोणा व्यक्तीला वा जमातीला दोष देत नाहीं. परंतु जर हिंदू आणि शीख दिल्लीच्या मुसलमानांना घालवायचेंच असें ठरवीत असतील, तर ते देशाचें व आपापल्या धर्मांचेंहि नुकसान करीत आहेत असें मला वाटतें. या गोष्टीचें मला दुःख होतें.

मला मुसलमानांबद्दल फक्त सहानुभूति वाटते, त्यांच्यासाठीं मीं उपवास सुरू केला, असे टोमणे कांहींनीं मला मारले आहेत. त्यांचें म्हणणें बरोबर आहे. मी सर्व जीवनावधि अल्पसंख्य लोकांची, किंवा ज्यांना ज्यांना गरज असे त्यांची बाजू घेऊन सदैव उभा राहिलों आहें; आणि असेंच प्रत्येकानें उभें राहिलें पाहिजे. पाकिस्तानचा परिणाम हा झाला आहे, कीं हिंदी संघराज्यांतील मुसलमानांचा स्वाभिमान नि आत्मविश्वास नष्ट झाला आहे. असें व्हावें याचें मला दुःख वाटतें. एकाद्या राष्ट्रांतील कांहीं लोक आत्मविश्वासरहित असावेत, तसे ते ठेवले जावेत, अशानें तें राष्ट्र दुर्बळ होतें. माझा उपवास मुसलमानांच्याहि विरुद्ध आहे. त्यांनींहि हिंदू आणि शीख यांची बाजू घेऊन उभें रहावें. माझ्या उपवासानें त्यांना तसें सामर्थ्य द्यावें. उपवासकाळांत हिंदू आणि शीख यांच्याप्रमाणेंच मुसलमानांनींहि काम करायचें आहे. एक गोष्ट उदारणार्थ त्यांनीं आधीं सुधारावी. ती ही कीं ते नेहमीं माझी नि जवाहरलालांची स्तुति करीत असतात आणि सरदारांना दोष देत असतात. एका रात्रींत मुस्लिम लीगवाले मित्र होऊं शकणार नाहींत, असें सरदार म्हणाले होते. ते उद्गार घेऊनच कांहीं मुसलमान कुरबूर करीत असतात. परंतु सरदार असें बोलले म्हणून मी ज्याप्रमाणें त्यांना दोष देत नाहीं, त्याप्रमाणेंच मुसलमानांनींहि देऊं नये. सरदारांचें म्हणणें शब्दांनीं नि घोषणांनीं नव्हे, तर कृतीनें खोटें पाडा, असें मुस्लिम लीगवाल्या मित्रांना

माझें सांगणें आहे. पंडितजींची पद्धति आणि रीतभात सरदारांसारखी नसली, तरी ते सरदारांना आपले महत्त्वाचे नि मोलाचे सहकारी मानीत आहेत, हें विसरून चालणार नाहीं. सरदार मुसलमानांचे शत्रू असते, तर पंडितजी त्यांना राजीनामा द्यायला सांगते. सरदार आज माझें वेदवाक्य मानीत नसले, तरी ते माझे थोर मित्र आहेतच. मंत्रिमंडळाचें स्वरूपहि माझ्या मित्रांनीं ध्यानांत घेतलें पाहिजे. मंत्रिमंडळांतील कोणा एकाच्या कामाबद्दल सारे जबाबदार आहेत. सर्वांची सामुदायिक जबाबदारी तेथें आहे. अंतःकरणाची पुरी शुद्धि व्हावी, अशी माझी इच्छा आहे. दिल साफ असेल, तर परस्पर-विश्वास नि आदर राहतील. तुम्ही सारे या हिंदी संघराज्यांतील प्रजाजन. हें हिंदी संघराज्य हक्कानें तुम्हां सर्वांचें आहे. याच्याहून कमी गोष्टीसाठीं मी उपवास सोडणार नाहीं. इतकें तरी मला मिळालेंच पाहिजे. अंतःकरणांतून सैतान घालवा नि ईश्वराला तेथें अभिषेक करा.

## हिंदू आणि शीखांचें कर्तव्य

हिंदू आणि शीख यांचें कर्तव्य काय ? आतांच गुरुदेवांचें गीत तुम्हीं ऐकलेंत. " कोणीच तुझ्या हांकेला ओ न देईल तर एकटा जा, एकटा जा " असें तें गीत सांगत आहे. हें गीत मला फार प्रिय आहे. नौखालींतील माझ्या पायीं यात्रेच्या वेळेस हें गीत रोज म्हणण्यांत येई. शेवटचा श्वास असेपर्यंत मी सांगत राहीन, कीं " पाकिस्तानांत कांहीं होवो, हिंदी संघ-राज्यांतील एकाहि मुसलमानाच्या विरुद्ध आम्ही बोटहि उचलणार नाहीं " असें हिंदू आणि शीख यांनीं शौर्यानें जाहीर करावें. कितीहि संतापजनक घटना झाल्या, तरी आम्ही भ्याडपणाचीं कृत्यें करणार नाहीं, असें सांगण्याचें धैर्य त्यांनीं दाखवावें.

## दिल्लीची कसोटी

खऱ्या अर्थानें दिल्ली जर शांत झाली, तर मी उपवास सोडीन. दिल्ली हिंदची राजधानी. दिल्लीचा नाश, दिल्लीचा अधःपात, म्हणजे हिंदचा नि पाकचा नाश नि अधःपात. दिल्ली सर्व मुसलमानांसाठीं सुरक्षित स्थान होवो. शहीद सुऱ्हावर्दी यांच्यासारख्यांनाहि येथें सुरक्षित वाटो.

गुंडांचा राजा म्हणून त्यांच्याकडे पाहण्यांत येत असतें. ज्यांची गुंडगिरी सिद्ध झाली असेल त्या सर्वांना अटक करा. परंतु शहीद सुऱ्हावर्दींनीं कलकत्त्यांत मनापासून शांतीसाठीं काम केलेलें मीं जातीनें पाहिलें आहे. हिंदूंचीं घरें बळकावून बसलेल्या मुसलमानांना हातांनीं त्यांनीं बाहेर खेंचलें आहे. ते माझ्याबरोबर रहात आहेत. ते प्रार्थनेंत सामील व्हायला उत्सुक असतात; परंतु अपमान कदाचित् होईल म्हणून मीच त्यांना येऊं देत नाहीं. तुमच्यांतील मोठ्यांतल्या मोठ्या माणसाला दिल्लींत जसें सुरक्षितपणाचें वाटत असेल, तसेंच शहीदसाहेबांना, प्रत्येक मुसलमानाला वाटूं दे.

खरी शांति यायला किती दिवस लागतील त्याची मला फिकीर नाहीं. एक दिवस लागतो, कीं एक महिना, याला महत्त्व नाहीं. अकालीं उपवास सोडण्याच्या मोहांत कोणी मला पाडूं नये; असें कोणी करूं नये, बोलूं नये. माझे प्राण वांचविणें हा हेतु नसो. हिंदुस्थानला वांचवणें, हिंदुस्थानची प्रतिष्ठा सांभाळणें हें ध्येय असो. अलीकडे जें घडलें, तें सांगण्याची मला इच्छा नाहीं. परंतु त्यानें हिंदुस्थानची मान खालीं झाली आहे. तशी ती पुन्हां खालीं होऊं देऊं नका. म्हणजे मला अभिमान नि आनंद वाटेल.

## १२४

१४-१-'४८

प्रार्थनेला येणाऱ्या लोकांना वाचून दाखविण्यासाठीं म्हणून गांधीजींनीं तिसरे प्रहरीं तोंडीं सांगितलेला संदेश लिहून घेण्यांत आला होता. परंतु स्वतःच येऊन बोलण्याचें त्यांनीं मागून ठरविलें. ते म्हणाले, "डॉक्टरांचा सल्ला बाजूला सारून मी आलों आहें. परंतु उद्यांपासून मात्र मी बहुधा चालत येऊं शकणार नाहीं. आज शक्ति होती. तीहि खर्चूं नका म्हणून डॉक्टर सांगत होते. मी ईश्वराच्या हातांत आहें. मीं जगावें अशी त्याची इच्छा असेल, तर मी मरणार नाहीं. ईश्वरावरील माझी श्रद्धा दुबळी व्हावी अशी माझी इच्छा नाहीं."

### तारांचा, पत्रांचा वर्षाव

तिसरे प्रहरीं सांगितलेल्या तोंडीं संदेशांतील मुद्द्यांचा उल्लेख न करतां



२०

गांधीजी म्हणाले, " दुरून, जवळून तारा येत आहेत. कांहीं तारा महत्त्वाच्या आहेत, अर्थगंभीर आहेत. माझ्या निर्धाराचें अभिनंदन करून ईश्वराच्या हातीं त्या मला सोपवीत आहेत. कांहीं तारा अत्यन्त मैत्रीभावाच्या निदर्शक आहेत. 'उपवास सोडा; जात, धर्म, संप्रदाय मनांत न आणतां शेजाऱ्यांशीं आम्ही प्रेमस्नेहानें वागूं, तुमच्या उपवासांतील संदेशानुरूप वागण्याची कोशीस करूं' असें आश्वासन या तारा देत आहेत. सारख्या तारा येतच आहेत. त्यांतील निवडक तारा प्रसिद्धीस द्या, असें श्री. प्यारेलालजींस मीं सांगितलें आहे. हिंदू, शीख, मुसलमान, आणि इतर लोक सर्वांच्या तारा आहेत. कांहीं तारा संस्थांतर्फे, संघटनांतर्फे आहेत. आश्वासनें देणारे जर प्रामाणिकपणें तदनुरूप वागतील, तर माझा उपवास लौकर सुटायला त्यामुळें मदत होईल. श्रीमती मृदुलाबेन लाहोरला आहेत. पाकिस्तानमधील अधिकाऱ्यांशीं नि सर्वसामान्य मुसलमानांशीं त्यांचा तेथें परिचय आहे. त्या विचारतात, " येथें गांधीजींचे अनेक मित्र आहेत. गांधीजींच्या प्रकृतीविषयीं त्यांना चिंता वाटते. या बाजूला आम्हीं काय करावें अशी गांधीजींची इच्छा आहे, असें ते विचारतात. पाकिस्तानांतील मुस्लिम मित्रांपासून, राजकीय पक्षांतील किंवा सरकारी नोकरींतील मुस्लिम मित्रांपासूनहि गांधीजी काय अपेक्षितात ?" माझ्या प्रकृतीची काळजी करणारे मुस्लिम मित्र आहेत, या विचारानें समाधान वाटलें. विशेषतः मृदुलाबेनपाशीं त्यांनीं जी माहिती विचारली त्यामुळें मला अधिक बरें वाटलें. संदेश पाठविणाऱ्या आणि लाहोरांतील माहिती मागणाऱ्या सर्वांना माझें सांगणें, कीं उपवास हा शुद्धीचा मार्ग आहे. उपवासाच्या हेतूविषयीं ज्यांना ज्यांना सहानुभूति वाटत असेल, त्या सर्वांना आत्मशुद्धीच्या या कार्यासाठीं आवाहन आहे. मग ते पाकिस्तान सरकारच्या नोकरींत असोत, वा राजकीय पक्षोपपक्षांत असोत, वा अन्यत्र असोत.

## पाकिस्तानला दोन शब्द

कराचींतील शीखांवर केलेल्या भ्याड हल्ल्याची हकिकत तुम्हीं ऐकलीच आहे. निरपराधी स्त्री-पुरुषांची, मुलांबाळांची कत्तल करण्यांत आली. त्यांची

चीजवस्त लुटण्यांत आली. इतरांना पळावें लागलें. आतां गुजरात येथें निर्वासितांच्या आगगाडीवर हल्ला चढवल्याची बातमी आली आहे. सीमाप्रांतीय निर्वासितांना घेऊन ही गाडी येत होती. किती तरी मारले गेले, स्त्रियांचें अपहरण झालें, असें कळतें. मला वेदना होतात. हिंदी संघराज्यसरकारनें कोठवर हें सारें सहन करायचें ? मी उपवास करीत असलों, तरी हिंदू आणि शीख यांच्या सहनशीलतेचा मी तरी कोठवर अंत पाहूं ? पाकिस्ताननें या प्रकारास आळा घातलाच पाहिजे. त्यांनीं आपलीं अंतःकरणें शुद्ध करावीं. हिंदू आणि शीख पाकिस्तानांत परत येऊन नीट सुरक्षित राहूं लागेपर्यंत त्यांनीं स्वस्थ नये बसूं.

हिंदुस्थानभर अंतःशुद्धीची लाट उचंबळली, तर पाकिस्तानहि पाक होईल. झालें-गेलें तेथें विसरलें जाईल. भूतकालीन भेद दूर होतील. पाकिस्तानांतील तुच्छांतील तुच्छासहि कायदेआझमांइतका मान मिळेल; त्यांच्याइतकें जीवितवित्ताच्या बाबतींत संरक्षण त्याला मिळूं शकेल. असें पाकिस्तान चिरंजीव होईल. पाकिस्तान म्हणजे पाप असें मीं पूर्वी म्हटलें, आजहि तेंच मला म्हणावें लागत आहे. काय करायचें ? परंतु जर पाकिस्तान मीं मघां म्हटलें तसें वागणारें झालें, तर मीं त्याला पाप म्हटलें याचें मला वाईट वाटेल. मग मला असें म्हटल्याचा पश्चात्ताप होईल. परंतु तोंवर नाहीं. तें ध्येयभूत पाक पाकिस्तान, कागदावर, पाकिस्तानी वक्त्यांच्या वक्तृत्वांत बघण्याची मला इच्छा नसून पाकिस्तानी मुसलमानांच्या दैनंदिन व्यवहारांत बघण्यासाठीं जागयची मला इच्छा आहे. मग हिंदी संघराज्यांतील जनताहि आपलें कधीं वैर होतें, ही गोष्ट विसरून जाईल. आणि हिंदी संघराज्यहि अभिमानानें पाकिस्तानचा उच्च आदर्श गिरवूं लागेल. असें म्हणण्यांत मी चूक करीत आहें असें नाहीं मला वाटत. मी जिवंत असलों, तर हिंदी संघराज्याला सांगेन, कीं भलें करण्यांत पाकिस्तानला मागें टाका. उपवास यासाठीं आहे. याहून कमी नाहीं चालणार. पाकिस्ताननें जें वाईट केलें त्याचाच कित्ता तत्काळ आपणहि गिरवला, असें हिंदी संघराज्यांतील आपणांस आज नामुष्कीनें नि शरमेनें म्हणावें लागत आहे.

## माझें स्वप्न

मी लहान होतों. राजकारणाचें त्या वेळेस मला कांहींहि कळत नव्हतें. परंतु तेव्हांहि सर्व जातींच्या हृदयैक्याचें स्वप्न मी मनांत खेळवीत असें. तें स्वप्न जीवनांत पूर्ण झालेलें दिसून आयुष्याच्या सायंकाळीं लहान मुलाप्रमाणें मला उडी मारूं दे. प्राचीन ऋषींनीं १२५ वर्षांची आयुर्मर्यादा ठरवली आहे. हें संपूर्ण जीवन जगावें असें मला पुनरपि मग वाटूं लागेल. असें स्वप्न पूर्ण व्हावें म्हणून कोण आपले प्राण पणास लावणार नाहीं? तेव्हांच खरें स्वराज्य येईल. तेव्हांच आपण कायदेशीर रीत्या नि भौगोलिक दृष्ट्या जरी दोन राष्ट्रें असलों, तरी व्यवहारांत आपण दोन आहोंत असें वाटणार नाहीं. माझ्या समोरचें ध्येय अति भव्य आहे. तें प्रत्यक्षांत येणें मला कठिण वाटत आहे, जसें तुम्हांसहि वाटत असेल. परंतु एका प्रख्यात चित्रकारानें चितारलेल्या एका प्रख्यात चित्रांतील लहान मुलाप्रमाणें हें ध्येय मिळेपर्यंत मी सुखी होणार नाहीं. जर लोक पूर्णपणें अंतःशुद्धि करतील, तर भारताची ते सेवा करतील आणि माझ्या उपवासाचा काळहि कमी करतील, अशी मला खात्री वाटते. माझी कोणी चिंता नका करूं. स्वतःची सुधारणा कशी करायची, देशाच्या हितार्थ काम कसें करायचें, याचीच फक्त तुम्ही चिंता करा. सर्वांना एक दिवस मरायचेंच आहे. मृत्यूला कोण चुकवणार? मग त्याची डर तरी कशाला? खरें पाहिलें, तर दुःखक्लेशांपासून सोडविणारा मृत्यु हा मित्र आहे."

## तिळतिळ मारणें

गांधीजींनीं जो संदेश तोंडीं सांगितला होता त्यांत ते म्हणतात :

काल सायंकाळच्या माझ्या प्रार्थनोत्तर भाषणानंतर दोन तासांनीं वृत्तपत्रांचे वार्ताहर मला भेटूं इच्छीत होते. कांहीं शंकांचें निराकरण करून घ्यायला आम्ही आलों आहोंत, असें ते म्हणाले. दिवसभरच्या अपार कामामुळें मी थकलों होतों म्हणून चर्चेसाठीं त्यांना बोलवायचें मनांत येईना. "क्षमा करा; तुमचे प्रश्न लिहून आणून उद्यां सकाळीं द्या" असा निरोप त्यांना श्री. प्यारेलालांबरोबर पाठवला. त्याप्रमाणें त्यांनीं सकाळीं प्रश्न आणून दिले.

**पहिला प्रश्न:**—" हिंदी संघराज्यांत कोठेंहि कोणत्याच प्रकारची दंगल नसतां तुम्हीं उपवास कां सुरू केलांत ? "

**माझें उत्तर:**—" मुसलमानांचीं घरें बळजबरीनें ताब्यांत घेण्यासाठीं संघटितपणें नि निश्चयानें प्रयत्न करणें, मोठ्या जमावानें या रीतीनें वागणें, म्हणजे का अत्याचार नव्हे ? अशान्त करणारी दंगल नव्हे ? पोलिसांना अखेर अश्रुवायु सोडावा लागला; हवेंत कां होईना गोळीबार करावा लागला; तेव्हां कोठें लोक पांगले. अशा अप्रत्यक्ष दिसून न येणाऱ्या उपायांनीं दिल्लींतील साऱ्या मुसलमानांना घालवून लावीपर्यंत मीं वाट बघणें मूर्ख-पणाचें होईल. हें मुसलमानांना तिळतिळ मारणें आहे असें मी म्हणेन."

## सरदार

**दुसरा प्रश्न:**—"तुम्ही म्हणालांत, कीं जे मुसलमान भीतीच्या व असुरक्षितपणाच्या बातम्या घेऊन येतात ते, गृहखातें ज्यांच्याकडे आहे ते सरदार पटेल मुसलमानांच्या विरुद्ध आहेत अशा तक्रारी घेऊन येतात. त्यांना मी उत्तर देऊं शकत नाहीं. तुम्ही असेंहि म्हणालांत, कीं 'सरदार पटेल अतःपर माझें म्हणणें वेदवाक्याप्रमाणें मानणारे नाहींत.' या उद्गारामुळें लोकांची अशी समजूत होत आहे, कीं सरदारांचा हृदयपालट व्हावा म्हणून तुमचा हा उपवास आहे. म्हणजेच गृहखात्याच्या निषेधार्थ हा उपवास आहे असा अर्थ होतो. तुम्हीं या बाबतींत प्रकाश पाडलांत तर ठीक होईल."

**उत्तर:**—"मी जें बोललों होतों, जेंउत्तर दिलें होतें, तें असंदिग्ध होतें. एकाहून अधिक अर्थ त्यातून निघूं शकत नव्हते. सुचविलेला अर्थ माझ्या मनांत चुकूनहि आला नाहीं. माझ्या बोलण्यांतून असा अर्थ निघेल असें मला वाटलें असतें, तर आधींच गृहीत धरून मीं संशयनिरास केला असता. सरदारांच्या तथाकथित मुस्लिमविरोधी वृत्तीविषयीं अनेक मुसलमान मित्रांनीं माझ्याजवळ तक्रार केली आहे. एक प्रकारच्या अप्रकट दुःखानें मीं त्यांचें म्हणणें ऐकून घेत असें. मी कांहीं उत्तरादाखल बोलत नसें; परंतु मीं आपण होऊन स्वतःवर जें नियंत्रण घातलें होतें, त्यापासून उपवासानें मला मुक्त केलें आहे. आणि टीकाकारांना मीं सांगितलें, कीं सरदारांना

माझ्यापासून नि जवाहरलालांपासून अलग करणें चूक आहे. अशा रीतीनें सरदारांना पृथक् करण्यापासून त्यांचें अधिक कल्याण होणार आहे, असें नाहीं. सरदार स्पष्टवक्ते आहेत. त्यामुळें कधीं कधीं त्यांच्या मनांत नसूनहि दुसऱ्यांचीं मनें दुखविलीं जातात. परंतु सरदारांचें हृदय सर्वांना सामावून घेण्याइतपत विशाल आहे. जीवनावधि असलेल्या प्रामाणिक मित्राची उगीच कोणी अनाठायीं निंदा करूं नये, या हेतूनें तर मीं तसें वक्तव्य केलें. सरदारांना प्रेमानें माझे शब्द-पालक म्हणून म्हणण्यांत येतें. माझ्या श्रोत्यांच्या मनांत ती भावना असूं नये म्हणून पुन्हां मीं म्हटलें, कीं सरदार प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे असल्यामुळें ते कोणाचे होयबा होऊं शकणार नाहींत. ते मीं सांगितल्याप्रमाणें वागत याचा अर्थ असा नव्हे, कीं ते माझे होयबा होते. तर मी जें म्हणे, तें सहजपणें त्यांच्या मनोवृत्तीला एकदम पटे. ते आपल्या क्षेत्रांत मोठे होते; ते अति कार्यक्षम असे कारभार हांकणारे आहेत. असें असूनहि माझ्या हाताखालीं राजकीय शिक्षण घ्यायला नम्रपणें ते उभे राहिले. ते मला म्हणाले, 'तुम्हीं जेव्हां हिंदुस्थानांतील आपली राजकीय कारकीर्द सुरू केलीत तेव्हां त्या काळीं रूढ असलेल्या राजकारणांत मी रस घेऊं शकत नव्हतों.' जेव्हां सत्ता त्यांच्यावर येऊनच पडली, तेव्हां त्यांना असें दिसून आलें, कीं जें अहिंसेचें शस्त्र त्यांनीं अपूर्व रीतीनें यशस्वी करून दाखविलें होतें, तें त्यांना प्रत्यक्षांत नीट वापरतां येईना. मला कळून आलें, कीं मी आणि माझ्याबरोबर सारेच ज्याला अहिंसा म्हणत असूं, ती खरी अहिंसा नव्हती; अहिंसेची एक दुबळी नकल ती होती; निःशस्त्र प्रतिकार तो होता. साहजिकच निःशस्त्र प्रतिकाराचा सत्ता चालवणाऱ्यास काय उपयोग? एकाद्या राष्ट्राचा दुबळा राजा डोळ्यांसमोर आणून बघा! ज्यांनीं त्याला सत्ताधारी केलें असेल, त्यांचाच तो अधःपात करील. परंतु सरदार सोंपवलेलें काम कधीं बिघडूं देणार नाहींत; टाकलेला विश्वास अनाठायीं होऊं देणार नाहींत.

## उपवासाचा हेतु

"माझ्या वक्तव्याची ही अशी पार्श्वभूमि असूनहि, जर कोणी माझा उपवास म्हणजे गृहमंत्र्यांच्या कारभाराचा निषेध, असें म्हणण्याचें धाष्ट्र्य

करीत असेल, तर तो स्वतःचाच अपमान करून घेईल, स्वतःचेंच नुकसान करून घेईल. सरदारांचा किंवा माझा कधींहि करूं शकणार नाहीं. मीं यापूर्वी अनेकदां सांगितलें आहे, कीं बाहेरची कोणतीहि शक्ति मनुष्याला अवमानित करूं शकत नाहीं. केवळ आपण स्वतःच स्वतःला अवमानीत असतों, खालीं ओढीत असतों. हें वाक्य येथें अप्रस्तुत असलें, तरी त्यांतील सत्य इतकें थोर आहे, कीं त्याची सर्व प्रसंगीं पुनरुक्ति केली, तरी शोभूनच दिसेल. माझा उपवास हिंदी संघराज्यांतील अल्पसंख्य मुसलमानांसाठीं आहे, असें स्वच्छ सरळ शब्दांत मीं सांगून टाकलें आहे. त्याचाच अर्थ हा, कीं तो साहजिकच हिंदी संघराज्यांतील हिंदू आणि शीख, तसेंच पाकिस्तानमधील मुसलमान यांच्या विरुद्ध आहे. पाकिस्तानांतील अल्पसंख्य लोकांच्यासाठींहि तो आहे, जसा हिंदी संघराज्यांतील अल्पसंख्य लोकांसाठीं आहे. जो विचार मीं आधींच विवरला होता, त्याचाच हा कसा तरी गोळाबेरीज सारांश आहे. मी एक अति अपूर्ण आणि दुर्बळ मर्त्य प्राणी आहें हें सत्यार्थीनें कबूल करतों. अशाच्या उपवासांत उपवास करणाऱ्याला सर्व प्रकारच्या धोक्यांतून सांभाळण्याइतपत क्षमता नि शक्ति कोठून असणार? हा उपवास सर्वांच्या शुद्धीसाठीं आहे. मीं जें पाऊल टाकलें आहे, त्याच्या शुद्धतेविरुद्ध कांहीं सूचित करणें बरोबर होणार नाहीं."

## विपर्यासास वाव नाहीं

तिसरा प्रश्नः—"तुमचा उपवास संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षासमितीच्या बैठकीच्या सुमारास नेमका सुरू झाला आहे. कराचींतील दंगे, गुजरात येथील कत्तलीहि नुकत्याच झालेल्या. त्यांना परराष्ट्रांतील वृत्तपत्रांतून कितपत प्रसिद्धि मिळाली आहे माहीत नाहीं; परंतु तुमच्या उपवासानें साऱ्याच गोष्टी मागें पडल्या आहेत. पाकिस्तानच्या प्रतिनिधींना तुमच्या उपवासाची चांगलीच संधि मिळाली आहे. ते तिचा उपयोग करून न घेतील, तर ते पाक-मुत्सद्दी कसले? हिंदमधील मुसलमानांना जगणें कठिण झालें आहे. आपल्या हिंदू अनुयायांना विवेक सुचावा म्हणून महात्मा गांधींनीं उपवास सुरू केला अखेर, असा प्रचार पाकिस्तानी प्रतिनिधी नक्की करणार. सत्याला जगाच्या चारी

कोपऱ्यांत जाऊन पोंचायला वेळ लागतो. दरम्यान तुमच्या उपवासामुळें संयुक्त राष्ट्रसंघाची दृष्टि हिंदी प्रश्नाबाबत पूर्वग्रहदूषित होण्याची दुर्दैवी घटना घडण्याचा मात्र संभव आहे."

**उत्तर**:—"या प्रश्नास सविस्तर उत्तर द्यायला नको आहे, तशी आवश्यकताहि नाहीं. हिंदुस्थानबाहेरचीं राष्ट्रें आणि लोक यांची जी माहिती मला आहे, तीवरून मी असें सांगण्याचें धाष्टर्य करतों, कीं उपवासाचा सर्वांवर चांगलाच परिणाम झालेला आहे. हिंदुस्थानांत जें कांहीं घडत आहे, त्याचा पक्षातीत दृष्टीनें विचार करणारे जे बाहेरचे कोणी असतील, ते उपवासाच्या हेतूंचा विपर्यास करूं शकणार नाहींत. हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान यांतील सर्व जनतेला सुविवेक यावा म्हणून हा उपवास आहे. पाकिस्तानांतील मुसलमान जर सभ्य स्त्री-पुरुष या नात्यानें वागणार नसतील, तर हिंदी संघराज्यांतील मुसलमानांना वांचविणें अशक्य आहे. परंतु सुदैवाची गोष्ट आहे, कीं श्रीमती मृदुलाबेन यांनीं कळविल्याप्रमाणें पाकिस्तानांतील मुसलमानांसहि स्वकर्तव्याचें स्पष्ट भान आल्याचें दिसत आहे. संयुक्त राष्ट्रें जाणतातच, कीं माझ्या उपवासानें योग्य निर्णय घ्यायला व नवीनच जन्मास आलेल्या या दोन राष्ट्रांना योग्य मार्गदर्शन करायला त्यांना मदतच होईल."

## १२६

१६–१–'४८

## ईश्वराची कृपा

प्रार्थनेसाठीं जमलेल्यांना गांधीजींचा त्यांनीं तोंडीं सांगून लिहून घेतलेला संदेश वाचून दाखवण्यापूर्वी ध्वनिक्षेपकावरून अंथरुणावरून ते बोलले. ते म्हणाले, " आज मी बोलूं शकेन असें मला वाटत नव्हतें. परंतु कालच्यापेक्षां माझा आवाज अधिकच चांगला आहे, हें पाहून तुम्हांला आनंद होईल. याचें कारण ईश्वराची कृपा, यावांचून दुसरें मी काय म्हणणार ? उपवासाच्या चौथ्या दिवशीं आजच्याइतकें चांगलें मागें मला कधींच वाटलें नव्हतें. सारे जर आत्मशुद्धीच्या कर्मांत भागीदार होतील, तर

शेवटपर्यंत बोलण्याची शक्ति मला कदाचित् राहील. उपवास सोडायची मला मुळींच घाई नाहीं. घाईनें कार्य बिघडतें. शुद्धि पुरी होण्यापूर्वींच सारें आतां ठीक आहे असें सांगायला कोणीं येऊं नये. खऱ्या अर्थानें दिल्ली शान्त झाली, तर साऱ्या देशावर परिणाम होईल. दोन्ही देशांत शान्ति न राहील, तर जगण्याची मला इच्छा नाहीं."

## केवळ शुद्ध सदिच्छा

वाचून दाखविलेला संदेश :

"जबाबदार अशा कोणत्याहि मंत्रिमंडळाला विचारपूर्वक ठरवलेली नीति बदलणें सोपें काम नसतें. तरीहि आमच्या मंत्रिमंडळानें—जें सर्वार्थानें जबाबदारीनें वागणारें आहे—तितक्याच विचारानें परंतु त्वरेनें ठरलेली नीति बदलेली आहे. काश्मीरपासून केपकामोरीनपर्यंत, कराचीपासून आसामपर्यंत, सगळ्या देशानें यासाठीं त्यांना मनापासून धन्यवाद द्यायला हवेत. आणि हिंदी संघराज्याच्या मंत्रिमंडळानें घेतलेला हा निर्णय ऐकून जगांतील सारीं राष्ट्रें म्हणतील, कीं इतकें मोठें मन करून निर्णय घेणें हिंदी संघराज्याचें मंत्रिमंडळच फक्त करूं शकेल. हें धोरण मुस्लिमधार्जिणें नाहीं. हें धोरण स्वतःच्या संतोषार्थ आहे, आत्म्याच्या समाधानार्थ आहे. विचारहीन जनतेची तात्पुरती स्तुति मिळवण्याच्या इच्छेनें मोठ्या मानवसमाजाचें प्रतिनिधित्व करण्यास लायक नि पात्र असणाऱ्या कोणत्याहि मंत्रिमंडळानें कोणतेंहि पाऊल टाकतां कामा नये. सर्वत्र अविवेकाचें साम्राज्य चालू असतां आमच्या उत्तमोत्तम प्रतिनिधींनीं विवेकानें, तोल सांभाळून नको का जायला? स्वतःच्या ताब्यांतील राष्ट्रनौका धीरोदात्त वर्तनानें त्यांनीं फुटण्यापासून नको का वांचवायला? मंत्रिमंडळाला प्रेरणा कोणीं दिली? माझ्या उपवासानें. माझ्या उपवासानें सारी दृष्टीच बदलून टाकली. हा उपवास नसता, तर जें केवळ कायदेशीर आहे आणि करणें प्राप्तच आहे, त्याच्यापलीकडे मंत्रिमंडळ जातें ना. परंतु हिंदी संघराज्य-सरकारचें आजचें हें कृत्य केवळ शुद्ध सद्भाव नि सदिच्छा यांनीं भरलेलें आहे. पाकिस्तानची कसोटी आतां तें पहात आहे. आतां पाकिस्तानची सत्त्वपरीक्षा. आतां

केवळ काश्मीरच्या बाबतींतच सन्मान्य तडजोड व्हावी असें नाहीं. तर दोन्ही देशांतील सारेच मतभेद निकालांत निघावेत. खरा न्याय केवळ कायद्याच्या अक्षरांत नसतो; तो त्या अक्षरांच्या पलीकडेहि कधीं जाणें अवश्य असतें. इंग्लंडमध्यें कित्येक शतकांपासून कायद्याच्या बाबतींतील एक घरगुती म्हण आहे. ' नेहमींचा कायदा जेथें काम देऊं शकत नाहीं, तेथें खरा न्याय मदतीला धांवून येतो ' अशा अर्थाची ती म्हण आहे. आतां आतांपर्यंत कायद्याप्रमाणें निकाल देणारीं व खऱ्या न्यायाला अनुसरून निकाल देणारीं अलग न्यायमंदिरें होतीं. अशा दृष्टीनें नि या विचारानें आपण पाहूं, तर हिंदी संघराज्याच्या या कृतींतील केवळ निरपेक्ष शुद्ध न्यायाबद्दल कोणी प्रश्न करणार नाहीं. एकादा जुना दाखलाच हवा असला, तर ज्याला मॅक्डोनल्ड-अवॉर्ड म्हणतात, त्या बाबतींतील आहे. तो निकाल केवळ ब्रिटिश मंत्रिमंडळांतील सर्व प्रधानांचा एकमुखी निकाल होता; इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या गोलमेज-परिषदेंतील बहुसंख्य सभासदांनींहि त्याला पाठिंबा दिला होता. तरीहि येरवडा तुरुंगांतील उपवासानें एका रात्रींत तो निर्णय रद्द करण्यांत आला.

## उपवासाला योग्यतम उत्तरें

"हिंद सरकारच्या या थोर कृत्यामुळें तरी मीं उपवास सोडावा, असें मला सांगण्यांत येत आहे. मीं माझें मन यासाठीं वळवूं शकावें, अशी मलाहि इच्छा आहे. जे डॉक्टर आपण होऊन त्यागपूर्वक अत्यन्त कसोशीनें दररोज मला तपाशीत असतात, त्यांनाहि जसाजसा उपवास लांबत आहे, तसतशी चिंता वाटूं लागली आहे. हा देह इतक्या लौकर गळून पडेल असें नाहीं त्यांना वाटत; तर भीति ही वाटत आहे, कीं मूत्रपिंड नीट काम करीत नसल्या-मुळें जर उपवास लांबला, तर पुढें-मागें कायमचा आजार जडण्याची शक्यता आहे. वैद्यकीय मित्रांचा– ते कितीहि तज्ज्ञ असोत– सल्ला घेऊन मीं उपवास अंगीकारलेला नाहीं. माझा मार्गदर्शक, आदेशदाता एक भगवान् होता. तो सर्वशक्तिमान् नि सर्वज्ञ आहे. माझ्या या दुबळ्या शरीराचा अजून उपयोग आहे असें त्याला वाटत असेल, तर वैद्यकीय

तज्ज्ञ स्त्री-पुरुषांना चिंता वाटत असली, तरी तो हें शरीर टिकवील. मी त्याच्या हातांत आहें. म्हणून मी जेव्हां म्हणतों, कीं मला मरणाचें भय नाहीं, किंवा जगलों, तर कायमचा आजार जडणार नाहीं, तेव्हां तुम्हीं माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवाल अशी मला अशा आहे. परंतु मला असेंहि वाटतें, कीं देशाला माझी जरूर असेल, तर वैद्यकीय मित्रांनीं दाखविलेल्या चिंतेनें लोकांनीं आपापले मतभेद झटपट मिटवावे. आणि मोठ्या कष्टानें मिळवलेल्या स्वराज्यांत शौर्य-धैर्यानेंच राहिलें पाहिजे हें लक्षांत घेऊन आपले शत्रु आहेत असा ज्यांच्याविषयीं संशय वाटतो त्यांच्यावरहि वीराप्रमाणें विश्वास ठेवावा. शूराला अविश्वासाचा तिटकारा वाटतो. माझ्या प्रतिज्ञेची पूर्ति होईल, जर दिल्लींतील हिंदू, मुसलमान, शीख यांचें खरें ऐक्य होईल. हिंदुस्थानच्या किंवा पाकिस्तानच्या बाकी सर्व भागांत आगडोंब पेटला, तरी हें ऐक्य भंगतां कामा नये. आनंदाची गोष्ट आहे, कीं उभय देशांतील लोकांनीं आपोआप ओळखलें आहे, कीं उपवासाला अत्यन्त योग्य उत्तर म्हणजे दोन्ही देशांत संपूर्ण मित्रभाव निर्माण होणें; इतका कीं उभय देशांतील लोकांनीं निःशंकपणें इकडेतिकडे जावें-यावें. आत्मशुद्धि झाली, तर इतकें व्हायलाच हवें. दोन्ही देशांतील इतर सर्वांनीं एका दिल्लीवर सारा बोजा लादणें चूक आहे. परंतु हेंहि लक्षांत घ्यायला हवें, कीं हिंदी संघराज्यांतील लोक अतिमानवी नाहींत. किती झालें, तरी माणसेंच सारीं. जनतेच्या वतीनें आमच्या सरकारनें किती किंमत पडते त्याचा विचारहि न करतां उदार पाऊल टाकलें आहे. पाकिस्तानची प्रतिक्रिया काय तें बघायचें. इच्छा असेल तर मार्ग आहेत. परंतु इच्छा आहे का?"

## १२७

१७-१-'४८

## हृदयाची शुद्धि

" पूर्वीं म्हटलेलेंच मी पुन्हां सांगतों. उपवासाच्या दडपणामुळें कांहींहि

केलें जाऊं नये. माझा पूर्वीचा अनुभव आहे, कीं उपवासाच्या दडपणामुळें जें केलें जातें, तें उपवास सुटतांच पुन्हां करून न केल्यासारखें होतें. असें कांहीं होईल, तर ती पराकाष्ठेची शोकान्त घटना होईल. असें करण्याची कधींच जरूर नसते. आध्यात्मिक उपवास हृदयशुद्धीची फक्त अपेक्षा करतो. ज्या कारणानें अंतःशुद्धीची जाणीव होते, तें कारण निघून गेल्यावरहि शुद्धि मग चालूच राहते. प्रियकर आला-गेला, तरी रंगसफेती देऊन भिंत साफ करण्याचें काम चालूच राहतें. हें बाहेरचें भौतिक वस्तूंचें स्वच्छीकरण पुनः पुन्हां करावें लागत असतें. परंतु अंतःशुद्धीची सिद्धि मरेपर्यंत टिकते. उपवास हेंच एक योग्य नि स्तुत्य दडपण घालूं इच्छितो. उपवासाचें दुसरें योग्य असें कार्यच दाखवतां येणार नाहीं.

## पाकिस्तानला दोन शब्द

"राजे, महाराजे, सामान्य जनता यांच्याकडून तारांचा वर्षाव होतच आहे. पाकिस्तानांतून तारा येत आहेत. त्यांचा उपयोगहि आहेच. परंतु पाकिस्तानांत जे रहात आहेत आणि त्याला आकार देतात, त्यांना त्यांचा एक मित्र आणि त्यांचें भलें चिंतणारा या नात्यानें मला दोन शब्द सांगणें भाग आहे. पाकिस्ताननें ज्या चुका केल्या आहेत, त्या जर प्रांजलपणें ते कबूल करणार नसतील, जर त्यांची सदसद्विवेकबुद्धि नीट जागृत झाली नसेल, तर पाकिस्तान कायम करण्यांत त्यांना यश येणार नाहीं.

"याचा अर्थ असा नाहीं, कीं दोन्ही राष्ट्रांचें स्वच्छेचें पुनर्मीलन मी इच्छीत नाहीं. परंतु सत्तेच्या जोरावर पाकिस्तान पुन्हां जोडून घ्यायचें या विचाराला विरोध करण्याची, ही कल्पना दूर करण्याची मला इच्छा आहे. मरण-शय्येवरून उच्चारलेले हे शब्द विसंवादी सूर म्हणून मानण्यांत येणार नाहींत अशी मला आशा आहे. कदाचित् पाकिस्तानच्या भावना दुखवल्या जातील या भीतीनें जे मला सत्यार्थानें वाटतें, तें जर त्यांना मीं कळविलें नाहीं, तर त्यांना मीं फसवलें असें होईल, ही गोष्ट पाकिस्तान लक्षांत घेईल अशी मी आशा करतों. माझा अंदाज चुकीचा असेल, तर तसें मला सांगण्यांत यावें. माझी खात्री पटली, तर मी माझे शब्द परत घेण्याचें वचन देतों. माझ्या माहितीप्रमाणें माझें म्हणणें बिनचूक आहे.

## उपवासामुळें सुखी

"ज्याला राजकीय डाव म्हणतात, अशा कोणत्याहि स्वरूपांत माझ्या उपवासाकडे पाहिलें जाऊं नये. सदसद्विवेकबुद्धि नि कर्तव्य यांची मानलीच गेली पाहिजे अशी हांक आली म्हणून हा उपवास. वेदनांच्या तीव्रतेंतून तो जन्मला आहे. दिल्लींतील अनेक मुस्लिम मित्र याला साक्षी आहेत. त्यांचे प्रतिनिधी दररोजच्या घडामोडी सांगण्यासाठीं बहुतेक रोज मला भेटतात. मीं माझा उपवास सोडावा म्हणूम माझ्या दृष्टीनें पवित्र अशा या संधिकाळीं राजे, महाराजे, शीख वा हिंदू वा इतर कोणी लोक जर मला चकवतील, तर त्यामुळें त्यांचें स्वतःचें, देशाचें किंवा कोणाचेंच कल्याण होणार नाहीं. त्यांनीं नीट ध्यानांत घ्यावें, कीं जेव्हां जेव्हां आत्म्यासाठीं मी उपवास करीत असतों, तेव्हां जितका मी सुखी असतों तितका कधींच नसतों. आजवर कधीं मिळालें नव्हतें इतकें सुख या उपवासानें मला दिलें आहे. आपण आपल्या प्रवासांत जाणीवपूर्वक सैतानाकडून ईश्वराकडे आतां वळत आहोंत असें जोंवर कोणास वाटत नाहीं, तोंवर त्यानें माझी ही सुख-समाधि भंगू नये."

## १२८

१८-१-'४८

## पुढील काम

आपल्या शय्येवरून ५ वाजून २० मिनिटें झालीं असतां गांधीजी ध्वनिक्षेपकावरून प्रार्थनावृंदास म्हणाले :

" मीं तोंडीं सांगितलेला संदेश लिहून घेण्यांत आलेला आहे. तो तुम्हांला वाचून दाखविण्यांत येईल. आजचा हा मला नि तुम्हां सर्वांनाच सुखाचा दिवस आहे. आज गुरु गोविंदसिंगांच्या जन्माचा शुभ दिवस. आजच्या या शुभ दिवशीं तुम्हां सर्वांच्या कृपेनें मी उपवास सोडूं शकलों, याचा मला आनंद वाटतो. उपवास सुरू झाल्यापासून दिल्लीचे नागरिक, पाकिस्तानांतून आलेले दुःखित, सरकार आणि सरकारी कारभारी,

सर्वांनींच प्रत्यहीं जो दयेचा वर्षाव मजवर केला, तो मी कधींहि विसरूं शकणार नाहीं. कलकत्त्यासहि असेंच प्रेम मीं अनुभविलें. कलकत्त्यांत शान्ति आणण्याच्या कामीं शहीदसाहेबांनीं केलेलें साहाय्य मी विसरूं शकणार नाहीं. ते नसते, तर मी कलकत्त्यांत राहूं शकलों नसतों. शहीदसाहेबांच्या प्रामाणिकपणाविषयीं लोकांना अजून अनेक शंका आहेत. परंतु मागील विसरून सर्वांविषयीं मित्रभाव बाळगायला आणि कोणाचेंहि वैर न करायला त्यांनीं शिकलें पाहिजे. कोणत्यवधि मुसलमान देवदूत नाहींत. किंवा सारे हिंदू आणि शीखहि देवदूत नव्हत. सर्व जातीजमातींतून भलेबुरे लोक असतात. तुमच्यामधील ज्यांना गुन्हेगार-जाती म्हणतात, त्यांच्याविषयीं का तुम्हांला मित्रभाव नाहीं वाटत ?

मुसलमानांची संख्या जगभर पसरलेली आहे. त्यांची लोकसंख्या थोडीथोडकी नाहीं. सर्व जगाशीं सख्य असावें अशी तुमची इच्छा आहे असें तुम्ही म्हणतां, मग मुसलमानांशीं मैत्री नसावी याला कारणच नाहीं. मी कांहीं भविष्यवेत्ता नाहीं. परंतु ईश्वरानें जी कांहीं बुद्धि आणि समजूत मला दिली आहे, त्यामुळें वाटतें, कीं जर हिंदी संघराज्यांतील मुसलमानांशीं तुम्हांला मित्रभावानें वागतां आलें नाहीं, तर जगांतील सारे मुसलमान तुमच्याविरुद्ध जातील आणि कदाचित् हिंदुस्थान तुम्हांला गमावावा लागेल. मग हिंदुस्थान नि पाकिस्तान दोन्ही भाग पुनश्च परकीयांच्या सत्तेखालीं जातील. असंख्य नर-नारींचे आशीर्वाद नि सदिच्छा मला मिळत आहेत. दिल्लींत राहणाऱ्या सर्वांनीं—हिंदू, मुस्लिम, शीख, पारशी, ज्यू, ख्रिश्चन—तमाम सर्वांनीं आम्ही भावाभावाप्रमाणें राहूं, आम्ही पुनश्च भांडणार नाहीं, असें त्यांनीं मला आश्वासन दिलें आहे. आणि या आश्वासनांत पाकिस्तानमधून आलेल्या दुःखितांनींहि भाग घेतलेला आहे, ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. जर हा शुभ आरंभ असाच चालू राहिला, तर हिंदुस्थानांत शान्ति निश्चितपणें येईल नि मग पाकिस्तानांतहि आल्याशिवाय राहणार नाहीं. हें एका माणसाचें काम नाहीं. या कामांत आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनीं अंतःकरण-पूर्वक सामील झालें पाहिजे. उपवास सोडण्याचा हा अर्थ नसेल, तर तो सोड-ण्यांत मीं चूक केली असें होईल. तुम्हीं केवळ शब्द मानलात नि आंतील

अर्थ मारलात असें होईल. जें दिल्लींत शक्य आहे, तें सर्व हिंदुस्थानांत शक्य आहे. जर या हिंदी भागांत संपूर्ण जातीय शांति नांदू लागली, तर पाकिस्तानलाहि तदनुरूप वागणें भाग आहे. सर्वांनीं भीतीचा संपूर्णपणें त्याग करावा. प्रत्येक मुस्लिम मुलाला हिंदू आणि शीखांच्या मध्यें सुरक्षित वाटलें पाहिजे. आतांपर्यंत सैतानाकडे आपलें तोंड होतें. आतां तें ईश्वराकडे वळेल अशी मला आशा आहे. जर तुम्ही असें कराल, तर हिंदी संघराज्य जगाला शान्तीचा मार्ग दाखवील. अन्य कशासाठींहि जगायची मला इच्छा नाहीं. तोंडपाटीलकीचा कांहीं उपयोग नाहीं. हृदयसिंहासनावर ईश्वराला बसवा. त्याला कोणत्याहि नांवानें हांक मारली, तरी तो एकच आहे. या सत्याची अनुभूति येतांच सारें वैर शमलें पाहिजे, सारी असहिष्णुता थांबली पाहिजे.

भांडायचें नाहीं असें हिंदूंनीं कायमचें ठरवून टाकावें. गीता नि ग्रंथसाहेब वाचतां त्याप्रमाणेंच कुराणहि वाचा, असें मी हिंदूंना नि शीखांना सांगेन. मी मुसलमानांस सांगेन, कीं ज्या भक्तिभावानें कुराण वाचतां, त्याच भक्तिभावानें गीता नि ग्रंथसाहेब वाचीत जा. जें वाचाल त्याचा अर्थ समजून घेत जा. सर्व धर्मांविषयीं समभाव राखा. जीवनावधि मी असा वागत आलों. हें माझें ध्येय. रूढ अर्थानें मी मूर्तिपूजक नसलों, तरी सनातनी हिंदू असण्याचा मी दावा करतों. मूर्तिपूजा करणाऱ्यांना मी तुच्छ नाहीं मानूं शकत. मूर्तिपूजक पाषाणी मूर्तींत प्रभूला पाहतो. ईश्वर सर्वव्यापी आहे. जर पाषाणांत त्याला बघणें चूक असेल, तर गीता, ग्रंथसाहेब, कुराण इत्यादि ग्रंथांतहि त्याला पाहणें चूक ठरेल. तीहि एक प्रकारची मूर्तिपूजाच. सहिष्णुता आणि आदरबुद्धि शिकाल, तर सर्वांपासून तुम्हांला शिकतां येईल. मग जातीय भेद तुम्ही विसराल आणि सुखासमाधानानें एकत्र नांदाल. चालत्या आगगाडींतून स्त्रियांना-पुरुषांना फेंकून देण्याचें लाजिरवाणे प्रकार मग घडणार नाहींत. हिंदी संघराज्यांतील लोक खुशाल सर्वत्र निर्भयपणें हिंडतील-फिरतील. मला तोंवर आंतरिक शान्ति मिळणार नाहीं, जोंवर पाकिस्तानहि हिंदू आणि शीखांसाठीं असेंच सुरक्षित होणार नाहीं, जोंवर हिंदू आणि शीख पाकिस्तानांतील आपल्या घरींदारीं पुन्हां प्रतिष्ठापूर्वक, सन्मानपुरस्सर जाणार नाहींत आणि मुसलमान निर्वासित इकडे परत येणार नाहींत."

## उपवासाचें पारणें

लेखी संदेश :

ज्याचें परिचित नांव ईश्वर असें आहे, त्या सत्याच्या नांवें मीं उपवास आरंभिला. जिवंत सत्याशिवाय ईश्वर कोठेंच नाहीं. ईश्वराच्या नांवानें असत्यांत, अपराधी का निरपराधी न बघतां, स्त्री-पुरुषांची, मुलांबाळांची कत्तल करण्यांत आपण आनंद मानला. स्त्रियांचें अपहरण, सक्तीचें धर्मांतर इत्यादींत आपण रमलों. आणि हें सारें करतांना कधीं लाज वाटली नाहीं. सत्याच्या नांवानें असें कोणीं केल्याचें माझ्या तरी ऐकिवांत नाहीं. तेंच नांव ओंठांवर ठेवून मीं उपवास सोडला. आपल्या राष्ट्राची वेदना असह्य होती. डॉ. राजेंद्रबाबूंनीं हिंदू, मुसलमान, शीख, हिंदुमहासभा नि रा. स्व. संघ, पंजाब, सीमाप्रांत नि सिंध यांतील निर्वासित, सर्वांचे मिळून शंभर प्रतिनिधी आणले होते. या सर्व प्रातिनिधिक मेळाव्यांत पाकिस्तानचे हायकमिशनर जहीद हुसेनसाहेब, दिल्लीचे कमिशनर, उप-कमिशनर, आझाद हिंद फौजेच्या वतीनें जनरल शहानवाझखान हे होते. पुतळ्या-प्रमाणें बसलेले पंडित नेहरू अर्थातच तेथें होते, आणि मौलानासाहेबहि. या प्रतिनिधींनीं सह्या केलेला व हिंदुस्थानींत लिहिलेला करार डॉ. राजेंद्र-बाबूंनीं मला वाचून दाखवला. ते मला म्हणाले, "आतां आणखी अंत नका बघूं. उपवास सोडा नि वेदना थांबवा." उपवास सोडा म्हणून सांगणाऱ्या पाकिस्तानांतून आणि हिंदी भागांतून तारांवर तारा येत होत्या. या सर्व मित्रांचा सल्ला कसा झुगारूं ? "हिंदू, शीख, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, ज्यू आम्ही सारे, कांहींहि होवो मैत्रीनें राहूं ; ती मैत्री अभंग ठेवूं. कारण ती मैत्री भंगणें म्हणजे राष्ट्र भंगणें होय" असें आभिवचन मी कसें अविश्वासूं ?

## प्रतिज्ञेचा भावार्थ

मी हें लिहीत असतांना सुखी करणाऱ्या, धीर देणाऱ्या, तारांचा पाऊस पडत आहे. माझ्यासमोर असलेल्या मानवजातीची सेवा करायला ईश्वरानें मला विवेकी नि समर्थ ठेवावें म्हणून किती मला वाटत आहे ! आजची

गंभीर प्रतिज्ञा लोकांनीं जर पाळली, तर मी तुम्हां सर्वांना आश्वासन देतों, कीं शेवटच्या श्वासापर्यंत मानवजातीची सेवा करीत सव्वाशें वर्षें जगण्याची माझी इच्छा दुप्पट जोरानें माझ्या हृदयांत उसळेल नि ईश्वरासमोर तशी इच्छा नि प्रार्थना मी करीन. कल्पनातीत लौकर माझ्या प्रतिज्ञेची अक्षर-पूर्ति झाली आहे. दिल्लीच्या सर्व नागरिकांच्या सदिच्छेनें हें होऊं शकलें. हिंदुमहासभेचे पुढारी आणि रा. स्व. संघ यांनींहि त्यांत सहकार केला. कालपासून हजारों निर्वासित आणि इतरहि उपवास करूं लागले असतां असा परिणाम झाल्यावांचून कसा राहील? हजारोंकडून मैत्री राखूं म्हणून सह्या केलेलीं पत्रकें येत आहेत. साऱ्या दुनियेंतून तारा नि आशीर्वाद येत आहेत. माझ्या या कृत्यांत ईश्वरी हात होता याचा याहून आणखी चांगला पुरावा कोणता? परंतु माझ्या गंभीर प्रतिज्ञेच्या अक्षर-पूर्तीच्या पाठीमागें त्यांतील भावार्थ आहे. तो लक्षांत न आणूं तर केवळ अक्षर मारक ठरतें. प्रतिज्ञेचा आत्मा कोणता? हिंदुस्थानांतील हिंदू, शीख, मुसलमान यांची खरी मैत्री; तशीच मैत्री पाकिस्तानांतहि. परंतु हिंदुस्थानांतील मैत्री दृढावली, तर पाकिस्तानांतहि ती होईल. रात्रीमागून दिवस हें जितकें संशयातीत, तद्वतच हें. हिंदुस्थानांत अंधार असेल, तर पाकिस्तानांत प्रकाश अपेक्षिणें मूर्खपणा ठरेल. परंतु हिंदुस्थानांतील निशा निःसंशय दूर होईल, तर पाकिस्तानांतीलहि निशा नष्ट होईल. त्या दिशेनें चिन्हें दिसतहि आहेत. पाकिस्तानांतून किती तरी संदेश आले आहेत आणि एकहि विसंवादी नाहीं. ज्यानें या गेल्या सहा दिवसांत सारखें आपलें प्रत्यक्ष जणूं मार्गदर्शन केलें, तोच सत्यरूप परमेश्वर आपलें सर्वांचें मार्गदर्शन करो."

## १२९

१९-१-'४८

## अभिनंदन आणि चिंता

सर्व जगांतून हिंदी व इतर लोकांनीं सदिच्छेच्या नि चिंता प्रकट करणाऱ्या तारा पाठवल्या होत्या. मी सर्वांचा आभारी आहें. मीं

टाकलेलें पाऊल बरोबर होतें असें यावरून दिसून येतें. मला अर्थात् तिळभरहि संशय नव्हता. ईश्वर आहे आणि त्याचें सर्वांत अर्थपूर्ण स्वच्छ नांव सत्य हें आहे याविषयीं जशी कधीं मला शंका येत नाहीं, तशीच या उपवासाविषयीं नव्हती. आतां हायसें वाटून पाठवलेल्या अभिनंदनाच्या तारांची वृष्टि होत आहे. मी व्यक्तिशः पोंच पाठवीत नाहीं. त्याची सर्वांनीं क्षमा करावी. कारण अशी पोंच पाठवणें केवळ अशक्य आहे, शक्तीबाहेरचें आहे. तारा पाठवणारे अशी पोंच अपेक्षितहि नसतील, अशी मला आशा आहे. परंतु या तारांतून दोन बाजूला काढणें आवश्यक वाटतें. एक तार पश्चिम पंजाबच्या पंतप्रधानांची आणि दुसरी भोपाळच्या नबाबसाहेबांची. दोघांच्याहिविषयीं लोकांना गंभीर अविश्वास वाटतो; परंतु उपवासासारख्या गंभीर प्रसंगीं तारांतील मजकूर अंतःकरणापासून नसेल, तर त्या पाठवण्याची त्यांनीं तसदी तरी कशाला घेतली असती ? तारांतील हे उतारेच सारें सांगतील.

भोपाळच्या नबाबसाहेबांच्या तारेंतील उतारा :

"सर्व जातिजमातींमध्यें हृदयैक्य स्थापन केलें जावें, म्हणून तुम्हीं मारलेल्या हांकेल दोन्ही भागांतील सारे सज्जन ओ दिल्याशिवाय राहणार नाहींत. हिंदुस्थान नि पाकिस्तान यांच्यामध्यें मित्रभाव आणि समझोता व्हावा म्हणून मारलेल्या कोणत्याहि हांकेला असेच सारे सदैव ओ देतील. गेल्या वर्षाच्या अशान्त काळांतहि आम्ही भोपाळमधील लोक सारे सुखरूपपणें निभावून गेलों. येथील सर्व जातिजमातींत सलोखा नि स्नेहभाव नांदला. संस्थानांतील शान्तीला कलंक लावणारें एकहि कृत्य येथें घडलें नाहीं. ही मित्रभावना सर्वशक्तीनिशीं अधिकाधिक वृद्धिंगत करायला आम्ही झटूं, असें आम्ही आश्वासन देतों."

पश्चिम पंजाबच्या पंतप्रधानांची समग्र तार :

"थोर ध्येयाच्या पूर्तीसाठीं आपण जें थोर दिव्य केलेंत, त्याबद्दल पश्चिम-पंजाब-मंत्रिमंडळ अन्तःकरणपूर्वक धन्यवाद देत आहे. आपल्या या थोर कृतीची या मंत्रिमंडळास कदर आहे. या प्रधानमंडळानें अल्पसंख्य जमातींच्या जीवितावित्ताच्या नि अब्रूच्या रक्षणासाठीं शक्य तें सारें केलें

पाहिजे, हें तत्त्व सदैव डोळ्यांसमोर ठेवलें आहे. हें आमचें सरकार अल्पसंख्य लोकांनाहि नागरिकत्वाचे समान हक्क मिळाले पाहिजेत याच मताचें आहे. यापुढें आमचें मंत्रिमंडळ या धोरणाला अनुसरून दुप्पट जोरानें काम करील असें आम्ही आपणांस आश्वासन देतों. या खंडप्राय हिंदुस्थान देशांत सर्वत्र परिस्थितींत सुधारणा होऊन आपला उपवास लौकर कसा सुटेल, हीच एक चिंता आम्हांला आहे. आपले अमोल प्राण वांचावेत म्हणून हा प्रान्त कोणतेहि प्रयत्न करायचे बाकी ठेवणार नाहीं."

## इशारा

आजकालचें युग विचारहीन अनुकरणाचें आहे. म्हणून मी इशारा देतों, कीं असा उपवास वाटेल त्यानें करणें मूर्खपणाचें होईल. इतक्या अल्पावधींत असेच परिणाम आपणांसहि मिळतील अशा समजुतीनें कोणी असा उपवास करूं पाहील, तर त्याच्या पदरीं निराशा येईल आणि उपवासासारखे प्राचीन रामबाण मार्ग तो अप्रातिष्ठित करील. उपवासासाठीं दोन गोष्टी तीव्रतेनें हव्यात. जीवती-जागती ईश्वरावर श्रद्धा, आणि अंतरात्म्याचा निःसंदिग्ध आदेश. तिसरी एक गोष्ट सांगावीशी वाटते. वास्तविक सांगण्याची जरूर नाहीं. ती ही, कीं अंतरात्म्याचा असंदिग्ध आदेश एक गोष्ट गृहीत धरतो, कीं ज्या कार्यासाठीं उपवास करावयाचा तें कार्य न्याय्य असेल, योग्य असेल आणि तत्कालानुरूप असेल. त्यासाठीं प्रदीर्घ पूर्वतपश्चर्या लागते. म्हणून कोणीहि पटकन् असा उपवास आरंभू नये.

## समोरचें काम

दिल्लीचे नागरिक आणि निर्वासित यांच्यासमोर प्रचंड काम आहे. विश्वासपूर्वक एकत्र येण्याजाण्याचे प्रसंग शोधावे, असे प्रसंग योजावे. काल किती तरी मुस्लिम भगिनी भेटायला आल्या होत्या. माझें अंतःकरण उचंबळलें. माझ्या बरोबर राहणाऱ्या मुली म्हणाल्या, भेट मिळेल कीं नाहीं या शंकेनें बिर्लाभवतांन त्या बसल्या होत्या. बहुतेक पडदानशीन होत्या. मीं सांगितलें कीं त्यांना येऊं दे. आणि त्या आल्या. मीं त्यांना सुचविलें, कीं भावासमोर, वडिलांसमोर का पडदा राखाल? मला याहून निराळें

कां मानावें ? आणि एकजात सारे पडदे दूर झाले. माझ्यासमोर पड्दे दूर झाल्याची ही कांहीं पहिलीच वेळ नव्हती. मी ही गोष्ट एवढ्याचसाठीं सांगत आहें, कीं खरें प्रेम काय करूं शकतें तें तुम्हीं पहावें. हिंदू आणि शीख भगिनींनीं मुस्लिम भगिनींकडे जावें. त्यांच्याशीं मैत्री जोडावी. उत्सवसमारंभांस बोलवावें, त्यांच्या उत्सवसमारंभांस आपण जावें. मुसलमान मुलें-मुली सर्वसामान्य शाळांमध्यें येतील असें करावें. जातीय शाळा कशाला ? खेळांतहि एकत्र खेळावें. मुसलमानांवर बहिष्कार तर नकोच; उलट, आपला उद्योगधंदा त्यांनीं सुरू करावा म्हणून त्यांना उत्तेजन द्यावें, त्याचें मन वळवावें. मुसलमानांची अप्रतिम कारागिरी दिल्लींत दिसतनाशी झाल्यामुळें दिल्लीचें फार नुकसान होत आहे. मुसलमानांचीं उपजीविकेचीं साधनें आपण बळकावणें हें हिंदू-शीखांना शोभत नाहीं. तें कार्पण्याचें उद्वेगजनक चिन्ह होय. उद्योगधंद्याच्या बाबतींत कोणाची मक्तेदारीहि नको आणि तो धंदा हिरावून घेण्याचाहि प्रयत्न नको. या विशाल देशांत सर्वांना वाव आहे. शांतता-समिती स्थापल्या गेल्या आहेत. त्यांनीं नेहमीं सर्वच देशांतून दुर्दैवानें अनुभव येतो त्याप्रमाणें झोपीं जाऊं नये. हिंदुस्थानांतील साऱ्या जातीजमाती शांतीनें राहतील, ही तर मला जिवंत ठेवण्याची अट. आणि हें शांतीचें एकत्र राहणें तरवारीच्या जोरावर नव्हे, तर प्रेमाच्या बंधनानें. एकमेकांस जोडणारी प्रेमासारखी दुसरी वस्तु दुनियेंत नाहीं.

## १३०

२०-१-'४८

वीज गेल्यामुळें ध्वनिक्षेपक बंद पडला. दुबळ्या लहान आवाजांत गांधीजी बोलले आणि घेतलेल्या टिपणावरून त्याचा सारांश डॉ. सुशीला नायर यांनीं जमलेल्यांस मागून सांगितला. तो सारांश :

### विवेक राखा

दिल्लीनें मोठी गोष्ट केली आहे. शान्ति-पत्रकावर सह्या करणारांनीं सत्यस्वरूप परमेश्वराला साक्षी ठेवून सह्या केल्या आहेत, अशी मला आशा

आहे. हिंदुमहासभेच्या एका अधिकाऱ्यानें आपण अशा प्रतिज्ञेला बांधलेले नाहीं, असें म्हटल्याचें कानीं आलें. मला दुःख वाटतें. दिल्लीचे नागरिक आणि निर्वासित स्थिर राहतील, अन्यत्र कांहींहि घडलें, तरी जर विचलित झाले नाहींत, तर हिंदुस्थानला आणि पाकिस्तानला ते वांचवितील. दिल्ली प्राचीन शहर आहे. दिल्ली सत्यानें नि अहिंसेनें जर वागली, तर त्याचा परिणाम साऱ्या दुनियेला जाणवेल. मुंबईचें सरदारांचें भाषण जर तुम्ही काळजीपूर्वक वाचाल, तर सरदारांत आणि पंडित नेहरूंत व माझ्यांत दृष्टि-भेद आहे असें दिसणार नाहीं. आम्ही सारे एकाच ध्येयासाठीं धडपडत आहोंत. प्रत्येकाची मांडण्याची, बोलण्याची ढब निराळी असते इतकेंच. आमच्यांतील कोणीहि मुसलमानांचा शत्रु नाहीं. मुसलमानांचें शत्रुत्व करणें म्हणजे हिंदुस्थानचेंच शत्रुत्व करणें होय. कमींत कमी एवढीं तरी गोष्ट मी तुमच्यापासून अपेक्षितों, कीं आपल्याच हातांत कायदा घेऊन अमानुष कर्मे करूं नका. असें करणें म्हणजे समाजाचा अंत होय. सन्मान्य नागरिक या अर्थानें न्यायाचें काम आपापल्या लोकनियुक्त सरकारवर तुम्हीं सोपवणें आवश्यक आहे. जे अमेरिकन नीग्रोंना जिवंत जाळतात, मारतात, त्यांना तुम्ही रानटी म्हणतां. तुमचीं वर्तमानपत्रें आणि तुम्ही त्यांना वाटेल तीं नांवें ठेवतां. मग तशींच कृत्यें तुम्हीं केलींत तर तीं कां कमी रानटी ठरतील ?

मी आतां पाकिस्तानमध्यें जायला मोकळा झालों म्हणून म्हटलें खरें. परंतु मी शान्तिपुरुष आहें, मुसलमानांचा मित्र आहें, मी पाकिस्तानांत गेलों तर किती चांगलें होईल, असें पाकिस्तान-सरकारला अंतःकरणपूर्वक वाटत असेल, तरच माझें जाणें शक्य आहे. परंतु तें कांहीं असो. प्रवास झेपण्या-इतपत मी आतां बरा आहें असें डॉक्टरांनीं सांगेपर्यंत तरी मीं वाट पाहिलीच पाहिजे. त्यांचें म्हणणें असें, कीं पंधरा दिवस तरी अजून लागतील. मी प्रवाही आहारच अजून घेत आहे. इतर आहार अजून घेऊं शकत नाहीं. फळांचा रस, दूध आणि भाजीचें पाणी इतकेंच सध्यां घेतों नि तें पुरेसें आहे.

## प्रधानमंत्र्यांचें धीरोदात्त वर्तन

हिंदू आणि शीख निर्वासितांचीं दुःखें आहेत. परंतु लौकर मदत

मिळावी, सुखसोयी मिळाव्या म्हणून पंडित जवाहरलाल शक्य तें सारें करीत आहेत. त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे. दुःखितांसाठीं स्वतःचें आंथरूण देऊन स्वतःच्या अंगांत ऊब रहावी म्हणून रात्रभर फेऱ्या घालूं इच्छिणारा हा पंतप्रधान आहे. त्यांचें घर भरून गेलें आहे. हिंदुस्थानचे पंतप्रधान असल्यामुळें देशी-विदेशी पाहुण्यांची सोय करावी लागते. तरीहि निर्वासितांसाठीं एक दोन खोल्या मी देईन, ते म्हणाले. दुसरे प्रधान, अधिकारी, नि संपन्न माणसें या गोष्टीचें अनुकरण करतील, अशी मी अपेक्षा करतों. हिंदुस्थानच्या सर्वांत थोर अशा या पुढाऱ्याचें हें स्वार्थत्यागी उदाहरण सर्व जगभर प्रशंसिलें जाईल यांत शंका नाहीं. निराधार निर्वासितांचीं दुःखें लौकर संपतील अशी मी आशा करतों. या आपल्या सुंदर भूमीनें सेवा आणि त्याग यांची आश्चर्यकारक वृत्ति असलेल्या अशा थोर माणसांना जन्म दिला, हें पाहून तुमचीं हृदयें आनंदानें भरून यायला हवींत. जवाहर खरोखरचा जवाहर आहे. दुसरेहि असेच आहेत, कदाचित् थोडे कमी तेजस्वी. जनतेसाठीं तुमचे पुढारी असें सारें करीत असतां मुसलमानांना तुम्हीं थोडेंहि न दुखविणें तुम्हांला शोभून दिसेल. त्यांना दुखविणें म्हणजे पुढाऱ्यांना दुखविणें होय.

हिंदुस्थानांत संधिसाधु लोकहि आहेत. माझ्या उपवासाचाहि कांहींनीं धंदा केला नि पैसे मिळविले असें मला सांगण्यांत आलें. त्यांनीं नोटांचा धंदा सुरू केला नि गरिबांना भोळ्या लोकांना त्या विकल्या. पोट भरण्यासाठीं या लोकांना का दुसरा एकादा सन्मान्य धंदा नाहीं ? अशा तत्त्वहीन लोकांपासून लोकांनींहि सावध रहावें. फसून जाऊं नये.

## काश्मीरचा प्रश्न

लाहोरची एक तार आली आहे. तार पाठवणाऱ्यानें "काश्मीर फ्रीडम् लीगचे अध्यक्ष" अशी खालीं सही केली आहे. तारेंतील मजकूर पुढीलप्रमाणें :

"हिंदु-मुस्लिम-ऐक्यासाठीं आपण जें धीरोदात्त थोर कर्म केलेंत त्याची मी अत्यंत कदर करतों. आजच्या असंतोषाचें मूळ काश्मीर आहे. खरा समझोता होण्याच्या मार्गांतील ही अडचण आहे. खरोखरच शान्ति हवी असेल,

तर हा प्रश्न सर्वांत आधीं हातीं घ्यायला हवा. आक्रमक हिंदी फौजा मागें घेऊन, ज्या कोणाचा खरोखर काश्मीर असेल त्यांच्या हवालीं तो करणें, हाच एक समाधानकारक रीतीनें प्रश्न सोडवण्याचा मार्ग आहे."

या तारेनें मी व्यथित झालों. काश्मीरचा प्रश्न मिटला नाहीं, तर का मुसलमान हिंदू-शीखांना शत्रूच मानीत राहणार? आणि हिंदू-शीखांनींहि का त्यांना शत्रु मानावें? हिंदी फौजा आपण होऊन काश्मीरमध्यें गेल्या नाहींत. माझ्या माहितीप्रमाणें काश्मीरच्या महाराजांनीं आणि काश्मीरी मुसलमानांचे पुढारी शेख अबदुल्ला यांनीं हांक मारली, म्हणून हें सैन्य गेलें आहे. जर हल्लेखोर, टोळीवाले व इतर लोक माघारे जातील, आणि पूंच भागांतील बंडखोर आणि इतर काश्मीर यांना आपला प्रश्न सोडवायला मोकळें ठेवतील, जर बाहेरची मदत त्या बंडखोरांना देण्यांत आली नाहीं, तर हिंदी फौजा मागें न्या असें सांगण्याची योग्य वेळ येईल. ज्या कोणाचें काश्मीर कायदेशीर असेल त्याला तें मिळावें हें म्हणणें बरोबर आहे. परंतु हे कायदेशीर मालक कोण? महाराज तेथें आहेत. आणि हिंदी सरकार ही गोष्ट डोळ्यांआड कशी करूं शकेल? अखेरीस काश्मीरी जनतेनेंच आपलें भवितव्य निर्णायचें आहे. म्हणून तर मतनोंदणीची कल्पना.

## ग्वाल्हेर, भावनगर आणि काठेवाडी संस्थानें

रतलामहून एका ग्वाल्हेरी मुसलमानाची तार आहे. ती पुढीलप्रमाणें :

"उज्जयिनी जिल्ह्यांतील जहांगीरपूरचे आम्ही मुसलमान. १५ आणि १६ तारखेस आमच्या गांवाला हिंदूंनीं वेढा दिला आणि मारपीट केली. अनेक जखमी, एक मेला. आमचीं पिकें, घरेंदारें यांचा नाश. संस्थानचे अधिकारी कांहीं करीत नाहींत. आम्ही संकटांत, धोक्यांत. कृपेनें कांहीं तत्काळ दाद लावा, कांहीं व्यवस्था करा, ही प्रार्थना."

जर हा वृत्तांत खरा असेल, तर आपणां सर्वांस दुःख व्हायला हवें. जातीय शांति कोठेंहि बिघडली, तर आपणां सर्वांना नि आपल्या सरकारला खालीं मान घालणें प्राप्त आहे.

वर्तमानपत्रांत अशी बातमी आहे, कीं काठेवाडी राजेमहाराजे एक संस्थान करूं इच्छितात. हें शहाणपणाचें पाऊल टाकण्याबद्दल मी धन्यवाद

देतों. भावनगरच्या राजांचेंहि मी अभिनंदन करतों. कारण त्यांनीं संपूर्ण जबाबदार स्वराज्य जनतेला देऊन सर्वांना उदाहरण घालून दिलें आहे. जनतेचा पहिला सेवक म्हणून त्यांनीं स्वतःला जनतेच्या स्वाधीन केलें आहे.

## १३१

२१-१-'४८

## प्रार्थनेच्या वेळेस बॉंब

बुधवारीं सायंकाळीं प्रार्थनोत्तर बोलतांना आदल्या दिवशींच्या बिर्ला-भवनाच्या प्रांगणांतील बॉंबच्या स्फोटाविषयीं गांधीजी म्हणाले, चिंतापूर्वक विचारपूस केली जात आहे आणि त्या स्फोटाच्या वेळेस मी शांत राहिलों म्हणून माझी स्तुति केली जात आहे. मला प्रथम वाटलें, कीं लष्कराची प्रॅक्टिस चालली आहे, म्हणून चिंतेचें कारण नाहीं. प्रार्थनेनंतर मला कळलें, कीं तो बॉंबचा स्फोट होता आणि तो बॉंब माझ्यासाठीं होता. माझ्यावर बॉंब फेंकला जात आहे, त्याचा स्फोट होत आहे, अशा वेळेस मी कसा वागलों असतों ईश्वरालाच माहीत. म्हणून माझी स्तुति नको. अशा स्फोटाला बळी पडत असतांहि माझ्या तोंडावर जर हास्य राहील आणि बॉंब फेंकणाऱ्याविषयीं मनांत क्रोध-संताप राहणार नाहीं, तर प्रशस्तिपत्राला मी पात्र ठरेन. मला एवढेंच सांगायचें आहे, कीं ज्यानें बॉंब फेंकला तो एक असत्प्रवृत्त केलेला तरुण आहे. कोणीहि त्याचा तिरस्कार नये करूं. मी हिंदुधर्माचा शत्रु आहे असें बहुधा त्याला वाटत असावें. परंतु धर्मनाश कोणी करणारा असेल, तर त्याच्या नाशार्थ ईश्वर कोणाला तरी पाठवतोच असें गीता नाहीं का सांगत? या सुप्रसिद्ध श्लोकाचा विशेष असा अर्थ आहे. या तरुणाच्या लक्षांत यायला पाहिजे, कीं आपल्या मताचे नसणारे वाईटच असतात, असें नाहीं. जगांत सज्जनांच्या सहिष्णुतेमुळेंच वाईट लोक जगूं शकतात. जगांत कोणाहि स्त्री-पुरुषानें असें नये मानूं, कीं आपण इतके पूर्ण आहोंत, कीं पाप्याला शासन करायला आपणांलाच देवानें पाठवलें आहे! या तरुणाला असें बहुधा वाटलें असावें.

मला असें कळलें, कीं या तरुणानें परवानगीशिवाय एका मशिदीचा ताबा घेतला होता. त्याला दुसरीकडे कुठें रहायला जागा नव्हती. परंतु सध्यां पोलीस सर्व मशिदी खालीं करायला लावीत आहेत. या तरुणाला या गोष्टीचा राग आला. मशिदीचा ताबा घेणें ही या तरुणाची पहिली चूक आणि ज्या अधिकाऱ्यांनीं खालीं करायला सांगितलें त्यांचें न ऐकणें, ही दुसरी चूक.

## ही हिंदुधर्माची सेवा नव्हे

या तरुणाच्या पाठीमागें असणाऱ्यांना माझें सांगणें, कीं अशा कृत्यांपासून परावृत्त व्हा. हिंदुधर्माचें रक्षण करण्याचा हा मार्ग नव्हे. माझ्याच मार्गानें हिंदुधर्माचें रक्षण होईल. बालपणापासून मीं हिंदुधर्माचें आचरण केलें आहे. माझ्या दाईनें भुतेंखेतें पळावीं म्हणून मला रामनाम म्हणायला शिकविलें. नंतर पुढें ख्रिस्ती, मुसलमान वगैरेंशींहि माझा संबंध आला. दुसऱ्या धर्मांचाहि मीं बऱ्यापैकीं अभ्यास केला. परंतु मी हिंदुधर्मालाच चिकटून राहिलों. लहानपणीं हिंदुधर्मावर जितकी माझी श्रद्धा होती, तितकीच ती आजहि आहे. ज्या धर्मावर मीं प्रेम केलें, जो हृदयांत बाळगिला, ज्याचा आचार केला, त्या धर्माला वांचवण्यासाठीं ईश्वर मला साधन म्हणून वापरील, अशी मला श्रद्धा आहे. कांहीं असो. ईश्वराच्या हातांतील साधन म्हणून होण्यापूर्वीं धर्माच्या मूलभूत तत्त्वाशीं सतत परिचय हवा, तीं तत्त्वें नेहमीं आचरणांत यायला हवींत.

## बॉंब फेंकणाऱ्याची कींव करा

कांहीं शीख मित्र येऊन मला म्हणाले, कीं या कृत्याशीं शीखांचा कांहीं संबंध आहे असें नका मानूं. तो तरुण शीख नाहीं हें मला माहीत आहे. परंतु तो तरुण शीख, हिंदु, मुसलमान, कोणी असला म्हणून काय झालें ? मी सर्वांचें भलें चिंतितों. मीं पोलिसांच्या इन्स्पेक्टर जनरलसाहेबांना सांगितलें, कीं त्या तरुणाला कोणत्याहि प्रकारें त्रास नका देऊं. त्यांनीं त्याचें मन वळविण्याचा, त्याला सन्मार्गावर आणण्याचा, त्याला सद्विचारी बनावण्याचा प्रयत्न करावा. हा तरुण आणि त्याचे सल्लागार आपली चूक ओळखतील अशी मला आशा आहे. या आरोपीवर रागावूं नका असें तुम्हांला माझें

सांगणें आहे. आपण कांहीं वाईट करीत आहोंत याची त्याला कल्पना नव्हती. तुम्ही त्याची कींव करा. राष्ट्राच्या एका वृद्ध सेवकाला वांचवण्या-साठीं म्हणून त्याच्या उपवासासंबंधीं मनांत राग असूनहि जर शान्तीची प्रतिज्ञा तुम्हीं केली असेल, तर अपराध तुमचा आहे; त्या बॉंब फेंकणाऱ्या तरुणाचा नाहीं. परंतु याच्या उलट तुम्ही शांतीच्या प्रतिज्ञेवर अन्तःकरण-पूर्वक सही केली असेल, तर या तरुणासारखी मंडळी शेवटीं तुमच्या विचाराची झाल्याशिवाय राहणार नाहींत.

बॉंबचे स्फोट होवोत वा गोळ्यांचा वर्षाव होवो, तुम्ही सर्वजण शांतपणें प्रार्थनेंत रमाल अशी मी आशा राखतों. या तरुणाला अटक करायला एक अशिक्षित गरीब स्त्री कारणीभूत झाली हें ऐकून आनंद वाटला. जर हृदय शाबूत असेल, जर सद्विचार मनांत असेल, तर लिहितां-वाचतां येत नसलें म्हणून काय झालें ? या अशिक्षित स्त्रीच्या—तिच्या या साध्या नि सहज शौर्याबद्दल मी अभिनंदन करतों.

## भावलपूर आणि सिंध

भावलपूरच्या दुःखितांची चिठ्ठी आली आहे. मी त्यांना विसरलों नाहीं. आजच भावलपूरच्या नबाबसाहेबांची तार आली आहे. संस्थानांतील मुसलमानेतरांच्या संरक्षणासाठीं नि कल्याणासाठीं शक्य तें सर्व करीत आहें, असें ते तारेंत म्हणतात. मीहि माझ्या पद्धतीनें त्या कामाच्या मागें आहे.

सिंधमधील शीख निर्वासित मुंबईला आहेत. त्यांची एक तार आली आहे. " सिंधमध्यें इतस्तः विखुरलेले १५ हजार शीख आहेत. या सर्वांचा निःपात होण्याचा धोका आहे. त्यांचे प्राण, धर्म, संस्कृति, सारें संकटांत आहे. त्यांना त्वरित आणण्याची व्यवस्था करण्यांत यावी." शीखांचा निःपात मी कधींहि सहन करणार नाहीं. एका मनुष्याला शक्य तें सारें मी करीतच आहें. पंडित नेहरूंचें सरकारहि स्वतःच्या जबाबदारीच्या बाबतींत पूर्ण जागरूक आहे. सिंधचें सरकार नि पाकिस्तानचें सरकार यांना हांक मारून मी सांगतों, कीं त्यांनीं तेथील शीख रहिवाश्यांना आम्ही आमच्या प्राणांनीं तुमचें रक्षण करूं असें आश्वासन द्यावें. जर त्यांच्या रक्षणाची ते हमी देऊं शकत नसतील, तर त्या सर्वांना त्यांनीं एकत्र जमा करावें आणि त्यांना

त्वरित आणि सुरक्षितपणें पाठवण्याची व्यवस्था करावी. शीख ही शूरांची जमात आहे. आपल्या धर्माचें नि अब्रूचें रक्षण आपल्या हातीं असतें हें त्यांनीं ध्यानांत घ्यावें. कोणीहि तुमचा धर्म नि अब्रू हिरावूं शकणार नाहीं. माझे कांहीं पारशी मित्र आज सिंधला गेले आहेत.

## चुकीचें उदाहरण

उपवासांत मला एक पत्र आलें होतें. लेखक म्हणतो, "तुम्ही १९४२ च्या वेळेस तुरुंगांत होतां, तेव्हां देशांत थोडेफार हिंसक प्रकार झाले. आज उपवासांत तुम्हांला जर मरण आलें, तर देशांत हिंसेची एवढी प्रचंड लाट उसळेल, कीं मानवजात थरारेल. म्हणून मानवजातीसाठीं तरी उपवास सोडा." मी तुरुंगांत असतांना लोकांनीं हिंसेचा आश्रय घेतला ही गोष्ट खरी असली, तरी उपवासांतील माझ्या मरणाची लेखकाला भीति वाटते, त्या स्वरूपाचा परिणाम व्हावा असें मला वाटत नाहीं. परंतु उपवासाला आरंभ करण्यापूर्वी सर्वत्र यादवी माजण्याची, भ्रातृहत्येची भीति मीं बोलून दाखविली होती. प्रभु कृष्णाच्या मृत्यूच्या आधींच यादवांनीं यादवी करून सर्व संहार करून घेतला होता. परंतु असा परिणाम घडविण्याइतका मी मोठा नाहीं. मी सामान्य मर्त्य मनुष्य आहें. परंतु लोक यादवांप्रमाणें आळशी नि दुर्गुणी झाले असतील, तर ईश्वर माझ्यासारख्या सामान्य माणसालाहि निमित्त करून अशी महान् आपत्ति आणून सर्वांचा संहार करूं शकेल. मी स्वतःला ईश्वराच्या हातांत सोंपविलें असल्यामुळें परिणामाची चिंता मी फारशी करीत नसें. परंतु उपवासांत जें कांहीं मीं पाहिलें, त्यामुळें हिंदुस्थानचा असा सर्वनाश होणार नाहीं ही माझी आशा अधिकच बळावली.

शेवटीं दिल्लींत मुसलमान आतां मोकळेपणानें हिंडूं-फिरूं लागलेले पाहून मला समाधान होत आहे हें सांगतों. आत्मशुद्धीची प्रक्रिया चालू ठेवा. आपलीं हृदयें सत्यस्वरूप जिवंत परमेश्वराचीं मंदिरें बनवा.

## १३२

२२-१-'४८

आज उपवासानंतर प्रथमच गांधीजी सायंकाळीं प्रार्थनेच्या जागीं चालत



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

गेले. प्रार्थनोत्तर प्रवचनांत ते म्हणाले, "हळूहळू शक्ति येत आहे. आणि ईश्वराची इच्छा असेल, तर मी लौकरच पुन्हां पूर्ववत् होईन."

## पंडित नेहरूंचें उदाहरण

एका मित्रानें लिहलें आहे, कीं पंडित जवाहरलाल नेहरू, इतर मंत्री, अधिकारी, यांनीं आपापल्या घरीं निर्वासितांना जागा दिली, तरी खंडींत रतीइतकाच त्यांचा उपयोग. निर्वासितांचा प्रचंड प्रश्न त्यानें थोडाच सुटावयाचा आहे?" मलाहि हें मान्य आहे. सारे प्रधान नि अधिकारी जास्तींत जास्त कांहीं हजार लोकांना आश्रय देऊं शकतील; परंतु पंडित नेहरूंनीं जागा देतों म्हटलें याचें महत्त्व किती लोकांना जागा मिळणार यांत नसून हें पुढाऱ्यांनीं घालून दिलेलें उदाहरण सर्वस्पर्शी होईल, यांत आहे. जनतेसाठीं राजानें थोडेसें जरी केलें, तरी ब्रिटिश लोकांना त्याचें कौतुक वाटतें. पुढाऱ्यांच्या अशा कृत्यांची कदर नि कौतुक जगांतील सारे सुसंस्कृत लोक करीत असतात. पंडित जवाहरलाल नेहरूंनीं सर्व राष्ट्रासमोर उदाहरण ठेवलें आहे. आणि ही गोष्ट अधिकाधिक निर्वासित दिल्लीकडेच येत आहेत यावरून सिद्ध होत आहे. दिल्लींत आपणांस उत्तम रीतीनें वागवण्यांत येईल असें त्यांना साहजिकच वाटतें. पंडित नेहरूंचें उदाहरण किती लोकप्रिय आहे हें यावरून जरी दिसलें, तरी दुसरीहि एक गोष्ट यावरून दिसतें, कीं आपण अजून प्रमाणांत गोडी हें तत्त्व कांहीं शिकलों नाहीं.

## दारिद्र्याची लाज नको

दुसऱ्या एका गोष्टीकडे माझें लक्ष वेधण्यांत आलें आहे. जेव्हां काँग्रेस वनवासी होती तेव्हां तिनें सेवा, त्याग, साधेपणा यांचें ध्येय जनतेसमोर ठेवलें होतें. त्या काळांत एक लाख रुपये जमविणेंहि कठिण जाई. परंतु आज काँग्रेस-सरकारच्या हातीं कोट्यवधि रुपये आहेत; कोट्यवधि ते उभे करूं शकतात. परंतु आपण का ते तसे खर्चायचे? परकी सत्ता जाऊन देशी सत्ता आली, तरी खर्च का अवाढव्यच चालायचा? कांहीं लोकांना वाटतें, कीं हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं, वकिलांनीं, स्वतंत्र हिंदुस्थानला शोभेल अशा

रीतीनें खर्चिले पाहिजे, राहिलें पाहिजे; स्वतंत्र इंग्लंड, स्वतंत्र अमेरिका यांच्यावरोवर रुबाबानें नि ऐटदार वागण्यांत आपण स्पर्धा केली पाहिजे. परदेशांमध्यें हिंदुस्थानची प्रतिष्ठा राखण्याकरितां हा खर्च जरूर आहे असें यांना वाटतें. परंतु माझें तसें मत नाहीं. स्वातंत्र्य म्हणजे लवाजमा नव्हे, ऐट नव्हे. आपण आपल्याजवळ कापड असेल त्या मानानें बेतलें पाहिजे. आपली गरिबी लपवण्यांत अर्थ नाहीं. हिंदुस्थानची प्रतिष्ठा हिंदुस्थानच्या नैतिक श्रेष्ठतेवर आहे. निःशस्त्र प्रतिकारामुळें ती प्रतिष्ठा आलेली आहे. अजूनपर्यंत या बाबतींत ती स्पर्धातीत आहे. कारण इतर लहान-थोर राष्ट्रें आपापलें लष्करी सामर्थ्य नि प्रताप यांचाच अभिमान बाळगणारीं आहेत. त्यांचें तें भांडवल. हिंदुस्थानजवळ केवळ नैतिक भांडवल आहे, जें अधिक खर्चिल्यानें, अधिक वाढतें. सत्ता हातीं आली म्हणजे मूल्यमापनांत आम्ही क्रान्ति करूं, असें कॉंग्रेस म्हणे. तें अशानेंच करतां येईल. एरव्हीं कशानें नाहीं. मंत्री मोठमोठे पगार घेतात म्हणून जनता नांवें ठेवीत आहे. कृत्रिम असें ब्रिटिशांनीं येथें निर्माण केलेलें खर्चिक मान स्वाभाविक हिंदी जीवनाला शोभेल अशा रीतीनें खालीं आणलें जात नाहीं, म्हणूनहि लोक टीका करीत आहेत. परंतु मंत्र्यांच्या खाजगी जीवनाची या टीकाकारांना दखल नसते. दुसऱ्या कॉंग्रेसवाल्यांची गोष्ट मला सांगायची आहे. ते अधिक अपेक्षा करीत असतात. जे ते पूर्वी मिळवीत त्यापेक्षां किती तरी अधिक मिळावें असें त्यांना वाटतें. जो पूर्वी १५० रुपयांवर राही, आपला संसार भागवी, तो ५०० मागायला संकोचत नाहीं; एवढेंच नव्हे, तर तशी अपेक्षा करतो. या लोकांना वाटतें, कीं जुन्या सनदी नोकरांप्रमाणें लठ्ठ पगार न मागूं, तशा रुबाबानें नि ऐटीनें न राहूं, तसे पोषाक न करूं, तर लोक आपणांस मानणार नाहींत. परंतु हिंदुस्थानची सेवा करण्याचा हा तरीका नव्हे. माणसांची किंमत तो किती पैसे कमावतो यावर नसते, हें त्यांनीं विसरतां कामा नये. आत्मशुद्धीच्या कामांत त्यांनींहि सर्वांनीं सामील झालें पाहिजे; आणि आत्मशुद्धि सम्यक् विचार आणि सम्यक् आचार यांची अपेक्षा करते.

## पुन्हां ग्वाल्हेर

ग्वाल्हेर संस्थानांतील एका गांवच्या मुसलमानांच्या छळाविषयींची तार

मीं मागें सांगितली होती. प्रजामंडळाचे एक प्रतिनिधि काल प्रार्थनेनंतर मला भेटायला आले होते. महाराजांनीं जनतेला संपूर्ण स्वराज्य दिल्याबद्दल आशीर्वाद मागायला हे प्रतिनिधि आले होते. मीं त्यांना म्हटलें, संस्थानांत जातिभेद-धर्मभेद रहायचे असतील, तर असल्या राजकीय सुधारणांत मला काय राम वाटणार? महाराज व त्यांची प्रजा जर असले सारे भेद नष्ट करणार असतील, तर त्यांना आशीर्वाद देणें, त्यांचें अभिनंदन करणें, मला योग्य वाटेल; मुसलमानांविषयीं यत्किंचितहि तिटकारा वाटतां कामा नये. भंगी असो वा ब्राह्मण असो; राव असो कीं रंक असो; सर्वांना कायदेशीर-रीत्या समानतेनें नि समतेनें वागवलें गेलें पाहिजे. ती समता प्रत्यक्षांतहि दिसायला हवी. महाराज जर जनतेचे पहिले सेवक म्हणून राहतील, तर त्यांनीं नि त्यांच्या वंशजांनीं गादीवर रहावें नि जनतेची सेवा करावी, असें मी आनंदानें म्हणेन. राजे व प्रजाजन--दोघांनीं आत्मशुद्धि करावी. जगासमोर सरळ मान करून तरच उभें राहतां येईल, नि जगाची नैतिक उंची भारताच्या ताब्यांत सुरक्षित राहील.

१२३

२३-१-'४८

## नेताजींचा जन्मदिन

आज नेताजींची जयन्ती. गांधीजी प्रार्थनोत्तर त्यासंबंधीं आरंभीं बोलले. ते म्हणाले, " अशा तारखा सहसा माझ्या ध्यानांत नसतात. जन्म-मरणाच्या तारखांना मी फारसें महत्त्व देत नाहीं. मी या बाबतींत उदासीन असतों. असें करणें चूक कीं बरोबर मला माहीत नाहीं. परंतु आज मला आठवण करून देण्यांत आली. सुभाषबाबूंच्या जन्मदिनाचें स्मरण करायला विशेष कारण आहे म्हणून मला आनंद झाला. माझी अहिंसेवर श्रद्धा. नेताजींची नव्हती. परंतु सुभाषबाबूंजवळ प्रान्तीयता नव्हती, जातीयता नव्हती, हें मी कसें विसरूं? त्यांच्या त्या शूर सेनेंत हिंदुस्थानभरचे लोक होते, स्त्री-पुरुष होते. कोणताहि भेद नव्हता. त्यांच्याबद्दल त्या सर्वांना इतकी निष्ठा नि प्रेम

वाटे, कीं असें क्वचित्च कोणाला मिळालें असेल. एका वकील मित्रानें मला हिंदुधर्माची चांगली व्याख्या सांगा म्हणून म्हटलें. मी सनातनी हिंदु असलों, तरी हिंदुधर्माची व्याख्या करायला मी असमर्थ आहें. मीं त्या मित्राला म्हटलें, पुष्कळ वर्षांपासून कायदा मी विसरून गेलों आहे. धर्मांच्या शास्त्रांतहि मी पंडित नाहीं. परंतु सामान्य मनुष्य या नात्यानें मी म्हणू शकेन, कीं हिंदुधर्म सर्व धर्मांना मान दिला पाहिजे असें मानतो. माझ्या मतें सुभाषबाबू असें हिंदु होते. त्या महान् देशभक्ताचें स्मरण करून सर्वांनीं आपल्या अंतःकरणांतून जातीय कटुता झडझडून दूर करावी, अंतःकरणें शुद्ध करावींत.

## सावधगिरीचा इशारा

ग्वाल्हेर संस्थानांतील एका गांवच्या जातीय दंगलीविषयीं मी बोललों होतों. मीं प्रकरणाची चौकशी चालविली आहे. एक मनुष्य स्वतः त्या गांवीं गेला. त्याची तार आली आहे, कीं लूट, जाळपोळ, खून वगैरेंची ती बातमी अगदीं चूक आहे. तेथें एक खाजगी भांडण होतें एवढी गोष्ट खरी. परंतु त्याला जातीय तेढ असें स्वरूप नाहीं देतां येणार. जाळपोळ तर नव्हतीच. कोणी मेलेंहि नाहीं. या तारेनें मी आनंदलों आहें. मुसलमान मित्रांना माझें सांगणें, कीं अत्यंत काळजीपूर्वक त्यांनीं तक्रारी पाठवाव्या. अतिशयोक्ति कसोशीनें टाळायला हवी. स्वतःचे दोष वाढवावे, दुसऱ्याचे कमी करावे हा सुवर्णनियम जीवनांत असावा. आत्मशुद्धीचा हाच मार्ग. जे अतिशयोक्तींत आनंद मानतात, ते आपल्या जमातीला श्रेयोहीन करतात.

## म्हैसूर, जुनागड आणि मिरत

म्हैसूरची एक तार आली आहे. तेथें जातीय अशांतता आहे. माझ्या उपवासाचा तेथें कांहीं परिणाम नाहीं, असें तार म्हणते. हें ऐकून मला वाईट वाटलें. प्रत्यक्ष वस्तुस्थितीसंबंधानें म्हैसूर-सरकारनें पत्रक काढावें असा माझा सल्ला आहे.

जुनागडच्या अनेक वजनदार मुसलमानांचीहि एक तार आली आहे : " सरदारांनीं एक 'रीजनल कमिशनर' नेमल्यामुळें आम्हांला पूर्णपणें विश्वास

वाटत आहे. जुनागडच्या लोकांत आतां कोणी फूट पाडूं शकणार नाहीं. जुनागडचे मुसलमान इतर जनतेबरोबरच आहेत ही गोष्ट आम्ही सार्वत्रिक मतनोंदणीचे वेळेस सिद्ध करूं."

एक मीरतची तार आहे : "देशांत पूर्ण शांति रहावी म्हणून होणाऱ्या प्रयत्नाविषयीं आम्हांला पूर्णपणें आदर वाटतो. राष्ट्रीय मुसलमानांविषयीं आमच्या मनांत वाईट नाहीं. परंतु ते मुस्लिम लीगवाले मुसलमान जे कालपर्यंत शस्त्रास्त्रें जमा करीत होते आणि अजूनहि पाकिस्तानला मदत करण्याचे ज्यांचे विचार आहेत, ते हिंदी संघराज्याशीं निष्ठावंत राहतील, यावर आमचा विश्वास बसूं शकत नाहीं. त्यांच्यावर विश्वास ठेवाल, तर तुम्हांला पस्तावावें लागेल. धर्म नि राजकारण या भिन्न गोष्टी आहेत. अहिंसा राजकारणांत कधींहि काम देऊं शकणार नाहीं. आजचें सरकार आहे त्याविषयीं आमची तक्रार नाहीं. त्यांत बदल व्हावा असें वाटत नाहीं." अशा प्रकारचा हा मजकूर आहे. सरकारांत बदल व्हायचा प्रश्न कसा उत्पन्न झाला मला समजत नाहीं. आजचें सरकार कोणी बदलूं शकेल किंवा त्याची जागा कोणी भरून काढूं शकेल, असें मला वाटत नाहीं.

## देशद्रोह्यांचा प्रश्न

राजकारणांत अहिंसा चालत नाहीं हें फार उशीरां मला सांगण्यांत येत आहे. राजकारणांत अविश्वासानें कामाचा आरंभ नाहीं करतां येत. ज्यांच्या हातीं आज राज्यकाभार आहे ते धैर्यशाली पुरुष आहेत, त्यागी आहेत. प्रसंग आला म्हणजे देशद्रोह्यांचा ते बंदोबस्त करतील. देशद्रोही केवळ मुसलमानांतच नसतात. ते सर्व जातीजमातींतून आढळतात. तुम्ही भावाप्रमाणें मुसलमानांशीं वागायचें ठरवलें आहे, त्या निश्चयाला तुम्ही चिकटून रहा, एवढेंच मला सांगायचें आहे. लीगवाले सारेच वाईट नाहींत. ज्यांचें वर्तन संशयास्पद वाटेल, त्यांचीं नांवें सरकारला कळवा. सरकारला जितकें कडकपणानें त्यांच्याजवळ वागायचें असेल तितकें वागूं दे. तुम्हीच आपल्या हातांत कायदा कधींहि घेतां कामा नये. तो रानटीपणा होईल.

सदिच्छेच्या तारा अजून येतच आहेत. मी सर्वांचा आभारी आहें, म्हणून पुन्हां एकदां सांगतों. शांति नांदावी म्हणून त्या सर्वांची इच्छा

आहे. ती त्यांची इच्छा ईश्वरानें पुरी करावी म्हणून मी प्रार्थना करतों. व्यक्तिशः पोंच पाठविणें मला अशक्य आहे. तारा पाठवणारांनीं याची क्षमा करावी.

## १३४

२४-१-'४८

आज फारच गर्दी होती. गांधीजी येतांच त्यांना अभिवादन करण्यांत आलें. बायका आपसांत कुजबुजत होत्या. लहान मुलें रडत होतीं. शान्ति राखा म्हणून गांधीजींनीं पुन्हांपुन्हां बजावलें. थोडा वेळ सारें शांत होतें. प्रार्थना पार पडली. गांधीजींनीं पुन्हां एकदां सर्व स्त्रियांना शान्ति राखा म्हणून सांगितलें. त्यांचें भाषण सुरू झालें.

### कैद्यांची अदलाबदल आणि अपहृत स्त्रिया

ते म्हणाले, " एक पत्र आलें आहे. अपहृत स्त्रिया आणि कैदी यांची अदलाबदल व्हावी म्हणून दोन्ही राष्ट्रांचा करार होता. आरंभीं आरंभीं हा करार पाळण्यांत येत होता. परंतु हल्लीं तदनरूप वर्तन होत नाहीं, अशी पत्रलेखकाची तक्रार आहे. संस्थानांनीं सुद्धां याप्रमाणें वागावें असें पश्चिम पंजाब सरकारचें म्हणणें आहे. आणि तसें झाल्याशिवाय आम्ही करार पाळणार नाहीं, असाहि त्यांचा आग्रह. पश्चिम-पंजाब-सरकारच्या इच्छेला आक्षेप घ्यायची जरुरी आहे असें मला वाटत नाहीं; परंतु ही नवीन अट घालण्यांत येत असेल, तर तें बरोबर नाहीं. मित्रभाव ठेवायचा असेल, तर सर्व अपहृत स्त्रिया नि कैदी यांची अदलाबदल व्हायला हवी. संख्येचा विचार नाहीं करतां कामा. पश्चिम पंजाबांत अपहृत स्त्रियांची संख्या कदाचित् अधिक असेल; परंतु पश्चिम पंजाब जितक्या अपहृत स्त्रियांना पाठवील तितक्याच पूर्व पंजाबांतून पाठवायच्या, हें मला समजत नाहीं. समजा, पश्चिम पंजाब पाठवीत नसेल आणि पूर्व पंजाबांत अजून एक अपहृत स्त्री राहिली आहे, तर तिला का तुम्ही अडकवून ठेवणार ? असें करणें पाप आहे. वाईट वर्तनांत स्पर्धा, चढाओढ कशाला ? जर अंतःशुद्धि खरोखर हवी असेल, तर

मागील सारें विसरायला हवें. दोन्ही सरकारें एकमेकांवर अविश्वासाचा आरोप करीत आहेत. मला हें पाहून वाईट वाटतें. स्वतःच्या वर्तनाचा नीट हिशेब द्यायचा असेल, तर असें करणें बंद व्हायला हवें."

प्रार्थनासभेंत फारच गलबला होऊं लागला तेव्हां गांधीजी म्हणाले, "मला जें सांगायचें होतें तें सांगणें अशक्य आहे. मी आजचें भाषण पुरें करतों. परंतु स्त्रियांना माझें सांगणें आहे, कीं त्यांनीं शांत राहिलें पाहिजे. मुलें बरोबर असणाऱ्या स्त्रियांनीं दूर उभें रहावें म्हणजे शान्ति मोडणार नाहीं."

१३५

२५-१-'४८

आज रविवार होता. दररोज गर्दी वाढतच होती. परंतु आज बेसुमार होती. गांधीजींनीं प्रार्थनोत्तर प्रवचन सुरू केलें. ते म्हणाले, "उघड्या ओलसर जमिनीवर बसणें बरें नव्हे. येतांना गवताचें किंवा जाड खादीचें आसन आणीत जा."

## दिल्लींत शान्ति

दिल्लींतून रोज शान्तीचीं आश्वासनें येत आहेत. शहरांतील जातीय परिस्थितीबाबत चिंता करण्यासारखें विशेष नाहीं. हिंदू आणि मुसलमान मित्र म्हणाले, कीं हृदयांचें पुनरैक्य स्थापिलें जात आहे. लोकांना जाणीव झाली आहे, कीं भांडतच राहूं, तर उद्योगधंदा करणें कठिण होईल. मला हें ऐकून आनंद झाला. परिस्थिति सुधारत आहे. परंतु आणखी एक पाऊल पुढें टाका. येथें प्रार्थनेस येणाऱ्या प्रत्येक हिंदूनें आणि शीखानें आपल्या-बरोबर एक तरी मुस्लिम येतांना आणावा.

## मेहरौली येथील उरूस

मेहरौली येथें बखतियार चिस्तीचा दर्गा आहे. तेथें दरसाल उरूस भरत असतो. उद्यांपासून तो सुरू होणार आहे. दंगलीच्या काळांत दरग्याची



९९

नासधूस करण्यांत आली होती. कांहीं दगडी जाळ्या नेण्यांत आल्या होत्या. गेल्या कांहीं दिवसांत शक्य तेवढी दुरुस्ती करण्यांत आली आहे. पूर्वी उरुसांत हिंदू-मुसलमान दोघेहि भाग घेत असत. आजहि शान्तीनें, भक्ति-प्रेमानें हिंदू तेथें गेले, तरी ती केवढी मोठी गोष्ट होईल ! ज्या मुसलमानांना उरुसांत भाग घ्यायचा असेल, त्यांना पोलिसांच्या कमींत कमी साहाय्यानें जास्तींत जास्त संरक्षण मिळेल. त्यांचा अपमान कोणी करणार नाहीं, त्यांना कोणी सतावणार नाहीं, याची खबरदारी घेण्यांत येईल. तुम्ही सारेच या कामा-साठीं पोलीस बना. साऱ्या जगाचे डोळे तुमच्याकडे आहेत. साऱ्या जगांतून तारा येत आहेत. चीन, आफ्रिका, युरोप, अमेरिका सर्व ठिकाणांहून तुम्हीं जें कांहीं दिल्लींत करून दाखविलेंत त्याचें कौतुक करणाऱ्या, त्याची स्तुति करणाऱ्या या तारा आहेत. जगाला तुमच्यापासून ज्या अपेक्षा आहेत, त्या तुम्ही पुऱ्या कराल अशी मला आशा आहे. निःशस्त्र प्रतिकारानें लढून तुम्हीं १५ ऑगस्टला आपलें स्वातंत्र्य मिळविलेंत. जगाच्या इतिहासांतील ती अपूर्व वस्तु आहे. परंतु नंतर तुम्ही शापित होऊन हिंदू, मुसलमान, शीख सारे एकमेकांजवळ रानटीपणानें वागूं लागलांत. परंतु ती एक तात्पुरती वेडाची लहर होती, तो एक क्षणिक झटका होता, अशी मी आशा करतों. तुमचीं हृदयें शाबूत आहेत. तुमच्या मनांतील क्रोध-संताप उपवासानें दूर केला आहे असें वाटतें. रोग कायमचा बरा होवो. पुन्हां न उलटो.

## मला मोकळें करा

वर्ध्याला जायला आतां तुम्ही मला मोकळें करावें, तेथेंहि तुमचेंच काम करायला मी जात आहें. डॉ. राजेन्द्रप्रसादहि माझ्याबरोबर येणार आहेत. परंतु माझ्या गैरहजेरींत नीट वागण्याचें आश्वासन देत असाल, तर मी जाईन. तुमच्या आशीर्वादानें नि आश्वासनानें जाऊं इच्छितों. पाकिस्तानां-तहि जायची इच्छा आहे. परंतु कायदेशीर रीत्या पाकिस्तान परमुलुख आहे. पाकिस्तान-सरकारनें आमंत्रण न दिलें, तरी निदान त्याची संमति आणि अनुमति तरी हवी. तरच मी तिकडे जाऊं शकेन.

# भाषावार प्रान्तविभागणी

गेले दोन दिवस कॉंग्रेस-कार्यकारिणीची बैठक चालली आहे. भाषावार प्रान्त-पुनर्रचनेच्या प्रश्नावर चर्चा चालली आहे. पंडित जवाहरलाल आणि सरदार दोघेहि आज उपस्थित होते. कॉंग्रेसनें हें तत्त्व मागेंच स्वीकारलें आहे. हातीं सत्ता येतांच घटनात्मक रीतीनें या तत्त्वाची शक्य तितक्या लौकर अंमलबजावणी करूं असेंहि कॉंग्रेसनें जाहीर केलेलें आहे. अशी पुनर्विभागणी देशाच्या सांस्कृतिक विकासाला पोषक ठरेल, असें कॉंग्रेसचें मत आहे. परंतु देशाच्या प्राणमय ऐक्याच्या आड ही विभागणी बंड करून उठतां कामा नये. प्रान्तिक स्वायत्तता याचा अर्थ प्रान्तांनीं फुटून जावें, स्वेच्छेनें वागावें, एकमेकांचा, एवढेंच, काय मध्यवर्ती सत्तेचाहि विचार करूं नये, असा नाहीं. असा अर्थ असतांहि कामा नये. जर प्रत्येक प्रान्त स्वतःला स्वतंत्र सार्वभौम घटक मानील, तर हिंदी स्वातंत्र्याला कांहीं अर्थच राहणार नाहीं, एवढेंच नव्हे; तर या सर्व घटकांचें स्वातंत्र्यहि संपुष्टांत येईल.

हिंदी स्वातंत्र्याची कॉंग्रेसनें कल्पिलेली सनद ग्रामीण स्वायत्ततेवर उभारलेली होती. सर्व ग्रामांनीं मध्यवर्ती सत्तेपासूनच प्राण मिळवायचा आणि मध्यवर्ती सत्तेलाहि सर्व शक्ति नि सत्ता खेड्यांपासून मिळायची. स्वातंत्र्याचा अर्थ संकुचित प्रान्तीयता असा जर व्हायचा असेल, उद्यां प्रान्तांप्रान्तांत स्पर्धा आणि कटुता जर उत्पन्न होणार असेल, तर तें धोक्याचें आहे. तामीळ आणि आंध्र, मुंबई आणि कर्नाटक असे पृथक् प्रान्त होऊन एकमेकांशीं का भांडणार-झगडणार ? प्रान्तिक भाषांची संपूर्ण वाढ व्हायला हवी असेल, तर भाषावार प्रान्तरचना आवश्यक आहे. हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा होईल. परंतु ती प्रान्तीय भाषांची जागा घेऊं शकणार नाहीं. प्रान्तांमध्यें हिन्दुस्थानी भाषा शिक्षणाचें वाहन होऊं शकणार नाहीं; इंग्रजी तर नाहींच नाहीं. हिंदुस्थानशीं आपला सर्वांचा प्राणमय संबंध आहे याची जाणीव सर्वांना करून देणें, हें राष्ट्रभाषेचें काम. बाहेरचें जग तुम्हांला गुजराती, महाराष्ट्री, तामिळी अशा अर्थानें न ओळखतां

हिंदी म्हणून ओळखतें. म्हणून धैर्यानें नि निश्चयानें सर्व फुटीर वृत्ति आपण दडपून टाकली पाहिजे. आपण सारे हिंदी असें आपणांस वाटलें पाहिजे, या भावनेनें आपण वागलें पाहिजे. एवढें पथ्य सांभाळल्यावर मग भाषावार पुनर्रचना अहितकर न होतां शिक्षण, व्यापार, यांना ती चालनाच देईल.

## सीमा-समिति नको

नवीन पाया घालतांना सीमा ठरवायला सीमा-समितीची तुम्हांला जरूर भासेल, असें मला वाटत नाहीं. ही परकीयांची पद्धति. आपण परकीय पद्धतीचा त्याग केला आहे. उत्तम मार्ग हा, कीं त्या त्या प्रान्तांनीं अन्योन्य विचारानें, तडजोडीनें सीमा ठरवाव्या व त्या मुख्य प्रधानांमोर त्यांच्या अंतिम शिक्कामोर्तबासाठीं मांडाव्या. तें खरें स्वातंत्र्य होईल. तंटा मिटावा म्हणून सीमा-समितीसारख्या त्रयस्थ पक्षासमोर जाऊन उभें राहणें, म्हणजे स्वातंत्र्याचा अभाव होय. अन्योन्य सहकार, आंतर-अवलंबन हा मार्ग आपण चोखाळायचा आहे. हा मार्ग उत्क्रान्त करा, रूढ करा.

### १३६

२६–१–'४८

## स्वातंत्र्य-दिन

आज २६ जानेवारी, स्वातंत्र्यदिन. जें स्वातंत्र्य आपण पाहिलें नव्हतें, हाताळलें नव्हतें, ज्याच्यासाठीं आपण लढत होतों, त्या वेळेस हा दिवस पाळणें अत्यंत समुचित होतें. आणि आतां? आपण तें हाताळलें आणि आपला भ्रमनिरास झाला! तुमचा नसेल झाला. तरी माझा झाला आहे.

आपण आज काय साजरें करीत आहोंत? आपल्या भ्रमनिरासाचा का उत्सवसमारंभ? खात्रीनें नाहीं. आपण आशेचा महोत्सव करीत आहोंत. कसली आशा, कशाची आशा? आशा ही, कीं अति वाईटाचे दिवस गेले; आम्ही आतां अशा मार्गावर आहोंत, कीं जेथें गरिबांतल्या गरीब शेतकऱ्याला, खेडुतालाहि आम्ही सांगूं, कीं आजपासून तूं गुलामगिरींतून मुक्त

झालास. हिंदुस्थानांतील शहरांच्या आणि नगरांच्या सेवेसाठीं केवळ तूं जन्मलेला नाहींस; आतां नीट योजनाबद्ध उद्योगधंदे मांडूं; पक्का माल तुम्ही तयार कराल, तो आतां शहरांत खपेल; शहरें आतां तुमच्यासाठीं. तुम्ही खेडेगांवांतील श्रमणारे; तुम्ही राष्ट्राचा प्राण आहांत. तसेंच आतां अशी आशा राखूं या, येथें सर्व जातीजमातींचे नि पंथांचे लोक समानतेनें नांदतील; बहुसंख्य जमात अल्पसंख्य जमातीवर प्रभुत्व गाजवणार नाहीं; मग ती अल्प-संख्य जमात किती कां लहान नि क्षुद्र असेना. अशी आशा आज आपण पल्लवित करीत आहोंत, ती आशा दूर नका लोटूं; हृदय दुःखी, कष्टी नि निराश नका करूं. परंतु देशांतील हे संप, आणि हा नाना प्रकारचा बेकायदेशीरपणा, यानें ही आशा दूरच ढकलण्यांत नाहीं का येत ? आपल्या आजारीपणाचीं नि दुर्बलपणाचीं हीं लक्षणें आहेत. श्रमणाऱ्यांनीं आपली प्रतिष्ठा नि सामर्थ्य ओळखावें. भांडवलवाल्याजवळ श्रमणाऱ्यांशीं तुलना करण्याजोगी प्रतिष्ठाहि नसते नि सामर्थ्यहि नसतें. प्रतिष्ठा नि सामर्थ्य रस्त्यांतील माणसाजवळहि असतात. सुव्यवस्थित लोकशाही समाजांत बेकायदेशीरपणाची, संपाची, जरूरच असतां कामा नये. अशा समाजांत न्याय मिळावा म्हणून भरपूर कायदेशीर इलाज असतात. छुपा किंवा उघड अत्याचार अशा ससाजांत निषिद्ध ठरायला हवा. कानपूरचे संप, किंवा कोळशाच्या खाणींतील किंवा अन्य ठिकाणचे, यामुळें सर्व समाजाचें आर्थिक नुकसान होतें; स्वतः संप करणाऱ्यांचेंहि होतें. तुम्हीं अनेक यशस्वी संप लढवलेत आणि आतां तुम्हीच संप निषिद्ध मानतां, हें कसें, असें कोणी म्हणेल. असे टीकाकार कोणी असलेच, तर त्यांना माझें उत्तर हें, कीं त्या वेळेस स्वातंत्र्य नव्हतें किंवा आज आहेत तसे कायदेहि नव्हते. पूर्वेकडे काय नि पश्चिमेकडे काय, सत्तेच्या राजकारणाचा ज्वर सर्वांना सतावीत आहे. जो तो हातीं सत्ता मिळावी म्हणून सारें पणाला लावीत आहे. आपण या सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहूं शकलों, तर आश्चर्यच मानावें लागेल. हा आजचा विषय संपवण्यापूर्वी आपण अशी आशा कर-ण्याची मुभा घेऊं या, कीं जरी राजकीय नि भौगोलिक दृष्ट्या भारत दुखंड झाला असला, तरी अन्तर्यामीं आम्ही एकमेकांस मदत करणारे, एकमेकांस आदरणारे भाऊ नि मित्र म्हणूनच राहूं. बाह्य जगासमोर एक म्हणूनच वागूं.

# निर्नियंत्रण आणि वाहतुक

कापडावरचें नियंत्रण गेल्यामुळें सर्वत्र आनंद वाटत आहे. कापडाचा तुटवडा मुळीं कधींच नव्हता. भरपूर कापूस असतांना आणि भरपूर कांतणारे नि विणणारे असतांना कापडाचा तुटवडा कसा असेल? सर्पण आणि कोळसा यांच्यावरचींहि नियंत्रणें गेल्यामुळें लोकांना बरें वाटत आहे. बाजारांत गूळ तर आतां भरपूर येत आहे. गरिबाला शरीरांतील उष्णतेची उणीव भरून काढायला गूळ हेंच साधन. वाहतुक झपझप न झाली, गुळाचा उठाव न झाला, तर बाजारांत ढेपी पडूनच राहणार. गूळ सर्वत्र लौकर पोंचेल असें व्हायला हवें. यांतील माहीतगार असा एक पत्रलेखक लिहितो :

" नियंत्रणें उठवण्याचें धोरण तेव्हां यशस्वी होईल, जेव्हां रेल्वे व मोटार-वाहतुक कार्यक्षम अशी असेल. रेल्वे-वाहतुकींत सुधारणा न झाली, तर देशांत सर्वत्र दुष्काळ पडण्याची भीति आहे. नियंत्रणें उठवण्याचें धोरण कोलमडून पडेल. नियंत्रणें असोत वा नसोत, रेल्वेची आजच्या प्रकारें वाहतुक आहे ती केवळ धोका देणारी आहे. त्याच वस्तूचे देशाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळे दर आहेत. त्यांतील तफावत आश्चर्यकारक आहे, भयंकर आहे. याचें कारण वाहतुक नाहीं हेंच. रोहटक येथें ८ रुपये मण गूळ विकला जावा आणि मुंबईस तोच ५० रुपये मण विकला जात असेल, तर रेल्वेच्या वाहतुकीच्या कामांतच कोठें तरी मोठा दोष आहे, हें उघड आहे. देशांतील हजारों वॅगनी सारख्या कार्यव्यापृत ठेवल्या जात नाहींत. महिने महिने वाघणीमधील माल उतरवलाहि जात नाहीं. या वॅगनी देण्यांत पराकाष्ठेची लांचलुचपत चालू आहे. ‘ डब्बे फार नाहींत, कोळसा कमी, निरनिराळ्या मालापैकीं कोणता आधीं पाठवायचा, कोणता मागून अशी भानगड आहे ’ इत्यादि सबबींखालीं ही लांचलुचपत चालते. एक वॅगनभर माल पाठवायचा असेल, तर शेंकडों रुपये खर्चावे लागतात आणि रेल्वेच्या आवारांत दिवसानुदिवस रखडावें लागतें. वाहतुक-मंत्री पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहेत, ते कार्यक्षम आहेत, सारें खरें. परंतु त्यांच्या प्रयत्नांनींहि वॅगनी अधिक मिळूं लागल्या आहेत असा अनुभव नाहीं. त्या भराभरा सर्वत्र जात-येत आहेत असेंहि नाहीं. निर्नियंत्रणाचें धोरण यशस्वी करायचें

नगर वाचनालय सातारा

असेल, तर वाहतुक-मंत्र्यांनीं रेल्वे नि रस्ता-वाहतुकींत आमूलाग्र सुधारणा करायला हवी. असें होईल तरच निर्नियंत्रण आशीर्वाद ठरेल. गरिबांसाठीं नियंत्रणें दूर केलीं जात आहेत, परंतु त्या वेळेसच त्याला तीं उपकारक ठरतील. रेल्वे आणि रस्ता-वाहतुकींतील सदोषतेमुळें लक्षावधि, कोट्यवधि शेतकऱ्यांचें, खेड्डतांचें, श्रमजीवींचें नुकसान होत आहे. कारण त्यांचा मालच बाजारांत जाऊं शकत नाहीं.

मीं मागें लिहिलें होतें, कीं पेट्रोलचें रेशनिंग रद्द करायला हवें. तसेंच रस्ता-वाहतुकीसाठीं परमिट-पद्धति आणि मक्तेदारी या गोष्टीहि रद्द करायला हव्यात. या मक्तेदारीमुळें मूठभर वाहतुक-कंपन्या फायदा मिळवीत आहेत; परंतु लाखों, क्रोडों देशबांधवांची हलाखी होत आहे.

निर्नियंत्रणाच्या धोरणाचें ९५ टक्के यश रेल्वे आणि मोटार-वाहतुकीच्या कार्यक्षमतेवर केवळ अवलंबून आहे. रेल्वेच्या वॅगनी पडून राहतां कामा नयेत; तसेंच मोटार-लॉऱ्यांची मक्तेदारी, ती परमिट-सिस्टिम, आणि पेट्रोलची वांटपपद्धति हेंहि सारें रद्द व्हायला हवें. असें होईल, तर दूरच्या कोनाकोंपऱ्यांतूनहि लक्षावधि टन अन्नधान्यें व इतर पदार्थ देशांतील सर्व बाजारांमध्यें येऊं लागतील."

## लांचलुचपतीचा भस्मासुर

पत्रलेखकानें लांचलुचपतीचा उल्लेख केला आहे. गोष्ट नवीन नाहीं. परंतु पूर्वीपेक्षां वाढत्या प्रमाणावर ती आहे. बाह्य बंधन फारसें उरलेंच नाहीं. या वाईट संवयीला बळी पडलेले लोक 'देश आपल्यासाठीं नसून आपण देशासाठीं आहोंत' हें जेव्हां ओळखतील तेव्हांच लांचलुचपत नाहींशी होईल. उच्च दर्जाची नीति यासाठीं हवी. असल्या प्रकारापासून जे अलिप्त आहेत, आणि असल्या भ्रष्ट नोकरांचाकरांवर ज्यांचें वजन आहे त्यांनीं अत्यंत दक्ष रहायला हवें. अशा बाबतींतील औदासीन्य गुन्हा आहे. आपल्या या सायंप्रार्थना जर अंतःकरणपूर्वक असतील, तर आपल्यांतील हा लांचलुचपतीचा भस्मासुर दूर करण्यांत त्यांचाहि थोडाथोडका नाहीं उपयोग होणार.

२७-१-'४८

## मुसलमान आणि प्रार्थनावृन्द

आज मंगळवार. प्रार्थनोत्तर प्रवचन सुरू झालें. प्रार्थनेला मुसलमान हजर असतील त्यांनीं हात वर करावे, म्हणून म्हटलें. फक्त एक हात वर झाला. गांधीजी म्हणाले: माझी निराशा झाली. मीं तुम्हांस सांगितलें होतें, कीं प्रत्येक हिंदूनें नि शीखानें बरोबर निदान एक तरी मुसलमान मित्र आणावा. तुम्ही इतकें तरी कराल, असें मला वाटलें होतें.

## मेहरौली येथील उरूस

मी मेहरौली येथील दर्गा शरीफ (पवित्र दरगा)च्या दर्शनास आज सकाळीं गेलों होतों. उरुसाला मुसलमानांची बरीच गर्दी होती. आणि हिंदू व शीखहि तेथें तितकेच पाहून माझें हृदय आनंदलें. परंतु कांहीं बेताल अफवा पसरल्या गैरसमज पसरवणाऱ्या. त्यामुळें दरसालपेक्षां मुसलमान फारच कमी होते. मानवाला मानवाचें भय वाटावें, ही लज्जास्पद गोष्ट आहे. तेथील मोलवान् आरशांची, जाळ्यांची मोडतोड पाहून मला दुःख वाटलें. पाकिस्तानांत अशाच, याहूनहि वाईट गोष्टी घडल्या आहेत असें कोणी म्हणेल; परंतु हें उत्तर नव्हे. कलात्मक वस्तूंचा, मोलवान् वस्तूंचा असा विध्वंस करण्याइतका आपला अधःपात व्हावा का? इतक्या खालच्या थराला आपण येऊन पोंचावें हें किती वाईट! पाकिस्तानांत याहूनहि मोठ्या प्रमाणावर गोष्टी घडल्या आहेत असें गृहीत धरू. परंतु पाप कोण अधिक करतो अशी का तुलना करायची असते? सारें जग वाईट मार्गानें गेलें म्हणून कां आपण जावें? समजा, मी आज वाईट मार्गानें जाऊं लागलों, तर तुम्हांला वाईट नाहीं वाटणार? मला तर तें मरणाहून मरण वाटेल. त्याप्रमाणेंच दरग्याला केलेल्या नुकसानीबद्दल तुमचीहि मान खालीं व्हायला हवी. एका मित्रानें दरग्याचा इतिहास तुम्हांला सांगितलाच आहे. अशा पवित्र स्थानाविषयीं योग्य तो पूज्यभाव दाखविणें सर्वांना शोभून दिसेल.

## सीमाप्रान्तांत कत्तल

सीमाप्रान्तांत पेशावर जिल्ह्यांत पाराचिनार येथील छावणीवर पहाडी टोळ्यांनीं हल्ला चढविला. १३० निरपराध हिंदू आणि शीख मारले गेले, अशी बातमी आली आहे. अशा प्रकारांनीं क्रोध-संताप येणें साहजिक असलें, तरी तें बरोबर नाहीं. यात्रेंत जमलेल्या लोकांना मीं सांगितलें, कीं सूडबुद्धि हृदयांत लपलेली असेल, तर तुमच्या वतीनें म्हणून जो शांतता-करार करण्यांत आला आहे तो मोडला असें होईल. अशा बाबतींत योग्य तें करणें तुमच्या सरकारचें काम आहे. सामान्य जनतेनें शान्तच राहिलें पाहिजे.

## अजमीरचे हरिजन

श्रीमती राजकुमारी अमृत कौर अजमीरहून आल्या. त्या सांगत होत्या, कीं तेथील हरिजनांची वस्ती अत्यंत गलिच्छ आणि घाण अशा जागीं आहे. सवर्ण हिंदू आणि अधिकारीवर्ग यांची ही बेफिकिरी पाहून मी स्तिमित होतों. येथें दिल्लींतील हरिजनवस्तीहि घाणच आहे. परंतु अजमीरनें सर्वांस या बाबतींत मागें टाकलें आहे. राजकुमारी म्हणाल्या, हरिजनांना दिलेलें काम गलिच्छ असलें, तरी त्यांची उपेक्षा नाहीं होतां कामा. तत्काळ ही दुःस्थिति सुधारली जायला हवी.

## मीरपूरचे बळी

काश्मीरमध्यें मीरपूर जिल्हा आहे. आक्रमकांनीं तेथून स्त्री-पुरुषांना पळवून नेलें आहे. त्यांत तरुण मुलीहि होत्या. आक्रमकांनीं त्यांना छळलें. त्यांतील बऱ्याच जणींना पाकिस्तानांत नेल्याचें कळतें. आक्रमकांजवळहि थोडें-फार सभ्यतेचें नीतिशास्त्र असायला हवें. त्या नीतिशास्त्रांत स्त्रियांचें अपहरण ही गोष्ट तरी असतां कामा नये. मला मिळालेली बातमी खरी धरून मी पाकिस्तान-सरकारला हांक मारून सांगतों, कीं ह्या उघडउघड अन्यायाचें परिमार्जन करा. पंडित जवाहरलाल नेहरूंचें हृदय दुःखदग्ध झालें. त्यांचें सरकार शक्य तें करीतच आहे. इस्लामचा माझा जो कांहीं अभ्यास आहे त्यावरून वाटतें, कीं इस्लाम अशीं कर्में सहन नाहीं करीत. सरकारी यंत्राची आस्ते गति असते. मानवतेची हांक विलंब नाहीं सहन करीत.

२८-१-'४८

## भावलपूरच्या मित्रांना

आज बुधवार. सायंकाळीं प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले : कांहीं भावलपूरच्या मित्रांनीं लिहिलें आहे, कीं आम्ही तुमची भेट इच्छीत होतों, परंतु मिळाली नाहीं. मला भेटून त्यांना बरें वाटणार असेल, तर मी वेळ काढीन. ते दुःखांत आहेत हें मी जाणतों. मी त्यांना आश्वासन देतों, कीं शक्य तें सारें करण्यांत येत आहे. नबाबसाहेबांची तार आली आहे, कीं डॉ. सुशीला नायर आणि मिस्टर लेस्ली क्रॉस हे येथें येऊन पोंचले आहेत. तुम्ही धीर धरा. पुढें काय होतें तिकडे लक्ष ठेवा.

## दिल्लींतील शान्ति

राजधानींतील तिन्ही जमातींत शान्ति नांदत आहे. एकंदर सर्वच परिस्थिति यामुळें सुधारेल.

## दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं सत्याग्रह सुरू केला आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना तेथील निरनिराळ्या प्रांतांत मोकळेपणें जातां येत नाहीं. स्वाभिमानरक्षणार्थ सत्याग्रही नर-नारी व्होल कर्स्ट येथें जाऊन तेथें मोटारींत बसून जोहान्सबर्गला गेलीं, त्या ठिकाणीं त्यांनीं जाहीर सभा घेतली, हें शौर्यधैर्याचें निदर्शक असें पाऊल आहे. सारे सत्याग्रही योग्य रीतीनें वागतील, तर यश त्यांचें आहे. अजून सरकारनें धरपकड केलेली नाहीं. परंतु चळवळ वाढत गेली, तर धरपकड होईलच. परंतु जोंवर चळवळ शांततेनें चालवण्यांत येत आहे, तोंवर जुलूमजबरदस्तीचें सरकारला कांहीं कारण आहे, असें वाटत नाहीं. गौरेतरांजवळ बोलणीं करायला गोऱ्यांना कमीपणा कां वाटावा ? अधिकाऱ्यांनीं सत्याग्रही पुढाऱ्यांना बोलवावें आणि त्यांचें रास्त मागणें मान्य करावें. ब्रिटिश राष्ट्रसंघांतील इतर घटकां-

करून हिंदुस्थान नि पाकिस्तान हे जे दोन नवीन घटक, त समान आणि स्नेहाच्या नांदवणुकीची अपेक्षा करीत आहेत. आणि यांत चूक काय आहे? परंतु केवळ रंगामुळें दक्षिण आफ्रिकन सरकार हिंदी लोकांना जर कमी मानीत असेल, तर तें चूक करीत आहे असें म्हणण्याला मला प्रत्यवाय वाटत नाहीं. ब्रिटिश राष्ट्रसंघांतील घटकांनीं आपसांत भांडणें, मी कल्पूंच शकत नाहीं.

## म्हैसूरमधील मुसलमान

म्हैसूरवर तुमच्या उपवासाचा परिणाम नाहीं, अशी म्हैसुरी मुसलमानांची तार आल्याचें मीं त्या दिवशीं सांगितलें होतें. आतां संस्थानाच्या गृहमंत्र्यांची तार आली आहे. ते म्हणतात : तुम्हांला दिलेली माहिती चूक आहे. उपवासाचा गंभीर परिणाम येथें झाला आहे. येथील तंग वातावरण त्यामुळें निवळलें आहे. कांहीं अशांतता बंगलोर शहरांतल्या भागांत होती, परंतु पोलिसांना गोळीबार करावा न लागतांच ताबडतोब शान्ति निर्माण करण्यांत आली. लाठीहल्लाहि करावा लागला नाहीं. बाकी इतरत्र सर्व संस्थानांत संपूर्ण शांति आहे. कोठेंहि जातीय तेढ नाहीं.

एका मुसलमान बंधूचीहि तार आली आहे : प्रार्थनासभेंत आमच्या दुःखाला वाचा फोडलीत म्हणून आम्ही तुमचे आभारी आहोंत. सरकार आतां जागें झालें आहे. त्यांनीं लगेच पत्रक काढलें आहे. मुसलमानांची आगळीक नव्हती हें त्या पत्रकानें सिद्ध होत आहे. तार पुढें म्हणते, कीं देशांतील सरकारशीं आणि देशाशीं मुसलमान सदैव निष्ठेनें वागत आले आहेत, त्यांना सरसि हाकलून लावणें थांबविलें पाहिजे. माझें मुसलमान मित्रांना आणि इतरांनाहि सांगणें, कीं अतिशयोक्ति नका करूं. थोडें कमी करूनच सांगावें. अन्योन्य सहकारानें नांदायला सर्व जातीजमातींनीं हा नियम पाळावा. माझ्या दीर्घकालीन अनुभवानें मी हें सांगत आहें.

## दात्यांना दोन शब्द

हरिजन-कार्य किंवा अशाच कामासाठीं कोणीकोणी साध्या पाकिटांतून पैसे पाठवतात. एकदां माझ्या वडिलांनीं मला साध्या टपालानें मोलवान्

खडा पाठवला होता. आणि मागून काळजी वाटूं लागल्यामुळें पोंचला कीं नाहीं म्हणून त्यांनीं तार केली. त्याचप्रकारें आतां एका मित्रानें हजारांची एक नोट साध्या पाकिटांतून पाठवली आहे. समजा, पाकीट मध्येंच लांबवलें गेलें असतें, तर हरिजन-कार्याचें आणि देणाराचें तितकें नुकसान झालें असतें. अशा देणग्या सुरक्षित येतात, यावरून पोस्ट ऑफिसचा प्रामाणिकपणा मात्र सिद्ध होतो. मी पोस्ट ऑफिसमधील लोकांना मनःपूर्वक धन्यवाद देतों आणि जनतेजवळ वागतांना इतर खात्यांनींहि असाच उच्च दर्जाचा प्रामाणिकपणा दाखवावा असें सांगतों. परंतु दात्यांनाहि सूचना देतों, कीं असा उगीचच्या उगीच धोका त्यांनीं पत्करूं नये. इतरांना मोह पडेल असें करूं नये. असे पैसे मनीऑर्डरनें किंवा इन्शुअर करून पाठवण्यांत यावेत. जरूर तर त्यास जो खर्च येईल, तो देणगींतून त्यांनीं कमी करावा.

## १३९

२९-१-'४८

# भावलपूरला शिष्टमंडळ

आज गुरुवार सायंकाळीं प्रार्थनोत्तर बोलतांना गांधीजी म्हणाले : फ्रेंड्स युनिट संस्थेचे श्री. लेस्ली विल्सन् यांच्याबरोबर डॉ. सुशीला नायर भावलपूरला गेल्या. लेस्ली विल्सन् हे देवाचे माणूस, सर्वांचे मित्र. त्यांनीं आपण होऊन तिकडे जायची तयारी केली होती. तेव्हां सुशीला नायर यांनीं त्यांना विचारलें मीहि येऊं का तुमच्याबरोबर ? नोआखालींत काम करतांना फ्रेंड्स युनिटशीं त्यांचा परिचय झाला होता. पंजाबमधील गुजरात गांवच्या त्या. त्यांचें कुटुंब मुसलमानांच्या मैत्रीविषयीं प्रसिद्ध होतें. परंतु अनेक दुःखद आपत्ती या कुटुंबाला भोगाव्या लागल्या, तरीहि डॉ. सुशीला यांचें मन विषमय झालें नाहीं. त्यांना स्थानिक भाषा येते. जायला भीतीहि त्यांना वाटत नव्हती. मी श्री. लेस्ली क्रॉस यांचेजवळ बोललों. त्यांनीं आनंदानें रुकार दिला. जाणाऱ्या या दोघांत मुख्य श्रेय कोणाला, असा मला प्रश्न करण्यांत आला. श्री. क्रॉस हे माझे थोर मित्र आहेत आणि श्रीमती सुशीला मला

मुलीसारखी. दोघांना एकमेकांविषयीं आदर आणि दोघें सेवाभावानें गेलीं. तेथील परिस्थितीचा अभ्यास करून येथें येऊन मला अहवाल सादर करण्यासाठीं दोघें गेलीं. निरपेक्ष सेवेंत भेदभाव नसतो; परंतु फरक करायचाच असेल, तर अर्थातच दोघांत श्री. लेस्ली क्रॉस हे मुख्य होत.

## त्यांचा सेवक

आज तिसरे प्रहरीं बन्नूहून आलेल्या निर्वासितांचें ४० जणांचें एक शिष्टमंडळ भेटायला आलें होतें. गरीब बिचारे. त्यांची विपन्न दशा होती. त्यांचें दर्शन मला मोलाचें वाटलें. मला दुसरें काम असल्यामुळें मीं त्यांना म्हटलें, तुमचें म्हणणें श्री. व्रजकृष्णांना सांगा. ते टिपून घेतील. आणि त्यांनीं तें ऐकलें. त्यांचा चांगुलपणा. त्यांच्यांतील एकजण मात्र म्हणाला, "आमच्या साऱ्या आपत्ती तुमच्यामुळें." नंतर रागानें मला म्हणाला, "सारें सोडून तुम्ही हिमालयांत जा ना!" मीं त्याला म्हटलें, "कोणाच्या आज्ञेनें मी जाऊं?" कांहींजण चिडले. कांहीं त्याला दोष देऊं लागले. कांहींनीं माझ्या प्रयत्नांची स्तुतीहि केली. हृदयाच्या आंतील गाभाऱ्यांत परमात्मा असतो. तो सांगेल त्याप्रमाणें वागणें हाच एक माझा मार्ग. त्या शिष्टमंडळांत स्त्रियाहि होत्या. मला तर ते सारे बहीणभाऊ वाटले. ईश्वरच एक आपला खरा मित्र. आपण सारे त्याच्या हातांत. हिमालयांत जाऊन तेथील शांति अनुभवण्याची मला चिंता नाहीं. येथील आगींत राहूनच जी काय शांति मला मिळवतां येईल, तिनें मला समाधान आहे. म्हणून तुमच्यांत राहणें मी पसंत करतों. परंतु तुम्ही सारेच हिमालयांत जायला निघालेत, तर तुमचा सेवक या नात्यानें तुमच्या पाठोपाठ तेथेंहि यायला मी निघेन.

## भाकरीसाठीं काम

निर्वासितांना अन्न, वस्त्र, निवारा जरी देण्यांत आला, तरी काम करण्याची त्यांची वृत्ति नाहीं, अशा तक्रारी येतात. मनुष्य आपत्तींत असेल, तर त्याच्या सुखाची किल्ली काम करण्यांत आहे. ईश्वरानें मानवाला खाण्यापिण्यासाठीं, मौज मारण्यासाठीं नाहीं निर्मिलें. गीता सांगते यज्ञ (भाकरीसाठीं काम) करा आणि मग यज्ञशिष्ट घ्या. काम न करतां

खाणारे लक्षाधीश बांडगुळें होत. त्यांनींहि निढळाच्या घामानें खाल्लें पाहिजे, नाहीं तर उपाशी रहावें. जे अपंग आहेत, त्यांचाच फक्त अपवाद. समाजानें त्यांची तरतूद करावी. निर्वासितांसाठीं नानाविध काम आहे. संडास साफ करणें, सर्वत्र सफाई, सूत कांतणें, इतर उद्योग. प्राप्त परिस्थितीचाहि जास्तींत जास्त उपयोग करून घ्यायला शिकलें पाहिजे.

## किसान

माझें म्हणणें कोणीं ऐकतें, तर आपला गव्हर्नर जनरल आणि आपला पंतप्रधान किसानांतील असता. लहानपणीं शाळेंतील पाठ्य पुस्तकांत मीं वाचलें होतें, कीं पृथ्वीवरील राज्याचे किसान हे वारसदार. हें त्यांना अर्थात् लागू, जे शेतांत स्वतः काम करतात आणि जें पिकतें त्यांतून खातात. असे किसान निरक्षर असले म्हणून काय झालें? त्यांचे व्यवहार-ज्ञान चांगलें असेल, शौर्यधैर्यानें ते संपन्न असतील, धुतल्या तांदळासारखे निर्दोष नि प्रामाणिक असतील, संशयातीत देशभक्ति बाळगणारे असतील, तर आणखी काय हवें? संपत्तीचे खरे ते उत्पादक. ते खरे धनी असून आम्हीं त्यांना गुलाम केलें आहे. सेक्रेटरिएटमधल्याहि उच्च जागा किसानांना मिळाव्यात म्हणून मला सुचवण्यांत आलें. अपेक्षित कामाचें जर त्यांना ज्ञान असेल, ते त्या कामाला अनुरूप असतील, तर माझा या सूचनेस पाठिंबा आहे. अशा प्रकारचे किसान पुढें येऊं लागले, तर मी जाहीरपणें प्रधानांना आणि इतरांना त्यांच्यासाठीं जागा खालीं करा म्हणून सांगेन.

## मद्रासेंत अन्नधान्याचा तुटवडा

मद्रासकडे अन्नधान्याचा तुटवडा आहे. मद्रास सरकारचे प्रतिनिधी श्री. जयरामदासांकडे आले आहेत. मद्रास प्रांताला अन्नधान्याचा पुरवठा व्हावा म्हणून ते व्यवस्था करायला आले आहेत. परंतु ही वृत्ति मला आवडली नाहीं. मद्रास प्रांतातील लोकांच्या मनावर मला ठसवण्याची इच्छा आहे, कीं त्यांच्या प्रांतांतच त्यांना पुरेसें अन्न भुईमूग, नारळ आणि अशा अनेक खाद्यवस्तूंच्या द्वारें मिळूं शकेल. आणि मासेहि पुरेसे आहेत. बहुतेक लोक मासे खातातच. मग हातांत भिक्षापात्र घेऊन त्यांनीं बाहेर कां पडावें?

त्यांनीं तांदुळाचाचें आग्रह धरतां कामा नये. आणि पांढऱ्या फटफटीत तांदळाचा तर नयेच धरूं. तसल्या तांदुळांत सत्त्वांश मुळींच नसतो. तांदूळ नसेल, तर गहूं चालेल, असेंहि जणूं उपकार होतील अशा वृत्तीनें मागूं नये. तांदळाच्या पिठांत त्यांनीं भुईमूग, किसलेला नारळ मिसळावा आणि भुकेचा लांडगा दूर ठेवावा. आत्मविश्वास आणि स्वावलंबन यांची त्यांना खरी जरूर आहे. मी मद्रासी बंधूंना नीट ओळखतों. दक्षिण आफ्रिकेंत माझ्या सत्याग्रही दलांत मद्रास इलाख्यांतील सर्व भाषा बोलणारे लोक होते. जेव्हां सत्याग्रही कूच सुरू झालें, तेव्हां माणशीं त्यांचें रोजचें खाणें १।। पौंड ब्रेड आणि एक औंस साखर इतकेंच असे. रात्रीं जेथें मुक्काम पडे, तेथें हे सत्याग्रही आजूबाजूच्या गवतांतून नाना भाजीपाला आणीत, शिजवीत, गाणीं गात. तें पाहून मला आनंद होत असे. असे योजक आणि कधींहि न अडणारे लोक आजच अगतिक कसे बनले ? आपण सारे श्रमजीवी आहोंत हें खरें आहे. प्रामाणिक श्रमांत आपला मोक्ष आहे, त्यांतच सर्व आवश्यक गरजांची पूर्ति आहे.